# महानगरपालिका औरंगाबाद

## स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत

**दिनांक १६-०४-१९९८ ते ११-११-१९९८**

## रजिष्टर क्र. ०८

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.*

**दि. १६-०४-९८ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. मा. श्री. प्रभाकर विधाते सभापती स्थायी समिती यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभा दि.१६-०४-९८ रोजी दुपारी ठिक ४.०० वा. सभा संपन्न झाली तिचे इतिवृत्त सभेची सुरुवात "वंदे मातरम्" या गिताने झाली सभेस रजिस्टर प्रमाणे स. सदस्य तथा अधिकारी उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. म.अ. रऊफ म. अ. माबूद | स. सदस्य |
| २) | श्री. स. अली मिरा सलामी | -//- |
| ३) | श्री. संजय जोशी | -//- |
| ४) | श्री. गौतम लांडगे | -//- |
| ५) | श्रीमती यशोदा वाडेकर | -//- |
| ६) | श्री. गांगवे बन्सी | -//- |
| ७) | श्री. जयवंत (बंडु) ओक | -//- |
| ८) | श्री. इंगळे रविंद्र बाबुराव | -//- |
| ९) | श्री. जैन विकास रतनलाल | -//- |
| १०) | श्री. ढगे नरसिंग मुरलीधर | -//- |
| ११) | सौ. तळेकर राधाबाई सखाराम | -//- |
| १२) | श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | -//- |
| १३) | श्री. बचाटे राजकुमार (सांडु मामा) | -//- |
| १४) | श्री. विखारोद्दिन पि. खुदबोद्दिन | -//- |
| १५) | श्री. स. अ. एकबालोद्दिन स. मो. कुतूबुबोद्दिन | -//- |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१(१) व (५) अन्वये सभापती पदासाठी निवड करणे.

**संवाद :**

**मा. सभापती :** स्थायी समिती सभापती पदाच्या निवडणूकीसाठी ज्या उमेदवारांना फॉर्म परत घ्यावयाचा आहे. त्यासाठी त्यांना अर्ध्या तासाचा अवधी देण्यात येतो (वेळ अंदाजे ४=०५) तो पर्यंत सभा तहकूब करण्यांत येते.
(सभेला सुरुवात अंदाजे ४=३५ वाजता) आता सभापती पदाच्या निवडीसाठीच्या उमेदवारी फॉर्म परत घेण्याची वेळ संपलेली आहे. त्यानुसार श्री. जयवंत ओक व श्री. मिरा सलामी हे दोन उमेदवार रिंगणात आहेत.

**श्री. नरसिंग ढगे :** सभागृहात आवाजी मतदानाने हात उंचावून सभापती पदाची निवडणूक घेण्यात यावी यासाठी स. स. श्री. जयवंत ओक यांचेसाठी.

श्री. विकास जैन - सुचक
श्री. संजय जोशी - अनुमोदक

**मा. सभापती :** आवाजी मतदानासाठी स. स. श्री. जयवंत ओक बाबत स. स. श्री. विकास जैन, हे सुचक व श्री. संजय जोशी यांनी अनुमोदक म्हणून सूचना केली. त्यानुसार सभागृहात हातवर करावे (त्यानुसार सभागृहात)

श्री. जयवंत ओक यांना १० मते तर
श्री. मिरा सलामी यांना ०३ मते पडतात.

त्यानुसार स. सदस्य श्री. जयवंत ओक आवाजी मतदानाने सभापती पदासाठी १० विरुध्द ३ मतांनी विजयी होतात. विजयी सभापती पदांचे स्वागत सभागृहात केल्या जाते. या बरोब "जन गन मन" राष्ट्रगितने सभा संपते.

स्वाक्षरीत/-
नगर सचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
मा. सभापती,
स्थायी समिती,
महानगरपालिका, औरंगाबाद

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.*

**दिनांक २८-०५-९८ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. मा. सभापती श्री. जयवंत बंडु ओक यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समितीची बैठक दि. २५-०५-९८ रोजी संपन्न झाली तिचे इतिवृत्त बैठकीची सुरुवात "वंदे मातरम्" या गिताने दु.३.१० वा. झाली बैठकीस खालील स. सदस्य उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. प्रभाकर सिताराम विधाते | स. सदस्य |
| २) | श्री. अ. रऊफ म. अ. माबूद | -//- |
| ३) | श्री. स. अली मिरा सलामी | -//- |
| ४) | श्री. संजय जोशी | -//- |
| ५) | श्री. गौतम लांडगे | -//- |
| ६) | श्री. गांगवे बन्सी तुळशीराम | -//- |
| ७) | श्री. इंगळे रविंद्र बाबुराव | -//- |
| ८) | सौ. यशोदा वाडेकर | -//- |
| ९) | श्री. ढगे नरसिंग मुरलीधर | -//- |
| १०) | श्री. जैन विकास रतनलाल | -//- |
| ११) | सौ. राधाबाई तळेकर | -//- |
| १२) | श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | -//- |
| १३) | श्री. बचाटे राजकुमार (मामा) | -//- |
| १४) | श्री. विखारोद्दिन पि. खुदबोद्दिन | -//- |
| १५) | श्री. स. अ. एकबालोद्दिन स. मो. कुतूबुबोद्दिन | -//- |

**संवाद :**

**मा. सभापती :** या ठिकाणी स्थायी समितीची सभा असुनही संबधित कर्मचारी उपस्थित नाही. व माईक तथा स्पिकरची व्यवस्था केलेली नाही. (यावेही मा. सभापतींना विद्युत व्यवस्थेसंबंधी कार्यालयीन आदेश काढण्याचे नगर सचिव यांनी दाखविले.) यापुढे असे होता कामा नये. माईक व स्पिकरची कायमची व्यवस्था व्हावी. वेळेवर धावपळ होऊ नये. यांची संबंधिताने दक्षता घ्यावी.

**श्री. संजय जोशी :** प्रशासनाचा कार्यभार अतिशय गोंधळाचा आहे. यावरून आपणांस दिसून येईल. कर आकारणी-२ येथे कार्यरत असलेले कर्मचारी श्री. एम. एम. खान, कनिष्ठ अभियंता सध्या कोणत्या ठिकाणी कामाला आहेत. याची माहिती द्यावी. हजेरी पट एका ठिकाणी व काम दुसऱ्या ठिकाणी अशा प्रकारचे प्रशासन कर्मचाऱ्यांकडून काम करून घेते काय? कर्मचारी ज्यांच्या अधिपत्याखाली काम करीत असेल त्याचेच सुचनेवरून काम करीत असेल. परंतु त्या विभागात तसे नाही असे दिसून येते. याची प्रशासनाने माहिती द्यावी.

**उप आयुक्त (प्र.) :** कर आकारणी-२ श्री. राजपुत टी. डी. यांच्या अधिपत्याखाली श्री. एम. एम. खान काम करतात.

**श्री. संजय जोशी :** प्रशासन डोळेझाक करीत आहे. श्री. एम. एम. खॉन कर आकारणी-२ येथे काम करीत नसून इतरत्र म्हणजे कर आकारणी-१ चे काम करतो.

**मा. सभापती :** ज्या कर्मचाऱ्यांस जे काम दिलेले आहे, तेच काम करतील. इतरत्र कुणीही काम करू नये. याबाबत सविस्तर अहवाल पुढील स्थायी समितीच्या बैठकीत द्यावा.

**श्री. संजय जोशी :** श्री. खॉन एम. एम. यांची बदली कर आकारणी-२ कडे असून कर आकारणी-१ कडे काम कसे करतात. याची माहिती द्यावी.

**श्री. गौतम लांडगे :** स. सदस्य श्री. जोशी यांच्या म्हणण्यानुसार संबंधित कर्मचारी इतरत्र काम करू नये असे आहे.

**उप आयुक्त (प.) :** वेळोवेळी मा. आयुक्त यांचे वेगवेगळे आदेश निघाले जातात. त्यानुसार संबंधित विभाग प्रमुख कार्यवाही करीत असते.

**मा. सभापती :** संबंधित कर्मचारी जर विभाग प्रमुखांच्या सुचनेवरून काम करीत आहे काय? याची शहानिशा करून प्रशासनाने पुढील बैठकीत माहिती द्यावी. जर स्वत:च्या मनप्रमाणे काम करीत असल्यास त्यांचेवर कार्यवाही केली जाईल.

**श्री. स. अली. मिरा सलामी :** संबंधित कर्मचाऱ्यांस जे काम दिल्या जाईल तेच काम करतील. त्यानंतरही कार्यवाही कुणार करणार?

**श्री. संजय जोशी :** ज्या कर्मचाऱ्यांचे आदेश ज्या विभागासाठी झालेली असेल. त्या कर्मचाऱ्यांने त्याच विभागाकडे काम करावे. असे प्रशासनाने ठरविले पाहिजे.

**श्री. प्रभाकर विधाते :** प्रशासनाकडे कर्मचारी वर्ग अपुरा आहे काय? किंवा श्री. खॉन दोन्हीहीकडे काम करतो काय? याचे कारण काय आहे.

**श्री. संजय जोशी :** सिटी चौकच्या मागील बाजूस जो शहागंजकडे रस्ता जातो. तेथील एका घराचे भूसंपादन महानगरपालिकेने केले. परंतु त्या घराचे व एकंदर तेथील सर्व वस्तु उदा. लाकडे, दरवाजे, खिडक्या यांची किंमत किती काढली याची माहिती द्यावी. माझ्या माहितीप्रमाणे सुट्टीच्या दिवशी ते घर का पाडले आणि भूसंपादनासाठी रु. २७.०० लाख किंमत कशी दिली. तेथील बांधकाम साहित्य लाकूड किती कार्यालयात जमा केली याची सविस्तर माहिती द्यावी. रु. २७.०० लाखाच्या किंमतीचे घर पंधरा दिवसात महानगरपालिकेने भूसंपादनाची कार्यवाही करून ताब्यात घेतले. याबाबत नगररचना विभागाचे श्री. कालेले यांच्याकडून संचिका मागवून घेऊन संचिकेवरून सविस्तर माहिती द्यावी.

**प्रशासकीय अधिकारी :** त्या ठिकाणी पत्र्याचे घर होते. २ शटर्स, ३ दरवाजे व १०-१२ बल्या कार्यालयात जमा केली आहेत.

**मा. सभापती :** बैठकीस स. सदस्यांना अर्धा तास चर्चा करर्णसाठी देण्यात येते. त्यानंतर चर्चा करता येणार नाही.

**श्री. संजय जोशी :** नियमाप्रमाणे एक स. सदस्य कितीही वेळ बोलू शकतो. आपण बंधन घालू शकत नाही.

**श्री. गौतम लांडगे :** वेळोवेळी बंधन घालणे बरोबर नाही. तसेच नियम नसून लोकप्रतिनिधी हे जनतेच्या सेवेसाठी सभेमध्ये बोलतात त्यांचेसाठी वेळ काळ ठरवून देणे योग्य नाही.

**श्री. प्रभाकर विधाते :** आता काही दिवसाने पावसाळा सुरू होणार आहे. मान्सुनपूर्वी प्रत्येक वर्षाप्रमाणे शहरातील नाले साफ सफाईचे काम प्रशासनाने तातडीने हाती घ्यावे.

**कार्यकारी अभियंता (पा. पु.) :** दरवर्षीप्रमाणे शहरातील नाल्यामधील गाळ व साफ सफाईचे कामे हाती घेतल्या जातात. यावर्षी प्रामुख्याने श्रीमान श्रीमती, औषधी भवन

असे एकूण जवळपास चार नाल्यांचा समावेश असून त्यानुसार साफसफाई केली जाईल. पावसाळ्यापूर्वी पाण्यचा प्रवाह सुरळीत होईल.

**श्री. प्रभाकर विधाते :** सिटी चौक येथील बॉम्बे मर्कटाईल बँक, सारस्वत बँक वगैरेचा समावेश आहे काय?

**कार्यकारी अभियंता (पापु) :** एका एजन्सीज मार्फत बॉम्बे मर्कंटाईल बँक, सारस्वत बँक, श्रीमान श्रीमती, औषधी भवन कार्यालयापर्यंत काम चालू आहे. इमारतीखालील नाल्या सफाईचे काम एजन्सीमार्फत करण्यात येते.

**श्री. संजय जोशी :** शहानुरवाडीचा नाला आहे तेथील नालयात ड्रेनेजचे पाणी सारखे वाहत असते. याबाबत स्थायी समितीच्या स. सदस्यांनी पहाणी करावी.

**श्री. स. अली मिरा सलामी :** सिलेक्टेड शहरातील नाले साफ सफाई होणार असे सांगितले जाते. म्हणजे नेमके काय? शहरातील सर्व नाले साफ सफाई होण्याची काळजी घ्यावी. माझ्या वॉर्डातील दलालवाडी येथील नाला साफ होणे आवश्यक आहे.

**श्री. संजय जोशी :** शहानुरवाडी येथील नाल्यात गेली कित्येक वर्षापासून पाणी सोडल्या जात आहे. याकडे प्रशासनाचे लक्ष दिसत नाही. नाला साफ होत नाही.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** कुंवार फल्ली भागात १ १/२ वर्षापासून ड्रेनेजचे पाणी साचलेले आहे. याबाबत सूचना व पत्र देऊनही कार्यवाही झालेली नाही. दि. २३-०३-९८ ला पाणपोईच्या संदर्भात स्वेच्छा निधीतून देणे बाबत मी कार्यालयात पत्र दिले होते. तथापी अद्यापही कार्यवाही झालेली नाही.

**श्री. स. अ. एकबालोद्दिन (मुजाहेद) :** सन १९९५ ला संपूर्ण शहरातील नाल्यांना पुर आलेला होता. तेंव्हापासून आतापर्यंत नाले साफ झाले नाही. सर्व ठिकाणचे नाले साफ करावे. त्यानुसार शहरातील संपूर्ण नाले वेगवेगळ्या कामाचे भाग करून सफाई करणे आवश्यक आहे.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** मलेरिया विभागांतर्गत ४८ कर्मचारी नाला साफ सफाईसाठी कामाला आहे. जेथे पाणी साचल्या जाते ते पाणी कचरा काढून वाहून जाणेसाठी कामे करतात.

**श्री. गौतम लांडगे :** संबंधित कर्मचाऱ्यांनी गाळही काढावे असे आदेश व्हावेत.

**मा. सभापती :** शहरातील नाले साफ सफाई करावयाची असल्यास ६० ते ७० लाख रुपये खर्च होण्याची शक्यताअ हो. जे ४८ कर्मचारी साफसफाईच्या कामासाठी आहेत ते पूर्णपणे नाले सफाईचे काम करू शकत नाही. या ठिकाणी आणखी ५ ते २५ दैनिक वेतनावरील कर्मचारी लावून काम करवून घेणे योग्य वाटते.

**कार्यकारी अभियंता (पापु) :** यासाठी म्हणजे जवळपास ७.५० लाख रुपये खर्च नाले साफ सफाईसाठी लागेल.

**श्री. संजय जोशी :** नाले साफ सफाई करण्यासाठी कोणत्याही एजन्सीज मार्फत काम करून घ्यावे.

**उप आयुक्त (प्र.) :** सिलेक्टेड नाले साफ सफाई करण्यासाठी ७.५० लाख रु. खर्च येणार आहे. त्यासाळी मा. आयुक्त यांचेकडे जी बैठक झाली यामध्ये याबाबत चर्चा होऊन कार्यवाही करण्याचे सूचित केले आहे.

**कार्यकारी अभियंता (पापु.) :** बॉम्बे मर्कटाईल बँक ते सारस्वत बँक, औषधी भवन ते सुपर मार्केट, कटकटगेट, नुर कॉलनी वगैरेचा या नाला साफ सफाईसाठीचा समावेत राहील.

**मा.सभापती :** या व्यतिरिक्त शहरातील बरेचसे छोटे-मोठे नाले आहेत आणि पावसाळ्यात यामुळे काही घरांना धोका पोहचतो त्यासाळी नाले साफ करणे आवश्यक आहे.

**श्री. संजय जोशी :** ज्या नाल्याच्या काठावर घरे आहेत. तेथील अगोदर नाले साफ करावे.

**श्री. स. अ. एकबालोद्दिन (मुजाहेद) :** माझ्या माहितीप्रमाणे जे नाले लिजवर दिलेली आहेत, आणि आपण त्यांना बांधकाम परवानगी दिलेली आहे. त्यांना स्वत:चे खर्चाने नाले सफाई करण्यासाठी अट घातलेली आहे.

**श्री. स. अली मिरा सलामी :** स. सदस्यांनी सूचना केल्याप्रमाणे लिजवर दिलेल्या नालेबाबत सहाय्यक संचालक नगररचना यांचे अटी व शर्तीत काम दर्शविलेले आहे. त्यानुसार कार्यवाही व्हावी.

**सहा. संचालक नगररचना :** नाल्यावरील बांधकामास परवानगी देतांना वर्षातून एकदा नाला साफ सफाई करावी अशी अट घातलेली आहे.

**श्री. संजय जोशी :** खिवंसरा पार्क येथील नाला आहे. त्यावर असा स्लॅब टाकलेला आहे की, तो नाला एखाद्या कर्मचाऱ्यास त्यात उतरून साफ सफाई करता येत नाही. याकडे संबंधित अधिकाऱ्यांनी स्वत: लक्ष द्यावे.

**श्री. प्रभाकर विधाते :** अशा प्रकारचे शहरातील जेवढे नाले आहेत ती सर्व नाले झोननिहाय पाहणी करण्याचे झोनला सूचना कराव्यात.

**सौ. यशोदा वाडेकर :** शहरात जेवढे लहान लहान नाले आहेत, तेथील घाण व कचरा अधिक प्रमाणात साचतात व पावसाळ्यात प्रवाह पूर्ण नसल्याने आजुबाजुच्या घरामध्ये पाणी शिरते, त्यामुळे आर्थिक नुकसान होते यासाठी लहान लहान नाले साफ करणे योग्य राहील.

**श्री. विखारोद्दिन पि. खुदबोद्दिन :** माझ्या वॉर्डातील नाले साफसफाई कधीही झालेली नाही. आणि रिटर्निंग वॉलचे काम अद्यापही झालेली नाही. मलेरिया विभागातील कर्मचारी कधीही फवारणी केलेली नाही. कार्यकारी अभियंता (पापु) व आरोग्य, बांधकाम १ व २ यांचेकडे दैनिक वेतनावरील किती कर्मचारी कार्यरत आहेत त्याची माहिती द्यावी. कारण यांचेकडील कर्मचारी कधीही काम करतांना दिसत नाहीत.

**मा. सभापती :** बाहेर पत्रकार मंडळी आहे त्यांना बोलण्यासाठी २.०० मिनिटासाठी सभा तहकूब करण्यात येते. (वेळ ४.१५ वा सभेला सुरुवात ४.१७ वा.)

**श्री. गौतम लांडगे :** शहरातील नाल्यावरील संरक्षित भिंती या एकाच बाजूने बांधलेल्या आहेत. दशमेशनगर येथील नाल्यावर एकाच बाजूला संरक्षित भिंत बांधलेली आहे. दशमेशनगर राठी टावर्स नाल्यांत कॉलमचे बांधकाम चालू आहे. ज्यामुळे दुसऱ्या बाजूला नागरिकांची अतिक्रमणे होऊन घरे तयार होतात. राखी टावर्स या ठिकाणी रिटनिंग वॉल कंपाऊंड एकाच बाजूला बांधण्याची परवानगी का दिली याची माहिती द्यावी. दशमेश नगरच्या पुढे अतिक्रमण करून घरे बांधलेली आहेत.

**श्री. संजय जोशी :** या ठिकाणी कार्यालयातील कर्मचाऱ्यांचे नातेवाईक आहेत. म्हणून एकाच बाजूला संरक्षण भिंत बाधले काय याची माहिती द्यावी. ते तांत्रिकदृष्ट्या योग्य आहे काय?

**कार्यकारी अभियंता (पापु.) :** सदरील काम माझ्या विभागामार्फत झालेले नाही. ज्या व्यक्तींनी त्या ठिकाणी बांधकाम केलेले आहे. त्या ठिकाणचे त्या व्यक्तींचे नावावर पी.

आर. कार्ड आहे. त्या ठिकाणी नैसर्गिक प्रवाह असून संबंधित व्यक्तीला बांधकाम करण्याची परवानगी दिलेली आहे.

**श्री. संजय जोशी, श्री. गौतम लांडगे :** संबंधित व्यक्तीला नाल्याच्या एका साईडला भिंत बांधण्याची परवानगी दिली ते योग्य नाही. याबाबत स्थायी समितीने स्वत: स्थळ पाहणी करावी अशा प्रकारची प्रशासनाने परवानगी का दिली?

**श्री. नरसिंग ढगे :** माझ्या वॉर्डात स. न. ५९ मध्ये ले आऊट ओपन स्पेसची संरक्षित भिंत बांधली ती तुटली. बांधकाम करीत असताना नाला टर्न केला. ज्यामुळे या भागातील सुत गिरणी समोरून गेलेला नाला सरळ न करता टर्न केल्याने नागरिकांना जाणे येणेस अडचणी येत आहेत. नैसर्गिक प्रवाह जसा आहे तसाच करावयास पाहिजे. याकडे प्रशासनाने लक्ष द्यावे.

**श्री. संजय जोशी :** चाणक्य पुरीच्या मागे अशाच प्रकारचा एक नाला आहे. त्याबाजूला अशीच परिस्थिती निर्माण झालेली आहे व नाला बुजविला आहे. याकडे प्रशासनाने दखल घ्यावी.

**सहा. संचालक नगररचना, श्री. संजय जोशी, श्री. गौतम लांडगे :** पंचनामा केला आहे. पंधरा दिवसच झाले संबंधित व्यक्तींस नोटीस देवून खुलासा मागविण्यात आला आहे. संबंधित भागास स्थळ पहाणी करावी अशी आमची मागणी आहे.

**श्री. प्रभाकर विधाते :** धनश्री ऑईस फॅक्टरी, लोटा कारंजा येथील नाल्यावर एका बाजूला भिंत बांधकामामुळे दुसऱ्यांना त्रास होत आहे. याकडे संबंधित अधिकाऱ्यांनी लक्ष दिले काय? ते काम कुणाचे आहे.

**कार्यकारी अभियंता (पापु.) :** ज्या बाजूने भिंत बांधतो त्यांच्या विरुध्द दिशेने खाजगी मालकाने स्वखर्चाने संरक्षित भिंत बांधली आहे. ही नाल्याच्या काढावर आहे. त्यामुळे मनपास भिंत बांधता येत नाही. बांधल्यास पुलाचा व्हेंट (व्हाईड) बंद होईल.

**मा. सभापती :** १) शहरातील हद्दिमध्ये ज्या ज्या भागातील झोनमध्ये नाले येतात त्याची पाहणी करून स्वच्छतेसाठी कार्यवाही प्रशासनाने करावी. स. स. न. र. यांचेशी समन्वय ठेवून अतिक्रमण आहे का ते पहावे.

२) स. सदस्य श्री. संजय जोशी, गौतम लांडगे, नरसिंग ढगे व प्रभाकर विधाते यांनी केलेल्या सुचनेनुसार शहरातील नाल्यावरील अतिक्रमणे व साफ सफाईबाबत स्थायी समितीची बैठक संपल्यावर उप आयुक्त (प.) व उप आयुक्त (म.) यांचे समवेत स. सदस्यांनी स्थळ पाहणीसाठी चालावे व त्यानंतर कार्यवाही करता येईल.

**श्री. स. अली मिरा सलामी :** आरोग्य विभागातील मलेरिया अंतर्गत काम करणारे ४८ दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांकडून शहरातील सर्व नाले साफ सफाई मोहिम राबविता येईल.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** ४८ दैनिक वेतनावरील कर्मचारी मलेरिया विभागात काम करीत आहेत. त्यांना आपण पेमेंट करतो.

**मा. सभापती :** नाल्यावर लिजवर परवानगी देतांना नाले स्वतः हुन साफ करण्याविषयी लेखी लिहून घ्यावे व नाल्याच्या प्रवाहापेक्षा १० फुट उंचीवर परवानगी द्यावी. नसता त्यांचेकडून टॅक्स आकारणी करीत असतांना ती जादा वसुली करावी.

**मुख्य लेखा अधिकारी :** नाल्यावरील बांधकाम परवानगी देत असतांना त्या व्यक्तींना किंवा संस्थेला दरवर्षी स्वत:च्या खर्चाने तो भाग साफ सफाई करणे बंधनकारक असतो जर ते साफ करीत नसल्यास महानगरपालिकेने साफ करून जो

काही खर्च येईल तो खर्च ३ दिवसांची नोटीस देवून डिमांड नोटीसीद्वारे खर्च वसूल करावे.

**श्री. प्रभाकर विधाते :** एव्हरेस्ट एज्युकेशन सोसायटी औरंगाबाद महिला आघाडीला लिजवर जागा दिली. शासन नियमाप्रमाणे मंजुरीनंतर बांधकाम परवानगी द्यावी. नाल्यापासून किती अंतर पाहिजे ते सहा. संचालक नगररचना यांनी पहावे.

**मा. सभापती :** ठिक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करावी. ३ दिवसांची नोटीस द्यावी, त्यांनी काढले नाही तर महानगरपालिकेने साफ करून घ्यावे व खर्च त्यांचेकडून वसूल करावा.

**श्री. गौतम लांडगे :** सिडको एन-८ दवाखाना येथे कुत्रे चावल्यानंतर तेथे इंजेक्शन देण्याची व्यवस्था नाही काय? याची माहिती द्यावी. कारण माझ्या वॉर्डातील एका व्यक्तीला कुत्रा चावल्यने त्यास एन-८ च्या दवाखान्यात घेऊन गेले असता त्या ठिकाणी तेथील नर्स व डॉक्टरांनी टी. टी. चे इंजेक्शन देवून घाटी दवाखान्यास शिफारस केली व विचारणा केली असता नर्स व डॉक्टरांनी असे सांगितले की, आमच्याकडे कुत्रे चावल्याचे इंजेक्शन उपलब्ध नाहीत. त्यामुळे टी. टी. चे इंजेक्शन देत आहोत. तेंव्हा कुत्रे चावल्याचे इंजेक्शन महानगरपालिकेच्या दवाखान्यात का उपलब्ध नाहीत यांची माहिती द्यावी.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** आपल्याकडे ४०० वाय. चे इंजेक्शन आहेत.

**श्री. गौतम लांडगे :** मग घाटीच्या दवाखान्यात जाण्याची शिफारस संबधित डॉक्टरांनी का केली?

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** कुत्रा चावल्याने इंजेक्शन एन-८ च्या दवाखान्यात उपलब्ध आहेत जर संपले असतील तर त्याप्रमाणे संबंधित डॉक्टरांनी कळविल्यास त्याप्रमाणे कार्यवाही करता येईल.

**मा. सभापती :** दवाखान्यात सर्व प्रकारचे औषधे व इंजेक्शनचा साठा उपलब्ध करणे बाबत आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी कार्यवाही करावी व तसा अहवाल सादर करावा.

**श्री.गौतम लांडगे :** शहाबाजार येथील स्मशान भूमीबाबत दि. १९-०५-९८ रोजी माजी नगरसेवक श्री. बंडु प्रधान उपोषणास बसले होते. तेंव्हा त्यावेळी प्रशासनाने आश्वासन देवून त्यांचे उपोषण सोडले होते की, त्या ठिकाणचे अतिक्रमणे काढून त्या ठिकाणी डिपामर्किशन करून कार्यवाही करण्यात येईल. असे सांगितले होते. त्यानुसार काय कार्यवाही केली याची माहिती द्यावी.

**श्री. संजय जोशी :** त्या स्मशान भूमीच्या बाबतीत संबधित व्यक्तींना जमीन भूसंपादनाचा मोबदला महानगरपालिकेने दिलेला असतांनाही पुन्हा अतिक्रमणे कसे झाले. त्यावर प्रशासनाने कार्यवाही का केली नाही.

**सहा. संचालम नगररचना :** याबाबत तेथील भूसंपादित जागेचे सिमांकनाची कार्यवाही आजच झाली आहे.

**श्री. संजय जोशी :** सिल्क मिलच्या बाजूस एका व्यक्तींचा अपघात झाला असतांना त्या ठिकाणच्या स्मशान भूमीत काही लोकांनी दफनविधी करू दिले नाही. व तणावाची परिस्थिती निर्माण झालेली होती. नंतर पोलिसाच्या मदतीने मृताचा क्रियाक्रम पार पडला. त्या ठिकाणच्या स्मशान भूमीच्या जागेच्या बाबतीत कोणता वाद आहे. त्या ठिकाणी प्रशासनाने सुविधा उपलब्ध करून का दिल्या नाहीत.

**श्री. विखारोद्दिन पी. खुदबोद्दिन :** स. सदस्यांनी जी माहिती सांगितली ती चुकीची असून ती स्मशान भूमी नाही. संबधित वॉर्ड माझा आहे व पूर्ण माहिती स. सदस्यांना नाही. तेंव्हा खरी हकीकत अशी आहे की, ज्या ठिकाणी अपघात झाला तो व्यक्ती थोडासा मनोरुग्ण व पागल स्थितीतला होता व त्याने स्वतःहुन आत्महत्या करण्याचा प्रकार केलेला आहे. या ठिकाणी वाद झाला नाही. याबाबतची कल्पना येथील नागरिकांना आहे. पोलिस माझ्याकडे आले होते. यावेळेस करू द्या. असे त्यांनी सांगितले या भागासाठी मालवाड्यात स्मशान भूमी असून तेथे सर्व प्रकारचे क्रिडा पार पाडल्या जातात. परंतु सिल्क मीलच्या बाजूस असलेल्या जागेमध्ये स्मशान भूमी नसून ती सिल्क मीलची खाजगी मिळकत आहे. यात राजनितीचा वळण देण्यात येत असून लोकांमध्ये संभ्रम निर्माण होत आहे. त्यामुळे तेथील परिस्थितीचा उलगडा झाल्याशिवाय काहीही बोलणे बरे नाही.

**श्री.संजय जोशी, श्री. गौतम लांडगे :** संबंधित ठिकाणी स्मशान भूमी आहे काय? व त्या ठिकाणी संरक्षित भिंत व रोड बांधकाम पाणी पुरवठ्याची व्यवस्था केलेली आहे काय? याची माहिती द्यावी.

**मालमत्ता अधिकारी :** कोर्टात वाद चालू आहे.

**मा. सभापती :** सिल्क मीलच्या जवळील स्मशान भूमीबाबत हिंदु मुस्लीम व दलित अशा प्रकारचा वाद असल्यास याबाबत पुढील बैठकीत जागेच्या नकाशासह व शहरातील किती हिंदु स्मशान भूमी व कब्रस्थान किती आहेत. तेथील सुविधा कोणकोणत्या केलेल्या आहेत, यासह माहिती द्यावी.

**श्री. संजय जोशी :** अमरप्रीत हॉटेल ते शहानुर मिया दर्गा रोडवर कब्रस्थान आहे. त्या ठिकाणी वॉल कंपाऊंड करावे नसता एखादे वेळेस रोडवर अपघात झाल्यास वातावरण गढुळ होण्याची शक्यता असते, याकडे प्रशासनाने कार्यवाही करावी.

**उप आयुक्त (प.) :** सभागृहात ऐनवेळी संबंधित अधिकाऱ्यांकडून कोणत्याही कामाचे बाबतीत अधिकाऱ्यांचे डोके म्हणजे कॉम्प्युटर सारखे नसते. तेंव्हा कृपया जे प्रश्न ऐनवेळचे असतात. त्या बाबत पुढील बैठकीत माहिती देता येईल.

**श्री. संजय जोशी :** प्रशासनाचे अशा प्रकारचे बोलणे योग्य वाटत नाही. जे की, या ठिकाणचे अधिकारी वर्ग यांना शहरातील कामकाजाची पूर्णपणे माहिती असते आणि अधिकारी वर्गाची सेवाही जास्त झालेली असल्याने त्यांना प्रश्नाची उकल करणे माहितीमुळे करता येणे शक्य आहे. करिता स. सदस्य सभागृहात प्रश्न उपस्थित करीत असतात.

**श्री. प्रभाकर विधाते :** बेगमपुरा, स्मशान भूमी तसेच बिबीका मकबरा, व लेण्या परिसरातील विटभट्ट्या त्यावर होणारे अतिक्रमणे बाबतची संपूर्ण माहिती पुढील बैठकीत सादर करावी.

**मा. सभापती :** स. सदस्यांनी सूचना केल्याप्रमाणे संबधित अधिकाऱ्यांनी पुढील बैठकीत माहितीसह हजर रहावे.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** माझ्या वॉर्डातील समस्त नागरिकांचे टॅक्स वेळेवर व पूर्ण भरणा केलेले आहेत. मात्र सुविधा महानगरपालिकेने पुरविलेल्या दिसत नाही. गेले दीड वर्षापासून प्रशासनास पत्र देवून ड्रेनेजचे पाणी सतत रस्त्यावर वाहते व तुंबून राहते. याविषयी कार्यवाही करण्याचे पत्र देवूनही अद्याप पर्यंत काहीही झालेले नाही.

**मा. सभापती :** जलवाहिनीतून ड्रेनेजचे पाणी येते. वस्तुस्थिती काय आहे कार्यकारी अभियंता यांनी माहिती द्यावी.

**कार्यकारी अभियंता (पापु.) :** जवळपास १९७५ पसून या भागातील जलवाहिनी टाकलेल्या आहेत ते आर. सी. सी. पाईप बदलणे आवश्यक आहे. व त्या अत्यंत जुन्या झालेल्या असून तेथील नवीन लाईन बिडाचे (सी आय.) पाईप लाईन टाकणेबाबतचा प्रस्ताव असून त्या बाबतचे टेंडर ५४% जादा दराचे आल्याने पुन्हा फेर निविदा मागवून संबंधित भागातील काम तातडीने हाती घेता येईल.

**श्री. स. अली मिरा सलामी :** ६७ (३) (सी) चा वापर करून अशा वेळी प्रशासनाने कार्यवाही करावी. पुन्हा नविन फरे निविदा मागविण्यास दुसऱ्यावेळेस ही ५४% जादा दर प्राप्त झाल्यास आपण काय करणार.

**मा. सभापती :** स. स. श्री. किशोर तुळशीबागवाले यांनी दीड वर्षापासून पत्र देवूनही त्यांच्या पत्रानुसार कामाची कार्यवाही झालेली नाही. यासाठी स. स. नी ज्या विभागातील कामाचे बाबतीत पत्र दिलेले असेल त्यासाठी विशिष्ट कालावधी ठरवून कामे करणे योग्य राहील. एखादी संचिका १ ते ६ दिवसांच्या वर अधिकाऱ्यांच्या टेबलावर राहु नये. याची दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे स. स. चे स्वेच्छा निधीचे कामे सुध्दा ६-७ महिने रेंगाळतात व पडुन राहतात. यावरही प्रशासनाने दिरंगाई न करता एका महिन्यांच्या आंत कार्यवाही करावी.

**श्री. संजय जोशी :** माझ्या माहितीप्रमाणे प्रत्येक महिन्याला रु. ७५.०० लाख विद्युत मंडळास विज बिलापोटी देतो. त्याचप्रमाणे वार्षिक रु. १०.०० कोटी अंदाजे भरणा होणार आहे. तेंव्हा अंदाजपत्रकात कोणत्या लेखा शिर्षातून सदरचे पैसे काढून भरणा करणार यांची माहिती द्यावी.

**मुख्य लेखाधिकारी :** विद्युत मंडळास मनपाने पाणी बिलाचे विज दरासाठी वार्षिक रु. ७.०० कोटीची अंदाजपत्रकात तरतूद केलेली होती. मागील बैठकीत ठरल्याप्रमाणे रु. ५०.०० लाख मनपाने विद्युत मंडळास प्रत्येक महिण्यात द्यावयाचे ठरलेले होते. विद्युत मंडळाने सारखा तगादा लावल्यामुळे आणि मा. उपमुख्यमंत्री यांच्या सूचनेप्रमाणे रु. ७५.०० लाख विद्युत मंडळास द्यावयाचे ठरलेले होते. परंतु उर्जा सचिव मा. त्रिपाठी साहेब व मनपा यांच्या संयुक्त बैठकीत ठरल्याप्रमाणे १.५० कोटी पैकी १.०० कोटी मनपाने प्रतयेक महिन्यास द्यावयाची सूचना केली. त्यानुसार येत्या सर्वसाधारण सभेत अशा प्रकारची टिप्पणी सह प्रस्ताव मंजुरीस्तव ठेवण्यात येणार आहे. जवळपास २०.०० कोटी रु. पाणी पुरवठा साठी मनपाला विद्युत मंडळाकडे द्यावे लागते. तरीही रिसिट येणार नाही. त्यासाठी इतर खर्चावर बंधने घालून फक्त अत्यावश्यक कामे व नियोजन करूनच कार्यवाही करावी लागेल व फेड करावी लागणार आहे.

**श्री. संजय जोशी :** महानगरपालिकेने कामाचे नियोजन करून अत्यावश्यक सेवेची विकास कामे शहरातील कामे करावे.

**श्री. प्रभाकर विधाते :** रु. ३.०० कोटी मननाच्या कोणत्या लेखा शिर्षकातुन काढून विद्युत मंडळास देणार याची माहिती द्यावी.

**मुख्य लेखाधिकारी :** याबाबत येत्या सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव प्रशासनामार्फत मांडण्यात येणार आहे.

**श्री. विकास जैन :** शहरातील मालमत्ता कर व पाणीपट्टी वसूली किती थकीत आहे. याची माहिती द्यावी.

**मुख्य लेखाधिकारी :** रु. २२.०० कोटी मालमत्ता कर व
रु. ३.०० कोटी पाणीपट्टी वसुली थकीत आहे.

**मा. सभापती :** ज्या नागरिकांचे मालमत्ता करापोटी व पाणीपट्टीसाठी कोर्टात केसेस आहेत. त्यावर त्या संबंधिताना चर्चेला बोलावून, करमुल्य निर्धाण अधिकारी १ व २ तसेच उपआयुक्त यांनी तातडीने निर्णय घेतल्यास, कोर्ट केसेस परत घेतील व मनपास करान्वये आर्थिक फायदा बराच होईल यासाठी प्रशासनाने कार्यवाही करावी.

**श्री. संजय जोशी :** अर्थसंकल्पात नियोजन करणेसाठी विशेष बैठक घ्यावी.

**श्री. मिरा सलामी :** या बाबत पन्हा पुन्हा बैठक अर्थसंकल्पासाठी घेणे योग्य होणार नाही.

**मा. सभापती :** या संदर्भात मा. महापौर व इतर पदाधिकारी तसेच मा. आयुक्त यांचे बरोबर चर्चा करून व स्थायी समितीमध्ये निर्णय घेता येईल.

**श्री. मिरा सलामी :** विद्युत देयकांची रक्कम कशी काढावी या बद्दल पुन्हा बैठक घेवून सर्वसाधारण सभेत ठेवावे. जकात विभागातील बरेचसे चेक वटले जात नाही. याबद्दलही प्रशासनाने तातडीची कार्यवाही करावी. व वसुलीवर जास्तीत जास्त भर द्यावा.

**मा. सभापती :** मालमत्ता कर भरणा करतात त्या सर्व वसाहतींना लाईट / पाणी व रोडची व्यवस्था करून देणे आवश्यक राहील.

**श्री. संजय जोशी :** विद्युत मंडळास प्रत्येक महिन्याला रु. ७५.०० लाख द्यावयाचे आहेत. त्यामुळे वर्षाकाठी रु. १०.०० कोटी मनपास द्यावे लागणार आहे हा खर्च कोणत्या लेखा शिर्षातून करणार याबाबत योजना आखणे जरुरीचे आहे.

**उप आयुक्त (म) :** मा. आयुक्त यांच्याकडे बैठक झालेली होती. त्यामध्ये शहरातील मालमत्ता करांच्या कोर्टातील डिस्पुटस केसेस निकाली काढणे संदर्भात दोन महिन्यात निर्णय घेणे याबाबत मा. आयुक्त यांनी आदेशित केले आहे. जेणे करून कर भरणा तातडीने वसूली होईल या शिवाय जकात विभागाकडे खोटे चेक आलेले असतील त्याबाबत तिन दिवसांत निर्णय घेऊन खाते चौकशी करण्याचे ठरलेले आहे. त्यानंतर कार्यवाही करण्यात येईल.

**श्री. विकास जैन :** प्रशासनाकडे अनेक बैठका झालेल्या आहेत. परंतु आश्वासना पलीकडे काहीही झालेले नाही.

**श्री. संजय जोशी :** मालमत्ता कराचे जेवढे डिस्पुटस केसेस आहेत. त्या केसेसचे कमी जास्त करण्याचे अधिकार कुणाचे राहतील.?

**उप आयुक्त (म.) :** मालमत्ता कराचे जेवढे डिस्पुटस केसेस असतील त्याबाबत झोननिहाय केसेस तातडीने काढणे बाबत प्रशासनातर्फे कार्यवाही करणेत येईल. यामध्ये झोन अधिकारी, उप आयुक्त (म), विधी सल्लागार कर आकारणी १ व २ यांची समिती राहील व त्याप्रमाणे मालमत्ता धारकांकडील कागदपत्र आधारे कार्यवाही करणेत येईल.

**श्री. गौतम लांडगे :** मालमत्ता कराच्या ज्या डिस्पुटस केसेस असतील त्यावर आक्षेपानुसार सुनावणी होऊन कमी जास्त केलेली प्रकरणाचा अहवाल तसेच जकात उत्पन्नातचे मासिक अहवाल पाणीपट्टी वसूली इ. झोनवाईज अहवाल स्थायी समितीस द्यावा.

**मा. सभापती :** ठिक आहे या बाबत प्रशासनाने कार्यवाही झालेल्या प्रकरणांची यादी सादर करावीत.

**श्री. मिरा सलामी :** मागील वर्षीप्रमाणे यावर्षी सुध्दा युती शासनाकडून महानगरपालिकेसाठी अनुदान मागणेसाठी पदाधिकारी यांनी सतत पाठपुरावा करावा.

**श्री. गौतम लांडगे :** स्मशानभूमीत थ्रिसेट लावणे बाबतची स्वेच्छा निधीतून खर्च करण्यासाठी काय कार्यवाही झाली.

**अति. शहर अभियंता :** आचार संहितेमुळे काम थांबलेले आहे. आणि सदरील काम ४ ते ५.०० लाखाचे आहे.

**मा. सभापती :** १) थ्रिसेट स्वेच्छा निधीतील कामे एका महिण्यात करावे. आणि ३ दिवसांत निविदा मागवून कार्यवाही करावी.

२) प्रत्येक महिन्याला मालमत्ता कराच्या आक्षेपाने सुनावणी होऊन कमी जास्त झाल्याचा अहवाल झोननिहाय स्थायी समिती सभेस सादर करावा.

**श्री. मिरा सलामी :** ज्या दिवशी पाणी पुरवठा होणार नाही. त्या दिवशी शहरात काही नागरिक पाणी मागणी करीत असतात तर काही विकत घेणेसाठी संपर्क साधतात अशा वेळी फक्त पब्लीक सप्लाय करावा. पैसे भरून टँकरचा पुरवठा करणेचे टाळावे. कोटला पाणी टाकी येथे फोन अद्यापही आलेला नाही. याचे कारण काय? तेथे संपर्क करता येत नाही.

**उप आयुक्त (प्र) :** श्री. संगमकर एस. एम. माजी महापौरांचे पी. ए. यांचेकडे होता तो शिफ्ट करण्याची सूचना संबंधित विभागास दिलेल्या आहेत.

**श्री. संजय जोशी :** शहरात एखाद्या वेळेस पाणी पुरवठा सुरळीत न झाल्यास पाण्याच्या टाकीवर फोनद्वारे संपर्क साधता येतो. तेंव्हा टाकीवर फोन असणे जरुरीचे आहे. टाकीवर फोन न ठेवता एका पी. ए. च्या घरी फोन ठेवणे प्रशासनाचे धोरण योग्य नाही.

**श्री. विखारोदिन पि. खुदबोदिन :** मला अशी माहिती मिळाली की, माजी महापौरांच्या पी. ए. कडून फोन शिफ्ट करून श्री. एच. आर. बाहेती उप- आयुक्तांचे पी. ए. यांचेकडे दिला आहे.

**श्री. मिरा सलामी :** टाकीवर फोनची आवश्यकता आहे. प्रशासनाने तातडीने संबंधित फोन शिफ्ट करण्याची कार्यवाही करावी. शहरात पाणी टँकर किती चालू आहेत याची माहिती द्यावी.

**कार्यकारी अभियंता (पापु) :** सध्या सात टँकर पाण्याचे चालू आहेत. ५ टँकर सिडकोत तर दोन टँकर शहरात कार्यरत आहेत.

**मा. सभापती :** मागील वेळेत श्री. रामटेके तत्कालीन जलगृह अभियंता यांनी असा प्रस्ताव आणलेला होता की, शहरातील विहिरी स्वच्छ करून त्यावर जाळ्या बसवून घ्याव्यात व ते पाणी नागरिकांना हप्पसाद्वारे द्यावे.

**श्री. संजय जोशी :** प्रस्ताव चांगला आहे. परंतु दरवर्षी आपण त्या भागात विहिरी आहेत. तेथील विहिरी स्वच्छ ठेवूनही नागरिक पिण्याचे पाण्याचा उपयोग करीत नाहीत. यासाठी संबंधित विहीरीच्या ठिकाणी एखाद्या कर्मचाऱ्यांची देखरेख ठेवून व्यवस्था ठेवली तर पाणी पिण्यायोग्य राहील.

**श्री. मिरा सलामी :** शहरात पाणी पुरवठा सुरळीत होणेसाठी जायकवाडी व्यतिरिक्त "नेहरे अंबरी" येथील पाण्याच्या व्यवस्थेबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी. नेहरे अंबरी फोडून विटभट्ट्यावाले पाणी घेतात. त्यानंतर एखाद्या तलावाची

योजना आखावी जेणेकरून भविष्यात त्याचा उपयोग शहरातील सर्व नागरिकांना होऊ शकेल.

**मा. सभापती :** ठिक आहे. या बाबत प्रशासनाने कार्यवाही करावयाची आहे. मागील अनेक सभेमध्ये मी याच संदर्भात चर्चा केलेली आहे मा. महापौर, मा. आयुक्त यांना वायरलेस सेट देणे बाबत काय झाले? त्यातील किती चांगले व किती नादुरुस्त आहेत.

**कार्यकारी अभियंता :** सध्या ११ पैकी ९ वारयलेस चालू स्थितीत असून २ बाबत दुरुस्तीसाठी पडलेले आहेत.

**मा. सभापती :** दुरुस्ती करून घ्यावी.

**श्री. विखारोद्दिन पि. खुदबोद्दिन :** नक्षत्रवाडी येथील पंप हाऊस येथे एका टेलिफोनची व्यवस्था व्हावी त्याचबरोबर फारोळा येथील टेलिफोन व्यवस्था करावी. एखाद्या वेळेस पंप हाऊस वर टेलिफोन असल्यास वस्त्या ठिकाणी विस्तारीत फोनची व्यवस्था व्हावी.

**कार्यकारी अभियंता :** पंप हाऊसला टेलिफोन आहे.

**मा. सभापती :** ठिक आहे विस्तारीत फोनचे एक्सटेन्शन बसवा, लवल पट्टी लावण्यात यावी. आता मागील वेळेस स. स. श्री. जोशी यांच्या सुचनेनुसार सिटी चौक येथील एका घर मालकांस मनपाने भूसंपादन करून रु. २७.०० दिल्याबाबतची संचिका आणलेली आहे. त्याची सविस्तर माहिति द्यावी.

**सहा संचालक नगररचना :** दि. २४-०४-९८ ला संबंधित मालकाडून भूसंपादन करून मनपाने ताबा घेतला आहे.

| | |
|---|---|
| १) एकूण जमिनीची किंमत | रु. १५.८७ लाख |
| २) सोलेशियम रक्कम | रु. ५.६९ लाख |
| ३) व्याजदर (गॅझेटमध्ये घोषित झाल्यापासून अवॉर्डपर्यंत) | रु. |
| ४) साहित्याची किंमत | रु. ३.९० लाख |

**श्री. संजय जोशी :** महानगरपालिकेने यावरून दिसून तयेते की, प्रायव्हेट नेगोशिएट केलेले नाही. त्यामुळे ५.६९ लाख रु. मनपाचे सोलेशियम साठी वाय गेले. तसेच रिकाम्या जागेची किंमत जादा दाखविली साहित्याचे किंमत लाकडे व इतर साहित्य मिळून रु. ३.९० लाख दाखविले. तर एवढी किंतीचे सामान संबंधित घरात होते काय? जर असतील तर मनपाने कुठे ठेवलेले आहे. याची तपशिलवार माहिती द्यावी. ते घर मातीचे होते व पत्राचे घर दाखवून व्हॅल्युएशन काढलेले दिसते. तेथील बाकीचे सामान कुठे आहे. पंचनामा रिपोर्टच खोटा लिहिलेला असेल यावर स्पष्ट होते.

**उप आयुक्त (म) :** याबाबत चौकशी करून माहिति देण्यात येईल.

**मा. सभापती :** उप आयुक्त (म) यांनी संपूर्णपणे चौकशीर करून, पंचनामा खरा किंवा खोटा आहे याची शहानिशाह करावी व व्हॅल्युएशन काढलेले आहे. त्यानुसार मटेरियल कशा व कोणत्या प्रकारचे होते. किती मटेरियल मनपात जमा आहे या सर्वांची अहवालासह पुढील बैठकीत माहिति द्यावी.

**विषय क्र. २/१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पथदिव्यासाठी विद्युत साहित्य खरेदी करण्यासाठी अ. प. सा. बां. विद्युत दरसूची सन १९९७-९८ नुसार र. रु. ९,९०,०००/- चे तयार करण्यात आलेले आहे. तसेच सदरील पथदिव्यासाठी विद्युत साहित्य खरेदी करिता मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे. सदरील खर्च सन १९९८-९९ वर्षाच्या "विद्युत साहित्य खरेदी" या शिर्षकाखाली करण्यात येईल. तरी पथदिव्यांकरिता विद्युत साहित्य खरेदी करण्यासाठी र. रु. ९,९०,०००/- चे अंदाजपत्रकास मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**श्री. संजय जोशी :** इलेक्ट्रीकल्स साहित्य डायरेक्ट कंपनीकडून खरेदी केल्यास ४% सवलत मिळते व साहित्य ही गॅरंटीचे मिळते त्यानुसार कार्यवाही व्हावी.

**मा. सभापती :** विद्युत साहित्य मागील वर्षीच्या दराने डायरेक्ट कंपनीकडून बाजाज / क्रॉम्पटन/फिलिप्स यांचेकडून स्टँडर्ड इलेक्ट्रीकल्स मेटेरियल खरेदी करण्यास मंजुरी देण्यात येते. त्यानुसार कार्यवाही व्हावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार पथदिव्यांसाठी विद्युत साहित्य खरेदी करण्यासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रु. ९,९०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. सदरील विद्युत साहित्य डायरेक्ट कंपनीकडून बजाज/क्रॉम्पटन/फिलिप्स यांचेकडून स्टँडर्ड साहित्य खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ३/२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पथदिव्यासाठी विद्युत साहित्य खरेदी करण्यासाठी सा. बां. विद्युत दरसूची १९९७-९८ नुसार र. रु. ९,९१,०००/- चे तयार करण्यात आलेले आहे. तसेच मा. आयुक्त यांनी मंजुरी झालेली आहे. सदरील खर्च सन १९९८-९९ वर्षाच्या "विद्युत साहित्य खरेदी" या लेखा शिर्षकातून करण्यात येईल. अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पथदिव्यासाठी विद्युत साहित्य खरेदी करण्याकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. ९,९१,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील विद्युत साहित्य डायरेक्ट कंपनीकडून बजाज/क्रॉम्पटन/फिलिप्स यांचेकडून स्टँडर्ड साहित्य खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

त्यानुसार वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, विद्युत साहित्य पथदिवे खरेदी करण्याकरिता एकंदरीत अंदाजपत्रक सा. बां. विद्युत दरसूची १९९८-९९ नुसार र. रु. ४,१०,३००/- चे तयार करण्यात आलेले आहे. तसेच मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे. सदरील खर्च सन १९९८-९९ वर्षाच्या "विद्युत साहित्य खरेदी" या लेखा शिर्षकातून करण्यात येईल. अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विद्युत साहित्य पथदिवे खरेदी करण्याकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. ४,१०,३००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील विद्युत साहित्य डायरेक्ट कंपनीकडून बजाज/क्रॉम्पटन/फिलिप्स यांचेकडून स्टँडर्ड साहित्य खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

त्यानुसार वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, पथदिव्यासाठी विद्युत साहित्य खरेदी करण्यासाठी अंदाजपत्रक सा. बां. विद्युत दरसूची ९८-९९ नुसार र. रु. २,४५,२५०/- चे तयार करण्यात आलेले आहे. तसेच मा. आयुक्त यांची मंजुरी झालेली आहे. सदरील खर्च सन ९८-९९ वर्षाच्या "विद्युत साहित्य खरेदी" या लेखा शिर्षकातून करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पथदिव्यासाठी विद्युत साहित्य खरेदी करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. २,४५,२५०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील विद्युत साहित्य डायरेक्ट कंपनीकडून बजाज/क्रॉम्पटन/फिलिप्स यांचेकडून स्टँडर्ड साहित्य खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

त्यानुसार वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६/५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, देशमुखनगर (गुरुनानक पेट्रोल पंप मागे) येथील रस्त्यांचे डाबंरीकरण करणेच्या कामासाठी सन ९६-९७ च्या सा. बां. खात्याचे डी. एस. आर. दराने अंदाजपत्रक र. रु. १,३६,५००/- चे तयार करण्यात आले असून सदरचा खर्च "भांडवली खडी रस्ते" या सदराखाली करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे देशमुखनगर (गुरुनानक पेट्रोल पंप मागे) येथील रस्त्यांचे डाबंरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. १,३६,५००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७/६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिडको एन-१२ मनपा शाळेत मुलांमुलीकरिता स्वतंत्र स्वच्छता गृह बांधावयाचे आहे. त्यासाठी सन ९६-९७ च्या जिल्हा दरसूचीनुसार र. रु. १,४८,४३०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा. आयुक्तांनी दि. २१-०३-९८ रोजी मंजुरी दिलेली आहे.

करिता अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर. सदर कामाचा खर्च "सुलभ शौचालय व मुतऱ्या बांधणे" या लेखा शिर्षांगत करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको एन-१२ मनपा शाळेत मुलांमुलीकरिता स्वतंत्र स्वच्छतागृह बांधण्याचे कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. १,४८,४३०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, हॉटेल अभिरूची ते गारखेडा मुख्य रस्त्यावर पददिव्यांची व्यवस्था करणे करिता सन ९८-९९ च्या अर्थसंकल्पीय तरतूद नुसार अं. प. रु. ४,६०,०००/- करिता जा.क्र. १८७/९७ दि. १९-१२-९७ पर्यंत १४ निविदा मागविण्यात आल्या दि. २६-१२-९७ प्रमाणे बी-१ निविदा मागविण्यात आल्य दि. २६-१२-९७ पर्यंत १४ निविदा विक्री झाल्या पैकी एकूण तीन निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. दानिश कार्पो | १% कमी दर |
| २. | मे. बी. जे. इलेक्ट्रीकल्स | ५% जास्त दर |
| ३. | मे. प्रगत इलेक्ट्रीकल्स | १६% कमी दर |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा १६% कमी दराची मे. प्रगत इलेक्ट्रीकल्स यांची निविदा आहे. करिता निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हॉटेल अभिरूची ते गारखेडा मुख्य रस्त्यावर पददिव्यांची व्यवस्था करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा १६% कमी दराची मे. प्रगत इलेक्ट्रीकल्स यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९/८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, गजानन महाराज मंदिर ते सिडको हद्द या १०० फुट डी. पी. रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी र. रु. २८,७१,१००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास सर्वसाधारण सभेमध्ये विषय क्र. १५६/२० दि. १२-१२-९७ नुसार मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी निविदापत्रके मागविली असता निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण पाच निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत पाचही निविदा दर भरून प्राप्त झल्या त्यांचा तपशील खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. डी. अजितसिंग | ३१.३४% कमी दर |
| २. | मे. आदीनाथ कन्स्ट्रक्शन | ३१% कमी |
| ३. | मे. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | २७.८६% कमी |
| ४. | मे. चांदराम आशन्ना | २६.०५% कमी |
| ५. | मे. व्यंकटेश कन्स्ट्रक्शन | २५.७१% कमी |

तुलनात्मकादृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ३१.३४% कमी दराची श्री. डी. अजितसिंग यांची निविदा आहे. तरी निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गजानन महाराज मंदिर ते सिडको हद्द या १०० फुट डी. पी. रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकादृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ३१.३४% कमी दराची श्री. डी. अजितसिंग यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच काम त्वरित सुरू करण्याचे दृष्टीने या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०/९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालयाच्या उभारणी करीता संग्रहालयात एक दालन हे मराठवाडा संस्कृती दालन करून त्यासाठी सहकार्य व मार्गदर्शन करण्यासाठी श्री. मोरवंचीकर (निवृत्त इतिहास विभाग प्रमुख) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांची नेमणूक करण्यासठी महाराष्ट्र राज्य पुरात व खात्याचे संचालक श्री. कवाडकर यांचे उपस्थितीत श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुरावणवस्तु संग्राहलय उभारणी संदर्भात दि. ०७-०४-९८ रोजी बैठक घेऊन सविस्तर चर्चा करण्यात आली.

सदरील बैठकीस माजी खासदार श्री. प्रदीम जैसवा, मा. आयुक्त म.न.पा. डॉ. पुरवार, श्री. गजभिये (पुरातत्व खाते) व विशेष आमंत्रित डॉ. मोरवंचीकर (निवृत्त इतिहास विभाग प्रमुख) उपस्थित होते.

बैठकीत मा. कावाडकर साहेब यांना सूचना केली की, संग्रहालयाच्या उभारणी करिता व या संग्रहालयास वास्तव रुप देण्यारिता कर्मचारी / अधिकारी यांची आवश्यकात आहे व त्याकरिता एखाद्या तज्ज्ञ व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली शासकीय नियमावली नुसार हे काम झाल्यास शासन अनुदान प्राप्ततेकरिता या संस्थेचा विचार करेल. त्यासाठी वस्तु संग्रलयाचे उद्दिष्ट ठरविणे त्यामधील वस्तुचे प्रदर्शन करणे व पर्यटक व जलसामान्य यांच्या मध्ये आपल्या इतिहासाबद्दल जागृती निर्माण करणे या आवश्यक बाबी आहेत. याकरिता परिसराचे ज्ञान असणाऱ्या तज्ञाची मुख्य मानद समन्वये म्हणून नेमणक करणे गरजेचे आहे. या बाबत सविस्तर चर्चा होऊन त्याकरिता मा. डॉ. मोरवंचीकर यांना विचारणा केली असता त्यांनी मुख्य मानद समन्वयक यांना विचारणा केली असता त्यांनी मुख्य मानद समन्वयक म्हणून काम करण्याचे व सग्रहालयाची उभारणी संदर्भात सहकार्य व मार्गदर्शन करण्याचे मान्य केले आहे.

यासाठी त्यांनी खालील प्रमाणे प्रस्ताव दिलेले आहेत.

१) ही नेमणूक निव्वळ मानद स्वरुपांची असेल व त्याकरिता कोणत्याही स्वरुपात मानधन, पगार इ. अपेक्षित नाही.

२) या निमित्ताने प्राप्त होणाऱ्या व आवश्यक असणाऱ्या अधिकाराची चर्चा संग्रालयाच्या देखभालीसाठी व वस्तु जतन करण्यासाठी सर्व अधिकारयुक्त सर्वोच्च समितीपुढे (ज्यात मा. महापौर, मा. खासदार, मा. आयुक्त, डॉ. शांतीलाल पुरवार व त्यांचे पुत्र श्री. प्रकाश पुरवार यांचा समावेश आहे.) व्हावी.

३) वस्तु संग्रहालयाच्या उभारणी संदर्भातील सर्व पत्र व्यवहार मुख्य मानद समन्वयकांच्या सहीने व शिक्क्याने व्हावा.

४) वस्तु संकलनाकरिता गरज भासेल तेंव्हा परगावी जाणेकरिता परवानगी असावी व त्यास्तव वाहन उपलब्ध करून देण्यात यावे.

५) मुख्य मानद समन्वयकांकरिता एक सर्व सोयीयुक्त कार्यालय असावे. त्यात दूरध्वनी, फर्निचार, कपाट, स्टेनो (मराठी व इंग्रजी) टायपरायटर आदी बाबींचा समावेश असावा.

६) मुख्य मानद समन्वयक हे झोनवार असे एकूण चार दिवस संग्रहालयाच्या उभारणी संदर्भात काम पाहतील त्यांना दररोज कार्यालयीन वेळेतील कामाकरिता कार्यालयात येणे व घरी जाणे करिता वाहनाची व्यवस्था करण्यात यावी.

७) मुख्य मानद समन्वयकांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राच्या उभारणी संदर्भातही काम करण्याची विनंती मा. आयुक्त यांनी केल्याप्रमाणे ते उपरोक्त चार दिवसांपैकी दोन दिवस डॉ. आंबेडकर संशोधन केंद्राकरिता देतील डॉ. आंबेडकर संशोधन केंद्रासंबंधी कार्याचे स्वरुप ठरविणे करिता संबंधितांशी सविस्तर चर्चा होणे आवश्यक आहे.

८) छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालय व डॉ. आंबेडकर संशोधन केंद्र या दोन्ही संस्थांच्या उभारणी करिता नेमण्यात आलेले मुख्य मानद समन्वयक याचा कोणत्याही लोकप्रतिनिधींशी प्रत्यक्ष संबंध येता कामा नये.

९) उपरोक्त दोन्ही संस्थांच्या उभारणी संदर्भात जे निर्णय होतील त्याची आगाऊ सूचना मुख्य मानद समन्वयक यांना देण्यात येईल. या निर्णय प्रक्रियेत त्यांना वेळोवेळी सामावून घेण्यात येईल. व त्यांच्या सहमतीनेच निर्णय घेण्यात येतील.

१०) स्टेशनरी, चहापानाचा खर्च (जो अतिथीकरिता करावा लागेल) महानगरपालिकेने करावा.

११) वरील प्रस्ताव मान्य झाल्यास डॉ. मोरवंचीकर यांना एक मराठी स्टेनो टायपिस्ट पूर्ण वेळ, एक शिपाई पूर्ण वेळ, एक टंकलेखक यंत्र व कार्यालयात एक दूरध्वनी देण्यात येईल.

तरी वरील प्रस्तावानुसार डॉ. मोरवंचीकर (निवृत्त इतिहास विभाग प्रमुख) यांना मुख्य मानद समन्वयक या पदावर नेमणूकीचे आदेश पत्र देणेस्तव प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. गौतम लांडगे :** प्रस्तावातील अ.क्र. ८ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय व डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र या दोन्हीही संस्थांच्या उभारणीकरिता नेमण्यात आलेले मुख्य मानद समन्वयक यांचा कोणत्याही लोकप्रतिनिधींशी प्रत्यक्ष संबंध येता कामा नये. असे म्हटलेले आहे. याबाबतचा प्रशासनाचा हेतू काय आहे? लोकप्रतिनिधीनी समन्वयक म्हणून नेमणूक करून मानधन दिलेले आहे. लोकप्रतिनिधींशी संबंध का ठेवू नये?

**श्री. संजय जोशी :** स. सदस्यांनी सूचना केल्याप्रमाणे प्रस्तावातील मुद्दे क्र. ८ व १०,११ हे सुध्दा मुद्दे योग्य वाटत नाहीत. प्रशासनाने उपरोक्त मुद्दे खोडून दुरुस्तीसह प्रस्ताव पुन्हा सादर करावा. म्हणजे खर्च व सर्व सोयी मनपाने कराव्यात व प्रत्यक्षात संबंध लोकप्रतिनिधींनी ठेवू नये याचा निकष काय लावावा. हे प्रस्ताव सादर करणाऱ्यांनी समजावून सांगावे.

**अति. शहर अभियंता :** ज्या काही दुरुस्ती सुचवावयाच्या असतील त्या सूचना कराव्यात त्यानुसार कार्याही करण्यात येईल.

**श्री. संजय जोशी :** मुख्य मानद समन्वयकांना गेल्या ७ महिन्यांपासून मानधन देण्यात येत आहे. वस्तु संग्रहालय अद्याप चालू नसतांनाही मानधन व पगार का देण्यात येतो. सदरील प्रस्ताव स्थगित ठेवून दुरुस्तीसह पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.

**मा. सभापती :** ठिक आहे. प्रस्तावातील मुद्दे क्र. ८,१०, व ११ च्या दुरुस्तीसह पुढील बैठकीत ठेवावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविलेले मुद्दे क्र. ८, १० व ११ च्या मुद्द्यांच्या दुरुस्तीसह पुढील बैठकीत ठेवावा जसे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११/१० :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, पडेगांव कत्तलखॉन येथील घाणपाणी उपसा करण्यासाठी व्हॅक्युम एन्टीअर खरेदी करणे आणि आहे. त्यासाठी पुरवठा करण्यात येणाऱ्या चेसिजवर व्हॅक्युम पम्प, टॅक केबिन, पाईप फिटींग व इतर ॲकसेसरिज करिता अंदाजे रुपये ६,००,०००=०० खर्च येतो. हा खर्च अद्ययावत कत्तल खाना लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात येईल. अंदाजपत्रकात मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**
**श्री. संजय जोशी, श्री. गौतम लांडगे :** या प्रस्तावाची प्रशासनाला गरज आहे काय?
**कार्य. अभियंता (पापु.) :** होय अत्यंत आवश्यकता आहे.
**मा. सभापती :** मंजूर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पडेगांव कत्तलखाना येथील घाण पाणी उपसा करण्यासाठी व्हॅक्यमु एम्टीयर खरेदी करणेकरिता चेसीसवर व्हॅक्युम पंप, टॅंक, केबिन, पाईप फिटींग व इतर ॲक्सेसरीज करिता तयार करण्यात आलेल्या र. रु. ६,००,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मजुरी देयात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२/११ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, पडेगांव कत्तलखाना येथील घाण पाण्यामुळे दुर्गंधी लोऊन आजुबाजुच्या परिसरातील नागरिकांना त्याचा त्रास होत आहे. सध्या शहरातील जलनिःसारण व सेप्टीक टॅंक स्वच्छतेसाठी असलेल्या व्हॅक्युम एम्टीअर द्वारेच कत्तलखान येथील घाणपाणी उपसा करण्यात येतो. परंतु एकच मशिनद्वारे जलनिःस्सारणाचे व घाण पाणी उपसा करण्याचे काम पूर्णपणे होत नाही. त्यासाठी कत्तलखाना येथील घाणपाणी उपसा करण्यासाठी एक व्हॅक्युम एम्टीअर मशिन खरेदी करणे आवश्यक आहे.

नविन व्हॅक्युम एम्टीअर करिता चेसिज खरेदीसाठी टाटा कंपनीचे अधिकृत विक्रेते मे. सतिश मोटार्स लि. औरंगाबाद यांच्या सरकारी दराप्रमाणे (गव्ह. रेट) रु. ५,३३,७३०=०० खर्च येतो. हे दर जकात कर वगळून असून चेसिजचा ताबा घेतांना जी किंमत असेल त्याप्रमाणे पेमेंट करावे लागेल. चेसिज खरेदीस मान्यता मिळाल्यस चेसिजवर बसविण्यात येणारे व्हॅक्युम एम्टीअर करिता प्रस्ताव सादर करण्यात येईल. हा खर्च अद्यायावत कत्तलखाना लेखा शिर्षा अंतर्गत करण्यात येईल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पडेगांव कत्तलखाना येथील घाण पाणी उपसा करण्याकरिता व्हॅक्युम एम्टीअर करिता चेसिस खरेदीसाठी टाटा कंपनीचे अधिकृत विक्रेते

मे. सतिश मोटार्स लि. औरंगाबाद यांच्या सरकारी दराप्रमाणे र. रु. ५,३३,७३०/- च्या खर्चास तसेच जकात कर वगळून येणाऱ्या किंमतीमध्ये चेसीस खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३/१२ :**

औरंगाबाद नगरपालिकेने मोहल्ला उस्मानपुरा करिता मंजूर करून विकसित केलेल्या रेखांकनामध्ये प्रत्येक भुरवंडा करिता त्यावेच्य गरजेनुसार सर्व्हिस लेन (Services Lane) दिलेली हाती. आता सदर रेखांकनातील उपलब्ध सुविधा विचारात घेता त्या सर्व्हिस लेनचा वापर कालबाह्य झाल्याने गल्लीचा गैरवापर होऊ नये, गल्लीत कचरा वगैरे टाकल्याने होणारा उपद्रव टाळण्यासाठी ह्या गल्ल्यांचे क्षेत्र लगतच्या भूखंड धारकांस प्रत्येक निम्मे खालील अटी व शर्तीस अधिन राहून देण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. ह्या करिता भूखंड धारकांकडून ह्या भागासाठी त्या त्या वर्षा करिताच्या सिध्द शिघ्रगणक दरानुसार (जास्तीत जास्त दर) ७५% रक्कम प्रती चौ. मी. प्रमाणे घेण्यात येईल. (१९१८ या वर्षाकरिता दर रु. २४००/- प्रती चौ. मी. राहील.)

१) सदरील गल्लीच्या जागेत कोणतेही तात्पुरते अथवा पक्क्या स्वरुपाच्या बांधकामास परवानगी दिली जाणार नाही.
२) सदरील गल्लीचा वापर केवळ सामासिक अंतर म्हणून करावा वाढविण्यात येईल.

करिता वरीलप्रमाणे गल्लीचे क्षेत्र लगत भूखंड धारकांस विकासासाठी देण्याचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे उस्मानपुरा करिता औरंगाबाद नगरपालिकेने मंजूर करून विकसित केलेल्या रेखांकनामध्ये प्रत्येक भूखंडाकरिता त्यावेच्या गरजेनुसार दिलेल्या सर्व्हिस लेनचा वापर कालबाह्य झाल्याने गल्लीचे क्षेत्र लगत भूखंड धारकास प्रस्तावात दर्शविलेल्या दरानुसार व अ.क्र. १ ते ३ च्या अटी शर्ती नुसार विकासासाठी देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४/१३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शिल्पनगर येथील मारिया हॉस्पिटल ते दुमिर हॉस्पिटल पर्यंत रस्त्याचे रुंदीकरण करणेच्या कामासाठी अदांजपत्रक रक्कम रुपये ६,२३,३५२/- चे तयार करण्यात आले असून त्यास स्थायी समिती सभेमध्ये विषय क्र. ११ दि. १७-१२-९७ नुसार मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी निविदा पत्रके मागविली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (२२) बावीस निविदापत्रके विक्री झाल्या असून त्यापैकी निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (४) चार निविदा पत्रके दर भरून प्राप्त झाल्या असून त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. कुलवंतसिग | ५% जास्त दराने |
| २) | श्री. एस. ए. नवाब | ००.७०% कमी दराने |
| ३) | श्री. शिवा कन्स्ट्रक्शन | ४% जास्त दराने |
| ४) | श्री. सारव कन्स्ट्रक्शन | १०% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ००.०७% कमी दराने श्री. एस. ए. नवाब यांची निविदा होती पण मा. आयुक्त साहेबांच्या वाटाघाटीनुसार सदरील कामाच्या ठेकेदारास २% कमी दराने मान्यता दिली आहे.

तरी सदरील काम २% कमी दराने श्री. एस. ए. नवाब यांच्याकडून घेण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शिल्पनगर येथील मारिया हॉस्पिटल ते दुमिर हॉस्पिटल पर्यंत रस्त्याचे रुंदीकरण करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे निविदा धारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम श्री. एस. ए. नवाब यांच्याकडून अं. प. दरापेक्षा २% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५/१४ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मसनतपुर (दक्षिण) येथे खडी रस्ते तयार करणेचे कामाकरिता अंदाजपत्रक रक्कम रुपये ४,५७,०६०/- सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांची दरसूची (डी.एस.आर). १९९६-९७ अनुसार तयार करण्यात आली असून मा. आयुक्तांनी दिनांक ११-११-९७ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली असून कार्यालयाची प्रगट निविदा सूचना क्र. मनपा/लेखा/नि/१५/९८ दिनांक २०-०३-९८ अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम दि. १५-०३-९८ पर्यंत एकूण (१३) तेरा कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याच्या तारखेस ३०-०३-९८ रोजी फक्त चार (४) मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या त्या निविदा दिनांक ०१-०४-९८ रोजी उपस्थित ठेकेदारा समक्ष उघडण्यात आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मेसर्स फरफेक्ट कन्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०.३३% कमी. |
| २) | श्री. महेंद्र कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०.००% कमी. |
| ३) | चौधरी कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.९९% कमी. |
| ४) | एस. एम. मंडोरे | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.१०% कमी. |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०.३३% कमी दराचे निविदा मेसर्स फरफेक्ट कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे.

करिता मेसर्स फरफेक्ट कन्स्ट्रक्शन यांची ३०.३०५ कमी दराची निविदा मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

तसेच सदर काम म्हाडा अनुदान ९७-९८ या शिर्षाअंतर्गत करण्याचे प्रस्तावित आहे.

**संवाद :**

**मा. सभापती :** सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव :** सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात येतो.

## *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र. १६/१५ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, स्वामी विवेकानंद उद्यान येथील नविन उद्यान रोडसाईड ग्रिल बसविणे व रंगरंगोटी करणे बाबतचे रु. १,४१,५००/-

एवढ्याचे अंदाजपत्रक सां. बा. खात्याच्या सन ९६-९७ च्या दरसूचीप्रमाणे तयार करण्यात आले असून सदर कामाचा खर्च उद्यान दुरुस्ती अंतर्गत तरतूदीतून करण्याचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स्वामी विवेकानंद उद्यान येथील नविन उद्यान रोड साईड ग्रील बसविणे व रंगरंगोटी करणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. १,४१,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७/१६ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मनजीत नगर जालनारोड आकाशवाणी समोरील मनपाच्या खुल्या जागेवर संरक्षित भिंत व त्यावर तारकुंपन करणे बाबत चे अंदाजपत्रक सा. बां. खात्याच्या सन ९६-९७ च्या दरसूचीनुसार रु. १,७९,८००/- चे तयार करण्यात आले असून सदर कामावर होणारा खर्च "विकास योजने अंतर्गत" भूखंडाचे संरक्षण या तरतूदीतून करण्याचा प्रस्ताव विचाराथ तसेच मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनजीत नगर जालनारोड आकाशवाणी समोरील मनपाच्या खुल्या जागेवर संरक्षित भिंत व त्यावर तारकुंपन करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. १,७९,८००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८/१७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिके तर्फे इमारती व इतर कामासाठी लागणारे एम.एस.स्टील व टॉर खरेदी करण्यास सर्वसाधारण सभा ठराव क्र. १६३/२७ दि. १६-१२-९७ ,रे र. रु. ५७,४४,०००/- ला मंजुरी प्राप्त झाली आहे. त्यानुसार कार्यालयामार्फत निविदा सूचना जा.क्र. लेखा/नि/७/९८ दिनांक २४-०३-९८ रोजी राज्यस्तरीय वर्तमान पत्रात जाहिर निविदा प्रसिध्द करून निविदा मागविण्यात आल्या असता एकूण ४ निविदा प्राप्त झाल्या त्यानुसार तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला तो खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | एम.एस.आय.डी.सी. | ९.७०% अं. प. दरापेक्षा कमी. |
| २) | सेलीग मिल | ९.३६% अं. प. जास्त दरापेक्षा कमी. |
| ३) | हेमंत स्टील रोलींग मिल | १०.२६% अं. प. दरापेक्षा कमी दराने. |
| ४) | अमित स्टील रोलींग मिल | ०.५३% अं. प. दरापेक्षा जास्त दराने. |

सर्वात कमी दर हेमंत स्टील रोलींग मिल १०.२६% अंदाजपत्रकीय दराने कमी आहेत. व एम.एस.एस.आय.डी.सी. यांचे दर ९.७०% ने अंदाजपत्रकीय दराने कमी आहेत.

एम.एस.एस.आय.डी.सी. ही शासन अंगीकृत असल्यामुळे हेमंत स्टील रोलींग मिल एम.एस.एस.आय.डी.सी. करू शध्दीते. त्यामुळे कमी दरावची निविदा अं. प. दरापेक्षा १०.२६% कमी दरानुसार एम.एस.एस.आय.डी.सी. मान्य करणेस हरकत नाही. प्रस्ताव स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपाच्या इमारती व इतर कामासाठी लागणारे एम.एस.स्टील व टॉर खरेदी करण्याकरिता प्राप्त झालेल्या निविदांपैकी सर्वात कमी व अं. प. दरापेक्ष्ज्ञा १०.२६% कमी दराची मे. हेमंत स्टील रोलींग मिल यांची मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९/१८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, प्रियदर्शनी इंदिरानगर येथील स्मशानभूमीमध्ये संरक्षित भिंत चौकीदरासाठी निवासस्थान रेस्टींग रोड व पाण्याचा हौद बांधणे आहे. त्यासाठी र. रु. १५.०० लाख एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. व त्यास स्थायी समितीची मान्यता घेण्यात येऊन निविदा मागविले असता कोरे निविदा विक्री दि. ०३-०४-९८ पर्यंत एकोणचाळीस (३९) विकले गेले व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत दर भरून सिलबंद पाकीटात (३) तीन निविदा प्राप्त झाल्या असून प्राप्त निविदेचे तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | सलीम पटेल | ३% अं. प. दरापेक्षा जास्त दराचे दर |
| २) | एस. एम. मंडोरे | ४% अं. प. दरापेक्षा जास्त दराचे दर |
| ३) | हय्यात कन्स्ट्रक्शन | ५% अं. प. दरापेक्षा जास्त दराचे दर |

या अनुषंगाने प्राप्त दरामध्ये तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच गुत्तेदार श्री. सलीम पटेल यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त दराचे दर प्राप्त आहे. सदर कामाबाबत वाटाघाटी झाली असता प्रस्तुतचे काम हे अंदाजपत्रकीय दरानुसार करण्यास मा. आयुक्त यांनी मान्यता देण्यात आली. सदर कामाचा खर्च हा सन ९७-९८ च्या शासकीय अनुदानातून करण्यात येणार आहे.

तरी वाटाघाटी अंतिमचा दर म्हणजेच अंदाजपत्रकीय दरानुसार श्री. सलीम पटेल यांची निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रियदर्शनी इंदिरानगर येथील स्मशानभूमीमध्ये संरक्षित भिंत चौकीदारासाठी निवासस्थान रेस्टींग रोड व पाण्याचा हौद बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच गुत्तेदार श्री. सलीम पटेल यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम श्री. सलीम पटेल यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०/१९ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. पहाडसिंगपुरा स्लम येथे ३०० मी.मी. अर्धगोलाकार गटार बांधणे बाबत कामाकरिता सा. बां. खाते याच्या वर्ष ९६-९७ च्या दरसूचीनुसार रु. ८,३६,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम "म्हाडा अनुदान" या शिर्षकातून करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी मंजुरी दिलेली आहे. प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यात आले असता अंतिम तारखे पर्यंत एकूण-२२ निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारण्याच्या

अंतिम तारखे पर्यंत एकूण सहा निविदा प्राप्त झाल्या व उपस्थित गुत्तेदारा समक्ष उघडण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| १) | शेख मसूद | ३२.६६% कमी |
| २) | परफेक्ट कन्स्ट्रक्शन | २७.५% कमी |
| ३) | न्यु स्टार कन्स्ट्रक्शन | २१.७८६% कमी |
| ४) | महेंद्र कन्स्ट्रक्शन | १३% कमी |
| ५) | एम. पी. जैस्वाल | १०.९९% कमी |
| ६) | कुलवंतसिंग | ५% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३२.६६% कमी दराची असलेली श्री. शेख मसूद ठेकेदार यांची निविदा मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पहाडसिंगपुरा स्लम येथे ३०० मी.मी. अर्धगोलाकार गटार बांधणेच्या कामाकरिता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ३२.६६% कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१/२० :**

शिक्षणाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सध्या हनुमान नगरात १ली, २ री चे वर्ग श्री. काळे यांच्या खाजगी इमारतीत भरविण्यात येतात ही जागा अत्यंत अपुरी असून संबंधित घर मालकाने जागा रिक्त करण्याबाबत विनंती केली आहे. त्यामुळे सदरची शाळा चालू शैक्षणिक वर्षात इतरत्र स्थलांतरित करण्यासाठी पुंडलिक नगर या भागात उघडण्यातच्या बाबतीत स्थळ पाहणी करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या वाढीमुळे सध्या अस्तित्वात असलेल्या शाळेमध्ये तिसरा वर्ग चालू करणे गरजेचे आहे. पुंडलिकनगर येथे श्री. शिंदे यांच्या खाजगी इमारतीत सदरची शाळा स्थलांतरित केल्यास त्या ठिकाणी बहुतांश पुरेशी जागा उपलब्ध होऊन शकेल व तिसरीचा वर्ग ही तेथे सुरू करता येईल. श्री. शिंदे यांनी आपली खाजगी इमारत शाळेसाठी भाड्याने देण्याची संमती दर्शविलेली आहे.

पुंडलिकनगर येथे नविनशाळा बांधावयाची झाल्यास त्या भागात खाजगी कन्या शाळेसमोर महानगरपालिकेची खुली जागा उपलब्ध आहे. या मोकळ्या जागेत शाळेसाठी इमारत बांधता येऊ शकेल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. गौतम खरात :** मंजूर करावे अनेक ठिकाणी खोल्या भाड्याने घेतल्या जातात परंतु संबंधितास पेमेंट दिले जात नाही. जयभिमनगर प्रगती कॉलनी येथील ७-८ महिन्याचे भाडे दिलेले नाही.

**मा. सभापती :** शिक्षणाधिकारी यांनी खुलासा करावा.

**शिक्षणाधिकारी :** कुठलेही भाडे थकलेले नाही.

**मा. सभापती :** अशा प्रकारे भाडे थकीत ठेवण्यात येऊ नयेत. सदरचा प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पुंडलिकनगर येथील मनपा शाळेस जागा अपुरी पडत असल्याने व नविन शैक्षणिक वर्षात तिसरीचा वर्ग सुरू करणे तसेच विद्यार्थ्यांची वाढता संख्या लक्षात घेता श्री. शिर्दे यांच्या खाजगी इमारतीत सदरची शाळा स्थलांतरीत करण्यास तसेच सदरील इमारत शाळेकरिता भाड्याने घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

मा. सभापतींनी सर्वांचे आभार मानुन "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे या सभापतींनी जाहिर केले.

स्वाक्षरीत/-
नगर सचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
मा. सभापती,
स्थायी समिती,
महानगरपालिका, औरंगाबाद

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.*

**दिनांक १०-०६-९८ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. मा. श्री. जयवंत ओक सभापती स्थायी समितीची सभा संपन्न झाली तिचे इतिवृत्त. सभेची सुरुवात "वंदे मातरम्" या गिताने अंदाजे दु.४=३० वा. झाली. सभेस खालील स.स. तथा अधिकारी वर्ग उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स.स. श्री. विधाते प्रभाकर सिताराम | स. सदस्य |
| २) | स.स. श्री. अ. रऊफ म. अ. माबूद | -//- |
| ३) | स.स. श्री. सय्यद अली मिरा सलामी | -//- |
| ४) | स.स. श्री. गौतम लांडगे | -//- |
| ५) | स.स. श्री. गांगवे बन्सी तुळशीराम | -//- |
| ६) | स.स. श्री. इंगळे रविंद्र बाबुराव | -//- |
| ७) | स.स. सौ. वाडेकर यशोदा धनंजय | -//- |
| ८) | स.स. श्री. जैन विकास रतनलाल | -//- |
| ९) | स.स. सौ. तळेकर राधाबाई | -//- |
| १०) | स.स. श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | -//- |
| ११) | स.स. श्री. बचाटे राजकुमार (मामा) | -//- |
| १२) | स.स. श्री. विखारोद्दिन पि. खुदबोद्दिन | -//- |
| १३) | स.स. श्री. स. अ. एकबालोद्दिन स. मो. कुतूबुबोद्दिन | -//- |

**विषय क्र. २२/१ :**

दिनांक २८-०५-९८ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री. मिरा सलामी :** आमच्या बैठकीसाठीच्या अजेंड्यांत दि. २८-०५-९८ चे इतिवृत्त फक्त जोडण्यात आलेले आहे. यापूर्वीचे जवळपास दोन तीनचे इतिवृत्त दि. १९-०३-९८ चे वगैरे का जोडण्यात आलेले नाही. काय कारण आहे या बैठकीचे इतिवृत्तासोबत सर्व इतिवृत्त न जोडण्याचे कारण काय? जर मागील इतिवृत्त कायम न करता या बैठकीतील विषय मंजूर केल्यास सदरची बैठक अनाधिकृत आहे असे समजण्यात येईल. करिता जोपर्यंत मागील इतिवृत्त सोबत जोडण्यात येणार नाही. तोपर्यंत सभागृहात कोणत्याही प्रकारचे सभेतील अजेंड्याचे विषयावर निणर्य घेऊ नये असे मला वाटते. कारण महाराष्ट्र शासनाचा जी. आर. कार्यालयात आलेला आहे की सभेतील विषयी मंजुरी होऊन जोपर्यंत इतिवृत्त कायम होत नाही. तोपर्यंत त्याची अंमलबजावणी (कार्यवाही) प्रशासनाने करू नये. याबाबतची माहिती सभागृहाला द्यावी.

**मा. सभापती :** पुढील बैठकीत इतिवृत्त जोडण्यात येतील. त्याबरोबर शासनाकडून आलेल्या जी. आर. ची माहिती देखील पुढील बैठकीत देण्यात येईल.

**श्री. मिरा सलामी :** प्रशासनाकडे जी. आर. ची प्रत आलेली आहे. ती सभागृहात आणावी. सभेच्या अजेंड्यामध्ये मागील इतिवृत्त का जोडण्यात आले नाही याबाबत

कुणाचा स्वार्थिपणा आहे काय? याची सभागृहाला माहिती द्यावी. (याच वेळी सभागृहात शासनाकडील जी. आर. चे झेरॉक्स प्रत दाखवतात.)

**मा. सभापती :** स.स.नी सूचना केल्याप्रमाणे मागील इतिवृत्त जे. की, जोडण्यात आलेले नाही. फक्त दि.२८-०५-९८ चे इतिवृत्त जोडण्यात आले व उर्वरित झालेल्या सभाचे इतिवृत्त कामय व्हावयाचे आहे. याबाबत कार्यवाही करावी. व कार्यालयातून शासनाची जी. आर. ची. प्रत स. स. यांचेकडे कशी प्राप्त झाली. याबाबत ज्या कर्मचाऱ्यांनी ही प्रत व कार्यालयातील गोपनीय माहिती स. स. यांना पुरविली संबंधितावर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

**श्री. मिरा सलामी :** दि. ०३-१०-९७ रोजी मा. आयुक्त यांनी माझ्या वॉर्डात पाहणी केलेली होती. दलालवाडी पैठणगेट भागात पाण्याची अत्यंत दयनीय अवस्था आहे. येथील जलवाहिनी बाबत मागे टेंडर मागविण्यात आले. परंतु प्रस्ताव अद्यापही सादर झालेला नाही. याचे कारण काय? हे समजायला मार्ग नाही. तेंव्हा पाणी पुरवण्याच्या अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न सोडविणेसाठी आवश्यक ती कार्यवाही प्रशासनाने करावी.

**उप अभियंता पापु-१** : क्रांतीचौक ते हॉटेल एलोरा येथील पाण्याचे पाईपलाईनचे टेंडर काढलेले आहे. त्यानंतर टेलिफोन भवन पासून पैठणगेट यासाठी दुसरे टेंडर मागवून काढण्यात आलेले असून आचार संहिते टेंडर फायनल झालेले नाही. आता तातडीने कार्यवाही करण्यात येईल.

**श्री. मिरा सलामी :** आचारसंहितेमुळे पाण्याच्या पाईपलाईनचे काम थांबलेले आहे हे म्हणजे योग्य नसून पाण्याच्या अत्यंत जिव्हाळ्याच्या प्रश्नावर लोकांना त्रास होऊ नये. यासाठी टँकरद्वारे लोकांना पाणीपुरवठा करावा लागतो. मागील वेळेस दोन पाण्याच्या टँकरवर टाकी बसवून शहरातील नागरिकांना यांचा उन्हाळ्यासाठी उपयोग करून घेणेसाठी वापर होईल असे असतांना अद्यापही पाण्याचे टँकरवर टाक्या बसविण्यात का नाही आल्यात? माहिती द्यावी. एवढा उशिर होण्याचे कारण काय? जर एवढा उशिर होत असल्यास उन्हाळ्यासाठी टँकर घेण्याचा मनपाचा उद्देश सफल झालेला दिसत नाही.

**मा. सभापती :** १) संबंधित अधिकारी यांनी माहिती द्यावी. (याचवेळी उपअभियंता यांत्रिकी व अति. शहर अभियंता उपस्थित नाही. असे समजले तेव्हा) जर संबंधित अधिकारी सभागृहात उपस्थित नसल्यास प्रशासनाने संबंधित अधिकाऱ्यांनी रजेचे पत्र दिलेले आहे काय? ते तपासून कार्यवाही व्हावी. पाण्याच्या संदर्भात अंदाजपत्रक त्वरित तयार करावे.

२) याशिवाय ज्या ज्या स. स. नी आपआपल्या वार्डातील पाण्याच्या समस्यांसाठी कार्यालयात पत्र दिलेले आहे. अशा अत्यावश्यक सेवे बाबत प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी.

**श्री. प्रभाकर विधाते :** माझ्या वॉर्डातील लालमंडी येथील पाण्याच्या पाईपलाईनचे अंदाजपत्रक तयार केलेले असूनही अद्यापही कार्यवाही झालेली नाही.

**उप अभियंता पाप-१ :** ठिक आहे. संबंधित भागाची पाहणी करण्यात येईल.

**मा. सभापती :** याबाबत तातडीने कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे आचारसंहिता असल्याने जनतेची अनेक कामे झालेली नाहीत. त्यामुळे सर्वसाधारण सभेतील निर्णयानुसार स्वेच्छा निधीची तारीख कधीपर्यंत वाढविली ते दाखवावी.

**श्री. मिरा सलामी :** शासनाचा जी. आर. आहे. तो सभागृहात वाचून दाखवावा. यात नमूद केलेले आहे की, झालेल्या कामातील खर्चाचे ऑडिट सुध्दा करावे. तेंव्हा त्याप्रमाणे प्रशासनाने अंमल बजावणी करावी.

**मा. सभापती :** ठिक आहे. मा. आयुक्त यांनी माहिती द्यावी.

**मा. आयुक्त :** लोकसभेची मध्यावधी निवडणूका असल्याने संपूर्ण देशभर आचार संहिता होती. आणि नंतर कन्नड मतदार संघातील विधानसभेमुळे संपूर्ण जिह्याला आचार संहिता लागू झाली आणि असल्याचे मा. जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या आदेशान्वये जिल्हाभर आचारसंहिता होती. परंतु मा. सभापती यांनी शहर विकासाची कामे करण्याकरिता या आचारसंहितेच्या महानगरपालिका हद्दित कोणत्याही प्रकारची बाधा पोहचत नाही अशी याचिका उच्च न्यायालयात दाखल केली. व त्यानुसार कोर्टाने वरील बाबतीत प्रशासनाला आदेशित केले की, कन्नड विधानसभा या भागाशी शहर विकासाच्या कामाशी अगदी भिन्न असून कोर्टाने काही निर्बंध घालून शहर हद्दितील नागरिकांची विकास कामाबाबत आदेशित करून निकाल दिलेले आहेत. त्यामुळे दि. १६-०३-९८ पासून काही कामांचे टेंडर वगैरे काढणेबाबत कार्यवाही चालू होती. ती आचारसंहितेमुळे थांबलेली होती ती पुढे चालू झालेली आहेत. ज्यामध्ये दलालवाडी च्या कामाचे टेंडर काढून काम करवून घ्यावयाचे आदेशित केलेले होते. तथील कामाचे कोणत्याही एजन्सीजचे टेंडर ठरलेले नव्हते आता ज्या एजन्सीचे टेंडर निश्चित झालेले आहे. त्याचेकडून काम करवून घेण्यात येईल. या वर्षीच्या उन्हाळ्यासाठी दोन टँकर पाणी पुरवठ्यासाठी घेतलेले होते व त्यावर टाक्या बसवून चालविण्यासाठी उपयोगात आणावयाचे ठरले असे असतांना गेल्या दोन महिण्यापासून दोन टँकर विकत घेऊनही नागरिकांच्या कामासाठी उपयोगात येत नसतील तर संबंधितावर आवश्यक ती चौकशी करण्यात येईल. आता माझ्याकडे ज्या अधिकाऱ्यांनी रजा मागितलेली आहे. त्यापैकी श्री. एम.डी. सानेवणे, कार्यकारी अभियंता पापू यांनी परिक्षेसाठी सुट्टी घेतली आहे. श्री. सि. एस. सोनी यांची आईच्या प्रकृतीमुळे सुट्टी घेतली तर डॉ. देशपांडे यांनी स्वत: चा मुलागा अमेरिकेवरून आलेला असल्याने सुट्टीवर आहेत. तसेच स. स. प्रभाकर विधाते यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत कार्यवाही करण्यात येईल.

**श्री. प्रभाकर विधाते :** राधामोहन कॉलनी येथील गटारी बाबत अनेक तक्रारी आहेत. येथील प्रत्यक्ष स्थळ पाहणी कररावी. येथील दुर्गंधी पाणी रस्त्यावर सारखे वाहत असते.

**मा. सभापती :** संबंधित स्थळी प्रत्यक्षात जाऊन पाहणी करून संबिंधत उप अभियंता स्लम अधिकाऱ्यांनी कार्यवाही करावी व अहवाल सादर करावा.

**श्री. विखारोद्दिन :** मागील सभेमध्ये मी सूचना केलेली होती की, कोटला पाण्याची टाकी व इतर टाकीवर तातडीने संपर्क साधण्यासाठी दूरध्वीची आवश्यकता आहे. टेलिफोन अद्यापही शिफ्ट झालेला नाही.

**उपआयुक्त (प्र.) :** या संदर्भात टेलिफोन विभागास पत्राने कळविण्यात आलेले आहे व एक-दोन दिवसांत याबाबत कार्यवाही होईल.

**श्री. विखारोद्दिन :** माझ्या वॉर्डातील खालील समस्यांचे प्रशासनाने निराकरण करावे.

१) वॉर्डातीले रिटनिंग चाल

२) शादिखानाचे एक वर्षापासून काम होत नाही.

३) मनपा आरोग्य केंद्राचे काम अपुरे असून ८ महिन्यापासून काम बंद आहे.
४) कब्रस्तानचे अंदाजपत्रक तयार आहे. तरी काम होत नाही.

**मा. सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी.

**शहर अभियंता :** स.स. नी. विचारलेल्या प्रश्नांप्रमाणे शहाशौक्ता कॉलनीत कब्रस्तान आहे. परंतु यामध्ये अंदाजपत्रक तयार केलेले असून औफाक बोर्डाने "ना हरकत प्रमाणपत्र" देणे आवश्यक आहे. तोपर्यंत कार्यवाही करता येणार नाही.

**मा. सभापती :** मी. स. स. ना. विनंती करतो की, माझ्या माहितीप्रमाणे शहरातील सर्व कब्रस्तान (मुस्लिम) जी आहेत त्याबाबतच्या औफाक बोर्डाकडून वारंवार "ना हरकत प्रमाणपत्र" घ्यावे लागते. याशिवाय कब्रस्तान ही औफाक बोर्ड त्यांना जसे वाटेल तसे त्यांना मनमानीपणे ९९ वर्षाच्या लिजवर तेथील जागा दिलेली आहेत. त्यामुळे तेथील जागांचा गैरवापर लोक करतात. तसेच औफक बोर्डने इतरांना जागा विकण्यापेक्षा, त्यातील विक्रीतून आलेल्य काही अंशी पैसा मनपाकडे जमा करून अशा लोकापयोगी कब्रस्तान च्या कामांसाठी मनपा वेगवेगळे कामे करवून घेऊ शकते. याची स. स. नी दखल घ्यावी. याशिवाय औफाक बोर्डाचे अध्यक्ष / सचिव व मनपा प्रशासन यांनी यासाठी संयुक्त बैठक घेऊन यावर तातडीने निर्णय घ्यावा. जे की, मनपाचे आर्थिकदृष्ट्या फायद्याचे राहील. काख कब्रस्तान ही जागा औफाक बोर्डाची व त्यावर विविध विकास कामे मनपा फंडातून होतात. ही बाब योग्य नसून यावर संयुक्त बैठक बोलावून निर्णय होणे महत्वाचे आहे. कारण औफाक बोर्डचा असा मनमानीपणा असल्यास शासना पातळीवर कळविणे योग्य राहील.

**श्री. विखारोद्दिन :** माझ्या वॉर्डातील कब्रस्थानचा प्रश्न असून याबाबत प्रशासनाने अंदाजपत्रक तयार करूनही पुढील कार्यवाही मात्र केलेली नाही. ती बाब जाणीवपूर्वक प्रशासन करणे ही काय असे वाटते. कब्रस्थान बाबत, औफाक बोर्ड व मनपा यांचे माध्यमातून काही तोडगा निघतो काय? याबाबत शासन व मा. पालकमंत्री यांचेकडून कार्यवाही केल्यास अधिक सोईस्कर होईल.

**श्री. मिरा सलामी :** कब्रस्तानच्या चर्चेवरून असे वाटते की "गरीब की बीबी सबकी भाभी" असे म्हणावयास हरकत नाही. कारण औफाक बोर्डला त्यांचेकडे किती जमीन आहेत व त्यावरील किती जमीन विकलेल्या आहेत व किती जमीनीवर अतिक्रमण झालेले आहेत. ते सांगणे कठीण आहे. सर्व वसाहतीतून मालमत्ता धारकांकडून मालमत्ता कर वसूल केल्या जातो. त्या करातून नागरिक मनपाकडून सर्व सुविधा देण्याच्या मागण्या करतात त्यामध्ये कब्रस्थानचीही सुविधा आहे अनेक ठिकाणी रु. १०.००/- १०.०० लाखाचे अंदाजपत्रक तयार करूनही मनपाने पुढील कार्यवाही केलेली दिसत नाही. आता सध्या चर्चेद्वारे असे बोलले जात आहे की, औफाने कब्रस्थान विकास कामासाठी पैसा द्यावा. परंतु आतापर्यंत अनेक भागातील गेल्या दोन तीन वर्षापासून कब्रस्तानच्या टिनिंग वॉल, आणि इतर सुविधा बाबत अंदाजपत्रक तयार करूनही कामेच होत नाहीत. आणि त्यामुळे स. स. हे शहरातील संपूर्ण कब्रस्थानातील रिटर्निंग वॉलचे कामाबाबत सारखे ओरडतात याबाबत मा. आयुक्त यांनी कार्यवाही करावी.

**मा. सभापती :** औफाक बोर्डने कब्रस्थान (मुस्लिम) मनपाच्या कडे हस्तांतरीत करावे म्हणजे मनपामार्फत सर्व सुविधा पुरविल्या जातील. औफाक बोर्ड इतर काही

लोकांना लिजवर जागा का देते. शहरातील अनेक भागामध्ये (मुस्लिम) कब्रस्तान आहेत. संगळीकडे अशाप्रकारे शहरात कामे करावयाची झाल्यास मनपाचे अंदाजपत्रक पुरेल काय? याची शंका आहे. माझ्याही वॉर्डात कब्रस्थान आहे. अनेक ठिकाणी अनेक समाजाच्या हिंदु, ख्रिश्चन व बौध्द यांच्या ही स्मशानभूमी आहेत. मग प्रत्येकाने आपआपले स्मशानभूमी विकसित करण्यासाठी मांडावे लागेल. यासाठी कुठेतरी निर्णय घेणे योग्य राहील. नसता फक्त विविध कब्रस्थानसाठी रु. ५.०० कोटी खर्च होईल व ही तरतूद कोठून करणार?

**श्री. विखारोद्दिन :** वक्फ बोर्ड प्रायव्हेट आहे की शासनाची आहे याची माहिती शासनाला विचारावे.

**श्री. मिरा सलामी :** छावणी पसिरातील "कर्णपुरा" देविचे मंदिर येथील कामासाठी मनपाने छावणी बोर्डनी "ना हरकत प्रमाणपत्र" घेऊन कामे केलेली आहेत.

**श्री. अब्दुल रऊफ** : प्रशासनाने गेल्या १-२ वर्षापासून कब्रस्तानमधील कामे अंदाजपत्रक तयार करूनही पुढील कार्यवाही करीत नाही.

**मा. सभापती :** शहरातील विविध कब्रस्तानासाठी आतापर्यंत मनपातर्फे वॉल कंपाऊंड व इतर सुविधाबाबत किती व कशा प्रकारे खर्च केलेले आहेत याची सविस्तर अंदाजपत्रकासह व कामाप्रमाणे माहिती पुढील बैठकीत शहर अभियंता यांनी द्यावी. त्याचप्रमाणे दिल्यानंतर त्या कामाबाबत काय कार्यवाही केली याबाबतचे पत्र तातडीने संबंधित नगरसेवकांना द्यावे. आणि स. स. श्री. विखारोद्दिन यांनी केलेल्या सुचनेप्रमाणे कार्यवाही करावी.

**श्री. विखारोद्दिन :** मागील बैठकीत स.स. श्री. संजय जोशी यांनी जी माझ्या वॉर्डातील कब्रस्तान संदर्भात सूचना केलेली होती. ती चुकीची असून संबंधित ठिकाणी स्मशानभूमी नसून त्याचे कारण वेगळे आहे.

**शहर अभियंता :** हमालवाडी येथील स्मशानभूमी बाबत कोर्टातून स्टे आणला होता.

**मा. सभापती :** या कामाच्या संदर्भात स. स. श्री. विखारोद्दिन व शहर अभियंता यांनी माझे सोबत समक्ष पाहणी करण्यासाठी चालावे त्यानंतर कार्यवाही करणेत येईल.

**श्री. विखारोद्दिन :** माझ्या निदर्शनास अशा गोष्टी आलेल्या आहेत की, माझ्या वॉर्डातील काम असल्यास मलाच विचारणा न करता तेथील काम थांबविण्यात येते. यांचे कारण काय? याबाबत प्रत्यक्षात संयुक्त असून स्थळ निश्चित करण्यात येऊन नंतर बदलण्यात येते याची माहिती संबंधित नगरसेवकांस होत नाही. मा. सभापती, दिशाभूल करण्यात आलेली आहे. त्याचबरोबर मा. महापौर व मा. आयुक्त सुध्दा याच संदर्भात काम थांबविण्याचे पत्र देतात. याचे कारण काय? हे समजत नाही.

**श्री. प्रभाकर विधाते :** मागील बैठकीत माझ्या वॉर्डातील बेगमुपुरा स्मशानभूमीतील काही समस्यां बाबत विचारणा केली हाती. त्याबाबत काय झाले? मकई गेट वरून जावे लागत आहे.

**शहर अभियंता :** बेगमपुरा स्मशानूभमी स्थित कंपाऊंड वॉल बांधलेली आहे त्या ठिकाणी ५० फुट रस्ता आहे. तेथे लागूनच लोहरी समाजाची वस्ती असून या रस्त्यांच्या कामासाठी तेथील लोकांनी आक्षेप घेतलेला आहे. जाणे येणेसाठी दुसरा रस्ताच नसल्याने पर्यायी व्यवस्था सुध्दा नाही. आणि त्यामुळे कल्वर्ट भिंत ठिकाणी रोड, लाईटची बोरींग व्यवस्था झालेली आहे.

**मा. सभापती :** १) स.स.श्री. प्रभाकर विधाते यांच्या वॉर्डातील समस्या असल्याने त्यांना सोबत घेऊन स्थळ पाहणी करावी व राहिलेल्या समस्या तातडीने सोडवाव्यात व समस्या सोडविण्यासाठी काही लोक अडथळे आणत असल्यास पोलिस तक्रार करून कार्यवाही करावी.

२) शहरातील ज्या स्मशानभूम्या आहेत त्यातील किती ठिकाणच्या स्मशानभूमीत सुविधा पुरवावयाच्या आहेत याची माहिती द्यावी.

३) विविध समाजाच्या जेवढ्या स्मशानूमी / कब्रस्तान आहेत. त्या विकसित करावयाचे असल्यास प्रथमतः त्या मनपाने स्वतःच्या ताब्यत घेऊन त्यावर स्थळ पाहणी करूनच प्रशासनाने पुढील कार्यवाही करावी.

**श्री. मिरा सलामी :** कब्रस्तान महानगरपालिकेच्या अंडरमध्ये घेण्यास आमचा पाठींबा आहे.

**श्री. विखारोद्दिन :** अशा प्रकारचा प्रस्ताव सभेमध्ये मंजूर करावा की, शहरातील सर्व औफाकच्या जमनी महानगरपालिकेच्या ताब्यात घ्याव्यात यासाठी मा. पालकमंत्री व शासनाकडून मंजुरी घ्यावे. तसेच माझ्या वॉर्डातील शादिखाना बाबत काय कार्यवाही केली याची माहिती द्यावी.

**शहर अभियंता :** १) या ठिकाणी जी २६०० स्क्वे.मी. जागेवरच काम करता येईल. त्याची पाहणी करून कार्यवाही करावी लागेल. कारण त्या ठिकाणी पाण्याची टाकी बांधलेली आहे.

२) हमालवाड्यात रिटर्निंग वॉल विशेष घटक योजने अंतर्गत त्यासाठी पत्रव्यवहार चालू आहे.

**श्री. स. अ. एकबालोदिन स. मो. कुतुबूद्दिन :** कबाडीपुरा वॉर्डातील रिटर्निग वॉल बाबत काय झाले तेथील काही लोकांनी तक्रार दिली आहे की, नगरसेवक बांधू देत नाही. असे समजले ते खरे आहे काय? याचा खुलासा करावा.

**उप अभियंता स्लम :** तेथील गुत्तेदाराने स्टे आणलेला आहे. याचे कारण म्हणजे संबंधित गुत्तेदाराने अगोदर काम केलेले होते ते काम उशिरा व समाधानकारक न झाल्याने त्यास नोटीस देऊन त्यास ब्लॅक लिस्ट करावे असे होते. परंतु त्यांनी केलेल्या कामाचा सर्व पैसा दिल्यानंतर त्यांनी कोर्टातून स्टे आणलेला आहे. व उर्वरित कामही मलाच मिळावे अशी त्यांची मागणी आहे.

**मा. सभापती :** महानगरपालिकने ज्या गुत्तेदाराने ब्लॅक लिस्ट केलेली आहे. त्यांना पुन्हा काम देवू नये. परंतु काही गुत्तेदार हे दुसऱ्याच्या नावावर कामे घेतात याची प्रशासनाने दखल घ्यावी.

**श्री. स. अ. एकबालोदिन स. मो. कुतुबूद्दिन :** पुढील काम थांबलेले आहे. याबाबत प्रशासनाने कार्यवाही करून जाहिर नोटीस द्यावी व वर्तमान पत्रातून खुलासा करावा. वस्तुस्थिती लोकांना कळाली पाहिजे.

**मा. सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी याबाबत तातडीने कार्यवाही करावी.

**श्री. म. अ. रऊफ म.अ. माबुद :** मागील बैठकीत शहरातील सर्व नाले साफसफाईची चर्चा केलेली हाती. व पुढील बैठकीत सविस्तर माहिती देण्यात येईल. असे सांगितले होते. त्याबाबत काय झाले.

**मा. सभापती :** या संदर्भात अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून कार्यवाही सुरू करणार आहे.

**श्री. गौतम लांडगे :** कोणत्याही कामाचे अंदाजपत्रक तयार करून कामाची निविदा काढेपर्यंत जवळपास तीन महिन्याचा कालावधी लागतो.

**मा. सभापती :** अशा तातडीच्या कामासाठी शॉर्ट टेंडर ३ दिवसांत काढून कार्यवाही करावी.

**श्री. विखारोद्दिन** : मागील वर्षाचे सन १९९७-९८ चा स्वेच्छा निधीचा खर्च या वर्षी आचारसंहिता असल्याने दोन महिने मुदतवाढ केलेली होती. त्याप्रमाणे काय कार्यवाही होत आहे.

**मुख्य लेखा अधिकारी** : सर्वसाधारण सभेने नगरसेवकांच्या स्वेच्छा निधी संदर्भात प्रस्ताव मंजूर केलेले आहे. त्यानुसार माहे डिसेंबर पर्यंत स. नगरसेवकांनी त्यांच्या स्वेच्छा निधीतील कामाबाबत पत्र द्यावे त्यावरील कामाच्या अनुषंगाने शासनाचे कॅलेंडर वर्ष व मनपाचे आर्थिक बजेट गृहित धरून माहे मार्च पर्यंत कामाची प्रगतीची पूर्तता करणेसाठी प्रशासनाला कालावधी लागतो व ते त्याच वर्षीच्या अंदाजपत्रकातून खर्च करण्यासाठी प्रशासनाला भाग पडते. दुर्दैवाने या वर्षी अनेक कामाचे संदर्भाने दिली आली. व आचारसंहिता असल्याने बरीचशी कामे झाली नाहीत. तथापी ३० एप्रिल ९८ पर्यंत जेवढी बिले तयार होऊन आलीत ती सर्व मार्च महिण्यातीलच म्हणजे कॅलेंडर वर्षातील गृहित धरून मंजुरी केलेली होती. मात्र त्यानंतरची आलेली बिले घेतलेली नाही कारण सर्वसाधारण सभेने आचासंहिता लागू असल्याने आणखी दोन महिने स्वेच्छा निधीचा वापर करण्यासाठी मुदतवाड केलेली होती. खरे परंतु प्रशासनाचे मत त्यामध्ये घेतलेले नाही. आता मार्च ९८ मागील वर्षीच्या अंदाजपत्रकातील तरतुदी बंद झाल्याने ती मंजूर करता येणे शक्य नाही. आता नव्याने या वर्षीचा स्वेच्छा निधी याच वर्षासाठी वापरावा लागणार आहे. मागील वर्षीचा नाही.

**मा. सभापती :** ज्या स.स. नी माहे डिसेंबर ९७ पर्यंत स्वेच्दा निधीतून कामाच्या बाबतीत पत्र दिलेले असतील त्यांचेच पत्र गृहित धरलेले आहे. त्यानंतर दिलेल्या अर्जाचा विचार केला नाही. असे प्रशासनाचे मत आहे. परंतु सर्वसाधारण सभेचा प्रस्ताव झाला त्यावेळी प्रशासनाचे मत जाणून घेतलेले नाही. म्हणून आता नव्याने या वर्षीच्यासाठी पत्र दिल्यास स्वेच्छा निधीचा खर्च करता येईल.

**श्री. म. अ. रऊफ, श्री. प्रभाकर विधाते, श्री. बन्शी गांगवे, श्री. विखारोद्दिन, श्री. मिरा सलामी:** सर्वसाधारण सभेने प्रस्ताव मंजूर केलेला आहे. स्वेच्छा निधीतून काम करण्यासाठी पत्र दिल्यापासून एका महिन्यात मंजूर करण्याचे म्हटलेले आहे. आणि आता प्रशासन अडचणी का सांगते? आमच्या वॉर्डातील असे अनेक कामे आहेत की, स्वेच्छा निधीतील गेले ८-९ महिण्यापासून पत्र देऊन सांगितलेले असता नाही कार्यवाही झालेल नाही. तर डिसेंबर मध्ये पत्र दिल्यास मार्च -९८ पर्यंत स्वेच्छा निधीतील कामे कसे होतील यासाठी प्रशासनाने आपले धोरण व्यवस्थित हाताळावे. एकास वेगळे धोरण आणि दुसऱ्यास वेगळे धोरण प्रशासनाने दुभाभाव अवलंबवू नये. नागरिकांची कामे वेळेवर होणेसाठी नगरसेवक सारखे विचारणा करतात व प्रशासन कोणत्याही कामात दिरंगाई करून टाळाटाळ करते. त्यामुळे नगरसेवकांना नागरिकांकडे तोंड दाखविण्यास जागा राहात नाही.

**मा. सभापती :** आताच सांगितलेले आहे. सर्वसाधारण सभेने प्रस्ताव जरी मंजूर केलेला असेलही तरी त्यावेळी प्रशासनाचे मत जाणून घेतलेले नाही.

**मुख्य लेखा अधिकारी :** नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीच्या नियमावली नुसार ३१ डिसेंबर पूर्वी पत्र द्यावे. सर्वसाधारण सभेच्या मंजुरीनुसार कार्यवाही करावी लागते. आणि माहे ३१ डिसेंबर ९७ पर्यंत ज्या स.स. चे स्वेच्छा निधीतील कामाबाबत पत्र

आलेले असतील त्याचे पत्रानुसार संबंधित विभागाने कार्यवाही केलेले असल्यास त्याबाबत कमीतकमी ३ महिन्याचा कालावधी लागतो. उदा. अंदाजपत्रक तयार करणे, टेंडर मागविणे, प्रस्ताव तयार करणे व मंजुरीसाठी पाठविणे या सर्व प्रशासकीय कामासाठी अवधी लागतो. यासाठी ९ महिण्याच्या कालावधीत स.स. नी आपआपले वॉर्डातील स्वेच्छा निधीचे कामासाठी पत्र देणे आवश्यक आहे. जेणे करून पुढील ३ महिन्यात प्रशासकीय प्रक्रिया होऊन अंदाजपत्रकीय तरतुदीनुसार त्याच कॅलेंडर वर्षातील खर्च होऊन कार्यवाही पूर्ण होऊ शकते. मात्र त्यानंतर आलेल्या पत्राचे बाबतीत पुढील आर्थिक वर्षातील खर्चाबाबत हिशेबात धरला जाईल.

**श्री. विखारोद्दिन :** सर्वसाधारण सभेने जसा प्रस्ताव मंजूर केलेला होता. ह्याप्रमाणे स्थायी समितीने सुध्दा अपवादात्मक परिस्थिती नुसार स्वेच्छा निधीचा खर्च करणेसाठी दिलेल्या अर्जानुसार याच स्थायी समितीत प्रस्ताव मंजूर करावा. त्याप्रमाणे प्रशासन कार्यवाही करेल.

**मा. आयुक्त :** स. खासदार / आमदार / नगरसेवक यांचा स्वेच्छा निधी हा आपआपल्या मतदार संघातील / वॉर्डातील छोटे छोटे गरजेची कामे करून घेण्यासाठी असतात. या निधीचा सुरुवात १ एप्रिल पासून सुरू होऊन ३१ मार्चला संपते या कालावधीत प्रशासन नियोजन करून कार्यक्रम आखते. मार्च पर्यंत नियोजन करणार नसला तर त्या स्वेच्छा निधीचा उपयोग होणारनाही. यावर्षी आपण असे ठरविलेली स्वेच्छा निधी अंतर्गत ज्या नियमावली आहेत. त्याप्रमाणे आपण स्वेच्छानिधीचा उपयोग करावा. त्या नियमावलीमध्ये सर्वांनी सर्वसाधारण सभेत स्पष्टपणे मान्य केले आहे की, स्वे. नि. कामाची जी पत्र आहेत ती स. नगरसेवकांनी आपल्या वॉर्डातील विविध कामांचा अभ्यास करून कोण कोणती काम करायची आवश्यकता आहे, कोणाला प्रशिक्षण, कोणाला अरोग्यासाठी मदत करायची, इ. अभ्यास करून डिसेंबर पर्यंत पत्र द्यावयाचे आहे. मर्ग मार्च पर्यंत साधारण ३ महिन्यात प्रशासनाला संबंधित काम पूर्ण करण्यासाठी प्रयोजन करून कार्यवाही करण्यात येते.

डिसेंबर पर्यंत आपण सर्वांना ठरविले होते की, आपल्या स्वेच्छानिधीची आपले जी पत्र आहेत त्यावर कार्यवाही करायची म्हणजेच ३ महिन्यात म्हणजे ३१ मार्च पर्यंत सर्व स्वेच्छा निधी उपयोगा येईल असे ठरविले होते. यावर्षी डिसेंबर मध्येच आचार संहिता लागल्यामुळे महापौरांनी अंदाजपत्रकाच्या अर्थसंकल्पीय मिटींगच्या वेळी सांगितले की, जाने, फेब्रु, मार्च जवळजवळ २ १/२ महिने आचार संहितेत गेल्यामुळे २ महिने तुम्ही सवलत द्यावी. ज्यांची पत्र यापूर्वी आली नाही किंवा आचार संहितेमुळे काम करू शकले नाही, त्या २ महिनेत त्यांचा मागील वर्षात ९७-९८ वर्षात खर्च टाका. ९८-९९ ची जी स्वे. नि. ची. रु. २ लक्ष आहेत त्यावर त्याचा बोजा टाहू नका. असे. ना. महापौरांनी सांगितले ही प्रथा म्हणून त्याचा वापर होऊ नये अशी आपली सर्वांची अपेक्षा आहे. दरवर्षी आपण डिसेंबर पूर्वी आपण पत्र द्यावयास पाहिजे हा ठाम निर्णय सर्वसाधारण सभेत घेतलेला आहे. या मागची भूमिका आहे की कमीत कमी ३ महिने नकाशे अंदाजपत्रके इ. कामासाठी लागतील. आपल्या काही स. नगरसेवकांनी १५ मार्चला काही २० मार्च काही २५ मार्चला माझ्याकडे पत्र आली की ९७-९८ च्या वर्षात कामे करावी. ज्या ठिकाणी एजन्सी उपलब्ध असेल, ज्या ठिकाणी कामे नकाशे,

अंदाजपत्रक करायाचे नाही. जेस गोदरेज कपाट घ्यावयाचे आहे, फर्निचर, पुस्तके द्यायचे किंवा प्रशिक्षण द्यावयाचे आहे. आजारपणासाठी रोग्यांना मदत द्यावयाची आहे, संस्थेला मदत द्यावयाची आहे. ज्या ठिकाणी कोणतेही अंदाजपत्रक, नकाशे तयार करून तांत्रिक मंजुरी घेण्याची आवश्यकता नाही ते ताबडतोब मंजूर करावे परंतु जेथे तांत्रिक मंजुरी घ्यावयाची आहे नकाश अदांजपत्रक तयार करावयाचे आहे ते २ महिण्यात शक्य नाही. आपल्या म्हणण्याप्रमाणे मार्च मध्ये जी पत्रे दिलेली आहेत त्याचे स्पील ओहर घेणार किंवा कसे, जर तसे केले तर या वर्षाचा स्वेच्छा निधी समजा मागच्या वर्षीचे ५०,०००/- शिल्लक असतील तर या वर्षीचे तुम्हाला २,५०,०००/- स्वेच्छानिधी मंजूर करावे लागेल म्हणजे या बजेट मधून रु. ५०,०००/- डायवर्ट करावे लागेल अशी तयारी असेल तर कुठल्यातरी लेखाशिर्षमधून ते डायवर्ट करावे लागेल. आणि प्रत्येक नगरसेवकांची अशी रक्कम शिल्लक असेल तर जवळ-जवळ १ कोटी रुपये डायवर्ट करावयाची कार्यवाही आपणांस करावी लागेल. तो निर्णय स्थायी समिती मध्ये विचार पूर्वक घेण्यात यावा.

**श्री. विखारोद्दिन :** सर्वसाधारण सभेच्या ठरावानुसार स्वेच्छा निधीबाबत मा. आयुक्त यांनी दोन महिन्याची वाढ करण्याचे पत्र किंवा परिपत्रक काढलेले होते काय?

**मा. आयुक्त :** विभाग प्रमुखांना परिपत्रक व प्रशासकीय आदेशा बाबत सांगण्यात आलेले आहे. स्वेच्छा निधीचा वापर कसा करावा याबाबत नियमावली आहे. आणि ती सर्वसाधारण सभेने मंजूर केलेली आहे. बरेचसे स. स. आपआपल्या वॉर्डातील शाळा / लायब्ररी साठी कपाट, फर्निचर, वह्या पुस्तके वाटप अशी छोटे-छोटे कामे करून घेण्यासाठी पत्र देतात. त्याच वेळी प्रशासनाला नकाशे, अंदाजपत्रक करावे लागत नाही. ते काम करण्यात येते. उपलब्ध एजन्सीकडून करून घेण्यात येतात. परंतु जेथे रस्ता तयार करायचे झाल्यास ते एवढ्या कमी वेळात करणे शक्य होत नाही.

**श्री. गौतम लांडगे :** स.स. श्री. वेळेवर पत्र देऊनही प्रशासन नियोजन का करीत नाही.

**मा. सभापती :** स.स. नी. विचारलेल्या प्रश्नाचे किंवा कामाचे बाबतीत प्रशासनाने कार्यवाही करून ४० दिवसाचे आंत विकास कामे तातडीने सुरू करणे. जरुरीचे आहे. तसा आदेश देण्यात येतो व तसे संबंधित नगरसेवकांना पत्राद्वारे कळवावे. त्याचप्रमाणे ज्या स. स. माहे डिसेंबर ९७ च्या पूर्वी स्वेच्छा निधीचे कामाचे बाबतीत पत्र दिलेले आहेत. असे किती स. स. आहेत त्यांची वॉर्डनिहाय यादी पुढील बैठकीत लेखा विभागाने सादर करावी.

**सौ. राधाबाई तळेकर :** माझ्या वॉर्डातील श्री. नंदु दशिरथे त्यांना सांगिताची जास्त आवड आहे. त्यास सांगिताची पेटी स्वेच्छा निधीतून घेऊन देण्याबाबत प्रशासनाला पत्र गेल्या नोव्हेंबर-९७ मध्ये दिलेले आहे. पत्र दिल्यानंतर सहा महिण्याचा कालावधी लोटलेला आहे. त्या पेटीचे अंदाजपत्रक जवळपास रु. १३,०००/- केलेले होते. आणि नंतर सारखी विचारणा करूनही ती संचिकेत कुठे आहे समजायला मार्ग नाही. याचे कारण काय? सांस्कृतिक विभागातून कोणत्या विभागाकडे संचिका पाठविले हे दिसून येत नाही.

**मुख्य लेखा अधिकारी :** सदरची संचिका अंदाजपत्रक तयार होऊन आलेली होती त्यात अंदाजपत्रक रु. १३०००/- इतके होते. शिक्षण विभागाने मनपा विद्यार्थ्यासाठी मागविलेल्या निविदेतील किंमत रु. २३००/- आहे. त्यामुळे ही पेटी लहान

मुलांची आहे. यासाठी संचिका पाठविली. स्पेसिफिकेशन प्रमाण संबंधित विभागाकडून दुरुस्ती होऊन पुढील कार्यवाही करता येईल.

**मा. सभापती :** संबंधित संचिका संबंधित विभागाकडून आवश्यत ती कार्यवाही करून घ्यावी. व पुढील बैठकीत याबाबतची माहिती द्यावी.

**श्री. गौतम लांडगे :** माझ्या वॉर्डात अनेक समस्या ड्रेनेजच्या होत आहेत. मी गेल्य ३-४ महिण्यापासून जेटींग मशीनची मागणी करूनही उपलब्धता मिळत नाही. सध्या जेटींग मशिन चालू स्थितीत आहे काय?

**श्री. प्रभाकर विधाते :** रेल्वे स्टेशन येथील मा. महापौरांच्या निवासस्थाना समोर जे आठ टपऱ्या बसविलेल्या आहेत त्यांना मनपाने परवानगी दिलेली आहे काय?

**मा. सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी.

**सहा. संचालक नगररचना :** ८ लोकांना पर्यायी व्यवस्था म्हणून ११ महिण्यासाठी जागा दिलेली आहे.

**मा. सभापती :** १०० फुटाच्या डीपी शेडवर या ८ लोकांना टपरीसाठी परवानगी कशी काय दिली? प्रशासनाने हा निर्णय का घेतला? जर अशा प्रकारे डीपी रोडवर टपरी परवारगी प्रशासन देत असेल तर मी सुध्दा सर्व शहरातील व इतर भागातील लोकांना डीपी रोडवर टपरी बसविणे भाग पाडीन. प्रशासनाचे वरील धोरण चुकीचे असून अनाधिकृत टपरी डीपी. रोडवरून आपण हटवितो तर या टपऱ्यांना ह्या ठिकाणी परवानगी का द्यावी.

**श्री. विकास जैन :** मी संबंधित वॉर्डाचा नगरसेवक आहे. मला प्रशासनाने कोणत्याही प्रकारे विश्वासात न घेतो ते काम केलेले आहे ते योग्य नाही.

**श्री. विखारोद्दिन :** ज्या ८ लोकांना रेल्वेस्टेशन येथील भागात टपरी बसविण्यास परवानगी दिलेली आहे ते मा. आयुक्त यांच्या मान्यतेने दिलेली आहे.

**श्री. गौतम लांडगे :** यापूर्वी असा निर्णय झालेला आहे की, टपरी बसविण्यास परवानगी देतांना संबंधित वॉर्डातील नगरसेवकांना चर्चा करून बसवावे. मग स.स.ना का विचारात घेतले नाही.

**मा. सभापती :** शहरातील कोणत्याही डी. पी. रोडवर टपरी बसवित असताना किंवा परवानगी देत असतांना प्रशासनाने त्या-त्या वॉर्डातील स.स.ना. विश्वासात घेऊन कार्यवाही करावी.

**श्री. गौतम लांडगे :** झोन-७ मध्ये जेटींग मशीनचे काम ठरवून दिल्याप्रमाणे का उपलब्ध होत नाही. मशीन बंद आहे काय?

**उप अभियंता (यांत्रिकी) :** सध्या जेटींग मशील चालू आहे.

**मा. सभापती :** स.स.च्या सुचनेनुसार ज्या झोननिहाय मागणी ठरलेली आहे. त्याप्रमाणे जेटींग मशीनचे काम करवून घ्यावे. त्याचबरोबर स.स.श्री. गौतम लांडगे व श्री. राजकुमार बचाटे यांनी मागणी केल्यानुसार संबंधित विभागाने तातडीने कार्यवाही करावी.

**श्री. गौतम लांडगे :** मागील इतिवृत्तातील पृष्ठ क्र. २ मध्ये चर्चा झाल्याप्रमाणे श्री. एम. एम. खान कर आकारणी-२ या विभागातील कर्मचारी असूनही ते कर आकारणी-१ या चिभागामध्ये काम करतात याबाबत प्रशासनाने काय कार्यवाही केली.

**उप आयुक्त(प्र.) :** करमूल्य निर्धारण अधिकारी-२ यांचेकडे सदरील कर्मचारी काम करीत असून कर आकारणी-१ कडील चिकलठाणा झोन मधील एमआयडीसी मधील कर आकारणीच्या चौकशी संदर्भात सुनावणी व दैनंदिन कर आकारणीसाठी मा. आयुक्त यांच्या आदेशान्वये कर मुल्यनिर्धारण अधिकारी-

१ यांचेकडे मदतनीस म्हणून कार्यरत आहेत. या व्यतिरिकत करमूल्य निर्धारण अधिकारी हे पुढील माहिती देतील.

**श्री. गौतम लांडगे :** काणते काम कुणाकडून करवून घ्यायचे हे प्रशासनाचे धोरण आहे. परंतु कर आकारणी-२ मध्ये संबंधित कर्मचारी यांची हजेरी पट असून काम मात्र कर आकारणी-१ कडे करतात हे योग्य वाटत नाही. त्यापेक्षा त्यांची बदलीची करआकारणी विभाग-१ कडे करावी. त्याचप्रमाणे मागील इतिवृत्तातील पृष्ठ क्र.१४ मध्ये सिटीचौक येथील एका घरमालकास मनपाने भूसंपादन करून रु. २७.०० लाख दिले याबाबत सविस्तर चौकशी करून अहवाल पुढील देण्यात येणार होता. त्याबाबत काय कार्यवाही झाली याची माहिती द्यावी.

**उप आयुक्त (म) :** दिनांक २८-०५-९८ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती बैठकीत देवडी बाजार ते लोटाकारंजा येथील ५० फुट रस्त्यात बाधित झालेली मालमत्ता पाडल्यानंतर किती किंमतीचे साहित्य महानगरपालिकेने हस्तगत केले. याबाबतचा सविस्तर अहवाल सादर करण्याबाबत सूचित करण्यात आले होते. या अनुषंगाने मालमत्ता पाडल्यानंतर आणलेल्या साहित्याची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. मनपाने आणलेल्या साहित्याची माहिती खालीलप्रमाणे.

भूसंपादन क्र. ६५०९, ६५१० व ६५११ अशा तीन क्रमांकाने भूसंपादन करण्यात आले असून या भूसंपादनापोटी रु. ३७ लक्ष वाटप करण्यात आलेले आहेत. भूसंपादनाची संपूर्ण कार्यवाही / प्रक्रिया ही विशेष भूसंपादन अधिकारी, विशेष भूसंपादन घटक, औरंगाबाद यांनी केल्याचे सकृत दर्शनी दिसून आले. याचा सविस्तर अहवाल खालीलप्रमाणे.

| | |
|---|---|
| जमीन मोबदला | रु.१५,०८,७३० |
| मुल्यांकन | रु.३,९०,३०९ |
| दिलासा रक्कम ३०% | रु.५,६९,७१२ |
| अतिरिक्त १२% व्याज | रु. १,८३,२५७ |
| सेवरस (दुरुस्ती) रक्कम | रु.४५,९७५ |
| भाडे करूना हलविणे | रु. ३००० |
| धंद्यातील नुकसान | रु.१५,००० |
| **एकूण मोबदला** | **रु.२७,१५,९८८** |

सर्व साधारण उपरोक्त मालमत्तांमध्ये अपेक्षित प्रत्यक्षात आढळून आलेले व कमी साहित्य खालीलप्रमाणे आहे.

| साहित्याचे वर्णन | अपेक्षित साहित्य | प्रत्यक्षात आढळलेले साहित्य | कमी आढळलेले साहित्य |
|---|---|---|---|
| दरवाजे मोठे | ६ | ६ | - |
| दरवाजे लहान | ४ | - | फ्रेम ४ आढळल्या पट आढळले नाहीत. |
| खिडक्या | ५ | ३ | २ |
| बल्ली / रफ्टर | १११ | ६३ | ४८ |
| पत्रे | २१ | १७ पूर्ण | - |

| | | | |
|---|---|---|---|
| | | २१ तुकडे | |
| स्टील रोलींग शटर्स मोठे | १ | १ | - |
| स्टील रोलींग शटर्स लहान | १ | १ | - |
| लाकडी फडताळ | २ | २ | - |
| लोखंडी फडताळ | १ | १ | - |

संबंधित इमारत निरिक्षक श्री. के.पी. पवार यांनी प्राप्त झालेल्या साहित्याची यादी खालीलप्रमाणे दिली आहे.

| | |
|---|---|
| लाखंडी पत्रे लहान / मोठे | २६ नग |
| शटर्स | २ नग |
| लाकडी दरवाजे | ६ नग |
| लाकडी बल्ल्या | ३५ नग |
| लोखंडी फडताळ | १ नग |

उपरोक्त पंचनाम्यावरून लाकडी बल्ल्या / राफ़ुटर यामध्ये तफावत दिसून येते. प्रत्यक्षात श्री. पवार इमारत निरिक्षक यांनी दि. ०३-०५-९८ रोजी केलेल्या पंचनाम्यात / सामान्याचा यादीत लाकडी बल्ल्या ३५ नगर दर्शविलेल्या आहेत. प्रत्यक्षात लाकडी बल्ल्या ४२ नग व राफ़ुटर २१ असे एकंदर ६३ नगर निदर्शनास आले. याचा अर्थ श्री. पवार यांनी सामानाच्या यादीत राफ़ुटरचा उल्लेख केलेला नाही. आणि ७ लहान मोठ्या बल्ल्यांची संख्याही कमी दर्शविलेली आहे.

तक्रारीचे गांर्भीय लक्षात घेता या कार्यालयाकडून विशेष भू. संपादन अधिकारी विशेष भूसंपादन घटक औरंगाबाद यांच्याकडून बाधित झालेल्या इमारतीतील साहित्याची यादी मागविण्यात आली होती. विशेष भूसंपादन अधिकारी यांनी खालीलप्रमाणे अहवाल दिलेला आहे.

"प्रस्तुत प्रकरणात अंतिम निवाडा जाहिर होऊन ताबा व मोबदला वाटपाची कार्यवाही पूर्ण झालेली आहे." भूखंडाचे अंदाजपत्रक तयार करत असतांना संपादनाखालील पूर्ण भूखंडाचे क्षेत्रफळ लक्षात जागेवर अस्तित्वात असलेले बांधकामाची एकूण किंमत काढून त्यानुसार येत असलेला प्रति चौरस मीटर दर काढणेत येतो व सदर दराला डीप्रशिएट करून येणारा दर व संपादनाखालील बांधवी क्षेत्रफळ यांचा गुणाकार करून बांधीव क्षेत्राचे मुल्यांकन करण्यात आलेले आहे. सदर अंदाजपत्रक निवाड्यात समाविष्ट करण्यात आलेले आहे.

भूसंपादन अधिकारी यांनी त्यांच्या उपरोक्त अहवालात प्रत्यक्षात किती लोखंडी, लाकडी साहित्य मिळवयास पाहिजे याचा उल्लेख केलेला नाही. परंतु त्यांनी दिलेल्या अंदाजपत्रकाच्या आधारे अंदाजीत लाकडी व लोखंडी साहित्या वरील प्रमाणे काढलेले आहे. याचा संपूर्ण अभ्यास करता खालीलप्रमाणे निष्कप्रत यावे लागेल.

विशेष भूसंपादन अधिकऱ्यांनी ताब्यात घेतलेली मालमत्ता ही महानगरपालिकेने ताब्यात घेण्यापूर्वी त्यांचे मोजमाप तसेच त्या मालमत्तेतील कोणकोणत्या प्रकारचे साहित्य महानगरपालिकेच्या ताब्यात येणार आहे याची खातरजमा करावयास पाहिजे.

बाधित मालमत्ता विशेष भूसंपादन अधिकाऱ्याकडून महानगरपालिकेस हस्तांतर होण्यापूर्वी सहा संचालक नगर रचना यांनी मालमत्तेतील साहित्याची यादी हस्तगत करून घेतल्यास अशा प्रकारचे प्रश्न पुन्हा उद्‌भवणार नाहीत.

सहा. संचालक नगररचना यांनी यादीनुसार प्रशासकीय अधिकारी यांच्याकडे सदरची मालमत्ता पाडण्यासाठी सुपूर्द करावी व इमारत निरिक्षक यांनी त्यानुसार पंचनामा तयार करून घ्यावा.

विषयांकित इमारती संदर्भाने प्रशासकीय अधिकारी व संबंधित इमारत निरिक्षक यांच्याशी चर्चा केली असता त्यांनी असे निदर्शनास आणून दिले की, सदरची इमारत ही बरीच जुनी होती व ती जे. सी. बी. मशीनने पाडत असतांना इमारतीच्या कुजलेल्या फळ्या बल्ल्या मातीच्या ढिगाऱ्यात दबल्याने परत काढता आल्या नाहीत व पर्यायाने त्या जमा करता आल्या नाहीत.

उपरोक्त परिस्थिती पाहता सदर प्रकरणात खालीलप्रमाणे निष्कर्ष निघतात.

१) या प्रकरणात विशेष भू संपादन अधिकारी व सहा. संचालक नगररचना यांचा तांत्रिक अभिप्राय मागविण्यात यावा.
२) साहित्य अपेक्षित पेक्षा कमी मिळाल्याबाबत संबंधित इमारत निरिक्षक, श्री. के. पी. पवार यांचे स्पष्टीकरण मागविण्यात यावे,तसेच प्रशासकीय अधिकारी यांचे स्वयंपष्ट अभिप्राय मागविण्यात यावेत.
३) विविध प्रकरणात बाधित होणाऱ्या मालमत्ता पाडण्याचे काम व अशा जागा रिक्त करून घेण्याचे काम शहर अभियंता / अति. शहर अभियंता याचे मार्फत जाहीर लिलाव पध्दतीने करवून घेण्यात यावे व जाहीर लिलावाद्वारे प्राप्त होणारे उत्पन्न महानगरपालिकेचे उत्पन्न म्हणून गृहित धरण्यात यावे. या पध्दतीमुळे महानगरपालिकेचे नुकसानही होणार नाही. यामुळे प्रशासकीय अधिकारी विभागामार्फत तोडून-फोडून आणलेले साहित्य दिर्घकाळ पर्यंत पडून राहणार नाही.

**श्री. प्रभाकर विधाते :** संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करण्यात सभागृहाची दिशाभूल करीत आहेत.

**श्री. गौतम लांडगे :** मागील बैठकीत प्रशासकीय अधिकारी यांनी खुलासा केला की, एम दोन बल्ल्या आणि काही शटर्स वगैरे जमा केले. परंतु उपआयुक्त (म) यांनी आपल्या खुलाशात सामानाची यादी कोठून आणली तेथील साहित्य किती किंमतीचे होते. ११८ रॅप्टर त्या ठिकाणी होते ते कुठे गेले. याची माहिती द्यावी.

**मा. सभापती :** चौकशी अंती असे स्पष्ट होते की,
१) भूसंपादन अधिकारी याचा तांत्रिक अभिप्राय
२) सहा. संचालक नगररचना तांत्रिक अभिप्राय
३) जी. बी. पवार
४) व प्रशासकीय अधिकारी यांचे स्पष्टीकरण मागवून त्यानुसार कार्यवाही करणेत यावी.

**श्री. मिरा सलामी :** इतिवृत्तातील पृष्ठ क्र. ५ वर शहरातील सर्व नाले साफसफाई करणे बाबत आणि काही लिजवर दिलेले होते. त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित

लिजवर देणाऱ्या संस्थेकडे असते व ते त्यांनी ते दरवर्षी स्वखर्चाने करावे असे असते. त्याप्रमाणे प्रशासनाने काय कार्यवाही केली.

**सहा. संचालक नगररचना :** शहरातील जे नाले काही संस्थेस लिजवर देणे आली त्यांना अटी शर्ती घालून दिल्याप्रमाणे दरवर्षी त्यांनी नाले साफ क रावे. नसता संबंधितांना मनपातर्फे डिमांड नोटीस पाठवून मनपातर्फे करण्यात आलेल्या खर्च हा वसूल करावे लागेल.

**मा. सभापती :** शहरातील जे नाले काही संस्थाना लिजवर दिलेल्या आहेत त्याचेकडून दरवर्षी नाले साफ करून घ्यावे व तसे न झाल्यास मनपाने करून घ्यावे व संबंधिताकडून ते तातडीने नोटीस जारी करून वसूली करावे. आता पुन्हा पुन्हा नव्याने सांगणे योग्य नसून प्रशासनामार्फत याबाबत तातडीने कार्यवाही करावी.

**श्री. मिला सलामी :** नाले जे लिजवर दिलेले आहेत त्यामध्ये नगररचना विभागाने परवानगी दितांना ज्या अटी शर्ती घातलेल्या आहेत त्यानुसार कार्यवाही व्हावी.

**मा. सभापती :** १) याबाबत शॉर्ट टेंडर आणून तीन दिवसात प्रशासनामार्फत शहरातील नाले साफसफाई बाबत कार्यवाही करावी. व जे नाले लिजवर दिलेले आहेत. त्यांचेकडून साफसफाई करून घ्यावी. नसता डिमांड नोटीस देऊन अटी व शर्तीनुसार पैसे वसूल करावे.

२) मागील स्थायी समिती सभेतील विषय क्र. १५/१४ दि.२५-०५-९८ हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात आलेला होता तो मंजूर करण्यात येतो.

४) त्याचप्रमाणे दि.२५-०५-९८ चे स्थायी समिती सभेतील विषय क्र. २/१, ३/२, ४/३, ५/४, हे विद्युत विभागातील साहित्य खरेदीचा असून सदरचे चारही विषय मागील बैठकीतील स्विकृतीसह मंजूर करण्यात आलेले आहे. या व इतर दुरुस्तीसह विषय क्र. १ यास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

१) प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातील नाले साफसफाई बाबत प्रशासनाने तिन दिवसात शॉर्ट टेंडर काढून ३ दिवसांत नोटीस काढण्याची कार्यवाही करावी व जे नाले लिजवर दिलेले आहेत. त्याचे बाबतीत प्रशासनाने अटी व शर्तीनुसार डिमांड नोटीस देवून कार्यवाही करावी नसता मनपाने साफसफाई करून सदरचा खर्च तातडीने वचूल करावा व दरवर्षी साफसफाई करून घेण्याचे आदेशित करावे.

२) मागील स्थायी समिती सभा दि.२८/०५/९८ विषय क्र. १५/१४ हा प्रस्ता स्थगित ठेवण्यात आला होतो. तो मंजूर करण्यात येतो.

३) त्याचप्रमाणे दि. २५८/०५/९८ चे सभेतील विषय क्र. २/१, ३/२, ४/३, ५/४ हे विद्युत विभागातील साहित्य खरेदीचे प्रस्ताव असून त्याच सभेत स्विकृतीसह मंजुरी देण्यात आला आहे. या व इतर दुरुस्तीसह विषय क्र. १ यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २३/२ :**

पशुधन विकास अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिका अंतर्गत सिध्दार्थ उद्यान येथील मत्स्यालयातील मांशाची देखरेखी करीता वार्षिक ठेका मासिक पध्दतीने देण्याबद्दलचे वर्तमान पत्राद्वारे निविदि मागविण्यात आली असता खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झाली आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. सागार फिशरीस इंटरप्रायझेस | २३,३३१.०० |
| २. | मे. सन इंटरप्राइझेस | १५,९००.०० |

| | | |
|---|---|---|
| ३. | श्री. सी. एस. वाकेकर | १२,९५०.०० |
| ४. | मे. स्वप्नी किशरीज | १२,००१.०० |
| ५. | मे. फिश होम ऑक्युरियम | ११,७५०.०० |

वरील प्रमाणे (५) निविदा प्राप्त झाल्या असता सर्वात कमी दर मे. फिश होम ऑक्युरियम यांचे प्रति महा. रुपये ११,७५०.०० आहे.

आचार संहितामुळे मा. आयुक्त यांनी मत्साल्यातील मासेची खाद्यावी गरज लक्षात घेता विशेष अधिकाराचा वापर करून ९८-९९ निविदा मधील वरील प्रमाणे सर्वात कमी दर असलेले निविदा धारकांचे दर दि. ०१-०५-९८ ते ३१-०७-९८ (तीन महिने) करिता मंजूर केले आहे.

तरी १९९८-९९ वर्षाचे निविदा मधील सर्वात कमी दर असलेले निविदा धारकांचे दर दि. ३१-०३-९९ पर्यंत मंजूरीस्तव सादर प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** मंजूर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यान येथील मत्स्यालयातील माशांच्या देखरेखीकरिता वार्षिक ठेका मासिक पध्दतीने देण्याकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच प्रतिमहा रु. ११,७५०/- या दराची मे. फिश होम ऑक्युरियम यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४/३ :**

औरंगाबाद शहर मंजूर विकास योजना नुसार ५० फुट रुंद रस्त्यामध्ये बाधित मिळकत नगरभूमापन क्र. ३४७० चे बाधित क्षेत्रापेक्षी ३१.२८ चौ. मी. मिळकतधारक महानगरपालिकेस देण्यास तयार आहेत. त्यानुसार मोबदल्याची रक्कम रुपये २,५४,३९३/- (दाने लक्ष चोपन्न हजार तिनशे शहन्नव फक्त) बाधित क्षेत्र ३०.२८ चौ. मी. साठी निश्चि केले आहे. सदनर रक्कम हितसंबंधीचे घ्ज्ञेण्यास मान्य केले आहे. तसेच सदर जागा खरेदी खत करून घ्यावी लागेल त्यासाठी रुपये २३,०००/- (रुपये तेवीस हजार फक्त) खर्च येतो. त्यापैकी ५०% खर्च मिळकत धारक करणार असून मिळकतधारकाने खरेदी खताच्या ५०% म्हणजे रुपये ११५००/- मोबदल्याच्या रक्कमेतून बढती करून उर्वथ्रत मोबदला घेण्यास मान्य केले आहे. सबब ५०% वजा जाता (रु.२,५४,३९६ /-, ११,५००/- = २,४२,८९६/-) (रुपये दोन लक्ष बेचाळीस हजार आठशे शहान्नव फक्त) तरी सदर मिळकतधारक (१) श्री. गुलाम झैनोद्दिन वल्द हाफीज गुलाम मोहंमद (२) श्री. गुलाम अहेमद वल्द हाफीज गुलाम मोहंमद यांना अदा करणेसाठी आणि खरेदीखत करून घेणेसाठी अग्रीम म्हणून रु. २३,०००/- (रु. तेवीस हजार) श्री. डी. डी. कालेले शा. अ. यांना देणेचे मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. स. अ. एकबालोद्दिन स. मो. कुतुबुद्दिन :** संपादित जागेबद्दल माहिती देण्यात यावी.

**मा. सभापती :** सहाय्यक संचालक, नगररचना यांनी खुलासा करावा.

**सहाय्यक संचालक नगररचना :** जुनाबाजार झैन टेलरसमोरील मिळकतीचे रस्त्याने बाधित क्षेत्र घेतो, भूसंपादनाचा ठराव झालेला आहे. जसे लोक येतात त्यानुसार कार्यावाही करण्यात येत आहे.

**श्री. स. अ. एकबालोद्दिन स. मो. कुतुबुद्दिन :** मागील २-३ वर्षात किती मिळकती वस्त्यासाठी ताब्यात घेतल्या याची माहिती द्यावी व या मिळकतीचा मोबदला यापूर्वी देण्यात आल्याचे समजते.

**श्री. मिरा सलामी :** माझ्या माहितीप्रमाणे पूर्वी हे घर दुसऱ्याच्या नावांवर होते. त्यांना मोबदला दिलेला आहे. ते प्रशासनाने तपासावे.

**मा. सभापती :** सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा आतापर्यंत किती लोकांना मोबदला देण्यात आला याची माहिती देण्यात यावी.

**ठराव :**

सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. २५/४ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. संजयनगर बायजीपुरा स्लम वॉर्ड क्र. ३१ मध्ये उर्वरित गल्लीत फरशी बसविणे बाबत कामाकरिता सा. बां. खाते यांच्या वर्ष ९६-९७ च्या दरसूचीनुसार रु. ४,१२,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम खांडकी रस्ते या शिर्षकातून करण्यात येईं. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. १७-१२-९७ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे. तसेच अंदाजपत्रकास स्थायी समिती मध्ये विषय क्र. ११ दि. २६-१२-९७ नुसार मंजुरी मिळालेली आहे. प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यात आले असता अंतिम तारखेपर्यंत एकूण १७ निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण आठ निविदा प्राप्त झाले व उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| १) | परफेक्ट कन्स्ट्रक्शन | ३३.३३% कमी |
| २) | विपुल कन्स्ट्रक्शन | २८% कमी |
| ३) | महमंद इस्माईल | २६.७८६% कमी |
| ४) | मन्नानखॉन | २६% कमी |
| ५) | फाईम स्टार कन्स्ट्रक्शन | २२.१% कमी |
| ६) | मल्ल इंटरप्रायजेस | २१.३३% कमी |
| ७) | कम्फर्ट कन्स्ट्रक्शन | १८% कमी |
| ८) | अब्दुल सलाम | १३.३% |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३३.३३% कमी दराची असलेली श्री. परफेक्ट कन्स्ट्रक्शन यांची निविदा मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. संजयनगर बायजीपुरा स्लम वॉर्ड क्र. ३१ मध्ये उर्वरित गल्लीत फरशी बसविणे बाबतच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ३३.३३% कमी दराची मे. परफेक्ट

कन्स्ट्रक्शन यांची निविद स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६/५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, चंपा मस्जिद चौक ते एस.टी. कॉलनी रस्त्यावर दुभाजकाची उंची वाढवून त्यावर लोखंडी ग्रील बसविण्याचे कामासाठी दि. ०३-१०-९७ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. २५०/५ अन्वये र. रु. ६,५९,८००/- च्या अंदाजपत्रकास मान्यता मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र. मनपा/लेखा/नि/७३/९७ दि. २३-१०-९७ अन्वये प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकूण (१९) एकोनावीस निविदा विक्री झाल्या असून निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकूण (६) सहा निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. शेख मसूद | ३८% कमी दराने |
| २) | मे. राणा कन्स्ट्रक्शन | ३६.१०% कमी दराने |
| ३) | श्री. एम. पी. जैस्वाल | ३२.१% कमी दराने |
| ४) | श्री. कुलवंतसिंग | १५.७०% कमी दराने |
| ५) | श्री. एस. एम. नवाब | १९% कमी दराने |
| ६) | मे. एस. एच. असोसिएट्स | दर दिलेले नाही. |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३८% कमी दराने श्री. शेख मसूद यांची निविदा असून प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** सदरील प्रस्ताव पुन्हा रिकॉल करण्यात यावा.

**ठराव :**

सदर कामाकरिता पुर्ननिविदा मागविण्यात याव्यात असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. २७/६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वरद गणेश मंदिर ते समर्थनगर चौक पर्यंत रस्ता दुभाजकावर लोखंडी ग्रील बसविण्याचे कामासाठीच्या अंदाजपत्रक र. रु. ८,९०,०००/- ला दि. ०३-१०-९७ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. २४८/३ अन्वये मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र. मनपा/लेखा/नि/७३/९७ दि. २३-१०-९७ अन्वये प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकूण (२६) सव्हीस निविदा विक्री झाल्या असून निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकूण (८) आठ निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | मे. वैद्यानाथ मेटल कोरोगेटेडे | ३१.०३% कमी दराने |
| २) | श्री. एम. पी. जैस्वाल | ३०% कमी दराने |
| ३) | मे. हाईवे कन्स्ट्रक्शन कं. | २५.९९९% कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| ४) | श्री. राजसिंग | १५.१०% कमी दराने |
| ५) | मे. संजीवनी कन्स्ट्रक्शन | १७.२७% कमी दराने |
| ६) | मे. एस. ए. नवाब | १८.३०% कमी दराने |
| ७) | मे. साई कन्स्ट्रक्शन इंजिनिअर्स | २०% कमी दराने |
| ८ | मे. एम.एम. कन्स्ट्रक्शन | ११.११% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३१.०३% कमी दराने मे. वैद्यनाथ मेटल कोरोगेटेडे यांची निविदा असून प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**
**मा. सभापती :** सदरील प्रस्ताव पुन्हा रिकॉल करण्यात यावा.

**ठराव :**
सदर कामाकरिता पुर्ननिविदा मागविण्यात याव्यात असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. २८/७ :**
अतिरिक्त शहर अभियंता यांनी सुधारित प्रस्ताव सादर केला की, श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय येथे फर्निचर तयार करणेच्या कामासाठी दिनांक ०९-१२-९७ च्या स्थायी समितींच्या सभेमध्ये विषय क्र. ३४८/७ अन्वये मे. महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळ विकास भवन औरंगाबाद यांचे दरपत्रकास व अंदाजपत्रक रक्कम रु. १४,५०,०००=०० ला मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामा बाबत दिनांक १७-०४-९८ रोजी मा. आयुक्त यांचे दालनात माजी खासदार, श्री. प्रदिम जैस्वाल, डॉ. मोरवंचीकर यांचे उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालयाच्या प्रगती बाबत चर्चा झाली यावेळी असे ठरले की, सध्या ज्या तीन हॉल मध्ये फर्निचरचे काम सुरू आहे त्याच पध्दतीने काम उर्वरित तीन पैकी दोन हॉल मध्ये करण्यात यावे. पूर्वी या दोन हॉलमध्ये सदरचे काम मा. बाबासाहेब पुरंदरे यांच्या प्रतिष्ठानच्या देखरेखी खाली करण्यात यावे परंतु सदरचा प्रस्ताव रद्द झाल्याचे मा. आयुक्तांनी बैठकीत सांगितले असून त्यास सर्वांनी मान्यता दिली.

पूर्वी तीन हॉल मधील बारा मोठ्या शोकेसेस व आठ छोट्या शोकेससची निविदा रक्कम रु. १५,५०,०००/- एवढ्या किमतीच्या काढण्यात आलेल्या आहेत, त्यात जमीनी वरील एकूण आठ शोकेसेस ह्या रु. १,४४,०००/- एवढ्या किंमतीच्या होत्या म्हणजेच रु. १४,५०,०००/- मधून रु. १,४४,०००/- वजा केल्यास रु. १३,०६,०००/- चे काम (मोठ्या शोकेसचे) करण्यात येत आहे. अशा प्रकारे तीन हॉल मध्ये वाश शोकेसेससाठी रु. १३,०६,०००/- चे करण्यात येत आहे. म्हणून एका हॉल मध्ये चार शोकेसेस अशा दोन हॉल मधील आठ मोठ्या शोकेससाठी रक्कम रु. ८,७०,६६७=०० एवढ्या जास्तीचा खर्च येत आहे.

सदरील कामासाठी पूर्वीचा मंजूर खर्च रु. १४,५०,०००/- अधिक वाढीव खर्च रु. ८,७०,६६७/- चे सुधारित अंदाजपत्रक होत आहे. सदरचे काम करणेसाठी मे. महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळाचे अधिकारी श्री. इंगळे यांना वाढीव दोन हॉलचे काम पूर्वीच्या दराने करण्यासाठी विचारणा केली असता त्यांनी सदरील काम करण्यासाठी संमती दर्शविली आहे.

तरी सुधारित अंदाजपत्रक रक्कम रु. ८,७०,६६७=०० च्या वाढीव खर्चास व सदरील काम हे पूर्वीच्याच ठेकेदाराकडून त्यांनी दिलेल्या दराने करून घेणेस्तव तसेच सदरचा खर्च सन १९९८-९९ च्या संग्रहालया करिता ठेवण्यात आलेल्या तरतुदीमधून करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय येथील फर्निचरच्या कामात वाढ झाल्याने सदरील कामाचे वाढीव अंदाजपत्रक र. रु.८,७०,६६०/- ला तसेच सदरील वाढीव काम पूर्वीचेच गुत्तेदाराकडून त्यांनी दिलेल्या दराने करून घेण्यास तसेच सदर खर्च सन १९९८-९९ च्या संग्रहालयाकरिता ठेवण्यात आलेल्या तरतूदीतून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९/८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, बुक्कलगुडा व नवाबपुरा येथे शहाबाद फरशी बसविण्याचे कामासाठी दिनांक १७-०९-९७ च्या स्थायी समितीच्या सभेत विषय क्र. २१०/९ अन्वये अंदाजपत्रक रक्कम रुपये २,१८,०००/- ला मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र. मनपा/लेखा/नि/६५/९७ दि. ०८-१०-९७ अन्वये प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकूण (१२) बारा निविदा विक्री झाल्या असून निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकूण (०३) तीन निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मुबारक पठाण | ०.०२% कमी दराने |
| २) | श्री. शेख शरीफ | २% जास्त दराने |
| ३) | श्री. जी. के. पवार | ३% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.०२% कमी दराने श्री. मुबारक पठाण यांची निविदा असून प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बुक्कलगुडा व नवाबपुरा येथे शहाबाद फरशी बसविण्याचे कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०२% कमी दराची श्री. मुबारक पठाण यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०/९ :**

मालमत्ता अधिकारी यांनी मा. आयुक्त यांच्या मंजुरीनुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेच्या क्षेत्रात कमीत कमी २००० च्या वर हातगाड्या आहेत. त्याना प्रति वर्ष लायसन्स फि करण्यासाठी दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द देवून ही हातगाडी धारक परवाना फी भरून परवाना नुतीनीकरण करून घेत नाहीत.

प्रति हातगाडी मागे २००/- रु. लायसन्स फि घेवून परवाना देण्यात येत असतो तसेच हातगाडी परवाना फिस वसुली बाबत नियम तयारकरून शासनाच्या मंजुरीसाठी

पाठविण्यात आले आहेत. मनपाने आर्थिक नुकसान होऊ नये म्हणून वार्षिक २००० हातगाड्या पासून अंदाजे ४,००,०००/- (चार लाख रुपये) उत्पन्न अपेक्षित आहे.

करिता वरील हातगाडी लायसन्स फि वसुली निविदा पध्दतीने चालविण्यास देणे बाबत विचारार्थ मा. स्थायी समिती समोर सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या क्षेत्रातील हातगाड्यांना लावण्यात येणारी लायसन्स फि महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होऊ नये या दृष्टीने फि वसुली निविदा पध्दतीने चालविण्यास देण्याकरिता सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१/१० :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. राहुलनगर स्लम भागात खडी रस्ते तयार करणे व मुख्य डांबरी रस्त्याचे साईट सोल्डरचे खडीकरण करून रस्ता रुंद करणेचे कामाकरिता अंदाजपत्रक र. रु. ५,०९,०००/- अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभग, औरंगाबाद यांची दरसूची ९६-९७ अनुसार तयार करण्यात आली असून मा. आयुक्तांनी दि. २७-११-९७ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली असून स्थायी समितीच्या विषय क्र. ३७८/९ दि. १७-१२-९७ अन्वये मान्यता मिळानी नंतर रितसर वृत्तपत्रात प्रसिध्दी देवून मनपा/लेखा/नि/६/९८ दि. २३-०३-९८ द्वारे निविदा मागविण्यात आल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम दि. ३०-०३-९८ पर्यंत एकूण १६ निविदा विकण्यात आल्या व स्विकारण्याच्या दि. १३-०४-९८ रोजी फक्त ४(चार) मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या त्या निविदा दि. २१-०४-९८ रोजी उपस्थित ठेकेदारा समक्ष उघडण्यात आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. कुलवंतसिंग | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.१०% कमी |
| २) | मेसर्स हयात कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.७०% कमी |
| ३) | मेसर्स एस. एच. असोशिएट | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त |
| ४) | मेसर्स डी. अजितसिंग | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.१०% कमी दराची निविदा श्री. कुलवंतसिंग यांची आहे.

करिता श्री. कुलवंतसिंग यांची १.१०% कमी दराची निविदा मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे राहुलनगर स्लम भागात खडी रस्ते तयार करणे व मुख्य डांबरी रस्त्याचे साईट सोल्डरचे खडीकरण करून रस्ता रुंद करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.१०% कमी दराची श्री. कुलवंतसिंग यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवावही व्हावी.

**विषय क्र. ३२/११ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी सुधारित प्रस्ताव सादर केला आहे की, महावीर चौक ते रेल्वेस्टेशन या १०० डी. पी. रोडचे रुंदीकरण (खडीकरण) पुलाचे रुंदीकरण करणेच्या कामासाठी दिनांक १९-१०-९६ च्या सर्वसाधारण सभेमध्ये विषय क्र. १२२/४ अन्वये अंदाजपत्रक रक्कम रुपये ११,२५,०५०=०० मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र. मनपा/लेखा/नि/१३३/९६ दि. १८-१२-९६ अन्वये प्रगट निविदा मागविल्या असता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २९.०१८% कमी दराने श्री. निसार अहेमद यांची निविदेस दिनांक १४-०३-९७ च्या स्थायी समितीच्या विषय क्र. ९ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करतांना रुंदीकरण करणेचे भागाचे मोजमापे सरासरीने घेण्यात आलेली आहेत. परंतु विद्यमान रस्त्याच्या पूर्वेकडील व पश्चिमेकडील बाजुस रस्ता रुंदीकरण विकास योजना रुंदी प्रमाणे करणे. प्रस्तावित होते. मात्र पश्चिमेकडील भागालगट लष्कर मंडळाची जागा असल्याने संरक्षण विभागाने रस्ता रुदीकरण करणेचे काम थांबविले होते. नंतर म.न.पा. व लष्कर विभागाचे अधिकारी समवेत प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली असता सदरील रस्ता रुंदीकरणाचे काम हे कॅन्टोनमेन्ट बोर्डाच्या जागेवर अतिक्रमण होत नसल्याचे आढळून आले आहे.

त्याचप्रमाणे सदरील काम हे निविदे प्रमाणे झाल्यानंतर विद्यमान रस्त्याच्या पश्चिमेकडील छावणी मंडळाच्या जागेस लागून काही भागात अंदाजे ३ ते ५ मिटर रुंदीची जागा अविकसित राहत असून सदर रसता हा कर्मशियली महत्वाचा असल्याने ह्या अविकसित जागेवर अतिक्रमण होण्याची दाट संभावना असल्याने सदर जागेवर मेटल बेलट असेणे जरुरी आहे.

तसेच वाढीव काम हे मुळ मंजूर अंदाजपत्रकीय रक्कमेच्या आताच होणार आहे. त्यासाठी वाढीव रक्कमेची आवश्यकता नाही. सदरील कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रु.११,२५,०५०=०० ची तरतूद ठेवण्यात आली असून आतापर्यंत सदरच्या कामावर रक्कम रु. ६,०७,९९७=०० इतका खर्च झालेला असून रक्कम रु. ५,१७,०५९=०० इतकी रक्कम निविदा कमी दराची गृहित धरून शिल्लक राहत आहे. व विद्यमान कामासाठी मुळ प्रशासकीय मंजुरीच्या रक्कमेत होणाऱ्या बचतीमधून रस्त्याच्या पश्चिमेकडील उपलब्ध रुंदीपर्यंत रस्ता विकसित करणे जरुरी आहे.

तरी सदर कामा अंतर्गत होणाऱ्या एकंदरीत बचतीमधून प्रस्तावित रस्ता रुंदीकरण करणेसाठी रु. ४,५९,३६२=०० रक्कमेचा वापर करणेस परवानगी मिळणेस्तव तसेच मुळ अंदाजपत्रकातील परिमानात होणाऱ्या बदला नुसार मुळ प्रशासकीय मंजूर रक्कम रु. ११,२५,०५०=०० ला सुधारित अंदाजपत्रकासह अतिरिक्त बाब मिळून सदर काम हे मुळ कामासाठी असलेले ठेकेदार, श्री. निसार अहेमद यांचेकडून त्यांनी दिलेल्या दराने म्हणजेच अंदाजपत्रकीय रक्कमेच्या ३९.०१८% कमी दराने करून घेणेस्तव प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महावीर चौक ते रेल्वेस्टेशन या १०० डी. पी. रोडचे रुंदीकरण (खडीकरण) पुलाचे रुंदीकरण करणेच्या कामातून रु. ५,१७,०५९/- इतकी रक्कम निविदा कमी दराची असल्याने शिल्लक राहत असल्याने प्रशासकीय मंजुरीच्या रक्कमेत होणाऱ्या वस्तीमधून रस्त्या पश्चिमेकडील उपलब्ध रुंदी पर्यंत रस्ता विकसित करणे करिता रक्कम रुपये ४,५९,३६२/- च्या खर्चास तसेच सदरील काम मुळ कामाचे ठेकेदार श्री.

निसार अहेमद यांचेकडून त्यांनी दिलेल्या दराने म्हणजेच अंदाजपत्रकी दरापेक्षा २९.०१८% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

# *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र. ३३/१२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, जिन्सी येथील मनपाचे जागेवर दुकान व वाचनालयासाठी इमारत बांधवयाची आहे. त्यासाठी सा. बां. विभागाचे सन ९६-९७ चे जिल्हा दरसूचीनुसार र. रु. ३,१२,७२५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा. आयुक्तांनी दि. ०९-०६-९८ रोजी मान्यता दिली आहे. तसेच मा. स्थायी समितीने विषय क्र. १०१/२७ दि. १८-०६-९७ च्या इतिवृत्तान्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उपरोक्त कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र. मनपा/लेखा/नि/१६/९८ दि. ०२-०४-९८ अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण १५ निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण २ निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्या दि. ०६-०५-९८ रोजी उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. एम.एम. फारुकी | ३% जास्त दराने |
| २) | श्री. राजेंद्र वेर्द | ३% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ३% जास्त दराची निविदा श्री. एम. एम. फारकी यांची निविदा प्राप्त झालेली आहे. परंतु दि. ०४-०६-९८ रोजी मा. आयुक्त यांचे दालनात प्रत्यक्ष दराबाबतच्या वाटाघाटी अंती १% कमी दराने मा. आयुक्तांनी मान्यता दिली आहे. तरी एम. एम. फारुकी यांची अं. प. दरापेक्षा १% कमी दराची निविदा माण्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जिन्सी येथील मनपाचे जागेवर दुकान व वाचनालयासाठी इमारत बांधवयाची कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीत ठरल्यानुसार सदरील काम श्री. एम. एम. फारुकी यांचेकडून अं. प. दरापेक्षा १% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४/१३ :**

शिक्षणाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, नव्याने सुरू होत असलेल्या वाचनालयासाठी लागणारे खालील फर्निचर खरेदी करावयाचे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | बुक केस ५X२ १/$^{२X१}$ (२४ गेज) | ५० नग | ४६००/- प्र.नग |
| २) | मोठे कपाट ३X६ X १$^{२/१}$ | २० नग | ३८००/- प्र.नग |
| ३) | लोखंडी टेबल ३X६ X १$^{२/१}$ | २० नग | ३८००/- प्र.नग |
| ४) | कुशन चेअर्स ४X८ (२X१$^{२/१}$ | २० नग | १२००/- प्र.नग |

| | | | |
|---|---|---|---|
| | x१^२/१^) | | |
| ५) | बेचेस (सनमायका टॉप)६x१^२/१^ x१ | ६० नग | १४००/- प्र.नग |
| ६) | फायबर चेअर्स (स्टॅंडर्ड साईज) | ४१ नग | ४७५/- प्र.नग |
| ७) | ऑफिस टेबल २x४ | १३ नग | २३००/- प्र.नग |
| ८) | इंडस्ट्रील लॉकर ३x६ (२२ गेज) | ०१ नग | ८८७५/- प्र.नग |

गतवर्षी निविदा मागवून प्राप्त कमी दराच्या निविदेमध्ये आयुक्तांनी वाटाघाटी करून १०% कमी दराने फर्निचर खरेदीसाठी मान्यता देण्यात आली होती. त्यास स्थायी समिती ठराव क्र. २४१/४० दि. १७-०९-९७ अन्वये मंजुरी मिळाली आहे. त्याच मान्य दराने ९८-९९ वर्षासाठी उपरोक्त फर्निचर खरेदीसाठी ४,९२,५२५/- खर्च अपेक्षित आहे. सदर खर्च वाचनालयाच्या फर्निचर खरेदीच्या लेखा शिर्षातून करण्यात येईल. मा. आयुक्त यांनी सदर प्रकरणी प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ ठेवावा असे सूचित केले आहे.

त्यानुसार वरील प्रकरणी प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नव्याने सुरू होत असलेल्या वाचनालयासाठी लागणारे लागणारे फर्निचर प्रस्तावात अ.क्र. १ ते ८ चे समोर दर्शविलेल्या दराने गतवर्षी प्राप्त झालेल्या निविदामध्ये झालेल्या वाटाघाटीनुसार म्हणजेच १०% कमी दराने दि. १७-०९-९७ च्या स्थायी समितीच्या मंजुरीप्रमाणे खरेदी करण्यास तसेच सदर कामासाठी रु. ४,९२,५२५/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५/१४ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शहाशौक्ता कॉ. स्लम भागातील रस्ते खडीरस्ते करणेच्या कामाकरिता अं. प. र. रु. ३,९४,५००/- सा. बां. विभाग औरंगाबाद यांची दरसूची ९७-९८ अनुसार तयार करण्यात आली असून मुख्य अधिकारी औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ यांची त्याचे आदेश क्र. मु. अ./औम/डीबी/स्लम/७७०९/७७०९/७७३४ दि. ३१-१२-९७ अन्वये प्रशासकीय मान्यता दिली असून मा. आयुक्तांनी दि. ०७-०३-९८ रोजी निविदा मागविणे बद्दल मंजुरी दिल्यानंतर कार्यालय प्रगट निविदा सूचना क्र. मनपा/लेखा/नि/५/९८ दि. ३०-०३-९८ रितसर वृत्त पत्रात प्रसिध्दी देऊन निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम दि. २५-०३-९८ पर्यंत एकूण १३ कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारणेच्या दिवशी फक्त ३ मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या त्या दि. ०१-०४-९८ रोजी उपस्थित ठेकेदारासमक्ष उघडण्यात आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | मे. हयात कन्स्ट्रक्शन | ०.०५% कमी |
| २) | महेंद्र कन्स्ट्रक्शन | ५% जास्त |
| ३) | कुलवंतसिंग | १०% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ०.५% कमी दराची निविदा मे. हयात कन्स्ट्रक्शन यांची असल्यामुळे निविदा मंजुरीसाठी प्रस्तावित करण्यात आली होती.

परंतु मा. आयुक्तांनी सदरील निविदेत दिलेले दर अमान्य असल्यामुळे अं. प. दरापेक्षा २% कमी या दराने मान्य केली आहे. करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहाशौक्ता कॉलनी स्लम भागातील रस्ते खडीरस्ते करणेच्या कामाकरिता प्राप्त निविदाधाराकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम मे. हयात कन्स्ट्रक्शन यांचे कडून अं. प. दरापेक्षा २% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६/१५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, जकात कर वसुलीमध्ये वाढ होण्याच्या दृष्टीकोनातून मा. आयुक्त यांनी निर्देशित केल्याप्रमाणे जकात विभागासाठी एक जिप्सी वाहन खरेदी करावयाचे आहे.

मारुती जिप्सी हार्ड टॉपची व पेट्रोलवर चालणारी जिप्सी खरेदी करण्यासाठी अधिकृत विक्रेते मे. ऑटोमोटीव्ह मॅन्युफॅक्चरर्स लि. औरंगाबाद यांचेकडून रु. ३,७०,२८९/- रु. चे दरपत्रक वसूल झाले आहे. मारुती जिप्सी बुक करतांना रु. ३,२६,१२६/- रक्क भरावी लागेल. वाहनाच्या किंमतीमध्ये कमी व जास्ती फरक झाल्यास त्याप्रमाणे डिलीव्हरी घेतांना पेमेंट करावे लागेल. सदरील किंमत जकता कर वगळून असल्यामुळे जकातीमध्ये सुट द्यावी लागेल. सदरील खर्च सन ९८-९९ या आर्थिक वर्षासाठी वाहन खरेदीसाठी केलेल्या रु. ६० लाखाच्या तरतूदीतून करता येईल. मे. ॲटोमोटीव्ह मॅन्युफॅक्चरर्स लि. औरंगाबाद यांचे दरपत्रक मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जकात कर वसुलीमध्ये वाढ होण्याच्या दृष्टीकोनातून जकात विभागासाठी मारुती जिप्सी वाहन खरेदीसाठी मे. ऑटोमोटीव्ह मॅन्युफॅक्चरर्स लि. औरंगाबाद यांचे र. रु. ३,७०,२८९/- चे दरपत्रक सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७/१६ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर के आहे की, मो. तक्षशिलनगर स्लम येथे शहाबाद फरशी बसविणे बाबत व सहा बैठकीचे सार्वजनिक शौचालय बांधणे कामाकरिता सा. बा. खाते यांच्या सन ९६-९७ च्या दरसूचीप्रमाणे रु. ३,९८,७०६/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम म्हाडा अनुदान या शिर्षकातून करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. १२-०३-९७ ला प्रशासकीय मंजुरी दिली आहे. प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यात आली असता अंतिम तारखेपर्यंत एकूण सहा निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण दोन निविदा प्राप्त झाल्या व उपस्थित ठेकेदारासमक्ष उघडण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| १) | कम्फर्ट कन्स्ट्रक्शन | १% कमी |
| २) | कुलवंतसिंग | ५% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अं. प. दरापेक्षा १% कमी दराची असलेली कम्फर्ट कन्स्ट्रक्शन याची निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. तक्षशिलनगर स्लम येथे शहाबाद फरशी बसविणे बाबत व सहा बैठकीचे सार्वजनिक शौचालय बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अं. प. दरापेक्षा १% कमी दराची मे. कम्फर्ट कन्स्ट्रक्शन याची निविदेस स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८/१७ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, नक्षत्रवाडी गाव येथे अर्धगोलाकार गटार बांधकाम करणेकरिता अं. प. रु. ३,५२,०००/- सा. बा. यांची दरसूची ९६-९७ च्या तयार करण्यात आली असून मा. आयुक्तांनी दि. ११-०१-९७ रोजी प्रशासकीय मान्यता पदान केली असून कार्यालयीन निविदा सूचना वृत्तपत्रात प्रसिध्दीस देऊन मनपा/लेखा/नि/५/९८ दि. २०-०३-९८ अन्वये निविदा विक्रीच्या अंतिम दि. २५-०३-९८ पर्यंत (२३) कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारणेच्या अंतिम दि. ३०-०३-९८ रोजी फक्त १० मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या तया दि. ०१-०४-९८ रोजी उपस्थित ठेकेदारासमक्ष उघडण्यात आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. सुखबीरसिंग | अं. प. दरापेक्षा २८.५% कमी |
| २) | शेख मसुद | २७.२५% अं. प. दरापेक्षा कमी |
| ३) | फाईव्हस्टार कन्स्ट्रक्शन | २२.०१% कमी |
| ४) | शेख सलीम | २१.८६% कमी |
| ५) | न्यु स्टार कन्स्ट्रक्शन | २१.७८६% कमी |
| ६) | कुलवंतसिंग | १३.७०% कमी |
| ७) | एस. ए. देशमुख | १३.०३% कमी |
| ८) | सफवान कन्स्ट्रक्शन | १७% कमी |
| ९) | महेंद्र कन्स्ट्रक्शन | १२% कमी |
| १०) | नंदकुमार कन्स्ट्रक्शन | १०% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा २५.५% कमी दराची निविदा श्री. सुखबीरसिंग यांची आहे. करिता सुखबीरसिंग यांची २८.५% कमी दराची निविदा मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

तसेच सदर काम म्हाडा अनुदान ९७.९८ या शिर्षअंतर्गत करण्याचे प्रस्तावित आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नक्षत्रवाडी गाव येथे अर्धगोलाकार गटार बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा २५.५% कमी दराची श्री. सुखबीरसिंग यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९/१८ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. शहाशौक्ता कॉलनी (झोपडपट्टी) मध्ये १/२ गोलाकार गटार बांधकाम करणेकरिता अं. प. र. रु. ३,७४,०००/- सां. बां. विभाग औरंगाबाद यांची दरसूची ९७-९८ नुसार तयार करण्यात आले असून मुख्य अधिकारी, औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ औरंगाबाद यांनी जा. क्र. मअ/औम/डिबी/स्लम/७७३४/९७ दि. ३१-१२-९७ अन्वये प्रशासकीय मजुरी देण्यात आली. नंतर मा. आयुक्तांनी दि. ०७-०३-९८ रोजी निविदा मागविणे बद्दलची मान्यता दिली. असून रितसर वृत्तपत्रात कार्यालयीन निविदा सूचना क्र. मनपा/लेखा/नि/५/९८ दिनांक २०-०३-९८ अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम दि. २५-०३-९८ पर्यंत एकूण १७ निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याच्या दिवशी उक्त ३ मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या त्या दि. ०१-०४-९८ रोजी उपस्थित ठेकेदारासमक्ष उघडण्यात आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | मे. यात्रिब कन्स्ट्रक्शन | अं. प. दराने |
| ४) | न्यु स्टार कन्स्ट्रक्शन | अं. प. दरापेक्षा ५% जास्त दराने |
| ५) | कुलवंतसिंग | अं. प. दरापेक्षा ६% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दराची निविदा मे. यात्रिब कन्स्ट्रक्शन यांची आहे. करिता निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. शहाशौक्ता कॉलनी (झोपडपट्टी) मध्ये १/२ गोलाकार गटार बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दराची मे. यात्रिब कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकाणरणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०/१९ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. सादतनगर स्लम भागात अर्धगोलाकार गटार बांधकाम करणेकरिता र. रु. २८,७६,०००/- चे अ.प. सा. बां. विभाग औरंगाबाद यांची दरसूची ९५-९६ अनुसार तयार करण्यात आले असून मा. आयुक्तांनी दि.२२-१२-९६ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली तसेच दि. १०-०३-९७, १५-०३-९७ व २६-०३-९७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. १९१/८ अन्वये सदर कामास मान्यता मिळाली. नंतर रितसर क्र. मनपा/लेखा/नि/३२/९७ दिनांक ०३-०५-९७ अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम दि. १२-०५-९७ पर्यंत एकूण २० निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याच्या तारखेस फक्त (७) मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या त्या निविदा दि. २८-०५-९७ रोजी उपस्थित ठेकेदारासमक्ष उघडण्यात आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | सलीम पटेल | २९.९९% कमी |
| २) | आर. बी. चव्हाण | २९% कमी |

| | | |
|---|---|---|
| ३) | राणा कन्स्ट्रक्शन | २७.२१% कमी |
| ४) | सुपर कन्स्ट्रक्शन | २३.४३% कमी |
| ५) | बसरा कन्स्ट्रक्शन | १९% कमी |
| ६) | एम. एम. कन्स्ट्रक्शन | २०.७१% कमी |
| ७) | रशमी कन्स्ट्रक्शन | १३.२३% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा २९.९९% कमी दराची श्री. सलीम पटेल यांची निविदा आहे. म्हणून सदर ठेकेदारास काम करसे पडवणार ह्या बाबत त्यांचेकडून दर पृथः करण मागविण्यात आले असता त्यांनी दर दिलेल्या दरात काम करण्याची हमी दिली होती. परंतु काम दर्जेदार होण्याची शक्यता वाटत नव्हती तसेच स. नगरसेवक यांनी दि.१६-०६-९७ रोजी पत्राद्वारे फेरनिविदा मागविण्याबद्दल विनंती केली होती. त्याची प्रकरण दि. १६-०८-९७ च्या स्थायी समिती सभेचा विषय क्र. १६१/२० अन्वये प्रकरण रिकॉल करण्यात यावे असे सर्वानुमते ठरविण्यात आले त्यानंतर दि.०३-१०-९७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीच्या वि.क्र. २४६/१(३) अनवये प्रस्तावास मंजुरी देण्यात आली आहे. त्या अनुसार संबंधित ठेकेदारास २% एफएस. डी. भरणा करणेबद्दल कार्यालयाचे पत्रक क्र. मनपा/स्लम-१/५४६/९७ दि. ११-१२-९७ द्वारे कळविण्यात आले असता श्री. सलीम पटेल यांनी दिनांक २०-०२-९७ रोजी लेखी कळविले आहे की, सदर निविदेत दिलेले दर ९० दिवस बंधनकारक राहतील व कालमर्यादा संपल्यामुळे मी त्याच दरात काम करण्यास तयार नाही. व त्याऐवजी १०% अं. प. दरापेक्षा कमी दरात काम करण्यास तयार आहे.

म्हणून सेफन्ड लोएस्ट श्री. आर. बी. चव्हाण यांना कार्यालयाचे पत्रक क्र. मनपा/स्लम-१/१२७/९८ दि.१३-०४-९८ अन्वये लेखी विचारणा करण्यात आली की, आपण प्रथम लोएस्टचे दरात म्हणजेच २९.९९% कमी या दरात सदर काम करण्यास तयार आहे काय? त्याअनुसार त्यांनी लेखी संमती दिली आहे.

करिता सदर काम श्री. सलीम पटेल यांनी दिलेले दरात म्हणजेच २९.९९% कमी या दराची श्री. आर. बी. चव्हाण (सेकन्ड लोएस्ट) यांचेकडून करून घेण्याकरिता मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. सादतनगर स्लम भागात अर्धगोलाकार गटार बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे ठेकेदार श्री. सलीम पटेल यांनी निविदेतील दरास ९० दिवस कालमर्यादा संपल्याने त्या दराने काम करण्यास तयार नसल्याचे लेखी कळविले. त्याचप्रमाणे दुसरे कमी दराचे निविदाधारक श्री. आर. बी. चव्हाण यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार श्री. चव्हाण यांनी प्रथम कमी दराचे निविदाधारकांचे दरात म्हणजे अं. प. दरापेक्षा २९.९९% कमी दराने काम करण्यास संमती दर्शविल्याने सदरील काम श्री. आर. बी. चव्हाण यांचेकडून २९.९९% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१/२० :**

मोतीकारंजा येथील न. भु. क्र. १३४६० व १३४६१ मधील १२३७३ चौ. मी. जमीन मंजूर विकास योजनेतील शाळा क्रिडांगण व १५ मीटर विकास योजना रस्त्यासाठी खाजगी वाटाघाटीने १९८४ मध्ये संपादन करण्यात आली.

जमीन मालम श्री. गुलाम अली शाह यांनी जमीनीचे मुल्यांकन कमी असलेने न्यायालयात दावा दाखल केला असता न्यायालयाने दि. २९-०४-९८ रोजी निर्णय देऊन जमीनीचा मावेजा रु. ४८ लक्ष निश्चित केला व दोन महिन्यात मावेजा देण्यात यावा असे आदेश देण्यात आले. त्यानंतर जमीन मालकास पुन्हा वाटाघाटीसाठी बोलावून मावेजाची र. रु. ४५.०० लक्ष निश्चित करण्यात आली. तरी न्यायालयाच्या निर्णयानुसार अर्जदार यांना रु. ४५ लक्ष देण्याबाबत प्रस्ताव मंजुरीसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोतीकारंजा येथील नगर भुमापन क्रमांक १३४६० व १३४६१ मधील १२३७३ चौ. मी. जमीन मंजूर विकास योजनेतील शाळा क्रिडांगण व १५ मीटर विकास योजना संपादन करण्यात आलेल्या जमीनीचा मोबदला मा. न्यायालयाचे आदेशानुसार जमीनीचा मावेजा र. रु. ४५.०० लक्ष जमीन मालक श्री. गुलाम अली शाह यांना अदा करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२/२१ :**

मो. समाधान कॉलनी येथील न. भु. क्र. १८०८९ व १८०८८ हे भूखंड श्री. मन्नालाल हरीलाल अग्रवाल ह्यांचे मालकीचे आहेत ह्या मिळकती औरंगाबाद शहर मंजूर विकास योजनेनुसार अ.क्र.८९ (खुली जागा) मध्ये बाधित होते. मिळकतधारकाने महानगरपालिकेस म.प्रा. व नगर रचना चे अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सूचना दिली होती. त्याप्रमाणे ह्या मिळकतीचे भूसंपादन प्रशासकीय ठराव क्र. ६१४ दि. २५-१०-९४ रोजी मान्य झालेला आहे.

आता संबंधित मालकाने खाजगी वाटाघाटीने जागा देऊन जागेचा मोबदला मिळाला म्हणून मागणी केलेली आहे.

सिध्दशिर्घ गणकानुसार या भागातील जमिनीचे दर घेऊन या प्रकरणी मुल्यांकन करता भूखंड न.भु.क्र. १८०८९ क्षेत्र ५४८.२० चौ. मी. व भूखंड न.भु.क्र. १८०८८ क्षेत्र ५१४.२० चौ. मी. ह्या दोन्ही भूखंडाचे क्षोत्राचा मिळून मोबदला रु. २३,७९,७८५/- (तेवीस लक्ष एकोणाऐंशी हजार सातशे पंच्याऐंशी) निश्चित करण्यात आली आहे.

तसेच नोंदणीकृत दस्तऐवज करण्यास येणारा सर्व खर्च महानगरपालिकेने निम्मा व मिळकतधारक निम्मा करणार आहेत. खरेदी खताच्या सर्व र. रु. २,१४,२००/- (रु. दोन लक्ष चौदा हजार दोनशे फक्त) येईल. त्यातील निम्म खर्च रु. १,०७,१०० वळात केल्यास मिळकतधारकास रु. २२,६२,६८५/- देय होईल. खाजगी वाटाघाटीमध्ये ह्या मुल्यांकनास संबंधिताने मान्यता दिलेली आहे. करिता जमीन मुल्य व जमीन संपादनाचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

मान्यतेनंतर रितसर नोंदणीकृत व दस्ताऐवजाने जमीन हस्तांतरीत करून घेण्यात येईल. नोंदणीकृत दस्तऐवजाकरिता / खरेदी खताकरिता येणारा खर्च एकूण रु. २,१४,२००/- (दोन लक्ष चौदा हजार दोनशे फक्त) श्री. डी. डी. कालेले शाखा अभियंता यांना अग्रीम म्हणून देण्यात यावी. प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे समाधान कॉलनी येथील न. भु. क्र. १८०८९ व १८०८८ भूखंड क्षेत्र अुनक्रम ५४८.२० चौ. मी. व ५१४.२० चौ. मी. संपादित करण्यास व या भूखंडास एकूण मोबदला र. रु. २३,७२,७८५/- मधून नोंदणीकृत दस्तऐवजाचा एकूण खर्च रु. २,१४,२००/- च्या निम्मा म्हणजे रु. १,०७,१००/- वळता करून उर्वरित र. रु. २२,७२,६८५/- संबंधित जमीन मालक श्री. मन्नालाल हिरालाल अग्रवाल यांना अदा करण्यास तसेच खरेदी खताकरिता येणारा खर्च रु. २,१४,२००/- श्री. डी. डी. कालेले शाखा अभियंता यांना अग्रीम म्हणून देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

"जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगर सचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
मा. सभापती,
स्थायी समिती,
महानगरपालिका, औरंगाबाद

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.*

**दिनांक २६-०६-९८ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.मा.श्री.जयवंत ओक सभापती स्थायी समिती महानगरपालिका औरंगाबाद यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २६-०६-९८ रोजी स्थायी समिती सभा संपन्न झाली तिचे इतिवृत्त. सभेची सुरुवात "वंदे मातरम्" या गिताने अंदाजे दु.४=०० वाजता झाली. सभेस खालील स.स. तथा अधिकारी वर्ग उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स.स. श्री. विधाते प्रभाकर सिताराम | स. सदस्य |
| २) | स.स. श्री. अ. रऊफ म. अ. माबूद | -//- |
| ३) | स.स. श्री. सय्यद अली मिरा सलामी | -//- |
| ४) | स.स. श्री. संजय जोशी | -//- |
| ५) | स.स. श्री. गौतम लांडगे | -//- |
| ६) | स.स. श्री. गांगवे बन्सी तुळशीराम | -//- |
| ७) | स.स. श्री. इंगळे रविंद्र बाबुराव | -//- |
| ८) | स.स. सौ. वाडेकर यशोदा धनंजय | -//- |
| ९) | स.स. श्री. जैन विकास रतनलाल | -//- |
| १०) | स.स. श्री. ढगे नरसिंग मुरलीधर | -//- |
| ११) | स.स. सौ. तळेकर राधाबाई | -//- |
| १२) | स.स. श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | -//- |
| १३) | स.स. श्री. बचाटे राजकुमार (मामा) | -//- |
| १४) | स.स. श्री. विखारोद्दिन पि. खुदबोद्दिन | -//- |
| १५) | स.स. श्री. स. अ. एकबालोद्दिन स. मो. कुतूबुबोद्दिन | -//- |

**संवाद :**

**श्री. संजय जोशी :** मला अशी माहिती मिळाली की, महानगरपालिके मध्ये काही कनिष्ठ अभियंता व लिपिक यांच्या दै. वेतनावरील जागा भरल्या आहेत. त्या कशा स्वरुपात भरण्यात आल्या यासाठी शासन नियमाप्रमाणे सेवा योजना कार्यालय किंवा समाज कल्याण विभागामार्फत यादी मागवून रिक्त असलेल्या जागा भरित नाही काय? या बाबत माहिती सभागृहात द्यावी.

**उप-आयुक्त (प्र.)** या बाबत माहिती पुढील बैठकीत देण्यात येईल.

**मा. सभापती :** स.स. यांनी विचारलेल्या प्रश्नाची सविस्तर माहिती पुढील बैठकीत द्यावी. कारण संबंधित अधिकारी अर्धा दिवस रजेवर आहेत.

**श्री. संजय जोशी :** कनिष्ठ अभियंता या पदाचे जागा भरण्यात आल्या आहेत. व या बाबतचे आदेश निघालेले आहेत. याची माहिती सभागृहाला द्यावी.

**मा. सभापती :** जागा रिक्त असल्यास प्रशासनाने डायरेक्ट न भरत सेवा योजन व समाज कल्याण कार्यालयामार्फत यादी मागवून नियमाप्रमाणे घ्यावे.

**श्री. संजय जोशी :** कार्यालय ने जागा रिक्त असलेल्या ठिकाणी अनुशेष भरावयाचा झाल्यास कार्यालय बरेचसे वर्ग-४ चे कर्मचारी आहेत ते सुध्दा बऱ्याच दिवसापासून काम करीत आहेत. त्यांना वर्ग-३ पदावर घेण्याबाबत कार्यवाही करावी.

**श्री. गौतम लांडगे :** प्रशासनास अशा काही योजनामुळे तातडीने कर्मचारी नेमणे आवश्यक असते. उदा आरोग्य व प्रकल्प विभागात त्यांच्या काही योजना व नव्याने स्थापन केलेल्या आरोग्य केंद्रान्वये कर्मचारी वर्गाची नेमणूक करणे आवश्यक असते. जर आपण अशी पदे भरावयाची झाल्यास सेवायोजन व समाज कल्याण कार्यालयामार्फत यादी मागवावयाची झाल्यास त्यास ५-६ महिण्याचा कालावधी लागतो. त्यामुळे मनपाने आखलेल्या प्रकल्पात विलंब होतो. यासाठी तातडीने करावयाच्या कामासाठी प्रशासन ज्या कुणाचे अर्ज पात्रतेनुसार आलेले असल्यास त्याप्रमाणे कार्यवाही करते. नसता प्रशासनाने जर जाहिरात द्यावयाचा झाल्यास त्यावेळीही बरेचसे अर्ज प्राप्त होतील. कार्यालयात एकच गर्दी होईल आणि पुन्हा भ्रष्टाचाराबाबत स.स. आवाज उठवेल यासाठी पात्रतेनुसार ज्या कुणाचे अर्ज प्राप्त होतात. त्यानुसार प्रशासन संपूर्ण छाननी करून कार्यवाही करते.

**श्री. संजय जोशी :** कनिष्ठ अभियंताना ११-११ महिण्याची नेमणूका देवून त्यांना घेण्यात येते व दुय्यक आवेक्षक १५-१५ वर्षापासून सेवा करित आहेत ते दुय्यक आवेक्षक म्हणून राहतात. ज्या ११ जणांच्या अभियंता पदावर दुय्यक अवेक्षकांना नियुक्त्ी देणे आवश्यक होते.

**मा. सभापती :** १) या संदर्भात प्रशासनाचे जे नियोजन आहे त्याप्रमाणे संपूर्ण कार्यवाही करावी.

२) गेल्या १५ वर्षापासून सब ओव्हरसियर पदावर जे काही कर्मचारी कार्यरत आहेत. त्यांना कनिष्ठ अभियंता पदासाठी कामाचा अनुभव लक्षात घेता. त्यांची ज्या ११ लोकांना नव्याने आपण आदेश दिलेले असेल. त्यामध्ये विचार करणे योग्य.

३) तसेच स. स. यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत जे नवन कर्मचारी घेणे बाबत. आपण प्रक्रिर्या सुरू केलेली असल्यास त्याचा सविस्तर माहिती पुढील बैठकीत द्यावी.

**श्री. गौतम लांडगे :** बरेच अर्ज कार्यालयात नोरी संदर्भात आलेले त्यावर आरोग्य अधिकारी यांनी कार्यवाही करावी. या संदर्भात नियोजन करावयास पाहिजे.

**मा. सभापती :** मा. आयुक्त यांनी माहिती द्यावी.

**मा. आयुक्त :** १) कार्यालयामार्फत ज्या कनिष्ठ अभियंताच्या जागा भरणा केलेल्या आहेत. त्या कायदेशीर किंवा बेकायदेशीर आहेत या बाबतीची सविस्तर माहिती सभागृहाला पुढील सभेत देण्यात येईल. यामध्ये काही चुका झालेल्या असल्या त्या दुरुस्त केल्या जातील. सेवाभरती नियमांचे अवलंब करणे. आवश्यक आहे. स्वातंत्र सेनानी, भूकंपग्रस्त, प्रकल्पग्रस्त इ. साठी रोस्टर ठेवावे लागते. २) जे उमेदवार शैक्षणिकदृष्ट्या पात्रतेनुसार परिपूर्ण आहेत. त्या लोकांचा विचार करण्यात येईल.

३) अशी काही पदे आहेत का, कार्यालयामार्फत रिक्त असलेल्या जागा भरावयाचे झाल्यास त्या सेवायोजन / समाज कल्याण इ. कडून शासनाचे नियमाप्रमाणे याद्या मागवून योग्य कार्यवाही करण्यात येते.

४) प्रशासनाने प्रत्येक संवर्गातील पदनिहाय रिक्त जागांबाबत प्रतिक्षा यादी तयार करून ठेवण्यासाठी मी सूचना दिलेल्या आहेत. फक्त स्मशानभूमीतील जोगी, वॉचमनच्या पदाबाबत शिथीलता लक्षात घेणे आवश्यक आहे.

५) बऱ्याच वेळेस तात्पुरते दवाखाने / वाचनालये इ. बाबत स. सदस्यांच्या मागणीनुसार प्रशासन कार्यवाही करते त्यामुळे तातडीने चालू करणेसाठी कर्मचारी यांची नेमणूक होणे आवश्यक असल्याने कामाची निकड व गरज लक्षात घेता १-२ कर्मचारी तात्पुरत्या स्वरुपात घ्यावे लागते. तशा कर्मचाऱ्यांना तात्पुरत्या स्वरुपात आदेश देण्यात येतो. तरीही नविन पदे भरत असतांना सेवायोजन/ समाजकल्याण / स्वातंत्र्य सैनिक/ टाईब कार्यालयामार्फत याद्या मागवून रिक्त जागाची भरती करण्यात येईल.

**श्री. संजय जोशी :** अगोदर नियोजन करावे नंतर काम करावे भारतमाता मंदिर बंन्सीलालनगर येथील वास्तुंचे प्रोजेक्ट रिपोर्टनंतर तयार होत आहेत तरी प्रथम प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करावा वनंतरच बांधकाम करावे मोठमोठे वास्तू बांधण्यात येतात. त्यात ठेवावयाला साहित्य नाही. त्यासाठी जाहिरात द्यावी लागते.

**श्री. मिरा सलामी :** १) मनपाने आकृतीबंध तयार केलेला आहे तो व्यवस्थितपणे केलेले नसल्याने व स्टाफ पॅटर्न आवश्यकतेप्रमाणे झाले नाही. म्ळणून सभागृहाने त्यास विरोध करून स्थगित ठेवला आकृतीबंध विरोध नाही कारण असे लक्षात होते का, आकृतीबंध ही योजना राबवितांना एखादी जाणकार "तज्ञ" व्यक्तींची बाहेरील व्यक्तींचा समावेश करून एखादी समिती गठीत करून "स्टॉफ पॅटर्न" तयार करावयास पाहिजे ही समिती नव्याने अभ्यास करून नियोजनबध्द कार्यक्रम ठेवून प्रशासनाला आपला अहवाल सादर करेल व प्रशासनाने ते मंजुरीस्तव सर्वसाधारण सभेकडे शिफारस करेल.

२) आताच चर्चा केल्याप्रमाणे ज्या ११ जागा कनिष्ठ अभियंता पदाच्या बाबत प्रशासनाने आदेश काढलेले आहेत ते नियम बाह्य असून रद्द करावे. यापूर्वी जे काही कर्मचारी रोजंदारीवर गेल्या १०-१२ वर्षापासून काम करीत आहेत. त्यांना नियमाप्रमाणे घेणे बाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

**मा. सभापती :** ज्या ११ कनिष्ठ अभियंता पदाचे आदेश प्रशासनाने काढलेले आहेत त्याची माहिती पुढील बैठकीत द्यावी. या शिवाय कर्मचाऱ्याच्या आकृतीबंध प्रस्तावाबाबत सर्वसाधारण सभेसमोर चर्चा करूनच निर्णय घेणे योग्य यापुढे प्रशासनाने कोणतेही संवर्गातील रिक्त पद भरीत असतांना "रोस्टर" पध्दत अवलंबून त्या नुसार अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

**श्री. संजय जोशी :** शहराचा प्रारुप विकास आराखडा सुधारित तयार करून गेले ८-९ महिनेचा कालावधी लोटलेला आहे. व शासनाकडे पाठविण्यात आलेला आहे. त्यामुळे या कामासाठी शासनाचे विशेष घटक निर्माण केले आहे. त्यांचे काम संपलेले असल्याने त्यांना त्यांचे विभागाकडे परत का पाठविले जात नाही. ज्यामुळे प्रशासनाला दरवर्षी रु. २.०० लाखाचा नाहक फटका बसतो याबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी ते कार्यालय आता बंद करावे.

**सहा संचालक नगररचना :** संबंधित काम संपलेले आहे. परंतु शासनाने माहे ऑगस्ट ९८ पर्यंत योजनेतील कर्मचाऱ्यांना मंजुरी दिलेली आहे. अजून ऑगस्ट महिण्यापर्यंत मंजूरी दिलेली असल्याने आणखी रु. ८.०० लाख मनपास जादा खर्च येईल त्यापेक्षा आराखडा संपलेला असल्याने शासनाला कळवून येथील कर्मचाऱ्यांवरील खर्च वजा केल्यास सदरील खर्च इतर विकास कामात मनपाने करावे.

**सहा. संचालक नगररचना :** सर्वसाधारण सभेने पारित केलेल्या प्रस्तावानुसार कार्यवाही करणेत येईल.

**श्री. संजय जोशी :** शहराच्या विकास आराखड्यासाठी जो शासनाकडून कर्मचारी वर्ग प्रतिनियुक्ती केलेला होता. त्यासाठी सध्या हा प्रकल्प संपलेला असून या बाबत सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव आणून प्रकरण बंद करावे व त्यामुळे मनपाचा खर्च कमी होईल.

**मा. सभापती :** ठिक आहे स.स. यांनी सूचना केल्याप्रमाणे जर शहराचा विकास आराखड्यासाठी नियुक्ती केलेल्या कर्मचाऱ्यांना काही कामे नाही व विकास आराखड्याचे काम संपलेला असल्यास शासनाकडे तशी शिफारीस करणेसाठी सर्वसाधारण सभेचे मान्यतेने प्रस्ताव पाठविणे योग्य राहील. ताबडतोब सर्वसाधारण सभेच्या मान्यतेसाठी ठराव आणावा स.स.श्री. विखारोद्दिन यांच्या मातोश्रीचे नुकतेच दु:खद निधन झाले त्यांना सभागृहात ०१.०० मिनिट श्रध्दांजली वाहण्यात यावी. (सभागृहात यावेळी ०१.०० मिनिट श्रध्दांजली वाहण्यात येते.)

**श्री. विखारोद्दिन :** सध्या जे शिक्षकांची निवड करण्यात येत आहे त्याची पध्दत कशी राहणार? रोस्टर पध्दतीप्रमाणे कार्यवाही होते काय? याची माहिती द्यावी. खुला संवर्ग इतर मागासवर्गीय, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती ई. किती आहेत याची माहिती द्यावी.

**मा. आयुक्त :** शिक्षकाच्या याद्या सेवायोजन / समाज कल्याण विभागाकडून प्राप्त यादी नुसारच मुलाखती घेऊन कार्यवाही केलेली आहे.

**श्री. स. अ. एकबालोद्दिन मुजाहेद :** काल परवाला काही वृत्तपत्रामध्ये दि. २९-०६-९८ पासून मनपाचे विद्युत बिल थकबाकी पोटी पापू बंद करणार अशी बातमी होती तेंव्हा प्रशासनाने याबाबत काय कार्यवाही केली.

**मा. आयुक्त :** दि. २९-०६-९८ पासूनमनपाने विद्युत बिले थकबाकी पोटी रु. ५२.०० कोटी किंवा रु. १.०० कोटी प्रत्येक महिण्याला दिले नाही तर मनपाचा पाणी पुरवठा बंद करण्यात येईल अशा प्रकारची प्रेस नोट छापून आलेली आहे. याबाबत मार्च ९८ ला अशा विषयांच्या संदर्भात विद्युत मंडळाने नोटीसही दिलेली होती. परंतु औरंगाबाद येथे दुष्काळाचा आवाढा बैठक आयोजित झ ाली होती. त्यावेळी महाराष्ट्राचे मा. मुख्यमंत्री, मा. उप. मुख्यमंत्री महोदय या ठिकाणी आले होते त्यांना या संदर्भात सविस्तर निवेदन सर्व पदाधिकारी यांचे समवेत दिलेले होते. त्यानुसार रु. ५०.०० लाख प्रत्येक महिण्याला विद्युत मंडळास देणेच्या सूचना करण्यात आल्या तरीही तडजोड घडवून रु. ७५.०० लाख देण्याचे ठरले मात्र्ा पुन्हा उर्जा सचिव यांच्या बरोबर अधिकाऱ्यांच्या बैठका झाल्या त्यात त्यांनी असे सांगितले की, रु. ७५.०० लाख कमी असून थकबाकी जास्तीचे असल्याने रु. १.०० कोटी प्रत्येक महिण्याला देणेचे सूचित केले या बाबत सर्वसाधारण सभेसमोर धोरण ठरविणे आवश्यक असल्याने मागील बैठकीत प्रस्ताव मांडण्यात आला होता. विद्युत मंडळाचे कार्यकारी अभियंता व मनपाचे अधिकारी यांचे सोबत चर्चा होऊन असे ठरले की, रु. १.०० कोटी ऐवजी रु. ७५.०० लाख प्रत्येक महिण्याला देण्यात येईल. तरीही सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव मांडून रु. १.०० कोटी देणेबाबत निर्णय घेणेसाठी चर्चा करणे योग्य. त्यानंतर निर्णय झाल्यास प्रशासनामार्फत कार्यवाही करण्यात येईल. असे मनपाने सांगितले

आहे. याबाबत मा. मुख्यमंत्री महोदय यांना मा. महापौर व पदाधिकारी यांनी निवेदन दिलेले आहे. त्याप्रमाणे निर्णय होणे आवश्यक आहे.

**श्री. विखारोद्दिन :** शहराचा विकास जलत गतीने होणे आवश्यक आहे. सन १९९५ मध्ये रेल्वे ओव्हर ब्रिज तयार करण्यासाठी मनपाने रु. ५०.०० लाख दिलेले आहे. या संदर्भात बैठक झाली होती . आणि त्यानुसार रेल्वे समितीने त्या भागातील संपूर्ण पाहणी करून आराखडा तयार करून ओव्हर ब्रिजचे काम कोणत्या ठिकाणापून व्हावे. याचा तपशिल करून कामामध्ये त्यांनी पुढाकार घेऊन गती मिळाली मात्र गेल्या काही दिवसांपासून या ओव्हर ब्रिज च्या बाबतीत काम थांबविण्याचे मा. आयुक्त यांनी सांगितलेले आहे याचे कारण काय? मी संबंधित अधिकाऱ्यांना सारखे विचारणा करीत आहे. त्यावेळी असे समजले की, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सदरील काम थांबविण्याचे आदेश दिले याबाबत ओव्हर ब्रिजचे काम जलदगतीने होणे ऐवजी थांबविणे योग्य नसून त्यामुळे नागरिकांना त्रास होतो. यासाठी थांबविण्यात आलेल्य कामास पुन्हा चालू करण्यासाठी मा. आयुक्त यांनी आदेशित करावे.

**मा. सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी.

**श्री. विखारोद्दिन :** मी या भागातील नगरसेवक असून मला कोणताही बाब न विचारता अशा प्रकारचा निर्णय घेणे योग्य नाही. यासाठी मा. आयुक्त यांनाच माहिती द्यावी. इतर अधिकारी यांना कोणतीही कल्पना नाही. महानगरपालिकेने रु. ५० लक्ष देवून २ वर्षे झाले.

**श्री. मिरा सलामी :** स.स. यांच्या सूसचनेवरून असे लक्षात येते की, विकास कामे करणे ऐवजी कुणाच्या सांगण्यावरून विका कामे खंडित करणे ही बाब दुर्देवी होय कारण रेल्वे ओव्हर ब्रिजचे तयार करण्यापूर्वी रेल्वे इंजिनिअर यांनी पहाणी करूनच निर्णय घेतलेला आहे. रेव्ले अभियंता यांनी या बाबत तसा अहवाल करून शासनाच्या निर्णयाप्रमाणे हा प्रस्ताव सुरू करण्यात आला होता. परंतु चालू झालेले असतांना आता मध्येच मा. आयुक्त यांनी काम थांबविण्याचे कारण नव्हते? यासाठी रु. ५०.०० लाख मनपाने देवू केलेले आहेत. आणि आता मध्यंतरी काम बंद पाडणे योग्य नाही. जर विकास कामाबाबत काही अडथळे येत असल्यास संबंधित वॉर्डाचे नगरसेवक व इतरांशी चर्चा घडवून कार्यवाही करता येऊ शकते.

**मा. आयुक्त :** हमालवाडी येथे रेव्ले ओव्हर ब्रिज व्हावे यासाठी अनेक दिवसापासूनची मागणी होती त्यानुसार रेल्वे ब्रिजच्या कामासाठी मनपाने रु. ५०.०० लाख समारंभापूर्वक प्रदान केले आहे. येथील जागा फाऊंडेशनची कामाला सुरुवात झाली. मागील काही दिवसापूर्वी हमालवाडा येथील नागरिकांनी मा. महापौर यांचेकडे एक निवेदन लिहून दिलेले होते. की, सदरील ओव्हर ब्रिज हे सिल्म मिल कॉलनीच्या लोकांसाठी नसून हमालवाडीतील लोकांना ये जा करण्यासाठीचा आहे. त्यावर निर्णय घेणे योग्य राहील. त्यानुसारच मा. महापौरांनी प्रशासनाला पत्र दिले की, सदरील कामा संदर्भात माझ्याकडे बैठक बोलवावी व त्यानंतरच निर्णय घेता येईल. तेंव्हा रेल्वे सिकंदराबाद येथील अधिकाऱ्यांना चर्चेसाठी बोलविण्यास पत्राने कळविले आहे. संबंधित अधिकारी चर्चेसाठी मा. महापौरांकडे आस्था नंतर जो काही निर्णय होईल त्यानुसारच कार्यवाही होईल. तोपर्यंत काम थांबवलेले आहे.

**श्री. विखारोद्दिन :** सदरील काम कुणाच्या दबावाखाली देऊन थांबविण्यात आले याची माहिती द्यावी. विकास कामामध्ये अशा प्रकारचे प्रशासनाने अडथळे आणणे योग्य नाही. कारण हमालवाडी व सिल्कमिल कॉलनी हे दोन्हीही आग हमालवाडीतच येतात सिल्कमिल कॉलनी हे नविन नांव आता बदलले आहे. परंतु पूर्वी संपूर्ण भाग हा हमालावाडीचा होता त्यामुळे या भागातील सर्व लोकसंख्या असणारे कुटुंबिय हमालवाडीतील असून या बाबत सर्व्हे झालेला आहे. या ठिकाणी शाळा, दरवाजे असून लहान मुले यांना या ब्रिजचा उपयोग तातडीने होऊ शकतो. परंतु कुणाच्या दबावामुळे काम थांबविले याचा खुलासा मागविणे योग्य.

**श्री. मिरा सलामी :** तांत्रिकदृष्ट्या ओव्हर ब्रीज बाबत केंद्र शासनाचे रेल्वे अभियंता यांनी अभिप्राय दिलेला आहेव रेल्वे ब्रिजवर संपूर्ण कंट्रोल रेल्वेचेच राहणर आहे. आपण फक्त पैसा दिलेला आहे. तेंव्हा काम बंद पाडणे योग्य नाही. असे समजले की, वेळोवेळी मा. पालकमंत्री यांच्या सारखा दबाव येत असतो. त्यामुळे काम दोनदा बंद पडलेले आहे.

**श्री. संजय जोशी, प्रभाकर विधाते, श्री. विकास जैन :** मा. पालकमंत्री यांचे नांव घेऊन बोलणे योग्य नाही. स. स. यांनी शहर विकासाच्या कामाबाबत फक्त बोलावे नांव घेऊन कुणाचेही बोलू नये.

**श्री. म. अ. रऊफ :** यापूर्वी जो निर्णय ओव्हर ब्रिज बाबतीत झालेला आहे. त्यानुसार कार्यवाही व्हावी.

**श्री. विखारोद्दिन :** ओव्हर ब्रिजच्या कामाचे संदर्भात मा. महापौर यांना त्यांचे दालनात माहिती दिली आहे.

**मा. सभापती :** सदरील ओव्हर ब्रीज हमालवाडी येथे आहे की, सिल्कमिलच्या बाबतीत आहे याची पाहणी केली आहे काय?

**श्री. विखारोद्दिन :** सिल्कमिल कॉलनी हा परिसर आता खूप वाढला आहे. सिल्कमिल कॉलनी यापूर्वी हमालवाडा या नावाने उल्लेखित आहे व हमालवाडा येथील भाग आहे. फक्त लोकसंख्या वाढल्याने मोहल्यांची नांवे वेगवेगळील दिलेली आहेत.

**मा. सभापती :** गेल्या किती वर्षापासून समझौता केला गेला तेंव्हा हमालवाडा व सिल्कमिल कॉलनीतील लोकांशी चर्चा करून दोन्हीही भागातील लोकांना सदरील ओव्हर ब्रिजचा उपयोग होईल अशा प्रकारची चर्चा झालेली होती.

**श्री. मिरा सलामी :** केद्र शासनातील रेल्वे अभियंता यांनी हमालवाडा भागाकडे रेल्वे ओव्हर ब्रीज होऊ शकणार नाही असा अभिप्राय दिलेला आहे.

**श्री. संजय जोशी :** प्रशासनाने या संदर्भात संबधित भागातील नागरिकांशी चर्चा करून निर्णय घ्यावा.

**उपअभियंता स्लम :** सदरील जागेबाबत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे या कामासाठी तेथील लोक जे सांगत आहे तेथे संबधित काम करीत आहोत रेल्वे स्टेशन येथील पार्सल कार्यालय तोडावे लागेल. परंतु ते तोडल्यास अंडर ओव्हर ब्रिज करण्यास योग्य नाही. यासाठी रेल्वे अभियंता यांनी दि. ३० ऑगस्टला पत्र दिले की, जे मार्क आऊट टाकलेले आहे. ते तांत्रिकदृष्ट्या फिजीबल आहे. आणि सदरील काम त्याच ठिकाणी व्हावे. परंतु या भागातील समाजकर्ता श्री. लाजरस यांना या प्रकरणी कोर्टात धाव घेतल्याने त्यांना याबाबतीत स्टे मिळाला नाही. हायकोर्टाने कमिशनर नेमून आपला अहवाल सादर करावा.

मनपाने काम फक्त डिपॉझिट द्यावयाचे आहे. त्यामुळे मनपाने सदरील पैसा जमा केला आहे. रोडवरील ओव्हर ब्रिजची पोजशिन बदल करणे हे रेल्वे अभियंता यांचे काम आहे. सदरील कामाबाबत मा. पालकमंत्री यांचा दबावाशी काहीही संबंध नाही. व त्यांनी काम थांबविण्याचे सांगितलेले नाही. लोकांनी तक्रार केल्या नुसार व कोर्टाने कमिशनर नेमल्याने काही बदल केल्यास ते योग्य नाही म्हणून मा. आयुक्त यांनी ते काम थांबविलेले आहे. कोर्ट कमिशनरच्या निर्णयानंतर कार्यवाही करता येईल.

**श्री. संजय जोशी :** रेल्वे ओव्हर ब्रिजच्या कामासाठी तज्ञ अधिकारी मंडळींनी साईट वर भेट देऊन पाहणी करून जागा फिक्स केलेली आहे काय? जर जागा फिक्स केलेली असल्यास हमालवाडा येथील लोकांनी आक्षेप घेण्याचे कारण नाही. तरीही मा. महापौर यांचेकडे बैठक घेऊन काम चालू करणे बाबत योग्य ती चर्चा स. सदस्या समवेत नागरिकांशीही करावी.

**उप अभियंता स्लम :** काही लोकांनी आक्षेप घेतल्यामुळे प्रकरण चालू आहे.

**श्री. विखारोद्दिन :** कोर्टात प्रकरण आहे परंतु या बाबत कोर्टाने कोणत्याही प्रकारे मनाई हुकूम दिलेला नाही.

**श्री. गौतम लांडगे :** कोर्टात प्रकरण जर असेल परंतु संबंधित लोकांनी कामाबाबत स्टे आणलेले आहे काय?

**उपआयुक्त (प्र) :** कोर्टाद्वारे स्टे आणलेला नाही.

**उप अभियंता स्लम :** कोर्टात प्रकरण असल्याने निर्णय मिळणे आवश्यक आहे. तोपर्यंत काही करता येत नाही.

**मा. सभापती :** कोर्टाचा निर्णय लागल्यानंतर कार्यवाही करता येऊ शकेल.

**श्री. विखारोद्दिन :** कोर्टाद्वारे संबंधित लोकांना स्टे आणलेला नाही आणि तरीही काम बंद का आहे? अगोदर सभापती महोदय यांनी असा आदेश द्यावा की संबंधित काम चालू ठेवावे.

**मा. सभापती :** या बाबततीत चर्चा खूप होत आहे. सदरील विषयांवर सर्वसाधारण सभेमध्ये चर्चा उपस्थित करता येईल. तरीही मा. महापौर यांचेकडे रेल्वे ओव्हर ब्रिजचे संदर्भात तथील नागरिक हमालवाडा व सिल्कमिल कॉलनी तसेच स. सदस्य व पदाधिकारी अधिकारी यांचे सोबत बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल.

**श्री. संजय जोशी :** सदरील प्रकरण कोर्टच्या अखत्यारित असल्याने तातडीने निर्णय लावावे व काम सुरू करावे.

**श्री. विखारोद्दिन :** बैठक घेऊन चर्चा करा परंतु तेथील काम चालू असतांना बंद पाडणे योग्य नसून मा. आयुक्त यांनी पुन्हा पत्र देऊन काम चालू करणेचे आदेश द्यावेत.

**श्री. मिरा सलामी :** रेल्वे अभियंतानी ओव्हर ब्रिजच्या संदर्भात जो अभिप्राय दिलेला आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करावी या बाबत मनपाने पैसा दिलेला आहे. आता हस्तक्षेप करू नये.

**श्री. संजय जोशी :** संबंधित बाबतीत मनपा पदाधिकारी व अधिकारी यांना प्रत्यक्षात जाऊन विचारणा करावी.

**श्री. विखारोद्दिन :** रेल्वे ओव्हर ब्रिजचे काम चाूल साठीचा निर्णय घ्यावा.

**श्री . संजय जोशी :** मा. महापौर यांचेकडे संबंधित भागातील नागरिका समवेत बैठक बोलावून निर्णय घ्यावा.

**श्री. गौतम लांडगे :** रेल्वे मंडळाचे काय म्हणणे आहे. त्यांचेशीही चर्चा करून निर्णय घ्यावा.

**श्री. राजकुमार बचाटे :** डिस्प्युट संबंधित जे अतसील त्यांना बोलवावे.

**मा. सभापती :** रेल्वे ओव्हर ब्रिजच्या संदर्भात सोमवार किंवा मंगळवार रोजी मा. महापौर यांचेकडे बैठक घेण्यात येईल. या वेळी संबंधित वॉर्डातील नागरिक व स. सदस्य तसेच पदाधिकारी व अधिकारी यांनाही बोलावून निर्णय घेण्यात येईल.

**श्री. म. अ. रऊफ, श्री. मिरा सलामी, श्री. विखारोद्दिन, श्री. स. अ. एकबालोद्दिन :** हमालवाडीतील काही नागरिकांनी सदरील काम बंद पाडले आहे. तरी चर्चा करते वेळी संबंधित नगरसेवकांना बोलविण्यात यावे.

**श्री. मिरा सलामी :** सध्या सिल्कमील या ठिकाणी ओव्हर ब्रिज तयार होत आहे. ते तयार करावे व पुन्हा हमालवाडी येथील लोकांसाठी नव्याने ओव्हर ब्रिज तयार करणेसाठी कार्यवाही करावी.

**मा. सभापती :** आता या संदर्भात एकदा निर्णय दिलेला आहे. त्यानुसार निर्णय होईल.

**सौ. यशोदा वाडेकर :** मागील दोन वर्षापासून मी माझ्या वॉर्डातील रस्त्याबाबत चर्चा करीत आहे. तेथील मकबुल मिस्त्री यांना रस्त्यावर अतिक्रमण केलेले आहे. त्याबाबत अद्यापही कार्यवाही केलेली नाही.

**सहा. संचालक नगररचना :** संबंधित जागेवर ११ फुटी रोड आहे. मकबुल मिस्त्री यांचे जागे व्यतिरिक्त जे बांधकाम अनधिकृत केलेले आहे. अनधिकृत बांधकाम करतांना पश्चिमेकडील लोक सरकलेले आहेत.

**श्री. प्रभाकर विधाते :** या बाबत एक पत्र आहे ते मा. सचिवांकडे वाचण्यास देतो. ते त्यांना वाचून दाखवावे.

**सचिव :** (पत्र वाचून दाखवितात)

**श्री. प्रभाकर विधाते :** या जागेबाबत संबंधिताकडे पी. आर. कार्ड आहे काय? नसल्यास कार्यवाही करावी.

**सहा. संचालक नगररचना :** कुणाकडेही पी.आर. कार्ड नाही त्या ठिकाणी दोनदा मोजमाप केलेले आहे.

**श्री. मिरा सलामी :** स. सदस्या या गेल्या बऱ्याच दिवसापासून सभेमध्ये विचारणा करतात. तेंव्हा या संदर्भात नगररचना, प्रशासकीय अधिकारी व मा. सभापती यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून कार्यवाही करावी.

**मा. सभापती :** या बाबत वस्तुसिथत काय आहे याची प्रशासकीय अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**प्रशासकीय अधिकारी :** मकबुल मिस्त्री यांचेकडे रजिस्ट्री पी.आर.कार्ड आहे. आणि दोन तीन वेळा मोजणी झालेले आहे.

**मा. सभापती :** सदरील संपूर्ण भाग हा अनधिकृत आहे. परंतु प्रकरण कोर्ट मॅटर असल्याने नियमाप्रमाणे नोटीस देऊन कार्यवाही करता येऊ शकेल त्याप्रमाणे सहा. संचालक नगररचना, प्रशासकीय अधिकारी व उपआयुक्त (म) यांचे बरोबर मी स्वत: स्थळ पाहणी उद्या सकाळी ठिक ८=३० वा. करेन व नंतरच योग्य ती नियमाप्रमाणे कार्यवाही करता येईल.

**सौ. वाडेकर :** सदरील भागात अनधिृत बांधकाम झ्झालेले असल्यास ते पाडझवे आणि जर नसेल तरी प्रशासनाने त्या ठिकाणी संबंधितास भुसंपादनाचा मोबदला देऊन रस्ता तयार करून द्यावा.

**श्री. नरसिंग ढगे :** सर्व्हे नं. १६ शहानुरवाडी येथे एक महिन्यापूर्वी पासून रस्त्याचे काम बंद पडले आहे. याचे कारण काय?

**उप अभियंता (बांध) :** कोर्टाच्या निर्णयामुळे तेथील काम बंद पडले आहे.

**श्री. नरसिंग ढगे :** गेल्या दिड महिण्यापासून कोर्टात मनपाचे वकील काहीही बोलत नाही. या जागेबाबत संबंधित व्यक्तींस भूसंपादनाचे मनपाने रु. १०.०० लाख दिलेले आहे. आता कोर्ट प्रकरण करण्याची आवश्यकता नव्हती. तरीही मनपाचे वकीलाने बाजू मांडणे आवश्यक आहे.

**श्री. संजय जोशी :** भूसंपादनाचे पैसे मुळ मालकास दिले की, अजून कुणा दिले याची छाननी करावी व वकील पॅनेल बाबत जर कुणी काम करीत नसल्यास ते बदलून घ्यावे.

**मा. सभापती :** १) या संदर्भात पुढील बैठकीत माहिती देण्यात येईल.
२) महानगरपालिकेवर वकील पॅनेल किती वर्षापूर्वीचे आहेत व किती लोकांचे पॅनेल आहे. त्यांचेवर सोपविलेली कामगिरी ते कशा पध्दतीने करतात याबाबत "पंधरवाडा" बैठक आयोजित करून माहिती घेत जावी. व जे पॅनेलवरील वकील व्यवस्थित काम करीत नसतील त्यांचेवर कार्यवाही करावी व वकील पॅनेल बदलून घ्यावे.

**श्री. संजय जोशी :** स.स. श्री. ढगे यांनी सूचना केल्यानुसार संबंधित भागातील पी.आर. कार्ड व रजिस्ट्रीची प्रत बाबत माहिती द्यावी.

**मा. सभापती :** ठिक आहे पुढील बैठकीत माहिती द्यावी.

**श्री. विखारोद्दिन :** ओव्हर ब्रिजवाडी येथील एका साळवे कुटूंबास मनपाने मोबदला दिलेला आहे व पर्यायी व्यवस्था सुध्दा केलली आहे. परंतु त्यांना सुविधा दिलेल्या नाहीत काय? ते कुटुंब अजुनही शिफ्ट झालेले नाही. अंदाजे किती दिवसांत शिफ्ट करण्यात येईल.

**उप आयुक्त (प्र.) :** श्री. साळवे कुटुंबीय यांना पर्यायी व्यवस्था केलेली आहे. त्यांना एका शाळेत व्यवस्था केलेली आहे. त्या ठिकाणी लाईट व पाणीपुरवठा व्यवस्था केल्यानंतर कार्यवाही होईल.

**मा. सभापती :** पंधरा दिवसांपर्यंत श्री. साळवे कुटुंबियांना स्थलांतर करण्यात यावे.

**श्री. गौतम लांडगे :** गेल्या तीन महिण्यापासून आंबेडकर नगर सिडको, मिसरवाडी, येथील स्ट्रिट लाईट बंद अवस्थेत आहेत. संबंधित अधिकाऱ्यांना वारंवार सूचना करूनही काहीही कार्यवाही होत नाही.

**उप आभियंता-२ :** या ठिकाणचे पोल मिसरवाडी भागातील डिस्पुटस मध्ये आलेले आहेत. त्यामुळे स्ट्रिट लाईट बंद आहेत त्यावर कार्यवाही करण्यात येईल.

**मा. सभापती :** आपल्याकडील जे लाईनमन कर्मचारी आहेत ते दिवसातून ४-५ लाईट लावतात आणि दिवसभराचे काम संपवितात याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी काळजी घ्यवी. स.स.नी तक्रार केलेली असल्यास तातडीने कार्यवाही करावी व विद्युत मंडळाकडील चुकी असल्यास तशा सूचना मंडळाकडे लेखी कळवाव्यात.

**श्री. गौतम लांडगे :** बऱ्याच दिवसापासून आम्ही विद्युत पोलसाठी लाईट व मक्युरीची मागणी करता. मागील सभेत मंजुरी देवूनही आम्हाला विद्युत मटेरियल मिळत नाही. म्हणजे मागविलेले साहित्य अद्याप आलेले नाही का?

**उप अभियंता विद्युत-**२: मर्क्युरी बल्ब अद्याप आलेले नाही.

**मा. सभापती :** शहरातील जेवढे लाईट बंद आहेत त्याची पाहणी करावी व त्यानुसार तातडीने कार्यवाही करावी. स.स.श्री. लांडगे यांनी केलेल्या सुचनेनुसार सोमवार पर्यंत कामास सुरुवात करावी.

**श्री. मिरा सलामी :** माझ्या वॉर्डात ७ पोलची मंजुरी होती व ३ पोल लावलेले आहेत. आता ४ पोल अद्यापही लावलेले नाहीत. यांचे कारण काय? जी आय पोल सहा महिण्यापासून लाईनही चालू केलेले नाहीत. व त्याचे अंदाजपत्रकही तयार केलेले नाही.

**उप अभियंता विद्युत-१:** विद्युत मंडळाने ७ पोलचे सर्व्हे केलेला होतो ३ पोल लावलेले आहेत. त्यांचेकडे स्टॉक नसल्याने लावलेले नाहीत. विद्युत मंडळाचे गर्डर पोल चे पैसा मनपाने दिलेला आहे. २ वेळा पत्र ही दिलेले आहे.

**मा. सभापती :** स. स. श्री. मिरा सलामी यांचे कामाबाबत मंगळवार पर्यंत कार्यवाही करावी.

**श्री. संजय जोशी :** रेल्वे विभागाकडे मालमत्ता कराचा पैसा व नळपट्टी चा किती पैसा बाकी आहे. रेल्वे विभागाकडे बरीच थकबाकी आहे. याची माहिती द्यावी कारण सर्वसाधारण सभेसमोर मनपाने रु. ३१.०० लाख द्यावयाचा प्रस्ताव ठेवणार असून त्यामधून सदरील पैसे वळती करून घेता येईल.

**मा. सभापती :** या बाबत पुढील बैठकीत माहिती द्यावी.

**श्री. गौतम लांडगे :** मागील वर्षात जकात ९०% वसुली झाली होती. सध्या जकात अधिक्षकाचे पद रिकामे आहे. अतिरिक्त पदभार मागील वर्षीपासून जे सांभाळत ते चांगल्याप्रमारे हातळीत असून याबाबत मा. आयुक्त यांनी मागील एका बैठकीत प्रशंसा केलेली होती. तेव्हा यापूढेही जकातीचे उत्पन्नात चांगली प्रगती होणेसाठी जकात अधिक्षकांचे कामाचे पद भरणे आचश्यक आहे. त्यानुसार कार्यवाही व्हावी.

**श्री. संजय जोशी :** अतिरिक्त पदभार कुणाकडेही न देता, कायमस्वरुपी जकात अधिक्षक यांचे पद भरून प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**श्री. प्रभाकर विधाते :** जकातीचे सध्याची वसुली समाधानकारक नाही.

**श्री. गौतम लांडगे :** मागील वर्षीचे जकातीचे उत्पन्न समाधानकारक आहे असे मा. आयुक्त यांनी स्थायी सभेमध्ये सांगितलेले आहे.

**श्री. विकास जैन** : स. सदस्य श्री. स. अहमद एकबाल मुजाहेद यांनी सूचना केल्याप्रमाणे विद्युत मंडळास दि. २९-०६-९८ पर्यंत रु. १.०० कोटी भरणा करणार काय याचा निर्णय घ्यावा.

**मा. सभापती :** मा. उपमुख्यमंत्रीह महादेय यांनी रु. ७५.०० लाख मनपाने, विद्युत मंडळास विज बिलाचे पोटी पति महिना देणेची सूचना केलेली आहे. त्याप्रमाणे कार्यवाही होत असून पुन्हा विद्युत मंडळाने दि. २९-०६-९८ पर्यंत रु. १.०० कोटी प्रमाणे भरणा केले नाही. तर मनपाचा विज पुरवठा बंद करण्यात येईल असा इशारा दिलेला आहे. त्याबाबत उत्तर देणे आवश्यक राहील.

**श्री. विकास जैन :** मागील बैठकीपासून मी सतत सूचना करीत आहे की, मालमत्ता कर व पाणीपट्टी वसुलीवर प्रशासनाने जोर द्यावा जेणेकरून वसुली होऊन मनपाचे उत्पन्न वाढेल. विभाग निहाय मिटींग घेणार, माझ्या झोनला मिटींग झाली नाही.

**उप. आयुक्त (म.)** करमूल्य निर्धारण अधिकारी १ व २ यांचेकडे सध्या घरांना क्रमांक देणेचे काम दिलेले आहे. आतापर्यंत जवळपास ६ हजार प्रापर्टीजच्या घरांना क्रमांक देणेचे काम झालेले असल्यामुळे मालमत्ता कराचे वसुलीचे काम थोडे थांबलेले आहे. याशिवाय काही कर्मचारी आर्थिक गणनेचे कामात व्यस्त आहेत तर काही कर्मचाऱ्यांना नविन कर आकारणीचे काम कनिष्ठ अभियंता व सब ओव्हरसियर यांचेकडे उद्दिष्ट्ये ठरवून दिलेले आहे. नविन डिमांड

रजिष्टरद्वारे नोटीसा वाटप करून मालमत्ता कराची वसुली करण्यात येणार आहे. शहरातील ज्या प्रापर्टीजला कर जादा लागलेला आहे. अशा कर आकारणीच्या ज्या डिस्पुटस् केसेस कर आकारणी-१ यांचेकडून आक्षेपावर १३० लोकांचे सुनावणी करून, प्रकरणे झालेली आहेत. असे निदर्शनास आले आहे की, जे लोक आपआपल्या प्रापर्टीजच्या कर आकारणी बाबत आक्षेप नोंदवितात मात्र कार्यालयात बोलविल्यानंतर मात्र येत नाही. याबाबत निश्चित धोरण आखणेची आवश्यकात आहे. प्रत्येक आक्षेपा संदर्भात स्थळपाहणी करून मोजणी केल्याशिवाय काही अर्थ नाही. त्यासाठी थोडा कालावधी लागणार आहे. मालमत्ता कर व पाणीपट्टीचे बिले माहे ऑक्टो/ नोव्हें महिन्यात तयार करण्यात आलेले होते. परंतं आता प्रत्येक झोननिहाय रिव्हीजन करून प्रत्येक मालमत्ता धारकांना नविन कर भरणा करणेसाठी त्याची चेकलिस्ट तयार करून ती जून महिन्यापर्यंत व्यवस्थित तयार करून अद्यायावत केले आहे. मागील ८/९ वर्षापूर्वीचे जे मालमत्ता करावे व पाणीपट्टीचे रजिस्टर होते ते काही प्रमाणात फाटलेले होते ते नविन तयार करण्यात आलेले आहे. झोनमधील बरेचसे कर्मचारी बिपीएल व आर्थिक गणनेचे कामात अतिरिक्त भार सांभाळून काम करित असल्याने थोडा वसूलीमध्ये फरक पडत आहे.

**श्री. विकास जैन :** असे निदर्शनास आले आहे की, काही अधिकारी मालमत्ता धारकांकडे वसुलीसाठी घरोघरी जातात तेंव्हा त्यांना काही मालमत्ता धारक हाकलनू लावतात. अशा धारकांबाबत नियमाप्रमाणे कार्यवाही व्हावी.

**श्री. मिरा सलामी :** माझ्या वॉर्डातील एका मालमत्ता धारकाने त्यास जादा कर आकारणी झालेली असल्याने आक्षेप घेतला मात्र एका महिण्यापासून त्यास सुनावणीसाठी सुध्दा बोलाविले नाही. असे लक्षात येते की, जे मालमत्ताधारक आक्षेप घेऊन संबंधित विभागाकडील कर्मचाऱ्यांस पैसे देतात. त्यानांच सुनावणीसाठी बोलावून कर कमी करण्याचे निर्णय घेतात असे अनेक उदाहरणे माझ्याकडे आहेत. याबाबत प्रशासनाने गांभीर्य लक्षात घेऊन कार्यवाही करावी. याशिवाय ज्या घरांचे नविन रिव्हीजन प्रमाणे सर्व्हे करावयास पाहिजे ते होत नाही. व कुणी मालमत्ता धारक संबंधितास भेटला नाही तर मात्र कर जादा लावून ठेवतात. त्यामुळे मालमत्ता धारक टॅक्स भरीत नाहीतव अशा प्रकारचे केसेस शहरात भरपूर आहेत.

**श्री. प्रभाकर विधाते :** शहरातील जे मालमत्ताधारक थकबाकीदार आहेत. व ज्यांचे केसेस डिसपुटसमध्ये आहेत. अशांचे आक्षेप मागवून झोननिहाय बैठका घेऊन या बाबत प्रशासनाने निर्णय घ्यावा.

**कर मुल्य निर्धारण अधिकारी-१ :** अशा प्रकारचे ४३० केसेस डिस्पुटसमध्ये होते. त्या सर्वांना सुनावणीसाठी बोलाविले असता काही आले तर काही येत नाही.

**मा. सभापती :** मालमत्ता बाबतचे कोर्ट प्रकरणे किती आहेत.

**कर मुल्य निर्धारण अधिकारी-१ :** बरेचशे मालमत्ता धारकांकडे गेल्या १०-१२ वर्षापासून मालमत्ता कराची थकबाकी प्रलंबित आहेत. काही लोकांचे घरे जूने व पडके आहेत तर काहींनी घरे दुसऱ्यांना विकलेली आहेत. ज्या लोकांनी आक्षेप घेतलेले होते. व ज्यांचेकडे बरीचशी थकबाकी शिल्लक आहे. अशा धारकांना सुनावणीसाठी बोलाविले असता २०% (टक्के) लोक सुनावणीसाठी

हजर राहतात. म्हणणे प्रकरणे निपटारा करणेसाठी प्रशासनातर्फे प्रयत्न असूनही प्रतिसाद मिळत नाही.

**मा. सभापती :** १) शहरात बऱ्याच मोठ्या प्रमाणात अनधिकृत वसाहत्या आहेत आणि अशा ठिकाणची वस्तीही फार मोठ्या प्रमाणात असूनही दुमजली घरे झालेली आहेत. अशा घरांचे नव्याने सर्व्हे करून प्रशासनाने कर आकारणीचे काम दरवाजा ते दरवाजा (Door to Door) करावे. त्यामुळे वसुली होऊन मनपाचे उत्पन्नात भर पडेल. व अशी काही घरे आहेत की, अनधिकृतरित्या वरचे मजले बांधकाम करूनही नविन आकारणी झालेली नाही त्याचेही सर्व्हे करावे. व थकित वसुली साठी डिमांड नोटीस जारी करावी.

२) शहरातील अशी अनेक प्रकरणे मालमत्ता करांचे डिस्पुट मध्ये आहेत ती सर्व प्रकरणे एकंदर किती आहेत. त्या सर्वांची नावानिशी व विभागावाईज माहिती पुढील बैठकीत सादर करावी.

३) अधिकृत व अनधिकृत वसाहती मधील घरांचे सर्व्हे करून मनपा कर आकारणी करीत आहे. या शिवाय बॉंडवर ज्यांचे/जमिन/घर विक्री झालेले आहेत त्यांनाही कर आकारणी करण्यात यावी म्हणजे मनपाचे उत्पन्नात भर पडेल. फक्त नियमाप्रमाणे नामांतर करता येणार नाही.

**श्री. मिरा सलामी :** बरीच घरे बॉंड पेपरवर विक्री / खरेदी केल्यानंतर जुने कर न दाखविता नविन कर आकारणी केल्या जाते. व त्यामुळे मनपाचे नुकसान होते.

**श्री. विकास जैन** : नागरिकांचे त्या त्या भागातील कर आकारणी बाबत जे काही आक्षेप व डिसपुटस केसेस असतील त्या बाबत सुनावणीसाठी बोलाविणे बाबत वर्तमान पत्रात नागरिकांच्या माहितीसाठी जाहिर प्रगटन किंवा वृत्तपत्रात मनपाने सूचना कराव्यात जेणे करून लोकांना माहिती होईल.

**विषय क्र. ४३/१ :**

दिनांक २०-०३-९८, ३०-०३-९८, १६-०४-९८ व दिनांक १०-०६-९८ चे स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**मा. सभापती :** १) स.स. यांच्या सुचनेनुसार प्रशासनाने नागरिकांच्या माहितीसाठी मालमत्ता कर भरणा थकबाकीसाठी व आक्षेपावर सुनावणीसाठी झोननिहाय बैठका घेऊन निर्णय घेणेस्तव वृत्तपत्राद्वारे आवाहन करावे.

२) दिनांक २०-११-९७ च्या स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तात ठराव क्र. ३१८/१७ मध्ये जेथे जेथे काझी असे नांव टंकलिखित झालेले आहे ते झीकाद्री असे असावे. अशी दुरुस्ती व्हावी.

३) दिनांक १०-०६-९८ चे इतिवृत्तातील विषय क्र. २४/३ हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात आलेला होता. त्या बाबत प्रशासनाने माहिती दिलेली असून प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

४) दिनांक १०-०६-९८ चे इतिवृत्तातील विषय क्र. २६/५, २७/६ चा प्रस्ताव पुर्ननिविदा मागविण्याचे ठरले होते. सदरील प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

५) दिनांक २०-०३-९८ चे इतिवृत्तातील विषय क्र.५१७/२६ हा प्रस्ताव गुत्तेदार श्री. संजिवनी कन्स्ट्रक्शन यांचे नांव २६.३०% अं. प. दरापेक्षा कमी दराने मंजूर करण्यात आलेला होता. परंतु सदरील गुत्तेदार काम करीत नसून त्याच प्रस्तावातील दुसरा किंवा त्यानंतर तिसरा गुत्तेदार ज्याचे कमी दराने निविदा आहे. त्यांचेकडून काम मरून घेण्यात यावे. जर यापैकी कोणीही काम करावयास तयार नसेल तर पुन्हः निविदा (रिकॉल) करावी.

**ठराव :**

१) स.स. यांच्या सुचनेनुसार प्रशासनाने नागरिकांच्या माहितीसाठी मालमत्ता कर भरणा थकबाकीसाठी व आक्षेपावर सुनावणीसाठी झोननिहाय बैठका घेऊन निर्णय घेणेस्तव वृत्तपत्राद्वारे आवाहन करावे.

२) दिनांक २०-११-९७ च्या स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तात ठराव क्र. ३१८/१७ मध्ये जेथे जेथे काझी असे नांव टंकलिखित झालेले आहे ते झीकाद्री असे असावे. अशी दुरुस्ती व्हावी.

३) दिनांक १०-०६-९८ चे इतिवृत्तातील विषय क्र. २४/३ हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात आलेला होता. त्या बाबत प्रशासनाने माहिती दिलेली असून प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

४) दिनांक १०-०६-९८ चे इतिवृत्तातील विषय क्र. २६/५, २७/६ चा प्रस्ताव पुर्ननिविदा मागविण्याचे ठरले होते. सदरील प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

५) दिनांक २०-०३-९८ चे इतिवृत्तातील विषय क्र.५१७/२६ हा प्रस्ताव गुत्तेदार श्री. संजिवनी कन्स्ट्रक्शन यांचे नांव २६.३०% अं. प. दरापेक्षा कमी दराने मंजूर करण्यात आलेला होता. परंतु सदरील गुत्तेदार काम करीत नसून त्याच प्रस्तावातील दुसरा किंवा त्यानंतर तिसरा गुत्तेदार ज्याचे कमी दराने निविदा आहे. त्यांचेकडून काम मरून घेण्यात यावे. जर यापैकी कोणीही काम करावयास तयार नसेल तर पुन्हः निविदा (रिकॉल) करावी.

या व इतर दुरुस्त्यासह दिनांक २०-०३-९८, २६-०३-९८, ३०-०३-९८, १६-०४-९८ व दि. १०-०६-९८ चे इतिवृत्तास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४/२ :**

मो. हर्सूल येथील स. नं. १२६ (भाग) करिता सौ. सुनंदा नाकाडे व इतर यांनी सादर केलेल्या रेखांकन प्रस्तावास मान्यता दिली असता त्यांनी ह्या रेखांकनाखालील जमीनीपैकी मंजूर विकास योजना १५.० मी. रुंद रस्त्याने बाधित होणारे क्षेत्रासाठी मोबदला देण्याची मागणी केलेली आहे. ह्या रेखांकना करिता संबंधिताने १००% विकास खर्च जमा केला असून, देय मोबदल्याचे रक्कमेतून रेखांकनासाठी जमा करावयाची जमीन विकास शुल्क रक्कम वळती करून घ्यावी म्हणून विनंती केली आहे. मंजूर विका योजना मधील १५.० मी. रुंद रस्त्याने ह्या रेखांकनाखालील जमीनीचे २५५०.० चौ. मी. क्षेत्र बाधित होत असून तेवढ्या क्षेत्राचे ९७ चे दरानुसार रु. २,५३,३६०/- एवढे मुल्य निश्चित होते व ह्या रेखांकना करिता संबंधिताने महानगरपालिकेस रु. १,४०,७६०/- एवढी जमीन विकास शुल्क रक्कम जमा करावयाची आहे.

करिता बाधित क्षेत्राचा देय मोबदला म्हणून रक्कम रु. २,५३,३६०/- निश्चित करून त्यातून जमिन विकास शुल्क रक्कम रु. १,४०,७६०/- वजा करून उर्वरित रक्कम रु.

१,१२,६००/- संबंधितास नंतर देण्याचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर. प्रस्ताव मान्यतेनंतर रेखांकनातर्गच्या रस्ते व खुली जागा चे हस्तांतरासह विकास योजना रस्त्याचे नोंदणीकृत दस्तऐवजाने हस्तांतर करून घेऊन नंतर रेखांकनास नेहमीच्या इतर अटी व शर्तीस पात्र राहून अंतिम मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येईल. व नंतर उर्वतिर देय रक्कम संबंधितास अदा करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स. न. १२६ (भाग) करिता सौ. सुनंदा नाकाडे व इतरांनी सादर केलेल्या रेखांकनातील १५ मीटर रुंद रस्त्याने बाधित जमीनीचा बाधित क्षेत्र २५५०.०० चौ. मी. क्षेत्राचा देय मोबदला रक्कम रु. २,५३,३६०/- देण्यास तसेच यातून जमीन विका शुल्क रु.१,४०,७६०/- वजा करून उर्वरित रक्कम रु. १,१२,६००/- संबंधितास देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५/३ :**

मालमत्ता अधिकारी यांनी मा. आयुक्त यांच्या मंजुरीनुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नेहरूभवन येथे दक्षिण कडील भिंत लगत नियोजित व्यापारी संकूल बांधण्यात येणार आहे. सदरील दुकानाचे भाडे व अनामत रक्कम निश्चित करण्यासाठी प्रकरण भाडे समिती समोर ठेवण्यात आले होते. तथापि भाडे समितीने खालील प्रमाणे भाडे निश्चित करून दिले आहे.

**अनामत रक्कम :** ४०००/- प्रति चौ. मी. प्रमाणे.

**भाडे :** दुकानाचे भाडे ५=०० रुपये चौ. फुट ५४=०० प्रति चौ. मी. प्रतिमहा प्रमाणे निश्चित करण्यांत आले आहे.

तसेच रु. ४०००/- प्रति. चौ. मी. हि अनामत रक्कमेची किमान बोली ठेवून त्यापेक्षा जास्त बोली बोलणाऱ्या दुकानधारकांना देण्या बाबत प्रस्ताव स्थायी समिती समोर विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नेहरू भवन येथे दक्षिण कडील भिंतीलगत नियोजित व्यापारी संकलातील दुकानाचे भाडे व अनामत निश्चित करण्याकरिता भाडे समितीने निश्चित केलेल्या खालील प्रमाणे अनामत तसेच भाडे आकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**अनामत रक्कम :** ४०००/- प्रति चौ. मी. प्रमाणे.

**भाडे :** दुकानाचे भाडे ५=०० रुपये चौ. फुट ५४=०० प्रति चौ. मी. प्रतिमहा प्रमाणे निश्चित करण्यांत आले आहे.

तसेच रु. ४०००/- प्रति. चौ. मी. हि अनामत रक्कमेची किमान बोली ठेवून त्यापेक्षा जास्त बोली बोलणाऱ्या दुकानधारकांना देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ४६/४ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, नारेगांव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या भोवती संरक्षक ग्रिल बसविणेच्या कामाकरिता अंदाजपत्रक र. रु. २३,०५९/- सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांची दरसूची ९६-९७ अनुसार तयार करण्यात आली.

सदर कामाकरिता स. नगरसेवक श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिकराव यांची लेखी विनंती नुसार त्यांच्या निधीतून करण्याचे प्रस्तावित आहे. करिता पुढील विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नारेगांव येथील डॉ. बाबासहोब आंबेडकर पुतळ्या भोवती संरक्षक ग्रिल बसविणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. २३,०५९/- चे अंदाजपत्रकास सदर स. नगरसेवक श्री. महादेव सुर्यवंशी यांच्या स्वेच्छा निधीतून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७/५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शहाबाजार येथील स्मशानभूमीस संरक्षित भिंत बांधणे बाबत चे अंदाजपत्रक र. रु. ६,२७,०००/- सा. बां. विभागाच्या सन ९६-९७ च्या दरसूची नुसार तयार करण्यात आले असून त्यास मा. आयुक्त यांची मान्यता प्राप्त आहे.

सबब र. रु. ६,२७,०००/- चे अंदाजपत्रकास व सदर कामावर होणारा खर्च "स्मशानभूमी विकास कार्यक्रम" तरतूदीतून करण्याचा प्रस्ताव स्थायी समिती समोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहाबाजार स्मशानभूमीस संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ६,२७,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८/६ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, व्यंकटेशनगर व सेव्हनहिल येथे उद्यान विकसित करणे बाबत चे अंदाजपत्रकास स्थायी समितीची ठराव क्र. ३७३/४ दि. १७-१२-९७ अन्वये मान्यता घेऊन सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र. ६/९८ दिनांक २६-०३-९८ रोजी शहरातील वृत्तपत्रात प्रसिध्द करून निविदा मागविली असता कोरे निविदा विक्री दि. ३१-०३-९८ पर्यंत (२५) पंचवीस विकले गेले व दर भरून सिलबंद पाकीटात स्विकृतीची दि.१३-०४-९८ पर्यंत (७) सात प्राप्त झाले त्या उपस्थित गुत्तेदारासमक्ष मा. मुख्य लेखा अधिकारी यांचे दालनात उघडण्यात आले असता प्राप्त निविदेचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | मल्ल एंटरप्रायजेस | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.१८% कमी दराचे दर |
| २) | आर. एस. भाटीया | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.९९% कमी दराचे दर |
| ३) | परफेक्ट कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.८६% कमी दराचे दर |
| ४) | मन्नान खॉन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.२२% कमी दराचे दर |
| ५) | न्यु सुपर कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.१०% कमी दराचे दर |
| ६) | एम.एन. कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.९९% कमी दराचे दर (नोएमडी) |
| ७) | कुलवंतसिंग | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.८६% कमी दराचे दर |

सबब सदर कामासाठी प्राप्त निविदेत तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा धारक श्री. मल्ल एंटर प्रायजेस यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.१८% कमी दराची या दराने काम करून घेण्याचा प्रस्ताव स्थायी समिती समोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व्यंकटेशनगर व सेव्हनहिल येथे उद्यान विकसित करणेच्या कामाकरिता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.१८% कमी दराची श्री. मल्ल एंटर प्रायजेस यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता हे सुधारित प्रस्ताव सादर करीत आहे की, छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालयाच्या उभारणीच्या कामासाठी सहकार्य मार्गदर्शन करण्यासाठी डॉ. श्री. मोरवंचीकर साहेब (निवृत्त इतिहास विभाग प्रमुख डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद) यांची नेमणूक करण्यासठी दिनांक २८-०५-९८ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. १०/९ अन्वये प्रस्तावात दर्शविलेले मुद्दे क्र. ८,१०, व ११ च्या मुद्याच्या दुरुस्तीसह प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवावा असे सर्वानुमते ठरले आहे.

त्यानुसार सुधारित प्रस्ताव खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे. छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालयाच्या उभारणी करिता संग्रहालयात एक दालन हे मराठवाडा सांस्कृतिचे दर्शन घडविणारे दालन असावे असे यापूर्वीचे ठरले आहे. त्यासाठी सहकार्य व मार्गदर्शन करण्यासाठी डॉ. श्री. मोरवंचीकर साहेब (निवृत्त व इतिहास विभाग प्रमुख डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद) यांची नेमणूक करण्यासाठी महाराष्ट्र राज्य पुरातत्व खात्याचे संचालक श्री. कावाडकर यांचे उपस्थितीत श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालयाच्या उभारणी संदर्भात दिनांक ०७-०४-९८ रोजी बैठक घेवून सविस्तर चर्चा करण्यांत आली.

सदरील बैठकीत माजी खासदार मा. श्री. प्रदिप जैस्वाल, मा. आयुक्त म.न.पा. डॉ. शांतीलाल पुरवार साहेब, श्री. गजभिये साहेब (पुरातत्व खाते) व विशेष आमंत्रित डॉ. श्री. मोरवंचीकर साहेब (निवृत्त इतिहास विभाग प्रमुख डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद) उपस्थित होते. बैठकीत मा. श्री. कावाडकर यांनी सूचना केली की, संग्रहालयाच्या उभारणीकरिता व या संग्रहालयास वास्तव रुप देण्याकरिता कर्मचारी/अधिकारी यांची आवश्यकता आहे. व त्या करिता एखाद्या तज्ञ व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली शासकीय नियमावलीनुसार हे काम झाल्यास शासनाकडून अनुदान मिळू शकते. त्यासाठी वस्तु संग्रहालयाचे उद्दिष्ट ठरविणे, प्रकल्प अहवाल तयार करणे, आवश्यक कर्मचारी / अधिकारी यांच्या आकृतीबंध तयार करणे वस्तुची मांडणी करणे तसेच पर्यटक व जनसामान्यांना आपल्या गौरवशाली इतिहासाबद्दन माहिती देणे इत्यादी बाबी आवश्यक आहेत. या करिता या परिसराचे उत्तम ज्ञान असणाऱ्या व्यक्तींची मुख्य मानद समन्वये म्हणून नेमणूक करणे गरजेचे आहे. याबाबत सविस्तर चर्चा होऊन त्या करिता मा. डॉ. श्री. मोरवंचीकर यांना विचारणा केली असता त्यांनी मानद समन्वयक म्हणून का करण्याचे व संग्रहालयाची उभारणी संदर्भात सहकार्य व मार्गदर्शन करण्याचे मान्य केले आहे.

यासाठी त्यांनी खालीलप्रमाणे प्रस्ताव दिलेला आहे.

१) हि नेमणूक निव्वळ मानद स्वरुपाची असेल व त्या करिता कोठल्याही स्वरुपात मानधन पगार इत्यादी अपेक्षित नाही.
२) या निमित्ताने प्राप्त होणाऱ्या व आवश्यक असणाऱ्या अधिकाराची चर्चा संग्रहालयाच्या देखभालीसाठी व वस्तु जतन करण्यासाठी सर्व अधिकारी युक्त सर्वोच्च समितीपुढे (ज्यात मा. महापौर मा. खासदार, मा. आयुक्त, डॉ. शांतीलाल पुरवार व त्यांचे पुत्र श्री. प्रकाश पुरवार यांचा समावेश आहे.) व्हावी.
३) वस्तु संग्रहालयाच्या उभारणी संदर्भातील सर्व पत्र व्यवहार मुख्य मानद समन्वयकाच्या सहिने व शिक्क्याने व्हावी.
४) वस्तु संकनाकरिता जेव्हा जेंव्हा गरज भासेल तेंव्हा तेंव्हा परवानगी जाने करिता परवानगी असावी व त्यास्तव वाहन उपलब्ध करून देण्यात यावे.
५) मुख्य मानद समन्वयक हे सोमवार ते गुरुवार असे एकूण चार दिवस संग्रहालयाच्या उभारणी संदर्भात काम पाहतील त्यांना दररोज कार्यालयीन वेळेतील कामाकरिता कार्यालयात येणे व घरापर्यंत जाणे करिता वाहनांची व्यवस्था करण्यात यावी.
६) मुख्य मानद समन्वयकांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राच्या उभारणी संदर्भातही काम करण्याची विनंती मा. आयुक्त साहेब यांनी केल्याप्रमाणे ते उपरोक्त चार दिवसांपैकी दोन दिवस डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राकरिता देतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रासंबंधी कामाचे स्वरुप ठरविणे करिता संबंधिताशी सविस्तर चर्चा होणे आवश्यक आहे.
७) डॉ. श्री. मोरवंचीकर साहेब यांना रु. ५००/- हा अतिथ्य भत्ता म्हणून देण्यात यावा.
८) उपरोक्त दोन्ही संस्थाच्या उभारणी संदर्भात जे निर्णय होतील त्याची आगाऊ सूचना मुख्य मानद समन्वयक यांना देण्यात यावी. तसेच निर्णय प्रक्रियेत त्यांना वेळोवेळी समावून घेण्यात यावे व त्यांच्या सहमतीनेच निर्णय घेण्यात यावेत.
९) डॉ. श्री. मोरवंचीकर साहेब यांना मानधन म्हणून रक्कम रु. १५००/- प्रतिमहा देण्यात यावेत असे एकूण अतिथ्य भत्त्यासह रु. २०००/- प्रतिमहा मानधन देण्यात यावेत.
१०) डॉ. श्री. मोरवंचीकर साहेब यांना जसे जशी व जेंव्हा जेंव्हा आवश्यकता भासेल तेंव्हा तेंव्हा त्यांना मराठी स्टेनो टायपिस्ट व टंकलेखन यंत्र पुरविण्यात येईल.
११) त्यांची ही नेमणूक डिसेंबर ९८ अखेर सहा महिण्याकरिता असेल.

तरी दि. २८-०५-९८ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीसभेत सुचित केल्यानुसार विषय क्र.१०/९ मधील इतिवृत्तानुसार सुधारित प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर केला आहे. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. गौतम लांडगे :** छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालयातील प्रस्तावातील मुद्दा के. ६ मध्ये मुख्य मानद समन्वयकांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राच्या उभारणी संदर्भात काम करण्याची विनंती मा. आयुक्त यांनी केल्याने उपरोक्त चार दिवसापैकी दोन दिवस डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राकरिता देतील. व याबाबत कामाचे स्वरुप ठरविणे करिता संबधिताशी चर्चा होणे आवश्यक आहे जसे म्हटलेले आहे. मला असे म्हणावयाचे आहे की, छत्रपती शिवाजी महाराज संशोधन केंद्र व डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र अगदी भिन्न आहेत. त्यामुळे डॉ.मोरवंचीकर साहेब हे इतिहासाचे निवृत्त विभाग प्रमुख असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन

केंद्राबाबत दुसऱ्या तज्ञ व जानकार नामवंत व्यक्तीची निवड करावी लागेल. तेंव्हा या प्रस्तावातून डॉ. मोरवंचीकर यांचे नाव फक्त छत्रपती शिवाजी महाराज संशोधन केंद्रापुरतेच ठेवावे.

**श्री. संजय जोशी :** मुद्दा क्र. ७ मध्ये अतिथी भत्ता रु.५००/- व मुद्दा क्र. ९ मध्ये मानधन रु. १५००/- असे मिळून रु. २०००/- व वेळ पडल्यास स्टेनो व टंकलेखन करण्यासाठी यंत्र पुरविण्यात येणार आहे. त्यापेक्षा कार्यालयामार्फतच हे सर्व पुरवावे नविन खरेदी करण्याचा प्रस्ताव ठेवू नये.

**मा. आयुक्त :** छत्रपती शिवाजी महाराज संशोधन केंद्र व डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र ही दोन्ही जवळपास पूर्ण होत आहेत. आणि त्या ठिकाणी आता प्रत्यक्षात कामाची व मानसाची आवश्यकता आहे. आणि सुरवातीला निवृत्त इतिहास विभाग प्रमुख डॉ. मोरवंचीकर यांनी मानधन घेण्यास नकार दिलेला आहे. परंतु मुख्य समन्वयक व निवृत्त विभाग प्रमुखांची आपण या संशोधन केंद्रासाठी नियुक्ती करीत असल्याने त्यांना आपण मानधन देणार आहोत. त्यामुळे कामाला गती येईल स.स. श्री. गौतम लांडगे यांनी सुचविलेला मुद्दाबाबत ही दोन्हीही केंद्राची कामे भिन्न आहेत. त्यानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर केंद्रासाठी जुनी नामवंत व्यक्ती असल्यास तसेच सुचवावे व त्यानुसार चर्चा करून निर्णय घेण्यात येईल.

**मा. सभापती :** सदरील प्रस्ताव दुरुस्तीसह मंजूर सोबतच्या प्रस्तावात डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रासाठी नामवंत व तज्ञ जाणकार व्यक्तींची निवड करणेसाठी स.स. श्री. लांडगे यांनी सूचना केल्याप्रमाणे तशी नांव सुचवावी त्यानुसार मा. आयुक्त यांचेकडे चर्चा करून निर्णय घेण्यात यावा.

**ठराव :**

उपरोक्त सुधारित प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अ.क्र. २ ते ५ व ७ ते ११ अटींना अधिन राहून मान्यता देण्यात येते. डॉ. मोरवंचीकर यांनी छत्रपती शिवाजी महाराज पुराण वस्तु संग्रहालयाचे उभारणीच्या संदर्भात सोमवार ते गुरुवार काम पाहतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रासाठी दुसऱ्या तज्ञ व जाणकार व्यक्तींची निवड करण्यात येईल. करिता डॉ. श्री. मोरवंचीकर यांची मुख्य मानद समन्वयक म्हणून डिसेंबर १९९८ अखेर पर्यंत सहा महिन्याकरिता प्रस्तावातील अ.क्र. २ ते ५ व ७ ते ११ ना अधिन राहून मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०/८ :**

शिक्षणाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सन ९८-९९ या शैक्षणिक वर्षाकरिता मनपाच्या प्राथमिक शाळेतील इयत्ता १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांना क्रमिक पाठ्यपुस्तकांचे संच उपलब्ध करून देणेसाठी शासनाकडून १ लाख रु. अनुदान मंजूर करण्यात आले आहे. या मध्ये नियमाप्रमाणे मनपास १ लाख रु. याप्रमाणे इ. ५ वी ते ७ वीच्या विद्यार्थ्यांना मनपाच्या वतीने २ लाख रुपयाची क्रमिक पुस्तके अशी चार लाख रुपयाची क्रमिक पुस्तके खरेदी करण्याबाबत मा. आयुक्तांनी मान्यता प्रदान केली आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्य पाठ्य पुस्तक मंडळ औरंगाबाद यांच्याकडे उपरोक्त रक्कम जमा करण्यांत आली आहे.

तरी कार्योत्तर मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**संवाद :**

**श्री. स. अहमद एकबाल मुजाहेद :** किराडपुरा-१ उर्दू या शाळेत उर्दू शिकविणारा मुख्याध्यापकाची नियुक्ती न करता मराठी माध्यमाच्या मुख्याध्यापकाची नियुक्ती केलेली आहे ते योग्य नसून संबंधितास तेथून बदली करावी.

**मा. सभापती :** १) याबाबत शिक्षण अधिकारी यांनी तपासणी करून पुढील बैठकीत माहिती देवून कार्यवाही करावी व प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन ९८-९९ च्या शैक्षणिक वर्षाकरिता महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेतील इयत्ता १ ली ते ४ थी या विद्यार्थ्यांसाठी शासकीय अनुदान रु. १ लाख मध्ये मनपाचा हिस्सा १ लाख असे एकूण रु. २,००,०००/- (दोन लाख) रुपयांची पुस्तके तसेच इ. ५ वी ते ६ वी च्या विद्यार्थ्यांकरिता महापालिकेच्या वतीने रु. २ लाख रुपयांची क्रमिक पुस्तकांची महाराष्ट्र राज्य पाठपुस्तक मंडळाकडून करण्यात आलेल्या खरेदीस कार्योत्तर मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१/९ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु. व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, इंदिरानगर बायजीपुरा स. नं. २५ मधील गल्ली क्र. १९ ते २० मधील जलवाहिनीची खाली वाढवावयाची आहे त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणची सन ९६-९७ च्या दर सुचीनुसार रक्कम रु. ४,१७,५५५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर कामाचा खर्च हा झोपडपट्टी सुधार (पा.पु. व ज.नि.) च्या तरतूदीमधून करण्यात येणार आहे. करिता अंदाजपत्रक र. रु. ४,१७,५५५/- मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे इंदिरानगर बायजीपुरा स. नं. २५ मधील गल्ली क्र. १९ ते २० मधील जलवाहिनीची खोली वाढविण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. ४,१७,५५५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२/१० :**

मुख्यलेखा अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिका कार्यालयास लागणारे छपाई साहित्य वेळोवेळी खरेदीस्तव जाहिर निविदा वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात येवून निविदा दरपत्रके मागविली असता या कार्यालयास एकूण पाच निविदा दरपत्रके मागविली असता या कार्यालयास एकूण पाच निविदा दरपत्रके प्राप्त झाली. प्राप्त निविदा दरांचा तुलनात्मक दरानुसार जे दर सर्वात कमी आहेत अशा दरांचे आयटम क्रमांक खालीलप्रमाणे त्या त्या निविदाधारकांचे नांवासमोर दर्शविण्यात आलेले आहे.

मा. आयुक्त यांनी दरात वाटाघाटीसाठी निविदाधारकांना बोलाविले असता प्राप्त दर जाहिर निविदे अंतर्गत कमीत कमी परवडणाऱ्या दराने दिले असलेने निविदाधारकांनी दर कमी करणेस नकार दिला, त्यामुळे प्राप्त निविदेमधील सर्वात कमी दरांची निविदा मान्य करणेस मा. आयुक्तांनी शिफारस केली आहे. तसेच प्राप्त निवदाधारकांत मे. जयभारती एक्सरसाईज बुक मॅन्यु कं. वैजापुर यांनी एस.एस. आय युनिटचा दाखला देवून तसेच ते अपंग असलेने त्यांना अनामत रक्कमेत सुट देण्यात येवून कार्यादेश देतांना अनामत घेणेची मा. आयुक्त यांनी मान्य केले आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | मे. जयभारती एक्सरसाईज बुक मॅन्यु कं. वैजापुर | आयटम क्र. १ मधील ए व एफ फक्त. |
| २) | मे. श्री. गणेश मुद्रणालय, औरंगाबाद | आयटम क्र. १ (डी. इ. जी. एम. के. एल.एन.ओ.पी.क्य.आर. एस. टी. यु. व्ही. डब्ल्यु, एक्स) ४(क), ६(अ), ७(अ), ८(ब), ९(अ,ब), ११(अ,ब,क,ड), १३ (जी.एच.आय.एल.एम., १७,२२,२३,२४, व ३२ इ.) |
| ३) | मे. सिमा प्रिंटर्स, औरंगाबाद | आयटम क्र. १(बी.सी.), १२ (एम.आय.ओ.पी.) १३ (एफ, जे. के. एन.ओ. १६ ,२०, २१ इत्यादी). |
| ४) | मे. लिबर्टी प्रिंटर्स औरंगाबाद. | आयटम क्र. १ (एम),२३ (ब,क,ड), ४(अ,ब,ड) ५,६, (ब,ड), ७ (ब,क,ड,) ८ (क,ड,)९ (क,ड)१०ब (९), ११ (इ ते म) १२ (ए.डी,) इ. एफ, आय, जे, के, एल, एम, एन) १३ (बी.सी.डी.,इ) १४,१८,१९,२७,२९ व ३० इत्यादी |
| ५) | मे. रविराज प्रिंटर्स, स्टेशनरी ॲण्ड एक्स, बुक मॅन्यु, कं. औरंगाबाद | आयटम क्र. १ (जे), ३ (अ) ६ (फ), ८(अ), १०(१ ते ८), १० ब (१ ते ७), १२ (बी.सी.जी.), १३ (ए), १५,२५, २६,२८ व ३१ इत्यादी. |

वरील प्रमाणे प्राप्त दर गतवर्षीपेक्षा सरासरीने कमी आलेले आहेत. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका कार्यालयास लागणारे छपाई साहित्य वेळोवेळी खरेदी करणेस्तव प्राप्त झालेल्या निविदापैकी प्रस्तावातील अ.क्र. १ ते ५ च्या निविधारकांच्या नांवासमोर दर्शविलेले कमी दराचे आयटम त्यांचेकडून खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३/११ :**

मुख्यलेखा अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला केला की, महानगरपालिका कार्यालयास सन ९८-९९ या आर्थिक वर्षासाठी लागणारी किटकनाशके खरेदीसाठी वर्तमानपत्रात जाहिर निविदा प्रसिध्द करून निविदा दरपत्रके मागविणेत आली. एकूण चार निविदा दरपत्रके या कार्यालयास प्राप्त झाली. प्राप्त दरपत्रकानुसार खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले. दर्शविलेले दर तुलनात्मकदृष्ट्या कमी आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | काळे फिनेल ५% आर. डल्ब्युसी- | रु. १७.०० प्रतिलिटर (गतवर्षापेक्षा ०.९० पैशांनी कमी) मे सलवा इंटरप्रायजेस व मे रोषण सेल्स कॉर्पोरेशन यांचे समान दर आहेत. |
| २) | सिबाका नोव्हान | रु. ४२१.०० प्रति लिटर - (गतवर्षाप्रमाणे सारखे)<br>मे. इन्शा ट्रेडींग कं. यांचे दर आहेत. |
| ३) | बॅक्ट रिनो (कार्बोलिक पावडर) | रु. १९.५० प्रति किलो मे. सलवा इंटरप्रायजेस यांचे दर आहेत. |
| ४) | लिडेंन १.३% | रु. १२.९५ प्रति किलो.<br>मे. सलवा इंटरप्रायजेस यांचे दर आहेत. |
| ५) | फालीडस्ट | रु. १९.०० प्रतिकिला (फक्त एका निविदाधारकांने दर भरले आहेत.) |
| | | मे. साई प्रॉडक्टस् लोणकर वस्ती ता. कोपरगांव यांचे दर आहेत. |

शासनाने बीएचपी पावडर बंद केल्याने त्या जागील वरीलप्रमाणे आयटम क्र. ३, ते ५ पावडर इतर नगरपालिका व महानगरपालिका वापरण्यात येत आहे. वरील तीन पावडपैकी मा. आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे जे पावडर वापरणेस योग्य असल्याचे प्रमाणपत्र देतील ते पावडर खरेदी करण्यात येईल.

मा. आयुक्तांनी सदरील एजन्सीकरिता दर वाटाघाटीसाठी बोलाविले असता फिनेल दोन्ही एजन्सी मिळून पुरवठा करणार आहेत, स्पर्धात्मक दर असलेने दर कमी करणेस सदरील एजन्सीजनी नकार दिला प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका कार्यालयास सन ९८-९९ या वर्षाकरिता लागणारी किटकनाशके खरेदी करण्याकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी काळ्याफिनेलकरिता प्राप्त निविदापैकी प्रती लिटर रु. १७.०० या दराची मे सल्हा इंटरप्रायजेस व मे. रोशन सेल्स कार्पो यांच्या निविदा स्विकारणेस तसेच अ.क्र. ३ ते ५ च्या पावडर पैकी आरोग्य अधिकारी हे जे पावडर वापरण्या योग्य आहे. असे प्रमाणपत्र देतील ते खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५४/१२ :**

मुख्यलेखा अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिकेस लागणारे स्वच्छता साहित्य सन ९८-९९ या आर्थिक वर्षासाठी खरेदीस्तव जाहिर निविदा प्रसिध्द करून निविदा दरपत्रके मागविली असता या कार्यालयास एकूण चार निविदा प्राप्त झाल्या.

करिता प्राप्त निविदाधारकांपैकी तीन निविदा धारकांना पत्र देवून विहित मुदतीत आवश्यक कादपत्रांची पूर्तता करणेस कळविण्यात आले परंतु त्यांनी दिलेल्या मुदतीत कागदपत्राची पूर्ततात न केल्याने त्यांना नोटीस देण्यात येवून त्यांची निविदा निकालात काढण्यात आली.

मे. इन्शा ट्रेडींग कं. यांनी कागदपत्रची पूर्तता केल्याने त्याची निविदा ग्राह्य धरण्यात आली. वरील चार निविदाधारकांनी दिलेल्या दरात तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दरात मा. आयुक्त यांना केलेल्या वाटाघाटीनुसार २% कमी दराने साहित्य खरेदीची शिफारस केली आहे.

मे. इन्शा ट्रेडींग कं. यानी वरीलप्रमाणे प्राप्त सर्वात कमी दरात २% कमी दरात साहित्य देणेस मान्य केले असलेने त्यांची निविदा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेस लागणारे स्वच्छता साहित्य सन ९८-९९ या आर्थिक वर्षासाठी खरेदी करण्याकरिता प्राप्त झालेल्या निविदांपैकी कागदपत्रांची पूर्तता केलेल्या निविदाधारक मे. इन्शा ट्रेडींग कं. यांचेशी झालेल्या वाटाघाटीत ठरल्याप्रमाणे २% कमी दराने साहितय खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५/१३ :**

मुख्यलेखा अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, सन ९८-९९ या आर्थिक वर्षासाठी लिखान साहित्य, ड्रॉईंग साहित्य व कॉम्प्युटर स्टेशनरी खरेदीसाठी जाहिर निविदा वर्तमानपत्रात प्रसिध्द करून निविदा दरपत्रके मागविली असता एकूण सहा निविदा या

कार्यालयास प्राप्त झाल्या. त्यापैकी मे. न्यु भारत स्टोअर्स यांची निविदा कागदपत्रा अभावी स्विकारण्यात आली नाही.

तसेच मा. आयुक्त यांनी संबंधित पाच निविदा धारकांना दरात वाटाघाटीसाठी बोलाविले असता मे रविराज प्रिंटर्स, स्टेशनरी ॲण्ड एक्सरसाईज बुक मॅन्यु कं. हे उपस्थित न राहता पत्र देवून त्यांनी भरलेले पाच आयटम्समध्ये दर नजर चुकीने भरल्याचे व ते दरपत्रकातून वगळ्या बाबत विनंती केली असता मा. आयुक्त यांनी त्यांची निविदा रद्द करून त्याची अनामत रक्कम जप्त करणे बाबत आदेश दिलेने इतर चार निविदा धारकांसोबत झालेल्या वाटाघाटीनुसार त्यांचे प्राप्त तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दरात २% कमी करून निविदा स्विकारण्याची शिफारस केली आहे.

करिता उर्वरित चार निविदाधारकाचे तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दर खालील प्रमाणे त्यांचे नांवासमोर आयटम क्रमांक नुसार दर्शविण्यात आलेले आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | मे. मुरली स्टेशनरी | आयटम क्र. ३, ६, ९, ११, १३, १६, १९, २१, २४, २८, ३२, ३३, ३५, ३८, ४०, ४४, ५०, ६१, ६३, ६९, ८३, ९४, १०३, १०९, ११०, १११, ११३, ११९, १२३, १४०, १४१, १४४, १५०, व १५४ इत्यादी |
| २) | मे. विजय जनरल स्टोअर्स | आयटम क्र. १, ५, ७, १२, १४, १६, १९, २२, २६, २९, ३१, ३४, ३८, ३९, ४१, ४५, ४९, ५७, ५८, ५९, ६०, ६४, ६५, ६६, ९०, ९७, १०२, १०८, ११४, ११८, १२४, १४३, १४४, १४९, १५२, १५३, व १५६ इ. |
| ३) | मे. एम. जे. ट्रडींग कं. | आयटम क्र. २, ४, ८, १०, १५, १७, १८, २०, २३, २५, २७, ३०, ३६, ३७, ४३, ४६, ४७, ४८, ५६, ६२, ६३, ९८,१०६,१०७, १२०, १२१, १२२, १२५, १४२, १४५, १४९, १५१, १५५, इत्यादी |
| ४) | मे. आर. एल दौलताबादकर | आयटम क्र. ५१, ५५, ७०, ७२, ७३, ७५, ७६, ७७, ७८, ७९, ८०, ८२, ८४, ८६, ८७, ८८, ९१, ९२, ९३, १०२, १०४, १०५, ११४, ११५, ११६, ११७, १२८, १२९, १३०, १३१, १३२ इत्यादी |

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९८-९९ या आर्थिक वर्षासाठी लिखान साहित्य, ड्रॉईंग साहित्य व कॉम्प्युटर स्टेशनरी खरेदीसाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी अ.क्र. १ ते ४ च्या निविधारकांचे नांवासमोर दर्शविलेले कमी दराचे आयटम त्यांचेकडून खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६/१४ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, भावसिंगपुरा शाळेजवळ उद्यान विकास करणेच्या कामाचे अंदाजपत्रकास दि. १७-१२-९७ च्या स्थायी समितीत ठराव क्र. ३७५/६ अन्वये मान्यता घेण्यात येऊन कार्यालयीन निविदा सूचना क्र. जा. क्र. मनपा/ लेखा/ नि./६/९८ दि. २३-०३-९८ रोजी प्रसिध्द करून निविदा मागविली असता कोरे निविदा विक्री दि. ३१-०३-९८ पर्यंत (१३) तेरा विकले गेले व स्विकृतीची दिनांक १३-०४-९८ रोजी (४) चार प्राप्त झाले तया दि. २१-०४-९८ रोजी उपस्थितीत गुत्तेदारा समक्ष मा. मुख्य

लेखाधिकारी यांचे दालनात उघडण्यात आले असता प्राप्त निविदेचे तुलनात्मक वर्गीकरण खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | प्राप्त दर |
|---|---|---|
| १) | मल्ल एंटरप्रायजेस | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २६.१८% कमी दराचे दर. |
| २) | म्यॅथू इे. आय. | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.२००% कमी दराचे दर. |
| ३) | परफेक्ट कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.८६% कमी दराचे दर. |
| ४) | फाईव्हस्ट्रार कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २८.१०% कमी दराचे दर. |

सबब प्राप्त निविदेत तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच गुत्तेदार श्री. मल्ल एंटरप्रायजेस यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २६.१८% कमी दराचे दर प्राप्त आहे. तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा विचारार्थ तथा स्विकृतीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भावसिंगपुरा शाळेजवळ उद्यान विकासीत करण्याच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा २६.१८% कमी दराची श्री. मल्ल एंटरप्रायजेस यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५७/१५ :**

मालमत्ता अधिकारी यांनी मा. आयुक्त यांच्या मंजुरीनुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सचिव प्रयाग महिला शिक्षण प्रसारक मंडळ प्रज्ञा जागृती विद्यालय यांनी अर्ज दिला आहे की, सदरील संस्थेची नोंदणी क्र. ३०८८ असून शाळा चालविण्यासाठी शासनाची परवानगी आहे. आमच्या शाळेच्या जागेच्या लगत महानगरपालिकेची १२X६० फुट आकाराची जागा शाळेतील विद्यार्थ्यांना डब्बा, खेळ, वाचनालयसाठी तसेच शिक्षकांना बसण्यासाठी अभ्यासासाठी सदर जागा नामपात्र भाड्याने संस्थेस द्यावी बाबत पत्र दिले आहे.

दिनांक १६-०१-९७ च्या मा. आयुक्त यांच्या परिपत्रकानुसार मा. शहर अभियंता नगररचना विभागाचा अभिप्राय घेण्यात आला (सदर जागेवर काहीही काम प्रस्तावित नाही. अनियमित लाबपट्टी स्वरुप असून वि. नि.नि. व आर-२ झोन विचारात घेता बिलडेबल) नसल्याने त्या जागेचा फक्त खुली जागा म्हणून वापर करण्याचे व भविष्यात बांधकाम न करता अथवा एफ.एस.डी. करिता ह्या जागेचा विचार न करण्याचे अटीवर उक्त जागा रु. १००/- प्रति चौ. मी. प्रति वर्षे या दराने देण्याची शिफारस केली आहे. फक्त विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी वावरण्याच्या अटीवर व वरिल अटी-शर्ती व नेहमीच्या अटी-शर्तीनुसार सदर जागा भाडे तत्वावर दिर्घ मुदतीवर देण्याबाबत प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रयाग महिला शिक्षण प्रज्ञा जागृती विद्यालय संस्थेस त्यांच्या शाळेलगत असलेली १२X६० फुट आकाराची महानगरपालिकेची जागा फक्त विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी वापरण्याच्या अटीवर तसेच भविष्यात बांधकाम न करता अथवा एफ.एस.डी. करिता ह्या जागेचा विचार न करण्याचे अटीवर नाममात्र रु. १००/- प्रति चौ.

मीटर प्रति वर्ष या दराने दिर्घ मुदतीकरिता भाडेतत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८/१६ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. इंदिरानगर बायजीपुरा स्लम येथे ५ गल्लीत शहाबाद फरशी बसविणे बाबत कामाकरिता सा. बां. खाते यांच्या वर्षे ९६-९७ च्या दरसूचीनुसार रुपये ९,६५,८००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम "खांडकी रस्ते या शिर्षकातून" करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. १६-०६-९८ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे. व स्थायी समिती समोर सादर करण्यास आदेशित केले आहे.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेले रुपये ९,६५,८००/- चे अंदाजपत्रकास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे इंदिरानगर बायजीपुरा स्लम येथे ५ फुटाचे गल्लीत शहाबाद फरशी बसविणे च्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ९,६५,८००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९/१७ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनि:सारण यांनी मोतीकारंजा जाफरगेट येथे नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता अंदाजपत्रक र. रु. ९,४४,०००/- चे परिसर अभियांत्रिकीच्या सन ९७-९८ च्या दरसूचीनुसार तयार करण्यात आलेले आहे. सदरील काम लेखाशिर्षक "नाला ट्रेनिंग" ९७-९८ यातून प्रस्तावित केले आहे. मा. आयुक्तांनी सदरील प्रस्तावास दि. १७-०६-९८ ला प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. तरी प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोतीकारंजा जाफरगेट येथे नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. ९,४४,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०/१८ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सदर केला की, संत एकनाथ सोसायटी येथे उद्यान विकास करणे बाबतचे अंदाजपत्रक तयार करून त्यास स्थायी समिती ची दिनांक ०१-१२-९७ ठराव क्र. २७४/५ अन्वये मान्यता प्राप्त करून कार्यालयीन निविदा सूचना जा.क्र. मनपा/लेखा/नि/६/६८ दि. २३-०३-९८ रोजी प्रसिध्दी करून "ब-१" नमुन्यात निविदा मागवली असता कोरे निविदा विक्री दि. ३१-०३-९८ पर्यंत (१७) सतरा विकले गेले व दर भरून सिलबंद पाटीटात स्विकृतीची दि. १३-०४-९८ पर्यंत (२) प्राप्त झाले. त्या उपस्थित गुत्तेदार समक्ष दि. २१-०४-९८ रोजी लेखाधिकारी यांचे दालनात उघडण्यात आले या अनुषंगाने प्राप्त दराचे विश्लेषन खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | न्यु. सुपर कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराचे दर |
| २) | एस. ए. नवाब | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराचे दर |

सदर निविदेत तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणेच गुत्तेदार श्री. न्य सुपर कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दराचे दर प्राप्त आहे. परंतु सदरील एजन्सी सोबत मा. आयुक्त यांचे दालनातम दि. १६-०६-९८ रोजी दराबाबत वाटाघाटी करण्यात येऊन ५% कमी दराने काम करण्यासाठी मा. आयुक्त व एजन्सीने दि. १६-०६-९८ रोजी मान्यता दिली आहे.

सबब सदर कामासाठी गुत्तेदार श्री. सुपर कन्स्ट्रक्शन एजन्सीचे अंदाजपत्रकीय दरोपक्षा ५% कमी दराची निविदा मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संत एकनाथ सोसायटी येथे उद्यान विकास करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम मे. सुपर कन्स्ट्रक्शन यांचेकडून अं. प. दरापेक्षा ५% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६१/१९ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सदर केला की, मो. आरेफ कॉलनी येथे मनपा शाळेजवळ उद्यान विकसित करणे बाबतचे अंदाजपत्रकास स्थायी समितीची दिनांक १७-१२-९७ ठराव क्र. ३७२/२ अन्वये मान्यता प्राप्त आहे. सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र. १०/९८ दि. २८-०३-९८ रोजी "बी-१" नमुन्यात निविदा मागवली असता कोरे निविदाविक्री दि. ०३-०४-९८ पर्यंत तीस विकले गेले व दर भरून सिलबंद पाकीटात स्विकृतीच्या अंतिम दि. १५-०४-९८ पर्यंत (३) तीन निविदा प्राप्त झाले. त्या उपस्थित गुत्तेदार समक्ष १६-०४-९८ रोजी मुख्य लेखा अ. यांचे दालनात उघडण्यात आले असता प्राप्त दराचे तुलनात्मक विशलेषण खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | हयात कन्स्ट्रक्यशन | २६.८६% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दर |
| २) | मन्नाव खॉन | २१.२६% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दर |
| ३) | सुजात हाश्मी | २५.९०% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दर |

या अनुषंगाने प्राप्त दरात सर्वात कमी म्हणजेच गुत्तेदार श्री. हयात कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २६.८६% कमी दराचे दर प्राप्त आहे.

सबब प्राप्त निविदेत तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच गुत्तेदार श्री. हयात कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २६.८६% कमी दराची निविदा मान्यतेस्तव तथा विचारार्थ स्थायी समिती समोर सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आरेफ कॉलनी येथे मनपा शाळेजवळ उद्यान विकस करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा २६.८६% कमी दराची श्री. हयात कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२/२० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, रविंद्रनगर शहाबाजार, स्मशानभूमी मध्ये बनींग शेड बांधणे बाबतचे अंदाजपत्रक सा. बां. विभागाच्या सन च्या दरसूचीनुसार

तयार करण्यात येऊन त्यास स्थायी समितीची दि. ०९-१०-९६ च्या अन्वये मान्यता प्राप्त करून निविदा मागविली होते. परंतु त्या ठिकाणी जागेच वाद असलेमुळे तेथे तुर्त काही करता येणार नाही असे मा. आयुक्त यांनी आदेशित केले आहे.

तसेच सदर ठेकेदाराने पत्राद्वारे काम न करणे बाबत कळविले आहे. या मुळे सदर कामाची निविदा मा. आयुक्त यांचे आदेशाने रद्द करण्यात येऊन सुधारित अंदाजपत्रक तसेच सदर ठेकेदाराने पत्राद्वारे काम न करणे बाबत कळविले आहे या मुळे सदर कामाची निविदा मा. आयुक्त यांचे आदेशाने रद्द करण्यात येऊन सुधारित अंदाजपत्रक सा. बां. विभागाचे सन ९७-९८ चे दरसूची अन्वये रक्कम रु. १,४९,६००/- चे तयार करण्यात आले आहे. सदर कामाचा "स्मशानूभमी विकास कार्यक्रम अंतर्गत स्पिल ओव्हर यादीत समावेश आहे.

सबब र. रु. १,४९,६००/- चे अंदाजपत्रक स्मशानभूमी विकास कार्यक्रम अंतर्गत विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रविंद्रनगर शहाबाजार, स्मशानभूमी मध्ये बनींग शेड बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या सुधारित अंदाजपत्रक रक्कम रु. १,४९,६००/- ला सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६३/२१ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, कमी खर्चाच्या स्वच्छता योजना अंतर्गत नविन सौचकुप बसविणे या कामासाठी सर्व साधारण सभामध्ये ठराव क्र. २१४/७ दि. १०-०३-९७ अन्वये र. रु. ४८,३८,०००/- अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदरील काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र. मनपा/नि/१०/९८ दि. २८-०३-९८ अन्वये वर्तमानपत्रात बी-१ निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण (एकवीस) (२१) निविदा विक्री झाल्या निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण सहा (६) निविदा भरून प्राप्त झाल्या त्याचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | मे. एलोरा कन्स्ट्रक्शन | ३२% अं. प. दरापेक्षा कमी दराने |
| २) | मे. एम. एम. कन्स्ट्रक्शन | २७.०० अं. प. दरापेक्षा कमी दराने |
| ३) | श्री. अब्दुल सलीम | २३.९०% अं. प. दरापेक्षा कमी दराने |
| ४) | मे. सामाअर कन्स्ट्रक्शन | २३.००% अं. प. दरापेक्षा कमी दराने |
| ५) | श्री. नंदकुमार घोडेले | २२.९९% अं. प. दरापेक्षा कमी दराने |
| ६) | मे. राणी कन्स्ट्रक्शन | १८.०५% अं. प. दरापेक्षा कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३२% कमी दर हे एलोरा कन्स्ट्रक्शन यांचे आहे. संबंधित गुत्तेदारास जा.क्र. मनपा/ज.नि/१/१७३/९८ दि. २२-०४-९८ अन्वये पत्र देऊन विचारणा केली असता गुत्तेदाराने त्यांचे पत्र दि. २३-०४-९८ अन्वये खुलासा केला आहे की, ३२% कमी दराने देखील सर्व नियम अटीचे पालन करून काम स्पेशीलफिकेशन प्रमाणे करून देण्यात येईल. तसेच गुत्तेदाराचे पत्र दि. ०८-०५-९८ अन्वये त्यांनी पूर्वी अशा प्रकारचा केलेल्या कामाबाबत माहिती दिली आहे.

तरी मे. एलोरा कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३२% कमी दराची निविदा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कमी खर्चाच्या स्वच्छता योजना अंतर्गत नविन सौचकुप बसविणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ३२% कमी दराची मे. एलोरा कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६४/२२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, टाऊन हॉल परिसरात नविन प्रशासकीय इमारत टप्पा क्र. ३ च्या बांधकामासाठी दि. १६-१२-९७ च्या सर्व साधारण सभेमध्ये विषय क्र. १५३/१७ अन्वये इ. रु. २,२८,२५,५३४/- अंदाजपत्रकास मान्यता मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र. मनपा/लेखा/नि/०८/९८ दि. २५-०३-९८ अन्वये प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकूण २३ (तेवीस) निविदा विक्री झाल्या असून निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकूण (८) आठ निविदा दर भरलेल्या प्राप्त णाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | मे. एलोरा कन्स्ट्रक्शन | १०.८०% कमी दराने |
| २) | मे. एस. एफ. कन्स्ट्रक्शन | ०९.९९% कमी दराने |
| ३) | श्री. डी. एस.मोरे | ०७.००% कमी दराने |
| ४) | श्री. अे. सी. कोठारी | ०५.९९% कमी दराने |
| ५) | मे. महेश ॲण्ड कं. | ०१.७५% कमी दराने |
| ६) | मे. के. के. कन्स्ट्रक्शन | ०६.०५% कमी दराने |
| ७) | मे. या. एन्टर प्राईजेस | ११.००% जास्त दराने |
| ८) | मे. ए. बी. सी. कंपनी | ०४.५% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १०.८०% कमी दराने मे. एलोरा कन्स्ट्रक्शन कं. यांची निविदा असून प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे टाऊन हॉल परिसरात नविन प्रशासकीय इमारत टप्पा क्र. ३ च्या बांधकामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा १०.८०% कमी दराची मे. एलोरा कन्स्ट्रक्शन कं. याची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६५/२३ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज. नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, हॉटेल एलोरा ते पैठणगेट पर्यंत ४०० व २५० मी.मी. व्यासाची एम.एस. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९६-९७ च्या दरसूचीनुसार र. रु. १७,३५,६९२/- एवढ्याचे अंदाजप९ाक तयार करून त्यास सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. १४२/६ दि. १५-१२-९७ अन्वये मान्यता घेण्यात आली आहे. त्यानुसार कार्यालयाची निविदा

सूचना क्र. २२/९८ जी. की. दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येवून बी-१ निविदा मागविण्यात आल्या कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण दहा (१०) कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकूण दोन (२) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | शहा कन्स्ट्रक्शन | ०.०५% कमी |
| २) | व्ही. आर. महाजन | १५% जास्त |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दर हा मे. शहा कन्स्ट्रक्शन यांची आहे. म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी असा दर दिलेला असून त्यास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे.

तरी मे. शहा कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराची निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हॉटेल एलोरा ते पैठणगेट पर्यंत ४०० व २५० मी.मी. व्यासाची एम.एस. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अं. प. दरापेक्षा ०.०५% कमी दराची मे. शहा कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६६/२४ :**

उपआयुक्त (प्रशासन) यांनी प्रस्ताव सदर केला की, भारतीय स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या सांगता सभारंभाचे निमित्ताने महानगरपालिकेचे वतीने राष्ट्रीय एकात्मिक संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे. या महोत्सवासाठी श्रीमती आरती अंकलकर शाहीद परवेस, अर्चना जोगळेकर, रशिद खॉन, प्रभाकर कारेकर, श्रीमती संगीता शंकरन, आदी नामवंत संगीत कलावंताना निमंत्रित करण्यात आले आहे. या तीन दिवसांत संगीत महोत्वासाठी एकूण खर्च रक्कम रु. तीन लाख एवढा येत आहे. यात कलावंताच्या जाण्यायेण्याचा खर्च मानधन व कार्यक्रमांच्या अनुषंगाने येणारा खर्च समाविष्ट आहे. तरी च्या अनुषंगाने येणारा सर्व खर्च समाविष्ट आहे. तरी उपरोक्त राष्ट्रीय एकात्मिक संगीत महोत्सव ह्या वयाच्या व तद अनुषंगाने येणाऱ्या रु. ३ लाख खर्चाचा प्रस्ताव स्थायी समिती चे विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भारतीय स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या सांगता सभारंभाचे निमित्ताने महानगरपालिकेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय एकात्मिक संगीत महोत्सवास लागणाऱ्या रक्कम रु. तीन लक्षच्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६७/२५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वि. क्र. २ अंतर्गत कोतवालपुरा, भोईवाडा व इतर मोहल्ल्यातील गल्लीत शहाबाद फरशी बसविण्याचे कामासाठी सन १९९६-९७ च्या सा. बां. खात्याचे डी. एस. आर. दराने अं. प. रक्कम रु. ९,८६,२११/- चे तयार करण्यात आले असून सदरचा खर्च "सुरत पॅटर्न फेस टु फेस" फरशी

बसविणे" या लेखा शिर्षाअंतर्गत ठेवण्यात आलेल्या तरतूदीतून करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विभाग क्र. २ अंतर्गत कोतवालपुरा, भोईवाडा व इतर मोहल्ल्यातील गल्लीत शहाबाद फरशी बसविण्याचे कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ९,८६,२११/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६८/२६ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, वि. क्र. २ अंतर्गत मिलकॉर्नर, नारळीबाग नागेश्वरवाडी, पैठणगेट व इतर मोहल्ल्यातील गल्ल्यात शहाबाद फरशी बसविणेच्या कामासाठी सन १९९६-९७ च्या सा. बां. खात्याचे डी. एस. आर. दराने अं. प. रु. ९,९३,२५५/- चे तयार करण्यात आले असून सदरचा खर्च "सुरत पॅटर्न फेस टु फेस" फरशी बसविणे" या लेखा शिर्षाअंतर्गत ठेवण्यात आलेल्या तरतूदीतून करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विभाग क्र. २ अंतर्गत मिलकॉर्नर, नारळीबाग नागेश्वरवाडी, पैठणगेट व इतर मोहल्ल्यातील गल्ल्यात शहाबाद फरशी बसविण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. ९,९३,२५५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६९/२७ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, वि. क्र. ३ अंतर्गत भवानीनगर भागात शहाबाद फरशी बसविणेच्या कामासाठी सन १९९६-९७ च्या सा. बां. खात्याचे डी. एस. आर. दराने अं. प. र. रु. ९,३२,०००/- चे तयार करण्यात आले असून सदरचा खर्च "सुरत पॅटर्न फेस टु फेस फरशी बसविणे" या लेखा शिर्षाकातून करण्यात येईल. करिता अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विभाग क्र. ३ अंतर्गत भवानीनगर भागात शहाबाद फरशी बसविणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ९,३२,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७०/२८ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, वि. क्र. २ अंतर्गत औरंगपुरा, बोहरीकठडा व विविध मोहल्ल्यातील गल्ल्यात शहाबाद फरशी बसविणेच्या कामासाठी सन १९९६-९७ च्या सा. बां. खात्याचे डी. एस. आर. दराने अंदाजपत्रक र. रु. ७,८१,७२२/- चे तयार करण्यात आले असून सदरचा खर्च "सुरत पॅटर्न फेस टु फेस फरशी बसविणे" या लेखा शिर्षाअंतर्गत ठेवण्यात आलेल्या तरतूदीतून करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विभाग क्र. २ अंतर्गत औरंगपुरा, बोहरीकठडा व विविध मोहल्ल्यातील गल्ल्यात शहाबाद फरशी बसविणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. ७,८१,७२२/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७१/२९ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, वि. क्र. १ अंतर्गत जयसिंगपुरा, मुर्गीनाला, लोटाकारंजा, बुढीलेन व इतर मोहल्ल्यातील गल्ल्यात शहाबाद फरशी बसविणेच्या कामासाठी सन १९९६-९७ च्या सा. बां. खात्याचे डी. एस. आर. दराने अंदाजपत्रक र. रु. ८,४७,२८४/- चे तयार करण्यात आले असून सदरचा खर्च "सुरत पॅटर्न फेस टु फेस फरशी बसविणे" या लेखा शिर्षाअंतर्गत ठेवण्यात आलेल्या तरतूदीतून करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विभाग क्र. १ अंतर्गत जयसिंगपुरा, मुर्गीनाला, लोटाकारंजा, बुढीलेन व इतर मोहल्ल्यातील गल्ल्यात शहाबाद फरशी बसविणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ८,४७,२८४/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७२/३० :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, विभाग क्र. ३ अंतर्गत दादा कॉलनी, आजम कॉलनी व नेहरूनगर येथे शहाबाद फरशी बसविणेच्या कामासाठी सन १९९६-९७ च्या सा. बां. खात्याचे डी. एस. आर. दराने अंदाजपत्रक र. रु. ९,५६,०००/- चे तयार करण्यात आले असून सदरचा खर्च "सुरत पॅटर्न फेस टु फेस फरशी बसविणे" या लेखा शिर्षाअंतर्गत ठेवण्यात आलेल्या तरतूदीतून करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विभाग क्र. ३ अंतर्गत दादा कॉलनी, आजम कॉलनी व नेहरूनगर येथे शहाबाद फरशी बसविणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ९,५६,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७३/३१ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर केला की, गणेश कॉलनी, आलमगीर कॉलनी, काचीवाडा, विभाग क्र. ३ अंतर्गत शहाबाद फरशी बसविणेच्या कामासाठी सन १९९६-९७ च्या सा. बां. खात्याचे डीएसआर दराने अंदाजपत्रक र. रु. ९,९४,०००/- चे तयार करण्यात आले असून सदरचा खर्च "सुरत पॅटर्न फेस टु फेस फरशी बसविणे" या लेखा शिर्षाकाअंतर्गत ठेवण्यात आलेल्या तरतूदीतून करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गणेश कॉलनी, आलमगीर कॉलनी, काचीवाडा, विभाग क्र. ३ अंतर्गत शहाबाद फरशी बसविणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ९,९४,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७४/३२ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, वि क्र. ३ अंतर्गत मकसूद कॉलनी, करीम कॉलनी, मुजीब कॉलनी भागात शहाबाद फरशी बसविणेच्या कामासाठी सन १९९६-९७ च्या सा. बां. खात्याचे डी. एस. आर. दराने अं. प. र. रु. ९,९३,०००/- चे तयार करण्यात आले असून सदरचा खर्च "सुरत पॅटर्न फेस टु फेस फरशी बसविणे" या लेखा शिर्षाअंतर्गत ठेवण्यात आलेल्या तरतूदीतून करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विभाग क्र. ३ अंतर्गत मकसूद कॉलनी, करीम कॉलनी, मुजीब कॉलनी भागात शहाबाद फरशी बसविणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. ९,९३,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७५/३३ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, विभाग क्र. ३ अंतर्गत शहाबाजार, चाऊस कॉलनी, बारी कॉलनी इ. भागात शहाबाद फरशी बसविणेच्या कामासाठी सन १९९६-९७ च्या सा. बां. खात्याचे डीएसआर दराने अंदाजपत्रक र. रु. ९,९०,०००/- चे तयार करण्यात आले असून सदरचा खर्च "सुरत पॅटर्न फेस टु फेस फरशी बसविणे" या लेखा शिर्षकाअंतर्गत ठेवण्यात आलेल्या तरतूदीतून करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विभाग क्र. ३ अंतर्गत शहाबाजार, चाऊस कॉलनी, बारी कॉलनी इ. भागात शहाबाद फरशी बसविणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. ९,९०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७६/३४ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, वि. क्र. १ अंतर्गत प्रगती कॉलनी, शांतीपुरा, बेगमपुरा, व इतर मोहल्ल्यातील गल्ल्यामध्ये शहाबाद फरशी बसविणेच्या कामासाठी सन १९९६-९७ च्या सा. बां. खात्याचे डी.एस.आर. दराने अंदाजपत्रक र. रु. ९,११,२००/- चे तयार करण्यात आले असून सदरचा खर्च "सुरत पॅटर्न फेस टु फेस फरशी बसविणे" या लेखा शिर्षाअंतर्गत ठेवण्यात आलेल्या तरतूदीतून करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विभाग क्र. १ अंतर्गत प्रगती कॉलनी, शांतीपुरा, बेगमपुरा, व इतर मोहल्ल्यातील गल्ल्यामध्ये शहाबाद फरशी बसविणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. ९,११,२००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७७/३५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, लक्ष्मीवाडी पदमपुरा येथे माता मंदिरासमोर खांडकी व शहाबाद फरशी बसविणेच्या कामासाठी सन १९९६-९७ च्या सा. बां. खात्याचे डी.एस.आर. दराने अंदाजपत्रक र. रु. १,५५,६५०/- चे तयार करण्यात

आले असून सदरील खर्च सन १९९८-९९ च्या भांडवली रस्ते (खांडकी) मध्ये ठेवण्यात आलेल्या तरतूदीतून करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे लक्ष्मीवाडी पदमपुरा येथे माता मंदिरासमोर खांडकी व शहाबाद फरशी बसविणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. १,५५,६५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७८/३६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पदपाणी कॉलनी येथे फरशीचे काम करणेबाबतच्या कामासाठी सन १९९६-९७ च्या सा. बां. खात्याचे डी.एस.आर. दराने अंदाजपत्रक र. रु. १,११,२२०/- चे तयार करण्यात आले असून सदरचा खर्च १९९७-९८ च्या "नविन खांडकी रस्ते" मध्ये ठेवण्यात आलेल्या तरतूदीमधून करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पदपाणी कॉलनी येथे फरशीचे काम करणेकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. १,११,२२०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७९/३७ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. मुकूंदवाडी (शिवाजी कॉलनी) येथील संतोष किराणा स्टोअर्स व त्या बाजुच्या गल्लीत ३०० एमएम अर्धगोलाकार गटार बांधणेच्या कामाकरिता अं. प. रक्कम रुपये १,०७,३७४/- सा. बां. विभाग ची दरसूची ९६-९७ नुसार तयार करण्यात आली असून मा. आयुक्तांनी दि. १९-०६-९८ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

सदर काम १८ खेडी विकास योजना ९८-९९ अंतर्गत करण्यांचे प्रस्तावित आहे. करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. मुकूंदवाडी (शिवाजी कॉलनी) येथील संतोष किराणा स्टोअर्स व त्या बाजुच्या गल्लीत ३०० एमएम अर्धगोलाकार गटार बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. १,०७,३७४/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८०/३८ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. गारखेडा (गांव) येथे रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे अंदाजपत्रक र.रु. ९,८९,५००/- चे सा. बां. विभाग यांची दरसूची ९७-९८ अनुसार तयार करण्यात आले असून मा. आयुक्तांनी दि. १९-०६-९८ ला मान्यता प्रदान केली आहे. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सदर काम १८ खेडी विकास योजना ९८-९९ या शिर्षाअंतर्गत करण्यांचे प्रस्तावित आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. गारखेडा (गांव) येथे रस्त्याचे डांबरीकरण कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. ९,८९,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८१/३९ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी चिकलठाणा पुष्पक गार्डन खडी रस्ते तयार करणेच्या कामाकरिता र. रु. १,४६,८७३/- चे अंदाजपत्रक सा. बां. विभाग औरंगाबाद यांची दरसूची १९९७-९८ अनुसार तयार करण्यात आले असून मा. आयुक्तांनी दि. १९-०६-९८ ला मान्यता प्रदान केली आहे. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर. सदर काम १८ खेडी विकास योजने अंतर्गत अर्थसंकल्प ९८-९९ मधून करण्यांचे प्रस्तावित आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पुष्पक गार्डन खडी रस्ते तयार करणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. १,४६,८७३/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८२/४० :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, आंबेडकरनगर येथे दगडी गटार बांधणेच्या कामाकरिता अंदाजपत्रक रक्कम रु. ३,८५,३३१/- सा. बां. विभागाचे दरसूची ९६-९७ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. सदर काम गलिच्छवस्ती सुधारणा ९८-९९ प्रस्तावित आहे. प्रस्ताव

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आंबेडकरनगर येथे दगडी गटार बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. ३,८५,३३१/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८३/४१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. श्रीनिकेतन कॉलनी येथे वाचनालय बांधावयाचे आहे. त्यासाठी सा. बां. खात्याचे सन ९६-९७ च्या जिल्हा दरसूचीनुसार ९,८५,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. त्यास मा. आयुक्तांनी रेखांकना अंतर्गत सभासदांची आवश्यक एन. ओ. सी. घेऊन मगच कार्यादेश द्यावा. या अटीवर दि. २५-०६-९८ रोजी मान्यता दिलेली आहे. उपरोक्त कामाचा खर्च सन ९८-९९ च्या वाचनालय व उर्दू वाचनालय या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात येईल तरी रक्कम रु. ९,८५,०००/- चे अंदाजपत्रक विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्रीनिकेतन कॉलनी येथे वाचनालय बांधण्याचे कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. ९,८५,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८४/४२ :**

कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. इंदिरानगर बायजीपुरा (उत्तर) स्लम भागात खडी रस्ते तयार करणे व खांडकी बसविणेच्या कामाकरिता

सा. बां. खात्याच्या वर्ष ९६-९७ च्या दरसूचीनुसार रु. ५,२३,९००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम "खडी रस्ते" या शिर्षकातून करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. १९-०६-९८ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे. तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेले रु. ५,२३,९००/- चे अंदाजपत्रकास प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. इंदिरानगर बायजीपुरा (उत्तर) स्लम भागात खडी रस्ते तयार करणे व खांडकी बसविणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. ५,२३,९००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८५/४३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, हॉटेल वेदांत ते एकनाथनगर रोडवर मिनी शॉपिंग सेंटर बांधावयाचे आहे. या कामासाठी रक्कम रु. १०,६६,३०३/- चे अंदाजपत्रक तयार करून मा. सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव मंजुरीस्तव ठेवले असता सर्वसाधारण सभेने ठराव क्र. ३७/३४ दि. २१-०६-९७ अन्वये मंजुरी दिलेली आहे. सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना जा.क्र. मनपा/लेखा/नि/५७/९७ दि. ०८-०९-९७ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (१९) निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (५) निविदा दर भरून प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. आर. बी. चव्हाण | १७% कमी दराने |
| २) | मे. हायवे कन्स्ट्रक्शन | ७.९९% कमी |
| ३) | श्री. एस. एम. मंडोरे | ४.५०% कमी |
| ४) | श्री. शेख मसूद | ३.८५% कमी |
| ५) | मे. कम्फर्ट कन्स्ट्रक्शन | १६.८६%`कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा दर श्री. आर. बी. चव्हाण यांची १७% कमी दराची निविदा दि. २६-१२-९७ च्या स्थायी समितीमध्ये मंजुरीस्तव पाठविली असता सदरील कामासाठी पुन्हा दरपत्रके मागवावीत असा ठराव पास करण्यात आला मा. मुख्य लेखाधिकारी यांनी नमूद केलेल्या बाबींचा विचार करता व मा. आयुक्त यांचे दिनांक १७-०४-९८ च्या आदेशानुसार सदरील प्रस्ताव स्थायी समितीपुढे फरे विचारार्थ सादर करण्यात येत आहे. त्यानुसार श्री. आर. बी. चव्हाण यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७% कमी दराची निविदा फेर विचारार्थ सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**शहरअभियंता :** या प्रस्तावाच्या संदर्भात त्यावेळी १९ निविदा विकल्या गेल्या होत्या. पैकी ५ निविदा प्राप्त झाल्या. त्यातून गुत्तेदार श्री. आर. बी. चव्हाण यांचे १७% कमी दराने भरले असून फेरनिविदा मागविले असता संबंधिताने भरले आहे. त्यानुसार विचार करावा. व त्याचे काम समाधानकारक आढळले नाही तर नियमाप्रमाणे कार्यवाही करता येईल.

**मा. सभापती :** सदरील प्रस्ताव पुन्हा पुर्ननिविदा मागवून करण्यांत यावा.

**ठराव :**

हॉटेल वेंदांत ते एकनाथनगर रोडवर मिनी शॉपिंग सेंटर बांधणेच्या कामाकरिता पुर्ननिविदा मागविण्यात याव्यात असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ८६/४४ :**

मा. कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. इंदिरानगर बायजीपुरा (स्लम) येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेचे कामाचे अं. प. रक्कम रु. २५,७२,७६७/- सा. बां. दरसूची सन ९५-९६ नुसार तयार करण्यात येऊन या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेब यांनी दि. ०६-०७-९६ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली होती. तदनंतर सर्वसाधारण सभेने दि. १९-८-९६ रोजी विषय क्र. १६ अन्वये मंजुरी दिल्यानंतर या कामाचा कार्यालयीन निविदा सूचना दिनांक ०९-१०-९६ प्रमाणे निविदा काढण्यात आली असता सर्वात कमी म्हणजेच अं. प. दरापेक्षा १७.९९% कमी दराने आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांची निविदा प्राप्त झाली. या निविदेस स्थायी समितीने विषय क्र. १६ दि. ०७-०१-९८ अन्वये मंजुरी दिली आहे.

काम प्रगथीपथावर असताना या वॉर्डाच्या स. नगरसेविका यांनी विनंती केल्यानुसार व वॉर्डातील नागरिकांनी अंतिक्रमीत ओटे तोडल्याने सांडपाणी ड्रेनेजला जोडून घेतल्याने तसेच रस्त्यावरील नळाचे पाण्यास्तव केलेले खड्डे भरून घेतल्याने तसेच रस्त्यावरील नळाचे पाण्यास्तव केलेले खड्डे भरून घेतल्याने व फेस टु फेस डांबरीकरण स्वच्छ औरंगाबाद योजनेप्रमाणे करून घेतल्याने सध्याचे दर वाढलेले असल्याने तसेच या कामाचे गुत्तेदार हे वाढीव काम मुळ मंजूर निविदा दरातच काम करण्यास तयार असल्याने, मनपाचा आर्थिक फायदा होत असल्याने वाढीव कामाचे दुरुस्त अंदाजपत्रक र. रुपये ३०,१६,५२१/- मंजुरीस्तव व सदरील काम मंजूर निविदा ठेकेदार श्री. आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांचेकडून मंजूर निविदा दराप्रमाणे १७.९९% कमी दराने करून घेण्यास्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. इंदिरानगर बायजीपुरा (स्लम) येथे रस्त्याचे डांबरीकरण करतांनाच नगरसेविकांच्या मागणीनुसार वॉर्डातील डांबरीकरणाचे काम फेस टु फेस करून घेतल्याने कामात वाढ होऊन पूर्वीचे रु. २५,७२,७६७/- ऐवजी दरुस्त अंदाजपत्रक र. रु. ३०,१६,५२१/- ला त्याचप्रमाणे वाढीव काम मुळ कामाचे ठेकेदार मे. आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांचेकडून मंजूर निविदा दर रु. १७.९९% अं. प. दरापेक्षा कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८७/४५ :**

शिक्षणाधिकारी यांनी प्रस्ताव सदर केला की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर गणवेश सहाय्य योजना अंतर्गत पांढरा शर्ट, खाकी हॉफपॅन्ट, निळा स्कर्ट, ब्लाऊज, शर्ट/ सलवार मनपा च्या सर्व शालेय विद्यार्थ्यांना वरीलप्रमाणे गणेवश शिलाई करून पुरवठा करावयाचे आहेत. सदर गणवेश कापड खरेदीसाठी दै. लोकमत, दै. तरुण, दै. सामना, दै. रहेबर, या स्थानित वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या. अकरा पुरवठा धारकांच्या निविदा नमुन्यासह प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा व नमुने मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. सभापती, मा. विरोधीपक्ष नेता, मा. आयुक्त, उपआयुक्त (प्र.) मुख्य लेखाधिकारी, शिक्षणाधिकारी यांनी दि. २५-०६-९८ रोजी सर्वानुमते प्राप्त दरपत्रकातील कापडाचे नमून व इतर दर लक्षात घेऊन खालील नामंकित नमुन पसंत केलेले आहे.

| | | |
|---|---|---|
| | | प्रति मीटर दर |
| १) | खाकी कापड (मक्तलाल) | ८४.५० मे. कामधेनू |
| २) | निळे कापड (एस. कुमार) | ८४.०० साजन सरिता |
| ३) | पांढरे कापड (मक्तलाल) | २९.८० मे. कामधेनू |

निविदेमध्ये नमूद करण्यात "कामधेनू" योजने अंतर्गत (शासन निर्णय क्र. जीइएन/१०९५/१६२/३४५/ दि. १३-०७-९५ नगर विकास विभाग) ५०% काम मे. महिला आर्थिक विकास महामंडळ, मर्यादित यांना देणे आवश्यक आहे. "कामधेनू" योजनेच्या अटीनुसार वरील निवड केलेले कापड निर्धारित कंपनीचेच व त्याच दरानुसारपुरवठा करणे बंधनकारक राहील.

खरेदी करावयाचे कापडाचा तपशील याप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | खाकी कापड ७२०० मी. X ८४.१० | रु. ०६,०६,९६०/- |
| २) | निळे कापड १८८७५ मीटर्स X ८४.०० | रु. १५,८५,५००/- |
| ३) | पांढरे कापड ४८५०० मीटर्स X २९.८० | रु. १४,४५,३००/- |
| | | **रु. ३६,३७,७६०/-** |

वरीप्रमाणे ३६,३७,७६०/- रुपये खर्चाचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर. कापडाची प्रत निविदेमध्ये निर्देशित केलेल्या वर्णनानुसार शासकीय प्रयोग शाळेमार्फत तपासून घेण्यात येईल व तद्‌नंतर त्याचे देयक अदा करण्यात येईल सदरचा खर्च डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी गणवेष सहाय्यक योजना ९८-९९ या लेखा शिर्षा अंतर्गत करण्यात येईल. प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. संजय जोशी :** माझ्या मते सिंगल पन्नाचा कापड शाळेतील मुलांसाठी गणवेष खरेदीसाठी केल्यास योग्य राहील. कारण मुलांच्या गणेवषासाठी निळे कापड व खाकी कापड आपण जे खरदी करित आहोत १८८७५ मीटर्स व ७२०० मी. रु. ८४/- च्या दराने हाच कपडा इतर दुकानदाराकडून फक्त सिंगल पन्नाचा रु. ३८ प्रमाणे बाजारातून मिळू शकतो. म्हणेच डबल म्हणजे दुप्पट नाही. २० से. मी. चा फरक असतो सिंगल पन्न्याचा कापड घेतला तर विमलचे २८३१३ मीटर रु. १०,७५,८९४/- पडेल म्हणजेच विमल कंपनीचा कापड खरेदी करावयाचे झाल्यास एकूण ठरलेला किंतीपेक्षा जवळपास रु. ५.०० लाख मनपा जास्त देणार आहे. त्यामुळे सदरील प्रस्तावाबाबत फेरविचार व्हावा. किंवा इतर ठिकाणी हाच कपडा कमी किंमतीत मिळतो काय याची सविस्तर पाहणी करावी. कारण रु. ५.०० लाखाचे मनपा अधिक किंमत देत असून त्यामध्ये आणखी जास्त कपडा आपल्याला उपलब्ध होऊ शकतो.

**शिक्षणाधिकारी :** शाळेतील विद्यार्थ्यांना दरवर्षीप्रमाणे गणवेष वाटप करावयाचा आहे. त्यासाठी सदरील प्रस्ताव असून सिंगल व डबल याप्रमाणे हिशेब आखुनच समितीने निर्णय घेतलेला आहे.

**श्री. संजय जोशी :** मुलींच्या गणेवषासाठी स्कर्टसाठी डबल पन्नाचा कापड आपण घेता काय? याची माहिती द्यावी. जर हा डबल पन्नीचा कपडा न घेतल्यास अंदाजे रु. ५.०० लाखाचा खर्च मनपाचा कामे होईल. याबाबत विचार व्हावा.

**मुख्यलेखाधिकारी :** प्रस्तावातील खरेदी करावयाचे निळे कापड हे एस कुमार कंपनीचे आहेत व खाकी आणि पांढरे कापड मफतलालचे आहेत व चांगल्या दर्जाचे असून निपड समितीमार्फत कार्यवाही झाली आहे.

**श्री. संजय जोशी :** मी केलेल्या सुचनेप्रमाणे विचार व्हावा. नसता माझा विरोध सदरील प्रस्तावास आहे. अशी नोंद घ्यावी.

**मा. सभापती :** १) सदरील प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.
२) बालवाडी येथील मुला मुलींना गणवेष द्यावयाचे झाल्यास रु. नगरसेवकांनी त्यांच्या स्वेच्छा निधीतून रु. ५०००/- पर्यंतचा निधी फक्त मनपातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यासाठी करण्यात यावा. याच बरोबर मंजुरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर गणवेश सहाय्य योजने अंतर्गत पांढरा शर्ट, खाकी हॉफपॅन्ट, निळा स्कर्ट, ब्लाऊज, शर्ट/ सलवार महानगरपालिकेच्या सर्व शालेय विद्यार्थ्यांना गणेवश शिलाई करून पुरवठा करण्याकरिता गणवेशाचे कापड खरेदीकरिता मागविण्यात आलेल्या निविदापैकी मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. सभापती, मा. विरोधीपक्ष नेता, मा. आयुक्त, उपआयुक्त (प्र.) मुख्य लेखाधिकारी व शिक्षणाधिकारी यांची निवडलेल्या कापडाचे नमून संबंधित पुरवठा धारकांनी दिलेले खालील तपशीलाप्रमाणे कापड खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| | | |
|---|---|---|
| १) | खाकी कापड (मफतलाल) | ८४.५० मे. कामधेनू |
| २) | निळे कापड (एस. कुमार) | ८४.०० साजन सरिता |
| ३) | पांढरे कापड (मफतलाल) | २९.८० मे. कामधेनू |

(शासन निर्णय क्र. जीईएन/१०९५/१६२/३४५/ दि. १३-०७-९५ नगर विकास विभाग) नुसार "कामधेनू" योजने अंतर्गत ५० टक्के काम महिला आर्थिक विकास महामंडळास देण्याच्या अटीनुसार खालील प्रमाणेच्या कापड खरेदीस व खर्चास मंजुरी देण्यातयेते.

| | | |
|---|---|---|
| १) | खाकी कापड ७२०० मी. X ८४.१० | रु. ०६,०६,९६०/- |
| २) | निळे कापड १८८७५ मीटर्स X ८४.०० | रु. १५,८५,५००/- |
| ३) | पांढरे कापड ४८५०० मीटर्स X २९.८० | रु. १४,४५,३००/- |
| | | **रु. ३६,३७,७६०/-** |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८८/४६ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद इगाह येथे नमाज पढणेचा चबुतरा विकास करणे बाबतचे अंदाजपत्रक रक्कम रु. ५.२५ लक्ष चे तयार करण्यात येऊन त्यास सर्वसाधारण सभेची मंजुरी ठराव क्र. १९१/१४ दि. २७-०३-९८ मध्ये धोरणात्मक निर्णय घेण्यात येऊन सदर काम मनपा "स्वेच्छा निधीतून" करण्याबाबत मान्यता प्राप्त झाली आहे.

सबब र. रु. ५.२५ लक्ष चे अंदाजपत्रकास व सदर काम मनपा स्वेच्छा निधीतून करण्याचा प्रस्ताव स्थायी समिती समोर विचरार्थ व मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. विकास जैन :** अशा प्रकारचा प्रस्तावावर आम्ही एकत्रित प्रस्ताव मांडल्यास मंजुरी द्यावी लागेल.

**मा. आयुक्त :** या प्रस्तावावर प्रशासनाची भूमिका सर्वसाधारण सभेमध्ये मांडण्यात आली होती. सदरील प्रस्ताव प्रशासकीय अंदाज पत्रकासाठी आलेला आहे. सदरील प्रस्ताव प्रशासकीय अंदाजपत्रकासाठी आलेला आहे. रु. ५.२५ लाखाचे अंदाजपत्रकास मंजुरी मिळाल्यानंतर टेंडर कॉल करून कार्यवाही करण्यात येईल. स. स. श्री. विकास जैन यांनी सूचना केल्या हा प्रस्ताव अगोदर सर्वसाधारण सभेसमोर चर्चेसाठी आल्यानंतर "विशेष बाब" म्हणून मंजुरी मिळाली आहे.

**श्री. संजय जोशी,श्री.गौतम लांडगे :** कोणत्याही प्रकारची पॉलीसी डिसाईड करावयाचे झाल्यास सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव मंजुरीस्तव येतात आता एकदा या प्रस्तावावर सर्वसाधारण सभेने मंजुरी दिलेली आहे. पुन्हा नव्याने मंजुरी घेण्याची आवश्यकता नाही.

**मा. सभापती :** येणाऱ्या सर्वसाधारण सभेसमोर अशा प्रकारचे प्रस्तावाबाबत विशेष बाब म्हणून जशी मंजुरी मिळालेली आहे. तशीच मंजुरी समाजातील बौध्द / शिख / ख्रिश्चन / हिंदु इ. च्या मंदिरासाठी स. नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतून खर्च करण्याची मंजुरी "विशेष बाब" म्हणून करण्याचे पॉलिसी डिसाईड करता येईल.

सदरील प्रस्तावास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद इगाह येथे नमाज पढणेचा चबुतरा विकास करणेच्या कामाकरिता सर्वसाधारण सभेने ठराव क्र. १९१/१४ दि. २७-०३-९८ अन्वये नगरसेवक स्वेच्छा निधीतून काम करण्याची मंजुरी दिल्यानुसार सदर कामासाठीचे र. रु. ५.२५ लक्ष च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८९/४७ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, काळी बावडी कब्रस्थान मोंढा नाका जवळ येथे संरक्षित भिंत बांधणे बाबतचे अंदाजपत्रक रक्कम रु. १,८०,९००/- चे सा. बां. विभागाचे सन १९९६-९७ चे दर सूचीनुसार तयार करण्यात आले आहे. सबब रु. १,८०,९००/- चे अंदाजपत्रकास व सदर काम स्मशान भूमी विकास तरतूदीतून करण्याचा प्रस्ताव स्थायी समिती समोर विचारार्थ व निर्णयास्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे काळी बावडी कब्रस्थान मोंढा नाका जवळ येथे संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,८०,९००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९०/४८ :**

मालमत्ता अधिकारी यांनी मा. आयुक्त यांच्याम मंजुरीनुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की, जिल्हाधिरी ९७/पुरवठा/झुभायो/कावि दि. ०१-०१-१९९८ अन्वये कळविले आहे

की, श्री. पुरुषोत्तम रघुनाथ ठाकून यांना मिलिंद कॉलेज परिसर येथे सुनका भाकर केंद्रासाठी जागा उपलब्ध करून देणे बाबत पत्र दिले आहे.

सदर प्रकरणात नगररचना विभागाकडून अभिप्राय मागविण्यात आला असून पूर्वी देण्यात आलेल्या झुनका भाकर केंद्रानुसार याही प्रकरणात कार्यवाही करावी.

सबब अर्जदाराने मागणी केलेली जागा स्थळ पाहणी केली असता झुणका भाकर केंद्रासाठी १५X८ या आकाराची जागा खालील ठिकाणी दर्शविण्यात आले असून चतुर्थसीमा खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | पूर्वेस | : | शहर बस थांबा मिलिंद हायस्कूल |
| २) | पश्चिमेस | : | छावणी ते विद्यापीठ गेट १०० फुट रुंद रस्ता |
| ३) | उत्तरेस | : | छावणी ते मिल कॉर्नर रस्ता १०० फुट रस्ता |
| ४) | दक्षिणेस | : | मिलिंद हायस्कूल / मिलिंद कॉलेज यांची कुंपन भिंत |

वरील चतु:सिमा मधील जागा १५X८ ची जागा झुनका भाकर केंद्रासाठी देण्यासाठी प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री. पुरुषोत्तम रघुनाथ ठाकून यांना जिल्हाधिरी ९७/पुरवठा/झुभायो/कावि दि. ०१-०१-१९९८ अन्वये सुनका भाकर केंद्रासाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत दिलेल्या पत्रानुसार १५X८ आकारची खालील चतु:सिमेतील मिलिंद कॉलेज परिसर येथील जागा झुणका भाकर केंद्रासाठी देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| | | |
|---|---|---|
| पूर्वेस | : | शहर बस थांबा मिलिंद हायस्कूल. |
| पश्चिमेस | : | छावणी ते विद्यापीठ गेट १०० फुट रुंद रस्ता. |
| दक्षिणेस | : | मिलिंद हायस्कूल / मिलिंद कॉलेज यांची कुंपन भिंत. |
| उत्तरेस | : | छावणी ते मिल कॉर्नर रस्ता १०० फुट रस्ता. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९१/४९ :**

अति. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, आमखास मैदान येथे मागास वर्गीय विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृह बांधण्यात आले आहे. त्याचे विद्युतीकरण करणाचे अंदाजपत्रक रु. २,१०,०००/- चे तयार केले आहे. तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आमखास मैदान येथे मागास वर्गीय विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृह बांधण्यात आले आहे. त्याचे विद्युतीकरणाचे कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. २,९०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

"जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगर सचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
मा. सभापती,
स्थायी समिती,
महानगरपालिका, औरंगाबाद

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.*

**दिनांक १०-०७-९८ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. मा. श्री. जयवंत ओक सभापती स्थायी समिती महानगरपालिका औरंगाबाद यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १०-०७-९८ रोजी स्थायी समिती सभा संपन्न झाली तिचे इतिवृत्त. सभेची सुरुवात "वंदे मातरम्" या गिताने अंदाजे दुपारी ४=०० वाजता झाली. सभेस खालील स.स. तथा अधिकारी वर्ग उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स.स. श्री. प्रभाकर सिताराम विधाते | स. सदस्य |
| २) | स.स. श्री. अ. रऊफ म. अ. माबूद | -//- |
| ३) | स.स. श्री. सय्यद अली मिरा सलामी | -//- |
| ४) | स.स. श्री. संजय जोशी | -//- |
| ५) | स.स. श्री. गांगवे बन्सी तुळशीराम | -//- |
| ६) | स.स. सौ. वाडेकर यशोदा धनंजय | -//- |
| ७) | स.स. श्री. जैन विकास रतनलाल | -//- |
| ८) | स.स. श्री. ढगे नरसिंग मुरलीधर | -//- |
| ९) | स.स. सौ. तळेकर राधाबाई | -//- |
| १०) | स.स. श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | -//- |
| ११) | स.स. श्री. बचाटे राजकुमार (मामा) | -//- |
| १२) | स.स. श्री. विखारोद्दिन पि. खुदबोद्दिन | -//- |
| १३) | स.स. श्री. स. अ. एकबालोद्दिन स. मो. कुतूबुबोद्दिन | -//- |

**संवाद :**

**श्री. राजकुमार बचाटे (मामा) :** स.स. श्री.सुभाष कच्छवाह यांच्या आजी यांचे नुकतेच दु:खद निधन झाले त्यांना सभागृहात श्रध्दांजली वाहण्यात यावी.

**मा.सभापती :** ठिक आहे. सभागृहात ०१=०० मिनिटे श्रध्दांजली वाहण्यात यावी. (सभागृहात ०१=०० मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली वाहण्यात आली.)

**श्री. प्रभाकर विधाते :** प्रकाश गायकवाड या व्यक्तींच्या नांवावर क्रांतीनगर येथील रोडवर टपरी अधिकृतरित्या देण्यात आली व त्यांनी महानगरपालिकेकडे टपरीचे भाडे नियमाप्रमाणे भरणा केलेला असूनही त्यास दिलेल्या टपरीवर श्री. शेगांवकर यांनी कब्जा केलेला आहे. वास्तवित पाहता श्री. गायकवाड यास मनपाने टपरी अधिकृत रितया मंजूर केलेली होती. मात्र दुसऱ्या व्यक्तींने त्याच टपरीवर आपला हक्क सांगितल्याने त्या टपरीबाबत वाद निर्माण झाला आहे. व संबंधितानी मागे उपोषणाची नोटीसही दिलेली होती या सदंर्भाने प्रशासनाने ह्या टपरीबाबत प्रत्यक्ष पाहणी करून दोघांच्या वादात टपरीला सिल लावले. परंतु त्याबाबत प्रशासनाने कार्यवाही काहीही केलेली दिसत नाही. याची माहिती सभागृहाला द्यावी. की, एका सुशिक्षित बेकारास तेथील टपरी मंजूर केलेली असतानांही दुसऱ्यांनी त्यावर अतिक्रमण करण्याचे कारण काय?

**मा. सभापती :** उप आयुक्त प्र. यांनी माहिती द्यावी.

**श्री. संजय जोशी :** माझ्या माहितीप्रमाणे क्रांतीनगर श्री. गायकवाड यांना दिलेल्या टपरीच्या वादामुळे प्रशासनाने त्या टपरीस सिल लावण्याचे आदेशित केलेले होते..

त्याला चार (४) महिने झाले मात्र सिल लावण्यात आलेले नाही. त्यामुळे श्री. गायकवाड यांनी त्या टपरीसाठी आतापर्यंत रु. ४ हजारावर खर्च केलेले असून तो एक गरीब व सुशिक्षित बेकार आहे. त्यासाठी मनपाने त्याच्याकडून टपरी फिसही वसुल केलेली आहे. परंतु अद्यापही मनपाने त्यास टपरी अधिकृतरित्या दिलेली नाही. याबाबत तसे पत्र संबंधितांना देऊन कळविले आहे काय?

**श्री. विकास जैन :** याबाबत प्रशासनाला माहिती आहे किंवा नाही याची माहिती द्यावी.

**मा. सभापती :** उपआयुक्त (प्र.) यांनी माहिती द्यावी.

**उपआयुक्त (प्र) :** क्रांतीनगर येथील रोडवरील एका जागेसाठी श्री. प्रकाश गायकवाड यांनी टपरीसाठी अर्ज केलेला होता. सदरील जागेवर एक टपरी होती. व त्यावर मनपाची सन १९९२ पासून थकबाकी होती. सदरील थकबाकी संबंधितानी पूर्णपणे मनपाकडे भरणा केलेली असल्याने श्री. गायकवाड यांना मनपाने ताबा दिला मात्र त्यांना उपभोग घेता आले नाही. त्याच जागेवर श्री. शेगांवकर यांनी आपला कब्जा अनाधिकृतरित्या करून घेतला. पोलिस केस करण्यात आली. दोन्हींही व्यक्तींच्या वादामुळे प्रशासनाने स्थळ पाहणी केली असता संबंधित टपरीस सिल लावण्याची प्रशासनाने सूचना केली.

**श्री. संजय जोशी** : टपरीसाठी श्री. गायकवाड यांनी बरीच आर्थिक रक्कम खर्च केली व तरीही टपरी त्याच्या ताब्यात नाही. त्यामुळे तो आर्थिक संकटात सापडलेला आहे. रस्त्यावर आलेले कुटुंब आहे. ज्याच्याकडून महानगरपालिकेने भाडे वसूल केले त्यांनाच टपरी द्यावी.

**मा. सभापती :** प्रशासनाने याबाबत नियमाप्रमाणे चौकशी करून ज्याच्या नांवे टपरी आहे व नियमाप्रमाणे पैसा भरणा केलेला असल्यास त्याप्रमाणे कार्यवाही करावी. कुणावर अन्याय होऊ नये. याची प्रशासनाने दखल घ्यावी.

**श्री. स. अली मिरा सलामी :** सन १९९५ पासून शहरातील टपऱ्या ज्या रोडवर बसलेल्या आहे. अश्यांना पत्र दिलेले आहे. टपरी कमेटरीने अहवाल दिल्याप्रमाणे ९५ पूर्वीच्या टपऱ्यांना परवानगी देण्यात येईल असे पत्र दिलेले आहेत. आचारसंहिता नंतर पैसे भरावे असे पत्र दिलेले आहे. सर्वेक्षणाच्या वेळी १९९५ पूर्वीचे असेल अशांना परवानगी देण्यात येईल असे असतांना देखील टपऱ्या उचलून आणल्या ज्यांना पत्र दिलेले आहेत त्यांना टपऱ्या देण्यात यावे.

**मा. सभापती :** टपरी देण्याबाबतचे स्पष्ट धोरण ठरविण्यासाठी पांच लोकांची एक समिती नेमण्याची सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव मांडण्यात येणार आहे. एका व्यक्तींला ४-४ टपऱ्या दिल्या असतील तर ते रद्द करावे फक्त एका व्यक्तीला एकच टपरी द्यावी.

**श्री. स. अली मिरा सलामी :** रस्ता रुंदीकरणातील ८० ते १०० फुट रोडवरील ठिकाणी टपरीसाठी जागा देणार नाही? काही रस्त्यावरील टपरीधारकांना ८० ते १०० फुट रोडवर टपरीसाठी जागा देण्यांत येणार असल्याचे पत्र दिलेले आहे. वाहतुकीस अडथळा येईल. किंवा कसे याबद्दल देखील विचार व्हावा. त्यानुसार प्रशासनाने कार्यवाही करावी. ज्यांनी पैसे भरलेले आहे. त्यांना टपऱ्या देण्यात यावे.

**उप आयुक्त (म.) :** टपरी वाटप संबंधी मागील सर्वसाधारण सभेपुढे ठराव ठेवण्यात आलेला होता. परंतु त्यावर निर्णय झालेला नाही. त्यामुळे ठराव आता होणाऱ्या

सर्वसाधारण सभेपुढे ठराव ठेवण्यात आलेला होता. परंतु त्यावर निर्णय झालेला नाही. त्यामुळे ठराव आता होणाऱ्या सर्वसाधारण सभेपुढे आपोआप येईल. यामध्ये टपरी वाटपासंबंधी ५ अधिकाऱ्याची प्रशासकीय कमेटी व एक पदाधिकारी कमेटीचा प्रस्ताव आहे. ठराव मंजूर झाल्यानंतर टपरी वाटपाची कार्यवाही करण्यात येईल.

**श्री. विकास जैन :** मागील सर्वसाधारण सभेमध्ये ८० ते १०० फुटी रोडवर टपरीसाठी परवानगी देणार नाही असा निर्णय झालेला होता. आणि आता पुन्हा १०० फुटी विकसित रोडवर टपरीसाठी जागा देण्यात येत आहे. ते योग्य नाही. माझ्या वॉर्डात रस्ता रुंदी करणाने बाधित लोकांना टपरीसाठी परवानगी दिलेली आहे ती परवानगी कोणत्या आधारे देण्यात आली मी संबंधित वॉर्डाचा नगरसेवक असून त्याची कल्पना मला नाही. आणि टपरीचे परवानगी मात्र देण्यात आली. माझ्या प्रभागातील लोकांनी अर्ज केल्यास त्यांना देखील त्याच रस्त्यावर टपरीसाठी परवानगी द्यावी.

**सभापती :** स.स. यांनी सूचना केल्याप्रमाणे अशा प्रकारचा त्याच्या वॉर्डातील त्यांना न विचारता टपऱ्या वाटप करणे हे प्रशासनाचे धोरण योग्य नाही.

**श्री. विखारोद्दिन :** ८० फुट आणि १०० फुटी रोडवर देण्यात आलेल्या टपरी परवानगी आता उपआयुक्त (म.) यांनी स्थगित केल्याचे समजले आहे. तेंव्हा संबंधित व्यक्तींना यापूर्वीच परवानगी का दिली अनेक वर्षापासून टपरीचे भाडे थकलेले आहे. बरेच टपरीधारक लोक असे आहेत की एक-एक व्यक्ती ४-५ ठिकाणी परवानगी मिळवून बसत आहे ते स्वत: तेथे बसलेले नाही इतरांना पुन्हा परस्पर भाड्याने दिलेले आहेत. अशा व्यक्तीं बाबत प्रशासनाने कठोर निर्णय घ्यावा. बेरोजगारांना टपरी वाटप करावी.

**मा. सभापती :** एखाद्या ठिकाणी गरीब व होतकरू बेकार तरुणास त्याच्या रोजी रोटी साठी टपरी परवानगी नियमाप्रमाणे त्या त्या भागानुसार द्यावी. परंतु एका व्यक्तींस एकदाच द्यावी. एकाच व्यक्तींच्या नांवे अनेक ठिकाणी परवानगीसाठी अर्ज असल्यास तशा व्यक्तींबाबत पाहणी करून त्यांचेवर नियमाप्रमाणे कार्यवाही करावी व जास्तीच्या टपऱ्या दिल्या असल्यास परवाना रद्द करावा. भाडेवाढ बाबत निर्णय व्हावा.

**श्री. स. अली मिरा सलामी :** सर्वसाधारण सभेमध्ये टपरी संदर्भात मंजुरी मिळालेली आहे. त्यानुसारच कार्यवाही व्हावी व तशी अंमलबजावणी करावी. ज्या लोकांना यापूर्वीच टपरीसाठी परवानगी मिळालेली आहे. त्यांना स्थगिती देण्यात येऊ नये.

**मा. सभापती :** असे लक्षात आले की, शहरात बऱ्याच टपऱ्या दिलेल्या आहेत त्यापैकी काही टपऱ्या एका व्यक्तींच्या नावांवर ४-५ टपऱ्या दिलेल्या आहेत. त्यांचेवर कार्यवाही करावी.

**श्री. प्रभाकर विधाते :** टपरी कमेटीने जो अहवाल सर्व्हे करून दाखल केलेला आहे. सन १९९५ च्या पूर्वी किती टपऱ्या शहरातील व्ही.आय.पी. रोड व्यतिरिक्त बसलेल्या आहेत. त्या बाबतचा असून टपऱ्या देणे बाबतचा नाही.

**मा. सभापती :** या बाबतचा निर्णय सर्वसाधारण सभेमध्ये घेण्यात येईल.

**श्री. स. अली मिरा सलामी :** प्रशासनोने नुकत्याच आता काही कर्मचारी व अधिकाऱ्यांचे बदल्या केलेल्या आहेत. त्यातील काही बदल्या गेल्या १०-१० वर्षापासून जे एकाच ठिकाणी आहेत त्यांच्या बदलया झाल्या नाही. एका वर्षात ३ वेळा

बदल्या झाल्या आहेत या बाबत माहिती द्यावी. म्हणजे ज्यांच्या बदल्या एका वर्षाच्या आंत केलेल्या आहेत तर शिक्षा म्हणून केलेल्या आहेत काय? शासनाचे धोरणानुसार ज्यांना ३ वर्षापेक्षा जादा कालावधी झालेला असेल त्यांच्या बदल्या करण्यास हरकत नाही. बदल्यामुळे काम होत नाही. सुरवातीपासून प्रत्येक बाब सांगावी लागेल.

**मा. सभापती :** प्रशासनोन केलेल्या बदल्यात पदाधिकारी व स. नगरसेवक यांनी कुठल्याही प्रकारची दखल घेऊ नये. फक्त कामे अडू नये. व अडचणी निर्माण होऊ नयेत हा मुख्य हेतू आहे. व प्रशासन त्या नुसार कार्यवाही करते ही प्रशासकीय बाब आहे.

**श्री. संजय जोशी :** झालेल्या बदल्या प्रकारणाची सभागृहाला माहिती आहे काय? एका ठिकाणी जे गेल्या ३ वर्षापेक्षाजी जास्त कालावधीत आहे त्याच्या बदल्या न करता इतरांच्या केल्या गेल्या ही बाब प्रशासनाची योग्य नाही.

**श्री. स. अली मिरा सलामी :** पैठणगेट येथील माझ्या वॉर्डातील काम गेले कित्येक दिवसांपासून रेंगाळते आहे. यांचेमुख्य कारण म्हणजे बदली कारण ज्या कामासाठी याची प्रक्रिया चालू आहे. त्या कामाच्या संदर्भात नेमकी त्याच अधिकाऱ्याचीच बदली होत आहे. व त्यामुळे माझ्या वॉर्डातील नेमके काम रखडून पडत आहे जे नवे अधिकारी येतात त्यांना नव्याने कामाची माहिती घेणे नेहमी नेहमी जागा दाखवावी लागते. समजावून सांगणे यासाठी उशिर लागतो व पर्यायाने कामासाठी तितकाच विलंब लागतो.

**श्री. अब्दुल रऊफ :** गेल्या ६ महिण्यापासून माझ्या वॉर्डातील स्वेच्छा निधीचे कामाबाबत पत्र देऊनही काम होत नाही, यास जबाबदार कोण आहे.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा या संदर्भात मी यापूर्वीच सूचना दिलेल्या आहेत की, एखाद्या स. सदस्यांनी स्वेच्छा निधीचे पत्र दिलेले असल्यास त्यांचे काम ४० दिवसांत करावे.

**श्री. अब्दुल रऊफ :** सदरील कामे ही कोणत्याही वॉर्डाची असोत, परंतु स्वेच्छा निधीचे असल्यास तातडीने व्हावयास पाहिजे. परंतु विद्युत विभागातील कामे जलदगतीने होत नाही. या शिवाय संबंधित अधिकाऱ्यांना हे सुध्दा माहिती नसते की, कोणत्या स. सदस्याचे स्वेच्छा निधीचे काम कोणत्या भागासाठीचे आहे मी दिलेल्या पत्रानुसार सदरील काम हे पानचक्की रोडवरील आहे. अशा प्रकारचे कामे ही ४ स. सदस्यांनी मिळून दिलेले काम असूनही विद्युत उपअभियंता यांनी कार्यवाही केलेली नाही.

**उपअभियंता विद्युत-२ :** संबंधित कामाची मंजुरी मिळालेली आहे. सदरील काम पाहुन कार्यवाही करण्यात येईल.

**मा. सभापती :** कोणत्याही स्वेच्छा निधीची कामे ही ४० दिवसांचे आत होणे आवश्यक आहे. स. सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाप्रमाणे उद्याच कामास सुरुवात होईल तसे प्रयत्न करावेत. कोणत्याही विभागातील जरी स्वेच्छा निधीचे कामे असले तरी संबंधित विभागांची स्थायी समितीच्या निर्णयाची दक्षत घ्यावी. अत्यावश्यक सेवा बद्दलची कामे तात्काळ करावे १०-१५ दिवसांत सर्व लाईट चालू व्हावे सामान आलेले आहे.

**उप अभियंता विद्युत-२ :** ठिक आहे उद्या पसून संबंधित कामास सुरुवात करण्यात येईल.

**श्री. अब्दुल रऊफ, श्री. स. अ. एकबालोदिन :** सामान आलेले नाही. सामान कोठे आहे ते दाखवावे.

**उप अभियंता (विद्युत):** १ लाखाचे ऑर्डर्स देण्यात आलेले आहे. इतर सामान आहे. सोडीयम वेफरचे सामान संपले आहे. २०-२५ बल्ब आहेत. दुसऱ्या कंपनीचा सामान एक आठवड्यात येईल.

**श्री. अब्दुल रऊफ :** कोणकोणते सामान आलेले आहे. त्याबद्दल माहिती द्यावी. लाईनला विचारले त्यांनी सामान आले नाही असे सांगितले.

**श्री. स. अ. एकबालोद्दिन :** मी दररोज सकाळी ९.०० वाजता येतो. परंतु मला सांगितलेले नाही.

**श्री. स. अ. मिरा सलामी :** स्टाफ रजिस्टर मागवून घ्यावे म्हणजे समजून येईल.

**मा. सभापती :** आपण सामान / साहित्य कोणाला देतो आवश्यक त्या पध्दतीचा अवलंब करावा लाईनमनवर कामाची जाबाबदारी टाकावी.

**श्री. स. अ. एकबालोद्दिन** मटेरियल १ लाखाचे आहे की २६ लाखाचे.

**श्री. संजय जोशी :** सभा संपल्यानंतर भांडारात जाऊन चेक करू.

**मा. सभापती :** रजिस्टर मागवून घ्यावे मा. आयुक्त यांनी बदलीच्या संदर्भात माहिती द्यावी.

**मा. आयुक्त :** प्रशासनातील कोणत्याही बदल्या करणे ही प्रशासकीय बाब आहे. श्री. वसंत निकम यांची बदली गेल्या दहा वर्षापासून झालेली नव्हती तर श्री. सिकंदर अली यांची बदली कार्यवाही अभियंता स्लम ची कामे दिल्यामुळे केली गेली. श्री. डी. पी. कुलकर्णी यांना प्रशासकीय कारणास्तव आणि श्री. कलिम अख्तर व श्री. रामटेके यांच्या पाणी पुरवठ्या विभागात पाणी पुरवठा व्यवस्थापन योग्य व्हावे जनहित लक्षात घेवून बदली केलेली आहे.

**श्री. स. अली मिरा सलामी :** पाणी पुरवठ्याच्या विभागातील ज्या बदल्या करण्यात आल्या त्या अधिकाऱ्यांना संबंधित काम जमत नसल्यास त्यांचेवर कार्यवाही का केली नाही. जर एखादे अधिकाऱ्यांना त्याच विभागाचे काम चांगले प्रकारे जमत असल्यास १०-१२ वर्षे तेच अधिकारी काम करीत राहणार काय? याची माहिती द्यावी.

**मा. सभापती :** प्रशासनातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या बदल्या प्रकरणी ही बाब संपूर्णतः प्रशासकीय असल्याने आपण दखल देणे योगय नाही.

**श्री. स. अली मिरा सलामी :** किराडपुरा नं. १ च भागात किती बालवाड्या आहेत याची शिक्षणाधारी यांनी माहिती द्यावी.

**शिक्षणाधिकारी :** किराडपुरा येथे ३ बालवाड्यांची संख्या आहे व कमीत कमी २० व जास्तीत जास्त २५ मुलांची संख्या एका बालवाडीसाठी आहे.

**श्री. स. अली मिरा सलामी :** संबंधित अधिकारी हे चुकीचे व खोटी माहिती सभागृहापुढे देत आहेत.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी चुकीची माहिती सभागृहाला देवू नये, जर माहिती नसेल मुळीच देवू नये.

**श्री. स. अली मिरा सलामी :** किराडपुरा नं. १ येथे ४ बालवाड्या आहेत आणि त्या ठिकाणी ४ बालवाड्या शिक्षिका असून २०-२० मुलांचे ग्रुप पाडून त्या शिक्षिका मुलांना शिकवितात.

**मा. सभापती :** उपआयुक्त (प्र.) यांनी पाहणी करून कार्यवाही करावी.

**श्री. स. अली मिरा सलामी :** खोकडपुरा येथील शाळेत उर्दू माध्यमाची शिक्षकांची मागणी असतांना मराठी माध्यमाचे शिक्षकांची नेमणूक का केली?

**श्री. स. अ. एकबालोद्दिन :** मागील सभेमध्ये मी सूचना केलेली होती का, किराडपुरा उर्दू शाळेमध्ये उर्दू माध्यम मुख्याध्यापकांचे पद असून त्या ठिकाणी मराठी माध्यमाचे मुख्याध्यापकाचे पद भरले आहे. त्यामुळे संबंधिताची तेथून बदली करण्यात यावी.

**उपआयुक्त (प्र) :** माहिती घेऊन बदल्या करण्यात येतील.

**श्री. अ. रऊफ :** मागील सभेमध्ये सिटीचौक रस्ता रुदींकरण बाबतीत कामाक्षी लॉजींग समोरील जागेतील भूसंपादन प्रक्रिये बाबत जो अहवाल दिलेला आहे. त्या बाबत काय झाले?

**उप आयुक्त (म.)**: या बाबतचा अहवाल परिपूर्ण सादर केलेला आहे.

**श्री. तुळशीबागवाले :** नेहरू रोजगार योजना, सुवर्ण जयंती कार्यक्रम गेले एका वर्षापासून चालू आहे. ५०,००० ची योजना आहे त्याप्रमाणे काय कार्यवाही झाली याची सविस्तर माहिती द्यावी.

**प्रकल्प संचालक :** माहे डिसेंबर-९७ पासून नेहरू रोगार योजना बंद पडलेली आहे. आणि नंतर डिसेंबर पासून केंद्र शासनाची सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना सुरू केली असून त्याबाबत प्रथमतः शहरातील दारिद्र्य रेषेखालील लोकांचे सर्व्हेक्षणाचे काम चालू असून मनपा कर्मचाऱ्यांना पर्यवेक्षकांचे काम व बेरोजगारांना सर्व्हेक्षणाचे काम दिलेली आहेत. सर्व्हेक्षण पूर्ण झाल्यानंतर प्रत्यक्षात कार्यवाही करण्यात येईल.

**मा. सभापती :** नेहरू रोजगार योजना शासनाने बंद करून व त्याचे नांव बदलून सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना असे नांव आहे. व त्याद्वारे बेरोजगारांना रु. ५०/- हजाराचे कर्म प्राप्त होते. शहरात सर्वेक्षण चालू आहे. जुलै अखेरपर्यंत सर्वेक्षणाचे काम पूर्ण होईल.

**श्री. संजय जोशी :** सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेसाठी जे सर्व्हेक्षण होऊ घातलेले आहे ते कोणत्या कारणास्तव होत आहे. याची माहिती द्यावी. जेणेकरून कोणत्या भागात होत आहे. स्लम भागासाठीच आहे की, इतर भागातही होणे आहे याची माहिती द्यावी.

**श्री. स.अली मिरा सलामी :** शहरातील सर्व्हेक्षण हे संपूर्ण भागासाठीचे आहे काय? दारिद्र्य रेषेखालील सर्वेक्षणास प्रति रु. ५/- व इतरासाठी रु. १/- जास्त पैसे मिळावे. म्हणून दारिद्र्य रेषेखालील घरांचेच जास्त सर्वेक्षण केले जाते.

**प्रकल्प संचालक :** सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेमध्ये एकंदर शासनाचे निकष ठरलेले होते ते राज्यशासन राबवित आहे. ३ पानाचे पत्र आहे त्यामध्ये तिन निकष लावलेले आहे (१) एका कुटुंबातील एका महिण्याचे दरडोई उत्पन्न रु. ४१९९८ इतके असावे. (२) ज्यांचेकडे रंगीत टिव्ही, कुलर, वाहन व इतर साधन सामुग्री नसेल तर ते दारिद्र्य रेषेत येतात. (३) त्या व्यतिरिक्त बाकीचे दारिद्र्य रेषेवरती राहतील असे सर्वेक्षण करण्यांत येते, एका सर्वेक्षणाचे व्यक्तींस सहा पानाचे प्रपत्र पूर्ण भरणा केल्यास त्यास रु. ५/- मिळतात. सर्व्हेक्षणासाठी असलेल्या बेरोजगारांवर आमचे सुपरवायझर देखरेख करित आहेत. आता सध्या स्लम घोषित असलेल्या झ ाोपडपट्ट्यांमध्ये सर्वेक्षण काम चाूल असून ३६५ प्रगणकांमध्ये विभागून संपूर्ण शहरात सर्वेक्षणाचे काम चालू आहे. सन १९९६-९७ मध्ये कोणत्याही ठिकाणी महाराष्ट्र शासनाने अनुदान दिलेले नाही. जी प्रकरणे प्रलंबित होती व अनुदान शिल्लक होते ती प्रकरणे मंजूर झालेली आहेत. व नेहरू रोजगार

योजना बंद झाल्यापासून चे जे शिल्लक अनुदान राहिलेले असेल ते या योजनेत वळते करण्यांत आलेले आहे. सध्या ४८% एवढे काम सर्वेक्षणाचे पूर्ण झालेले आहे. उर्वरित काम १५ दिवसांत करण्यात येणार आहे. सदरील कामे विभागीय अधिकारी यांचे अधिपत्याखाली पूर्ण होत आहे.

**श्री. विखारोद्दिन :** सिल्क मिल कॉलनीतील स्मशानभूमी व सभागृहाचे बांधकाम बाबत काय कार्यवाही झाली याची माहिती द्यावी. आश्वासन दिले जाते अंदाजपत्रक अद्याप आले नाही.

**शहर अभियंता :** येथील भागातील कामाचे बाबतीत अंदाजपत्रक तयार असून कार्यवाही करण्यात येणार परंतु त्या ठिकाणी जागेचा वाद आहे. परंतु सहाय्यक संचालक नगर रचना यांनी ३ दिवसापूर्वीच माहिती दिली की, काम करता येते.

**श्री. विखारोद्दिन :** नगर रचना विभागाकडून मार्कींग करून दिलेली नाही.

**उप अभियंता (बां)** ज्या जागेवर दवाखाना बांधकाम झालेले आहे. तेथील उर्वरित जागेवर सभागृह बांधकामाचे अंदाजपत्रक २-३ दिवसांत तयार करण्यात येईल.

**श्री. विखारोद्दिन :** कब्रस्तान बाबत काय कार्यवाही झाली.

**शहर अभियंता :** सदरील कामाचे अंदाजपत्रक तयार करून लेखा विभागाकडे सादर करण्यात आलेले आहे.

**मा. सभापती :** दोन्हीही कामाचे अंदाजपत्रक पुढील बैठकीत सादर करावे.

**श्री. विखारोद्दिन :** रेल्वे स्टेशन ओव्हर ब्रिज संदर्भात मंगळवारला मा. महापौर यांचेकडे बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल. असे ठरलेले होते. त्याबाबत काय झाले?

**श्री. स. अली मिरा सलामी :** या बाबत कोणताही निर्णय झालेला दिसून येत नाही.

**मा. सभापती :** याबाबत निर्णय झालेला नाही. परंतु तेथील नागरिकांनी प्रत्यक्षात माझी भेट घेऊन बोलले आहेत.

**श्री. विखारोद्दिन :** परंतु रेल्वे ओव्हर ब्रिजचे काम थांबलेले आहे त्याचे काय? याच संदर्भात श्री. साळवे कुटुंबिय व इतर लोकांना त्या ठिकाणावरून पर्यायी व्यवस्था केलेली होती व त्यांना सर्व सुविधा देऊन १५ दिवसांत निर्णय घेण्यात येईल असे ठरलेले होते. त्याचे काय झाले.

**उप आयुक्त (प्र.) :** पर्यायी व्यवस्थेसंबंधी त्या ठिकाणी लाईट व पाणी पुरवठ्याची व्यवस्था झालेली नाही. दोन दिवसांत या बाबत निर्णय घेण्यात येईल.

**श्री. विखारोद्दिन :** संबंधित लोकांना सुविधा दिल्यानंतरही ते शिफ्ट का होत नाही ते काम महानगरपालिकेचे आहे काय?

**उप आयुक्त (प्र) :** संबंधितांना पर्यायी व्यवस्था केलेली आहे. परंतु लाईट व पापू ची व्यवस्था झालेली नसल्याने शिफ्ट झालेली नाहीत.

**श्री. संजय जोशी :** त्या कुटुबियांना पाण्याची व्यवस्था झालेली नसल्यास एक सार्वजनिक नळ कनेक्शन द्यावे व शिफ्टींग करावे.

**मा. सभापती :** आठ दिवसात त्या ठिकाणी पाणी पुरवठ्याची व्यवस्था करून त्या लोकांना शिफ्ट करावे.

**श्री. विखारोद्दिन :** मागील दोन तीन सभेपासून मी सूचना करीत आहे की, कोटला पाण्याच्या टाकीवर दूरध्वनी का बसविण्यात आलेला नाही.

**मा. सभापती :** संबंधित ठिकाणी तातडीने दूरध्वनीची व्यवस्था करावी.

**श्री. स. अली मिरा सलामी :** इतिवृत्तामध्ये माझ्या नावांचा उल्लेख मिरा सलामी असा होतो. त्या ऐवजी स. अली मिरा सलामी असे व्हावे. त्याचप्रमाणे इतिवृत्तात माझ्या नांवे मा. पालकमंत्री यांचा दबाव आहे असे वाक्य टाकलेले आहे ते मी बोललेलो नसून स. स. श्री. विखारोद्दिन यांनी म्हटलेले आहे. त्यांचे नांवे ते वाक्य असावे अशी दुरुस्ती व्हावी.

**मा. सभापती :** ठिक आहे.

**श्री. विखारोद्दिन :** मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केद्राबाबत काय झाले.

**कार्यकारी अभियंता (स्लम) :** संबंधित कामाचा प्रस्ताव मंजूर झालेला आहे. इतिवृत्त कायम झाल्यानंतर कार्यवाही करण्यात येईल.

**मा. सभापती :** प्रकल्प अधिकारी / समुदाय संघटक व कनिष्ठ लिपीक इ. पदाचे बाबतीत सेवायोजन कार्यालय व समाजकल्याण विभागाकडून याद्या मागविण्यात आल्या त्याबाबत माहिती द्यावी.

**उप आयुक्त (प्र.) :** प्रशासनातील वेगवेगळी पदे दैथ्नक वेतनावर भरणे बाबत समाजकल्याण / सेवायोजन व आदिवासी विकास प्रकल्प इ. कार्यालयाकडून नोकर भरतीसाठी याद्या मागविण्यात आल्या असून त्या फिक्स पगारावर (ठराविक वेतन) असून तात्पुरत्या स्वरुपाच्या आहेत. कायम स्वरुपी नोकरीच्या नाहीत असे स्पष्टपणे याद्या मागवितांना पत्राने संबंधित विभागांना कळविले आहे.

**श्री. संजय जोशी :** नोकर भरतीसाठी याद्या ज्यावेळी मागविल्या आणि संबंधित विभाग कार्यालयांनी पाठविलेल्या असल्यास जर त्यांना कामावर घेतल्यास त्यांची जेष्ठता यादी १०-१२ वर्षाची रद्द होईल. पर्यायाने मनपाची कामे संपल्यानंतर ते लोक पुन्हा बेकार होतील याबाबत काय धोरण आहे.

**मा. सभापती :** महानगरपालिकेमध्ये विविध पदांचे नौकरी बाबत जे अर्ज प्राप्त होतात. उदा धरणग्रस्त, स्वतंत्र सैनिक इ. बाबत अगोदर विचार करावा. त्याचप्रमाणे ज्या पदांच्या याद्या विविध कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या आहेत त्यांना मुलाखती घेऊन त्यातील काही उमेदवारांना नौकरीवर घेतल्यास व त्यांना फिक्स पगारावर (ठरावित वेतन) काही निश्चित कालावधीसाठी घेतल्यास व तो कलावधी संपल्यानंतर त्या उमेदवारांचे पुढील भविष्यात काय होणार? कारण या उमेदवारांची संबंधित विभागाकडून आलेल्या यादीतून जेष्ठता रद्द होईल व तो पुन्हा बेकार राहील. यासाठी प्रशासनाचे स्पष्ट धोरण असणे आवश्यक आहे. या शिवाय जे कर्मचारी सध्या मनपात दैनिक वेतनावर कार्यरत आहेत त्यांना मनपाच्या सेवाजेष्ठतेमध्ये कायम करतांना सामावून घ्यावे. तसेच महानगरपालिकेमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय व मौलाना अबुल कलाम आझाद रिसर्च सेंटर, विविध वाचनालये, दवाखाने, शाळा व इतर काही विभागांमध्ये नविन वर्ग-३ आणि वर्ग-४ ची पदे भरावयाची असल्यास त्या बाबत मागील महिण्यापासून ज्या उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले असतील त्या सर्वांचे विविध पदावरील याद्यामध्ये नांवे समाविष्ट करावे व त्यांना मुलाखतीस बोलवावे.

**मा. आयुक्त :** पदे निर्मिती करून घ्यावी लागेल.

**विषय क्र. ९२/१**

दिनांक २६-०६-९८ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**मा. सभापती :** इतिवृत्तातील पृ.क्र. १५ ठराव क्र. ४३/१ अ.क्र. ५ चे काम कोणही ठेकेदार करायला तयार नाही. पुन्हा निविदा मागविण्यात याव्यात.

**ठराव :**

इतिवृत्तातील पृक्र. १५ ठराव क्र. ४३/१ अ.क्र. ५ चे काम कोणीही ठेकेदार करायला तयार नाही. पुन्हा निविदा (रिकॉल) मागविण्यात याव्यात. या व इतर दुरुस्त्यासह दिनांक २६-०६-९८ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९३/२**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मा. उप महापौर यांचे विनंतीनुसार त्यांच्या वापरांसाठी (डिझेल) ए.सी.कार. घ्यावयाचा असून त्यांच्या वापरांतील सद्याची कार देखील "स्पेअरकार" म्हणून वापतरा येईल व एखादी कार दुरुस्तीमध्ये असली तरी ती कार वापरता येईल.

हिदुंस्थान मोटर्स ह्यां कंपनीचे औरंगाबाद येथील दोन्ही अधिकृत डिलर्स कडून दरपत्रके मागविली असता दोघांची दरपत्रके वसूल झालीत.

| | | |
|---|---|---|
| १) | ॲम्बेसॅडर डिझेल डिलक्स | |
| २००० सी. सी. बकेट सिटर्स,<br>रेडीयल टायर्स, टिन्टेड ग्लास,<br>ए.सी.सी.<br>वरील मॉडेलच्या कारसाठी दर खालीलप्रमाणे आले आहेत. | | |
| १) | मे. भारत इंजिनियरींग कंपनी, औरंगाबाद | रु. ४,३४,३४८=०० |
| २) | मे. कैलास मोटर्स प्रा. लिमिटेड रु. | ४,३४,४३८=०० |

वरील दर जकात कर वगळता आहेत. त्यामुळे त्यांत त्यांना सुट देण्याबाबत जकात अधिक्षक यांना पत्र द्यावे लागेल. कंपनी च्या दरात कमी व जास्त द्याव्यात त्याप्रमाणे डिलीव्हरी घेतांतना रक्कम आदायी करावी लागेल. पेमेंटची आदायी केल्यानंतर वहानाची डिलीव्हरी मिळेल.

सदरील खच्र १९८८-९९ या आर्थिक वर्षात ठेवलेल्या वाहन खरेदीच्या रु. ६० लाखांचे तरतूदीतून करता येईल कमी दरांचे दरपत्रक मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. संजय जोशी :** एकाच शहरात दोन्ही कंपन्याचे दरात रु. १०० ने फरक का येतो. तसेच महानगरपालिकेच्या आर्थिक दृष्टीने डिझेल गाडी ऐवजी पेट्राल गाडी खरेदी करावी. त्यास मेन्टनन्स कमी होतो व जास्त काळ टिकते.

**श्री. स. अली मिरा सलामी :** उपमहापौर यांरनाही गाडी खरेदी करणे आवश्यक आहे काय? त्यांना नविन गाडी खरेदी करून किती कालावधी झाला. आणि त्यांची गाडी आतापर्यंत किती कि.मी. फिरलेली आहे.

**उपअभियंता (यां.)** मा. उपमहापौर यांना गाडी खरेदी करून देऊन तीन वर्षाचा कालावधी झालेला आहे. सध्या पेट्रोलचे वाढते भाव लक्षात घेता डिझेल गाड्या खरेदी करणे योग्य राहील. स्पेअर कार नाही. पदाधिकाऱ्यांना प्रसंगावधान गाडी देण्यास स्पेअर कार असणे आवश्यक आहे.

**श्री. संजय जोशी :** आपल्याकडे ज्या गाड्या डिझेलच्या आहेत. त्यावर मेंटेनन्स जात होतो. त्यापेक्षा पेट्रोल गाड्या खरेदी करणे योग्य राहील. याबाबत उपअभियंता (यां.) यांनी आपले मत सांगावे.

**उपअभियंता (यां.) :** पेट्रोल गाड्या डिझेल पेक्षा कधीही चांगल्याच आहेत. कैलास मोर्टासकडून पेट्रोल गाड्या घेतल्यास पेट्रोल टंक लॉक, फोर रबर मॅटींग, मडगार्ड प्लाप, प्लॅगरॉड व २ फ्री सर्व्हीसींग देणार आहे. तयामुळे मनपाच्या रु. १५०० चा फायदा होणार आहे. त्यांचेकडून इसूजी इंजिन बसवलेले बकेट टायपसिट, रेडीअल टायर, डिन्टेड ग्लास, ए.सी.सह. रु. ४००३८४/- इतक्या किमतीत पडेल.

**मा. सभापती :** ठिक आहे. पेट्रोल गाडी मे. कैलास मोटर्स यांचेकडून खरेदी करण्यात यावी.

**श्री. विकास जैन :** सभागृह नेता यांचेसाठीही नविन गाडी पेट्रोलची खरेदी करावी.

**मा. सभापती :** ठिक आहे. स्थायी समितीमध्ये कार खरेदीबाबत र्चा झाली त्यामध्ये डिझेल कार मध्ये मेंटनेन्स जास्त असल्यामुळे ॲम्बेसडर पेट्रोल ए.सी. कार इसूजीच्या एकून तीन कार खरेदी करण्याचे ठरले. मे. कैलास एजन्सीला प्रा. लिञ यांनी दि. १०-०७-९८ रोजी पत्र देऊन असे कळविले आहे की, त्यांच्याकडून कार घेतल्यास पेट्रोल टँक लॉक फोर रबर मॅटींग, मडगार्ड कॅप, प्लॅग रोड, मोफत देण्यास तयार आहे. शिवाय दोन फ्री सर्व्हीसिंग देण्यास तयार आहे. तरी मे. कैलास एजन्सीज यांच्याकडून कार खरेदी केल्यास प्रती वाहनामागे मनपास एकूण रु. १५००/- चा फायदा होणार आहे. तरी मे. कैलास एजन्सीज यांचेकडून इसुजी इंजिन बसवलेचे बकेट टाईपसिट, रेडिअल टायर टी हेड ग्लास व ए. सी. सह या वाहनासाठी कमी आलेल्या दरपत्रकाच्या दरात म्हणजे प्रत्येकी रु. ४,००,३८४=०० या किंमतीत एकूण तीन कार मा. उपमहापौर, मा. सभापती (स्थायी समिती) मा. सभागृह नेता यांच्यासाठी खरेदी करण्यात याव्यात व सध्या यांच्या वापरात असलेली वाहने स्पेअर वाहन म्हणून वापरावेत. प्रस्ताव क्र. २ मंजूर.

**ठराव :**

स्थायी समितीमध्ये का खरेदीबाबत चर्चा झाली त्यानुसार डिझेल कार मध्ये मेंटेनन्स जास्त असल्यामुळे ॲम्बेसेडर पेट्रोल ए.सी. कार. (इसुझू) च्या एकूण तीन कार खरेदी करण्यात याव्यात. मे. कैलास एजन्सीज प्रा. लि. यांनी दि. १०-०७-९८ रोजी पत्र देऊन असे कळविले आहे की, त्यांच्याकडून कार खरेदी केल्यास पेट्रोल टॅन्क लॉक, फोर रबर मॅटींग, मडगार्ड कॅप, प्लॅग रोडवे, मोफत देण्यास तयार आहे. शिवाय दोन फ्री सर्व्हीसिंग देण्यास तयार आहेत. करिता मे. कैलास एजन्सीज यांचेकडून इसुजी इंजिन बसवलेले बकेट टाईपसिट, रेडिअल टायर, टी हेड ग्लास व ए. सी. सह या वाहनासाठी कमी आलेल्या दरपत्रकाच्या दरात म्हणजे प्रती वाहन रु. ४,००,३८४=०० या किंमतीत एकूण तीन कार मा. उपमहापौर, मा. सभापती (स्थायी समिती) मा. सभागृह नेता यांच्यासाठी खरेदी करण्यात याव्यात व सध्या त्यांच्या वापरात असलेली वाहने स्पेअर वाहन म्हणून वापरण्यास

सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. या प्रस्तावास याच सभेत स्विकृती देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९४/३**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मा. सभापती स्थायी समिती यांचे विनंती नुसार त्यांचे वापरासाठी नविन अम्बेसेडर (ए.सी.) कार खरेदीचा प्रस्ताव सादर करावा. मा. सभापती यांच्या वापरात असलेल्या टाटा-इस्टेट या वाहनास अपघात झाल्या असून ती नादुरुस्त आहे. दुरुस्तीचा प्रस्ताव सादर केलेल्या आहे. दुरुस्तीनंतर सदरील कार स्पेअर वाहन म्हणून वापरता येईल. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मा. सभापती स्थायी समिती यांचे साठी नविन अम्बेसेडर ए.सी. कार खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच विषय क्र.९३/२ मध्ये नमूद केल्या प्रमाणेच काही प्रकरणात कार्यवाही करण्यात यावी. व त्या अनुषंगाने वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९५/४**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर करीत आहे की, रंगारगल्ली येथील रस्ता रुंदीकरणातील माती उचलणेचे कामासाठी सन १९९७-९८ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डि.एस.आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रु. १,५८,०००/- चे तयार करण्यात आले आहे.

महानगरपालिकेतर्फे रंगारगल्ली येथील रस्ता रुंदीकरणाचे काम करून घेण्यात येत असून दिनांक १६-०५-९८पासून रस्त्यात बाधित मिळकतीचा ताबा घेऊन त्या मिळकती पाडून त्यांची माती उचलणे व ओटे तोडून त्याची माती वाहून देण्याचे काम चालू आहे.

सदरील काम तातडीने करून घ्यावयाचे असल्याने उपलब्ध ठेकेदार श्री. हुसेन अली यांचेकडून माती उचलण्याचे काम करून घेण्यात येत आहे.

तरी सदरच्या कामासाठी तयार केलेले अंजदापत्रक रक्कम रु. १,५८,०००/- ला व कामाची तातडी लक्षात घेता उपलब्ध ठेकेदार श्री. हुसेन अली यांचे कडून काम करून घेण्यात येत असल्याने अंदाजपत्रकास कार्योत्तर मंजुरी मिळणेसाठी प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. स. अ. एकबालोद्दिन कुतुबूद्दिन :** कामाक्षी लॉजिंग समोरील रोडवरील भूसंपादन प्रक्रियेत जो रस्ता खुला झालेला आहे. तेथील माती संबंधित गुत्तेदाराने उचलली त्यांचे अंदाजपत्रक अद्याप केले नाही. त्याचे देयक अद्यापही दिलेले नाही. तो गुत्तेदार सध्या पैशाअभावी अर्ध पागल झाल्यासारखा होत आहे.

**मा. सभापती :** संबंधित गुत्तेदाराचे अंदाजपत्रक तयार करून तातडीने मंजुरी द्यावी. सदरील प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**श्री. अ. रऊफ :** आपल्याकडे जेसीबी मशीन, रस्त्यावरील माती उचलण्यासाठी आहे. दुपारी ट्रक रिकामे राहतात त्या मशीनद्वारे रस्ता रुंदीकरणातील माती का उचलण्यात आली नाही. एवढा खर्च मनपाने संबंधित गुत्तेदारांकरवी कसा केला? सध्या तेथील सात-आठ घरे भूसंपादन प्रक्रियेत पूर्ण व्हावयाचे आहे. आणि सदरील कामाचे अंदाजपत्रक तयार करून प्रस्ताव का मांडला? या

रस्ता रुंदीकरण कामातील संपूर्ण खर्चाचा एकदाच अंदाजपत्रक तयार करून प्रस्ताव प्रशासनाने मांडावयास पाहिजे होते. एवढी घाई करण्याचे कारण काय?

**श्री. बन्सी गांगवे :** मो. मुकूंदवाडी येथील माती उचलणेबाबत माजी महापौर सौ. सुनंदा कोल्हे यांनी पत्र दिलेले होते त्याप्रमाणे त्यांचे वार्डातील अंदाजपत्रक माती उचलणेसाठी तयार करून कार्यवाही करावी.

**श्री. स. अ. एकबालोद्दिन कुतूबुद्दिन, श्री. अ. रऊफ :** रंगारगल्ली रस्ता रुंदीकरणात माती उचलण्याचे काम अद्यापही अपूर्ण असून बरीचे घरे भूसंपादन प्रक्रियेत राहिलेली आहे. त्या खर्चाचा विचार करूनच अंदाजपत्रक तयार करावयास पाहिजे होते. त्यामुळे या प्रस्तावावर आमचा विराध आहे. वास्तविक पाहात जेसीबी मशिनद्वारेच पूर्ण माती उचलण्याचे काम व्हावे. प्रशासन मनपाचे आर्थिक नुकसान या कामी करीत आहे.

**श्री. स. अली मिरा सलामी :** माझ्या वॉर्डातील दलालवाडी येथील अशाच प्रकारचे काम असतांना सूध्दा अद्यापही अंदाजपत्रक तयार केलेले नाही. मात्र रस्ता रुंदीकरण कामासाठी तातडीने अंदाजपत्रक तयार केले जाते.

**श्री. अ. रऊफ :** माझ्या वॉर्डातील माती उचलण्याचे २०० मि. पर्यंतचे काम होते. त्यांचाही अंदाजपत्रक तयार करून निर्णय याच सोबत घ्यावा.

**श्री. कार्यकारी अभियंता (स्लम) :** या कामासाठीचे अंदाजपत्रक कामाच्या अतिरिक्त जादा झाल्याने रिवाईज्ड अंदाजपत्रक तयार करावे लागले. करिता सदरील प्रस्ताव मंजुरीस्तव आणलेला आहे.

**मा. सभापती :** कोणत्याही वॉर्डातील कामे स.स. यांनी सूचना केल्यास नियमाप्रमाणे करावे परंतु कामाची निकड लक्षात घेता ते नियमात बसवून कसे करता येईल. याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

**श्री. अ. रऊफ :** माझ्या वॉर्डातील एका बाजूच्या नाल्याचे कामाचे रु. १.०० लाखांचे अंदाजपत्रकास मंजुरी मिळालेली होती. परंतु तेथील काम सुरू न करता तेच अंदाजपत्रकातील रक्कम दुसऱ्या बाजूच्या बाजूला वापरलेली आहे. याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी कार्यवाही करावी.

**मा. सभापती :** या बाबत संबंधित अधिकाऱ्यांनी पाहणी करून कार्यवाही करावी.

**श्री. नरसिंग ढगे :** माझ्या वॉर्डात वाढीव काम ४२% कमी दराने काम चालू आहे. त्याच दराने बाकीचे काम करवून घ्यावे. संबंधित गुत्तेदार ते काम करायला तयार आहे तेंव्हा वाढीव काम करून घ्यावे.

**मा. सभापती :** स.स. श्री. नरसिंग ढगे यांनी सूचना केल्याप्रमाणे ४२% कमी दराचे अंदाजपत्रकास मा. आयुक्त यांनी मंजुरी द्यावी.

**श्री. स. अली मिरा सलामी :** स.स. श्री. नरसिंग ढगे यांनी सूचना केल्यानुसारच त्यांच्या कामाजवळील भागात नाल्याजवळील घरे पडलेली असून त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी.

**मा. सभापती :** या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांनी पाहणी करून कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रंगारगल्ली येथील रस्ता रुंदीकरणातील माती उचलण्याचे कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,५८,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील कामाची तातडी लक्षात घेता हे काम उपलब्ध ठेकेदार श्री. हुसेन अली यांचेकडून करून घेतलेल्या कामास कार्योत्तर मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९६/५**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर करीत आहे की, रंगारगल्ली रुंदीकरणासाठी खडी रस्ता तयार करणेच्या कामासाठी सन १९९७-९८ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी. एस. आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रु. १,७४,७५०/- चे तयार करण्यात आहे.

रंगारगल्ली येथील रस्ता रुंदीकरण करण्याचे काम हाती घेण्यात आले असून रस्त्यातील बाधित घरे पाडून त्याची माती उचलण्याचे काम चालू आहे. ज्या ठिकाणची घरे तोडून माती उचलण्यात आलेली आहे. तेथे पुन्हा अतिक्रिमण होऊ नये म्हणून त्या ठिकाणी खडीकरण करणे गरजेचे असल्यामुळे उपलब्ध ठेकेदार श्री. हुसेन अली यांचे कडून कामास मंजुरी मिळाल्यास काम करून घेण्यात येईल.

तरी सदरील कामासाठी तयार केलेले अंदाजपत्रक रक्कम रु. १,७४,७५०/- ला व कामास मंजुरी मिळाल्यास उपलब्ध ठेकेदार श्री. हुसेन अली यांचेकडून काम करून घेणेस्तव प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. विखारोद्दिन :** येथील पूर्ण घरे तुटलेली नाही. मलबा निघाला नाही. १-२ ठिकाणी न्यायालयाची स्थगिती आहे. १०-१२ घरे शिल्लक आहे. ५०% ही झाले नाही.

**श्री. अ. रऊफ, श्री. स. अ. मिरा सलामी, श्री. स. अ. एकबालोद्दिन :** रंगारगल्ली रस्ता रुंदीकरणातील अद्याप बरीच घरे भूसंपादन प्रक्रियेत राहिलेली असल्याने तेथील घरे तातडीने पाडून खडी, रस्ता तयार करावे.

**उप आयुक्त (प्र.) :** रंगारगल्ली रस्ता रुंदीकरणातील बरीच घरे पाडलेली असून त्यापैकी ३ घरावाल्यांनी कोर्टातून स्टे आणलेला आहे. त्यामुळे ती घरे मनपाने भूसंपादन प्रक्रियेत पाडलेली नाहीत. रस्ता रुंदीकरण केल्यानंतर तातडीने खडीकरण करून डांबरीकरण करणे. आवश्यक आहे. अन्यता अतिक्रमण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**श्री. स. अ. एकबालोद्दिन :** पूर्ण घरे तुटलेली नाही.

**श्री. स. अली मिरा सलामी :** आमाच्या माहिती प्रमाणे आणखी ८ ते ११ घरे अजून पाडावयाची आहेत.

**श्री. संजय जोशी :** रस्ता रुंदीकरणात घरे तोडलेल्या भागात आपण तातडीने सुविधा जर पुरविल्या नाही तर नागरिकांना त्रास होतो. त्यामुळे खडीकरण करून डांबरीकरण करणे आवश्यक आहे.

**श्री. रऊफ श्री. स. अ. एकबालोद्दिन, श्री. स. अली मिरा. सलामी :** १ वर्षे झाले कामाक्षी लॉजिंग समोरील घर तोडून जागा रिकामी केली आहे. मग त्या ठिकाणी अतिक्रमण झालेले आहे काय? अतिक्रमणाची प्रक्रिया होत असल्यास मनपा उपआयुक्त (म.) यांनी तातडीने कार्यवाही करावी. व माती उचलणे कामी अंदाजपत्रक सर्व वॉर्डातील मिळून एकत्रित तयार करावी व नंतरच मंजुरी द्यावी.

**सहा. संचालक नगररचना :** तीन व्यक्तींनी रंगारगल्ली रस्ता रुंदीकरणाच्या प्रक्रियेत कोर्ट स्टे आणलेले आहे. त्यामुळे घरे पाडलेली नाहीत.

**श्री. स. अली मिरा सलामी :** कामाक्षी लॉज समोरील भाग तोडून १ वर्षे झाले. त्यांचे अर्जंट काम का करण्यात आले नाही. व या कामाची १ महिना सुरुवात होणार नाही.

**श्री. विखारोद्दिन :** कामाक्षी लॉज समोरील रस्ता का झाला नाही.

**श्री. एकबालोद्दिन :** याची निविदा काढावी.

**श्री. रऊफ :** कामाक्षी लॉज समोरील रस्त्यावरची ६ महिने माती उचलली नाही. परंतु बिल्डींग तुटली नाही तरी एजन्सीच्या नावाने मंजुरी देण्यात येते.

**मा. सभापती :** अतिरिक्त शहर अभियंता यांनी कामाक्षी लॉज समोरील भागाचे, रंगारगल्ली येथील रस्त्याचे खडीकरण व डांबरी करणाची कामे ताबडतोब करावी. कोणत्याही रस्ता रुंदीकरण प्रक्रियेत अतिक्रमण होणार नाही याची दक्षात प्रशासनाने घ्यावी. सदरील प्रस्ताव ५ मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तवात दर्शविल्याप्रमाणे रंगारगल्ली रस्ता रुंदीकरणाकरिता खडी रस्ता तयार करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,७४,७५०/- च्या आंजपत्रकास तसे पुन्हा अतिक्रमण होऊ नये म्हणून या ठिकाणी तातडीने खडीकरण करण्याकरिता उपलब्ध ठेकेदार श्री. हुसेन अली यांचेकडून काम करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९७/६**

कार्यकारी अभियंता (पा.पु. व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, रहेमानियाँ कॉलनी येथील विहिरीत संरक्षित भिंत बांधावयाचा आहे. सदर कामाचा खर्च हा पाणी पुरवठा देखभाल व दुरुस्तीच्या तरतूदीमधून करण्यात येणार आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन ९६-९७ च्या दरसूचीनुसार रक्कम रु. १,३३,१००/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

तरी अंदाजपत्रक रक्कम रु. १,३२,१००/- मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** मंजूर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रहेमानियाँ कॉलनी येथील विहिरीस संरक्षित भिंत बांधण्याचे कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,३३,१००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९८/७**

कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा व जलनिःसारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. कैसर कॉलनी येथील ड्रेनेज लाईन अपरुटींग करून १५० मी.मी. व्यासाची चिनी मातीची लाईन काढून २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता अंदाजपत्रकाची रक्कम रुपये ३,०४,१००/- चे परिसर अभियांत्रिकीच्या दरसूची सन १९९७-९८ नुसार तयार करण्यात आले आहे.

सदरील काम लेखा शिर्षक देखभाल दुरुस्ती ९८-९९ यातून प्रस्तावित केले आहे. मा. आयुक्तांना दिनांक १९-०६-९८ ला प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. तरी प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** मंजूर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कैसर कॉलनी येथील ड्रेनेज लाईन अपरुटींग करून १५० मी.मी. व्यासाची चिनी मातीची लाईन काढून २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. ३,०४,१००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९९/८**

मा. शहर अभियंता यांना प्रस्ताव सादर केला की, एन-६ अविष्कार कॉलनी येथील सह्याद्री नगर येथील खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे बाबत चे अंदाजपत्रक सन ९६-९७ च्या दरसूचीनुसार रक्कम रु. १,२३,५००/- एवढ्याचे तयार करण्यात आले असून सदर कामावर होणारा खर्च विकास योजने अंतर्गत भूखंडाचे संरक्षण या तरतूदीतून प्रस्तावित करण्यात आले आहे. सबब वरील प्रमाणे प्रस्ताव मान्यतेस्तव व विचारार्थ स्थायी समिती समोर सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** मंजूर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एन-६ अविष्कार कॉलनी येथील सह्याद्री नगर येथील खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. १,२३,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र. १००/१**

मो. आंबेडकर नगर येथील ग्रिव्ह्युज कंपनी लगत दगडी गटार बांधणे कामाकरिता र. रु. १,२०,२९१/- चे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांची दरसूची ९६-९७ अनुसार तयार करण्यात आली असून मा. आयुक्तांनी दि. ०६-०७-९८ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

सदर काम गलिच्छ वस्ती सुधारणा कार्यक्रम ९८-९९ शिर्षखाली गटार अंतर्गत करण्याचे प्रस्तावित आहे. करिता मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** मंजूर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आंबेडकर नगर येथील ग्रिव्ह्युज कंपनी लगत दगडी गटार बांधणे कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. १,२०,२९१/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०१/२**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिडको एन-६ मनपा वॉर्ड क्र. २१ प्रा. शाळा परिसरात सभागृहात बांधावयाचे आहे. त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन ९७-९८ च्या जिल्हा दरसूचीनुसार र.रु. ३,०६,१८०/- चे अंदाजपत्रक तयार तयार करण्यात आलेले आहे. त्यास मा. आयुक्तांनी दि. २८-०६-९८ रोजी मान्यता दिलेली आहे.

सदरील कामाचा खर्च हा सन ९८-९९ या आर्थिक वर्षात विकास इमारती शाळा व दवाखाने या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात येईल. तरी अंदाजपत्रक र. रु. ३,०६,१८०/- चा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** मंजूर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको एन-६ मनपा वॉर्ड क्र. २१ प्रा. शाळा परिसरात सभागृह बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. ३,०६,१८०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०२/३**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, पुंडलिकनगर येथे आरोग्य उपकेंद्र चालवणे बाबत येथील नागरिकांची मागणी आहे. शासनाचे नियमानुसार पन्नास हजार लोकवस्तीला एक या प्रमाणे आरोग्य केंद्र असावे असे आदेशित आहे. त्यानुसार जवळच जवाहर कॉलनी आरोग्य केंद्र चालू आहे. पुंडलिकनगर येथे आरोग्य केंद्र जर चालवायाचे असेल तर त्या ठिकाणी जागा उपलब्ध करणे जरुरी आहे. त्यासाठी सध्या श्री. दसरे यांचा एक हॉल आर.सी.सी. चा १७' x २२' चा उपलब्ध आहे. तो त्यांनी रुपये ३०००/- (रु. तीन हजार मात्र) दरमहा घर भाडे मागणी केली आहे.

या आरोग्य केंद्रासाठी १ वैद्यकीय अधिकारी २ परिचारिका १ नोंदणी लिपीक व २ सेविका ची गरज आहे.

वरील कर्मचारी वृंदाची पदे निर्माण करुन नियमानुसार भरावी लागतील. पुंडलिकनगर येथे दवाखाना सुरू करण्यांस वरील बाबींची मान्यता मिळणेस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. स. अ. एकबालोद्दिन :** माझ्या वॉर्डात आरोग्य केंद्र अद्याप सुरू झालेले नाही.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** १५ ऑगस्ट-९८ पर्यंत शहरातील ३ आरोग्य केंद्र सुरू करण्यात येणार आहेत.

**श्री. स. अली मिरा सलामी :** माझ्या वॉर्डातील आरोग्य केंद्र सुरू करणे बाबत काय झाले?

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** शासनाचे श्रीवास्तव कमिटींच्या नियमान्वये ३५ हजारापर्यंत लोकसंख्या असल्यास आरोग्यकेंद्र मंजूर करीत नाही. तर ५० हजारावरील लोकसंख्या असल्यास एका अरोग्य केंद्रास मंजुरी दिल्या जाते. त्यानुसार कार्यवाही करण्यात येते. सध्या १७ आरोग्य केंद्र मनपामध्ये आहेत.

**श्री. संजय जोशी :** आहे तेच चालवत नाही. मुंबई मध्ये बॉम्बे हॉस्पिटल शासनास देण्याच्या तयारीत आहे. मंजुरी नंतरचा खर्च बघावा.

**मा. सभापती :** प्रत्येक वॉर्डातील लोकसंख्या लक्षात घेता व शासन नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येते.

**श्री. संजय जोशी :** या आरोग्य केंद्रास मंजुरी द्यावी. त्यानंतर यापुढे देण्यात येऊ नये.

**मा. सभापती :** आतापर्यंत ज्या आरोग्य केंद्रास कर्मचाऱ्यांच्या मागणीसह मंजुरी प्राप्त झाली आहे. ते तातडीने सुरू करावे.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** आरोग्य केंद्राबाबतीत ज्या खाजगी इमारतीमध्ये केद्र सुरू करावयाचे आहे. त्यासाठी रु. ३०००/- (तीन हजार) भाडेची मागणी केलेली आहे. तेंव्हा भाडे समितीद्वारे निर्णय घ्यावा. अशी प्रस्तावात दुरुस्ती करावी.

**मा. सभापती :** माझ्या माहितीप्रमाणे मनपाची खुली जागा किंवा एखाद्या सोसायटीतील १०% प्रमाणे सोडण्यात आलेल्या जागेवर मनपाने आरोग्य केंद्र होणेबाबत पाहणी करून कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे तात्पुरत्या स्वरुपात जागा उपलब्ध होईपर्यंत भाडे समिती मार्फत रु. ३०००/- (तीन हजार) भाडे आकारणी संदर्भात निर्णय घेणे यास मंजुरी देऊन पद निर्मितीचा प्रस्ताव त्यांनी सर्वसाधारण सभेपुढे सादर करावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पुंडलिकनगर येथे आरोग्य उपकेंद्र चालू करण्याकरिता श्री. दसरे यांचा आर.सी.सी. चा १७' x २२' आकाराचा हॉल दरमहा रु. ३००० (तीन हजार) भाड्याने मागणी केली आहे. यासंबंधी भाडे कमेटीच्या मार्फत निर्णय घेण्यात यावा. तसेच या अरोग्य केंद्रासाठी १ वैद्यकीय अधिकारी, २ परिचारिका, १ नोंदणी लिपीक व २ सेविकांची पदे निर्माण करण्यासंबंधी प्रशासनाने सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव सादर करावा. त्याअनुषंगाने वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०३/४**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्तवित केले आहे की, सन १९९८-९९ वर्षाकरिता आरोग्य विभागास औषधी, शल्य साहित्य व साहित्य खरेदी करणे आहे. यासाठी जाहिर निविदा क्र. आ/७३२/९८ दिनांक १५-०४-९८ प्रमाणे वृत्तपत्रातून जाहिरात देवून निविदा मागविण्यात आल्या होत्या त्यानुसार खालील निविदा धारकाकडून दर पत्रके निविदा द्वारे प्राप्त झाले आहे.

| | |
|---|---|
| १) | मे. अश्वीनी फार्मास्ट्युकल्स |
| २) | मे. सार्जिको मेडीकल इंटरप्राइजेस |
| ३) | मे. समरी फार्मास्ट्यूकल्स |
| ४) | मे. सिमेन्स कंपनी |
| ५) | मे. किंकरे ब्रदर्स |
| ६) | मे. निग्पा फार्मास्ट्यूकल्स |

तुलनात्मक तक्ता नुसार खालील प्रमाणे नावापुढे दर्शविलेली ॲटम संबंधिताने कमी दर आहेत.

| | |
|---|---|
| १) | मे. अश्वीनी फार्मास्ट्युकल्स ॲटम-३४ |
| २) | मे. सार्जिको मेडीकल इंटरप्राइजेस-६ |
| ३) | मे. समरी फार्मास्ट्यूकल्स-६ |
| ४) | मे. सिमेन्स कंपनी-१ |
| ५) | मे. किंकरे ब्रदर्स-४९० |

संबंधिताचे कमी दराचे दर ॲटम क्रमांक नुसार आहे.

१) मे. अश्विनी फार्मास्टयुकल्स- १, १७, १९, ७८, ८५, ११४, ११५, ११९, अ १३१, १९४, २०० ते २०३, २०६, २४४, २५३, २५४, २७०, २७२, २७३, २७९ ते २८६, २१९, ३००, ३२४
२) मे. सार्जिको मेडीकल इंटरप्राइजेस - २५, ५९, ८६,११७, ५१२ आणि ५३४ एकूण ६
३) मे. समरी फार्मास्ट्यूकल्स - ९५, ९६, ९७, अ ९७ ब, ९८ अ ९८ ब, एकूण-६
४) मे. सिमेन्स कंपनी - १८३, ६१८ फक्त -२
५) मे. किंकरे ब्रदर्स - २ ते ६,८ ते ११, १३ ते १६, १८, २०, २१, २३, २४, २९ ते ३५, ३७, ३९, ४१, ४२, ४३, ४५, ४६, ४७, ते ५३, ६२, ते ६९, ७७, ८२, ८३, ८४, ८७ ते ९४, ९९, १००, १०२, १०६, १०९, १११, ११३, ११६, ११७, ११८, ११९, ब १२०, १२१, १२३, १२४, १२५ ते १३०, १३३, ते १३८, १४०, १४३, १४५, १४६, १४९, १५०, १५२, १५३, १५५, १५६, १५७, १५९ ते १६२, १६४, १६५, १६७, १६९ ते १७३, १७५, १७८, १८२, १८३, १८९, १९५ ते १९८, २०२, २०४, २०५, २०९, २१०, २१३, २१४, २१७, २२२, २२५, २३०, २३४, २३५, २३६ ते २३९, २४१, २४२, २४४, २४८, २५०, २५१, २५२, २५५, ते २६१, २६४, २६९, २७१, २७४ ते २७८, २८७ ते २९८, ३०१ ते ३१६, ३१७ ते ३२३, ३२५, ३२७ ते ३५७, ३५९ ते ३७६, ३७८ ते ३९४, ३९६ ते ४५८, ४६० ते ४७४, ४७७, ते ४८०, ४८५ ते ५०४, ५०६ ते ५११, ५१३, ५१५ ते ५३३, ५३५ ते ५६६, ५७०, ५७३, ते ५८२, ५८४ ते ६०३, ६०५, ६०६, ६०८ ते ६१३, ६२० ते ६४१, ६४३ आणि ६४४ एकूण ४९०.

वरील प्रमाणे प्राप्त झालेल्या निविदाच्या दरामध्ये मा. आयुक्तांनी पुरवठा धारकाबरोबर चर्चा केली त्याप्रमाणे १०% टक्के दर कमी करून कमी दराचे दर मंजूर करण्यात यावे व पुरवठा धारकास पुरवठा करण्यास मंजुरी देण्यात यावी. पुरवठधारका सोबत वर दर्शविलेल्या प्रमाणे करार करण्यास मंजुरी द्यावी. व अंदाजपत्रकातील तरतूदीनुसार खरेदी करण्यास मंजुरी द्यावी. मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

**श्री. स. अली मिरा सलामी :** माझ्या वॉर्डात आरोग्य केंद्र मंजुरी होऊन गेली दोन वर्ष झाली. परंतु अद्यापही आरोग्य केंद्र झालेले नाही तेंव्हा याबाबत तशी इतिवृत्तांत नोंद व्हावी.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** शासनाच्या निर्णयानुसार ३५ हजार लोकसंख्येच्या ठिकाणी आरोग्य केंद्र स्थापण्याची परवानगी दिली जात नाही. तर त्यावरील ५० हजार वरील लोकसंख्येस शासनामार्फत परवानगी दिली जाते. ३५,००० हजार लोकसंख्येला अे.एन.एम. आहे डॉक्टरचा जागा नाही.

**श्री. विखारोद्दिन :** दलालवाडी भागा अरोग्य केंद्र होणे आवश्यक आहे.

**मा. सभापती :** विषय क्र. ४ मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९८-९९ या वर्षाकरिता आरोग्य विभागास औषधी, शल्य साहित्य व साहित्य खरेदी करणे करिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे निविदाधारक आहे. यासाठी जाहिर निविदा क्र. आ/७३२/९८ दिनांक १५-०४-

९८ प्रमाणे वृत्तपत्रातून जाहिरात देवून निविदा (१) मे. अश्वीनी फार्मास्ट्युकल्स (२) मे. सार्जिको मेडीकल इंटरप्राइजेस (३) मे. समरी फार्मास्ट्यूकल्स (४) मे. सिमेन्स कंपनी (५) मे. किंकरे ब्रदर्स यांचे नावासमोर दर्शविलेल्या ॲटमच्या दरामध्ये वाटाघाटीनुसार १०% कमी दर करून निविदा मंजुरीस तसेच पुरवठधारका सोबत प्रस्तावात दर्शविल्यानुसार करार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०४/५**

अग्निशमन विभागाला तीन वर्षापासून केमीकल्स फायर कॉल्स/रेस्क्यु कॉलस्/ ॲक्सीडेंट कॉलस्/ इत्यादी येत आहेत. त्यामुळे मा. आयुक्त म.न.पा. औरंगाबाद यांच्या मान्यतेनुसार अग्निशमन विभागाची सुधारणा करण्यासाठी ज्यामध्ये अग्निशमन दलाचे स्वत:चे नियम तयार करणे / आकृतीबंध तयार करणे / अद्यावत मशनरी घेणे / मनपास उत्पन्नाचे साधन सुचवणे इत्यादीसाठी मुंबई अग्निशमन दलाचे निवृत्त मुख्य अग्निशमन अधिकारी श्री. डी. जे. कुलकर्णी यांना अग्निशमन दलाचे सल्लागार म्हणून नेमण्याचे प्रायोजित आहे.

१) त्यांची सेवा सहा महिण्यासाठी मोफत असणार आहे.
२) आवश्यक गरजेवेळी बोलावल्यास मुंबई ते औरंगाबाद विमानाने येण्या जाण्याचा खर्च
३) औरंगाबादला कार ड्रायव्हर सह देणे.
४) सुयोग्य ऑफिस व स्टेनो देणे.

करिता प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. विखारोद्दिन, श्री. अ. रऊफ :** संबंधित प्रस्तावाची पूर्ण माहिती द्यावी.

**मुख्य अग्निशमन अधिकारी :** अग्निशमन विभागाची सुधारणा करण्यासाठी स्वत:चे नियम, आकृतीबंध तयार करणे, अद्यावत मशीनरी घेणे मनपाचे उत्पन्नाच साधन सुचविणे इ. कामासाठी सल्लागार म्हणून मागणी करीत आहोत.

**श्री. स. अली मिरा सलामी :** आकृतीबंध कार्यक्रम ज्यावेळी प्रशासनाने आखलेला होता. त्यात तसे नमूद केलेले होते काय?

**श्री. राजकुमार बचाटे (मामा) :** अनेक ठिकाणी जीव धोक्यात घालून कामगिरी बजवावी लागते. राष्ट्रपती पदके मिळालेली आहेत. परवाची घटना आहे. जेंव्हा अधिकारी पाण्यात उतरले त्यांना किट्स, ऑक्सिजन होते का, अधिकारी जीव धोक्यात घालून कामे करतात त्यांना उपकरणे द्यावी. त्यासाठी विशेष पथकाची निर्मिती करावी या साठी जाणकार लोकांचे मार्गदर्शन आवश्यक आहे. त्यासाठीच त्यांना आपण बोलवतो त्यांच्या अनुभवांचा फायदा महानगरपालिकेने अवश्य घ्यावा.

**उपआयुक्त (प्र.)** अग्निशनम विभागास सल्लागार म्हणून ज्यांना द्यावयाचा प्रस्ताव आहे ते महाराष्ट्र शासनाने सेवा निवृत्त अधिकारी असून ते मनपास मोफत सल्ला देणार आहेत. आपण त्यांना पगार देणार नसून आवश्यकते वेळेस जाणे येणेचा विमान भाडे देणार आहोत व पाहणीसाठी वाहन देणार.

**श्री. राजकुमार बचाटे (मामा) :** ६ महिन्यानंतर गरज पडली तर बोलावून घेवू.

**मा. सभापती :** सहा महिन्यासाठीचा प्रस्ताव आहे. मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अग्निशमन विभागाची सुधारणा करण्यासाठी ज्यामध्ये अग्निशमन दलाचे स्वत:चे नियम तयार करणे, आकृतीबंध तयार करणे, अद्यावत मशनरी

घेणे, मनपास उत्पन्नाचे साधन सुचविणे इ. कामाकरिता मुंबई अग्निशमन दलाचे निवृत्त मुख्य अग्निशमन अधिकारी श्री. डी. जे. कुलकर्णी यांना अग्निशमन दलाचे सल्लागार म्हणून प्रस्तावातील अ.क्र. १ ते ४ च्या अटी व शर्तीनुसार नेमण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०५/६**

शिक्षणाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर गणवेश सहाय्य योजने अंतर्गत पांढरा, हाफशर्ट, खाकी हाफ पॅन्ट, निळा स्कर्ट, पांढरे पोलके (ब्लाऊज) शर्ट / सलवार मनपाच्या सर्व शालेय विद्यार्थ्यांना वरीलप्रमाणे गणवेश शिलाई करून द्यावयाचे आहेत. सदर गणवेश शिलाईसाठी दैनिक लोकमत समाचार, दैनिक रहेबर, लोकविजय, विश्वमित्र या स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या एकूण सात निविदेची विक्री झाली. त्यापैकी पांच निविदा धारकांनी निविदा भरलया. प्राप्त निविदा धारकांचा दर याप्रमाणे.

| अ. क्र. | गणवेशाचा तपशिल | आर.एस. जैस्वाल | सुदंर रेडिमेड | न्यु. सरस्वती | सम्राझी म.ग. उद्योग | एम.एन.एस. आ.डी.सी. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | हॉफ पॅन्ट | ९/- | ९=१० | ९=२५ | १०/- | ८=८० |
| २ | हॉफ शर्ट | ९/- | ९=०५ | ८=९० | १०/- | ७=९५ |
| ३ | स्कर्ट | ९/- | ९=७० | ९=९० | १०=५० | ६=९५ |
| ४ | ब्लाऊज | ९/- | ९=०० | ९=३५ | १०=०० | ७=९५ |
| ५ | सलवार | ९/- | १४=०० | १०=०० | १६=०० | ७=७० |
| ६ | पंजाबी शर्ट | ११/- | ११=७० | ११=०० | १६=०० | ८=०० |

अंदाजे ३५,००० हजार गणवेश शिवावे लागतील वरीलप्रमाणे सर्वात कमी दर एम.एस. एस. आय. डी. सी. यांचे आहेत.

निविदेमध्ये नमूद करण्यात आलेल्या कामधून योजने अंतर्गत (शासन निर्णय क्र. जी. ईएन १०९५/१६२/३४५/ दि. १३-०७-९५ नगर विकास विभाग) अन्वये ५०% काम हे न्यु. सरस्वती महिला सहकारी औद्योगिक उत्पादक संस्था मर्यादित यांना देणे आवश्यक आहे. कामधेनू योजनेच्या अटीनुसार वरील कमी दरानुसार गणवेश शिलाई करून देणे बंधनकारक राहील. यासाठी होणारा खर्चा डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी गणवेश सहाय्य योजना ९८-९९ या लेखा शिर्षा अंतर्गत करण्यात येईल.

प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. अ. रऊफ :** प्रस्तावातील निविदा कोणकोणत्या आलेल्या आहेत याची माहिती द्यावी सलवारची शिलाई कशी असणार, ८-९ रुपयामध्ये शिलाई होते का? मापे घेतलेली नाही.

**श्री. स. अ. एकबालोद्दिन :** मागील वर्षाचा अनुभव लक्षात घेता शाळेतील मुलामुलींचे गणवेश ज्यामध्ये शर्ट व सलवार चांगल्या प्रकारे शिवल्या जात नाही, अनेकांच्या तक्रारी आहेत . माप घेऊन शिवल्या जात नाही. अंदाजे शिवण काम केल्याने मुलांचे कपडे बेढब दिसतात. व त्यामुळे कपडेही ताणल्यामुळे फाटतात. याकडे प्रशासनाने बारकाईने लक्ष देऊन कार्यवाही करावी. सलवार कळीची शिवायला हवी.

**मा. सभापती :** मार्केट दराप्रमाणे व चांगल्या प्रकारे कपडे शिवणकाम केल्या जाईल याची प्रशासनाने दखल घ्यावी.

**मा. शिक्षणाधिकारी :** प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर काम देणेपूर्वी त्यांचेकडून गॅरंटी लिहून घेतल्या जाईलव डिपॉझिट घेतलेले आहे. कपड्याची सलवारसाठी डबल शिलाई केल्या जाईल. त्यानंतरही काही तक्रारी आल्यास संबंधित एजेन्सीजवर कार्यवाही केली जाईल व पुहः दुरुस्त करून घेण्यात येईल.

**सौ. राधाबाई तळेकर :** सिंगल शिलाई सुध्दा चांगली असू शकते परंतु धागा टेरिकॉटचा असावा.

**मा. सभापती :** कपड्यांचे शिलाई संदर्भात एखादे सॅम्पल मागवावे. व १५ ऑगस्ट पूर्वी सर्व विद्यार्थ्यांना गणवेश वाटप व्हावे. प्रस्ताव स्विकृतीसह मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर गणवेश सहाय्य योजने अंतर्गत पांढरा, हाफशर्ट, खाकी हाफ पॅन्ट, निळा स्कर्ट, पांढरे पोलके (ब्लाऊज) शर्ट / सलवार या महानगरपालिकेतील शाळेच्या विद्यार्थ्याकरिता गणवेश शिलाईसाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी एम.एस..एस. आय.डी.सी. यांचे निविदा दरास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच "कामधेनू" योजने अंतर्गत शासन निर्णयानुसार ५० टक्के काम न्यू सरस्वती महिला सह. औद्योगिक उत्पादन संस्थेस देण्यात यावे. १५ ऑगस्ट ९८ पूर्वी काम पूर्ण व्हावे. या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

"जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगर सचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
मा. सभापती,
स्थायी समिती,
महानगरपालिका, औरंगाबाद

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.*

**दिनांक ३०-०७-९८ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. मा. श्री. जयवंत ओक, सभापती स्थायी समिती महानगरपालिका औरंगाबाद यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ३०-०७-९८ रोजी स्थायी समिती सभा संपन्न झाली तिचे इतिवृत्त. सभेची सुरुवात "वंदे मातरम्" या गिताने अंदाजे दुपारी ४=०० वाजता "मलिक अंबर" सभागृहात झाली. सभेला खालील प्रमाणे स.सदस्य व अधिकारी वर्ग उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स.स. श्री. अ. रऊफ म. अ. माबूद | स. सदस्य |
| २) | स.स. श्री. संजय जोशी | -//- |
| ३) | स.स. श्री. गौतम लांडगे | -//- |
| ४) | स.स. श्री. गांगवे बन्सी तुळशीराम | -//- |
| ५) | स.स. श्री. इंगळे रविंद्र बाबुराव | -//- |
| ६) | स.स. सौ. वाडेकर यशोदा धनंजय | -//- |
| ७) | स.स. श्री. जैन विकास रतनलाल | -//- |
| ८) | स.स. श्री. ढगे नरसिंग मुरलीधर | -//- |
| ९) | स.स. सौ. तळेकर राधाबाई | -//- |
| १०) | स.स. श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | -//- |
| ११) | स.स. श्री. बचाटे राजकुमार (मामा) | -//- |
| १२) | स.स. श्री. विखारोद्दिन पि. खुदबोद्दिन | -//- |
| १३) | स.स. श्री. स. अ. एकबालोद्दिन स. मो. कुतूबुबोद्दिन | -//- |

**संवाद :**

**श्री. संजय जोशी :** महानगरपालिकेतील "शाखा अभियंता" पै. श्री. एम. एम. हक यांचे नुकतेच दुःखद निधन झालेले आहे. त्यांना २ मिनिटे सभागृहात श्रध्दांजली वाहण्यात यावी.

**श्री. विकास जैन :** यास माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :** ठिक आहे. श्री. एम. ए. हक, शाखा अभियंता, यांना सभागृहात २.०० मिनिटे श्रध्दांजली वाहण्यात येते. (सभागृहात २.०० मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली वाहण्यात आली.)

**श्री. संजय जोशी :** खिंवसरा पार्क या माझ्या वॉर्डामध्ये एक वर्षापूर्वी मा. आयुक्त यांनी समक्ष भेट दिलेली होती. सेल्फ डेव्हलपमेंटचा भाग आहे. डांबरीकरण बरोबर झालेले नाही. खिंवसरा पार्कमध्ये राहणाऱ्या जवळ जवळ फ्लॅट असलेल्या, तेथील नागरिकांना रस्ता नसल्यामुळे येण्या जाण्यास त्रास होत आहे. सेल्फ डेव्हलपेमेंटच्या भाग असून येथे अनेक नागरिक राहतात. एक वर्ष झाले याची दखल घेतली नाही. रामतारा गृहनिर्माण संस्थेच्या अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण झालेले नाही. अप्रोच रोड नाही. चिखलामुळे तेथील लोक सोसायटीच्या जागेपर्यंतही पोहचू शकत नाही. या ठिकाणी डांबरीकरणही झालेले नाही मात्र प्रशासनाने त्यांना कम्पलेशन सर्टीफिकेट दिले ते कोणत्या आधारे? त्याप्रमाणे तेथील लोक रात्री बे रात्री मुलाबाळासह रस्त्याने जाणे येणे करतात. या भागात रस्त्याची सुविधा नसतांना ले-आऊट मंजूर

करण्यात आले यास जबाबदार कोण आहे? या भागातील सुविधाबाबत प्रशासनाचे लक्ष नाही. शहरातील या भागात लाईट, डांबरीकरण, पाणीपुरवठा या नागरी सुविधा आजपर्यंत पूर्ण झालेल्या नाहीत. महापालिकातील संबंधित अधिकारी यास जबाबदार असून याबाबत प्रशासनाने त्यांच्यावर कार्यवाही केली पाहिजे व याचा निर्णय तातडीने व्हावा अन्यथा स्थायी समिती मध्ये चर्चा होऊन काहीही उपयोग होणार नाही. जर प्रशासन काम करीत नसेल तर मी राजीनामा देईन, स्थायी समिती सभेला येणारा नाही.

**मा. सभापती :** अति. शहर अभियंता यांनी माहिती द्यावी.

**अति. शहर अभियंता :** "रामतारा" गृहनिर्माण संस्थेसाठी अप्रोच शेड करण्याकरिता रस्त्याच्या जागेसाठी भूसंपादन करावे लागेल. भूसंपादन करून रस्ता उपलब्ध करून घेण्याशिवाय पर्याय नाही.

**सहा. संचालक नगररचना :** या जागेबद्दल वाद निर्माण झालेला आहे. मुख्य रस्त्यावरून अप्रोचसाठी भूसंपादन करावे लागेल. भूसंपादन सुरू केलेले नाही.

**श्री. संजय जोशी :** संबंधित अधिकारी सभागृहात चुकीची उत्तरे देत आहेत. त्या ठिकाणी अप्रोच रोड नाही. म्हणता, तर संबंधित अधिकारी यांनी बांधकाम परवानगी व कम्प्लेशेन प्रमाणपत्र कशाच्या आधारे दिली. या ठिकाणी १५ दिवसाच्या आत रस्ता होणेबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

**सहा. संचालक नगररचना :** १९८० ला रेखांकन मंजूर झाले आहे. विकास योजना (डि.पी.) रस्त्यावरून अकसेस दिलेला आहे. सद्या खुल्या भागातून जाणे येणे होते. ज्या रस्त्यावरून नागरिक जात येत असताना त्या जागा मालकाने त्या जागेवर कोणतेही बांधकाम केलेले नाही.

**श्री. संजय जोशी :** १९८० ला कोणी रेखांकन मंजूर केले. रेखांकन झाले म्हणजे रस्ता असेल. तेथील जागेवर रस्ता नाही. एखाद्या खाजगी मालकाची ती जागा उद्या त्याने बांधकाम केल्यास हे नागरिक कोठून जाणार जसे ले-आऊट मंजूर करून दिले तसा तात्काळ रस्ता त्या ठिकाणी झाला पाहिजे. त्या ठिकाणी नागरिकांना बांधकाम परवानगी का दिली. त्यानंतर कम्प्लेशन सर्टीफिकेट कसे दिले. त्या ठिकाणचा ले-आऊट जुना आहे. प्रशासनाने टेबलावर बसून ले-आऊट मंजूर केलेला आहे.

**सहा. संचालक नगररचना :** सदरील जागा मालकाला आपण बोलावून घेऊन त्यांच्याशी विचारपुस करून पुढील कार्यवाही करू. परंतु तेथील डीपी रोड अक्वायर झालेला नाही. पूर्वी विकास योजना रस्त्यावर रेखाकनास मंजुरी देण्यात येत असे परंतु आता विद्यमान रस्त्याशिवय रेखांकनास मंजुरी दिली जात नाही.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी त्या ठिकाणी जाऊन आतापर्यंत काम कार्यवाही केली त्या ठिकाणी कोणत्या नागरी सुविधाची आवश्यकता आहे. याबाबत तात्काळ पाहणी करून कार्यवाही करावी.

**अति. शहर अभियंता :** त्या ठिकाणी मी जाऊन पाहणी केलेली आहे. तेथील भाग हा सेल्फ डेव्हलपमेंट आहे रस्ता, डांबरीकरण, पाणीपुरवठा इ. सुविधा जमीन मालकाने करून देणे आवश्यक आहे.

**सहा संचालक नगररचना :** रेखांकन सेल्फ डेव्हलपमेंट केल्याबद्दल प्रमाणपत्र घेतल्यानंतरच मंजुरी देण्यात येते.

**मा. सभापती :** स. सभासदांनी ज्या ज्या भागातील नागरी सुविधा बाबत तक्रारी केलेल्या आहेत जसे लाईट, रस्ता, डांबरीकरण याबाबत संबंधित अधिकारी यांनी पुढील बैठकीपर्यंत काय कार्यवाही केली याची माहिती द्यावी. तसेच खिंवसरा पार्क व रामतारा सोसायटी येथील नागरी सुविधा नसतांना ही कामाबाबत पूर्ण त्याचे प्रमाणपत्र देण्यासंबंधी शहानिशा करून पाहणी करून निर्णय द्यावा.

**श्री. नरसिंग ढगे :** माझ्या वॉर्डातील अपूर्ण राहिलेले रस्त्याचे काम चालू करावे १००% विकास खर्च भरलेले आहे. रु. ३,०७,०००/- चे काम चालू आहे. संबंधित ठेकेदार ३७ टक्के बिलामध्ये करण्यास तयार असून या बाबत मी बऱ्याच वेळेस पत्र दिले परंतु त्या बद्दल काहीही कार्यवाही झाली नाही. दि. १०-०७-९८ मधील इतिवृत्तातील पृष्ठ क्र. १५ मध्ये याबाबत चर्चा झालेली आहे.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी या कामाबाबत काय कार्यवाही केली याची माहिती द्यावी.

**अति. शहर अभियंता :** दोन (२) दिवसापूर्वीच या संदर्भात मा. आयुक्तांकडून पत्र प्राप्त झाले आहे. या बाबतची संचिका मा. आयुक्तांकडे पाठवणार आहोत त्यास आयुक्तांची मान्यता घ्यावी लागेल. त्यानंतर कार्यवाही करण्यात येईल.

**मा. सभापती :** ते काम ३७ टक्के कमी दरात होत असेल तर करावयास काय हरकत आहे. गेल्या स्थायी समिती बैठकीत निर्णय झालेला आहे. त्यानुसार कार्यवाही करावी. या बाबत पुन्हः सुचित करण्यात येते की, जर ३७ टक्के कमी दरात मध्ये काम होत असेल तर लवकरात लवकर मा. आयुक्तांची मान्यता घेउुन पुढील कार्यवाही करावी.

**श्री. राजकुमार बचाटे (मामा) :** आकाशवाणी ते त्रिमुर्ती चौकापर्यंतच्या रस्त्यावर महापालिकेने रस्त्यावर जे (चाऱ्या) सिमेंट नाल्याचे बांधकाम केले आहे. त्यावर ढापे (स्लॅब) टाकण्यात आलेले नाही. यामागे महापालिकेने ज्या नाल्या बांधल्या त्या मागचा उद्देश सफल होत नाही. यात लहान लहान मुले पडतात. दोन वेळची घटना आहे मोठे माणसे पडले होते. त्यावरती (स्लॅब) ढापे टाकले नसल्याने नागरिकांनी कचरा टाकून भरले आहे.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**अति. शहर अभियंता :** दोन्ही बाजुने चढ असल्यामुळे ते बांधकाम केलेले आहेत. ज्या ठिकाणी पाणी साचते त्या ठिकाणी ढापे टाकण्यास हरकत नाही.

**श्री. राजकुमार बचाटे :** केलेल्या नाल्या बांधकामाचा काहीही उपयोग नाही. बऱ्याच ठिकाणी पाणी साचतांना दिसून येते. संबंधित अधिकारी यांचे अशा कामावर दुर्लक्ष होते आहे. झालेल्या विकास कामाचा उपयोग झाला पाहिजे.

**मा. सभापती :** अति. शहर अभियंता यांनी स. सदस्य यांच्या सोबत त्या ठिकाणी पाहणी करून बांधलेल्या नाल्यामध्ये पाणी साचनार नाही या बाबत उपाययोजना करून पुढील कार्यवाही करावी.

**श्री. गौतम लांडगे :** शहरात रस्त्यावर बऱ्याच ठिकाणी पाऊस पउल्यावर पाणी साचलेले दिसून येते. हेडगेवार रुग्णालया समोरून समर्थनगर रस्त्यावर बऱ्याच ठिकाणी पाणी साचलेले दिसते. तसेच उत्सव मंगल कार्यालयापर्यंत ही अशा प्रकारचे पाणी साचलेले दिसते. महाराणा प्रताप चौक या ठिकाणी तर बऱ्याच दिवस पाणी साचलेले दिसून येते. त्यामुळे नागरिकांना जाण्या-

येण्यास त्रास होतो. पाणी साचणार नाही याची संबंधित अधिकारी यांनी उपयायोजना करावया पाहिजे.

**मा. सभापती :** ज्या-ज्या स. सदस्यांनी तक्रारी दिल्या असतील त्यानुसार शहरातील शहरातील ज्या ठिकाणी पावसाने पाणी साचते ते कशा प्रकारे काढता येईल या बाबतची कार्यवाही संबंधित अधिकाऱ्यांनी करावी. पाहणी करण्यात यावी अशा भागात कॅचपीट करावे.

**श्री. अ. रऊफ म. अ. माबूद :** "कॅचपीट" मध्ये माती जमते ते साफ करून घ्यावे त्यामुळे पाणी जाण्यास मार्ग मोकळा होईल.

**श्री. संजय जोशी :** ज्या ठिकाणी पाणी साचते त्या ठिकाणी खड्डे आहेत. त्या ठिकाणची ती खोल जागा उचलून घ्यावी.

**श्री. नरसिंग ढगे :** उल्कानगरी भागात श्री. भालेराव यांच्या घरात पाणी शिरते. त्या ठिकाणी लवन झालेली जागा आहे. त्यामुळे संबंधितास त्रास होतो. त्या ठिकाणी कॅचपीट तयार करण्यात आले असूनही पाण्याचा प्रवाह जास्त दाबाने येत असल्याने त्या घरातील लॅटरिनमधून पाणी शिरत आहे.

**श्री. अ. रऊफ म. अ. माबूद :** ब४याच ठिकाणी घराची उंची खाली गेली, व रोड उंच झालेले आहेत. त्याकरिता लोकांनी घरे उंच करून घ्यावी. जेणे करून घरांमध्ये पाणी शिरणार नाही. बऱ्याच भागात घाण साचल्यामुळेही पूर्णपणे वाहुन जात नाही. त्यामुळे पाणी साचून राहते.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**अति. शहर अभियंता :** दोन्ही बाजुने रस्ता उंच आहे, घरे रस्त्यापेक्षा खाली आहेत. जास्त पाऊस झाला तर कॅपपिट मधून पाणी जात नाही ते परत (बॅक) येते. जास्त पाऊस होताच एखाद्या प्लॉट वाल्यांनी पाणी जाण्यासाठी सामासिक अंतरातून जागा दिली तर हा प्रश्न सुटेल. हेडगेवार रुग्णालय समोरील समर्थनगरकडे जाणाऱ्या रस्त्यावर १०-१५ दिवस पाणी साचत होते. ती परिस्थिती आज नाही. काही "कॅचपीट" टाकावयाच्या झाल्यास त्या पुढील पाईपलाईच्या व्यासाच्या विचार करूनच टाकाव्या लागतात.

**श्री. संजय जोशी :** श्री. भालेराव यांच्या घरात पावसाचे पाणी जाते. त्याव संबंधित अधिकारी यांनी उपाययोजना करावी बऱ्याच भागात ले-आऊ अधिकारी हे टेबलावरती बसून मंजूर करतात. उल्कानगरी मध्ये नाल्यावर रस्ते बांधले यामुळे असे प्रश्न निर्माण होतात. श्री. भालेरावची अडचण १५ दिवसांत दूर करण्यात यावी.

**मा. सभापती :** संबंधिताने उद्या जाऊन पाहणी करून घ्यावी व आवश्यक ती उपाययोजना करावी. यापुढे रेखांकन मंजूर करतांना दखल घेण्यात यावी.

**श्री. राजकुमार बचाटे (मामा) :** आकाशवाणी मागे, आकाशवाणी ते जवाहन कॉलनी परिसरात विष्णनगर, बौध्दनगर, भानुदासनगर, अरिहंतनगर, इ. माझ्या ही वॉर्डात काही खोलवजा भागात जास्तीचा पाऊस आल्यास गुढग्यापर्यंत पाणी साचलेले दिसून येते. एकदम पाणी साचल्यावर पाणी जात नाही व ज्यांचे घर त्या लगत आहेत अशा नागरिकांच्या घरामध्ये कधी कधी पाणी जाते यावर काही उपाययोजना करावी. यासाठी ज्या उपाययोजना करणार आहात त्या प्रस्तावातून माझ्या वॉर्डाचा भाग वगळण्यात येवू नये.

**श्री. स. अ. एकबालोद्दिन :** बुढ्ढीलेन, ज्युब्लीपार्क भागातही पावसाळ्याचे पाणी साचून राहते.

**मा. सभापती :** शहरात बऱ्याच ठिकाणी पाथवे करून तेथे "कॅचपिट" टाकून पाणी साचणार नाही व नागरिकांना जास्तीच्या पावसाच्या पाण्याचा त्रास होणार नाही. तसेच ज्या ठिकाणी दोन्ही भाग उंच असेल त्या ठिकाणचे पाणी बाजूच्या एखाद्या प्लॉटवाल्या कडून जागा घेऊन पाणी कसे काढता येईल याकडे लक्ष वेधून श्री. भालेराव यांच्या घराजवळ जे पावसाचे पाणी साठूवन घरात जाते. त्या ठिकाणी प्रत्यक्ष संबंधित अधिकारी यांनी जाऊन उपाययोजना करावी अशा प्रकारची अंमलबजावणी संपूर्ण शहरासाठी करावी.

**सौ. गौतम लांडगे :** सभागृहात स. सदस्य श्री. ढगे यांनी सूचना केल्याप्रमाणे त्याच संदर्भात नाले साफ करण्याचा प्रश्न उपस्थित केला होता की, शहरातील नाल्याची साफसफाई व्यवस्थित पणे झालेली दिसून येत नाही. डासांचे प्रमाण वाढलेले आहे. त्याला स्थगिती दिली नाही. त्यामुळे मागच्या भागात पाणी घुसते.

**सहा. संचालक नगररचना :** त्या बाबतची संचिका आलेली आहे. ती संचिका पडताळणी करून त्यावरील डिझाईनची सविस्तर पाणी करून कार्यवाही करण्यात येईल.

**श्री. गौतम लांडगे :** आपण त्या नाल्यावर परवानगी कशी दिली.

**श्री. संजय जोशी :** खिंवसरा पार्क येथील नाल्याची रुंदी मागे व पुढे ९ मीटर आहे. मध्येच २-३ मीटर होते. येथे बराच लांब नाल्यावर स्लॅब टाकण्यात आला आहे. काही दिवसांनी औषध भुवन येथे जसा प्रश्न उपस्थित झाला तसाच खिंवसरा पार्क व राही टावर्स येथे होणार आहे. तेथील नाला बंद केला. ही डिझाईन कशी करतात, शहरातील नाले साफ सफाई झाली नाही.

**मा. सभापती :** उपआयुक्त (म.) यांनी खुलासा करावा.

**उपआयुक्त (म.) :** ठरल्याप्रमाणे स. सभासदा सोबत काही नाल्याची पाहणी करण्यात आलेली आहे. झांबडे इस्टेट जवळील नाल्याची ही पाहणी केलेली आहे. दर्गाची व इतर काही ठिकाणी पाहणी करून त्या ठिकाणी प्रशासनाने कार्यवाही आहे. कार्यकारी अभियंता, आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी स्वत: जाऊन कार्यवाही केली. तो नाला संपूर्णत: साफ सफाई झालेला आहे व पाणीही पुर्णपणे वाहून जात आहे. त्या ठिकाणी सध्या डासांचा प्रादूर्भाव नाही. तरीही आरोग्य वैद्यकीय अधिकारी वेळोवेळी औषधी फवारणी करून कार्यवाही करतील.

**सौ. राधा तळेकर :** बऱ्याच ठिकाणी नाल्याची घाण साचलेली असते. त्यामुळे पाणी थांबून राहते व डासांचा प्रादूर्भात वाढतो व नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागतो. ड्रेनेजचे पाणी उल्कानगरीतील भागास मोकळे सोडलेले आहे. त्यामुळे दुर्गंधी वाढलेली आहे. डॉ. तूपकरीच्या घरासमोरून सेव्हनहील पासून लाईन टाकलेली आहे. आरोग्य विभाग मार्फत वेळोवेळी फवारणी केल्याने डांसाचे प्रमाण कमी होईल. संबंधित फवारणी करणारे कर्मचारी हे पुरपुर नाल्यात फवारणी करीत नाही.

**श्री. संजय जोशी :** ड्रेनेजचे पाणी सिडको एन-४ पासून शहानुरमियाँ दर्गापर्यंतच्या नालयात पाईपद्वारे सोडून दिलेले आहे. ते बंद करावे.

**श्री. स. अ. एकबालोद्दिन :** नाल्यावरच्या ड्रेनेजची लाईन चालू नसते. महापालिका यावर लाखो रुपये खर्च करते.

**मा. सभापती :** बऱ्याच ठिकाणच्या नाले साफ झालेले आहेत. ज्या ठिकाणचे राहिले असतील तेथील नाले संबंधित अधिकारी यांनी साफ करून घ्यावे. पाणी वाहते करो. तळ दाखविल्या शिवाय देयक अदा करायचे नाही.

**सौ. राधाबाई तळेकर :** १) वॉर्ड क्रमांक ७६, भुषननगर, गजाननगर, मातोश्रीनगर, पुंडलिकनगर, एन-३, एन-४ या भागातील ड्रेनेज लाईनचे पाणी उल्कानगरीजवळ अशोका अपार्टमेंट येथे साडून देण्यात आलेले आहे. ही पाईप लाईन प्रत्येक ठिकाणी फुटलेली आहे. बाजूच्या उल्कानगरी भागात नागरिक राहतात. त्या भागात बऱ्याच अपार्टमेंट (प्लॅट सिस्टीम) ची घरे असून तेथील लोकांना वास येतो. खिडक्या उघडणे अवघड आहे. पाहणी करायला गेल्यास तोंडात डास जातात. यात पावसाच्या पाण्यामुळे आणखी घाण अडकलेली असून तेथील नागरिकांचे जीवन धोक्यात येण्याची शक्यता टाळता येत नाही. २ वर्षापूर्वी सेव्हनहील रोड अशोकनगर डॉ. तुपकरीच्या घरांजवळव गुडघ्या इतके पाणी साचले होते. गेल्या वर्षी साप चावला. ड्रेनेजसाठी वारंवार पत्र दिले.

२) बऱ्याच ठिकाणी रस्त्याच्या कडेला गरीब लोकांचे घरे आहेत. महापालिकाने डांबरीकरण करून रस्ते उंच झालेले असून या गरीब लोकांची घरे खाली झालेली आहेत. हे गरीब लोक २०X३० च्या प्लॉट मध्ये राहतात असे प्लॉट घेणे चुकीचे आहे. मान्य आहे परंतु त्यात ते आपली जिविका भागवितात. पाऊस जास्तीचा पडल्यावर या लोकांच्या घरात पाणी जाते त्यामुळे त्यांचे आरोग्य हे भविष्यात धोक्याचे बनु शकते. यावर प्रशासनाने त्यांना मदत करावी. डांबरीकरणात थोड्या-थोड्या अंतरावर खड्डे आहे. काही ठिकाणी लवन झाले. त्याकडे लक्ष देण्यात यावे.

**मा. सभापती :** पुंडलिकनगर, हनुमाननगर य भागात ड्रेनेज लाईनसंबंधी संबंधीत अधिकारी यांनी पाहणी करून आवश्यक ती उपाययोजना करावी.

**श्री. गौतम लांडगे :** स. सभासद यांच्या सूचनेनुसार ड्रेनेज लाईन ओपन का सोडली याची माहिति द्यावी.

**श्री. संजय जोशी :** जवाहर पोलिस स्टेशन जवळ ड्रेनेज लाईन टाकलेली आहे. त्याजवळ चेंबर जोडले तर व्यवस्थित होईल.

**मा. सभापती :** मी स्वतः व उपआयुक्त (म.) या ठिकाणी भेट देऊ व कार्यकारी अभियंता सोबत उद्या पाहणी करतण्यात येईल व नंतर ड्रेनेज लाईन ओपन आहे काय? या बाबत कार्यवाही करण्यात येईल. उत्तमनगर व इतर भागात डांबरीकरण होणे आवश्यक आहे.

**श्री. स.अ. एकबालोद्दिन, श्री. विखारोद्दिन पी. खुदबोद्दिन :** ड्रेनेज पाईन लाईन टाकल्यानंतर किती दिवस चालायला पाहिजे याची संबंधित अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**श्री. गौतम लांडगे :** माजी आयुक्त श्री. भोगे साहेब असतांना नविन रस्त्याचे डांबरीकरण झाल्यावर ते किती प्रमाणात झाले आहे. याची शहानिश करत असे. आताचे डांबरीकरण हे फक्त १-१ वर्ष टिकते. यात अधिकारी लक्ष देऊन काम करत नाही. डांबरीकरण करतांना किती डांबर वापरले जाते. व तो डांबरीकरण केलेला रस्ता जास्तीत जास्त किती दिवस टिकवावा या बाबत खुलासा करावा. कामावर संबंधित अधिकाऱ्यांचे नियंत्रण नसते. जाधववाडीस रस्त्याच्या डांबरीकरणासाठी एका गुत्तेदाराचे श्री. भोगे यांनी ७ महिने पैसा

दिलेला नव्हता. तसे ज्या भागात गुत्तेदाराचे काम समाधानकारक नाही. त्यांच्यावर कार्यवाही करावयास पाहिजे.

**अतिरिक्त शहर अभियंता :** ज्या ठिकाणी डांबरीकरण झाले त्या जागेवर, पाण्याची पाईप लाईनसाठी, ड्रेनेज व टेलीफोन दुरुस्तीसाठी जर खोदकाम केले नाही तर ४-५ वर्षे चालते.

**मा. सभापती :** डांबरीकरण केल्यानंतर किती वर्षाची रोडची गॅरंटी असते? संबंधित सदस्यांचा या भागात स्लम भाग येतो काय?

**सौ. राधाबाई तळेकर :** येथील भाग हा "स्लम" मध्ये येतो. परंतु अधिकारी यांचे कोणत्याही विकासाची कामे करण्यावर लक्ष नसते. आरोग्य विभाग, डांस मारण्यासाठी औषध फवारणी करतात ती एकदा करून चालत नाही. त्यासाठी नेहमी नेहमी फवारणी करणे गरजेचे आहे. तरच डांस मरतात. फवारणीचे औषध चांगल्या क्वॉलिटीचे दिसत नाही. याचे कारण म्हणजे डासच मरत नाही.

**श्री. विखारोद्दिन पी. खुदबोद्दिन :** एकदा रस्त्यावर डांबरीकरण झाल्यावर कमीत कमी ते ४-५ वर्षे त्या रस्त्यावर डांबरीकरण झाले न पाहिजे. येथे तर १-१ वर्षामध्ये रोडवर डांबरीकरण होऊ लागले आहे. याचे कारण काय? त्यामुळे महापालिकाचे आर्थिक नुकसान होत आहे.

**मा. सभापती :** एकदा रोड डांबरीकरण झाल्यावर तो किती दिवस चांगल्या प्रकारे राहु शकतो. संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**श्री. संजय जोशी :** महानगरपालिकेचे दुर्दैव आहे. इतर विभागाच्या कामाचे व महानगरपालिकेचे कामात समन्वय नसते. याबाबत पॉलिसी डिसजिन होणे आवश्यक आहे. याबाबत शहरातील अशा सर्व कामाची पाहणी करून निर्णय घ्यावा.

**कार्यकारी अभियंता (स्लम):** रोडवर एकदा डांबरीकरण केल्यानंतर ते कमीतकमी ३ वर्षापर्यंत राहु शकते २ वर्षानंतर त्याचे "सिलकोट" करावे लागते. रस्त्यावरील पाणी पुरवठा / ड्रेनेज/ टेलिफोन व महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे पोलमुळे खड्डे रस्त्यावर होतात त्यामुळे रस्ते व्यवस्थित राहत नाही.

**श्री. विखारोद्दिन :** एकदा डांबरीकरण केल्यानंतर ४ वर्षानंतर त्याचे "सिलकोट" करावे लागते. जर पाणी पुरवठा, टेलिफोन या व इतर कामासाठी खोदकाम झाले तर त्या बाबत भविष्याच्या दृष्टीने उपाययोजना कराव्यात. यापूर्वी मी संबंधित अधिकाऱ्यांना माझ्या वॉर्डा संदर्भात विचारणा केली असता त्यांनी नका दिलेला आहे.

**मा. सभापती :** उपआयुक्त (म) यांनी एक पत्र काढुन, पाणीपुरवठा, लाईट, ड्रेनेज पाईप लाईन, अशा प्रकारची कामे कशा पध्दतीने करावयाची या बाबत आपण एक बैठक घेऊन त्यानुसार निर्णय घ्यावे व टेलिफोन, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, यांना करावयाची या बाबत आपण एक बैठक घेऊन त्यानुसार निर्णय घ्यावे व टेलिफोन, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ यांना ही आगाऊ सूचना पत्राद्वारे द्याव्यात व भविष्यात अशा चुका होऊ नयेत व एकमेकांमध्ये समन्वय असणे आवश्यक आहे.

**श्री. तुळशीबागवाले किशोर :** महानगरपालिकेकडून बांधकाम परवानगी देण्यात येते ज्या वेळेस भोगवटा प्रमाणपत्रासाठी लोक येतात, जादा बांधकामाबद्दल त्यांना दंड लावण्यात येते. भोगवटा प्रमाणपत्र घेतल्यानंतर धंदेवाईक बिल्डर लोक नंतर जादा बांधकामे करून प्लॅट विकण्यात येते. त्यामुळे भोवटा प्रमाणपत्र /

पूर्णातवाचे प्रमाणपत्र दिल्यानंतर किती लोकांनी जादा प्लॅट बांधले त्यावर नगररचना विभागाने कनिष्ठ अभियंत्यांना नेमून त्यांचा शोध घेवून आवश्यक ती कार्यवाही करावी.

**श्री. गौतम लांडगे :** बिल्डर्स हे आपल्या विभागाकडून प्लॅन मंजूर करून घेतात. त्यावर कम्पलेशन दाखल करून, कोणत्या बिल्डर्सने अथवा नागरिकांने जास्तीचे बांधकाम केलेले आहेत. त्यांच्याकडून जास्तीची रक्कम दंड म्हणून वसूल करण्यात यावी. बरेच लोक पार्ट कम्पलेशन प्रमाणपत्र घेतात त्यामुळे त्यांना संपूर्ण सवलत मिळते. प्रशासनाने बारकाईने पहावे व तशा प्लॅटसचे शोध घ्यावे.

**श्री.स. अ. एकबालोद्दिन :** यासाठी एक समिती तयार करावी.

**श्री. संजय जोशी :** बांधकाम परवानगी नसतांना संबंधित नागरिक अथवा बिल्डर्स परवानगी व्यतिरिक्त जर बांधकाम केलेले असेल तर त्या बाबतचे रेकॉर्ड संबंधित विभागात नसेल तर त्या विभागाकडून दंड वसूल करावा. व प्रशासकीय अधिकारी यांचेकडे कंम्प्लेशन प्रमाणपत्राची प्रत द्यावे. त्यानंतर संबंधित विभाग कार्यवाही करेल.

**मा. सभापती :** शहरात "बिल्डर्स" अगर कोणताही नागरिक यांनी बांधकाम परवानगी व्यतिरिक्त जास्तीचे बांधकाम केलेले असेल अशा बिल्डर्स व नागरिक यांच्या नावाची यादी तयार करून जास्तीच्या केलेल्या कामाबाबतची अतिरिक्त कामासाठी दंड वसूल करता येईल जेणे करून महानगरपालिकेच्या उत्पन्नात आणखी भर पडेल. परवानगीने केलेल्या बांधकामाच्या व्यतिरिक्त जास्तीचे केलेले बांधकाम हे किती टक्के पर्यंत करता येते. याबाबत चौकशी करून उपआयुक्त (म) सहाय्यक संचालक नगररचना व प्रशासकीय अधिकारी, यांनी त्वरित कार्यवाही करून एक महिण्याच्याआत स्थायी समितीस अहवाल द्यावा.

**श्री. संजय जोशी :** जे बांधकाम (एफ.एस.आय.) चटई क्षेत्र निर्देशांकापेक्षा जास्त बांधकाम केले असेल तर ते पाडून टाकावे.

**श्री. म. अ. रऊफ :** अनाधिकृत बांधकामा बाबत सूचना देवूनही प्रशासन कार्यवाही करीत नाही. उलट इमारत निरिक्षक मुळ मालकास आगाऊ सूचना देतात. त्यामुळे अनाधिकृत घरे शहरात जास्तीचे होत आहेत. दुकानाचे अनधिकृत बांधकामाबाबत पत्र दिले होते. परंतु आता दुकानाचे बांधकाम पूर्ण होऊन ते भाड्यानेही दिलेले आहे.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** या प्रकारणी चौकशी करण्याबाबत एक समिती नेमावी व प्लॅटेसचे बांधकाम अनाधिृत होत असल्यास ते पूर्णतः पाडावे.

**मा. सभापती :** स. नगरसेवक तक्रारी देतील त्याची दखल घ्यावी. सहा. संचालक नगररचना, प्रशाकीय अधिकारी आणि उपआयुक्त (म.) हे शहरातील सर्व अनधिकृत बांधकामाबद्दल कार्यवाही करतील. लोकांची हराशमेंट करू नये. महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होईल. त्याची काळजी घ्यावी.

**श्री. संजय जोशी :** एफ.एस.आय. शिल्लक नसतांना प्लॅटचे बांधकाम केले तर पाडावे लागेल. सामाजिक अंतरात जर बांधकाम केले असेल जसे गॅलरी, बॉक्स त्यांना प्रति चौरस मिटर प्रमाणे दंडाची आकारणी करावी.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** ज्या ठिकाणी प्लॅटच्या प्लॅटच काढण्यात येते त्यासंबंधी काय कारणार.

**श्री. स. अ. एकबालोद्दिन :** यासंबंधी कमेटी तयार करावी त्यांचे सोबत आम्ही पाहणी करू.

**सहा. संचालक नगररचना :** अशी बांधकामे फक्त १०% पर्यंतच नियिमित करता येतात.

**श्री. संजय जोशी :** म. प्रा. व न. २ अधिनियमाप्रमाणे १०% च्या वर बांधकाम केल्यास ते पाडावे लागेल. शहरातील खुल्या जागांवर अतिक्रमणे झालेली आहेत. एका खुल्या जागेतील डांबरी रस्ता नांगरला, राजनगर खुली जागा कंपाऊंडमध्ये घर झाले अशा प्रकरणात निर्णय घेण्यात यावा.

**श्री. विखारोद्दिन :** स.सदस्य श्री. जोशी यांनी योगय मुद्दा उपस्थित केला. महानगरपालिकेच्या किती खुल्या जागा आहेत. त्याचे रेकॉर्ड आहे काय? व किती खुल्या जागांवर अतिक्रमण झाले याची माहिती देण्यात यावी.

**श्री. म. अब्दुल रऊफ :** जी जमीन महानगरपालिकेची आहे त्या जागेवर कुण्याही व्यक्तींने अतिक्रमण करून बांधकाम केलेले असेल तर ते लवकरात लवकर पाडण्यात यावे व शहरतील ओपन स्पेसची माहिती द्यावी.

**प्रशासकीय अधिकारी :** पाहणी करून अहवाल सादर करण्यात येईल.

**मा. सभापती :** महानगरपालिकेच्या जागेवर ज्यांनी अतिक्रमण करून घरे बांधली आहेत. अशा (नागरिकांना) व्यक्तींना आदेश देऊन त्या दिलेल्या आदेशाचे पालन न करणाऱ्या व्यक्तींचे घर, किंवा व्यवसाय असेल तर तेथील अतिक्रमण पाडण्यात यावे. अशी संबंधित अधिकारी यांना मी आदेशित करतो व यापूर्वी सूचना केल्याप्रमाणे दोन महिण्यात प्रशासनाने अहवाल द्यावा.

**श्री. स. अ. एकबालोद्दिन :** मागे एक पत्र दिले होते. फंक्शनच्या हॉलच्या बाजूला एक वक्फ बोर्डा जवळील जागेबाबत, त्या जागेचे पी.आर. कार्ड पण स. सभासद हे कागदोपत्री रेकॉर्ड मा. सभापती यांना दाखवतात. सिटी स. न. ३८७८ वर फंक्शन हॉल बांधावे. वक्फ बोर्डाची जमीन बाजूला आहे.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**उप अभियंता (इ.) :** सदर कामाची निविदा मंजूर झाली. जागेवर आखणी देण्यात आली. स्थानिक लोकांनी अडथळे निर्माण केले. वक्फ बोर्डाने या संबंधात पत्र दिले. याबाबतीत मालमत्ता अधिकारी यांचा अभिप्राय घेतला. कालच संचिका प्राप्त झाली. पी.आर. कार्ड न. प. च्या काळातील आहे.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी वक्फ बोर्डला एक पत्र देऊन त्यांना कळवावे की, जी जागा आपल्या मालकीची नाही. महापालिकेची जागा व त्यांचे मुळे वक्फ बोर्डाची जागा दोन वेगवेगळे प्लॉटस आहेत. कागदपत्र महानगरपालिकेकडे आहेत व जागा महानगरपालिकेची आहे.

**श्री. स. अ. एकबालोद्दिन :** येथील जागेवर संबंधित व्यक्तीने कॅव्हेट दाखल केलेल आहे. अतिक्रमण झालेल्या जागेबाबतचे रेकॉर्ड दाखवणाऱ्यावर योग्य ती कार्यवाही व्हावी. या संदर्भात उपअभियंता (इ) यांचे नांव अफसर सिद्दीकी, त्यांचे कनिष्ठ अभियंता सिद्दिकी तर वक्फ बोर्डाचे सुध्दा सिद्दिकी असे तिघांचे ही नांव सिद्दिकी असून संगनमताने काम करीत आहेत.

**मा. सभापती :** शहर अभियंता यांनी माहिती द्यावी.

**शहर अभियंता :** ठिक आहे या संदर्भात मी पोलिस मदत घेतो व त्यानंतर तेथील कामाबाबतची कार्यवाही करतो.

**सौ. यशोदा वाडेकर :** रोकडा हनुमान कॉलनी ते क्रांतीचौक या रस्त्यावर बऱ्याच ठिकाणी पाणी साचते. तसेच त्या भागात बऱ्याच ठिकाणी अतिक्रमणे झालेली आहेत.

**श्री. गौतम लांडगे :** सभागृहात स. सभासदांच्या भावना लक्षात घेता ज्या सभेत सभासद संबंधित कामाबाबत चर्चा करतात. तक्रार करतात त्या कामाबाबत संबंधित अधिकारी यांनी वेळेच्या आत ते काम करावयास पाहिजे.

**श्री. म. अ. रऊफ :** माझ्या वॉर्डात १ १/२ वर्षापासून शादीखाना या ठिकाणचे काम बाकी राहिलेले आहे. त्या कामाच्या बाबत स्टील साहित्य असतांना या कामाच्या डिझाईन मध्ये काही बदल झालेत. संबंधित अधिकारी यांनी सूचना करूनही साईटवर येण्याची टाळाटाळ करतात. तेथील स्टिल असतांना लवकरात लवकर स्लॅब टाकण्यात येत नाही हे काम केवळ खांब उभारणीवर थांबलेले आहेत. येथे १५ दिवसांच्या आत स्लॅब टाकण्यात यावा. संबंधित कनिष्ठ अभियंता साईटवर आहेत असे सांगतात. पण प्रत्यक्षात ते साईटवर दिसत नाही.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**उप अभियंता (इ.) :** या बांधकामाच्या जागेत खोदकामासाठी जमीन अत्यंत कठीण (हार्डस्ट्राट) आहे. त्या कामाबाबत काही डिझाईन मध्ये या बदल करण्यात आलेले असून तेथे स्टिल साहित्य उपलब्ध नाही. साहित्य मागवावे लागेल. डिझाईन व स्ट्रक्चरला मंजुरी आहे. लवकरच स्लॅब टाकण्यात येईल. काम केले नाही तर ठेकेदाराला नोटीस देवून त्यावर कार्यवाही करून ठेका रद्द करता येईल.

**श्री. म. अ. रऊफ :** त्या ठिकाणी साहित्य पडलेले आहे हे संबंधित अधिकारी यांना माहिती नाही. त्या ठिकाणी या कामाकरिता दोन (व्यक्ती) कामगार काम करतात दोन व्यक्तींकडून हे काम होणे शक्य नाही. मुद्दामहून हे काम उशीरा होत आहे. ऑफिसमध्ये गेल्यावर संबंधित अधिकारी हे साईवर गेले असे सांगितले जाते.

**शहर अभियंता :** आम्ही १ महिन्यात छताचे काम करून घेवू.

**मा. सभापती :** १) (एक) महिण्याच्या आता या ठिकाणी स्लॅब टाकून काम पूर्ण करून घ्यावे. साहित्य असतांना काम उशिरा होणे ही गंभीर बाब आहे. वॉर्डात कोणतेही कामास सुरुवात झालेले काम काही कारणास्तव अपूर्ण राहिलेले आहेत ते पूर्ण काम लवकरात लवकर कसे करता येईल याकडे सर्व विभागातील अधिकारी यांच्या अधिपत्याखाली येणारी कामे दिरंगाई न लावता तत्परतेने करावी.

२) ज्या विभागातील कर्मचारी सकाळी कार्यालयामध्ये आल्यावर कोणत्याही साईटवर गेले आहेत याची पूर्व कल्पना स्वतःहून हालचाल रजिस्टरवर नोंद करून ठेवावी. साईटवर जातो असे सांगून जातात, परंतु साईटवर त्याच वेळात आढळून न आल्यास त्यावर प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी.

**श्री. म. अ. रऊफ, म. अ. माबूद :** शिक्षणाधिकारी यांना १ १/२ ते २ महिने झाले. नगरसेविकाचा स्वेच्छा निधीतून शाळेतील विद्यार्थ्यांना शालये पुस्तके व वह्या यांचे वाटप लवकरात लवकर करण्यात यावे. यासाठी पत्रे दिलेली आहे. परंतु शिक्षणाधिकारी यांनी अद्यापही कार्यवाही केलेली नाही. सदरील संचिका ही मा. आयुक्त यांचेकडे गेलेली आहे. असे सांगतात. आता शाळा सुर होऊन बरेच दिवस झालेत. आजपर्यंतही विद्यार्थ्यांना पुस्तके, वह्या मिळालेल्या नाहीत. ही गंभीर स्वरुपाची बाब आहे. याकडे प्रशासनाने लक्ष द्यावे.

**मा. सभापती :** शिक्षणाधिकारी यांनी माहिती द्यावी.

**मा. शिक्षणाधिकारी :** विद्यार्थ्यांना शालेय पुस्तके व वह्या देण्याबाबतच्या कामाचे टेंडर काढण्याची कार्यवाही चालू आहे. त्यानंतर पुस्तके वह्या विद्यार्थ्यांना वाटप करता येतील.

**श्री. गौतम लांडगे, श्री. म. अ. रऊफ, म. अ. माबूद :** प्रत्येक नगरसेवकांच्या शिक्षणाधिकारी यांच्या वेगवेगळ्या प्रकरणाबाबत नेहमी तक्रारी असतात कार्यालयात जाऊन विचारणा केली तर ते जागेवर सापडत नाही. तेथील कर्मचारी हे नेहमी साहेब व्हिजीटवर गेले अशी उत्तरे देतात. त्यामुळे कोणतेही काम करण्यास दिरंगाई होते. याची प्रशासनाने दखल घ्यावी. त्यांना १-२ मेमो दिल्याचे समजते. सभागृहाने निर्णय घेतलेला आहे की ४० दिवसांत काम करावे आता वह्या व पुस्तके कधी देणार.

**मा. सभापती :** स. सदस्य यांनी स्वेच्छानिधीच्या संदर्भात कोणत्याही कामासाठी पत्र दिल्यानंतर त्या त्या संबंधित विभागातील अधिकाऱ्यांनी ४० दिवसांच्या आत त्या बाबत कार्यवाही केली पाहिजे. असे सभागृहात बऱ्याच वेळेस मी सूचना केलेली आहे. अधिकारी या बाबत दिरंगाई करीत असतील तर त्यांच्यावर कार्यवाही केली जाईल तसेच शिक्षणाधिकारी यांना सुचित करतो की, स. सदस्य श्री. रऊफ यांनी उपस्थित केलेल्या सुचनेनुसार पुस्तके, वह्या विद्यार्थ्यांना लवकरात लवकर मिळाव्या या बाबत कार्यवाही करावी.

**सौ. यशोदा वाडेकर :** पाणी पुरवठ्या बाबत माझ्या वॉर्डातील रोडकीया हनुमान कॉलनी येथील जे काम आहे त्यासाठी बजेट नाही काय? गेल्या दिड वर्षापासून मी सतत विचारणार करीत आहे. परंतु बजेट अभावी काहीही कार्यवाही होत नाही असे सांगितल्या जाते.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.१)** अंदाजपत्रक केलेले आहे या कामासाठी बजेट नसल्यामुळे ते काम राहिलेले आहे.

**श्री. गौतम लांडगे :** दिनांक ०६-०७-९७ रोजी गौतमनगर येथील शाळेच्या संदर्भात मी पत्र दिले होते १ वर्ष पत्र अगोदर दिले तरी त्याबाबत काहीही कार्यवाही होत नाही. गौतमनगर येथील जागा सांभाळात सांभाळता नाकात दम येतो. एकदा अतिक्रमण उठवले अधिकारी हे कार्यालयीन कामाबाबत टाळाटाळ करीत असेल तर त्यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी.

**श्री. विखारोद्दिन :** प्रभागनिहाय बजेट करावे.

**मा. सभापती :** लेखाधिकारी यांनी खुलासा करावा.

**मुख्यलेखाधिकारी :** ज्या वेळेस आमच्याकडे प्रस्ताव येतात त्यानुसार आम्ही अगोदर येणारे कामाची नोंद घेतो. जसजसे प्रस्ताव स. नगरसेवकांकडून येतात त्यानुसार बुकींग होत असते. व त्यानुसार निविदा मागवून कार्यवाही केल्या जाते. जवळपास दिड कोटीचे अंदाजपत्रक असते. एकाच वेळेस १०-१५ स. सदस्यांनी पत्र दिलेले असल्यास ते अंदाजपत्रक तयार केल्यास संपून जाते. आणि यासाठी त्या त्या विभागाच्या कामानुसार तातडीने कार्यवाही व्हावयाची असते ती करणे आवश्यक असते.

**सौ. राधाबाई तळेकर :** एखाद्या स. नगरसेवकांचे १० लाखाचे इस्टीमेंट तयार होऊन त्यांची कामे व्यवस्थितपणे होते. आणि (दिड) १.५० लाख रुपयाचे इस्टिमेंट तयार करून ते बजेट नाही म्हणून मंजूर होत नाही. म्हणजे जेष्ठ नगरसेवकांना

प्राधान्य दिले जाते असे आहे काय? ७ ते ८ स. नगरसेवक सोडले तर उर्वरित नगरसेवकांचे कामाचा देखील विचार व्हावा.

**सौ. यशोदा वाडेकर :** जेष्ठ स. नगरसेवकांच्या दबावात येऊन काम करतात.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी बजेट बद्दल शेरे येतात हे बरोबर नाही.

**श्री. गौतम लांडगे :** माझ्या वॉर्डात एका बालवाडी इमारतीसाठी रु. ३.०० लाखाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून ही कार्यवाही झाली नाही जर माझ्या वॉर्डातील बालवाडी इमारतीचे काम झाले नाही तर अंदाजपत्रकीय पुस्तक सभागृहात फाडून टकीन.

**मुख्यलेखाधिकारी :** लेखा विभागात प्रत्येक संचिकेची नोंद होते ज्या संचिका पहिल्यांदा येतात त्यांना मंजूरी दिली जाते. काही वेळेस एकत्रच १०-१२ संचिका १.५० कोटी रुपयाच्या आल्यास बजेट संपते माहे एप्रिल / मे / जून या महिण्यात आलेल्या प्रस्तावावर बुकींग होत नाही. त्यापूर्वीच आलेले असतात कारण त्या वेळेस आचारसंहिता असल्याने माहे डिसेंबर मध्ये बऱ्याच स. सदस्यांनी प्रस्ताव दाखल केलेले होते. त्यानुसार कार्यवाही केली होती व कामे चालू होती.

**मा. सभापती :** पाण्याची समस्या गंभीर स्वरुपाची आहे. स. नगरसेवकांचे ज्या ज्या वॉर्डात पाणी बाबतच्या समस्या आहेत. अशा प्रकरणातील ज्या संचिका आहेत त्या लवकरात लवकर निकाली काढव्यात व नागरिकांना पाण्यापासून वंचित राहता येणार नाही याबाबत योग्य कार्यवाही करावी. कोणते बजेट बाकी आहे. त्यातून कामे कसे करता येईल हे पाहावे.

**श्री. म. अ. रऊफ :** चेलीपुरा ते लोटाकारंजा येथे पाणी पाईप लाईन टाकलेली आहे. ४ ते ५ दिवस चांगले व्यवस्थित पाणी ओल परंतु नंतर पाणीच येत नाही. संबंधित कनिष्ठ अभियंता यांनीही कधी पाहणी केलेली नाही. महापालिकेने ३.५० (साडेतीन) लाख रु. खर्च करून ही पाण्याची पाईपलाईन टाकलेली आहे. परंतु त्यांचा नागरिकांना उपयोग झाला पाहिजे.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.-१)** सदरील कामासंबंधी अधिकारी यांनी उद्याच पाहणी करून तात्काळ करावे. महापालिकेने लाखो रुपये खर्च करून ही पाईपलाईन टाकलेली असतांना सुरळीत पाणी पुरवठा होत का नाही याची तपासणी करावी.

**श्री. राजु इंगळे :** शहरातील ज्या ठिकाणी पाणी साठवण्याच्या टाक्या आहेत त्या साफ कराव्यात. जास्त कालावधीनंतर टाक्या साफ न केल्यास नागरिकांच्या आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता आहे. आजच सिडकोतील एन-८ भागात नाळामधून मेलेल्या पक्षाचे पिसे दिसून आले. त्यामुळे नागरिकांमध्ये चिड निर्माण झाली. माझ्या प्रभागात पाईपमधून कावळा निघाला याबाबत लवकरच कार्यवाही करावी.

**मा. सभापती :** कार्यकारी अभियंता (पा.पु.-१) यांनी १ वर्षाला पाण्याच्या टाक्या साफ कराव्यात टाकीवरील झाकण उघडे असेल तर बंद करावे जेणे करून नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होणार नाही. तसेच स. सदस्य श्री. राजु इंगळे यांच्या वॉर्डातील ज्या टाकीमधून पाणी पुरवठा होतो. ती टाकी त्वरित साफ करावी व अशा प्रकारची घाण नळाद्वारे येणार नाही याची दक्षता घ्यावी.

**श्री. विखारोद्दिन :** स. सदस्य श्री. जावेद रज्जा यांच्या आत्मदहनाच्या धमकीमुळे महापालिका प्रशासनाने पाणीपट्टी कमी करण्याचा विचार केला आहे काय? मागे मा. महापौर / उपमहापौर यांचेकडे शिष्ट मंडळाद्वारे बैठक झाली होती व तसा निर्णय झाला होता.

**मा. सभापती :** याबाबतची चर्चा सर्वसाधारण सभेमध्ये करावी व स. सदस्याच्या सुचनेप्रमाणे तसा प्रस्ताव प्रशासनाने केलेला नाही असे मला वाटते.

**श्री. विखारोद्दिन :** गेल्या दोन बैठकी पासून सतत चर्चा करीत आहे. त्यानुसार स. सदस्याचे सांगितल्याप्रमाणे कामे केलेली आहेत काय? रेल्वेस्टेशन येथील ओव्हर ब्रिजच्या कामाच्या बाबतीत अद्याप ही कार्यवाही झालेली नाही. या कामासाठी भूसंपादन प्रक्रियेत तेथील ५-६ कुटुंबियांना पर्यायीी व्यवस्था केलेली असून त्यांना गेल्या काही दिवसांपासून लाईट व पाणी पुरवठ्याची व्यवस्था केलेली नाही. मागील सभेत ८ दिवसांत सुविधा देऊन शिफ्टींग करण्यात येईल असे आश्वासन दिलेले होते. त्याप्रमाणे काय झाले? येथील रस्त्यात बाधित होणाऱ्या २५ टपऱ्या तोडण्यात आल्या त्या नियमाप्रमाणे केलेल्या होत्या तेथे त्यांना सुविधा उपलब्ध करून दिलेल्या नाही. त्यांचे करारनामा अद्यापही केलेला नाही. याबाबत तातडीने कार्यवाही व्हावी.

**मा. सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करणेच्या सूचना दिलेल्या आहेत. तरीही येत्या ४-५ दिवसांत योग्य ती कार्यवाही पाणी पुरवठा व लाईट बाबत करण्यात यावी.

**श्री. म. अ. रऊफ, म. अ. माबूद :** चिकलठाणा व छावणी येथील आठवडी बाजारातील संबंधित ठेकेदाराकडून हराशीचे पैसे ६ महिण्यापासून वसूल करण्यात आलेले नाही. तरी संबंधित अधिकारी हे लक्ष देत नाही. ६ महिण्यापासून वसूली का करण्यात आली नाही. याचा खुलासा करावा. ज्यामुळे मनपाची थकबाकीने उत्पन्नात वाढ होत नाही.

**मा. सभापती:** संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**मालमत्ता अधिकारी :** संबंधित ठेकेदाराकडून थकबाकी रक्कम वसूल करण्यात येईल तशी त्यांना सूचना दिलेल्या असून नोटीसही दिलेली आहे.

**मा. सभापती :** सदरील ठेकेदाराला वसुली बाबत नोटीस देऊन त्यांच्याकडून संबंधित अधिकारी यांनी थकबाकी राहिलेली जी रक्कम असेल ती वसूल करावी नाही तर त्या ठिकाणी कुलूप लावावी.

**सौ. राधाबाई तळेकर:** संबंधित ठेकेदाराकडे ६-६ महिने थकबाकी वसुलीची रक्कम वसूल केल्या जात नाही. पैसे वसुलीसाठी नोटीसा पाठविता आणि एखाद्या गरीब नागरिकांचे घर पाडावयाचे असल्यास नोटीस देऊन पाडत नाही हे प्रशासनाचे धोरण योग्य नाही.

**श्री. विखारोद्दिन :** अग्निशामन अधिकारी यांनी एका स्थानिक केबलवाहिणी वरून असे प्रसारित केले की, अग्निशामन दल हे शासनामार्फत चालवावे हे सत्य आहे काय?

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**अग्निशमन अधिकारी :** खऱ्या अर्थाने तसे मी काही बोललोच नाही चुकीने माझ्या तोडी सदरचे वाक्य टाकले गेले आहे.

**श्री. संजय जोशी :** अग्निशमन दल विभागात असलेले दै. वेतनावर टेलिफोन ऑपरेटर यांना जे. दै. वेतन रु. २५ आहे, इतर कार्यालयीन टेलिफोन ऑपरेटर यांना ६०

रु. प्रमाणे दैनिक वेतन देण्यात येते. तसेच मा. महापौर बंगल्यावर ही ६ कर्मचारी दै. वेतन रु. ३० ते ३५ प्रमाणे गेल्या ८/९ वर्षापासून काम करतात त्यांनाही दै. वेतनवाढ व्हावी.

**मा. सभापती :** एकाच पदावर जर वेगवेगळ्या ठिकाणी कोणताही कर्मचारी हा कार्यरत असेल तर त्याचे दै. वेतन हे सर्वांना सारखेच असेल पाहिजे. एका विभागातल्या कर्मचाऱ्यास जास्त व दुसऱ्या विभागातल्या कर्मचाऱ्यास हे प्रशासनाचे धोरण योग्य नाही. तसेच मा. महापौर यांच्या बंगल्यावरील ६ कर्मचारी फिक्स पगारावर काम करतात. त्यांना व अग्निशमन दलातील टेलिफोन ऑपरेटरला सप्टेंबर ९७ पासून त्यांच्या कामाप्रमाणे सर्वांना सारखेच दर देण्यात यावे.

**उपआयुक्त (प.) :** इतर कर्मचाऱ्यांना जे दिले जाते ते त्यांना देण्यात येईल.

**श्री. म. अ. रऊफ, म. अ. माबूद :** बाबा फरजन यांच्या निवास स्थानाजवळ महापालिकेने नाल्यावर भिंत बांधण्याचे ठरविले परंतु येथे श्री. बाबा फरजन यांनी वाद केला की, या भिंतीलगतची जागा ही म.न.पा. च्या मालकीची नाही. त्यामुळे येथील काम ३ महिने झाले तरी पूर्ण झाले नाही. त्यांचे म्हणणे आहे नाल्यातून भिंत बांधावी त्यांच्या भिंतीवर बांधकाम करू नये.

**उप अभियंता (ड्रेनेज) :** न्यायालयाचा मनाई हुकूम आहे. नाल्यातून बांधकाम केले तर पुलाचा १ व्हॅट बंद होतो.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी या ठिकाणी पाहणी करून योग्य ती उपाययोजना करून ते काम त्वरित सुरू करावे. तत्पुर्वी उपआयुक्त (प्र.) यांचेकडे संबंधित अधिकारी यांनी न्यायालय प्रकरण असल्यास चर्चा करावी.

**श्री. राजकुमार बचाटे :** महापालिकेचे विभागीय कार्यालय असलेली "वसंत भवन" झोन नं.२ ही बिल्डींग अनेक दिवसांपासूनची जुनी अशी इमारत आहे. या इमारतीत आतील व बाहेरील काही सुधारित काही कामे करावयाची आहे. तसेच या इमारतीच्या वर जे पत्र्याचे छत आहेत त्यात ही सुधारणा करावी. या ठिकाणी मुले कामगार भवनात खेळ खेळतात. त्यांना त्रास होणार नाही येथील सिमेंटचे पत्र फाटलेले दिसतात त्यांची दुरुस्ती व्हावी.

**मा. सभापती :** "वसंत भवन" येथील विभागीय कार्यालय असलेली महापालिकेचे बिल्डींगमध्ये, कामगार कल्याण केंद्रात संबंधित अधिकारी यांनी तेथील पाहणी करून दुरुस्तीची कार्यवाही करावी. सिमेंटचे पत्र्यांना छिद्र पडलेले आहे. पाणी गळते ताबडतोब दुरुस्तीची कामे करावी.

**श्री. म. अ. रऊफ :** किराडपुरा शाळा क्र. १ व नॅशनल स्कूल जवळ ज्या कचरा कुंड्या ठेवलेल्या आहेत त्या शाळेपून दूर ठेवण्याबाबत झोनलासूचना द्याव्यात. त्या कचरा कुड्यांत घाण साचलेली आहे. त्यामुळे या ठिकाणी दुर्गंधी सुटलेली आहे. शाळेतील मुलांना तसेच येणा४या जाणाऱ्या नागरिकांच्या आरोग्याला धोका होऊ शकते. या बाबत कार्यवाही करण्यात यावी.

**मा. सभापती :** १) शाळेच्या बाजुला असलेला कचरा व कचरा कुंड्या हलवण्यात यावे.
२) भाजीमंडी औरंगपुरा येथील भाजी मार्केट दुकानाच्या जागेवर महापालिकेची इमारत बांधून जळगांव भाजीमार्केट पॅटर्न या प्रमाणे करण्याचा महापालिकेचा विचार आहे यात तळमजल्यावर भाजी मार्केट पहिला व दुसऱ्या मजल्यावर दुकाने व ३ ऱ्या मजल्यावर मंगल कार्यालय राहील या कामासाठी सर्वांचे सहकार्याची आवश्यकता आहे. त्यानुसार सदर शहर

अभियंता यांनी अंदाजपत्रक तयार करून पुढील कार्यवाही करावी. मंगल कार्यालय सर्व सुविधायुक्त व्हावे. त्यास स्वतंत्र रस्ता राहावा. तसेच भाजी मार्केटचे पुन: बांधकामामुळे २५० ते ३०० बेरोजगारांना संधी उपलब्ध होईल. जळगांव पॅटर्न प्रमाणे कार्यवाहीसाठी उपआयुक्त (म) मुख्यलेखाधिकारी व अभियंत्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून रुपरेषा आराखडे तयार करावे.

३) महानगरपालिकेतील विविध ठिकाणी साफ सफाई करण्याकरिता उभा झाडू मागणीसाठी लेखाधिकारी यांचे पत्र आलेले आहेत. त्यांनी या बाबत लवकरात लवकर कार्यवाही करून उभा झाडू त्वरित साफसफाई कर्मचाऱ्यांना देणेबाबत कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०६/१ :**

दि. १०-०७-९८ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री. संजय जोशी :** मागील इतिवृत्तातील पृष्ठ क्र. २ वर श्री. प्रकाश गायकवाड यांच्या टपरीबाबत प्रशासनाने काहीच कार्यवाही केलेली दिसत नाही. तसेच प्रकाश गायकवाड कडून भाडे अग्रीम स्विकारलेला आहे.

**उपआयुक्त (म.) :** सदरील जागेवरील टपरी ही प्रकाश गायकवाड यांची नूसन ती दुसऱ्या एका व्यक्तींची होती. त्या व्यक्तीने थकबाकी न भल्यामुळे महापालिकेने ती टपरी ताब्यात घेतली त्यानंतर श्री. प्रकाश गायकवाड यांनी थकबाकी ही ॲडव्हान्स रक्कम म्हणून भरलेली आहे. परंतु त्यांना त्या टपरीचा पूर्ण उपभोग घेता आला नाही. त्याच टपरीवर श्री. शेवगांवकर यांनी अतिक्रमण केले व या दोघात वादविवाद सुरु झालेला आहे. सध्या ही टपरी कुणाच्याही ताब्यात नसून महापालिका प्रशासनाने त्या ठिकाणी पोलिस पथकासमवेत सिल लावण्यात येणार आहे. जो पर्यंत पुढील कार्यवाही होत नाही. तो पर्यंत दोन्ही पैकी कुणालाही ही टपरी देण्यात येणार नाही. त्या टपरीतील सामान चोरी प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केलेला आहे.

**श्री. गौतम लांडगे :** क्रांतीनगर मधील टपरी ही एका माणसाठी होती. परंतु त्या व्यक्तीला उपभोग घेता न आल्यामुळे ती टपरी बंद पडून होती. त्यानंतर श्री. प्रकाश गायकवाड यांनी त्या टपरीसाठी मुळ पहिला, टपरीमालक यांच्याकडे राहिलेली थकबाकी भरण्याची तयारी दर्शविली व महापालिकाने त्यांच्याकडून टपरी थकबाकी वसुली करून घेतली व त्यानंतर श्री. प्रकाश गायकवाड यांनी उपभो घेतला. कालांतराने आर्थिक परिस्थितीमुळे ती टपरी बंद ठेवली व श्री. शेवंगावकर यांनी त्या टपरीवर अतिक्रमण करून उपभोग घेण्यास सुरुवात केली जर महापालिकाकडे श्री. प्रकाश गायकवाड यांनी टपरी थकबाकी भरलेली असेल तर त्यांना ती टपरी देण्यास हरकत नाही.

**मा. सभापती :** उपआयुक्त(महसूल) व उपआयुक्त (प्र.) यांनी त्या ठिकाणी जाऊन पाहणी करून महापालिकेच्या (प्रशासन) रेकॉर्ड प्रमाणे ती टपरी कुणाची आहे. पैसे संबंधित व्यक्तीकडून कसे वसूल करण्यात आले याबाबत कार्यवाही करावी.

**सौ. राधाबाई तळेकर :** टपऱ्या देतांना संबंधित प्रभागातील स. नगरसेवकांना न विचारता टपरी देण्यात येते माझ्या वॉर्डातील जागेवर मला न विचारत इतर टपरी

दिलेल्या आहे. इतरांच्या पत्रावर कार्यवाही होते. संबंधित नगरसेवकांना विचारणा होत नाही हे प्रकार चालू आहे.

**श्री. म. अ. रऊफ :** बेरोजगारांना द्यायला हरकत नाही.

**मा. सभापती :** प्रशासकीय समिती व पदाधिकारी समिती निर्णय घेतील यात पोलिस अधिकारी देखील राहणार आहे. असा प्रकार चालू असेल ते थांबवायला पाहिजे.

**श्री. गौतम लांडगे :** मागील इतिवृत्ततातील पृष्ठ क्र. २४ वर सूचना केल्याप्रमाणे महापालिकेतील शाळेच्या विद्यार्थ्यांना गणवेष वाटप कधी होणार आहे. याची माहिती द्यावी. तसेच कपड्याच्या शिलाई संदर्भात एक सॅम्पल मागविले होते. संबंधित अधिकारी यांनी सभागृहात आणलेले आहे काय?

**श्री. म. अ. रऊफ :** मागील बैठकीत ठरल्याप्रमाणे संबंधित अधिकारी यांनी कपडा शिलाई सॅम्पल आणलेले नाही काय?

**(एवढ्यात शिक्षणाधिकारी यांनी शाळेच्या विद्यार्थ्यांचा कपडा शिलाई "सॅम्पल" आणलेले सभागृहात आवर्जून दाखवतात.)**

**श्री. म. अ. रऊफ, श्री. स. अ. एकबालोद्दिन स.मो. कुतुबुद्दिन :** गणवेश शिलाई सॅम्पल मधील "सलवार" हे ठरल्याप्रमाणे शिवलेले नाही. त्यास "कळी" शिलाई केलेली नाही. यात "सलवार" ला कळी शिलाई केलेली पाहिजे.

**उपआयुक्त (प्र.) :** यात थोडी सुधारणा करावयाची असेल ते करता येईल.

**मा. सभापती :** "सॅम्पल" शिलाई म्हणून संबंधित अधिकारी यांनी दाखवण्यासाठी सभागृहात आणलेले आहे हे बरोबर नाही काय? शिक्षणाधिकारी यांना सूचना की, जे "सॅम्पल" शिलाई केलेल कपडे सभागृहात आणलेले आहेत. अशाच प्रकारचे सर्व शालेय गणेवश शिलाई करून मिळाले पाहिजे यात स. सदस्य यांनी सूचना केल्यानुसार "सलवार" ला कळीची शिलाई करून घेण्यात यावी व १५ ऑगस्टपर्यंत सर्व विद्यार्थ्यांना गणवेश व्यवस्थित शिलाई करून वाटप करण्याची कार्यवाही करावी. सॅम्पलचे कपडे सिल करून मु. लेखाधिकारी यांचेकडे ठेवावे.

**श्री. विकास जैन :** शालेय विद्यार्थ्याचे गणेवश शिलाई करण्याचे काम माझ्या वॉर्डातील हॉलमध्ये चालू आहे. महापालिकेला जेव्हा गरज पडते तेंव्हा या जागेचा वापर करण्यात येतो. या वास्तुमध्ये अनेक कामे बाकी आहेत. या ठिकाणी ग्रंथालय, फर्निचर होण्याबाबत कोणीही कार्यवाही झालेली नाही.

**मा. शिक्षणाधिकारी :** त्यांचे इस्टिमेंट पूर्ण तयार करून कार्यवाही करण्यात येईल.

**मा. सभापती :** या वास्तुमध्ये टेबल, खुर्च्या, इतर फर्निचर याबाबतचे अंदाजपत्रक पुढील बैठकीपर्यंत तयार करावे.

**मा. शिक्षणाधिकारी :** १५ ऑगस्टच्या आत सुरुवात करू.

**श्री. म.अ. रऊफ :** लेबर कॉलनी येथील महापालिकेने समाज मंदिर बांधलेले आहे त्या ठिकाणी दुसरेच व्यक्ती दुरुपयोग करतात. त्यास महापालिकातील संबंधित विभाग हॅण्डवर्क करीत नाही काय? महापालिकेने बांधले त्यावर नांव टाकलेले नाही.

**शहर अभियंता :** झोन कार्यालयाला हस्तांतर केलेले आहे.

**मा. सभापती :** सदरील कामाबाबत झोन ऑफिसला पुन्हा: कळविणे व कार्यवाही करणे बाबत सक्त ताकीद देण्यांत यावी. तसेच इतिवृत्तात पृष्ठ क्र. १४ वर स.अ. कुतुबोद्दिन ऐवजी स.अ. एकबालोद्दिन स. अ. कुतुबोद्दिन अशी दुरुस्ती करण्यात यावी.

**ठराव :**

१) चर्चेअंती अग्निशमन विभागातील दै. वेतनावरील टेलिफोन ऑपरेटर व मा. महापौर निवास्थानातील गत ८/९ वर्षापासून फिक्त पगारावर काम करणारे ६ कर्मचारी यांना महानगरपालिकेतील इतरांना दैनिक वेतन व फिक्त पगारावर जो दर देण्यांत येतो त्याच दराने त्यांना सप्टेंबर ९७ पासून वेतन देण्यात यावे.
२) स. सदस्य श्री. स.अ. एकबालोद्दिन यांचे इतिवृत्त पान क्र. १४ वर स. अ. कुतुबोद्दिन ऐवजी स.अ.एकबालोद्दिन स. अ. कुतुबोद्दिन अशी दुरुस्ती करण्यात यावी.
३) इतिवृत्तांतील पृष्ठ क्र. १४ वर नाला ट्रेडींग असे टंकलिखित असवे, माती उचलणे नाही.

या व इतर दुरुस्तीसह दिनांक १०-०७-९८ च्या स्थायी समितीच्या इतिवृत्तास कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०७/२ :**

अति. शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, टाऊन हॉल येथील बॅडमिंटन हॉलचे विद्युतीकरण करण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९७-९८ च्या (विद्युत) दर सूचिनुसार रक्कम रु. १,२४,७१५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च "नविन उद्याने" या लेखा शिर्षमधून करण्यात येईल.

तरी रक्कम रु. १,२४,७१५/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे टाऊन हॉल येथील बॅडमिंटन हॉलचे विद्युतीकरण करण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कमरु. १,२४,७१५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०८/३ :**

अति. शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, बन्सीलालनगर येथील सांस्कृतिक केंद्रांतील टेनिस कोर्ट करिता विशेष प्रकाश व्यवस्था करण्यासाठी कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९६-९७ च्या दरसूचिनुसार रक्कम रु. १,४३,८८२/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च "भांडवली इमारती" या लेखा शिर्षामधून करण्यात येईल.

तरी रक्कम रु. १,४३,८८२/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बन्सीलालनगर येथील सांस्कृतिक केंद्रांतील टेनिस कोर्ट करिता विशेष प्रकाश व्यवस्था करण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,४३,८८२/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०९/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, सिल्कमिल कॉलनी येथील आरोग्य केंद्रात विद्युतीकरण करण्यांच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९७-९८ च्या दरसूचिनुसार (विद्युत) रक्कम रु. ३,४१,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च "भांडवली इमारती" या लेखा शिर्षामधून करण्यात येईल.

तरी रक्कम रु. ३,४१,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीबाबत प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिल्कमिल कॉलनी येथील आरोग्य केंद्रात विद्युतीकरण करण्यांच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ३,४१,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११०/५ :**

अति. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, छत्रपतीनगर येथील गुर्जर ते विजयनगर (गारखेडा) या ५० डी.पी. रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९६-९७ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डि.एस.आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रु. १,९५,७६०/- तयार करण्यात आले असून सदरील खर्च सन ९८-९९ च्या "नविन डांबरी रस्ते" मध्ये ठेवण्यात आलेल्या तरतूदीमधून करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे छत्रपतीनगर येथील गुर्जर ते विजयनगर (गारखेडा) या ५० डी.पी. रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,९५,७६०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १११/६ :**

अति. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पंचवटी हॉटेल ते कोकणवाडी चौक या रस्त्यास पुर्नः डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९७-९८ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डी.एस.आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रु. ९,८४,९००/- चे तयार करण्यात आले असून. सदरील खर्च सन १९९८-९९ च्या पुर्नः डांबरीकरण मध्ये ठेवण्यात आलेल्या तरतूदीमधून करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पंचवटी हॉटेल ते कोकणवाडी चौक या रस्त्यास पुर्नः डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ९,८४,९००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११२/७ :**

अति. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, कोकणवाडी चौक प्रस्तावित नविन वाहतुक बेटाच्या बाजूला भराव करून खडी रस्ता तयार करणेच्या कामासाठी सन १९९७-९८ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डी.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु. ३,४२,१०५/- चे तयार करण्यात आले असून. सदरील खर्च सन

१९९८-९९ या भांडवली रस्ते (नविन खडी रस्ते) यामध्ये ठेवण्यात आलेल्या तरतूदीमधून करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कोकणवाडी चौक प्रस्तावित नविन वाहतुक बेटाच्या बाजूला भराव करून खडी रस्ता तयार करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रु. ३,४२,१०५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच सदरील काम उपलब्ध गुत्तेदार श्री. अनिल कुलकर्णी यांचेकडून करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात यते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११३/८ :**

अति. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. केसरसिंगपुरा कोकणवाडी येथील रस्त्याची दुरुस्ती करून डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९७-९८ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डी.एस.आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रु. २,१२,०६०/- चे तयार करण्यात आले असून. सदरील खर्च सन १९९८-९९ च्या पुर्नः डांबरीकरण मध्ये ठेवण्यात आलेल्या तरतूदीमधून करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. केसरसिंगपुरा कोकणवाडी येथील रस्त्याची दुरुस्ती करून डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. २,१२,०६०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११४/९ :**

अति. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर करित आहे की, रंगारगल्ली येथे दगडी गटार बांधणेच्या कामासाठी सन १९९७-९८ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रु. ५,३०,०००/- चे तयार करण्यात आले असून. सदरचा खर्च शासकीय अनुदान सन १९९७-९८ "नविन खडी रस्ते" या शिर्षकातून करण्यांत येईल.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. म.अ. रऊफ, स.अ. एकबालोद्दिन :** रंगारगल्ली दगडी गटार कशा पध्दतीने बांधणार आहेत. कोठे बांधणार ९ इमारती तोडावयाचे शिल्लक आहे.

**अति. शहर अभियंता :** तेथील दगडी गटार रस्त्याच्या बाजूला करावयाच्या आहेत घरे तुटणार आहेत तेथेच बांधण्यात येईल. तुटल्याशिवाय बांधण्यात येणार नाही.

**मा. सभापती :** मंजूर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रंगारगल्ली येथे दगडी गटार बांधणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ५,३०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११५/१० :**

अति. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, भिमनगर भावसिंगपुरा भागात विविध ठिकाणी २५ विद्युत खांब पथदिवे बसविण्याकरिता रोवणे आहे. करिता म.राज्वि. मंडळाकडून "कोटेशन" (दरपत्रक प्राप्त झाले आहे. रु. १,९७,१६०/- सदरील

खर्च सन ९८-९९ च्या "नविन पोल" या लेखाशिर्षकामधून करण्णेस्तव सादर केला आहे. तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भिमनगर भावसिंगपुरा भागात विविध ठिकाणी २५ विद्युत खांब पथदिवे बसविण्याकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. १,९७,१६०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११६/११ :**

अति. शहर अभियंता यांनी प्रस्तावित केले आहे की, लहान लहान गल्लीबोळीतील कचरा उचलण्याच्या कामासाठी मा. आयुक्त यांनी निर्देशित केल्याप्रमाणे (सहा) ॲटोरिखा खरेदी करावयाच्या आहेत. पूर्वी आपल्याकडे बजाज कंपनीच्या लोडींग रिक्षा आहेत. त्यामुळे त्याच कंपनीच्या लोडींग ॲटोरिखा खरेदी करण्यासाठी कंपनीच्या अधिकृत विक्रेत्याकडून खालील प्रमाणे दरपत्रके वसूल झालीत.

| | | |
|---|---|---|
| १) | मे. ॲटो कोर्स, औरंगाबाद | रु. ५०,४०२=०० |
| २) | मे. पगारिया ॲटो सेंटर | रु. ५०,५०२=०० |

मे. ॲटो कोर्स औरंगाबाद यांचे दर कमी असून प्रत्येकी रु. ५०,४०२=०० प्रमाणे ६ ॲटोरिक्षा खरेदीसाठी रु. ३,०२,४१२=०० खर्च येईल. डिलीव्हरी होण्यापूर्वी रक्कम भरावी लागेल. डिलीव्हरी होण्याचे दिवशी किंमती मध्ये बदल झाल्यास त्याप्रमाणे अंदाई करावी लागेल. सदरील खर्च सन ९८-९९ या आर्थिक वर्षासाठी केलेल्या रु. ६०, लाखाचे तरतूदीमून करता येईल. तरी ॲटो कोर्स यांचेकडून रिक्षा खरेदी करण्यांस मंजुरी मिळावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे लहान गल्लीबोळीतील कचरा उचलण्याकरिता सहा ॲटोरिखा (लोडींग) खरेदी करण्याकरिता कंपनीच्या अधिकृत विक्रेत्यांनी दिलेल्या दराप्रमाणे कमी दराचे मे. ॲटो कोर्स यांचे प्रति रिक्षा रु. ५०,४०२/- या दराने सहा रिक्षा खरदीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच यासाठी येणाऱ्या एकूण र. रु. ३,०२,४१२=०० च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११७/१२ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनिःसारण यांनी मो. मनजीतनगर येथे नविन २५० मी.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता अंदाजपत्रकीय रक्कम रु. १,९८,८००/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील अंदाजपत्रक परिसर अभियांत्रिकी खात्याच्या दरसूची ९७-९८ च्या दरसूचीनुसार तयार करण्यात आले आहे.

सदरील काम लेखा शिर्ष "भांडवली कामे" यातून प्रस्तावित केले आहे. मा. आयुक्तांनी दि. ०७-०७-९८ ला प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. तरी प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे. मनजीतनगर येथे नविन २५० मी.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,९८,८००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११८/१३ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु. व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, मोहल्ला व्यंकटेशनगर रेल्वेस्टेशन रोडे येथे २५० मी.मी. व्यासांची २०० मीटर लांबीची आर.सी.सी. लाईन टाकणेच्या कामासाठी सन १९९६-९७ च्या परिसर अभियांत्रिकी खात्याचे दरसूची दराने रक्कम रु. १,२१,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले . सदरील कामाचा खर्च भांडवली कामे (ज.नि.सारण) या लेखा शिर्षकातील २४० लाखातील तरतूदीमधून करण्यात येणार आहे. सदरील कामाच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दि. २६-०६-९८ ला मंजुरी प्राप्त झाली आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. व्यंकटेशनगर रेल्वेस्टेशन रोडे येथे २५० मी.मी. व्यासांची २०० मीटर लांबीची आर.सी.सी. लाईन टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. १,२१,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११९/१४ :**

एन-११/ के सेक्टर येथे पाण्याचा दाब वाढविण्यासाठी अतिरिक्त जलवाहिनी टाकून क्रॉस कनेक्शन करणेच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रुपये, १,५७,७००/- परिसर अभियांत्रिकीच्या सन १९९६-९७ च्या दरसूचीनुसार तयार करण्यात आले आहे. सदरील कामावर होणारा खर्च पाणी पुरवठा भांडवली कामे १९९८-९९ या लेखाशिर्षकाच्या तरतूदीमूधन करण्यांत येणार आहे. प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे.

तरी एन-११/के सेक्टर येथे अतिरिक्त / जलवाहिनी टाकून क्रॉस कनेक्शन करण्याच्या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. १,५७,७००/- चे प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एन-११/ के सेक्टर येथे पाण्याचा दाब वाढविण्यासाठी अतिरिक्त जलवाहिनी टाकून क्रॉस कनेक्शन करणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. १,५७,७००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच सदरील काम तातडीने करणे आवश्यक असल्याने उपलब्ध ठेकेदार श्री. संदीम विखे यांचेकडून करून घेण्यात यावे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२०/१५ :**

एन-११ मुयरनगर येथे पाणपोई बांधण्याच्या कामासाठी परिसर अभियांत्रिकीच्या सन १९९६-९७ च्या दरसूचीनुसार रक्कम रु. १,१८,५००/- चे तयार करण्यात आले असून सदरील कामावर होणारा खर्च स. नगरसेविका स्वेच्छा निधी १९९८-९९ या लेखाशिर्षकाच्या तरतूदीमूधन करण्यांत येणार आहे. सदरील अंदजपत्रकास प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे.

तरी एन-११ येथे पाणपोई बांधण्याच्या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. १,१८,५००/- चे प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ व मंजुरीसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एन-११ मुयरनगर येथे पाणपोई बांधण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,१८,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच सदरील काम श्री. संदीम विखे यांचेकडून करून घेण्यात यावे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२१/१६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, हॉटेल वेदांत ते एकनाथनगर रोडवर मिनी शॉपिंग सेंटर बांधावयाचे आहे. त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन ९६-९७ च्या जिल्हा दरसूचीनुसार रक्कम रुपये १०,६६,३०३/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले त्यात सर्व साधारण सभेने ठराव क्र. ३७/३४ दि. २१-०६-९७ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार निविदा मागविल्या असता ठराव क्र. ४२२/१० दि. २६-१२-९७ अन्वये मा. स्थायी समितीने उपरोक्त कामासाठी पुन्हा दरपत्रक मागविण्यात यावेत असे आदेशित केले आहे. परंतु मा. आयुक्त यांचे दि.०७-०४-९८ रोजीच्या आदेशान्वये उपरोक्त प्रस्ताव मा. स्थायी समिती पुढे दि. २६-०६-९८ रोजी फेर सादर करण्यात आले असता मा. स्थायी समितीने उपरोक्त कामासाठी पूर्ण निविदा मागविण्यात याव्यात असे ठराव क्र. ८३/४३ अन्वये आदेशित केलेले आहे.

आता उपरोक्त कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन १९९७-९८ च्या जिल्हा दरसूचीनुसार प्रथम मंजूर अंदाजपत्रक रक्कम रुपये १०,६६,३०३/-, १,६२,२२४/- असे एकूण १२,२८,५२७/- सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. त्यास मा. आयुक्तांनी दि. ०९-०७-९८ अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार प्रथम मंजूर अंदाजपत्रक रक्कम रु. १०,६६,३०३/- वाढीव अंदाजपत्रक रु. १,६२,२२४/- असे एकूण १२,२८,५२७/- चे सुधारित अंदाजपत्रक म्हणजे रक्कम रुपये १,६२,२२४/- च्या वाढीव रक्कमेचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हॉटेल वेदांत ते एकनाथनगर रोडवर मिनी शॉपिंग सेंटर बांधण्याचे १९९७-९८ चे दरसूचीनुसार प्रथम मंजूर अंदाजपत्रक रक्कम रु. १०,६६,३०३/- अधिक वाढीव अंदाजपत्रक रक्कम रु. १,६२,२२४/- च्या वाढीव अंदाजपत्रकास (सुधारित अंदाजपत्रक रक्कम रु.१२,२८,५२७/-) सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२२/१७ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र येथे अशोक स्तंभ उभारण्यांच्या कामाचे अंदाजपत्रक सन ९७-९८ च्या दरसूचीनुसार रक्कम रु. १,७९,०००/- एवढ्याचे तयार करण्यांत आले असून सदर काम हे "डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र" लेखाशिर्षातून प्रस्तावित करण्यांत आले आहे.

करिता रक्कम रु. १,७९,०००/- चे अंदाजपत्रक स्थायी समितीसमोर विचार्राीा तसेच मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र येथे अशोक स्तंभ उभारण्यांच्या कामाकरिता तयार करण्यात अलेल्या रक्कम रु.१,७९,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२३/१८ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, लायन्स क्लब मुकूंदवाडी येथे १/२ गोलाकार गटार बनविणे व जुन्या गटारीची दुरुस्ती करणे करिता अंदाजपत्रक रक्कम रु. ४,६४,०३६/- सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांची दरसूची १९९६-९७

अनुसार तयार करण्यात आली असून मा. आयुक्तांनी दिनांक २६-०६-९८ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

सदर काम १८ खेडी विकास योजने अंतर्गत अर्थसंकल्प १९९८-९९ तरतूदीनुसार खर्च करण्याचे प्रस्तावित आहे. करिता मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे लायन्स क्लब मुकूंदवाडी येथे १/२ गोलाकार गटार बनविणे व जुन्या गटारीची दुरुस्ती करणेच्या कामासाठी तयार करण्यात अलेल्या रक्कम रु.४,६४,०३६/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२४/१९ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, स्लम विभाग-१ अंतर्गत पॅचवर्क करणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रु. १,४३,३००/- सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांची दरसूची १९९७-९८ अनुसार तयार करण्यात आली असून मा. आयुक्तांनी दिनांक २६-०६-९८ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

सदर काम गल्लीच्छ वस्ती सुधारणा कार्यक्रम अर्थसंकल्प १९९८-९९ लेखाशिर्ष पुर्नडांबरीकरण अंतर्गत खर्च करण्याचे प्रस्तावित आहे. करिता मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स्लम विभाग-१ अंतर्गत पॅचवर्क करणे करिता तयार करण्यात अलेल्या रक्कम रु.१,४३,३००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२५/२० :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी दुरुस्त प्रस्ताव (रिवाईजड रिजॅलेशन) सादर केला आहे की, मो. मुकूंदवाडी भागात शहाबाद फरशी करणे व अस्तित्वात असलेली खांडकी दुरुस्त करणेचे मुळे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग यांची दरसूची १९९६-९७ नुसार रक्कम रु. ५,७०,८५७/- तयार करण्यात आली असून स्थायी समितीच्या विषय क्र. २९७/१७ दि. १६-१०-९७ अन्वये सादर अंदाजपत्रकास मंजुरी मिळाल्यानंतर नियमानुसार निविदा मागविण्यात आल्या व प्राप्त निविदापैकी सर्वात कमी राची निविदा श्री. एस. पी. सरवदे यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराची असल्यामुळे स्थायी समितीच्या विषय क्र. ४८५/२९ दिनांक ३१-१२-९७ अन्वये सादर गुत्तेदाराकडून काम करून घेणे बद्दल मंजुरी मिळाली व सदर ठेकेदारास कार्यदेश क्र. मनपा/०३/९७ दि. ३१-१२-९७ ला देण्यात आला. माजी महापौर श्रीमती सुनंदाबाई कोल्हे, उपमहापौर डॉ. भागवत कराड तसेच सध्याचे महापौर सौ. शिलाबाई सिताराम गुंजाळे, यांची मागणी आहे की, उर्वरित गल्ल्यांचे फरशीचे काम जरुरीचे असल्याने व जागोजागी पावसाचे पाणी थांबल्यामुळे याच पावसाळ्यात वाढीव काम रु. ४,६१,४०५/- चे अंदाजपत्रकास व सध्या काम करीत असलेल्या ठेकेदाराकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी या दरात करून घेणे व सुधारित अंदाजपत्रक रु. १०,३२,२६२/- सह मंजुरी देणेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुकूंदवाडी भागात शहाबाद फरशी करणे व अस्तित्वात असलेली खांडकी दुरुस्त करणेच्या कामांमध्ये संबंधित प्रभागातील स.नगरसेविका माजी महापौर यांचे मागणीनुसार कामात वाढ झाल्याने या कामासाठी वाढीव सुधारित अंदाजपत्रक

र. रु. १०,३२,२६२/- ला तसेच या वाढीव कामाचे मुळे कामाचे गुत्तेदार श्री. एस. पी. सरवदे यांचेकडून वाढीव काम अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.०५% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२६/२१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. संजयनगर बायजीपुरा स्लम येथे बॉक्स टाईप कल्व्हर्ट तयार करणे बाबत कामाकरिता सा. बां. खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसूचीनुसार रु. ४,१८,९२५/- च्या अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम खडी रस्ते या शिर्षकातून करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. ३१-०८-९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे. तसेच स्थायी समितीस दि. २१-०१-९७ रोजी अंदाजपत्रकास मंजुरी मिळाली आहे. प्रस्तावित कामासाठी फेर निविदा मागविण्यात आले असता अंतिम तारखेपर्यंत एकूण (९) नऊ निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (३) तीन निविदा प्राप्त झाल्या व उपस्थित गुत्तेदारा समक्ष उघडण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. कुलवंतसिंग | २०.१०% कमी |
| २) | श्री. मन्नखॉन | १२.७८% कमी |
| ३) | श्री. सोहेल सिद्दिकी | ७.९९% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.१०% कमी दराची असलेली श्री. कुलवंतसिंग यांची निविदेस मान्यतेस प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. संजयनगर बायजीपुरा स्लम येथे बॉक्स टाईप कल्व्हर्ट तयार करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रक दरापेक्षा २०.१०% कमी दराची श्री. कुलवंतसिंग यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र. १२७/१ :**

सहाय्यक संचालक नगररचना यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. गारखेडा यथील अर्जदार चेतना हौसिंग फायनान्स प्रा.लि. तर्फे मुख्य संचालक श्री. दिनकर गणेश देशकर यांनी मंजूर रेखांकनातील श्री. दिनकर देशकर यांनी मंजूर रेखांकनातील त्यांच्या भूखंड क्र. ९ वर बांधकाम परवानगी मागितली परंतु त्या भूखंडामधून विकास योजने व्यतिरिक्त ९ मीटर रुंद रस्ता संपादनाचा प्रशासकीय प्रस्ताव तेथील जनतेच्या मागणीनुसार मंजूर करून मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे तर्फे विशेष भूसंपादन अधिकारी विशेष घटक औरंगाबाद यांचेकडे पााठविण्यात आला. त्यानुसार भूसंपादनाची कार्यवाही सुरू आहे. त्यामुळे सदर अर्ज फेटाळण्यात आला.

त्यावर अर्जदारांनी प्रस्ताव ठेवला की हा पूर्ण १००% भूखंड मनपास मी स्वखुशीने देण्यास तयार आहे. परंतु मला ह्या भूखंडातील खुल्या जागेपैकी माझ्या भूखंडाच्या क्षेत्राइतकी जागा द्यावी. त्यानुसारसदर जागेची अदलाबदल केल्यास १) रेखांकनाच्या खुल्या जागेच्या खेत्रात बदल होत नाही. २) मनपास विना मोबदला रस्ता मिळतो व त्वरित रस्ता तयार करता येईल. ३) महानगरपालिका गरजू व्यक्तींना देऊ शकते.

करिता सदर अर्जदार चेतना हौसिंग फायनान्स लि. तर्फे मुख्य संचालक श्री. दिनकर गणेश देशकर ह्यांना त्यांच्या रेखांकन क्र. १५६०/१९९१ दि. १५-०६-९१ मधील भूखंड क्र. ९ च्य बदल्यात त्यात रेखांकनातील मनपाची खुली जागा "बी" ८८५.१५ चौ. मीटर पैकी भूखंड क्र. ९ चे क्षेत्र ५८१.९३ चौ. मी. एवढे क्षेत्र बदलून देण्यांचा प्रस्ताव मान्यतेस्तव तसेच प्रस्ताव मान्य झाल्यावर अर्जदारांकडून जागेचा अदलाबदलाचा नोंदणीकृत दस्तऐवज करून घेण्यात येईल. करिता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मौजे गारखेडा यथील अर्जदार चेतना हौसिंग फायनान्स प्रा.लि.तर्फे मुख्य संचालक श्री. दिनकर गणेश देशकर यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे श्री. दिनकर देशकर ह्यांना त्यांच्या रेखांकन क्र. १५६०/१९९१ दि १५-६-९१ मधील भूखंड क्रमांक ९ च्या बदल्यात त्याच रेखांकनातील महानगरपालिकेची खुली जागा "बी" ८८५.१५ चौ. मीटर पैकी भूखंड क्र. ए चे क्षेत्र ५८१.९३ चौ. मी. एवढे क्षेत्र बदलून देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२८/२ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु. व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, रेल्वे उड्डाण पुलामध्ये ३०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी बाधित झालेली आहे. त्यामुळे नविन ३०० मी.मी. व्यासाची एम.एस. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९७-९८ च्या दरसूचीनुसार र. रु. ८,८६,८१६/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले. सदरचे काम हे १० एप्रिल ९८ पूर्वी करण्याबाबत मा. पालकमंत्री यांनी आदेश दिले होते. त्यामुळे अल्पावधीची निविदा सूचना क्र. ९/१८ जी की, दैनिक वर्तमान पत्रात निविदा प्रसिध्दीस देण्यात येवून बी-१ निविदा मागविण्यात आल्या कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण तेरा (१३) कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविद स्विकारण्याच्या नियोजित तारखेस एकूण तीन (३) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या त्या खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | मे. एम. एम. कन्स्ट्रक्शन | ७% जास्त |
| २) | श्री. सुजाण अली हास्मी | १०% जास्त |
| ३) | श्री. एम.एम. काथार | ४% जास्त |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्ट्या कमी दर हा श्री. एम. एस. काथार यांचा आहे. परंतु त्यांनी दिलेला दर कार्यालयास जास्त वाटत असल्यामुळे मा. आयुक्त यांच्या दालनात दि. ०६-०४-९८ रोजी दराबाबत ठेकेदाराशी वाटाघाटी करून अंदाजपत्रकीय दरानुसार त्यास मान्यता देण्यात आली व काम हाती घेण्यात आले आहे.

तरी वाटाघाटी अंतीच्या दर म्हणजेच अंदाजपत्रकीय दरानुसार श्री. एम. एस. काथार यांची निविदा कार्योत्तर मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रेल्वे उड्डाण पुलामध्ये बाधित झालेल्या ३०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी एम.एस. जलवाहिनी स्थलांतरित करण्याच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात दराचे निविदा धारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम तातडीने असल्याने अंदाजपत्रकीय दराने श्री. एम. एस.

काथार यांच्याकडून करून घेतलेल्या कामास सर्वानुमते कार्योत्तर मंजुरी देण्यात येते. या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२९/३ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु. व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, पैठण रोड वरील रेल्वे उड्डाण पुलामध्ये बाधित होणार जलवाहिनी स्थलांतरित करावयाची आहे. त्यासाठी ३०० मी.मी. व्यासाची ७०० र. मीटर एम. एस. पाईप खरेदी करावयाचे आहेत. त्यासाठी कार्यालयाची निविदा सूचना क्र. ९/१८ जी. की. स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यांत येवून "डी" कॉमवर विक्रेत्या तर्फे दर मागविण्यात आलेत कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण तीन कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. व्ही. आर. महाजन | १८९०=०० प्रती रनिंग मीटर |
| २) | श्री. एम. एस. काथार | १९१०=००० प्रती रनिंग मीटर |
| ३) | श्री. नदंकुमार घोडेले | १९१०=००० प्रती रनिंग मीटर |

वरीलप्रमाणे तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दर हा श्री. व्ही. आर. महाजन यांनी दिलेले आहे. परंतु सदरचा दर हा कार्यालयास जास्त वाटत असल्यामुळे दराबाबत मा. आयुक्त यांच्या दालनात वाटाघाटी झाली असता रु. १८४३=८
प्र. र. मी. असा दर मान्य झाला त्यास ठेकेदाराने मान्यता दिली आहे. सदरचे काम हे मा. पालकमंत्री यांच्या आदेशानुसार हाती घेण्यात आले.

तरी वाटाघाटी अंतीचा म्हणजेच रु. १,८४३=८० प्र. र. मी. दराने श्री. व्ही. आर. महाजन यांच्याकडून ३०० मी.मी. व्यासाचे एम.एस. पाईप खरेदी करण्यास कार्योत्तर मंजुरीस्तव प्रस्ताव सादर. सदरील खर्च सार्वजनिक बांधकाम विभागामर्फत २७.०० लाख प्राप्त निधीतून केली जाईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पैठण रोड वरील रेल्वे उड्डाण पुलामध्ये बाधित होणारी जलवाहिनी स्थलांतरित करण्याचे कामाकरिता लागणारे ३०० मी.मी. व्यासाचे एकूण ७०० रनिंग मीटर एम.एस. पाईप खरेदी करीता मागविण्यात आलेल्या निविदामध्ये तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराने निविदाधारक श्री. व्ही. आर. महाजन यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार प्रति रनिंग मीटर रु. १८४३=८० या दराने पाईप खरेदीस कार्योत्तर मंजुरी देण्यात येते. तसेच या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३०/४ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सादतनगर (अमान कॉ.) भागात खडी रस्ते तयार करणे कामाकरिता अंदाजपत्रक र. रु. ४,१५,९००/- सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांची दरसूची १९९५-९६ अनुसार तयार करण्यात आली असून मा. आयुक्तांनी दिनांक १७-१२-९७ रोजी प्रशासकीय मान्यता प्रधान केली तसेच स्थायी समितीच्या विषय क्र. ५३८/७ दि. २६-०३-९८ मंजुरी मिळाल्यानंतर रतिसर वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन निविदा मागविण्यात आल्या व कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम दि.

१०-०६-९८ पर्यंत एकूण १७ निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याच्या दिवशी फक्त ३ निविदा प्राप्त झाल्या त्या निविदा उपस्थित ठेकेदार समक्ष उघडण्यात आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. एम. जी. महबुब अली | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.४०% कमी |
| २) | कुलवंतसिंग | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.७% जास्त |
| ३) | आकाश कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.४०% कमी दराची निविद श्री. एम. जी. महबुब अली यांची आहे.

करिता श्री. एम. जी. महबुब अली यांची निविदा मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सादतनगर (अमान कॉ.) भागात खडी रस्ते तयार करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा ०.४०% कमी दराची निविद श्री. एम. जी. महबुब अली यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३१/५ :**

मौ. ईटखेडा येथील सर्व्हे नं. ४६ व ४७ करिता चेअरमन रेवती गृहनिर्माण व नादेव सोपुजी खडके यांनी सादर केलेल्या रेखांकन प्रस्तावास मंजुरीच्या वेळी त्यांनी या रेखांकनाखालील जमिनीपैकी मंजूर विकास योजना १२ मी व १५.० मी. रुंद रस्त्याने बाधित होणारे क्षेत्रासाठी मोबदला देण्याची मागणी केली आहे. ज्या रेखांकनाकरिता संबंधिताने नागरि सुविधाची कामे स्वत: करावयाची असून देय मोबदल्याच्या रकमेतून रेखांकन अंतर्गत डांबरीक रणाची रक्कम तसेच जमीन विकास शुल्क रक्कम वळतीकरून घ्यावा म्हणून विनंती केली आहे.

मंजुर विकास योजनामध्ये १२.० व १५.० मी रुंद रस्त्याने ह्या रेखांकनाखालील जमीनीचे २५१४ चौ. मी. क्षेत्र बाधित होता असून तेवढ्या क्षेत्राचे ९८ चे दरानुसार रु. १३,१७,३३६/- एवढे मुल्य निश्चित होते व या रेखांकनाकरिता संबंधिताने महानगरपालिकेस रु. ६,९३,६००/- डांबरीकरणाकरिता व रु. ४,६८,८१८/- एवढी जमीन विकास शुल्क रक्कम जमा करावयाचा आहे.

करिता बाधित क्षेत्रांचा देय मोबदला म्हणून र. रु. १३,१७,३३६/- निश्चित करून त्या मधून जमिन विकास शुल्य व रेखांकन अंतर्गत डांबरीकरणाची रक्कम एकूण रु. ११,६२,४१८/- वजा करून उर्वरित र. रु. १,५४,९१८/- संबंधितास रेखांकनातील खुल्या जागेची विकास शहर अभियंता यांच्या मार्गदर्शनासाठी पूर्ण केल्यानंतर देण्याचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

प्रस्ताव मान्यतेनंतर रेखाकनास नेहमीच्या इतर अटी व शर्तीस पात्र राहून अंतिम मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ईटखेडा येथील स. नं. ४६ व ४७ या रेखांकनाखालील जमिनापैकी मंजूर विकास योजना १२ मी व १५ मी. रुंद रस्त्याने बाधित जमीन २५१४ चौ. मी. क्षेत्राचा मोबदला र.रु. १३,१७,३३६/-मधून डांबरीकरणाकरिता रु. ६,९३,६००/- तसेच

जमीन विकास शुल्क र.रु. ४,६८,८१८/- अशी एकूण र.रु. ११,६२,४१८/- वजा करून उर्वरित र.रु. १,५४,९१८/- संबंधितास देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३२/६ :**

उपआयुक्त (महसूल) यांली प्रस्ताव सादर केला की, उप वनसंरक्षक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली, मुंबई यांचे पत्र क्र. जा.क्र./ब-२७/वन्यजीव/१४३४/सन ९७-९८ दि. २६-०८-९७ च्या पत्रान्वये व मा. आमदार श्री. चंद्रकांतची खैरे, वन आणि पर्यावरण तथा पालकमंत्री, महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी दि. २७-०७-९८ रोजी मा. आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांना दिलेल्या सूचनेनुसार संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरावली मुंबई यांना (२) पांढरे वाघ (नर, मादी) घ्यावयाचे आहेत.

महानगरपालिका औरंगाबाद प्राणी संग्रहालय येथे पांढरे वाघांची संख्या (१२) आहे डायरेक्टर, नंदकानन झुलॉजिकल पार्क, भुवनेश्वर (ओरिसा) यांनी त्यांचे पत्र क्र.४४२८/३ एफ/६४१/९४ दि. १४-०८-९७ (इंग्रजी पत्र) अन्वये प्रत्येक प्राण्याची किंमत "स्वामित्व शुल्य" (रॉयल्टी) त्यांचे वयोगटानुसार खालीलप्रमाणे नमूद केली आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | २ वर्षापर्यंत | रु. ३.०० लाख (प्रत्येकी) |
| २) | २-१० वर्ष | रु. ५.०० लाख (प्रत्येकी) |
| ३) | १० वर्षापेक्षा जास्त | रु. २.२५ लाख (प्रत्येकी) |

स्थायी समितीची मंजुरी मिळाल्यानंतर डायरेक्टर, नंदकानन, झुलॉजिकल, पार्क, भुवनेश्वर (ओरिसा) यांच्या दि. १४-०८-९७ च्या पत्रातील किंमतीच्या अधिन राहुन व तेवढी रक्कम मनपाकडे जमा झाल्यानंतर पांढऱ्या वाघांचे जोडपे हस्तांतरीत करण्यात येईल.

१) संबंधितानी वाहतुकीचा खर्च (ट्रान्सपोर्टीग चॉर्जेस) करावी.
२) संबंधितानी सेट्रल झुंऑथरिटी ऑफ इंडिया यांची परवानगी घ्यावी.
३) वाघाचे जोडपे हस्तांतरीत झाल्यापासून पुढची जबाबादरी संबंधितावर राहील.

प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, उप वनसंरक्षक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली, मुंबई यांचे मागणीनुसार औरंगाबाद महानगरपालिका प्राणी संग्रहालयातील दोन पांढरे वाघ (नर, मादी) डायरेक्टर, नंदकानन झुलॉजिकल पार्क, भुवनेश्वर (ओरिसा) यांच्या दि. १४-०८-९७ च्या पत्रातील किंमतीच्या अधीन राहून व तेढवी रक्कम मनपाकडे जमा झाल्या नंतर प्रस्तावातील अटी-शर्ती नुसार देण्या सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३३/७ :**

सहाय्यक, संचालक नगररचना यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद शहर विकास योजनेनुसार सर्वे नं. ३९ मौ. कांचनवाडी मधील श्री. अण्णा भिमाजी तरंगे व कचरू भिमाजी तरंगे यांच्या मालकीची जमीन क्षेत्र १७,१६५.६२ चौ. मी. हे आरक्षण क्र. ५ मधील शाळा, आरक्षण क्र. ६ खेळाचे मैदान आरक्षण क्र. ७ हायस्कूल तसेच १८ मी. रुंद रस्ता व १५ मी. रुंद रस्त्याने अशंतः बाधित होते. एकूण क्षेत्र १७१६५.६२ चौ. मी. पैकी ३५६५.१२ चौ. मी. क्षेत्र महानगरपालिकेने रस्त्याची जागा म्हणून हस्तांतरीत करून घेतलेले आहे.

उर्वरित १३,६००.५० चौ. मी. क्षेत्राचा मोबदला मिळकतधारकाने मागितलेला आहे. करिता खाजगी वाटाघाटीत सदर मिळकतीचा मोबदला रक्कम रुपये २२,७८,३७६/- (बावीस लाख आठ्ठ्याहत्तर हजार तिनशे शहात्तर) निश्चित केला आहे. तसेच सदर मिळकत ही खरेदीखत करून घ्यावी लागेल. त्यासाठी र. रु. २,०६,०००/- (दोन लाख सहा हजार) खर्च लागेल. खरेदीखताचा सर्व महानगरपालिकाने निम्म्या व मिळकत धारकाने निम्मा करावयाचा आहे. करिता खरेदीखातासाठी लागणारी निम्मी रक्कम रु. १,०३,०००/- ही मोबदला रक्कमेतून वळती करून घेण्यास मिळकत धारकाने मान्यता दिली आहे. उर्वरित रक्कम रु. २१,७५,३७६/- (एकवीस लाख पंचाहत्तर हजार तिनशे शहात्तर) ही मिळकत धारकांना चार मासिक हप्त्यात द्यावयाची आहे. करिता सदर रक्कम मिळकत धारकांना अदा करणेसाठी आणि नोंदणीकृत खरेदीखत करून घेण्यासाठी अग्रीम म्हणून रक्कम रु. २,०६,००० (दोन लाख सहा हजार) श्री. डी. डी. कालेले शा. अ. यांना देणेसाठी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद**

**मा. सभापती :** मोबदल्याची रक्कम दोन हप्त्यात देण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, स.नं. ३९ मौजे कांचनवाडी मधील श्री. अण्णा भिमाजी तरंगे व कचरू भिमाजी तरंगे यांच्या मालकीची जमीन क्षेत्र १७,१६५.६२ चौ. मीटर जे आरक्षण क्र. ५,६,७ प्राथमिक शाळा, खेळाचे मैदान, हायस्कूल तसेच १८ मी. रुंद रस्ता व १५ मी. रुंद रस्त्यात बाधित होणाऱ्या एकूण क्षेत्रापैकी ३५६५.१२ चौ. मी. क्षेत्र मनपाने हस्तांतरीत करून घेतले असून. उर्वरित १३,६००.५० चौ. मी. क्षेत्राचा मोबदला एकूण रुपये २२,७८,३७६/- (बावीस लाख अठ्ठ्याहत्तर हजार तीनशे शहात्तर) पैकी खरेदीबाबत निम्मा खर्च रु. १,०३,०००/- वळती करून उर्वरित मोबदल्याची रक्कम रु. २१,७५,३७६/- (एकवीस लाख पंचाहत्तर हजार तीनशे शहात्तर) मिळकतधारकांना देण्यांस सर्वानुमत मंजुरी देण्यात येते. त्याचप्रमाणे सदरील रक्कम मिळकतधारकांना दोन हप्त्यात देण्यांत यावी. आणि नोंदणीकृत खरेदीखत करून घेण्याकरिता अग्रीम रु. २,०६,०००/- (दोन लाख सहा हजार) श्री. डी.डी. काळेले, शाखा अभियंता यांना देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३४/८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, स्वामी विवेकानंद उद्यान (विस्तारीत) करिता लहान मुलांची खेळणी पुरवठा करण्याकरिता जा.क्र. मनपा/उद्यान/३५/९८ दि. ०७/०४/९८ रोजी वर्तमानपत्रात प्रसिध्दी देऊन पिविदा मागविल्या असता निविदेच्या विक्री तारखेपर्यंत ७ सात निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याच्या तारखेपर्यंत ४ चार निविदा प्राप्त झाल्या त्यांचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | वंडरक्लब स्पोर्ट इंन्डस्ट्रीज | २,९२,२५०.००/- |
| २) | मे. मुनिक ॲप्युस्कोर | ३,५७,४००.००/- |
| ३) | रिगल स्पोर्ट हैद्राबाद | ४,५९,१७६.००/- |
| ४) | वर्षा मेटल वर्क्स | पूर्ण दर भरले नाहीत. |

वरीलपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा वंडर क्लब स्पोर्ट इंन्डस्ट्रीज पुणे यांची आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स्वामी विवेकानंद उद्यान (विस्तारीत) करिता लहान मुलांची खेळणी पुरवठा करण्याकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात

कमी दराची म्हणजेच र. रु. २,९२,२५०/- ची वंडर क्लब स्पोर्ट इंन्डस्ट्रीज पुणे यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३५/९ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी सुधारित प्रस्ताव सादर केला आहे की, मो. हर्षनगर स्लम येथे नाल्याच्या बाजूने संरक्षित भिंत बांधणे कामाचे मुळ अंदाजपत्रक र. रु. ११,०३,६६७/- सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांची दरसूची ९५-९६ नअुसार तयार करण्यात आली असून मा. आयुकतांनी दि. २५-०७-९८ रोजी प्रशासकीय मान्यता प्रधान केली तसेच सर्वसाधारण सभेच्या विषय क्र. ७४/१३ दि. १७-०८-९६ अन्वये मान्यता मिळाली नंतर रितसर वृत्तपत्रात प्रसिध्दी निविदा मागविण्यात आले व प्राप्त निविदा पैकी सर्वात कमी दराची निविदा श्री. अब्दुल सलाम यांची निविदा ०१% कमी दराची असल्यामुळे स्थायी समितीच्या विषय क्र. ५२५/१७ दि. १८/१२/९६ द्वारे मंजुरी देण्यात आली व त्या नंतर काही तक्रार प्राप्त झाल्या व मा. आयुक्तांनी तक्रारची चौकशी व वाटाघाटी करून सदर ठेकेदारास अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी या दराने करण्याची मान्यता दि. १३-०१-९७ रोजी दिली व त्याप्रमाणे त्यांना कार्यदेश क्र. मनपा/स्लम/२/९७-९८ दि. २७-०२-९७ देण्यात आले व काम करित असतांना सदर ठिकाणी काही घरे धोकादायक असल्या कारणाने श्री. अब्दुल रऊफ स. नगरसेवक यांना स्थायी समिती मध्ये मा. सभापती यांचे समक्ष चर्चा करून सूचना केली की सदरील संरक्षित भिंत श्री. जावेद हसन यांचे ऑफिस पर्यंत वाढवून घ्यावी. म्हणजे पडावयास आलेल्या घरांना धोका निर्माण होणार नाही. त्या वाढीव कामाचे अं. प. रु. २,८७,६२०/- ९५-९६ च्या डी.एस.आर. अनुसार तयार करण्यात आले व सदर कामात एकूण १३,५०,४४८/- वाहनु कामासह खर्च होईल.

करिता एकूण र. रु. १३,५०,४४८/- वाढवून सुधारित अंदाजपत्रकास मान्यता देणे व श्री. अब्दुल सलाम यांचे कडून अं. प. दरापेक्षा ५% कमी या दराने काम करून घेण्यास मंजुरी घेणे विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. हर्षनगर स्लम येथे नाल्याच्या बाजूने संरक्षित भिंत बांधणेच्या कामामध्ये स. सदस्यांनी सूचना केल्यानुसार काम वाढ झाल्याने वाढीव कामाचे सु. अंदाजपत्रक र. रु. १३,५०,४४८/- ला तसेच सदरील काम मुळ कामाचे गुत्तेदार श्री. अब्दुल सलाम यांचेकडून अं. प. दरापेक्षा ५% कमी दराची करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३६/१० :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. संजयनगर बायजीपुरा स्लम येथे मुख्य रस्त्यावरील सांडपाणी नाल्यात सोडण्याकरिता गटार बांधणे व इतर कामाकरिता सा.बां. खात्याचे सन ९६-९७ च्या दरसूचीनुसार र. रु. २,०४,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम "खुली गटार" या शिर्षकातून करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. संजयनगर बायजीपुरा स्लम येथे मुख्य रस्त्यावरील सांडपाणी नाल्यात सोडण्याकरिता गटार बांधणे व इतर कामाकरिता तयार करण्यात

आलेल्या रक्कम रुपये २,०४,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच सदरील काम उपलब्ध ठेकेदार श्री. के. बी. पवार यांचेकडून करून घेण्यात यावे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३७/११ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. संजयनगर बायजीपुरा स्लम येथे अे पार्टमध्ये सय्यद हबीब शाह दरगाह परिसरात कॉंक्रीट रस्ता तयार करणे या कामाकरिता सा. बां. खात्याच्या सन ९७-९८ च्या दरसूचीनुसार र. रु. १,७२,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदरील काम "खांडकी रस्ते" या शिर्षकातून करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर. सदरील कामासाठी दरगाह कमेटीचे ना हरकत प्रमाणपत्र मिळाल्यानंतरच काम सुरू करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. संजयनगर बायजीपुरा स्लम येथे "अे" पार्टमध्ये सय्यद हबीब शाह दरगाह परिसरात कॉंक्रीट रस्ता तयार करणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये १,७२,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३८/१२ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. रमानगर स्लम भागात गल्ल्यामध्ये शहाबाद फरशी बसविण्याच्या कामाकरिता र.रु. १,९२,२५०/- चे अंदाजपत्रक सा. बां. खात्याच्या सन दरसूची ९७-९८ च्या नुसार करण्यात आले असून मा. आयुक्तांनी त्यांस प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

सदरील काम गलिच्छ वस्ती सुधारणा अर्थसंकल्प ९८-९९ तरतूदी अनुसार लेखाशिर्ष "नविन खांडकी रस्ते" मध्ये करण्याचे प्रस्तावित आहे. करिता मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. मो. रमानगर स्लम भागात गल्ल्यामध्ये शहाबाद फरशी बसविण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. १,९२,२५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३९/१३ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. नुरकॉलनी स्लम येथे डांबरी रस्ते तयार करणेच्या कामाकरिता सन ९७-९८ च्या दरसूचीनुसार र. रु. १,४६,६५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम "डांबरी रस्ते" १० वा वित्त आयोग अनुदान या शिर्षकातून करण्यात येईल. सदर अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. नुरकॉलनी स्लम येथे डांबरी रस्ते तयार करणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. १,४६,६५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४०/१४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, स्मशान हनुमान मंदिराजवळील नाल्यावर भाजी मंडई बांधावयाची आहे. त्यासाठी सा. बां. विभागाने सन ९६-९७ च्या जिल्हा

दरसूचीनुसार र. रु. २,७७,६००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. त्यास मा. आयुक्तांनी दि. १३-०७-९८ अन्वये मंजुरी दिलेली आहे.

उपरोक्त कामाचा खर्च हा सन ९८-९९ या आर्थिक वर्षात आठवडी बाजार विकसित करणे व आवश्यक त्या सोयी सवलती पुरविणे या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात येईल.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स्मशान हनुमान मंदिराजवळील नाल्यावर भाजी मंडई बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. २,७७,६००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४१/१५ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रियदर्शनी इंदिरानगर स्लम भागात शहाबाद फरशी गल्लीमध्ये बसविणेसाठी अंदाजपत्रक र. रु. ९,९८,०००/- सा. बां. विभाग औरंगाबाद यांचे दरसूची ९५-९६ नुसार तयार करण्यात आले असून मा. आयुक्त दि. २५-०७-९८ ला प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

सदर काम गलिच्छ वस्ती सुधारणा अर्थसंकल्प ९८-९९ च्या तरतूदी अनुसार लेखाशिर्ष नविन खांडकी रस्ते मध्ये करण्याचे प्रस्तावित आहे. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रियदर्शनी इंदिरानगर स्लम भागात शहाबाद फरशी गल्लीमध्ये बसविण्याकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. ९,९८,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४२/१६ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. रमानगर येथे उर्वरित रस्त्यांचे डांबरीकरण करण्याचे कामाकरिता र. रु. २,८४,९५४/- चे अंदाजपत्रक सा. बां. विभाग औरंगाबाद यांचे सन ९६-९७ चे दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून मा. आयुक्त दि. २७-०७-९८ ला प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

सदर काम गलिच्छ वस्ती सुधारणा अर्थसंकल्प ९८-९९ च्या तरतूदीनुसार लेखाशिर्ष "डांबरी रस्ते" मध्ये खर्च करण्याचे प्रस्तावित आहे. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. रमानगर येथे उर्वरित रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. २,८४,९५४/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४२/१६ :**

अतिरिक्त शहर अभियंता स्लम यांनी प्रस्ताव दिला की, विस्तारीत स्वामी विवेकानंद उद्यानाचे विद्युतीकरण करणाच्या कामासाठी सा. बां. बांधकाम खात्याच्या सन ९७-९८ च्या विद्युत दरसूचीनुसार र. रु.३,६८,३४७/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

सदरील खर्च नविन उद्याने या लेखा शिर्षकातून करण्यात येणार आहे. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विस्तारीत स्वामी विवेकानंद उद्यानाचे विद्युतीकरण करणाच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. ३,६८,३४७/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४४/१८ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. प्रियदर्शनी इंदिरानगर स्लम भागात रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता अंदाजपत्रक र. रु. ५,६८,९००/- चे सा. बां. दरसूची ९७-९८ नुसार तयार करण्यात आली असून मा. आयुक्तांनी दि. २५-०७-९८ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

सदर काम गलिच्छ वस्ती सुधारणा अर्थसंकल्प ९८-९९ च्या तरतूदीनुसार लेखाशिर्ष लेखाशिर्ष "नविन डांबरी रस्ते" मध्ये खर्च करण्याचे प्रस्तावित आहे. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रियदर्शनी इंदिरानगर स्लम भागात रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. ५,६८,९००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४५/१९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, नागेश्वरवाडी येथील प्रा. शाळेच्या संरक्षित भिंतीची उंची वाढविणे व मोकळ्या जागेवर अभ्यासिका बांधणेच्या कामाकरिता सा. बां. विभागाचे दरसूचीनुसार सन ९६-९७ नुसार र. रु. ७,५३,०५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा. आयुकतांनी मान्यता दिलेली आहे.

उपरोक्त कामाचा खर्च हा सन ९८-९९ या आर्थिक वर्षात विकास इमारती व शाळा, दवाखाने या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात येईल. तरी प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नागेश्वरवाडी येथील प्रा. शाळेच्या संरक्षित भिंतीची उंची वाढविणे व मोकळ्या जागेवर अभ्यासिका बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेले र. रु. ७,५३,०५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४६/२० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शांतीनिकेतन कॉलनी येथे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन ९६-९७ च्या सा. बां. बांधकाम खात्याच्या डी. एस. आर. दराने अंदाजपत्रक र. रु. २,६२,५५०/- चे तयार करण्यात आले असून सदरील खर्च सन ९८-९९ च्या पुर्नडांबरीकरण मध्ये ठेवण्यात आलेल्या तरतूदीतून करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शांतीनिकेतन कॉलनी येथे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. २,६२,५५०/- च्या अंदाजपत्रक सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४७/२१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, विशालनगर गारखेडा येथील ५० फुट विकास रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता सन ९६-९७ च्या सा. बां. बांधकाम खात्याच्या डी. एस. आर. दराने अंदाजपत्रक र. रु. ५,५४,१८५/- चे तयार करण्यात आले असून सदरील खर्च सन ९८-९९ च्या पुर्नडांबरीकरण मध्ये ठेवण्यात आलेल्या तरतूदीतून करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विशालनगर गारखेडा येथील ५० फुट विकास रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. ५,५४,१८५/- च्या अंदाजपत्रक सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४८/२२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, गोविंदनगर शिल्पनगर भागात खडी रस्त्यांना डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन ९७-९८ च्या सा. बां. बांधकाम खात्याच्या डी. एस. आर. दराने अंदाजपत्रक र. रु. २,१६,१००/- चे तयार करण्यात आले असून सदरील खर्च सन ९८-९९ च्या भांडवली रस्ते (नविन डांबरी रस्ते) मध्ये ठेवण्यात आलेल्या तरतूदीतून करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विशालनगर गारखेडा येथील ५० फुट विकास रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. ५,५४,१८५/- च्या अंदाजपत्रक सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४९/२३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर करीत आहे की, नागेश्वर मंदिर (नागेश्वरवाडी) ते निराला बाजार पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन ९७-९८ चे सा. बां. बांधकाम खात्याचे डी. एस. आर. दराने अंदाजपत्रक र. रु. ७,७०,९००/- चे तयार करण्यात आले असून सदरचा खर्च "नविन डांबरी रस्ते" या लेखाशिर्षा अंतर्गत ठेवण्यात आलेल्या तरतूदीतून करण्यात येईल. परुं या विभागाने सदरचा प्रस्ताव पुर्नडांबरीकणामधून प्रस्तावित केला आहे. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नागेश्वर मंदिर (नागेश्वरवाडी) ते निराला बाजार पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ७,७०,९००/- च्या अंदाजपत्रक सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५०/२४ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, हर्सूल स्मशानभूमी येथे रेस्टींग शेड वॉचमेन निवास्थान व पाण्याचा हौद बांधणेच्या कामाकरिता अंदाजपत्रक सन १९९६-९७ च्या दरसूचीनुसार र. रु. १,६७,८००/- चे तयार करण्यात येऊन त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यात आली आहे. सदर कामावर होणारा खर्च हा स्मशानभूमी विकास या तरतूदी अंतर्गत प्रस्तावित आहे. करिता अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हर्सूल स्मशानभूमी येथे रेस्टींग शेड वॉचमेन निवासस्थान व पाण्याचा हौद बांधणेच्या कामाकरिता सन ९६-९७ च्या दरसूचीनुसार र. रु. १,६७,८००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५१/२५ :**

कार्यकारी अभियंता पा.पु. व ज.नि. यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. बाबर कॉलनी, हत्तेसिंगपुरा स.न. ३० मध्ये २५० मी.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेकरिता अं. प. र. रु. ८,८०,८१०/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील अंदाजपत्रक परिसर अभियांत्रिकी बांधकाम विभागाच्या सन ९६-९७ च्या दरसूचीनुसार तयार करण्यात आले आहे. सदरील वस्ती अनाधिकृत असल्याने २५% लोकवर्गणी भरून घेतल्यानंतर प्रत्यक्ष काम सुरू करण्यात येईल.

सदरील काम लेखा शिर्ष "भांडवली कामे" यातून प्रस्तावित केले आहे. मा. आयुक्तांनी सदरील काम स्थायी समितीच्या मंजुरीस्तव पाठविण्यास्तव दि. ०७-०७-९८ ला प्रशासकीय मजुरी दिलेली आहे. तरी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. बाबर कॉलनी, हत्तेसिंगपुरा स.न. ३० मध्ये २५० मी.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. ८,८०,८१०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५२/२४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. पदमपाणी कॉलनी येथे वाचनालय बांधण्याचे कामासाठी सा. बां. बांधकाम विभागाचे सन ९६-९७ चे जिल्हा दरसूचीनुसार र. रु. ४,५४,८००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. त्यास मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे.

त्यास मा. स्थायी समितीने ठराव क्र. ४०९/४० दि. १७-१२-९७ अन्वये मान्यता दिलेले आहे. त्यानुसार कार्यालयीन निविदा सूचना क्र. जा.क्र. मनपा/लेखा/नि/२४/९८ दि. ०३-०६-९८ अन्वये निविदा मागविल्या असता निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (१३) निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (९) निविदा दर भरून प्राप्त झाल्या त्या दि. २३-०६-९८ रोजी उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | शेख मसूद | ७.९९% कमी दराने |
| २) | सय्यद अधर अली | १२.९९% -//- |
| ३) | संजय साळवे | ५.११% -//- |

| | | |
|---|---|---|
| ४) | सु. रा. काकडे | १३.९१% -//- |
| ५) | कुलवंतसिंग | ७.७०% -//- |
| ६) | एम. एम. काझी | ११.४१% -//- |
| ७) | एस. एम. शेख | ७.८६% -//- |
| ८ | डी. आर. जिवनलाल | १४.७८६% -//- |
| ९) | परफेक्ट कन्स्ट्रक्शन | ११.५५% -//- |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.७८६% कमी दराचे निविदा श्री. डी. आर. जिवनलाल यांचे आहेत. त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दि. २४-०७-९८ अन्वये मान्यता दिलेली आहे.

तरी श्री. डी. आर. जिवनलाल यांची १४.७८६% कमी दराची निविदा मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. पदमपाणी कॉलनी येथे वाचनालय बांधण्याचे कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा १४.७८६% कमी दराची निविदा श्री. डी. आर. जिवनलाल यांची स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५३/२७ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी सुधारित प्रस्ताव सादर केला आहे की, मो. सादतनगर स्लम भागातील रस्त्याचे डांबरीकरण करण्याकरिता अंदाजपत्रक र. रु. २५,३१,०००/- सार्वजनिक बांधकाम विभागाची दरसूची ९५-९६ अनुसार तयार करण्यात आले असून मा. आयुक्तांनी दि. ०४-०१-९७ रोजी प्रशासकीय मान्यता प्रधान केली असून सर्व साधारण सभेच्या विषय क्र. १९२/९ दि. १०-०३-९७, १५-०३-९७ व २६-०३-९७ द्वारे मंजुरी मिळाल्यानंतर रितसर वृत्त पत्रात प्रसिध्दी देऊन निविदा मागविण्यात आल्या व प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा श्री. के. बी. पाथ्रीकर यांची निविदा असल्यामुळे स्थायी समितीच्या विषय क्र. १३२/३ दि. ०५-०७-९७ अन्वये सदर ठेकेदाराकडून काम करून घेण्याची मंजुरी मिळाली त्यांना कार्यदेश क्र. मनपा/स्लम-१/४६२/९७ दि. २३-०९-९७ देण्यात आला व सादतनगर येथील डांबरी करणाचे काम करून घेण्याची आल्या व त्या कामाची रक्कम वजा जाता बचत अपेक्षित असल्याचे आढळले व त्या वॉर्डाचे स. नगरसेवक श्री. अब्दुल रशिद अ. सत्तार यांनी पत्र देऊन कळविले की सदर कामातील बचत मधून मो. राहुलनगर येथील स्लम भागातील व याच रस्ते अंतर्गत पाईप लाईन व ड्रेनेज करिता खोद काम झाल्यामुळे डांबरीकरण करणे जरुरी आहे. सध्या शहरात चालू असलेल्या घर ते घर डांबरीकरण (सुरत पॅटर्न) या योजनेद्वारे सर काम करता येईल व खर्च निविदा आफर प्रमाणे अंदाजपत्रकीय रक्कमेपक्षा जास्त होणार नाही.

करिता सदर ठेकेदार श्री. के. बी. पाथ्रीकर यांचेकडून पूर्वी दिलेल्या दर २४.२१% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी या दराने मो. राहुलनगर स्लम या ठिकाणी अंदाजपत्रकीय मंजूर रक्कमेच्या अधिन राहून काम करून घेण्याची मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. सादतनगर स्लम भागातील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठीच्या अंदाजपत्रकातील बचतीमधून राहुलनगर येथील स्लम भागातील

डांबरीकरणाचे काम या कामाचे मुळ गुत्तेदार यांच्याकडून पूर्वीच्याच दराने म्हणजे अं. प. दरापेक्षा २४.२१% कमी दराने अंदाजपत्रकीय रक्कमेच्या अधीन राहून करून देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५४/२८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी सुधारित प्रस्ताव सादर केला की, विभाग क्र. १,२ व ३ अंतर्गत रस्त्याचे पॅचवर्क करणेसाठी दिनांक १७-०९-९७ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. २२६/२५ अन्वये अंदाजपत्रक रक्कम रु. ५,४६,७७०/- ला मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र. मनपा/लेखा/८५/९७ दि. ०८-१०-९७ अन्वये निविदा मागविल्या असता तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २% जास्त दराने मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन कं. यांचे निविदेस दिनांक २६-१२-९७ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. ४१९/७ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

सदर काम करणेसाठी विभाग क्र. १,२ व ३ मधील रस्त्यावरील खड्डे ड्रेनेज व पाणी पुरवठ्याच्या कामामुळे खराब झालेले असून सदरचे काम त्वरित करून घेण्यात येत आहे. शहरातील बरेचशे रस्ते खराब झाल्यामुळे रस्त्याचे पॅचवर्क करणेसाठी नागरिकांची व नगरसेवकांची सतत मागणी होत असल्याने व सदरील निविदेची क्वाटींटी संपल्यामुळे पुन्हा आणखी ह्याच कामासाठी संबंधित ठेकेदाराकडून आणखी डांबर मटेरिअल घेवून कामे करण्यात येत आहेत.

तसेच मध्यंतरी पाच सहा महिने आचारसंहिता असल्यामुळे नविन निविदा काढता आली नाही. तसेच पुन्हा त्वरित निविदा काढणे शक्य नसल्याने व शहरातील पॅचवर्कचे काम सतत चालू असल्याने सदरील कामासाठी सुधारित अंदाजपत्रक रक्कम रु. ८,८४,०००/- चे तयार करण्यात आले आहे.

पूर्वीची अदंाजपत्रकीय रक्कम रु. ५,४६,७७०/- + ३,३७,२३० = ८,५४,०००/- चे सुधारित अंदाजपत्रकास व ह्यासाठी आणखी वाढीव रक्कम रु. ३,३७,२३०/- ला कार्योत्तर मंजुरी मिळणेस्तव प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विभाग क्र. १,२ व ३ मधील अंतर्गत विविध रस्त्याचे पॅचवर्क करणेच्या कामामध्ये वाढ झाल्याने व आचारसंहिता असल्यामुळे या कामाचे वाढीव अंदाजपत्रक र. रु. ३,३७,२३०/- ला तसेच काम या कामाचे पूर्वीचेच गुत्तेदार मे. आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांचेकडून करून घेण्यात आलेल्या कामास कार्योत्तर मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५५/२९ :**

मा. उप-आयुक्त (प्र.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, उपसंचालक माहिती विभागीय माहिती कार्यालय, औरंगाबाद यांनी मे. पृथ्वी प्रकाशन यांच्या तर्फे प्रसिध्द करण्यात येणाऱ्या दै. लोकमत, दै. लोकमत समाचार, दै. लोकमत, टाईम्स, यांच्या शासकीय जाहिराती दरामध्ये दि. १२-०३-९६ पासून दरवाढ झाल्याचे कळविले आहे. पृथ्वी प्रकाशन यांनी त्यांच्या १२-०३-९६ ते ०३-११-९६ या कालावधीमधील जाहिरातीच्या देयकामधील फरक रक्कम रु. २४,७२२=०० ची मागणी केली आहे. दि. ०३-११-९६ नंतर वाढीव दराने देयक अदा केलेली आहे.

तर पृथ्वी प्रकाशन यांच्या तर्फे प्रसिध्द करण्यात होणाऱ्या दैनिकामधील जाहिरातीच्या देयकातील फरक रक्कम रु. २४,७२२=०० अदाई करण्यास्तव तसेच इतर ही शासनमान्य

वृत्तपत्र संस्थानी मागणी केल्यास त्यांच्या देयकातील फरकातील रक्कम अदा करण्यास स्थायी समितीच्या निर्णयास्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मे. पृथ्वी प्रकाशन यांच्या तर्फे प्रसिध्द करण्यात येणाऱ्या दै. लोकमत, लोकमत समाचार व लोकमत टाईम्स, यांच्या शासकीय जाहिराती दरामध्ये दि. १२-०३-९६ पासून दरवाढ झाल्यामुळे १२-०३-९६ ते ०३-११-९६ या कालावधीमधील जाहिरातीच्या देयकामधील फरक रक्कम रु. २४,७२२=०० अदा करण्यास तसेच इतर शासनमान्य वृत्तपत्र संस्थांनी मागणी केल्यास त्यांच्या देयकातील फरकाची रक्कम अदा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी जाहिर केले.

स्वाक्षरीत/-
नगर सचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
मा. सभापती,
स्थायी समिती,
महानगरपालिका, औरंगाबाद

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.*

**दिनांक २८-०८-९८ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. मा. सभापती श्री. जयवंत ओक यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा महानगरपालिका औरंगाबाद येथील "मलिक अंबर" सभागृहात दि. २८-०८-९८ रोजी संपन्न झाली तिचे इतिवृत्त. सभेची सुरुवात "वंदे मातरम्" या गिताने अंदाजे दुपारी ४=०० वाजता झाली. सभेला खालीलप्रमाणे स.सदस्य व अधिकारी वर्ग उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स.स.श्री. प्रभाकर सिताराम विधाते | स. सदस्य |
| २) | स.स. श्री. अ. रऊफ म. अ. माबूद | -//- |
| ३) | स.स. श्री. स. अली मिरा सलामी | -//- |
| ४) | स.स. श्री. संजय जोशी | -//- |
| ५) | स.स. श्री. गौतम लांडगे | -//- |
| ६) | स.स. श्री. गांगवे बन्सी तुळशीराम | -//- |
| ७) | स.स. श्री. इंगळे रविंद्र बाबुराव | -//- |
| ८) | स.स. सौ. वाडेकर यशोदा धनंजय | -//- |
| ९) | स.स. श्री. जैन विकास रतनलाल | -//- |
| १०) | स.स. श्री. ढगे नरसिंग मुरलीधर | -//- |
| ११) | स.स. सौ. राधाबाई तळेकर | -//- |
| १२) | स.स. श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | -//- |
| १३) | स.स. श्री. बचाटे राजकुमार (मामा) | -//- |
| १४) | स.स. श्री. विखारोद्दिन पि. खुदबोद्दिन | -//- |
| १५) | स.स. श्री. स. अ. एकबालोद्दिन स. मो. कुतूबुबोद्दिन | -//- |

**संवाद :**

**श्री. संजय जोशी :** मागील बैठकीत माझ्या वॉर्डातील रामताश हौसिंग सोसायटी व खिंवसरा पार्क येथील नागरी सुविधा पुरवण्याबाबत चर्चा केलेली होती. सेल्फ डेव्हलपमेंटचा भाग आहे. डांबरीकरण बरोबर झालेले नाही. एक वर्ष झाले याची दखल घेतली नाही. याबाबत चर्चा होऊन मा. सभापती यांनी संबंधित अधिकारी यांना नागरी सुविधा पुरवण्याबाबत सूचना दिलेल्या होत्या परंतु आजपर्यंत काहीही कार्यवाही झालेली नाही. तसेच रामतारा गृहनिर्माण संस्थेच्या अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण झालेले नाही. अप्रोच रोड नाही. या ठिकाणी डांबरीकरण ही झालेले नाही. तरी प्रशासनाने त्यांना कॉम्पलेशन सर्टीफिकेट दिले ते कोणत्या आधारे या बाबतची चर्चा झाली. सभापतींनी संबंधित यांच्यावर या बाबत कार्यवाही करण्यात येईल असेही आदेश दिलेले होते. या बाबत खुलासा करावा. (याचवेळी स.स. श्री. नरेंद्र पाटील हे सभा सुरु होण्याच्या अगोदर पत्रकार कक्षात होते. त्यावेळी मा. सभापती यांचे लक्ष पत्रकार कक्षाकडे गेले व त्यांना सभापतीच्या परवानगी शिवाय स्थायी समिती सभागृहात प्रवेश करू नये असे सूचित केले.)

**मा. सभापती :** स. सदस्य श्री. नरेंद्र पाटील यांना विनंती की, सभा कामकाजास सुरुवात झालेली आहे. कृपया आपण बाहेर जावे.

**श्री. नरेंद्र पाटील :** मी ज्यावेळी पत्रकार परिषद घेण्यास सुरुवात केली त्यावेळी सभा कामकाजास सुरुवात झालेली नव्हती. मी सभागृहात बसलो नाही. पत्रकार कक्षात आहे. नगरसेवकांचा जो हॉल आहे तो रिकामा नाही. त्या हॉलमध्ये म.न.पा. ची काही कार्यालये नव्याने होत आहेत याकडे आपण लक्ष वेधावे मला धमकी देण्याची आवश्यकता नाही.

**मा. सभापती :** आपण पत्रकार कक्षात बसू शकता परंतु शांतपणे गडबड केली तर आपणांस गार्ड मार्फत बाहेर काढावे लागेल. (श्री. नरेंद्र पाटील हे याचवेळी पत्रकार कक्षातून सभागृहात येण्यासाठी मा. सभापती यांना विनंती करतात व आत येऊ का म्हणून विचारणा करतात. परंतु मा. सभापती यांनी त्यांना सभागृहात येण्यास परवानगी दिली नाही.)

**श्री. स. अली. मिरा. सलामी :** स. सदस्य श्री. नरेंद्र पाटील यांनी विनंती केल्यानुसार त्यांना आत येऊ द्यावे. यापूर्वीही बरेच नगरसेवक स्थायी समितीचे सदस्य नसतांना काही कामानिमित्त सभागृहात विचारणा करून आलेले आहेत.

**मा. सभापती :** आपणांस पुन्हाः सांगू इच्छितो की, आपण सभागृहात कृपया येऊ नये. पत्रकार कक्षात आपण शांतपणे बसू शकता. (याचवेळी श्री. नरेंद्र पाटील स. सदस्य हे स्थायी समितीच्या सभागृहाच्या गेटमधूनच तावातावाने बाहेर जातात.)

**मा. सभापती** : अति. शहर अभियंता यांनी स. सदस्य यांना बसण्यासाठी नगरसेवक कक्ष तयार करण्याची कार्यवाही करावी.

**श्री. संजय जोशी :** आताच मी केलेल्या प्रश्नाकडे लक्ष द्यावे. १ वर्षापूर्वी मा. आयुक्तांनी खिंवसरा पार्कला भेट दिली होती. समतारा गृह निर्माण संस्थेस अप्रोज रोड नाही. मा. सभापतींनी ८ दिवसांत तेथील काम करून देतो म्हणून सांगितले होते. डांबरी रस्ता ४ मी पाहिजे ३ मीटर देखील नाही, अनेक वेळा सांगून ही कामे होत नाही. मी खाली बसून काम करणार आहे.

**श्री. गौतम लांडगे, श्री. म. अ. रऊफ :** स. सदस्य यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे. त्याबाबत मागच्या बैठकीत चर्चा झाली होती. त्या चर्चेअंती मा. सभापती यांनी संबंधित अधिकारी यांना कार्यवाही करण्याच्या सूचना हि दिलेल्या होत्या. परंतु संबंधित अधिकारी यांनी काहीही कार्यवाही केलेली नाही. ती का करण्यांत आली नाही. याबाबत खुलासा करावा.

**श्री. संजय जोशी** : हिच परिस्थित गादीया विहारची आहे. मला खिंवसरा पार्क बद्दल सांगा मी खाली बसतो.

**मा. सभापती :** सहा. संचालक नगररचना अधिकारी यांनी खुलासा करावा.

**सहा. संचालक नगररचना :** त्या ठिकाणी पाहणी केलेली आहे. ज्या त्रुट्या आहेत त्या कळविल्या आहेत. नागरी सुविधा उपलब्ध करून देणे उदा. पाणी पुरवठा, डांबरी रोड, इ. कामे झालेली आहेत.

**श्री. संजय जोशी :** संबंधित अधिकारी यांनी तेथील काम झाल्याचे कम्पलिशन सर्टीफिकेट दिलेले आहे. ते कसे दिले गेले? प्रतयक्ष सभापतींनी या ठिकाणी येऊन बघावे अशी माझी विनंती आहे. स. सदस्य श्री. ढगे यांच्या वॉर्डातील अशाच प्रकारची परिस्थिती निर्माण झालेली आहे. या प्रमाणे औषधी भवन येथील परिस्थिती ही अशीच झालेली आहे. नाल्यावर अपार्टमेंट बाधून त्या लोकांच्या घरापर्यंत बांधत बांधत नेलेल्या आहे. रामतारा गृहनिर्माण संस्थेच्या १९८० ला रेखांकन झालेले आहे. पाचरस्ता नाही. अंतर्गत रस्त्यांचे कार्यवाही

करण्यांत येईल परंतु कार्यवाही करण्यात आली नाही. जर नागरी सुविधा होत नसेल तर मी आजच्या सभेत खाली बसूनच चर्चा करणार आहे. (याच वेळी स. सदस्य श्री. संजय जोशी हे सभागृहात खाली बसून आपल्या मुद्द्यावर चर्चा करतात. कार्यवाही होणार की नाहीृ हे अशी आश्वासन द्यावे तरच मी भूमीग्रहन सोडणार आहे. असे मा. सभापती यांना सांगतात.)

**मा. सभापती :** स. सदस्य श्री. संजय जोशी यांना विनंती की, त्यांनी खाली बसून चर्चा करू नये. संबंधित अधिकारी हे खुलासा करीत आहे.
(याचवेळी स. सदस्य श्री. संजय जोशी हे उभे राहून त्यांच्या खुर्चीवर जाऊन बसतात.)

**मा. आयुक्त :** स. सदस्य श्री. संजय जोशी यांनी खिवसंरा पार्क व रामतारा गृह निर्माण संस्थेच्या बाबतीत जो प्रश्न उपस्थित केला आहे तो अंतर्गत प्रश्न असून नागरी सुविधा पुरवण्या बाबतचा प्रश्न आहे. एक वर्षापूवी स. सदस्य यांच्या समवेत मी व सहाय्यक संचालक नगररचना, अति. शहर अभियंता, शहर अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी पाहणी केलेली होती. खिंवसरा पार्क ही पाच वर्षापूर्वीची उत्तम वसाहत झालेली आहे. खिंवसरा पार्कचे सेल्फ डेव्हलपमेंट रेकांकन आहे. तेथे परवानगी घेऊन अनेक अपार्टमेंट बांधलेल्या आहेत त्या ठिकाणी अनेक मध्यम वर्गीय लोक वसाहती करून राहात आहेत. स. सदस्य यांची तक्रार प्रशासनाकडे आहे. त्यावेळी मी नुकताच महापालिकेत रुजू झालेलो होता. त्यानंतर मी स. सदस्य श्री. संजय जोशी यांच्या समवेत महापालिकेतील संबंधित अधिकारी यांना त्या ठिकाणी आम्ही पाहणी केली होती. त्यावेळी त्या ठिकाणी असे दिसून आले की, जी काही अंतर्गत रस्त्याची रुंदी होती ती ३.५० ते ४ मीटर असावयास पाहिजे ती २.५० ते ३ मीटर दिसून आली. त्या ठिकाणी जो नाला आहे त्या नाल्यावर स्लॅब टाकण्यात आलेला आहे. तो स्लॅब असा टाकण्यात आला आहे. की तो नाला पुन्हा साफसफाई किंवा चोकअप काढावयाचे ठरल्यास काही पर्यायी व्यवस्था नाही. दुसरे असे की, जे विद्युत कामे म्हणजेच ज्या ठिकाणी ट्युब लाईट मक्युरी, सोडीयम दिवे हे ज्या त्या ठिकाणी अंतर्गत रस्त्यामध्ये बसवावयास पाहिजे होत्या. त्याच जागेवर बसण्यात आलेल्या नव्हत्या. तसेच वायरींगचे ही काम बरोबर केलेले नव्हते. पाठीमागून जो नाला येतो. त्या नाला ट्रेडींगचे काम केलेले होते. ते ही व्यवस्थित केलेले नव्हते. अशा प्रकारच्या समस्या त्या ठिकाणी दिसून आल्या याबाबतीत खिंवसरा पार्क या मालकास मागेच महापालिकेने एक नोटीस दिलेली होती. आता पुन्हा त्यांना महापालिकेतर्फे नोटीस देण्यांत येऊन कळविण्यात येईल की आपण जी काही खिंवसरा पार्क व काही अपार्टमेंटचे बांधकाम केलेले आहे. ते सेल्फ डेव्हलपमेंटच्या अधिन राहून केलेले आहे. व तेथील नागरिकांना ज्या काही नागरी सुविधा पुरवावयास पाहिजे त्या का पुरवत नाहीत. ही जबाबादारी महापालिकेची नाही असे सांगून कळविण्यात येईल व येत्या स्थायी समिती बैठकी पय्रंत संबंधित अधिकाऱ्यांनी त्या कामाबाबत संबंधित मालकाने ते काम केले आहे किंवा नाह, न केल्यास ते काम महापालिकेतर्फे करण्यात येईल व संबंधित मालकाकडून होणारा सर्व खर्च वसूल करण्यात येईल.

**श्री. संजय जोशी :** मा. आयुक्त यांनी फक्त खिंवसरा पार्क बाबतचा खुलासा केलेला आहे. रामतारा गृहनिर्माण संस्थेच्या बाबतीत खुलासा करावा. महापालिकेने या

ठिकाणचे पूर्ण विकास कामाबाबतचे सर्टिफिकेट कशाचे आधारे दिले. तेथील नागरिकांना रात्री-बेरात्री जाणे-येणे करावे लागते. तेथील ले-आऊट कसे मंजुर केला त्यांना हाल अपेष्टा सोसाव्या लागत आहे. ही जबाबादारी कोणाची आहे. याबाबत ही खुलासा व्हावयास पाहिजे.

**श्री. नरसिंग ढगे :** गादीया पार्क मध्ये अशाच प्रकारची परिस्थिती झालेली आहे. तेथील बिल्डरवर कार्यवाही करण्यात यावी.

**श्री. मिरा सलामी :** औषधी भवन बाबतीतही कार्यवाही करावी.

**मा. सभापती :** मा. आयुक्त यांना विनंती की, खिंवसरा पार्क येथील नागरी सुविधा बाबत व रामतारा हौसिंग सोसायटी येथील काम पूर्णत्वाचे सर्टिफिकेट ज्या संबंधित अधिकारी यांनी दिलेले आहे. तेथील काम नागरी सुविधा अपूर्ण असतांना ते सर्फिफिकेट कसे देण्यात या बाबत तपासणी करून संबंधित अधिकाऱ्यावर तातडीने कार्यवाही करावी. तसेच गादीया पार्क येथील संबंधित अधिकारी यांनी योग्य ती पुरपुर माहिती घेऊन कार्यवाही करावी. बिल्डरने सुविधा दिल्या नाही तर बिल्डरवर कार्यवाही करावी. शहरातील अशाच प्रकारच्या ज्या तक्रारी असतील त्याचे निवारण संबंधित अधिकारी यांनी लवकरात लवकर करावे.

**श्री. प्रभाकर विधाते :** माझ्या वॉर्डामधील डिंबरगल्ली येथे घाण पाणी साचलेले आहे. त्या घाण पाण्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत आहे. बरेच नागरिक बिमार पडलेले आहे. संबंधित अधिकाऱ्यांना याबाबत सूचना करूनही कार्यवाही करीत नाही. या भागात खड्डे खोदले व डांबररोड देखील खोदून काढला.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.)** त्या ठिकाणच्या घाण पाण्याबाबतची कार्यवाही केलेली आहे. जे घाण पाणी येत होते. त्यास संबंधित विभागातील कर्मचाऱ्यांनी ते काम व्यवस्थित करून दिले आहे. परवाच नागरिकांनी फोन वरून सांगितले की घाण पाणी आले नाही.

**श्री. विधाते प्रभाकर :** संबंधित अधिकारी चुकीची उत्तर देतात. आपण प्रत्यक्ष पाहणी करून समस्या सोडवावी.

**मा. सभापती :** कार्यकारी अभियंता यांनी स. सदस्य श्री. प्रभाकर विधाते यांच्या सोबत जाऊन प्रत्यक्ष पाहणी करून जर काम पूर्ण झालेले नसेल ते पूर्ण करावे जेणे करून नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होणार नाही.

**मा. सभापती :** विषय क्र. १ वर चर्चा करावी.

**श्री. स. अली मिरा सलामी, श्री. म. अ. रऊफ, श्री. विखारोदिन :** मा. सभापती यांना विनंती की, शहरातील बरेचश् विकास कामे ही होत नाही. त्याबाबत चर्चा होऊ द्यावी नंतर विषय पत्रिकेतील विषयावर चर्चा करावी.

**मा. सभापती :** स. सदस्य यांना चर्चा करावयाची असेल ती त्यांनी सर्वसाधारण सभेत करावी. मग ती विकास कामाबाबत असो किंवा इतर महत्वाच्या मुद्द्यावर असो.

**श्री. स. अली मिरा सलामी :** महापालिकेत नागरिक वेगवेगळ्या महाध्यमातून आर्थिक बाजूवर येथे चर्चा होणे आवश्यक आहे. कर वसूल केला जातो. त्याचे विकास कामाबाबत ज्या काही समस्या असतील त्याबाबत चर्चा होऊ द्यावी. चर्चा का करावयाची नाही. याची योग्य ते उत्तर द्यावी. आपण पक्षपातीपणाची भूमिका घेऊ नये. एका स. सदस्य यांना अनेक वेळा बोलण्याची संधी व आम्हास

बोलू द्यावयाचे नाही हे आपले धोरण चुकीचे असून आपण सभागृहात अगोदर मिनीटसवर चर्चा होऊ द्यावी.

**मा. सभापती :** स. सदस्य आपणांस विनंती की आपण सर्वसाधारण सभेत शहरातील विकास नागरिक सुविधा बाबत चर्चा करावी. आता विषय क्र. १ वर चर्चा करावी.

(याच वेळी स. स. श्री. स. अली मिरा सलामी हे मा. सभापती यांच्या आसनाजवळ येऊन, सभागृहात चर्चा होऊ द्यावी अशी विनवणी करतात. जर चर्चा होऊ देत नसाल तर माझा त्यास विरोध आहे. असे बोलतात.)

**मा. सभापती :** मागील ४ ते ५ दिवसांपासून दै. वृत्तपत्रात ज्या पदाधिकारी यांच्या उलट सुलट बातम्या छापून येत आहेत की, श्री. कुमावत सभागृह नेता, यांनी दिलेला राजीनामा, व माझ्या स्वत:च्या बाबतीत ही पदाधिकारी यांच्या गाड्या नादुरुस्त आहे. त्यामुळे श्री. अविनाश कुमावत यांनी राजीनामा दिलेला आहे. हे चुकीचे छापून आलेले आहे. तर या ठिकाणी गाड्या खरेदी करण्याबाबत काहीही मुद्दे व ताशेरे धरून कोणत्याही पदाधिकारी यांनी गाड्या खरेदी करण्याबाबतचा विचारही केलेला नाही. या महापालिकेत नवीन गाड्या खरेदी करावयाच्या नाही गाड्या महत्वाच्या नसून विकास कामांना महत्व द्यावयाचे आहेत. प्रशासनाला मी असे सांगू इच्छितो की, ज्या एखाद्या कामासाठी प्लॅन केलेला आहे. ते काम करण्याची कार्यवाही ही योगय त्या रितीने व लवकरात लवकर कशी करता येईल याकडे लक्ष द्यावे. जेणेकरून अधिकारी व पदाधिकारी यांच्यात समन्वय राहील. तीन गाड्या पदाधिकाऱ्यांना खरेदी करावयाचा प्रस्ताव मंजूर केलेला होता तो रद्द करण्यात येतो.

**श्री. स. अली मिरा सलामी :** नविन गाड्या खरेदी करण्याचा जो निर्णय रद्द केलेला आहे. त्याबद्दल अभिनंदन. परंतु आपल्याकडे जे मॅकेनिकल व इतर ही टेक्नीकल कर्मचारी असुनही महापालिकेतील गाड्या दुरुस्तीसाठी बाहेरच्या रिपेरींगसाठी गॅरेजला जातात. याबाबत माहिती द्यावी.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**उप अभियंता (यांत्रिकी) :** पेट्रोल वाहनाची कामे वर्कशॉपमध्ये ८०% काम होते २०% पाटामोपींग कुशन, टायर रिमोल्डींग ई. कामे बाहेरून होतात. रिमोडींग फक्त बाहेरील गॅरेज कडून करून घेतल्या जाते. इतर सर्व दुरुस्ती डिझेल बाबत आपल्या महापालिका विभागातून करण्यात येते. पेट्रोल वाहनाचे मॅकेनिक आपल्याकडे नाही.

**श्री. म.अ. रऊफ, श्री. गौतम लांडगे :** महापालिकेत यांत्रिकी विभागात जे कर्मचारी आहेत ते कर्मचारी किती आहेत व ते कर्मचारी किती काम करतात. डिझेल गाडी एका ठिकाणी दुरुस्तीला जाते तर कार पेट्रोल गाडी एका गॅरेजला दुरुस्तीला जाते. अधिकारी हे नेहमी चुकीची उत्तरे देतात. याबाबत प्रशासनाचे धोरण योग्य नाही.

**श्री. संजय जोशी :** महापालिकेतील पेट्रोलच्या गाड्या फक्त बाहेर रिपेंअरींगसाठी जातात असे अधिकारी यांचे म्हणणे आहे. हे चुकीचे असून वेल्डींग करण्यासाठीही महापालिकेच्या बाहेर रिपेंरींग करिता गॅरेजवर जातात हे कसे काय? आपल्या महापालिकेत सर्व टेक्नीकल कर्मचाऱ्यांचा स्टॉक असतांना संबंधित अधिकारी हे बाहेर गाड्या दुरुस्तीसाठी कशा पाठवता. एखाद्या गाडीची

संबंधित गॅरेजवाला यांनी टेस्टींग घेण्यासाठी गाडी बाहेर चालविली व जर ॲक्सीडेंट झाला तर त्या गाडीचे पूर्णतः नुकसान झाले तर आपल्याला इन्युरन्स मिळतो काय महापालिकेत कर्मचारी अपुरा असेल तर त्याबाबत योग्य ती प्रशासनाने कार्यवाही करावी. व बाहेरच्या गॅरेजवर गाड्या कोणत्याही प्रकारे रिपेरींगसाठी जाणार नाही याची संबंधित अधिकारी यांनी व प्रशासनाने नोंद घ्यावी.

**श्री. गौतम लांडगे :** केवळ बारीक सारिक कामासाठीचे बाहेरील गॅरेजवरील बिले सादर केल्या जाते. तेव्हा लेखा विभागाने मंजुरी न देता पडताळणी करूनच पुढील कार्यवाहीस्तव पाठवावे.

**मा.सभापती :** यापुढे पदाधिकारी यांच्या गाड्यावर व अधिकारी यांच्या गाड्यावर महिण्याला किती खर्च येतो. तसेच महापालिकेतील गाड्याचे कोणत्या ही प्रकारची दुरुस्ती करावयाची असेल तर गाडी बाहेरच्या गॅरेजवर गेली न पाहिजे त्या महापालिकेच्याच यांत्रिकी विभागामध्ये दुरुस्त करून घ्याव्यात जो की, जास्त वेळ ही वेस्टेज होणार नाही. कर्मचारी स्टॉक कमी असेल तर प्रशासन तशा प्रकारची कार्यवाही करतील.

**विषय क्र. १५६/१ :**

दिनांक ३०-०७-९८ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री. राजकुमार बचाटे :** इतिवृत्तातील पान क्र. ३ व ४ मध्ये आकाशवाणी ते त्रिमुर्ती चौक पर्यंतच्या रस्त्यावर महापालिकेने जे (चाऱ्या) सिमेंट नाल्याचे बांधकाम केले आहे ते योग्य त्या पध्दतीने केलेले नाही. याबाबत मागील बैठकीत चर्चा झालेली होती. व मा. सभापतींनी संबंधित अधिकाऱ्यांना कार्यवाही करण्या बाबत आदेशही दिले होते. त्या बाबत कार्यवाही पूर्ण झाली का?

**श्री. गौतम लांडगे, श्री. स. अली मिरा सलामी :** सभागृहात मागील बैठकीत या संदर्भात चर्चा झालेली होती. संबंधितांना आपण आदेश ही दिलेले होते. आपले आदेशाचे पालन संबंधित अधिकारी करत नाही. त्या ठिकाणची आजपर्यंत काय कार्यवाही झाली. या बाबत माहिती द्यावी.

**मा. सभापती :** अति. शहर अभियंता यांनी स. सदस्या यांच्या सोबत पाहणी केलेली आहे. त्यांनी लवकरात लवकर त्या कामाबाबत कार्यवाही करावी.

**श्री. नरसिंग ढगे :** इतिवृत्तातील पृष्ठ क्र. ३ वर माझ्या वॉर्डातील अपूर्ण रस्त्याचे कामाबाबत संबंधित ठेकेदार ३७ टक्के बिला मध्ये पूर्ण काम करण्यास तयार आहे. याबाबत कार्यवाही करण्याबाबत चर्चा झालेली होती. परंतु संबंधित अधिकारी यांनी काय कार्यवाही केली याची माहिती द्यावी.

**उप अभियंता (बां) :** सदरील वाढीव काम हे मुळ कामामध्ये सामाविष्ट केलेले नव्हते. सहारा अपार्टमेंट ते लक्ष्मीनगर ला अप्रोच पाहिजे होते. वाढीव काम हे १० टक्क्या पेक्षा जास्त करता येत नाही.

**श्री. संजय जोशी :** महापालिकेचे योग्य ते नियम काय आहेत याची माहिती द्यावी.

**मा. आयुक्त :** एखाद्या कामाचे इस्टीमेंट मंजूर करून टेंडर काढतो. त्या कामाला सुरुवात केल्यानंतर ते जे काम आहे. होणाऱ्या कामाच्या एकूण खर्चाच्या १० टक्के

पेक्षा होणारे जे वाढीव काम आहे. त्यापेक्षा जास्त करता येत नाही. १० टक्क्यापेक्षा पर्यंत वाढीव काम करता येते. जे वाढीव काम आहे. त्या कामासाठी नवीन इस्टिमेंट तयार कसा येते. अशी संबंधित अधिकारी यांनी कार्यवाही करावी व मंजुरी घेऊन ते काम पूर्ण करता येईल.

**मा. सभापती :** मा. आयुक्त यांनी स. सदस्य श्री. नरसिंग ढगे यांच्या वॉर्डातील अपूर्ण रस्त्याचे राहिलेले काम ३७ टक्के बिलो मध्ये करून घेण्यास संबंधित ठेकेदार तयार असेल व वाढीव काम हे महापालिकेच्या नियमाधीन होत असेल तर प्रयत्न करावेत. नसता त्या कामाचे पुन्हा अंदाजपत्रक तयार करून घेता येईल व त्यास मंजुरी देऊन ते काम पूर्ण होण्याची योग्य ती कार्यवाही करावी.

**श्री. म. अ. रऊफ** : इतिवृत्तील पृष्ठ क्र. ९ वर म.न.पा. च्या जमिनीवर अनाधिकृत बांधकामाबाबत सूचना देवूनही प्रशास कार्यवाही करीत नाही. मा. महापौर सभागृहनेता, विरोधी पक्ष नेता यांनी पत्र दिलेले आहे. याबद्दल चर्चा झालेली होती व कार्यवाही करण्याचे आदेश दिलेले होते. रुलींगला महत्व दिले जात नाही. परंतु त्या ठिकाणाची परिस्थिती पाहिली असता काहीही कार्यवाही झालेली नाही. संबंधित अधिकारी त्या ठिकाणी आजपर्यंत आलेले नाहीत. दुकाने बांधून रु. १५००/- एका दुकानाचे भाडे घेण्यात येते. याबाबत माहिती द्यावी.

**मा. सभापती :** प्रशासकीय अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**प्रशासकीय अधिकारी** : अनाधिकृत बांधकाम ज्या ठिकाणी होते आहे त्या बाबतची कार्यवाही महाराष्ट्र शासनाच्या आलेल्या दिनांक १८ जुलै ९८ चे पत्रानुसार करता येत नाही. त्या पत्रात असे म्हटले आहे की, सप्टेंबर पर्यंत पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे ज्या ठिकाणी मध्यम स्वरुपाचे बांधकाम होत असेल ते सध्या तरी काढण्यात येऊ नये.

**मा. सभापती :** प्रशासकीय अधिकारी यांना सूचित केले जाते की, पावसाळा संपल्यावर शहरात ज्या ज्या ठिकाणी अनाधिकृत बांधकाम झालेले असतील ते सर्व पाडण्यात यावे.

**श्री. स. अ. एकबालोद्दिन** : मागील बैठकीत इतिवृत्तात पृष्ठ क्र. ११ वर फंक्शन हॉलच्या बांधकामाबद्दल पुढे काय कार्यवाही झाली याबाबत माहिती द्यावी.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**उपअभियंता (इ.) :** याबाबत पोलिस प्रोटेक्शन मागण्यात आले काम करायला गेलो होतो. वक्फ बोर्डाने न्यायालयाकडून मनाई हुकूम आणलेला आहे.

**श्री. स. अ. एकबालोद्दिन :** स्टे आल्यावर ताबडतोब कार्यवाही केली नाही. १५ दिवस झाले या प्रकरणात वकील लावण्यात आले नाही. स्थगिती आदेश उठविण्याची ताबडतोब कार्यवाही झाली पाहिजे.

**मा. सभापती :** या कार्यवाही बाबत उपआयुक्त श्री. कांबळे साहेब यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून एक न्यायालयीन वकील लावून कार्यवाही करावी.

**श्री. म. अ. रऊफ :** बाबा फरजन यांचे घराजवळील कामाचे स्थगिती आदेश अद्याप उठविण्यात आलेले नाही.

**श्री. स. आ. एकबालोद्दिन :** आता मला कार्यालयाकडून पत्र मिळाले त्यात तकादा करित आहे. असे शब्द आहे. तकादा हे शब्द बदलण्यात यावे हे शब्द पैसे वसुलीसाठी वापरण्यात येते.

**मा. आयुक्त :** तकादा या शब्दाचा मराठी मध्ये पाठपुरावा असा अर्थ होतो.

**श्री. म. अ. रऊफ** : इतिवृत्तातील पृष्ठ क्र. १२ वर नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतून शाळेतील विद्यर्थ्यांना शोलय पुस्तके व वह्या वाटप लवकरात लवकर करण्यात यावे यासाठी चर्चा झालेली होती. ६ महिने झाले आतापर्यंत देण्यात आले नाही व मा. सभापती यांनी शिक्षणाधिकारी यांना पुस्तके व वह्या विद्यार्थ्यांना वाटप झालेले नाही. साहित्य कधी वाटप करणार याची माहिती द्यावी.

**श्री. स. अ. एकबालोद्दिन :** शैक्षणिक बाब आहे या कामाला काय मर्यादा आवश्यक आहे.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**मुख्य लेखाधिकारी :** शालेय विद्यार्थ्यांना पुस्तके व वह्या वाटप बाबत या कामासाठी टेंडर संबंधिचे काम लवकरच होईल.

**श्री. गौतम लांडगे :** शिक्षणाधिकारी यांच्या कामाबाबतच्या बऱ्याच वेळा तक्रारी येतात. संबंधित अधिकारी हे कोणत्याही प्रकारची कामे ही निष्काळजीपणाने करतात तसेच सभागृहात मा. सभापती आपण कार्यवाही करण्याबाबतचे आदेश दिलेले असतांना कार्यवाही होत नाही. हा सभागृहाचा आपमान आहे.

**श्री. म. अ. रऊफ :** मागील बैठकीत प्रस्तावानुसार ठराव पास होऊ असे ठरले होते की, शालेय विद्यार्थ्यांना १५ ऑगस्ट पूर्वी गणवेश वाटप व्हावयास पाहिजे होते. परंतु त्याबाबतही संबंधित अधिकारी यांनी प्रोसिजर पूर्ण केलेली नाही. तसेच कपड्यावरील कळीची शिलाई बाबतची चर्चा झालेली होती. प्रत्यक्ष पाहता कोणतेच काम वेळेवर होत नाही.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांना सूचित करण्यात येते की, नगरसेवकांच्या स्वेच्छानिधीतून शालेय विद्यार्थ्यांना पुस्तके ववह्या वाटप बाबत जो सभागृहात निर्णय झालेला आहे. त्याबाबत लवकरात लवकर कार्यवाही करावी यापुढे शाळा सुरु होण्यापूर्वी मुलांचे ड्रेस वह्या पुस्तके इ. चे. अंदाजपत्रके तयार ठेवण्यात यावे. व दुसरे असे की, १५ ऑगस्ट पूर्वी शालेय विद्यार्थ्यांना गणवेश वाटप केलेले नाही. अशा प्रकारच्या तक्रारी आलेल्या आहे. त्याबाबतही कार्यवाही करावी. तसेच कपडा शिलाईच्या नमुन्यनुसार कळीची शिलाई करणे बाबतही कार्यवाही करावी.

**श्री. म. अ. रऊफ :** इतिवृत्तातील पृष्ठ क्र. १७ वर किराडपुरा शाळा क्र. १ व नॅशनल स्कूल जवळच्या कचरा कुंड्या शाळेपासून दूर ठेवण्याबाबत चर्चा झालेली हाती. त्या कचरा कुंड्याची योग्य त्या खाली जागेवर ठेवण्याबाबत मा. सभापती आपण संबंधित अधिकारी यांना तसे आदेशही दिलेले होते. परंतु तेथील कचरा कुंड्या आज रोजी त्या ठिकाणी आहे. का त्या जागेवरून काढण्यात आलेल्या नाही. अधिकारी हे आदेशाचे पालन करीत नाही. तर त्याच्यावर कार्यवाही करावी.

**मा. सभापती :** किराडपुरा शाळेजवळील ज्या कचरा कुंड्या आहेत त्या घाणीचे भरलेल्या असतात त्यामुळे शालेय विद्यार्थ्याचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता आहे. त्यामुळे तेथील कचरा कुंड्या संबंधित अधिकारी यांनी संबंधित झोन ऑफिसरला कळवून तात्काळ उठविण्यात येऊन ज्या ठिकाणी महापालिकेची मोकळी जागा असेल त्या ठिकाणी ठेवण्यात याव्यात जेणे करून इतर नागरिकांनाही त्या घाणीमुळे त्रास होणार नाही.

(याच वेळी मा. सभापती यांनी विषय पत्रिकेतील विषय क्र. २ ला सुरुवात केली असता स. सदस्य श्री. म.अ. रऊफ यांनी आधी इतिवृत्ताचा विषय क्र. १ यावर चर्चा

होऊन द्यावी. असे बोलत होते व त्यांनी तावातावाने विषय क्र. २ वर चर्चा होऊ देत नसेल तर माझा या आजच्या सभेला यापुढे मी सभात्याग करत आहे. असे म्हणत त्यांनी विषय पत्रिका फाऊन मा. सभापती यांच्या असनासमोर टाकली.)

**मा. सभापती :** दिनांक ३०-०७-९८ रोजी संपन्न झालेल्या सभेतील १५१/२५ ठरावामध्ये सदरील वसाहत अनाधिकृत असल्याने २५% लोकवर्गणी भरून घेतल्यानंतर प्रतयक्षात काम सुरू करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. अशी वाढ करण्यास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

दिनांक ३०-०७-९८ रोजी संपन्न झालेल्या सभेतील ठराव क्र. १५१/५ मध्ये "सदरील वसाहत अनधिकृत असल्याने २५% लोकवर्गणी भरून घेतल्यानंतर प्रत्यक्षात काम सुरू करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. अशी वाढ करण्यासह दिनांक ३०-०७-९८ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५७/२ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, मोमीनपुरा येथील खडी रस्त्याने डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९७-९८ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रु. १,७७,२२१/- चे तयार करण्यात आले असून सदरचा खर्च "नविन डांबरीकरण" या लेखा शिर्षाखाली ठेवण्यात आलेल्या तरतूदीतून करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. मोमीनपुरा येथील खडी रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक र. रु. १,७७,२२१/- चे "नविन डांबरीकरण" या लेखा शिर्षातून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५८/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिंधी कॉलनी (पश्चिम भाग) अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९६-९७ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डी.एस.आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रु. ३,५५,१०५/- चे तयार करण्यात आले असून सदरील खर्च १९९८-९९ च्या पुर्नडांबरीकरण या लेखाशिर्षातून करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिंधी कॉलनी (पश्चिम भाग) अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक र. रु. ३,५५,१०५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५९/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, एकनाथनगर ते तुलसी हौसिंग सोसायटी या रस्त्यास डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९६-९७ च्या

सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डी.एस.आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रु. २,४०,०००/- चे तयार करण्यात आले असून सदरील खर्च १९९८-९९ च्या भांडवली रस्ते (नविन डांबरीकरण रस्ते) मध्ये ठेवण्यात आलेल्या तरतूदीमधून करण्यात येईल. करिता करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एकनाथनगर ते तुलसी हौसिंग सोसायटी या रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. २,४०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६०/५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर करीत आहे की, नगरभवन परिसरातील जुनी इमारत तोडून जुन्या इमारतीच्या बांधकाम साहित्याची विल्हेवाट करणे बाबत दि. ०९-०७-९८ रोजी सकाळी ११.०० वाजता नगरभवन परिसरात मा. उपआयुक्त (महसूल) व अतिरिक्त शहर अभियंता यांच्या उपस्थितीत जाहीर लिलाव करण्यात आला असता त्यावेळेस बोली कमी आल्यामुळे पुन्हा दि. ३०-०७-९८ रोजी सकाळी ११.०० वाजता नगरभवन परिसरात जाहिर लिलाव (दुसरी वेळ) मा. उप-आयुक्त (महसूल) मालमत्ता अधिकारी, व अतिरिक्त शहर अभियंता यांच्या उपस्थितीत करण्यात आला असता सदरील जाहिर लिलाव एकूण आठ (०८) लोकांनी भाग घेतला या आठ बोलीधारकापैकी श्री. जावेदखॉन यांनी सर्वात जास्त रु. १,९५,०००/- इतकी बोली लावलेली आहे. तसेच दुसऱ्या नंबरवर श्री. शेख रज्जाक यांनी रक्कम रु. १,९३,०००/- व तिसरे बोलीधारक श्री. मिर्झा नासेरखॉन यांनी रु. १,१७,०००/- बोली लावलेली आहे.

लिलावाच्या समितीने श्री. जावेदखॉन यांनी लावलेल्या रक्कम रु. १,९५,०००/- च्या बोलीस एक दोन तीन वेळेस बोली बोलून अंतिम केली आहे.

करिता सर्वात जास्त बोली बोलणारे श्री. जावेदखॉन यांनी बोली लावल्यामुळे त्यांना इमारत तोडून साहित्याची विल्हेवाट लावण्याकरिता आदेशित करण्यासाठी प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नगरभवन परिसरातील जुनी इमारत तोडून जुन्या इमारतीच्या बांधकाम साहित्याची विल्हेवाट करणे बाबत लिलावात रु. १,९५,०००/- श्री. जावेदखॉन यांनी लावल्यामुळे त्यांना इमारत तोडून साहित्याची विल्हेवाट लावण्याकरिता आदेशित करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६१/६ :**

मालमत्ता अधिकारी यांच्याकडून मा. आयुक्त यांच्या मंजुरीनुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहानुरवाडी येथे मनपातर्फे धोबी घाट बांधण्यात आले आहे. सदरील हौदाचे भाडे निश्चितीसाठी प्रकरण भाडे समिती समोर ठेवण्यात आले होते. भाडे समितीने खालील प्रमाणे भाडे निश्चित करण्यात आले.

**भाडे :**

एक लहान व एक मोठा हौद या एकत्रित युनिटसाठी १४०.०० प्रतिमहा प्रमाणे भाडे आकारण्यात यावे.

वरील भाडे मान्यतेसाठी प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपातर्फे शहानुरवाडी येथे बांधण्यात आलेल्या धोबी घाट हौदाचे भाडे, भाडे समितीने निश्चित केलेल्या एक लहान व एक मोठा हौद या एकत्रित युनिटसाठी १४०.०० प्रतिमहा प्रमाणे भाडे आकारणीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६२/७ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. चिकलठाणा (गांव) येथे फरशी व खांडकी बसविणे कामाकरिता अंदाजपत्रक रक्कम रु. ६,४७,९१४/- सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांची दरसूची १९९६-९७ अनुसार तयार करण्यात आली असून मा. आयुक्तांनी दि. ०४-०८-९८ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

सदर काम १८ खेडी विकास योजना अंतर्गत अर्थसंकल्प तरतूदी १९९८-९९ मध्ये खर्च करण्याचे प्रस्तावित आहे. मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. चिकलठाणा (गांव) येथे फरशी व खांडकी बसविणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ६,४७,९१४/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६३/८ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. शताब्दीनगर येथे दहा बैठकीचे सुलभ शौचालय बांधणे बाबत कामाकरिता सा. बां. खाते याच्या सन ९७-९८ च्या दरसुचीप्रमाणे रु. ५,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम "सुलभ शौचालय व मुतारी बांधणे व दहवा वित्त आयोग अनुदान" या शिर्षकातून करण्यांत येईल. सदर च्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. ०९-०८-९८ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे. तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेल्या रु. ५,००,०००/- चे अंदाजपत्रकास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. शताब्दीनगर येथे दहा बैठकीचे सुलभ शौचालय बांधणेसाठी र. रु. ५,००,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६४/९ :**

कार्यकारी अभियंता (पापु) यांनी प्रस्ताव सादर केला की, शहरात नविन वसाहती होत आहे. तसेच उन्हाळ्यामध्ये पाण्याची टंचाई भासते, करिता शहर व सिडको भागात विविध ठिकाणी एकूण २८ विधंन विहिरी खोदून त्यावर हातपंप बसविणे आहे. यात २५ विधंन विहिरी त्यावर हातपंप बसविणे आहे. यात २५ विधंन विहिरी शासकीय अनुदानातून व तीन विंधन विहीरी स. नगरसेवक स्वेच्छा निधीतून घेण्यात येणार आहे. एकूण २८ विधंन विहिरी खोदून त्यावर हात पंप बसविण्याच्या कामासाठी रु. ७,६१,४६०/- चे अंदाजपत्रक बनविण्यात आले आहे. अंदाजपत्रक बनविण्यात आले आहे. अंदाजपत्रकास मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहर व सिडको भागासाठी विविध ठिकाणी २८ विधंन विहिरी खोदून हातपंप बसविणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये ७,६१,४६०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६५/१० :**

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा व जलःनिसारण) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, संजयनगर गल्ली क्र. १ येथील सौ. रंजनी मधुरदास वैष्णव यांच्या मालकीची विहिर महानगरपालिका २५ वर्षाकरिता भाडेपट्ट्याने घेऊन इच्छित आहे. या विहिरीचे पाणी, कैलासनगर स्मशान भूमी येथे व आणि बाणीच्या वेळेस पाणी पुरवठा करण्याकरिता वापरण्यात येइ्रल या विहिरीसाठी प्रतिवर्ष्ज्ञ रु. १५००/- रु. मानधन म्हणून संबंधित विहिर मालकास देण्यात येई व करारपत्राच्या वेळेस ११ वर्षाचे मानधन रु. १६,५००/- आगाऊ देण्यात येईल व उर्वथ्रत पुढील १४ वर्षाकरिता प्रतिवर्षी करिता १५००/- मानधन म्हणून देण्यांत येईल. तरी विहिर भाडेपट्याने घेण्याचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर करारनाम्याचा पुढील कार्यवाही मालमत्ता विभागाकडून करण्यांत येईल.

**संवाद :**

**सौ. यशोदा वाडेकर :** ही विहीर कुणाच्या मालकीचा आहे. याची माहिती द्यावी. संजयनगर येथे गेल्यावर्षी रु. २५०००/- खर्चाची जलवाहिनी टाकली. टँकरने पाणीपुरवठा केला गेल्यावर्षी पाणी आले नाही.

**मा. सभापती :** अधिकारी यांनी या प्रस्तावाबाबत खुलासा करावा.

**कार्य. अभियंता (पा.पु.) :** संबंधित विहीर मालकाकडून महापालिका २५ वर्षाकरिता भाडेपट्ट्याने घेऊ इच्छित आहे. या विहिरीचे पाणी कैलासनगर स्मशाभूमी व आणिबाणीच्या वेही पाणीपुरवठा करण्याकरिता वापरण्यात येईल मागे जो पाणी पुरवठा टँकर द्वारे होत होता तो उद्यान व इतर तात्काळ आवश्यक त्या कामासाठी वापरण्यात येत असे.

**श्री. स. अली मिरा सलामी :** भाड्यापोटी रु. १६,५००/- देतो त्या ऐवजी विहिरीचे खोदकाम करता येईल ते पाहावे.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी त्या ठिकाणी जाऊन प्रत्यक्ष पाहणी करून ती विहिरीमधील खोदकाम करावयाचे की बोअर घेऊन जास्तीत जास्त पाणी उपलब्ध करता येईल या बाबत चौकशी करून कार्यवाही करावी. प्रस्ताव तुर्त स्थगित करण्यात येतो.

**ठराव :**

सदर प्रस्ताव तुर्त स्थगित करण्यात येतो. असे सर्वानुमते मंजुर करण्यात येते.

**विषय क्र. १६६/११ :**

कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा व जलनिःसारण विभाग यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. युनूस कॉलनी येथील १५० मी.मी. व्यासाची स. डब्ल्यू जी. ड्रेनेज लाईन काढून त्या ठिकाणी २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. नेज पाईपलाईन टाकण्याकरिता अंदाजपत्रक रक्कम रु. १,०६,८१०/- चे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण खात्याच्या दरसूची सन १९९६-९७ अन्वये तयार करण्यात आले आहे. सदरील काम लेखाशिर्ष देखभाल व दुरुस्ती १९९८-९९ यातून प्रस्तावित आहे.

मा. आयुक्तांनी दि. २८-०७-९८ ला प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. तरी प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. युनूस कॉलनी येथील १५० मी.मी. व्यासाची स. डब्ल्यू जी. ड्रेनेज लाईन काढून त्या ठिकाणी २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकण्याकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. १,०६,८१०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६७/१२ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, रामकृष्ण गोदावरी सोसायटी पडेगांव येथील खडी रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९७-९८ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याचे डि.एस.आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रु. २,६१,३३२/- चे करण्यात आले असून सदरचा खर्च "नविन डांबरीरस्ते" या लेखाशिर्षा अंतर्गत ठेवण्यात आलेल्या तरतूदीतून करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रामकृष्ण गोदावरी सोसायटी पडेगांव येथील खडी रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी आलेल्या रु. २,६१,३३२/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६८/१३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, भावसिंगपुरा येथील उद्यानाचे विद्युतीकरण करण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९७-९८ च्या दरसूचीनुसार र. रु. १,४८,९१४/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च शासकीय अनुदानातून करण्यात येणार आहे.

तरी र. रु. १,४८,९१४/- चे अंदाजपत्रकास मंजुरी बाबत प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो भावसिंगपुरा येथील उद्यानाचे विद्युतीकरण करण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. २,४८,९१४/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६९/१४ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, कैलासनगर स्मशानभूमी मारोती ते दादाकॉलनी प्राथमिक आरोग्य केंद्रासमोरील रस्ता विकसित करण्याच्या कामासाठी सन १९९७-९८ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डि.एस.आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रु. १,७३,५६५/- चे तयार करण्यात आले असून सदरचा खर्च "नविन खडी रस्ते" या लेखा शिर्षाअंतर्गत ठेवण्यात आलेल्या तरतूदीतून करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कैलासनगर स्मशान मारोती ते दादाकॉलनी प्राथमिक आरोग्य केंद्रासमोरील रस्ता विकसित करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,७३,५६५/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७०/१५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, स्टॅण्डर्ड सिल्क मिल कॉलनी येथील अरुंद गल्लीमध्ये शहाबाद फरशी बसविणेच्या कामासाठी १९९६-९७ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डि.एस.आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रु. १,०३,०२५/- चे तयार करण्यात आले असून सदरील खर्च १९९८-९९ च्या भांडवली रस्ते (नविन खांडकी रस्ते) मध्ये ठेवण्यात आलेल्या तरतूदीमधून करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. विखारोद्दिन :** सदरील काम हे झालेले आहे काय? किंवा अंदाजपत्रक तयार करून मंजुरीसाठी ठेवले आहे काय? याची माहिती द्यावी.

**उपअभियंता (ई) :** अंदाजपत्रक मंजुरीसाठी आहे.

**मा. सभापती :** मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स्टॅण्डर्ड सिल्क मिल कॉलनी येथील अरुंद गल्लीमध्ये शहाबाद फरशी बसविणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,०३,०२५/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७१/१६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शहानुरवाडी येथे सर्व्हे नं. १३/१ सि.स.न. १५८४५% पी-२६ येथे अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी कामासाठी १९९६-९७ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डि.एस.आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रु. २,९३,१९५/- चे तयार करण्यात आले असून सदरील खर्च ९८-९९ च्या भांडवली रस्ते (नविन खांडकी रस्ते) मध्ये ठेवण्यात आलेल्या तरतूदीमधून करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहनुरवाडी येथे सर्व्हे नं. १३/१ सि.स.न. १५८४५% पी-२६ येथे अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक रक्कम रु. २,९३,१९५/- ला सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७२/१७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, म्हाडा कॉलनी ज्योतीनगर येथील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी सन ९६-९७ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डि.एस.आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रु. २,३०,७४०/- चे तयार करण्यात आले

असून सदरील खर्च सन ९८-९९ च्या पुर्नःडांबरीकरण मध्ये ठेवण्यात आलेल्या तरतूदीमधून करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे म्हाडा कॉलनी ज्योतीनगर येथील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक रक्कम रु. २,३०,७४०/- ला सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७३/१८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर करीत आहे की, जुनाबाजार भागात फरशी बसविणे व जुनी खांडकी दुरुस्त करणेच्या कामासाठी सन १९९६-९७ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याचे डि.एस.आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रु. १,०१,११७/- चे तयार करण्यात आले असून सदरचा खर्च "रस्ते दुरुस्ती" (पॅचवर्क) या लेखा शिर्षा अंतर्गत ठेवण्यात आलेल्या तरतूदीतून करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जुनाबाजार भागात फरशी बसविणे व जुनी खांडकी दुरुस्ती करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक रक्कम रु. १,०१,११७/- ला सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७४/१९ :**

मो. मोतीकारंजा येथील ४० फुट रुंद रस्त्याच्या विकासानंतर न.भु.क्र. ७९४१ च्या समोरील १९.५० चौ. मी. एवढ्या क्षेत्रफळाची खुलीजागा अर्जदार श्री. भास्करराव पा. नारायणराव कुलकर्णी यांनी भाडेपट्ट्याने मोगितली आहे. तरी सदर जागेवर कोणतेही बांधकाम करता येणार नाही व नेहमीच्या अटी व शर्तीवर व योग्य ते भाडे ठरवून अर्जदारास देण्याबाबतचा प्रस्ताव मंजुरीसाठी सादर. प्रस्ताव मान्यतेनंतर उर्वरित कार्यवाही मालमत्ता विभागातर्फे करण्यात येईल. प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. तुळशीबागवाले :** शहर विकास योजनेच्या ४० फुट रुंद रस्त्यावर जागा शिल्लक नाही. १० फुट रुंद जागा देणे योग्य नाही.

**सहाय्यक संचालक नगररचना :** ४० फुट रुंद रस्त्याची जागा सोडून शिल्लक जागेतून देण्यात येत आहे.

**मा. सभापती :** पाहणी करून निर्णय घेण्यात येईल.

**ठराव :**

सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात येते.

**विषय क्र. १७५/२० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर करीत आहे की, कटकट गेट ते सिडको या रस्त्यावर गटार बांधणेच्या कामासाठी सन ९६-९७ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डि.एस.आर. दराने अंदाजपत्रक र. रु. ४,२५,२००/- चे तयार करण्यात आले

असून सदरचा खर्च "नविन खडी रस्ते" या लेखाशिर्षाखाली ठेवण्यात आलेल्या तरतूदीतून करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कटकट गेट ते सिडको या रस्त्यावर गटार बांधणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक र. रु. ४,२५,२००/- ला सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७६/२१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर करीत आहे की, जयसिंगपुरा येथील रोडचे खडीकरण करणेच्या कामासाठी सन १९९७-९८ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डि.एस.आर. दराने अंदाजपत्रक र. रु. १,५४,५५०/- चे तयार करण्यात आले असून सदरचा खर्च "नविन खडी रस्ते" या लेखाशिर्षा अंतर्गत ठेवण्यात आलेल्या तरतूदीतून करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जयसिंगपुरा येथील रोडचे खडीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक र. रु. १,५४,५५०/- ला सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७७/२२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, विशालनगर येथील अंतर्गत खडी रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९६-९७ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डि.एस.आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रु. २,५५,२५५/- चे तयार करण्यात आले असून सदरल खर्च १९९८-९९ च्या भांडवली रस्ते (नविन डांबरी रस्ते) मध्ये ठेवण्यात आलेल्या तरतूदीमधून करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विशालनगर येथील अंतर्गत खडी रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक रक्कम रु. २,५५,२५५/- ला सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७८/२३ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. ब्रिजवाडी येथे सिमेंट काँक्रीट व शहाबाद फरशी करणे. कामाकरिता अंदाजपत्रक रक्कम रु. २,२०,४८७/- सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांची दरसूची ९७-९८ अनुसार तयार करण्यात आली असून मा. आयुक्तांनी दि. ०८-०८-९८ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

सदर काम १८ खेडी विकास योजने अंतर्गत अर्थसंकल्प १९९८-९९ मधून कार्य करण्यांचे प्रस्तावित आहे. करिता मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. ब्रिजवाडी येथे सिमेंट काँक्रीट व शहाबाद फरशी करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक र. रु. २,२०,४८७/- ला सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७९/२४ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मसनतपुर येथे शहाबाद फरशी बसविणेकरिता अंदाजपत्रक रक्कम रु. ५,१३,३२९/- सार्वजनिक बांधकाम

विभाग औरंगाबाद यांची दरसूची १९९७-९८ अनुसार तयार करण्यात आली असून मा. आयुक्तांनी दि. ०९-०८-९८ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

सदर काम "१० वे वित्त आयोग अनुदान" या शिर्षकातून करण्याचे प्रस्तावित आहे. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मसनतपुर येथे शहाबाद फरशी बसविणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक रक्कम रु. ५,१३,३२९/- ला सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८०/२५ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, नारेगांव येथे शहाबाद फरशी बसविणे करिता अंदाजपत्रक रक्कम रु. ६,५१,५०८/- सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांची दरसूची १९९७-९८ अनुसार तयार करण्यात आली असून मा. आयुक्तांनी दि. ०८-०८-९८ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. सदर काम "१० वे वित्त आयोग अनुदान" या शिर्षकातून करण्याचे प्रस्तावित आहे. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नारेगांव येथे शहाबाद फरशी बसविणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक रक्कम रु. ६,५१,५०८/- ला सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८१/२६ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. सिध्दार्थनगर येथे ५ फुटाची गल्लीत शहाबाद फरशी बसविणे करिता अंदाजपत्रक रक्कम रु. ५,००,०००/- सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांची दरसूची १९९७-९८ अनुसार तयार करण्यात आली असून मा. आयुक्तांनी दि. ०५-०८-९८ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

सदर काम "१० वा वित्त आयोग अनुदान" या शिर्षकातून करण्याचे प्रस्तावित आहे.

करिता मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. सिध्दार्थनगर येथे ५ फुटाचे गल्लीत शहाबाद फरशी बसविणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक रक्कम रुपये ५,००,०००/- ला सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८२/२७ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, शहरातील वाहतुक सुविधा अंतर्गत विविध रस्त्यावर थर्मोप्लॅस्टिक पेंन्टरने लेन मार्कींग व झेब्रा पेन्टींग करणेच्या कामासाठी दिनांक २६-१२-९७ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. ४२७/१५ अन्वये अंदाजपत्रक रक्कम रु. ४,२७,११०/- ला मंजुरी मिळालेली आहे.

सदरील काम करणेसाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.मनपा/लेखा/नि/०८/९८ दिनांक २५-०३-९८ च्या निविदा सचुनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या विक्री झाली असून निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकूण (०१) एकच निविदा दर भरलेली प्राप्त झाली असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | मे. महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ म. औरंगाबाद | ०३.००% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०३.००% जास्त दराने मे. महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ म. औरंगाबाद यांची निविदा आहे. परंतु ठेकेदाराने निविदेमध्ये जास्त दर दिल्यामुळे त्यांना दराच्या वाटाघाटीसाठी बोलावले असता संबंधित ठेकेदाराने त्यांनी निविदेत दिलेल्या ०३.००% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दराने काम करून देणेसाठी संमती दिलेली आहे.

तरी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०३.००% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दराने मे. महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ म. औरंगाबाद यांची निविदा स्विकारणेस प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातील वाहतुक सुविधा अंतर्गत विविध रस्त्यावर थर्मोप्लॅस्टिक पेंन्टरने लेन मार्कींग व झेब्रा पेन्टींग करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या एकमेव निविदाधारक मे. महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ यांच्याशी काम त्यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त ऐवजी अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८३/२८ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनिःसारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मुजीब कॉलनी येथील ड्रेनेज लाईन अप्रुटींग करणे करिता अंदाजपत्रक रक्कम रु.२,६३,५५०/- चे तयार करण्यांत आले आहे. सदरील अंदाजपत्रक परिसर अभियांत्रिकी खात्याच्या सन ९७-९८ च्या दरानुसार तयार करण्यात आले आहे.

सदरील काम देखभाल व दुरुस्ती या लेखा शिर्षकातून प्रस्तावित केले आहे. मा. आयुक्तांनी दि. ०८-०८-९८ ला प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. तरी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुजीब कॉलनी येथील ड्रेनेज लाईन अप्रुटींग करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. २,८३,५५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८४/२९ :**

कार्यकारी अभियंता (पा. पु. व ज. नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, आजम कॉलनी येथे कमी दाबाने पाणी पुरवठा होत आहे. त्यासाठी नविन २०० मी.मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधीकरण विभागाची सन १९९७-९८ च्या दरसूचीनुसार रक्कम रु. १,५२,३००/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. सदर कामाचा खर्च हा देखभाल व दुरुस्तीच्या आर्थिक तरतूदीमधून

करण्यांत येणार आहे. तरी अंदाजपत्रक रक्कम रु. १,५२,३००/- चे मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आजम कॉलनी येथे कमी दाबाने पाणी पुरवठा होत आहे. त्यासाठी नविन २०० मी.मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकावयाच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. १,५२,३००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८५/३० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, जहागिरदार कॉलनी (मकरबी रेखांकनातील) मनपाच्या खुल्या जागेस संरक्षित भिंत व तार कुपंन करणे बाबतचे अंदाजपत्रक सन ९६-९७ च्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे दरसूचीनुसार तयार रक्कम रु.१,२६,५००/- एवढ्याचे तयार करण्यात आले असून त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यात आली आहे. सदर काम हे विकास योजने अंतर्गत भूखंडाचे संरक्षण या तरतूदी अंतर्गत प्रस्तावित करण्यात आले आहे. सबब वरीलप्रमाणे प्रस्ताव स्थायी समिती समोर विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जहागिरदार कॉलनी (मकरबी रेखांकनातील) मनपाच्या खुल्या जागेस संरक्षित भिंत व तार कुपंन करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. १,२६,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८६/३१ :**

मालमत्ता अधिकारी यांनी मा. आयुक्तांच्या मंजुरीनुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री. पांडु भिकाजी सोनवणे यांनी अर्ज दिला आहे की, मला मंजुरपुरा येथे म.न.पा. ने ६०/- रुपये प्रतिमहा प्रमाणे जागा भाड्याने दिली आहे. सदरील जागा शहागंज गांधीपुतळा ते मंजुरपुरा या विकास योजनेत बाधित होत असून त्यांच्या बदल्यात दुसरी जागा मिळणे बाबत विनंती केली आहे.

शहर अभियंता व नगररचना विभागाने अभिप्राय दिला आहे की, स्थळ पाहणी केली असत न.भु.क्र. ७६६५ ही मिळकती मधील रस्ता रुंदीकरणातील बाधित जागा सोडून १०X१५ ची शिल्लक राहते असा अभिप्राय दिला आहे.

भाडे समितीने सदरील जागेचे भाडे ३७३ प्रति चौ. मी. वर्ष निश्चित केले आहे. तरी न.भु.क्र. ७६६५ मधील शिल्लक १०X१५ या आकाराची जागा भाडेपट्ट्याने देण्याबाबत मा. स्थायी समिती प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. स. अली. मिरा सलामी :** संबंधित व्यक्तींला पूर्वी ६०/- रु. प्रति महा भाडेने दिलेली होती. तर ७२०/- रु वर्षाचे होतात. परंतु प्रस्तावात असे १०X१५ जागेचे भाडे हे ३७३/- रु. प्रति. चौ. मी. प्रती वर्ष दाखवण्यात आले. त्या ठिकाणी किती चौ. मिटर जागा आहे.

**मा. सभापती :** स. सदस्य यांनी सुचित केल्यानुसार सदरील प्रस्तावात योग्य दुरुस्ती करून सविस्तर माहितीसह पुढील मिटींगमध्ये ठेवण्यात यावा. प्रस्ताव सध्या स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव :**

सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात येतो.

**विषय क्र. १८७/३२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. जाफरनगर (जयवंतपुरा) येथे बहुउद्देशिय हॉल बांधावयाचा आहे. त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन ९७-९८ च्या जिल्हा दरसूचीनुसार र. रु.२,४३,२००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. त्या मा. आयुक्त महोदय यांनी दि.२९-०७-९८ रोजी मान्यता दिलेले आहे.

उपरोक्त कामाचा खर्च हा सन ९८-९९ च्या आर्थिक वर्षात व्यापारी संकूल व इतर इमारती या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात येईल. तरी उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक र. रु. २,४३,२००/- चा प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. जाफरनगर (जयवंतपुरा) येथे बहुउद्देशिय हॉल बांधावयाचा कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. २,४३,२००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८८/३३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शहाशौक्त मिया दर्गा कॉलनी येथे कब्रस्तानला संरक्षित तार कुंपन करणे बाबतचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन ९७-९८ च्या दरसूचीअन्वये सदर ठिकाणी संरक्षित तार कुंपन करणेच्या कामाचे सुधारित अंदाजपत्रक रु.२,५३,०००/- चे तयार करण्यात आले असून त्यास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

सबब वरीलप्रमाणे प्रस्ताव स्थायी समिती समोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहाशौक्त मिया दर्गा कॉलनी येथे कब्रस्तानला संरक्षित तार कुंपन करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. २,५३,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८८/३३ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर ॲम्युसमेंट पार्क येथील टप्पा-३ चे काम करणे बाबतचे अंदाजपत्रक रक्कम रु. ४,९६,३५०/- चे सन ९७-९८ च्या दरसूचीनुसार तयार करण्यात आले असून सदर कामावर होणारा खर्च हा नविन उद्याने या तरतूदी अंतर्गत प्रस्तुत करण्यांत आला आहे.

करिता वरीलप्रमाणे प्रस्ताव स्थायी समिती समोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर ॲम्युसमेंट पार्क येथील टप्पा-३ चे काम करणेसाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ४,९६,३५०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९०/३५ :**

कार्यकारी अभियंता (पा. पु. व ज. नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, व्यंकटेश नगर येथे १५० मी.मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधीकरण विभागाची सन ९६-९७ च्या दरसूचीनुसार रक्कम रु.

१,१८,०१५/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाच्या तरतूदीमधून करण्यात येणार आहे.

तरी अंदाजपत्रक रक्कम रु. १,१८,०१५/- चे मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व्यंकटेश नगर येथे १५० मी.मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकण्यासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. १,१८,०१५/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९१/३६ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनिःसारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, गुरु रामदास नगर येथे २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता अंदाजपत्रक रक्कम रु.२,८२,५००/- चे तयार करण्यांत आले आहे. सदरील अंदाजपत्रक परिसर अभियांत्रिकीच्या सन ९६-९७ च्या दरसूचीनुसार तयार करण्यात आले आहे.

सदरील काम भांडवली कामे ९८-९९ यातून प्रस्तावित केले आहे. मा. आयुक्तांनी दि. ०८-०८-९८ ला प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. तरी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गुरु रामदास नगर येथे २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. २,८२,५००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९२/३७ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनिःसारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. नंदलाल बिल्डींग ते जाधवमंडी येथील २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन अप्रुटींग करणेच्या कामाकरिता अंदाजपत्रक रक्कम रुपये १,१७,८००/- चे तयार करण्यांत आले आहे.

सदरील अंदाजपत्रक परिसर अभियांत्रिकी खात्याच्या सन ९६-९७ च्या दरसूचीनुसार तयार करण्यात आले आहे.

सदरील काम देखभाल व दुरुस्ती ९८-९९ यातून प्रस्तावित केले आहे. सदरील कामास मा. आयुक्तांनी दि. ०५-०८-९८ ला प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. तरी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. नंदलाल बिल्डींग ते जाधवमंडी येथील २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन अप्रुटींग करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,१७,८००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९३/३८ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनिःसारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. दादाकॉलनी येथील जुनी ड्रेनेज लाईन काढून २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी.

ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता अंदाजपत्रक रक्कम रु.२,३३,२००/- चे म.जि.प्रा. खात्याच्या सन १९९७-९८ च्या दरसूचीनुसार तयार करण्यात आले आहे.

सदरील काम भांडवली कामे ९७-९८ यातून प्रस्तावित केले आहे. मा. आयुक्तांनी दिनांक ०८-०८-९८ ला मंजुरी दिलेली आहे. तरी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. दादाकॉलनी येथील जुनी ड्रेनेज लाईन काढून २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. २,३३,२००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९४/३९ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. गुलाबवाडी स्लम येथे कॉंक्रीट रस्ते तयार करणे बाबत कामाकरिता सा. बां. खाते यांच्या वर्ष ९७-९८ च्या दरसूचीनुसार तयार करण्यात आले आहे. सदरील काम "खांडकी रस्ते" या शिर्षकातून करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. १४-०८-९८ रोजी प्रशासकीय मान्यतेचा दिली आहे.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेले रु. ६,९४,३००/- चे अंदाजपत्रकास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. गुलाबवाडी स्लम येथे कॉंक्रीट रस्ते तयार करणेसाठी तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक र. रु. ६,९४,३००/- ला सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९३/३८ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनिःसारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. मोतीवालानगर ते जाफरगेट आठवडी बाजार पर्यंत मेन सिव्हरची दुरुस्ती करणेकरिता अंदाजपत्रकीय रक्कम रु. १,६३,५१९/- चे परिसर अभियांत्रिकी विभागाच्या सन ९७-९८ दरसूचीनुसार तयार करण्यात आले आहे. सदरील काम देखभाल व दुरुस्ती ९८-९९ या लेखा शिर्षकातून प्रस्तावित केले आहे.

सदरील कामास मा. आयुक्तांनी दिनांक २८-०८-९८ रोजी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. तरी सदरील प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. मोतीवालानगर ते जाफरगेट आठवडी बाजार पर्यंत मेन सिव्हरची दुरुस्ती करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,६३,५१९/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९६/४१ :**

कार्यकारी अभियंता (पा. पु. व ज. नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, कंधारकर हॉस्पिटलपासून झांबड इस्टेटच्या नाल्यापर्यंत २५० मी.मी. व्यासाची ३२५ रनिंग मिटर लांबीची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामासाठी सन १९९७-९८ च्या महाराष्ट्र जीवन प्राधीकरण

खात्याचे दरसूची दराने रक्कम रु. १,८२,२००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. सदरील कामाचे अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दिनांक २८-०७-९८ ला प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. सदरील कामाचा खर्च भांडवली कामे (जलनि:सारण विभाग) या लेखा शिर्षकातील २४० लाखातील तरतूदीमधून करण्यांत येणार आहे. तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. १,८२,२००/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबत प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कंधारकर हॉस्पिटलपासून झांबड इस्टेटच्या नाल्यापर्यंत २५० मी.मी. व्यासाची ३२५ रनिंग मिटर लांबीची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. १,८२,२००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९७/४२ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनि:सारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. आरेफबाग, आरेफ कॉलनी, येथे नविन २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज पाईप लाईन टाकणेकरिता अंदाजपत्रक रक्कम रु.२,८६,२००/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील काम भांडवली कामे ९८-९९ या लेखा शिर्षकातून करण्याचे प्रस्तावित आहे. परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसूची ९५-९६ नुसार सदरील अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

मा. आयुक्तांनी दिनांक २७-०८-९८ ला प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. तरी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. आरेफबाग, आरेफ कॉलनी, येथे नविन २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज पाईप लाईन टाकणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. २,८६,२००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९८/४३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मोतीवाला नगर येथे उद्यान विकसित करावयाच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याच्या दरसूची सन ९७-९८ अन्वये रु. ९,३०,०००/- चे तयार करण्यात आले असून सदर कामाचा प्रस्ताव हा शासकीय अनुदान चार कोटी अंतर्गत प्रस्तावित आहे.

सबब वरीलप्रमाणे प्रस्ताव स्थायी समितीसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोतीवाला नगर येथे उद्यान विकसित करावयाच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ९,३०,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९९/४४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र येथे मुख्यप्रवेश द्वार बांधणे बाबतच्या कामाचे अंदाजपत्रक सा. बां. विभागाचे दरसूची

सन १९९७-९८ अन्वये तयार करण्यात येऊन रु. ५,१८,२००/- चे अंदाजपत्रकास सुधारित अंदाजपत्रकाचे वेळा वाढीव तरतूद उपलब्ध करून देणेच्या अटीवर प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.

करिता वरीलप्रमाणे प्रस्ताव स्थायी समितीसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र येथे मुख्यप्रवेश द्वार बांधणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक रक्कम रुपये ५,१८,२००/- ला सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २००/४४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सहकारनगर येथे सांस्कृतिक सभागृहाभोवती संरक्षित बांधणेसाठीचे अंदाजपत्रक सा. बां. विभागाचे सन ९७-९८ चे दरसूचीनुसार र. रु. २,२९,८००/- चे तयार करण्यात आले असून सदर कामाचा प्रस्ताव नविन उद्याने या तरतूदी अंतर्गत प्रस्तावित आहे. सबब वरीलप्रमाणे अंदाजपत्रक मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सहकारनगर येथे सांस्कृतिक सभागृहाभोवती संरक्षित बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. २,२९,८००/- च्या सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच सदरील काम उपलब्ध गुत्तेदार श्री. एस. एस. पवार यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यात यावे. या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०१/४६ :**

कार्यकारी अभियंता (पापु. व ज. नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, टाऊनहॉल मागील वस्तीमध्ये १०० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता परिसर अभियांत्रिकी (म.जि.प्रा.) यांची सन ९७-९८ च्या दरसूचीनुसार रक्कम रु. १,२६,७००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाच्या तरतूदीतून करण्यात येणार आहे. तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे टाऊनहॉल मागील वस्तीमध्ये १०० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. १,२६,७००/-/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०२/४७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, गुरुदत्तनगर (बेगमपुरा) येथील मनपाच्या खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे, खेळणी बसवणे, आर. सी. बेंचेस बसविणे बाबतचे अंदाजपत्रक सन ९६-९७ च्या सा. बां. विभागाचे दरसूचीनुसार रक्कम रु. १,५६,२००/- चे तयार करण्यात आले असून त्यास प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. सदर काम हे "विकास योजने अंतर्गत भूखंडाचे संरक्षण या" तरतूदी अंतर्गत प्रस्तावित आहे. सबब मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गुरुदत्तनगर (बेगमपुरा) येथील मनपाच्या खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे, खेळणी बसवणे, आर. सी. बेंचेस बसविणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,५६,२००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

"याच बरोबरच "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगर सचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
मा. सभापती,
स्थायी समिती,
महानगरपालिका, औरंगाबाद

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.*

**दिनांक १५-०९-९८ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. मा. सभापती श्री. जयवंत ओक, यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा महानगरपालिका औरंगाबाद येथील "मलिक अंबर" सभागृहात दि. १५-०९-९८ रोजी संपन्न झाली तिचे इतिवृत्त. सभेची सुरुवात "वंदे मातरम्" या गिताने अंदाजे दुपारी ४=३० वाजता झाली. सभेला खालीलप्रमाणे स.सदस्य व अधिकारी वर्ग उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स.स. श्री. अ. रऊफ म. अ. माबूद | स. सदस्य |
| २) | स.स. श्री. स. अली मिरा सलामी | -//- |
| ३) | स.स. श्री. संजय जोशी | -//- |
| ४) | स.स. श्री. गौतम लांडगे | -//- |
| ५) | स.स. श्री. बन्सी गांगवे | -//- |
| ६) | स.स. श्री. इंगळे रविंद्र बाबुराव | -//- |
| ७) | स.स. सौ. यशोदा धनंजय वाडेकर | -//- |
| ८) | स.स. श्री. जैन विकास रतनलाल | -//- |
| ९) | स.स. श्री. ढगे नरसिंग मुरलीधर | -//- |
| १०) | स.स. सौ. राधाबाई तळेकर | -//- |
| ११) | स.स. श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | -//- |
| १२) | स.स. श्री. राजकुमार बचाटे (मामा) | -//- |
| १३) | स.स. श्री. विखारोद्दिन पि. खुदबोद्दिन | -//- |
| १४) | स.स. श्री. स. अ. एकबालोद्दिन स. मो. कुतूबुबोद्दिन | -//- |

**संवाद :**

**श्री. राजकुमार बचाटे :** मराठवाड्यातील रहिवासी व प्रसिध्द सतारवादक म्हणून ओळखण्ले जाणारे स्व. श्री. गोपाळरावजी गुरव यांचे नुकतेच दु:खद निधन झाले त्यांना २ मिनिटे श्रध्दांजली अर्पण करावी.

**श्री. स. अली मिरा सलामी :** यास माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :** ठिक आहे. स्व. श्री. गौपाळरावजी गुरव यांना सभागृहात २ मिनिटे श्रध्दांजली वाहण्यात यावी.

याच वेळी सभागृहातर्फे स्वतब्ध उभे राहून स्व. श्री. गोपाळरावजी गुरव यांना २ मिनिटे श्रध्दांजली वाहण्यात आली.

**श्री. गौतम लांडगे :** शहरात बऱ्याच ठिकाणी महानगरपालिकेच्या खुल्या जागेवर अनाधिकृत बांधकामे होऊ लागली आहे. मी जे बोलत आहे हा अतिक्रमणाचा विषय असून अनाधिकृत बांधकाम व त्याच अनुषंगाने ते अतिक्रमण म्हणून हटविणे या संदर्भात मंत्रा ालयाचे मा. सचिव श्री. नलीनाक्षन यांचे तर्फे ४ मार्च १९९६ रोजी एक परिपत्रक पाठविण्यात आले. त्यात असे नमूद केले आहे की, नगरपालिका असो किंवा महानगरपालिका येथील होणाऱ्या अनाधिकृत बांधकामे यावर प्रशासनाचा अंकूश असला पाहिजे. याबाबत सर्व आयुक्तांना सूचना देण्यात आलेल्या आहे. महापालिकेच्या बाबतीत विचार केल्यास महानगरपालिकेचे जे प्रशासकीय विभाग पाडलेले असतात. त्यामध्ये एक

क्षेत्रीय अधिकारी नेमण्यात यावा. क्षेत्रीय अधिकारी यांच्या क्षेत्रात असे अनाधिकृत बांधकाम झालेले असेल तर त्यांचेवर कार्यवाही करून त्यांची खाते चौकशी करावी. तोपर्यंत त्यांना निलंबित ठेवावे. कार्यवाही पूर्ण चौकशी करून अनाधिकृत बांधकाम होणार नाही याची खबरदारी घ्यावी. क्षेत्रिक अधिकारी यांना नेमून दिलेल्या क्षेत्रात अनाधिकृत झालेली बांधकामे किती आहेत. इमारत निरिक्षक यांनी संबंधित नागरिक व बिल्डर अशा किती लोकांना नोटीसा दिलेल्या आहेत. याची माहिती द्यावी. जर यात काही त्रुटी आढळून आल्यास संबंधित अधिकारी यांनी या कामाबाबतची तपासणी करून योग्य त्या पध्दतीने कार्यवाही करावी. महापालिका क्षेत्रात येणाऱ्या आरक्षणावर बऱ्याच ठिकाणी अनाधिकृत बांधकामे झालेली आहे. सर्वसाधारण सभेमध्ये याबाबत अनेक वेळा चर्चा झालेली आहेत. महापालिकेत इमारत निरिक्षक असलेले श्री. राजपुत श्री. सनान्से, श्री. कुरैशी, श्री. बावस्कर, श्री. पाठक, श्री. पवार व ई. इमारत निरिक्षक असतील त्यांच्या आखत्यारात ज्या ज्या क्षेत्रामधील अशी अनाधिकृतरित्या बांधकाम झाले असेल आणि संबंधित निरिक्षक हे त्याबाबत योग्य कार्यवाही करत नसतील तर संबंधित इमारत निरिक्षकास तात्काळ निलंबित करावे. इमारत निरिक्षक यांच्यावर झोन ऑफिसर यांच्या मार्फत कार्यवाही होत नाही. तरी शासनाच्या या परिपत्रकानुसार संबंधितावर नोटीस बजावल्यानंतर न्यायालयातून स्थगिती आदेश मिळू नये म्हणून कॅवेट दाखल करावे. न्यायालयातील स्थगिती आदेश उठविण्याची कार्यवाही करावी.

**श्री. संजय जोशी :** महापालिकेच्या अधिकार क्षेत्रात काम करणार इमारत निरिक्षक यांनी नागरिकांचे किंवा एकाद्या बिल्डरने केलेले अनाधिकृत बांधकाम पाडावे व स्वतः च्या मालकीच्या ४-४ मजली इमारत बांधकाम करावे ही सत्य बाब असून महापालिकेच्या इमारत निरिक्षकांनी अशा प्रकारची बांधकामे करीत आहे. याची माहिती सभागृहाला द्यावी. तसेच जे इमारत निरिक्षक असतील त्यांनी अनाधिकृत बांधकामे करणाऱ्यांना किती नागरिकांना नोटीसा दिलेल्या आहे. व किती प्रकारच्या केसेसे कोर्टात चालू आहेत. याची माहिती द्यावी. माझ्या वॉर्डात बऱ्याच ठिकाणी खुल्या जागेवर अनाधिकृत बांधकाम झालेली आहेत. कोणत्या अधिका४र्यांी संबंधित नागरिकांना बांधकाम परवानगी दिलेली आहे. अशा जागेवर केलेले बांधकाम हे अतिक्रमण म्हणून का पाडण्यात आलेले नाही.

**श्री. राजकुमार बचाटे (मामा) :** महापालिकेच्या खुल्या जागेवर अनाधिकृत बांधकामे होऊ देणाऱ्या इमारत निरिक्षक हे नगरसेवकांना काही द्यावे लागते. मा. आयुक्तांनी गाडी उभी आहे. त्यांना द्यावे लागते. व अनाधिकृत बांधकामास खंड पडत नाहीत नगरसेवकांची, मा. आयुक्तांची बदनामी सहन केली जाणार नाही. नाही तर आम्हास कार्यवाही करावी लागेल.

**श्री. स. अली मिरा सलामी :** शहरातील जी अनाधिकृत बांधकामे होत आहे ती गेल्या ३ ते ४ महिण्यापासून जास्त प्रमाणात होत आहे. परिपत्रकाच्या नावांवर हे चालू आहे. शासनाचे जे पत्र आले त्याचा अर्थ असा की घरे स्थायिक आहे. त्यात कुटुंबे राहतात ती घरे अनाधिकृत म्ळणून तोडू नये. व जी अनाधिकृत बांधकामे होत आहे ती पावसाळा असेपर्यंत म्हणजेच सप्टेंबर १९९८ अखेर पर्यंत ती थांबवावी. परंतु काही नागरिक पावसाळ्याचा संधीचा फायदा घेऊन

अनाधिकृत बांधकामे करत असतील तर ती ताबडतोब पाडण्यात यावी. दि. ०१-०९-९८ ला पत्र दिले आहे की, माझ्या वॉर्डामध्ये एका ठिकाणी ड्रेनेज लाईन पर संडास बांधले तेथे किडे झाले आहे. महालक्ष्मी आल्या ते आम्ही कोठे बसवावे. नगरसेवकांची बदनामी करतात. संबंधित अधिकारी यांना त्या बाबत पत्र देऊनही कार्यवाही होत नाही.

२ ८ ते १० दिवसांपूर्वी रेल्वेस्टेशन येथील बाजूच्या रोडवर बऱ्याच ठिकाणी टपऱ्या बसलेल्या आहेत. त्या शासन पत्राच्या आधारे आपण या ठिकाणचे बांधकाम व अतिक्रमण तोंडू शकत नाही. हे योग्य नाही. योग्य त्या परवानगीने बांधकाम व टपरी ही तोडण्यात किंवा उठविण्यात येऊ नये परंतु अनाधिकृतपणे झालेले बांधकाम हे जरुर काढण्यात यावे. न काढलस संबंधित अधिकारी यांच्यावर कार्यवाही करावी.

**सौ. राधाबाई तळेकर :** दि. ११-०९-९८ रोज शुक्रवार अतिक्रमण पथकाने कडा ऑफिसच्या बाजूला असलेली मोकळ्या जागेवर गरीब बेकार नागरिक छोटा-छोटा धंदा करीत असतांना तेथील २-३ फोटो विक्रीच्या व्यवसाय करणारे व काही न्हावी व्यवसयि असलेले व काही ऑईलपेटने नांव टाकतात इ. व्यवसाय कररीत आहेत. व हे लोक गेल्या १० वर्षापासून तेथे व्यवसाय करतात व मनपाची परवानगी साठी १०-१२ वर्षापासून अर्ज देतात पण काहीही होत नाही. त्यांचे घरात इतर कमवता कोणी नाही. महापालिकेला कर भरण्यास ते लोक तयार आहेत. तर तेथील जागेवर फोटो विक्री करीत असलेल्या गरीब लोकांना वॉर्ड क्र. ७४ मध्ये इमारत निरिक्षक यांनी अक्षरश: फोटोचे तुकडे तुकडे करून त्या गरीब नागरिकांचे नुकसान केलेले आहे तो म्हातारा मनुष्य असून जालन्यावरून त्याचे काचेचा गठ्ठा आलेला आहे. अशावेळी या कर्मचाऱ्यांनी त्या नागरिकांना काही उपाययोजना करण्याबाबत समज द्यावयास पाहिजे. विनाकारण नुकसान करणे म्हणजे ही गंभीर बाब आहे. नेहमी नेहमी याच वॉर्डात हे कर्मचारी येऊन अतिक्रमण उठवितात. दुसऱ्या वॉर्डात अनाधिकृत बांधकामे व अतिक्रमणे दिसत नाही काय? बांधकाम निरिक्षक बेकायदा बांधकामाना प्रोत्साहन देतात त्यामुळे असे प्रकार घडत आहे.

**श्री. स. अली मिरा सलामी :** साजिद टावा चेलीपुराच्या बाजूला दोन जिलेबीची दुकाने आहेत संबंधित व्यक्तीला नाल्यावर जागा देण्यात आलेली आहे काय? महापालिकेच्या अधिकाररी यांनी आम्ही रोज १००/- देतो. त्यामुळे हा आमचा व्यवसाय चालतो ही बाब कितपत सत्य आहे. या बाबत संबंधित अधिकारी यांना विचारणा करावी.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**मालमत्ता अधिकारी :** संबंधित व्यक्तीकडून १००/- रु. रोजचे घेता असा काही प्रकार झालेला नाही. कुणी कर्मचाऱ्यांनी अशा प्रकारची चुकी केली असेल तर चौकशी करून कार्यवाही करण्यात येईल.

**उपआयुक्त (प्र.) :** याबाबत सविस्तर माहिती घेऊन पुढच्या बैठकीत खुलासा होईल.

**श्री. म. अ.अ. रऊफ :** नारेगांव येथील महापालिकेच्या जागेवर अनाधिकृत टपरी बाबत मी सभागृहात बोललो होतो. त्या अनुषंगाने मी प्रशासनाला पत्र ही दिले होते. परंतु काहीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

**श्री. संजय जोशी :** माझ्या वॉर्डात राजनगर, मयुरबन रेखांकन खुल्या जागेवर अतिक्रमण आहे. त्यातील एका ठिकाणी १६००० स्क्वेअर फुट खुल्या जागेची महापालिकेने रजिस्ट्री करून घेतली असतांना तेथील ओपन स्पेसच्या जागेवर राहणाऱ्या वॉचमेनला लाईट बाबत ना हरकत प्रमाणपत्र कसे दिले जाते.वर्तमान पत्रात बातमी आली काही कार्यवाही केली नाही. मयुरबन सोसायटीच्या या भागात सहाय्यक संचालक नगररचना प्रशासकीय अधिकारी यांनी पाहणी केली. ८ दिवसांत करतो म्हणून सांगितलेले आहे. खुल्या जागेची रजिस्ट्री करून घेण्यात येते. १९९३ साली महापालिकेच्या संबंधित विभागामार्फत ना हरकत प्रमाणपत्र दिल्या जाते. हे कसे काय? संबंधित जागेवर त्या वॉचमनला कोणत्या अधिकाऱ्यांनी लाईट घेण्याबाबत एन.ओ.सी. दिलेली आहे. त्याबाबत शाहनिशाह करून घ्यावी.

**मा. सभापती :** संपूर्ण शहरातील अनाधिकृत बांधकामाबाबत व अतिक्रमण झाले याबाबत किती नोटीसा दिल्या व कितीवर कार्यवाही केली दि. ०१-०१-९५ पूर्वीच्या अनाधिकृत बांधकाम असतील तर त्यांना नियमानुसार परवानगी देण्याची कार्यवाही करता येईल का ते पाहण्यात यावे. महापालिकेच्या हद्दित एकूण ६० अनाधिकृत वस्त्या आहेत. शासनाच्या पत्रानुसार दिनांक ०१-०१-९५ च्या नंतर अनाधिकृत झालेले बांधकाम करणाऱ्या नागरिकांवर कडक कार्यवाही संबंधित अधिकारी यांनी करावी. ज्या अनाधिकृत वस्त्या आहेत त्यात जाधववाडी, सुरेवाडी, पुंडलिकनगर, हनुमाननगर, कैलासनगर, जयभवानीनगर, अशा एकूण ६० वस्त्या आहेत जे नियमबाह्या अतिक्रमण झालेले आहेत त्या बाबत संबंधित अधिकारी यांनी किती लोकांवर आतापर्यंत कार्यवाही केलेली आहे.

**प्रशासकीय अधिकारी :** याबाबत माझ्याजवळ पूर्ण माहिती नाही. पुढच्या बैठकीत सविस्तर माहिती देण्यात येईल.

**मा. सभापती :** महापालिकेच्या ज्या खुल्या जागेवर अनाधिकृत बांधकामे होत असल्यास त्या नागरिकांवर किंवा बिल्डरवर काय कार्यवाही केली. ज्या त्या विभागामध्ये कार्यरत असलेले इमारत निरिक्षक यांनी कोणकोणत्या अनाधिकृत बांधकामाबद्दल कार्यवाही केली.

**श्री. संजय जोशी :** संबंधित अधिकारी यांना या बाबत यादी तयार करण्याचे आदेश द्यावे व यादी तयार करून अशा अनाधिकृत बांधकाम करणाऱ्या व्यक्तीला वर्षभरात किती, कोणाला व कोणत्या इमारत निरिक्षकांनी नोटीसा दिलेल्या आहेत व त्यानुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती सभागृहात ठेवावी.

**मा. सभापती :** न्यायालयात किती अनाधिकृत प्रकरणे आहेत. त्यावर वकीलामार्फत कार्यवाही होते. ती योग्य प्रकारे होत नसेल तर वकीरलांचा पॅनॅन बदलण्यात यावा अशा प्रकारणांत महापालिकेच्या हक्कात ताबडतोब स्थगिती आदेश मिळविण्यात यावे गरज भासल्यास चांगले वकील पॅनेलवर घ्यावे.

**श्री. स. अ. एकबालोद्दिन :** वकीलाच्या मानधनात वाढ करावी.

**मा. सभापती :** ६० अनाधिकतृ वसाहती आहेत. नगरविकास विभागाचे पत्र आले आहे. ०१-०१-९५ च्या आधारे १०,०००, १५,००० रु. दंड आकारून महापालिकेकडे निधी उपलब्ध होईल. तिजोरीत भर पडेल.

**श्री. गौतम लांडगे :** शासनाच्या पत्रानुसार दि. ०१-०१-९५ च्या नंतर अतिक्रमण झालेले, तातडीने पाडण्यात यावे. अनाधिकृत वस्त्या असतील.

**श्री. संजय जोशी :** अशा घरांना ५०००, १००००/- दंड व १९९५ पूर्वी बेटरमेंट चॉर्जेस ८ रुपये चौ. फु. प्रमाणे लावण्यात यावा व बेटरमेंट चार्जेस संबंधी सर्वांना सवलत द्यावी.

**मा. सभापती :** दि. ०१-०१-९५ च्या शासन पत्रानुसार संबंधित अधिकारी यांनी कार्यवाही करून सभागृहात माहिती द्यावी.

**प्रशासकीय अधिकारी :** दंडाची रक्कम वेगळी व इतर सर्व चार्जेस घ्यावे लागेल.

**श्री. संजय जोशी :** अनाधिकृत बांधले म्हणून रु. ५०००/- दंड शिवाय बाकीचे सर्व चार्जेस बेटरमेंट इ. द्यावे लागेल.

**श्री. स. अली मिरा सलामी :** शहरातील जे नाले आहेत या नाल्याच्या कडेला मोकळ्या जागा इसतात. त्या जागेवरही बऱ्याच नागरिकांनी अनाधिकृत बांधकामे करून घरे केलेली आहे. ते का काढण्यात येत नाही?

**श्री. म. अ. रऊफ, श्री. स. अली मिरा सलामी, श्री. संजय जोशी :** संबंधित अधिकारी हे किती दिवसांत याबाबत माहिती देणार आहे.

**मा. सभापती :** दिनांक ०१-०१-९५ च्या अगोदर अनाधिकृत वसाहती झालेल्या आहेत. त्याबाबत कार्यवाही करता येईल ते पाहावे सर्व्हे करून माहिती द्यावी. मालमत्ता कराची आकारणी झालेली आहे. त्यामुळे उत्पन्न वाढेल. झालेल्या अनाधिकृत बांधकामे, याबाबत संबंधित अधिकारी यांनी किती नागरिकांना नोटीसा दिलेल्या आहेत व किती केसेस कोर्टात चालू आहेत याबाबतचा अहवाल संबंधित अधिकारी यांनी सर्वे करून पुढच्या बैठकीपर्यंत माहिती द्यावी. प्रकरणात उपआयुक्त श्री. कांबळे यांनी वकील नियुक्त करून संबंधितावर कार्यवाही करतील तसेच महापालिकेतील अधिकारी हे अनाधिकृत बांधकामास प्रोत्साहन देत असतील तर त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल. ज्या नाल्याजवळ अनाधिकृत बांधकामे सध्याच्या परिस्थितीत होत असतील ते संबंधित नागरिकांना अगाऊ सूचना देऊन पाडण्यात यावे.

**श्री. स. अ. एकबालोदिन :** कालच एका उर्दू वृत्तामध्ये महापालिका शहरातील कब्रस्तान, स्मशानभूमी संबंधी बातमी प्रसिध्द झाली. स्मशानभूमीला सर्व सुविधा पुरविण्यात येतात परंतु कब्रस्तानला सुविधा उपलब्ध करून देत नाहीत. या ठिकाणी महापालिकेकडून सुविधा उपलब्ध करून दिल्या जात नाही काय? सुविधा पुरविणे हे महापालिकेचे कर्तव्य आहे. महापालिका तेथील सुविधा पुरवत असेल तर अशा प्रकारची बातमी वृत्तपत्रात येणे चुकीचे आहे. महानगरपालिकेसंबंधी फार काही लिहिण्यात येत आहे. वक्फ बोर्डाचे काम आहे की, महानगरपालिकेचे महानगरपालिकेने कब्रस्तानमध्ये शेड बांधणे इ. कामे केलेली आहेत. यासंबंधी पेपरला खुलासा द्यावा.

**मा. सभापती :** कब्रस्तान, व स्मशाभूमी येथे महापालिकाच्यावतीने काय सुविधा उपलब्ध करून दिली जाते. याची संबंधित अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**शहर अभियंता :** शहरातील स्मशानभूमी ह्या तर महापिलकेच्या अंतर्गत येतात परंतु कब्रस्तानसाठी वक्फ बोर्डाने नाहरकत प्रमाणपत्र दिल्यावर महानगरपालिकेला मुलभूत सेवा उपलब्ध करून देणे अनिवार्य असल्याने नाहरकत प्रमाणपत्रानंतर कुंपन भिंत बांधण्यात येते.

**मा. सभापती :** वक्फ बोर्डाचे चेअरमन यांना एक पत्र देऊन त्यांना कहवावे की, आपण सर्व कब्रस्तानच्या जागा महापालिकेकडे हस्तांतर करून द्यावे.

**श्री. स. अली मिरा सलामी :** कब्रस्तान वक्फ बोर्डाचे व स्मशानभूमी महापालिकेची एकाचे बेवारीस मृतदेह असेल तर तयाचे विल्हेवाट लावायला महानगरपालिका, अवफाक बोड मात्र दफन करू देतात ही मोठी गोष्ट आहे. नाहीरत महानगरपालिकेला कब्रस्तानसाठी भूसंपादन करावे लागले असते. वक्फ बोर्ड फुकटात जागा देते. वक्फ बोड हातभार लावेत. महानगरपालिकेचे कर्तव्य आहे. नाहरकत प्रमाणपत्र घेवून कब्रस्तानचा विकास करावा.

**मा. सभापती :** या प्रकरणाबाबत आपणांस सर्वसाधार सभेमध्ये चर्चा करावी लागेल. जेथे कब्रस्तान आहे. तेथील ज्याही सुविधा असतील त्या महापालिकेकडून पुरविण्यात येतील. परंतु हा मुद्दा सर्वसाधारण सभेमध्ये उपस्थित करावा लागेल.

**श्री. विखारोद्दिन, श्री. म.अ. रऊफ :** कबस्तानाजवळ दफनविधी करण्यात जास्त जागा पाहिजे. संबंधिताकडून तात्काळ ना हरकत प्रमाणपत्र घेऊन तेथे या पुढील सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतचे काम चालू करावे.

**श्री. स. अ. एकबालोद्दिन :** वर्तमानपत्रात मुस्लिम नगरसेवकांची बदनामी होते की ते कब्रस्तानचे काम करीत नाही.

**श्री. संजय जोशी :** शहरातील जेथे जेथे कब्रस्तान आहेत तेथील योग्य त्या सुविधा पुरविण्याबाबत सर्वच जागेबाबत ना हरकत प्रमाणपत्र घ्यावे. अशी माझी विनंती आहे.

**मा. सभापती :** कब्रस्तान येथे योग्य त्या सुविधा पुरविण्याबाबत तेथे जागा दिलेल्या आहे. अशी स. सदस्यांच्या नावाची बदनामी होत आहे. असे स. सदस्य यांचे म्हणणे आहे. मुस्लिमाच्या कब्रस्तानांना योग्य त्या सुविधा पुरविण्यासाठी त्या जागा महापालिकेकडे हस्तांतर झाल्या पाहिजे जसे संबधित अधिकारी यांना मी सुचित करतो. तसेच या बाबत स. सदस्य यांनी सर्वसाधारण सभेमध्ये हा मुद्दा मांडावा जेणे करून लवकरात लवकर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**श्री. गौतम लांडगे :** कोणत्याही कामाबाबातची बांधकाम परवानगी नगररचना विभगाकडून दिली जाते तेंव्हा नियमाप्रमाणे कार्यालयीन फिसर भरणा केली जाते. तेंव्हा काम पूर्ण झाल्याचे पूर्णत्वाचे प्रमाण पत्र घेत नाही. मात्र घरात राहयला जातात. जे त्या पर्यंतचे बांधकाम झाले त्याचा सर्वे करावा ज्या विभागाकडून बांधकाम परवानगी दिली आहे त्या विभागाकडून ज्या कामाची परवानगी घेतलेली आहे. तेवढेच काम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र देऊन पुढील काम चाूल करण्याची परवानगी परत दिली पाहिजे. परंतु असे न होतो. कम्प्लेशन सर्टिफिकेशन न घेता त्या जागेवर दुसरे नवीनच काम चालू करतात. पब्लीक टायलेट, युरीनल प्लॅन मध्ये दाखवतात परंतु नंतर तेथे दुकान बांधण्यात येते. शहरात बऱ्याच ठिकाणी शॉपिंग सेटर झालेले आहे. निरालबाजार समोर एक बिल्डींग आहे. तसेच खरोड नावाची एक कॉम्प्लेक्स आहे. कोणतेही बांधकाम करतांना संबंधित बिल्डरला जर अंडर ग्राऊंड करावयाचे असेल तर १ (एम) अंडरग्राऊंड काढण्यात आले आहे. संबंधित अधिकारी त्या बिल्डरला आगाऊ सूचना देऊन तशी प्रकारची कार्यवाही का करत नाही.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**महा. संचालक नगररचना :** दोन महिण्यापूर्वी सर्वे करण्यात आलेले आहे. विधी विभागाशी चर्चा करून नोटीसा दिलेल्या आहेत. त्यात १ महिण्याची तुदत देण्यात आलेली आहे. त्यात भोगवटा प्रमाणपत्र न घेणे, जादा बांधकाम इ. चा समावेश आहे.

**मा. सभापती :** बऱ्याच ठिकाणी अशा प्रकारचे बांधकाम झालेले आहे. मोठमोठ्या बिल्डींग झालेल्या आहेत. त्यांचे पार्कींग मध्ये दुकाने काढलेली आहेत. तरी जबाबदार असणारे संबंधित अधिकारी यांनी त्यांच्या स्वत:च्या सहीने अशा अनाधिकृत व जादा बांधकाम करणाऱ्या बिल्डरला नोटीसा दिल्या पाहिजे.

**श्री. गौतम लांडगे :** आता प्लिन्थ तपासणीचा रिपोर्ट घेण्यात येत नाही. प्लिंथ चेकींगची जबाबदारी सोपविल्या आहे असे दिसून येते व त्यानुसार सर्वे करण्यात येत आहे. याबाबतीत आर्कीटेक्ट, कनिष्ठ अभियंता, हा संचालक नगररचना हे सर्व जबाबदार असून आर्कीटेक्ट यांच्यावर कडक कार्यवाही करण्यात यावी त्यांना काळ्या यादीत सामील करावे.

**श्री. संजय जोशी :** बांधकाम परवानगीची प्रत प्रशासकीय अधिकारी यांना देण्यात येते. मात्र भोगवटा प्रमाणपत्राची प्रत त्यांना दिली जात नाही. भोगवटा प्रमाणपत्रानंतर मालक बांधकामात बदल करून घेतो. नकाशा प्रशासकीय अधिकारी यांचेकडे जायला पाहिजे. नकाशा प्राप्त झाल्यावर ३ ऱ्या दिवशी प्रशासकीय अधिकारी यांनी तपासणी अहवाल द्यावा. जास्त बांधकाम असेल तर ते पाडून टाकावे.

**मा. सभापती :** तात्काळ सर्वे करण्यात यावा असे काही आढळून आल्यास त्यावर कार्यवाही करण्यात यावी.

**प्रशासकीय अधिकारी :** याबाबत मला संबंधित विभागाकडून पूर्ण माहिती मिळालेली आहे.

**मा. सभापती :** प्रशासकीय अधिकारी तसेच सहा. संचालक नगररचना यांनी ज्या ज्या ठिकाणी अशा प्रकारची अनाधिकृत बांधकामे झालेली असतील तेथील सर्व्हे करून संबंधित बिल्डरवर दंडात्मक कार्यवाही करावी. तसेच तेथील आर्कीटेक्ट यांचा रिपोर्ट बरोबर आहे काय? चुकीच्या मार्गाने काम केलेले असेल तर त्यांनाही जबाबदार धरावे? महिन्याच्या आत याबाबतचा अहवाल सभागृहात सादर करावा.

**श्री. संजय जोशी :** महापालिका प्रशासनाकडून मला पत्र मिळाले आहे मी जे सभागृहात बोललो तेच उत्तर म्हणून मला पत्राने कळविले आहे की, (एक पत्र वाचून दाखवतात) रस्त्यांची रुंदी ३ मी. असली पाहिजे. संबंधी बिल्डरने तेथील नागरी सुविधा उपलब्ध करून द्यावयास पाहिजे हे तर मला ही कळते. परंतु मी सभागृहात जे तेथील नागरिक आहे त्यांना ज्या सुविधा मिळावयास पाहिजे त्या बाबत प्रशासनाने काय कार्यवाहल केली आहे. याची माहिती पाहिजे आहे. तेथे विद्युत लाईटची व्यवस्था नाही. रस्त्याची व्यवस्था नाही. याबाबतीत काय कार्यवाही केली याची माहिती द्यावी.

**मा. सभापती :** स. सदस्य यांनी जो मुद्दा उपस्थित केला तेथील प्रभागात विद्युत लाईट बाबत संबंधित अधिकारी यांनी जो कुणी लाईनमन असेल त्यांना तसेच आदेश देऊन तुर्त सुविधा करून देण्यात यावी. तेथील रस्त्याबाबतची जी समस्या आहे त्याबाबत संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**सहा. संचालक नगररचना :** खिंवसरा पार्क येथील वस्त्याबाबत जी सुविधा पाहिजे ती संबंधित बिल्डरने दिली पाहिजे त्या बिल्डरने तेथील आणखी काही सुविधा

असेल त्या पुरविल्या पाहिजे. संबंधित बिल्डरची ती जबाबादारी आहे. रामतारा येथील नागरी सुविधा बाबत दोन दिवसांत माकिती घेऊन सांगतो.

**श्री. संजय जोशी :** अधिकारी म्हणतात बिल्डरने त्या सुविधा पुरविल्या पाहिजे आणि तेथील सुविधा पुरविण्याबाबतचे कम्प्लेशन सर्टीफिकेट महापालिकेच्या विभागाकडून कसे दिल्या जाते.

**मा. सभापती :** बिल्डरने नागरी सुविधा पुरविल्या पाहिजे. न पुरविल्यास त्यांना तात्काळ नोटीस संबंधित विभागाकडून देण्यात यावी व या पुढील त्यांच्या बांधकामाला परवानगी देऊ नये. गेल्या १० वर्षापासून हा प्रश्न तसाच नडून आहे. संबंधित अधिकारी यांनी योग्य त्या पध्दतीने पुढील कार्यवाही करावी.

**श्री. नगरसिंग ढगे :** सुरवातील संबंधि बिल्डरला सेल्फ डेव्हलपमेंट ची परवानगी दिली जाते. परवानगी दिल्यानंतर संबंधित बिल्डर हे ज्या काही नागरी सविधा द्यावयास पाहिजे त्या देत नाही. माझ्याही वॉर्डात अशाच प्रकारचा प्रश्न प्रलंबित आहे.

**श्री. स. अली मिरा सलामी :** शहरातील असे किती बिल्डर आहेत की, ज्यांनी सेफ डेव्हलपमेंट मध्ये बांधकामा केलेले आहेत व तेथील नागरिकांना नागरी सुविधा संबंधित बिल्डरने उपलब्ध करून दिल्या नाही असे जे काही बिल्डर असतील त्याचे शहरातील ज्या ज्या ठिकाणी बांधकाम चालू असतील त्यांची परवानगी थांबवावी.

**मा. सभापती :** सेल्फ डेव्हलपमेंट मध्ये बांधकाम करण्यास महापालिकाकडून परवानगी दिल्या जाते. परंतु सुरवातीला बेटरमेंट चार्जेस भरल्यानंतर परवानगी दिली जाते. संबंधित बिल्डर हे तेथील नागरी सुविधा उपलब्ध करून देत नसतील तर त्यांच्यावर तात्काळ कार्यवाही संबंधित विभागातील अधिकारी यांनी करावी. हाच मुद्दा जर सर्वसाधारण सभेत उपस्थित केला तर योग्य त्या प्रकारची दिशा मिळेल करीता स. सदस्यांनी सर्वसाधारण सभेत हा मुद्दा उपस्थित करावा.

**श्री. स. अली मिरा सलामी :** शहागंज येथील जे महापालिकेचे दुकान मार्केट झालेले आहेत ते भाड्याने दिलेले आहे किंवा विकण्यात आलेले आहे काय?

**मा. सभापती :** मालमत्ता अधिकारी यांनी खुलासा करावा.

**मालमत्ता अधिकारी :** महापालिकेच्या मालकीचे ते दुकान मार्केट असून दुकाने भाड्याने दिलेल्या आहेत.

**श्री. स. अली मिरा सलामी :** ही दुकाने भाड्याने दिली आहे तर त्यांना मालमत्ता कराची पावती दिली जाते काय त्यांचेकडून भाडे  घेण्यात येते का मालमत्ता कर घेण्यात येतो.

**करमुल्यनिर्धारण अधिकारी :** माहिती घेवून सांगतो.

**मा. सभापती :** नोटीस तपासून पाहावी व पुढील बैठकीत माहिती द्यावी.

**श्री. गौतम लांडगे :** सिडको एन-७ येथील महापालिकेच्या शाळेत चार महिण्यापासून विज्ञान, हिंदी, गणित विषयाचे शिक्षक नाही. श्री. गायकवाड ७ वी हिंदी शिकवत होते. श्री. बोरुले हे विज्ञानाचे शिक्षक होते ते वर्ग २ रीच्या मुलांना शिकवित होते. काही शिखकांना सेवानिवृत्ती झालेली आहे व काही शिक्षकांच्या बदल्या झालेल्या आहेत. यामुळे महत्वाच्या विषयास शिकविण्यासाठी या शाळेत शिक्षक नाही. माझ्या वॉर्डातील गोरगरीबांची ९० टक्के मुले या शाळेत शिक्षण घेत आहेत. महापालिकेच्या शाळांमध्ये रिक्त शिक्षकांच्या जागा न भरल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. या वर्षाचे पहिले

शैक्षणिक सत्र संपत आलेले आहे. तरी या शाळेवर शिक्षक नाही. शाळेवर ताबडतोब शिक्षक देण्याची व्यवस्था करावी.

**मा. सभापती :** शिक्षणाधिकारी यांनी याबाबत माहिती द्यावी.

**शिक्षणाधिकारी :** महापालिकेच्या रेकॉर्डनुसार तीस शिक्षकांच्या जागा रिक्त आहे. स. सदस्य यांनी सूचना केलेल्या एन-७ येथील शाळेत, मागे शिक्षक भरती करण्यात आली होती. त्या वेळेस सदरील शिक्षक भरतीलतील ७ शिक्षक रुजूच झालेले नाही. त्यामुळे ही अडचण निर्माण झाली आहे. त्या यादीतील ८ शिक्षक व आणखी काही रिक्त जागा अशा एकूण ३० जागा रिक्त आहेत. पर्यायी व्यवस्थेसंबंधी आटोकाट प्रयत्न करण्यात येतील. नविन शिक्षकांची नेमणूक होताच देवू. नविन शिक्षक घ्यावे लागतील.

**मा. सभापती :** सात (७) शिक्षकांना आदेश देऊन ही हजर झालेले नाही. पर्यायी व्यवस्था अशी की एखाद्या शाळेवर जास्तीचे शिक्षक संख्या असेल त्या शाळेतील शिक्षक एन-७ येथील शाळेवर व अन्य कमी शिक्षक असलेल्या शाळेवर पाठवावेत. ८ दिवसांत व्यवस्था करावी.

**श्री. गौतम लांडगे :** या शाळेवर तातडीने शिक्षक देण्यात यावे. ७ वी पर्यंत या शाळेत मुले शिक्षण घेत आहे ४ महिने झाले शैक्षणिक दर्जा पूर्वीच खालावलेला आहे. हिंदी,विज्ञान, गणित अशा महत्वाच्या विषयाला या शाळेत शिक्षक नाही त्यामुळे मुलांचे नुकसान होत आहे. तासवाडी तात्पुरती शिक्षकांची नेमणू करावी.

**मा. सभापती :** नविन शिक्षक भरती होईपर्यंत तात्पुरती शिक्षक देण्याची व्यवस्था करावी.

**मा. उपआयुक्त (प्र.)** शाळेवर तात्पुरती शिक्षक देण्याची व्यवस्था करता येत नाही. यासाठी समाजकल्याण अधिकारी व सेवायोजन कार्यालय यांचेकडून लिस्ट मागविली आहे.

**श्री. गौतम लांडगे :** मुलांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी या शाळेवर तात्पुरती शिक्षकांची नेमणूक करावी. सेवानिवृत्त शिक्षकांना मानधन देवून तासिकावर घ्यावे. जून ते सप्टेंबर काहीही केले नाही.

**श्री. म. अ. रऊफ :** प्रतिक्षा यादीतून घ्यावे.

**मा. सभापती :** शिक्षकांच्या बाबतीतच काय शिफार करता महापालिकेच्या शाळेची काय अवस्था आहे. किती अधिकारली व नगरसेवकांची मुले महापालिकेच्या शाळेत जातात. माझे तर असे मत आहे की, महापालिकेच्या शाळेचा दर्जा खालावलेला आहे. त्यामुळे शाळा बंद कराव्या. माझे स्वत:चे मत आहे. पर्यायी शिक्षकांची व्यवस्था केली जाईल.

**सौ. राधाबाई तळेकर :** माझी तिनही मुले महापालिकेच्या शाळेत शिकली व पदवीधरही झाली.

**श्री. गौतम लांडगे :** शिक्षणाचा दर्जा खालावत आहे. त्यास जबाबदार असणाऱ्या शिक्षकांवर अधिकारी यांनी कडक कार्यवाही करावी.

**श्री. स. अली मिरा सलामी :** जेथे शिक्षक शिकवित नाही. त्यांचेवर कार्यवाही करणार परंतु जेथे शिक्षक नाही. तर काय कार्यवाही करणार. शिक्षणाधिकारी यांना याबाबतीत ३ महिण्यापासून माहिती असूनही काहीच कार्यवाही केलेली नाही. ज्या शाळेवर शिक्षकच नाही तर अधिकारी हे काय कार्यवाही करतील.

**मा. सभापती :** उपआयुक्त (प्र.) व शिक्षणाधिकारी यांनी १५ दिवसांच्या आंत सदरील शाळेवर शिक्षक देण्याची व्यवस्था करावी व रिक्त असलेली ३० पदेही भरण्याची लवकरच कार्यवाही करावी. तसेच ज्या ज्या शाळेवर शिक्षक योग्य तया पध्दतीने मुलांना शिक्षण देत नसतील तसेच शाळेचा इतर काही शैक्षणिक दर्जा सुधारणा होण्याच्या दृष्टीकोणातून टाळाटाळ करीत असतील तर त्यांच्यावर संबंधित अधिकारी यांनी कडक कार्यवाही करावी. की जेणे करून मुलांच्या शैक्षणिक बाबतीत काहीही अडचण निर्माण होणार नाही.

**विषय क्र. २०३/१ :**

दिनांक २८-०८-९८ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री. राजकुमार बचाटे (मामा) :** इतिवृत्तातील पृष्ठ क्र. ७ वर आकशवाणी ते त्रिमुर्ती चौका पर्यंतच्या रस्त्यावर महापालिकेने जे (चाऱ्या) सिमेंट नाल्याचे बांधकाम केले आहे ते योग्य त्या पध्दतीने केलेले नाही. याबाबत मागील बैठकीत चर्चा झाली होती. तसेच आदेश ही संबंधित अधिकाऱ्यांना दिले होते. काहीही कार्यवाही आजपर्यंत केलेली दिसत नाही. हा प्रश्न सातत्याने किती बैठकीत मांडावा रुलींग देवनूही काहीच होत नाही. नाली स्वच्छ नाही. ढापे नाही. नैसर्गिक पाणी जाण्यास उपयोग होत नाही.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**कार्यकारी अभियंता :** आकाशवाणी ते त्रिमुर्ती चौका पर्यंतच्या रस्त्यावर ज्या चाऱ्या टाकल्या आहेत त्यामध्ये दोन प्रकारचे मुद्दे उपस्थित होतात. एक तर चाऱ्यातील साठलेले पाणी काढणे व ज्या चाऱ्या आहेत त्या ठिकाणी योग्य त्या ठिकाणी ढापे बसविणे.

**श्री. राजकुमार बचाटे (मामा) :** ज्या चाऱ्यामध्ये पाणी साटते ते पाणी काढता येईल काय हा महत्वाचा मुद्दा आहे.

**मा. सभापती :** स. सदस्य श्री. राजकुमार बचाटे यांच्या वॉर्डातील चाऱ्याच्या ठिकाणी अति. शहर अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी पुन्हा एकदा जाऊन तपासणी करून पुढील कार्यवाही करावी.

**सौ. यशोदा वाडेकर :** इतिवृत्तात पृष्ठ क्र. १३ वर विहीरीच्या पाणीपुरवठ्या बाबतचा प्रस्ताव आहे त्याबाबत काय झाले.

**मा. सभापती :** सदर विषय हा या अगोदर झालेल्या बैठकीत स्थगित ठेवण्यात आलेला आहे. आजुबाजूला जर पुरेपुर पाणी उपलब्ध होत असेल तर तसेच त्या विहीरीच्या पाण्याच्या वापराची गरज पडत नसेल तर हा प्रस्ताव सभागृहात कधीही आपण रद्द करू शकतो.

**ठराव :**

दिनांक २८-०८-९८ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्तास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०४/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वैशालीनगर, जसवंतपुरा येथील खुल्या जागेस खेळणी व संरक्षित भिंत बांधणे बाबत चे अंदाजपत्रक सन ९७-९८ चे

सार्वजनिक बांधकाम विभागाचे दरसूचीनुसार रक्कम रु. २.०० लक्ष चे तयार करण्यात आले असून त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यात आली आहे. सदर काम हे लेखाशिर्ष नविन उद्याने तरतूदी अंतर्गत प्रस्तावित करण्यात आले आहे. सबब वरील प्रमाणे प्रस्ताव स्थायी समिती समोर विचारार्थ आणि मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वैशालीनगर, जसवंतपुरा येथील खुल्या जागेस खेळणी व संरक्षित भिंत बांधणेसाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. २.०० लक्ष चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०५/३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. भावसिंगपुरा येथे बालवाडी बांधणेसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन ९७-९८ चे जिल्हा दरसूचीनुसार रक्कम रु. २,४८,३९५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दि. ०८-०८-९८ रोजी मान्यता दिलेली आहे. उपरोक्त कामाची तरतूद ही सन ९८-९९ च्या शासकीय अनुदानातून करण्यात येईल. तरी उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. २,४८,३९५/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. भावसिंगपुरा येथे बालवाडी बांधणेसाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. २,४८,३९५/- ला सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०६/७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मोतीकारंजा नाईकवाडा येथे बहुउद्दिशिय हॉल बांधणेसाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९६-९७ चे जिल्हा दरसूचीनुसार रक्कम रु. १,१३,७४५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दि. ०८-०८-९८ रोजी मान्यता दिलेली आहे.

उपरोक्त कामाची तरतूद व खर्च हा सन ९८-९९ या आर्थिक वर्षात शासकीय अनुदानातून करण्यात येईल. तरी उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. १,१३,७४५/- चे प्रस्ताव मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोतीकारंजा नाईकवाडा येथे बहुउद्दिशिय हॉल बांधणेसाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,१३,७४५/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०६/४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मोतीकारंजा नाईकवाडा येथे बहुउद्दिशिय हॉल बांधणेसाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९६-९७ चे जिल्हा दरसूचीनुसार रक्कम रु. १,१३,७४५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दि. ०८-०८-९८ रोजी मान्यता दिलेली आहे.

उपरोक्त कामाची तरतूद व खर्च हा सन ९८-९९ या आर्थिक वर्षात शासकीय अनुदानातून करण्यात येईल. तरी उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. १,१३,७४५/- चे प्रस्ताव मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोतीकारंजा नाईकवाडा येथे बहुउद्दिशिय हॉल बांधणेसाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,१३,७४५/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०७/५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, रमानगर स्मशानभूमी जोड रस्ता लगत गटार बांधणे बाबतचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाचे जिल्हा दरसूचीनुसार सन १९९६-९७ अन्वये रक्कम रु. १,५९,०००/- चे तयार करण्यात आले असून सदर कामासाठीचा खर्च हा शहरातील खुली गटार तरतूदी अंतग्रत प्रस्तावित करण्यांत येऊन त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यात आली आहे.

सबब सदर कामासाठीचा वरीलप्रमाणे प्रस्ताव स्थायी समिती समोर विचारार्थ आणि मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रमानगर स्मशानभूमी जोड रस्ता लगत गटार बांधणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,५९,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०८/६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, कैलासनगर येथे श्रध्दांजली हॉल बांधणे बाबत चे अंदाजपत्रक रु. १,७५,००० चे सार्वजनिक बांधकाम विभागाची दरसूची सन ९७-९८ अन्वये तयार करण्यात आले असून सदर काम हे मा. आमदार श्री. शालीग्रामची बसैय्ये यांचे आमदार निधीतून प्रा.क्र./जि.नी/कार्या-१/स्था.वि.का./९८-९९/ ४७३/ दि१/३/-०७-९८ जिल्हाधिकारी यांचे मान्यतेन्वये प्रस्तावित करण्यांत येऊन कार्यालयीन निविदा सूचनाद्वारे सदर कामा करिता बी-१ नमुन्यात निविदा मागवले असता कौरे निविदा विक्री दि. २१-०७-९८ पर्यंत बा रा विकले गेले व दर भरून स्विकृतीची अंतिम दि.२९-०७-९८ पर्यंत दोन प्राप्त झाले. त्या उपस्थित गुत्तेदारासमक्ष दि. १२-०८-९८ रोजी उघडण्यात आले असता प्राप्त निविदेची तुलना खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | प्राप्त दर |
|---|---|---|
| १) | न्यु स्टार कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.००% जास्त दराचे दर. |
| २ | एस.ए. नवाब | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% जास्त दराचे दर. |

या अनुषंगाने प्राप्त दरात तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच गुत्तेदार श्री. न्यु स्टार कन्स्ट्रक्शन यांचे अदांजपत्रकीय दरापेक्षा ५.००% जास्त दराचे दर प्राप्त आहे. मा. आयुक्त यांची दि. २८-०८-९८ रोजीचे सदर कामे हे अंदाजपत्रकीय दराने करून घेणे बाबत मान्यता प्राप्त असून त्यास गुत्तेदाराने संमती दर्शविली आहे.

सबब प्राप्त निविदेतील तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी असलेले गुत्तेदार मे. न्यु. स्टार कन्स्ट्रक्यशन यांचे अंदाजपत्रकीय दराने काम करून घेणे बाबतचा प्रस्ताव स्थायी समिती समोर विचारार्थ व मान्यतेसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कैलासनगर येथे श्रध्दांजली हॉल बांधणेच्या कामासाठी मागविण्यात आलेल्या निविदेपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा गुत्तेदार न्यु स्टार कन्स्ट्रक्शन यांचे अदांजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दर प्राप्त आहे. सर्वात कमी दर असलेले न्यु. स्टार कन्स्ट्रक्शन यांचे सह वाटाघाटी करून त्यांनी हे काम अंदाजपत्रकीय दराने करण्याचे मान्य केले असल्याने अंदाजपत्रकीय दराने त्यांचेकडून काम करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०९/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिध्दार्थ उद्यान येथे संगीत कारंजे करिता तिकिट दर खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात आले आहे.

प्रोढांकरिता तिकिट दर रु. ५=००

(११ वर्षाखालील) लहान मुलांकरिता रु. ३=००

प्रस्ताव मंजुरीस्ताव सादर.

**संवाद :**

**श्री. म.अ. रऊफ :** प्रस्तावात दर्शविलेले तिकिट दर रुपये ५ व ३ जास्तीचे होतात त्या ऐवजी प्रौढांकरिता रु. ३ व लहान मुलांकरिता रु. १.५० असे प्रस्तावित करावे. या ठिकाणी गोरगरींबाची मुले येत असतात. त्यांना एवढीही सवलत महापालिकेने द्यावयास नको का तसेच बाहेरील पर्यटकही या उद्यानात येऊन या योजनेचा लाभ जास्त प्रमाणात घेतात.त्यामुळे सदरील तिकिट दर हे कमी ठेवावे.

**श्री. संजय जोशी :** तिकिट दर रु. ५ व ३ राहु द्यावे.

**श्री. स. अली मिरा सलामी :** मुलांना २ रु व मोठ्यांने ४ रु. ठेवावे.

**मा. सभापती :** हा ठराव मतदानास टाकण्यात येत आहे. (याचवेळी मा. सभापती यांनी स. सदस्य यांना हात वर करावयास लावतात की, ज्यांना ५ व ३ रु. व ज्यांना ३ व १.५० रु. प्रमाणे असावे अशा स. सदस्यांनी हात वर करावे. जे ही बहुमतानुसार निण्र्य घेण्यात येईल. व ५ व ३ रु. असावे यासाठी ९ सदस्यांनी हात वर केले १ तटस्थ सबब ९ विरुध्द ५ या बहुमताच्या निर्णयानुसार प्रौढांकरिता रु. ५ व लहान मुला करिता ३ रु. असे प्रस्तावित करण्यात येत आहे. )

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिघ्दार्थ उद्यान येथील संगीत कारंजी करिता ठरविण्यात आलेल्या तिकिट दर प्रौढांकरिता तिकिट दर रु. ५/- व (११ वर्षाखालील लहान मुलांकरिता) रु. ३ हे दर निश्चित करण्याबाबत हातवर करून मतदान घेण्यात आले. ठरावाच्या बाजूने आहे तरी वरील प्रमाणे दर आकारणीस बहुमताने मंजुरी देण्यात येत.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१०/८ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, संजयनगर (मुकूंदवाडी) स्लम भागात उर्वरित अर्धगोलाकार गटार बांधणेच्या कामाकरिता अं. प. रक्कम ७,७०,७७०/- चे सा. बां. विभागाचे दरसूची ९६-९७ नुसार तयार करण्यात आली असून मा. आयुक्तांनी दि. १३-०३-९८ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली असून दि.२०-०३-९८ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेच्या ठराव क्र. ५०५/१४ अन्वये मंजुरी मिळाल्यानंतर नियमानुसार रितसर वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन निविदा मागविण्यात आल्या. कोऱ्या निविदा विकण्याचे अंतिम तारीख १०-०६-९८ पर्यंत एकूण १७ कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याचे दिवशी फक्त (६) सहा मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या दि. २३-०६-९८ रोजी उपस्थित ठेकेदारासमक्ष उघडण्यात आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. आर. बी. चव्हाण | अं. प. दरापेक्षा ३०% कमी |
| २) | श्री. मन्नान खॉन | अं. प. दरापेक्षा २७.२०% कमी |
| ३) | शेख मसूद | अं. प. दरापेक्षा २२% कमी |
| ४) | कुलवंतसिंग | अं. प. दरापेक्षा १७.७०% कमी |
| ५) | विपुल कन्स्ट्रक्शन | अं. प. दरापेक्षा १३% कमी |
| ६) | सफवानकन्स्ट्रक्शन | अं. प. दरापेक्षा ३% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ३०% कमी दराची श्री. आर. बी. चव्हाण यांची निविदा स्विकारणेस प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संजयनगर (मुकूंदवाडी) स्लम भागात उर्वरित अर्धगोलाकार गटार बांधणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०% कमी दराची निविदा श्री. आर. बी. चव्हाण यांची असून सदर निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २११/९ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु. व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जिन्सी पंप हाऊस येथील स्लॅब काढुन दुरुस्ती करावयाची आहे. त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाची सन ९७-९८ च्या दरसूचीनुसार रक्कम रु. १,५६,७००/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर कामाचा खर्च हा पाणी पुरवठा देखभाल व दुरुस्तीच्या आर्थिक तरतूदीमधून करण्यात येणार आहे.

तरी अंदाजपत्रक रक्कम रु. १,५६,७००/- चे मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जिन्सी पंप हाऊस येथील स्लॅब काढुन दुरुस्ती करण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. १,५६,७००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१२/१० :**

हर्सूल येथे गांवाच्या बाहेर जलकुभंच्या व पुलाच्या जवळील रोड रुंदी करणाचे काम सार्वजनिक बांधकाम खात्याच्या मार्फत सुरू आहे. रोड रुंदीकरणाच्या कामामुळे रोड लगत असलेली २०० मीमी व्यासाची अे. सी. पाईप लाईन उघडी पडून ती वारंवार फुटत आहे.

त्यामुळे सदरील जलवाहिनी रोड लगत असल्यामुळे अे. सी. जलवाहीनी बदलून १००, १५०, व २०० मीमी व्यासाची सी.आय. जलवाहिनी टाकण्याची अंदाजपत्रक रक्कम रु. ६,१७,२८५/- चे परिसर अभियांत्रिकी यांच्या सन ९७-९८ दरसूचीनुसार तयार करण्यात आले असून सदर कामावर होणारा खर्च सन १९९८-९९ च्या देखभाल व दुरुस्ती या लेखा शिर्षकातील तरतुदीमधून करण्यात येणार आहे. अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे.

हर्सूल येथे सी.आय. लाईन टाकण्याच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु. ६,१७,२८५/- चे मंजुरीबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. विकास जैन :** विषय क्र. १० व ११ हे एका विषयाधीन असून सदर दोन्ही प्रस्तावात डी.एस.आर. हे एकच दाखविण्यात आले आहे. तरी विषय क्र. ११ स्थगित ठेवण्यात यावा.

**मा. सभापती :** कार्यकारी अभियंता यांनी माहिती द्यावी.

**कार्यकारी अभियंता :** दोन्ही प्रस्तवात दर्शविलेल्या जलवाहिण्या ह्या वेगवेगळ्या किंमतीच्या (दर्जाच्या) असून करिता तसेच प्रस्तावित करण्यात आले आहे.

**मा. सभापती :** विषय क्र. १० मंजूर करण्यात येतो व विषय क्र. ११ तूर्त स्थगित ठेवण्यात येतो. दुरुस्ती करून पुढच्या बैठकीत सादर करावा. तसेच ए. सी. पाईप वापरल्याने महापालिकेचा आर्थिक फायदा होईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हर्सूल गावाच्या बाहेर जलकुभांच्या व पुलाच्या जवळील रोड रुंदीकरणाच्या कामामुळे २०० मीमी व्यासाची अे. सी. जलवाहिनी वारंवार गळती होत असल्याने सदरील जलवाहिनी काढून १००, १५०, व २०० मीमी व्यासाची सी.आय. जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये ६,१७,२८५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१३/११ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु. व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, हर्सूल गांव येथील जलकुंभ भरण्यासाठी १५० मी. मी. व्यासाची डी.आय. के-९ जलवाहिनी टाकावयाची आहे. सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.२६/२३ दिनांक ३१-०५-९८ अन्वये रक्कम रु. २१,०४,८४१/- च्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आलेली आहे. महाराष्ट्र जीवन प्राधीकरण विभागाची सन ९६-९७ च्या दरसूचीनुसार सुधारित अंदाजपत्रक रक्कम रु. २८,५०,०००/- एवढ्याचे तयार करण्यात आलेले आहे. म्हणजेच मंजुरीच्या पेक्षा रक्कम रु. ७,७५,१५९/- एवढ्याचे अंदाजपत्रकात वाढ झालेली आहे.

तरी वाढीव अंदाजपत्रक रक्कम रु. ७,४५,१५९/- च्या मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यांत येतो असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. २१४/१२ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनिःसारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. हर्सूल येथे १५० मी. मी. व्यासाची ड्रेनेज लाईन काढून नविन २५० मी.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता महाराष्ट्र जीवन प्राधीकरण खात्याच्या सन ९७-९८ च्या

दरसूचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रु. १,५०,९००/- चे तयार करण्यात आले असून सदरील काम "भांडवली कामे" या लेखाशिर्षातून प्रस्तावित केले आहे.

करिता सदरील कामास मा. आयुक्तांनी दि. २८-०८-९८ ला मंजुरी दिलेली आहे. तरी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. हर्सूल येथे १५० मी. मी. व्यासाची ड्रेनेज लाईन काढून नविन २५० मी.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. १,५०,९००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१५/१३ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु. व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, शहानुरमियाँ दर्गाचे मागे जबिंदा ले-आऊट मध्ये नाल्यास रिटेनिंग वॉल बांधणे या कामासाठी १९९७-९८ च्या महाराष्ट्र जीवन प्राधीकरण खात्याचे दरसूची दराने रक्कम रु. ५,७०,८००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले, सदरील कामाच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दिनांक २८-०८-९८ ला प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.

तरी सदर कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु. ५,७०,८००/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहानुरमियाँ दर्गाचे मागे जबिंदा ले-आऊट मध्ये नाल्यास रिटेनिंग वॉल बांधणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ५,७०,८००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१६/१४ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, हर्सूल गांव स्लम येथे शहाबाद फरशी बसविणे बाबत कामाकरिता सा. बां. खाते यांच्या वर्ष ९७-९८ च्या दरसूचीनुसार रु. ३,९८,७५७/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम "खांडकी रस्ते व दहावा वित्त आयोग" या शिर्षकातून करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. २९-०८-९८ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हर्सूल गांव स्लम येथे शहाबाद फरशी बसविणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ३,९८,७५७/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१७/१५ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. मोगलपुरा (स्लम) येथे संरक्षित भिंत बांधणे बाबतच्या कामाकरिता सार्वजनिब बांधकाम खाते यांचे दरसूची सन ९५-९६ नुसार रु. ३७,०१,२७०/- च्या अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदरील काम "संरक्षित भिंत बांधणे" या शिर्षकातून करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेब यांनी दि. २४-११-९७ ला प्रशासकीय माजुरी दिली असून सर्वसाधारण सभेने विषय क्र. १२०/८ दि. ०४-१२-९७ ला मंजुरी प्रदान केली आहे. प्रस्तावित कामासाठी निविदा

पत्रके मागविण्यात आले असता अंतिम तारखेपर्यंत एकुण १३ निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण चार निविदा प्राप्त झाल्या व उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या.

| | | |
|---|---|---|
| १) | एलोरा कन्स्ट्रक्शन | १६% कमी दराने |
| २) | अब्दुल सलाम | १५.८६% कमी दराने |
| ३) | घाई कन्स्ट्रक्शन | १२.००% कमी दराने |
| ४) | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | ८% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६% कमी दराची निविदा एलोरा कन्स्ट्रक्शन यांची आहे. करिता अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६% कमी दराची असलेली एलोरा कन्स्ट्रक्शन यांची निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. मोगलपुरा (स्लम) येथे संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६% कमी दराची निविदा मे. एलोरा कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१८/१६ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. इंदिरानगर बायजीपुरा वॉर्ड क्र. २४ (उत्तर भाग) येथील रस्त्याचे डांबरीकरण करणे बाबत कामाकरिता सा. बां. खाते यांच्या वर्ष ९६-९७ च्या दरसूचीनुसार रु. १३,७१,०००/- चे अंदाजपत्रक तयारकरण्यात आले आहे. सदरील काम "डांबरी रस्ते" या शिर्षकातून करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. १६-०३-९८ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे. तसेच सर्वसाधारण सभेत दि. २७-०३-९८ मंजुरी मिळाली आहे. प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यात आले असता अंतिम तारखेपर्यंत एकूण तीन निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या व उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| १) | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | २२.०१% कमी दराने |
| २) | व्यंकटेश कन्स्ट्रक्शन | १९.९१% कमी दराने |
| ३) | मास्कॉट कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६% कमी दराची निविदा एलोरा कन्स्ट्रक्शन यांची आहे. करिता अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६% कमी दराची असलेली एलोरा कन्स्ट्रक्शन यांची निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. इंदिरानगर बायजीपुरा वॉर्ड क्र. २४ (उत्तर भाग) येथील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.०१% कमी मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१९/१७ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शांतीनाथ हौसिंग सोसायटी शहानुरवाडी येथे नाल्यामध्ये संरक्षित भिंत बांधणे बाबत परिसर अभियांत्रिकी विभागाच्या सन १९९६-९७ च्या दरसूचीप्रमाणे अंदाजपत्रकीय रक्कम रु. ११,४३,०००/- ला विषय क्र. १६६/२ अन्वये पत्रामध्ये प्रसिध्दी देवून निविदा मागविण्यात आल्या असता एकुण सव्वीस (२६) कोऱ्या विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत विक्री झाल्या. स्विकारणेच्या अंतिम तारखेला एकूण १४ (चौदा) निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. बदरबिन सालम | अंदाजपत्रकीय दरोपक्षा ४४.९९% कमी दराने |
| २) | मे. बसरा कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरोपक्षा ४२.०५% कमी दराने |
| ३) | मे. निलरंग कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरोपक्षा ४२.००% कमी दराने |
| ४) | मे. ए. आर. कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरोपक्षा ४१.७८६% कमी दराने |
| ५) | मे. न्यु सुपर कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरोपक्षा ४१.४१% कमी दराने |
| ६) | श्री. कुलवंतसिंग | अंदाजपत्रकीय दरोपक्षा ४०.१०% कमी दराने |
| ७) | मे. न्यु स्टार कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरोपक्षा ३८.७८८% कमी दराने |
| ८) | श्री. आर. एस. भाटीया | अंदाजपत्रकीय दरोपक्षा ३८.४०% कमी दराने |
| ९) | मे. हयात कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरोपक्षा ३७.६६% कमी दराने |
| १०) | मे. यातील कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरोपक्षा - ३२.९९९% कमी दराने |
| ११) | श्री. जी. आर. कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरोपक्षा ३२.९९% कमी दराने |
| १२) | मे. मे कम्पर्ट कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरोपक्षा ३२.०५% कमी दराने |
| १३) | श्री. पी. जी. पवार | अंदाजपत्रकीय दरोपक्षा ३१.९९% कमी दराने |
| १४) | मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरोपक्षा १७.८६% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा श्री. बदरबिन सालम यांची म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४४.९९% कमी दराची निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शांतीनाथ हौसिंग सोसायटी शहानुरवाडी येथे नाल्यामध्ये संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४४.९९% कमी श्री. बदरबिन सालम यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२०/१८ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व. ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रबुध्दनगर येथे १०० व १५० मी.मी. व्यासाची जलवाहीनी टाकावयाची आहे. त्यासाठी अंदाजपत्रक रक्कम रु. ३,८६,०००/- एवढ्याचे तयार करण्यात येवून त्यास स्थायी समितीचा ठराव क्र. ५३१/४० अन्वये मंजुरी घेण्यात आली आहे. कार्यालयाची निविदा सूचना क्र. २२/१८ जी की, दैनिक वर्तमानपत्राक प्रसिध्दीस देण्यांत येवून बी-१ निविदा मागविण्यात आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण १८ कोऱ्या निविदा विक्री झाल्या. व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस एकूण ६ (सहा) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. एस. चंद्रपाल | ३७.०१% कमी |
| २) | श्री. विपुल कन्स्ट्रक्शन | ३४.०१% कमी |
| ३) | श्री. सुरेश साधवानी | ३१.५२% कमी |
| ४) | श्री. स. अथर अली | २९.२१% कमी |
| ५) | श्री. एस. एस. काथार | ३३.९५९% कमी |
| ६) | श्री. शेख मसूद | ३१.०५% कमी |

वरीलप्रमाणेच्या तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दर हा री. एस. चंद्रपाल यांचा ाहे. म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३७.०१% कमी असा दर दिलेला आहे.

तरी श्री. एस. चंद्रपाल यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३७.०१% कमी दराची निविदा स्विकृतीस्तव व विचारार्थ प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रबुध्दनगर येथे १०० व १५० मी.मी. व्यासाची जलवाहीनी टाकणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३७.०१% कमी दराची श्री. एस. चंद्रपाल यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२१/१९ :**

शहर व सिडको भागातील जनतेस पाणी पुरवठा करण्यासाठी दोन नविन टँकर खरेदी करणे आहे. टाटा १६१३ चेसीजवर १०,००० लिटर क्षेमतेचे टँकर बनवून किर्लोस्कर इंजिन व पाईपस बसविण्याच्या कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण चार निविदा विक्री झाल्या व तीन प्राप्त झाल्यात आलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | एजन्सी | दर प्रति टँकर |
|---|---|---|
| १) | मे. बसरा कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद | २,३५,०००/- |
| २) | मे. न्यु साधन इंजिनिअरींग वर्क्स, औरंगाबाद | २,२०,०००/- |
| ३) | मे. एस. के. मसूद कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद | २,१५,०००/- |

तुलनात्मकदृष्ट्या मे. एस. के. मसूद कन्स्ट्रक्शन यांचे दर सर्वात कमी म्हणजेच २,१५,०००/- प्रती टँकर (टाकी) असे आहे. हे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा रु. १५,०००/- ने जास्त आहे. दर कमी करण्यासाठी त्यांच्याशी वाटाघाटी झाल्या. मे. एस. के. मसूद कॉन्ट्रक्टर यांना रु. २.०० लाख प्रती टाकी प्रमाणे काम करण्यास संमती दर्शविली आहे. दोन टाकी करीता रु. ४,००,०००/- खर्च येतो. तरी मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहर व सिडको भागातील जनतेस पाणी पुरवठा करण्यासाठी दोन नविन टँकर खरेदी करणे आहे. टाटा १६१३ चेसीजवर १०,००० लिटर क्षेमतेचे टँकर बनवून किर्लोस्कर इंजिन व पाईपस बसविण्याच्या कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता मे. एस. के. मसूद कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांनी दिलेले दर जास्त वाटत असल्याने त्यांच्याशी झालेल्या वाटाघाटीनुसार मे. एस. के. मसूद कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांनी रु. २.०० लाख प्रती टँकर प्रमाणे काम करण्यास संमती दर्शविल्याने मे.

एस. के. मसूद कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांचेशी वाटाघाटीनुसार ठरलेल्या म्हणजे प्रति टँकर रु. २.०० लाख दर स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२२/२० :**

मुख्यलेखाधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिका कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांना घर बांधणी तथा घर खरेदीसाठी महानगरपालिकेतर्फे रु. ७५,०००/- हजार पर्यंत कर्ज मंजूर करण्यात येते. तथापी श्री. विजय जावरे प्रकल्प संचालक महानगरपालिका औरंगाबाद यांनी रु. ७५,०००/- हजारऐवजी र. रु. ४ लक्ष कर्ज देणे बाबत विनंती केली आहे. श्री. जावरे हे वर्ग एक अधिकारी असून त्यांचे मासिक वेतन १० हजार असून खर्चाचे नॉर्मस नुसार ते ६० टक्के पर्यंत वेतनातून कपात करून शकतात. त्यांना विशेष बाब म्हणून २.५० लक्ष कर्ज मंजूर केल्यास कर्ज परत फेडीचा मासिक हप्ता २६३७/- येतो व मुळे कपात व कर्ज हप्ता मिळून त्यांची एकूण कपात रु. ५४५९/- होते त्यामुळे खर्चाचे प्रमाणाचे नॉमर्स नुसार ते पगारातून कर्जाची पतर फेड करू शकतात.

करिता विशेष बाब म्हणून त्यांना रु. २.५० ला घर बांधणी कर्ज मंजूर कणेस्तव प्रस्ताव विचारास्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपा कर्मचाऱ्यांना रु. ७५,०००/- पर्यंत घर बांधी कर्ज मंजूर करण्याची मर्यादा असली तरी श्री. व्ही. व्ही जावरे, प्रकल्प संचालक यांचा मासिक पगार आणि खर्चाचे नॉर्मसनुसार कर्जाचीी रक्कम परत करणे शक्य असल्यामुळे प्रकल्प संचालक श्री. व्ही.व्ही जावरे यांना घर बांधणीसाठी रक्कम रु. २,५०,०००/- कर्ज विशेष बाब म्हणून मंजूर करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२३/२१ :**

मालमत्ता यांनी मा. आयुक्त यांच्या मंजुरीनुसार प्रस्ताव सादर केला आहे की, मोहल्ला शहागंज येथील शॉपिंग सेंटर मधील जुनी मुत्रीच्या आजुबाजूस दुकानगाळे आहेत तसेच त्याच शॉपिंग सेंटरमध्ये नविन सुलभ शौचालय कार्यान्वित झाले असल्याने जुनी मुत्रीची जागा रिकामी करून तेथे दुकानासाठी जाहिर लिलावाने जागा देणे बाबत कार्यवाही करण्यांत येईल. तसेच प्रकरणांत सदर जागी दुकान बांधून प्रस्तावित धोरणानुसार रु. ४०००/- प्रति. चौ. मी. अनामत रक्कम घेऊन भाडे दर आधारे जाहिर लिलावाने देण्यात यावे ह्यासाठी किमान भाडे रु. ३६/- प्रति चौ. मी. प्रतिमहा अशी आकारणी भाडे समितीने केलेली आहे.

सबब प्रकरण मा. स्थायी समिती समोर विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. विकास जैन :** गांधीनगर येथील अर्जदार बलबिरसिंग व शेख च्यारुख यांनी या जागेची मागणी केलेली आहे. तसे अर्जही दिलेले आहेत. मुत्री तोडून स्वखर्चाने बांधण्यास तयारआहे. महानगरपालिकेने त्यांना देण्याबाबत विचार करावा.

**श्री. गांगावे बन्सी :** अर्जदार स्वतः बांधून येणार आहेत. त्यामुळे त्यांना देण्यास हरकत नाही.

**मा. सभापती :** जर भाडेपट्ट्याची रक्कम देत असेल तर विचार करण्यात यावा. अर्जदाराने महापालिकेच्या नियमाप्रमाणे शुल्क भरणे आवश्यक राहील.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहागंज शॉपिंग सेंटर येथे नविन सुलभ शौचालय कार्यान्वित झाल्याने शहागंज शॉपिंग सेंटर येथील जुन्या मुत्रीची जागा रिकामी करून रु. ४०००/- प्रति चौ. मी. अनामत रक्कम आणि रु. ३६/- प्रति चौ. मी. भाडे याप्रमाणे भाडे समितीने प्रस्तावित केलेल्या धोरणानुसार दुकानासाठी जाहिर लिलावाने देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच गांधीनगर येथील अर्जदार मनपाने आकारलेले शुल्क भरत असतील तर त्याचा विचार करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२४/२२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद इदगाह येथे चबुतरा विकास करणे बाबत च्या कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात येऊन त्यास सर्वसाधारण सभेची दि. २७-०३-९८ रोजी ठराव क्र. १९१/१४ अन्वये मान्यता देण्यात येऊन स्थायी समितीची दि. २६-०६-९८ रोजी च्या सभेत ठराव क्र. ८८/४६ अन्यवये मान्यता घेण्यात येऊन सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना प्रसिध्द करून बी-१ नमुन्यात निविदा विक्री दि. ३०-०७-९८ पर्यंत सहा विकले गेले व दर भरून सिलबंद पाकीटाता स्विकृतीची अंतीम दि. १२-०८-९८ पर्यंत तीन निविदा प्राप्त झाले त्या उपस्थित गुत्तेदारासमक्ष दि. १८-०८-९८ रोजी उघडण्यात आले असता निविदेच्या दराची तुलना खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | एजन्सी | दर प्रति टॅंकर |
|---|---|---|
| १) | एलोरा कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०२% कमी या दराने दर |
| २) | कुलवंतसिंग | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.०३% जास्त दराचे दर |
| ३) | फरफेक्ट कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराचे दर |

या अनुषंगाने प्राप्त निविदेत तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच गुत्तेदार श्री. एलोरा कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०२% कमी दराचे दर प्राप्त आहे. त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यात आली आहे.

सबब वरीलप्रमाणे प्रस्ताव स्थायी समितीन समोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. स. अली मिरा सलामी :** जेथे अंदाजपत्रकापेक्षा जास्त दर येतात तेथे ३ टेंडर येतात काही ठेकेदारा हे ४५ टक्के कमी दराने कामे करून देण्यास तयार असतात. परंतु कामाची प्रत ही चांगली दिसून येत नाही. यासाठी संबंधित ठेकेदार यांच्या कार्यवाहीसाठी एक कमिटी नेमावी. मंजुरीस विरोध नाही. परंतु कमी दराने काम करतांना कामाचा दर्जा मिळणे आवश्यक आहे.

**श्री. संजय जोशी :** ५% ने बिलोने हा प्रस्ताव मंजूर करून यासाठी एक कमिटी नेमण्यात यावी.

**श्री. स. अली मिरा सलामी :** जी बिलो आलेली आहेत त्याचे काय करणार? बैठकीत कामाची मंजुरी घेतल्यानंतर कामात वाढ होते.

**मा. सभापती :** मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद इदगाह येथे चबुतरा करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ०.०२% दराच्या मे एलोरा कन्स्ट्रक्शन यांच्या निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

# ऐनवेळचे विषय

**विषय क्र. २२५/१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शहाबाजार स्मशानभूमी येथे संरक्षित भिंत बांधणे बाबतचे कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. ६,२७,१००/- स्थायी समितीचे दि.२६-०६-९८ रोजीचे सभेत ठराव क्र. ४७/५ अन्वये मान्यता घेण्यात येऊन कार्यालयीन निविदा सूचना जा.क्र.मनपा/लेखा/नि.३७/९८ दि. २२-०७-९८ अन्वये प्रसिध्दी करून ब-१ नमुन्यात निविदा मागवले असता कोरे निविदा विक्री दि. ३०-०७९८ सोळा निविदा विकल्या गेल्या व दर भरून स्विकृतीची अंतिम दि. १२-०८-९८ पर्यंत तीन निविदा प्राप्त झालेने त्या उपस्थित गुत्तेदारासमक्ष दि. १८-०८-९८ रोजी उघडण्यात आले असता. प्राप्त निविदेच्या तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | एजन्सी | दर प्रति टँकर |
|---|---|---|
| १) | श्री. मन्नाव खान | अंदाजपत्रकीय दराचे दर |
| २) | श्री. शेख शरीफ | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% जास्त दराचे दर |
| ३) | श्री. एस. एम. मंडोरे | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराचे दर |

त्या अनुषंगाने प्राप्त दरात तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच गुत्तेदार श्री. मन्नाव खान यांचे अंदाजपत्रकीय दराने निविदा प्राप्त झालेली असून त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यात आली आहे.

सबब सदर काम हे श्री. मन्नाव खान यांचे निविदेतील अंदाजपत्रकीय दराप्रमाणे करून घेणे बाबतचा प्रस्ताव स्थायी समिती समोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहाबाजार स्मशानभूमी येथे संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दराच्या श्री. मन्नान खान यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२६/२ :**

सहाय्यक संचालक नगररचना यांचेकडून प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मौ. जाफरगेट येथील स.न. ३५ न.भु. क्र. १२९४२/पै. ची कृषी उत्पन्न बाजार समिती यांचे मालकी हक्कता असलेल्या जमीनीचे रेखांकनातील भूखंड महानगरपालिकेच्या विभाग क्र. ३ चे विभागजनानंतर विभाजीन नविन विभाग क्र. ८ च्या कार्यालयाकरिता खरेदी करण्याचे महानगरपालिकेने ठरविलेले आहे. सदर भूखंड खरेदी करण्यास्तव खाजगी वाटाघाटीने समितीने पदाधिकारीशी चर्चा करून दर रु. ९०/- प्रति चौ. फुट निश्चित केला त्या कार्यवाहीस्तव स्थायी समितीच्या दि. ०४-०३-९७ च्या सभेत ठराव क्र. ६९९/६ ने मान्यता देण्यात आलेली आहे.

नंतर प्रत्यक्ष मोजमापे घेवून क्षेत्रनिश्चिती करता ह्या भूखंडाचे उपलब्ध क्षेत्र ७९१४.० चौ. फुट एवढे असून त्याकरिता निश्चिती दर रु. ९०/- प्रति. चौ. प्रमाणे एकूण रक्कम रु. ७,१२,२६०/- एवढी होते. करिता भूखंडाची किंमत रक्कम रुपये ७,१२,२६०/- व सदर भूखंड खरेदीचा खर्च पूर्णपणे महानगरपालिकेने करावयाचा असून त्याकरिता खर्च रुपये ६४,२००/- होणार असून त्या खर्चासह एकत्रित रक्कम रुपये ७,७६,४६०/- चे मान्यतेसाठी प्रस्ताव

सादर. प्रस्ताव मान्यतेनंतर सदरील भूखंडाचे नोंदणीकृत रितसर हस्तांतर करून घेण्यात येईल. ह्या खरेदीखता लागणारा खर्च वर नमूद केल्याप्रमाणे रु. ६४,२००/- श्री. खन्ना एस.पी. शाखा अभियंता यांना अग्रीम म्हणून देण्यांत यावा. प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या विभाग क्र. ३ विभागजनानंतर विभाजीत नविन विभाग क्र. ८ च्या कार्यालयाकरिता खरेदी करण्यात येणारा जाफरगेट येथील स. नं. ३५ न.भु. क्र. १२९४२/- पै. ची कृषी उत्पन्न बाजार समिती यांचे मालकी हक्कतील भूखंडाचे उपलब्ध क्षेत्र ७९१४.० चौ. फुट निश्चित दर रु. ९०/- प्रति चौ. फुट प्रमाणे खरीदी करण्यास तसेच मोबदला रक्कम रु. ७,१२,२६०/- संबंधितास अदा करण्यास आणि खरेदीखत करिता लागणारा खर्च रु. ६४,२००/- श्री. एस. पी. खन्ना, शाखा अभियंता यांना अग्रीम देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२७/३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शहरातील विविध ठिकाणी रोडवर लावण्यात येणाऱ्या झांडाच्या संरक्षण व संवर्धनकरिता ट्रि गार्ड पुरवठा करिता जा. क्र. मनपा/लेखा/नि/३९/९८ दि. २८-०७-९८ अन्वये दै. वर्तमानपत्र अजिंठा, सकाळ, औरंगाबाद टाईम्स, लोकधर्म या वर्तमानपत्रात प्रसिध्दी देऊन निविदा मागविण्यात आल्या कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण १३ (१३) निविदा फॉर्म विक्री झाल्या. निविदा स्विकारण्याच्या तारखेपर्यंत एकूण ३ (तीन) निविदा फॉर्म दर भरून प्राप्त झाल्या. दि. १२-०८-९८ रोजी पुरवठा धारकासमोर उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | एजन्सी | दर प्रति टँकर |
|---|---|---|
| १) | मे. वर्षा मेटल वर्क्स | ३९७.०० प्र. नग. (६.१५) कमी दराने |
| २) | मे. एम.एस.एस.आय.डी.सी. | ३९८.०० प्र. नग. (६.१२) कमी दराने |
| ३) | मे. सोहेल सिद्दिकी | ४०७.१९ प्र. नग. |

वरीलपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा मे. वर्षा मेटल वर्क्स यांची आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातील विविध ठिकाणी रोडवर लावण्यात येणाऱ्या झांडाच्या संरक्षण व संवर्धनकरिता आवश्यक असलेल्या ट्रि गार्ड पुरवठा करण्याकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच प्रति नग रु. ३९७.०० या दराच्या मे. वर्षा मेटल वर्क्स यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२८/४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पदमपुरा येथील फायर ब्रिग्रेडच्या पाठीमागील बाजूस असलेल्या खुल्या जागेत संरक्षित भिंत व तार कुंपन करणे बाबतचे अंदाजपत्रक र. रु. १,७५,५००/- चे सा. बां. विभागाचे सन ९७-९८ चे दरसूचीनुसार तयार करण्यात आले असून त्यास प्रशासकीय मान्यता घेणेत आली आहे. सदर काम हे विकास योजनाअंतर्गत भूखंडाचे संरक्षण या तरतूदीअंतर्गत प्रस्तावित आहे. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव स्थायी समितीसमोर विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पदमपुरा येथील फायर ब्रिग्रेडच्या पाठीमागील बाजूस असलेल्या खुल्या जागेत संरक्षित भिंत व तार कुंपन करणे बांधणेच्या कामासाठी र. रु. १,७५,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२९/५ :**

अति. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर दिला की, रेल्वेस्टेशन साधना लॉज जवळील शॉपिंग कॉम्लेक्सचे (व्यापार संकूल) चे विद्युतीकरण करण्याच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या विद्युत दरसूचीनुसार र. रु. २,५०,८६५=०० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च "व्यापारी संकुले व उर्वरित इमारती" या लेखाशिर्ष खाली करण्यात येईल.

तरी रक्कम रु. २,५०,८६५/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रेल्वेस्टेशन साधना लॉज जवळील शॉपिंग कॉम्लेक्सचे (व्यापार संकूल) चे विद्युतीकरण करण्याच्या कामाकरिता रक्कम रुपये २,५०,८६५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३०/६ :**

जयभवानीनगर येथे जलनि:सारण वाहिनी टाकण्यासाठी शासकीय अनुदानातून अंदाजपत्रक रक्कम रु. १२,८९,०००/- ला मंजुरी मिळाली होती. सदरील कामाचे गुत्तेदार मे. शिवा कन्स्ट्रक्शन यांचे दर २९.९९९% कमी दराने आहे.

सदरील काम २९.९९९% कमी दराने असल्यामुळे १२,८९,०००/- चे काम रक्कम रु. ९,०२,२१३/- मध्ये होणार आहे.

जयभवानीगनर अनाधिकृत वसाहत असून तेथील लोकसंख्या जवळ-जवळ १५ ते १८ हजारापर्यंत आहे. तेथील नागरिकांची २५% लोकवर्गणी भरण्याची कुवत नाही. सदरील काम हे शासकीय अनुदानातून आहे व सदर कामावर १२.८९ रु लक्ष खर्च करण्याची मंजुरी आहे. जर सदर कामावर एकूण रक्कम १८.४२ लक्ष खर्च केल्यास गुत्तेदाराचे दर २९.९९९% कमी दराप्रमाणे सदर कामावर मंजूर रक्कम १२.८९ लक्ष एवढीच खर्च होईल. म्हणजे वाढीव काम केल्यानंतरही मंजुर रक्कमेपेक्षा जास्त रक्कम खर्च होणार नाही. वरीलप्रमाणे प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ आणि मंजुरीसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जयभवानीनगर येथे शासकीय अनुदानातून जलनि:सारण वाहिनी टाकण्याच्या कामासाठी रुपये १२,८९,०००/- च्या कामासाठी २९.९९९% कमी दराची मे. शिवा कन्स्ट्रक्शन यांची निविदा असल्यामुळे सदर कामावर एकूण १८.८२ लक्ष खर्च केल्यास कमी दराच्या निविदेमुळे सदर कामावर मंजूर रक्कम रुपये १२.८९ लक्ष एवढीच रक्कम खर्च होणार असल्यामुळे सदर कामावर एकूण रक्कम रुपये १८.४२ लाख चा खर्च मंजूर निविदा दराप्रमाणे म्हणजेच २९.९९९% कमी या दराने करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३१/७ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. इंदिरानगर बायजीपुरा (उत्तर) स्लम भागात खडी रस्ते तयार करणे व खांडकी बसविणे कामाकरिता

सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांची दरसूची ९६-९७ अनुसार रक्कम रु. ५,२३,९००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून मा. आयुक्तांनी दि. १९-०६-९८ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली तसेच स्थायी समिती दि. २६-०६-९८ विषय क्र. ५४/४२ अन्वये मंजुरी मिळाल्यानंतर रितसर वृत्तपत्रात कार्यालयाचा निविदा सूचना क्र. मनपा/लेखा/नि/३७/९८ दि. २२-०७-९८ द्वारे निविदा मागविण्यात आल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण २० निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याच्या दिवशी ३ मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या निविदा दि. १८-०८-९८ रोजी उपस्थित ठेकेदारासमक्ष उघडण्यात आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | मे. शहा कन्स्ट्रक्शन | ०.१% कमी अं. प. दरापेक्षा |
| २) | मे. राजेंद्र वर्दे | ९% जास्त अंदाजपत्रकीय दरापेक्षा |
| ३) | मे. आकाश कन्स्ट्रक्शन | १०% जास्त अंदाजपत्रकीय दरापेक्षा |

तुलनात्मकदृष्ट्या उपलब्ध निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा म्हजणे ०.१% कमी अंदाजपत्रकीय दरापेक्षा मे. शहा कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे. मा. आयुक्तांना सादर करण्यात आली असता सदर ठेकेदारांनी दिलेले दर असमाधानकारक असल्यामुळे संबंधित ठेकेदारास वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले व वाटाघाटी ठेकेदारांनी काम अडच्णीचे कारण दाखविले असता अंतिम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१% ऐवजी १% कमी अं. प. दरापेक्षा मान्य करण्यात आल्या. करिता मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे इंदिरानगर बायजीपुरा (उत्तर) स्लम भागात खडी रस्ते तयार करणे व खांडकी बसविणेच्या प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराची निविदा असलेल्या निविदा धारकांबरोबर झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम मे. शहा कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्राकाच्या दरापेक्षा १.००% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३२/८ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. आंबेडकर नगर येथे दगडी गटार बांधणे करिता अंदाजपत्रक रक्कम रु. ३,८५,३३१/- सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांची दरसूची १९९६-९७ अनुसार तयार करण्यात आली असून मा. आयुक्तांनी दि. २३-०६-९८ रोजी मान्यता प्रदान केली आहे. तसेच स्थायी समिती विषय क्र. ८२/४० दि. २६-०६-९८ रोजी मान्यता मिळाल्यानंतर रितसर वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन निविदा मागविण्यात आल्या. निविदाची अंतिम दि. ३०-०७-९८ पर्यंत एकूण १९ कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याच्या दिवशी १२-०८-९८ रोजी फक्त ८ मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या त्या निविदा दि. १८-०८-९८ रोजी उपस्थित ठेकेदारासमक्ष उघडण्यात आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | मे. परफेक्ट कन्स्ट्रक्शन | अ.प. दरापेक्षा ३०.३३% कमी |
| २) | न्यु स्टार कन्स्ट्रक्शन | अ.प. दरापेक्षा २८.८६% कमी |
| ३) | एस. एन. शेख | अ.प. दरापेक्षा २८.८६% कमी |
| ४) | मन्नाव खान | अ.प. दरापेक्षा २६.९९% कमी |
| ५) | एस. एस. मंडोरे | अ.प. दरापेक्षा २६.१% कमी |

| | | |
|---|---|---|
| ६) | एस. ए. देशमुख | अ.प. दरापेक्षा २६.१% कमी |
| ७) | एस. एच. असोशिएट | अ.प. दरापेक्षा २१.३% कमी |
| ८) | अतुल कन्स्ट्रक्शन | अ.प. दरापेक्षा १९.३% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ३०.३३% कमी दराची निविदा मे. दराची निविदा म्हजणे ०.१% कमी अंदाजपत्रकीय दरापेक्षा मे. परफेक्ट कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे. करिता मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आंबेडकर नगर येथे दगडी गटार बांधणेच्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ३०.३३% कमी दराच्या मे. परफेक्ट कन्स्ट्रक्शन यांच्या निविदापत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३३/९ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मिलिंदनगर (नागसेननगर) स्लम भागातील सार्वजनिक शौचालयाचे आधुनिकरण व दुरुस्ती करणे करिता अंदाजपत्रक र. रु. ५,७५,८००/- सार्वजनिक बांधकाम विभाग यांची दरसूची (डि.एस.आर.) १९९७-९८ अनुसार तयार करण्यात आले असून मा. आयुक्तांनी दि. २५-०८-९८ रोजी मंजुरी प्रदान केली आहे. सदर काम अर्थसंकल्प ९८-९९ लेखाशिर्ष "सुलभ शौचालय" ठेवण्यात आलेली तरतूदीमधून खर्च करण्याचे प्रस्तावित आहे. करिता मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मिलिंदनगर (नागसेननगर) स्लम भागातील सार्वजनिक शौचालयाचे आधुनिकरण व दुरुस्ती करणेच्या कामासाठी रक्कम रुपये ५,७५,८००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३४/१० :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, बनेवाडी गांव येथे खडी रस्ते तयार करणे कामाकरिता अंदाजपत्रक रक्कम रुपये १,३९,२५०/- सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांची दरसूची ९७-९८ अनुसार तयार करण्यात आली असून मा. आयुक्तांना दि. ०७-०९-९८ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

सदर काम अर्थसंकल्प १९९८-९९ तरतूद लेखाशिर्ष १८ खेडी विकास मधून खर्च करण्याचे प्रस्तावित आहे. मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बनेवाडी गांव येथे खडी रस्ते तयार करणेच्या कामासाठी रक्कम रुपये १,३९,२५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३५/११ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मंथन कॉ. हौ. सो. न्यु. श्रेयनगर येथील मनपाच्या खुल्या जागेत उद्यान विकसित करणेसाठीचे अंदाजपत्रक सार्वजनिक

बांधकाम विभागाचे जिल्हा दरसूची सन ९७-९८ नुसार रु. ४,९९,००=०० तयार करण्यात आले असून सदर काम हे दहाव्या वित्त आयोगाकडून प्राप्त झालेल्या अनुदानातून ५०% व उर्वरित ५०% मनपा नवीन उद्याने या लेखाशिर्षातून प्रस्तावित करण्यात येऊन त्यास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

सबब वरीलप्रमाणे प्रस्ताव स्थायी समितीमसोर विचारार्थ व मान्यतेसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मंथन कॉ. हौ. सो. न्यु. श्रेयनगर येथील मनपाच्या खुल्या जागेत उद्यान विकसित करणेच्या कामासाठी रक्कम रुपये ४,९९,००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. सदर कामाचा खर्च दहाव्या वित्त आयोगाकडून प्राप्त झालेल्या अनुदानातून ५०% व उर्वरित ५०% मनपा नवीन उद्याने या लेखाशिर्षातून करण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३६/१२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, म्हाडा कॉलनी सर्व्हे क्र. ४५ येथील खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे बाबतचे अंदाजपत्रक रक्कम रुपये २,८८,६००=०० चे सार्वजनिक बांधकाम विभागाचे जिल्हा दरसूची सन ९७-९८ अनुसार तयार करण्यात आले असून त्यास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सदर काम हे विकास योजने अंतर्गत भूखंडाचे संरक्षण या तरतूदी अंतर्गत प्रस्तावित करण्यात आले आहे.

सबब वरीलप्रमाणे प्रस्ताव स्थायी समितीमसोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे म्हाडा कॉलनी सर्व्हे क्र. ४५ येथील खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता रक्कम रुपये २,८८,६००=०० च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३७/१३ :**

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा व जलनिःसारण) यांनी प्रस्ताव सदार केलेला आहे की, एन-७ सिडको येथे भूमिगत २० लाख लिटर क्षमतेचा जलकुंभ बांधणे (पंप व पंपहाऊस) या कामाकरिता निविदा मागविण्यात आली होती व निविदेच्या अंतिम मुदतीपर्यंत दोन निविदा प्राप्त झाल्या, त्यांचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | खर्डीकरण कन्स्ट्रक्शन | रुपये ७३,०६,०००/- |
| २) | मे. गर्गे कन्स्ट्रक्शन | रुपये ७४,००,०००/- |

तुलना केली असता, यापैकी खर्डीकर कन्स्ट्रक्शन यांची निविदा कमी दराची म्हणजे रु. ७३,०६,०००/- एवढ्या रक्कमेची आहे.

या कामाने मुळे अंदाजपत्रक, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण दरपत्रक ९६-९७ प्रमाणे तयार करण्यात आलेले असून त्याप्रमाणे अंदाजपत्रकीय खर्च रुपये ४३,७८,५१२/- एवढा आहे व १९९७-९८ च्या दरपत्रकाप्रमाणे सदर अंदाजपत्रक रु. ७७,७२,२४८/- चे होते व सन १९९७-९८ च्या दरपत्रकाशी तुलना करीता मे. खर्डीकर कन्स्ट्रक्शन यांचेदर ५.९९% कमी दराने आहे.

या कामाची, तांत्रिकदृष्ट्या जिवन प्राधिकरणाकडून तपासणी करण्यात आलेली आहे. काही बाबींमध्ये त्यांनी फेरबदल दर्शविलेले असून त्या फेरबदलासह मे. खर्डीकर कन्स्ट्रक्शन यांचा निविदा रुपये ७३,०६,०००/- ची आहे.

या कामाचा समावेश रु. ४.०० कोटी शासकीय अनुदानांतर्गत करण्यात आलेला आहे. व त्या करिता रु. ४०.०० लाख रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. तथापि, एस. एस. ई. बी. डी. पी. बसविणे, ट्रान्सफार्मर बसविणे इ. कामाकरिता आणखी २२ लाख अंदाजे खर्च येणार आहे.

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची मे. खर्डीकर कन्स्ट्रक्शन यांची रुपये ७३,०६,०००/- ची निविदा स्विकृतीचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर. तसेच शासकीय अनुदानांतर्गत अंजिठा क्रिडा संकुलाची रु. ५० लाख रु. तरतूद या कामाकरिता वळती करून घेण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एन-७ सिडको येथे भूमिगत २० लाख लिटर क्षमतेचा जलकुंभ बांधणे (पंप व पंपहाऊस) च्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची म्हणजेच रु. ७३,०६,०००/- ची मे. खर्डीकर कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच या कामासाठी शासकीय अनुदानांतर्गत अजिंठा क्रिडा संकलाची रु. ५० लाखाची तरतूद वळती करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३८/१४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, झोन क्र. ६ मधील विविध डांबरी रस्त्यांना डांबरी पॅचवर्क करण्याकरिता पॅचवर्क मटेरियलचा पुरवठा करणेच्या कामासाठी सन १९९७-९८ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डि.एस.आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रुपये ३,००,०००=०० चे तयार करण्यात आले असून सदरील खर्च १९९८-९९ च्या रस्ते दुरुस्ती पॅचवर्क (६०=०० लाख) मध्ये ठेवण्यात आलेल्या तरतूदीमधून करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे झोन क्र. ६ मधील विविध डांबरी रस्त्यांना डांबरी पॅचवर्क करण्याकरिता पॅचवर्क मटेरियलचा पुरवठा करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ३,००,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३९/१५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, झोन क्र. ४ मधील विविध डांबरी रस्त्यांना डांबरी पॅचवर्क करण्याकरिता पॅचवर्क मटेरियलचा पुरवठा करणेच्या कामासाठी सन १९९७-९८ या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डि.एस.आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रुपये ३,००,०००/- चे तयार करण्यात आले असून सदरील खर्च सन ९८-९९ च्या रस्ते दुरुस्ती पॅचवर्क (६०=०० लाख) मध्ये ठेवण्यात आलेल्या तरतूदीमधून करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे झोन क्र. ४ मधील विविध डांबरी रस्त्यांना डांबरी पॅचवर्क करण्याकरिता पॅचवर्क मटेरियल पुरवठा करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ३,००,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४०/१६ :**

सहाय्यक संचालक नगररचना महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. खोकडपुरा सादिया टॉकीजच्या मागील शॉपिंग सेंटरची मागील बाजुची कुंपन भिंत बांधताना श्रीमती, गौराबाई लालचंद मेघावाले ह्यांनी आक्षेप घेतला आहे की, त्यांच्या जागेतून सदर कुंपन भिंत जाते.

मा. शहर अभियंता यांचे अभिप्रायानुसार हरकतदाराचे जमीन न.भु.क्र. १३५२४/२ मधून जागा क्षेत्र ७८७.५० चौ. फुट (७३.१८ चौ. मी.) महानगरपालिकेसाठी घ्यावयाची आहे. ह्या क्षेत्राचा मोबदला मिळकत धारकाने मागीतला आहे. करिता खाजगी वाटाघाटीत सदर मिळकतीचा मोबदला रक्कम रु. १,२३,१६१/- (एक लाख तेवीस हजार एकशे एकसष्ट रुपये फक्त) निश्चित केला आहे.

तसेच सदर मिळकत ही खरेदीखत करून घ्यावी लागेल. त्यासाठी र.रु. ११,२००/- (अकरा हजार दोनशे) खर्च लागेल खरेदी खताचा खर्च महानगरपालिकेने निम्मा व मिळकत धारकाने निम्मा करावयाचा आहे.

करिता खरेदी खतासाठी लागणारी विक्री रक्कम रु. ५६००/- (पाच हजार सहाशे) ही मोबदला रक्कमेतून वळती करून घेण्यास मिळकत धारकाने मान्यता दिली आहे. उर्वथ्रत रक्कम रु. १,१७,५६१/- (रु. एक लाख सतरा हजार पाचशे एकसष्ट रु.) ही मिळकत धारक श्रीमती गौराबाई लालचंद मेघावाले ह्यांना देणे आहे.

करिता सदर रक्कम मिळकत धारकांना अदा करणेसाठी आणि नोंदणीकृत खरीदीखत करून घेणेसाठी अग्रीम म्हणून रु. ११,२००/- (अकरा हजार दोनशे) श्री. डी. डी. कालेले, शाखा अभियंता यांना देणेसाठी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सादिया टॉकीजच्या मागील शॉपिंग सेंटरची मागील बाजुची कुंपन भिंतीसाठी श्रीमती, गौराबाई मेघावाले यांच्या नगर भूमापन क्र. १३५२४/२ पैकी ७८७.५० चौ. फुटाचे क्षेत्र खाजगी वाटाघाटीत ठरल्यानुसार नोंदणीकृत खरेदी खतासाठी लागणारा निम्मा खर्च मिळकतधारकाने करावयाचा असल्याने सदर रक्कम म्हणजेच रु. ५,६००/- वजा जाता संबंधिताकडून नोंदणीकृत दस्ताऐवजाद्वारे खरेदी करण्यासाठी रु. १,१७,५६५/- श्रीमती गौराबाई मेघावाले यांना देण्यास आणि नोंदणीकृत खरेदीखत करून घेण्यासाठी शाखा अभियंता श्री. डी. डी. कालेले यांचे नांवे रु. ११,२००/- अग्रीम देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४१/१७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, आंबेडकर नगर येथील भगवान बुध्द यांचे पुतळ्यामागील जागेवर बालवाडीसाठी इमारत बांधणे या कामासाठी सां. बां. विभागाचे सन ९६-९७ चे जिल्हा दरसूचीनुसार र.रु. २,१७,९००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्या मा. आयुक्त महोदयांनी दि २८-०८-९८ अन्वये मान्यता दिली आहे. सदरील कामाचा खर्च हा ५% कुमकुवत घटकातील कल्याणकारी योजना या लेखाशिर्षात होणाऱ्या एकूण बचतीमधून सन ९८-९९ या आर्थिक वर्षात करण्यांत येईल. तरी सदरील कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. २,१७,९००/- चा प्रस्ताव मान्यतेस्वत विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आंबेडकर नगर येथील भगवान बुध्द यांचे पुतळ्यामागील जागेवर बालवाडीसाठी इमारत बांधणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. २,१७,९००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४२/१८ :**

मा. कार्यकारी अभियंता (पापु व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, शहानुरमियाँ दर्गा मागे जबिंदा ले-आऊट येथे २५० व ३०० मीमी व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेजलाईन टाकणेच्या कामासाठी सन १९९७-९८ च्या महाराष्ट्र जीवन प्राधीकरण खात्याच्या दरसूचीप्रमाणे रक्कम रु. ५,३७,२००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले सदरील कामाच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दि. १०-०९-९८ ला प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. सदरील कामाचा खर्च भांडवली कामे (जलनिःसारण विभाग) यालेखा शिर्षकातील २४० लाखातील तरतूदीमधून करण्यात येणार आहे.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ५,३७,२००/- चे अंदाजपत्रक मंजुरीबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहानुरमियाँ दर्गा मागे जबिंदा ले-आऊट येथे २५० व ३०० मीमी व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेजलाईन टाकणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेले र. रु. ५,३७,२००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *सभागृहातील ऐनवेळचे प्रस्ताव*

**विषय क्र. २४३/१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, हैद्राबाद मुक्तीसंग्राम समारोह बाबत मा. अप्पर जिल्हाधिकारी यांच्या समवेत झालेल्या चर्चेत मा. अप्पर जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, सदर हैद्राबाद मुक्ती संग्राम समारोहाचे प्रायोजकत्व महानगरपालिकेला मान्य असल्याबाबतचे संमतीपत्र देण्यात यावे. तसेच चित्ररथासाठी र. रु. ५०,०००/- (र. रु. पन्नास हजार फक्त) मा. अप्पर जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविण्यात यावेतृ चित्रस्थासाइी यापेक्षा कमी खर्च झाल्यास उर्वरित शिल्लक रक्कम मनपास परत करण्यात येईल.

तरी हैद्राबाद मुक्तीसंग्राम समारोहाचे प्रायोजकत्व महानगरपालिकेला मान्य असल्याचे संमतीपत्र देण्याचे तसेच चित्ररथासाठी र. रु. ५०,०००/- (रु. पन्नास हजार फक्त) मा. अप्पर जिल्हाधिकारी यांना देण्याचे मान्यतेस्तव प्रस्ताव मा. स्थायी समितीचे मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हैद्राबाद मुक्तीसंग्राम समारोहाचे प्रायोजकत्व मान्य असल्याबाबत औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे आवश्यक असलेले संमतीपत्र व चित्ररथासाठी रक्कम रु. ५०,०००/- (पन्नास हजार फक्त) मा. अप्पर जिल्हाधिकारी यांचेकडे देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४४/२ :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्तावित केले आहे की, शहरातून स्वच्छता व मलेरिया निर्मुलनासाठी दुर्गंधीनाशक व जंतुनाशक ए.एफ.एम. औषधी खरेदी करणे जरुरी असल्याने जाहिर निविदा मागविण्यात आल्या त्यानुसार तीन निविदा प्राप्त झाल्या असून त्या खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | सुरिद केमिकल्स, मुंबई | दर रु. १४०/- प्रति किलो |
| २) | अखिल केमिकल्स, मुंबई | दर रु. १६९/- प्रति किलो |
| ३) | योगी केमिकल्स, मुंबई | दर रु. १६५/- प्रति किलो |

तुलनात्मक तक्त्यानुसार कमी दराचे दरपत्रक मे. सुरिद केमिकल्स मुंबई (Surid Chemicals, Mumbai) यांचे दर मंजूर करण्यास शिफारस केली आहे त्यांचे बरोबर खरदीसाळी करार करणे व येणारा खर्च रु. १ लाख ४० हजार अंदाजपत्रकातील जंतु नाशके या सदराखाली करण्यांस व सुरिद केमिकल्स मुंबई यांचे कमी दर मंजूर करण्यास्तव प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. स. अली मिरा सलामी :** प्रस्तावात तीन प्राप्त निविदापैकी दोन मुंबई व एक ठाणे येथील आहे. औरंगाबादची नाही काय? कोणत्या वृत्तपत्रात या बाबत जाहिर प्रगटन दिलेले होते. त्यांची माहिती द्यावी.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** स्थानिक वृत्तपत्रात जाहिर प्रगटन दिलेले होते परंतु औरंगाबादची एकही निविदा प्राप्त झालेले नाही.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातून स्वच्छता व मलेरिया निर्मुलनासाठी आवश्यक असलेले दुर्गंधीयुक्त व जंतुनाशक ए. एफ. एम खरेदीसाठी तुलनात्मक तक्त्यानुसार प्रतिकिलो रु. १४०/- कमी दर असलेल्या दरात ५% कमी दर आकारून मे. सुरिद केमिकल्स मुंबई यांचेकडून औषधी खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४५/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, नेहरू बालोद्यान येथील छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालयात म्युरलसचे काम करणेच्या कामासाठी दि. ०९-१२-९७ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. ३४९/८ अन्वये मे. मडीलगेकर्स आर्ट स्टुडिओ यांचेकडून काम करून घेणेस्तव मंजुरी मिळालेली आहे.

दिनांक ०५-०८-९८ रोजी मा. बाबासाहेब पुरंदरे यांचे सोबत संग्रहालयाचे संचालक डॉ. शांतीलाल पुरवार मा. प्रदिपकुमार जैस्वाल, मा. आयुक्त व अतिरिक्त शहर अभियंता बरोबर प्रत्यक्ष संग्रहालयाची पाहणी केली असता पाहणीत मा. बाबासाहेब पुरंदरे यांनी काही दुरुस्त्या सुचविल्या.

सध्या संग्रहालयात एकूण पाच प्रसंग तयार करावयाचे काम चालू आहे. ज्या ठिकाणी प्रसंग तयारकरावयाचे आहे या दालनाच्या आतील बाजूने भिंतीत ज्या खाचा ठेवण्यात आलेल्या आहेत त्या प्रत्येक खाचेमध्ये शिवाजी महाराज जिवनावरील प्रसंग काचेच्या तंतु पासून तयार होणाऱ्या टणक पदार्थामध्ये भिंतीवर तयार करावयाचे आहे.

सध्या चालू असलेल्या प्रत्येक प्रसंगात आकार हा ८' x १०' असा आहे. प्रसंग ठेवल्यानंतर भिंतीच्या खाचेमध्ये प्रसंगाच्या बाजूने प्रत्येकी २ १/४, व १/२, अंतर शिल्लक राहात असल्यामुळे रेखाटलेले प्रसंग आकर्षक वाटत नाही व त्यात पाहिजे तसा ठरावदारापणा दिसत नसल्यामुळे सदरील प्रसंग आकर्षक व उठावदारपणे दिसावा असे प्रत्यक्ष पाहणी अंती ठरले.

त्यानुसार सदरील काम करणेसाठी आकृतीची परिमाणे १२ १/२' x १० १/२ = १३१=२५ इतकी होत असून पाच प्रसंगाचे कामासाठी सुधारित क्षेत्रफळ ६५६.२५ चौरस फुट होत आहे. त्यानुसार ठेकेदाराने दिलेले दर म्हणजे ६५६.२५x १४००/- ९१८७५०/- इतकी वाढीव रक्कम लगत आहे.

त्याचप्रमाणे स्वागत कक्षाच्या पाठीमागील बाजूस उपलब्ध भिंतीवर दोन्ही बाजुने स्वतंत्र प्रसंग पूर्वीच्या पाच प्रसंगा व्यतिरिक्त तयार करावयाचे असून ते प्रसंग खालीलप्रमाणे आहे.

१) शिवराज्याभिषेक व २) अग्रयाचा दरबार

या दोन्ही प्रसंगाकरिता २०'x१०' प्रत्येकी जागा उपलब्ध असून त्यांचे क्षेत्रफळ २'x२०'x१०' = ४०० चौ. फुट होत आहे व या नविन कामाकरिता जुन्या दरानेच म्हणजे रक्कम रु. १४००/- प्रति चौरस फुटाप्रमाणे काम करावयाचे झाल्यास रक्कम रु. ५,६०,७५०/- होत आहे त्यामुळे जुन्या पाच प्रसंगाच्या आकृत्यामध्ये वाढ करण्याकरिता रक्कम रु. ३,५८,७५०/- होत आहे. त्यामुळे जुन्या पाच प्रसंगाच्या परिमानात वाढ करणे व नविन दोन प्रसंग तयार करण्याकरिता रक्कम रु. ३,५८,७५०/- + ५,६०,०००/- = ९,१८,७५०/- इतकी वाढीव रक्कम लागत आहे. अशा प्रकारे मुळकामाची मंजुर रक्कमेसह म्हणजे रक्कम रु. ५,६०,०००/- मिळून एकूण सुधारित अंदाजपत्रक रक्कम रु. १४,७८,७५०/- होत आहे.

करिता तयार करण्यात आलेले सुधारित अंदाजपत्रकास वाढीव कामासाठी लागणारी रक्कम रु. ९,१८,७५०/- ला मंजुरी मिळणेस्तव व सदरील काम हे पूर्वीचेच ठेकेदार मे. मडी लगेकर्स आर्ट स्टुडियो यांचेकडून पूर्वीच्याच दराने म्हणजे रु. १४००/- प्रती चौरस फुटानुसार काम करून घेणेसाठी प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाण छत्रपती शिवाजी महाराज वस्तु संग्राहलयाच्या दिनांक ०५-०८-९८ रोजी म्युरलसचे कामाबाबत केलेल्या पाहणीत सुचविण्यात आलेल्या दुरुस्तीप्रमाणे ज्या ठिकाणी शिवाजी महाराजांच्या जीवनावरील प्रसंग काचेच्या तंतु पासून तयार करावयाचे आहे. त्या प्रसंगामध्ये आकर्षक व उठावदारपणा दिसावा या दृष्टीने पूर्वीच्या आकार मानात बदल होऊन १२ १/२' x १०१/२ = १३१.२५ चौ. फुट इतके आकृतीचे परिमाण होत असून ५ प्रसंगाचे कामासाठी सुधारित क्षेत्रफळ ६५६.२५ चौ. फुट होत असल्याने ठेकेदाराच्या मंजूर दराप्रमाणे म्हणजेच प्र. चौ. फुट रु. १४०० या दराने रुपये ३.५८. ७५०/- आणि स्वागत कक्षाच्या पाठीमागील बाजूस उपलब्ध असलेल्या भिंतीवर दोन्ही बाजुने एक शिवराज्याभिषेक व (२) आग्रमाचा दरबा ार असे दोन प्रसंग पूर्वीच्या ५ प्रसंगा व्यतिरिक्त तयार करावयाचे असल्याने २'x२०x१०'=४०० चौ. फुट च्या नवीन कामाकरिता प्र. चौ. फुट १४०० रु. प्रमाणे रु. ५,६०,०००/- असे (रु. ३,५८,७५०/-+५,६०,०००/-) एकूण रक्कम रु. ९,१८,७५०/- च्या सुधारित अंदाजपत्रकास व सदरील काम पूर्वीचेच ठेकेदार मे. मडली मेकर्स आर्ट स्टुडिओ यांचेकडून पूर्वीच्याच दराने म्हणजेच प्र. चौ. फुट १४०० या दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४६/४ :**

उपआयुक्त प्रशासन यांनी प्रस्ताव सादर केला की, पोलिस संचालक ॲन्टी करप्शन ब्युरो, यांनी श्री. महेंद्र खैरनार मुख्य लेखाधिकारी महानगरपालिका औरंगाबाद यांचे विरुध्द न्यायालयात दोषारोप पत्र सादर करणे करिता, स्थायी समितीची परवानगी मागितलेली आहे.करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री. महेंद्र खैरनार मुख्य लेखाधिकारी महानगरपालिका औरंगाबाद यांचे विरुध्द न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यास पोलिस संचालक ॲन्टी करप्शन ब्युरो औरंगाबाद यांना परवानगी देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगर सचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
मा. सभापती,
स्थायी समिती,
महानगरपालिका, औरंगाबाद

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.*

**दिनांक ०९-१०-९८ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. मा. सभापती श्री. जयवंत ओक, यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा महानगरपालिका औरंगाबाद येथील "मलिक अंबर" स्थायी समिती सभागृहात दि. ०९-१०-९८ रोजी संपन्न झाली तिचे इतिवृत्त. सभेची सुरुवात "वंदे मातरम्" या गिताने अंदाजे दुपारी ४:३० वाजता झाली. सभेला खालीलप्रमाणे स.सदस्य व अधिकारी वर्ग उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स.स. श्री. प्रभाकर सिताराम विधाते | स. सदस्य |
| २) | स.स. श्री. अ. रऊफ म. अ. माबूद | -//- |
| ३) | स.स. श्री. स. अली मिरा सलामी | -//- |
| ४) | स.स. श्री. संजय जोशी | -//- |
| ५) | स.स. श्री. गौतम लांडगे | -//- |
| ६) | स.स. श्री. गांगवे बन्सी तुळशीराम | -//- |
| ७) | स.स. श्री. इंगळे रविंद्र बाबुराव | -//- |
| ८) | स.स. सौ. यशोदा धनंजय वाडेकर | -//- |
| ९) | स.स. श्री. जैन विकास रतनलाल | -//- |
| १०) | स.स. श्री. ढगे नरसिंग मुरलीधर | -//- |
| ११) | स.स. सौ. राधाबाई तळेकर | -//- |
| १२) | स.स. श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | -//- |
| १३) | स.स. श्री. बचाटे राजकुमार (मामा) | -//- |
| १४) | स.स. श्री. विखारोद्दिन पि. खुदबोद्दिन | -//- |
| १५) | स.स. श्री. स. अ. एकबालोद्दिन स. मो. कुतूबोद्दिन | -//- |

**संवाद :**

**श्री. स. अ. एकबालोद्दिन :** महानगरपालिका प्रशासनाकडे पत्र देऊनही माझ्या वॉर्डातील कुठलीही कामे होत नाही. नसता मी उपोषणाला बसणार आहे. (याचवेळी एक पत्र मा. सभापती यांना देतात.)

**श्री. संजय जोशी :** महापालिकेत उपअभियंता महणून कार्यालयीन सेवा केलेले श्री. शिंदे हे ३० तारखेला सेवानिवृत्त झाले. परंतु प्रशासनाने नियमाप्रमाणे त्यांना निवृत्त होणेच्या तारखेच्या अगोदर ३ महिने व नंतर ३ ते ४ दिवसांपूर्वीची सेवानिृत्त होण्याबाबतची नोटीस वगैरे काही दिलेले नाही. प्रशासनाचे याकडे लक्ष नाही काय? याची माहिती द्यावी. ते आजही कामावर होते.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**उपआयुक्त (प्र.):** श्री. शिंदे उपअभियंता यांना सेवानिवृत्तीबाबतची नोटीस प्रशासनामार्फत दिलेली आहे ते सेवानिवृत्तही गेल्या ३० तारखेला झालेले आहे. त्या नोटीस बाबत त्यांनी कोर्टातही आव्हान दिलेले होते.

**श्री. संजय जोशी :** सेवानिवृत्तीची नोटीस दिल्यानंतर व सेवानिवृत्ती झाल्यानंतरही ते सभागृहात कसे येऊन बसतात.

**मा. सभापती :** श्री. शिंदे साहेब आपणांस नोटीस मिळाली नाही काय? आपलया सेवानिवृत्ती निमित्त निरोप समारंभ झालेला आहे काय? (याचवेळी श्री. शिंदे सांगतात

की आजपर्यंत मला नोटीस मिळालेली नाही व कसलाही निरोप सभारंभ झालेला नाही.)

**प्रभाकर विधाते, श्री. विकास जैन, श्री. संजय जोशी :** श्री. शिंदे यांना सेवानिवृत्तीबाबतची नोटीस दिलेली असेल तर त्याबाबतचा पुरावा प्रशासनाने सभागृहात दाखवावा.

**श्री. गौतम लांडगे :** सेवानिवृत्त वय ५८ वर्षे राहावे. तयानुसार गेल्या ३० तारखेला त्यांचा सेवानिवृत्त निराप समारंभ ठेवलेला होता. त्याबाबतची पत्रिका मलाही मिहालेली होती हा निरोप संमारंभाच्या कार्यक्रम झाला नाही. ज्या विभागात काम करत होते तेथे ते कार्यरत आहे का? विचारणा करावी.

**कार्यकारी अभियंता :** श्री. पी. जी. पवार यांना श्री. शिंदे यांच्या जागेवर अतिरिक्त कार्यभार दिलेला आहे. श्री. शिंदे काम करत नव्हते. त्याना ३० तारखेलाच सेवानिवृत्त केलेले आहे.

**श्री. गौतम लांडगे :** श्री. शिंदे, उपअभियंता म्हणून त्यांनी १ ते ९ आजपर्यंत कार्यालयात येऊन हजेरी रजिष्टरवर सही केलेली आहे काय?

**श्री. संजय जोशी :** शहरात संत एकनाथ रंगमंदिर, अशा प्रकारचे रंगमंदिर मराठवाड्यात व आजुबाजुला कुठेही नाही. मागच्या वर्षी या रंगमंदिरात दुरुस्ती केलेली होती. लाखो रु. खर्च झाले. सागवाणी फळ्यांनी स्टेजचे काम केले होते. त्या सागवाणी फळ्या ठोकण्यात आल्या त्या ववस्थित नाही. वरतुन पाणी गळते व लाकूड फुगते. त्यामुळे सागवाणी फळ्या लावण्यात खुर्च्या दुरुस्त केल्या १० ते १५% चांगल्या आहेत. दुरुस्तीचे काम रेग्जीन चिटकावून दुरुस्त करण्यात आल्या आहेत. ज्या खुर्च्या दुरुस्त केल्या त्या व्यवस्थित नाही.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**अति. शहर अभियंता :** $१^{१/२}$ वर्षापूर्वी या ठिकाणी काही प्लोरींगचे, रंगरंगोटी व काही खुर्च्याची दुरुस्तीचे कामे केलेली आहे. त्यावेळी उपअभियंता श्री. खमर हे होते. यासाठी संपूर्ण खर्च हा ५ ते ६ लक्ष लागलेला आहे.

**मा. सभापती :** सदर कामावर खर्च झालेल्याची योग्य ती चौकशी करून माहिती द्यावी.

**श्री. संजय जोशी :** ज्या सागवानी फळ्या आहेत. त्या टेंटरमध्ये मागविल्या होत्या का? जेथून पाणी गळत होते. त्या जागेवर कधी दुरुस्ती केली का सविस्तर चौकशी करावी.

(२) काही वेळेला रंगमंदिर १५०-२०० रुपये प्रमाणे (अल्पदराने) भाड्याने दिले जाते. सदर ४ तासांनंतर लाईटचे बीलचे सुमारे रु. २०० येते तर भाड्याने देऊन उपयोग काय? सर्वसामान्यांना तसेच संस्था वगैरे यांना फुल चार्ज लावण्यात येतो हे कसे काय याची माहिती द्यावी.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**मालमत्ता अधिकारी :** मला या बाबत काही माहिती नाही. मी जेंव्हा पासून आहे. तेंव्हापासून असे काही प्रकार झालेला नाही रु. १४००/- प्रमाणे दर आकारण्यात येतोच.

**मा. सभापती :** अधिकाऱ्यांनी या बाबत मला माहित नाही असे उत्तरे देणे चुकीचे असून अधिकाऱ्यांना ज्या ज्या संदर्भाने आप-आपल्या कामाबाबतची माहिती त्यांना पाहिजे. संबंधित अधिकारी यांनी पुढच्या बैठकीत याबाबत सविस्तर माहिती द्यावी. तसेच स. सदस्य श्री. जोशी यांनी ही ज्या नागरिकांना १५० ते २००

रु. प्रमाणे भाडे आकारले असतील अशा व्यक्तींची नावासहीत पुरावा द्यावा. म्हणजे चौकशी करता येईल.

**रविंद्र इंगळे :** संत एकनाथ रंग मंदिर असे नाव देण्यात आले आहे. संत एकनाथाचे नाव या ठिकाणी आहेत. तर काही दिवसांपूर्वी या ठिकाणी जी नाटके झालेली आहे. अशा नाटाकांना परवानगी देण्यात येऊ नये.

**मा. सभापती :** मा. पोलिस आयुक्तांची ना हरकत प्रमाणपत्र मिळाल्यावरच परवानगी दिल्या जाते. हा मुद्दा येत्या सर्वसाधारण सभेमध्ये ठेवला तर योग्य दिशा मिळेल. सर्वसाधारण सभाच या बाबतचा निर्णय घेऊ शकेल.

**श्री. विखारोद्दिन :** महापालिकेच्या विद्युत विभागात किती गाड्या आहेत. शहरातील लाईट बाबत बऱ्याच तक्रारी आहेत. लाईटची एकही काम व्यवस्थित होत नाही. पैठणरोड जवळ काही ठिकाणी सोडीयम व्हेपरचे दिवे लावण्यात आलेले आहेत ते चालू होत नाही. व ज्या ठिकाणी आवश्यकता आहे. त्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांकडे विचारणा केली असता विद्युत साहित्य शिल्लक नाही असे सांगितल्या जाते. विद्युत साहित्य मागविल्यानंतर कुठे लावण्यात येते. त्याची विचारणा करावी.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**अति. शहर अभियंता** : विद्युत साहित्य आलेले आहे. लवकरच कार्यवाही करण्यात येईल.

**श्री. विखारोद्दिन** : विद्युत विभागाचे संबंधित अधिकारी हे वेळेवर कामे करीत नाही. ४-४ दिवसांत शहरातील काही ठिकाणी सोडीयम व्हेपरचे दिवे जळतात. काही ठिकाणी सोडीअम व्हेपरचे दिवे जळतात. काही ठिकाणी दिवे बसविण्यासाठी तक्रारी येतात तर २६ लक्ष रुपयाचे साहित्य मागविलेले आहेत. त्यात सदर साहित्य नाहीत काय? महिन्यापूर्वी १०० फिक्चर होते. अधिकारी म्हणतात ते कॉन्ट्रक्टरचे आहेत. ४ दिवसानंतर विचारणा केली तर ते सदर ठिकाणी दिसत नाही.

**श्री. म. अ. रऊफ** : माझ्या वॉर्डातही ४ दिवसात बल्ब चौक जळाले.

**श्री. स.अ. एकबालोद्दिन :** संबंधित अधिकारी यांना विचारणा केल्यानंतर असे सांगण्यात येते की, शहरात त्या त्या भागात व दसरा, गणपती या निमित्ताने तया ठिकाणी हे साहित्य लावावे लागते.

**श्री. गौतम लांडगे, श्री. विखारोद्दिन :** विद्यतु साहित्य हे कॉन्ट्रक्टरचे असते असे अधिकारी सांगतात साहित्य असतांना कामे करण्यास टाळाटाळ होते. महापालिका प्रशासनाने मागविलेले विद्युत साहित्य पुरवठा कुठे जातो. साहित्य कोणकोणत्या प्रभागात वापरले जाते. त्यासाठी एक रजिस्टरला नोंद असावी.

**श्री. गांगवे बन्सी** : संजयनगर भागात $२^{१/२}$ ते ३ वर्षापूर्वी पोल बसविले. पुढील लाईटची व्यवस्था करावी. म्हणून बऱ्याच वेळेस पत्र दिले पत्र द्यावे साहित्य खरेदी करून देवू असे सांगण्यात येते. समय भेट ही घेतली, दोन दिवसांपूर्वीच पत्र दिलेले आहे. त्यानुसार साहित्य मागवून देऊ असे अधिकारी सांगतात. ९० टक्के माझ्या वॉर्डात लाईटची व्यवस्था नाही. तसेच याच भागात डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजळव हि हीच परिस्थिती आहे. ४ सेट होते लाईट सद्या बंद आहेत व त्या ठिकाणी सध्या अंधार आहे. यास कोणास जबाबदार धरावे. पत्र देऊनही कार्यवाही का होत नाही.

**श्री. म. अ. रऊफ :** दिड १^१/२ वर्षापूर्वी एक पत्र दिले हाते. पानचक्की येथील लाईटबाबत सुधारणा स्वेच्छा निधीतून करण्यात याव्या. परंतु आजपर्यंत उत्तर मिळाले नाही.

**सौ. राधाबाई तळेकर :** माझ्या वॉर्डातील डिसेंबर ९६ ला २० पोल नविन बसविण्यात आले होते. त्यातील ११ ते १२ पोलवर वायर (तार) लावण्यात आली. ३ ते ४ पोलवर तर विद्युत पुरवठाच नाही. ८ ते ९ पोल नुसते उभे आहे. याबाबत श्री. बनसोडे श्री. देशमुख ह्या अधिकाऱ्यांना अनेक वेळा भेटुनही कार्यवाही होत नाही. आता किमान दिवळीपूर्वी तरी या ठिकाणी लाईटची व्यवस्था करावी.

**मा. सभापती :** स. सदस्य यांच्या वॉर्डात किती दिवसांत ३ सेट लावणार.

**उपअभियंता (विद्युत)** : स. सदस्य श्री. पांचाळ यांच्या वॉर्डामध्ये काम चालू आहे. त्यानंतर श्री. स. सदस्य गांगवे यांच्या वॉर्डामध्ये काम करावे लागेल.

**सौ. यशोदा वाडेकर :** माझ्या वॉर्डात ४ पोलवर अजुनही सप्लाय दिलेला नाही. संबंधित अधिकारी यांना वेळोवेळी सूचना केलेल्या आहेत. सोडीयमचे नवीन फिक्चर नाही अशा उत्तरे मिळतात.

**अति. शहर अभियंता** : शहरातील एम.एस.ई.बी. चे पोलवर लाईटची व्यवस्था नव्हती. त्या पोलवर विद्युत लाईटची व्यवस्था करण्यात आली. त्यामुळे विद्युत साहित्य (फिक्चर) कमी पडलेले आहे.

**श्री. गौतम लांडगे, श्री. गांगवे बन्सी :** ९५-९६ ला निवडणूक झाली त्या वेळेस जे १५०० पोल घेतलेले होते त्या पोलवर फिक्चर लावण्याबाबतचे इस्टिमेंट मंजूर केले. व त्या संबंधित पोलवर फिक्चर लावण्यात आलेले नाही. तेथील नागरिक हे स. सदस्यांना या बाबत तकादा करीत आहे असे किती पोल आहे याची विचारणा करावी. येणाऱ्या बैठकीपर्यंत लाईटची व्यवस्था करावी.

**श्री. म. अ. रऊफ, श्री. तुळशीबागवाले किशोर :** नवीन पोलवर फिक्चर बसविण्यात येते व जुन्या पोलवर नाही हे योग्य नाही. सदर विद्युत लाईटची कामे ठेकेदारांकडून करून घेतली जात असेल तर ती बंद करावी.

**श्री. विखारोद्दिन :** शहरात बऱ्याच ठिकाणी असे आढळून येते की, २५० पॉवरच्या विद्युत दिव्याला १२५ पॉ. चौक तर १२५ पॉवरच्या दिव्याला २५० पॉ. चौक बसवतात. त्यामुळे बल्ब बेकामी होतात व जी परिस्थिती आहे तीच राहते. सोडीअम दिव्याबाबत विचारणा करावी.

**मा. सभापती :** लाईट बाबतच्या समस्या सोडवण्यासाठी सर्व वॉर्डाचा सर्व्हे करून स. सदस्य श्री. गांगवे यांच्या वॉर्डातील लाइट बाबतची समस्या २ दिवसांत सोडवावी. ज्यावेळी कोणतीही विकास कामे करतांना संबंधित वॉर्डातील नगरसेवकांना कामाची कल्पना देऊन ते काम सुरू करावे व काम झाल्यावर स. सदस्यांनी सही घ्यावी विद्युत साहित्य नसेल तर संचिका मा. आयुक्तांच्या मंजुरीसाठी पाठवून २ दिवसांत कोणकोणत्या वॉर्डातील लाईटची कामे बाबी असतील ती व श्री. गांगवे यांच्या वॉर्डातील तसेच श्री. रऊफ यांच्या वॉर्डातील ३ सेट कनेक्शन, ७ पोलवर विद्युत पुरवठा होण्याबाबतची कार्यवाही करावी. विनाकारण स. सदस्यांना अधिकारी यांनी चुकीच्या मार्गाने बोलू नये.

**श्री. तुळशीबागवाले किशोर, सौ. राधाबाई तळेकर :** विद्युत विभागातील अधिकारी हे ठेकेदारांना गडी (लिफ्टर) वापरण्यासाठी देतात असे निदर्शनास आलेले आहे.

**मा. सभापती :** अधिकारी हे जर ठेकेदाराला नाड्या वापरण्यासाठी देत असतील तर कार्यवाही करण्यात येईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ उद्या विद्युत व्यवस्था करावी.

**अति. शहर अभियंता :** सोडीअम व्हेपरचे दिवे आहेत, श्रभ्. बनसोडे आल्यावर विचारणा करून माहिती देतो. साहित्य पुरेपुर उपलब्ध असेल तर लवकरच कार्यवाही करण्यात येईल.

**सहा. आयुक्त-१ :** श्री. शिंदे उप अभियंता यांना सेवानिवृत्तीची ३ महिण्यापूर्वी नोटीस १९-०८-९८ ला काढण्यात आलेली आहे. ते सेवानिवृत्तीची नोटीस दिनांक २८-०९-९८ रोजी ड्रेनेज दोन विभागात पाठविण्यात आलेली आहे. तशी विभागाची पोच घेण्यात आलेली आहे.

**मा. सभापती :** श्री. शिंदे यांना ३ महिण्याची नोटीस देण्यात आलेली आहे.

**श्री. संजय जोशी :** त्यांना नोटीस मिळाली नाही. सभागृहात कसे बसले.

**उपआयुक्त (प्र.):** श्री. शिंदे यांना महानगरपालिकेत चांगली सेवा केली. सर्व साधारण सभेने घेतलेल्या निर्णयानुसार ५८ वर्षानंतर सेवानिवृत्ती बाबतची नोटीस त्यांना देण्यात आलेली आहे. सदर नोटीसला श्री. शिंदे यांनी उच्च न्यायालयात आव्हान देखील केलेले आहे.

**मा. सभापती :** श्री. शिंदे यांचा सभागृहात मी आदर करतो. आणि त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सभागृह सोडावे (श्री. शिंदे यानंतर सभागृहाबाहेर जातात).

**श्री. नरसिंग ढगे :** गेल्या ६ महिण्यात मालमत्ता कर, पाणीपट्टी, वसुली खुपच कमी प्रमाणात झालेली आहे. किती टक्के झालेली आहे. याची माहिती द्यावी.

**श्री. गौतम लांडगे :** सभागृहात असा निर्णय झालेला होता की, दर महिण्यामध्ये मालमत्ता कर, पाणीपट्टी वसुली, बाबतची माहिती सभागृहात देण्यात येईल असे ठरले होते. याबाबता आतापर्यंत अधिकारी यांनी माहिती सादर केलेली नाही. का करण्यात आली नाही.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी हे या ठिकाणी आलेले नाहीत. स. सदस्य यांनी जो मुद्दा उपस्थित केला तो योग्य आहे.

**श्री. संजय जोशी, श्री. नरसिंग ढगे :** ४ महिने झाले तरी अधिकारी यांनी सभागृहात माहिती दिली नाही. आज अधिकारी नाही ठिक आहे. या अगोदर माहिती का पाठविली नाही. सभापतींनी आदेश देऊन ही त्यांचे पालन अधिकारी करत नाही. हा सभापतीचा अपमान आहे.

**श्री. विकास जैन :** संबंधित अधिकारी यांनी किती टक्के वसुली केली याबाबत माहिती देण्यात यावी.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी हे सभागृहात नाही. जे अगोदरचे मा. सभापती होते. त्यांनी हा प्रस्ताव मंजूर केलेला आहे. पुढच्या बैठकीला अधिकारी यांना विचारणा करून होणाऱ्या स्थायी समिती बैठकीत कर वसुली बाबतची माहिती विचारण्यात येईल.

**मुख्यलेखाधिकारी :** चालू आर्थिक वर्षात १५ कोटी रुपयांचे उद्दिष्ट होते. त्यात माहे सप्टेंबर पर्यंत २.५३ लक्ष म्हणजेच १८ टक्के वसुली झालेली आहे. पाणी पुरवठ्या

बाबतचे ७ कोटीचे उद्दिष्ट होते त्यात सप्टेंबर अखेर १.४२ कोटी म्हणजेच २० टक्के वसुली झालेली आहे.

**श्री. स. अली मिरा सलामी :** दर महिण्याला नियमाप्रमाणे ऑडीटची माहिती यावयास पाहिजे वसुली किती होते याबाबतचा अंदाज समजून येतो.

**श्री. गौतम लांडगे :** प्रशासनाने १५ कोटी रु. चे उद्दिष्ट ठेवलेले आहे. गेल्या ०१-०४-९८ पासून आजपर्यंत २.५३ लक्ष १८% झालेले आहे असे म्हणता तर आणखी सहा महिण्यात ५ कोटी रु. पण होणार नाही. यापूर्वीचा कर आकारणी वसुलीची ठरवलेली रक्कम ही जास्त होती.

**श्री. संजय जोशी :** झोनवाईज वसुली होते आहे. वसुली होणे अत्यंत आवश्यक आहे. ज्या झोन ऑफिसमधून प्रमाणकानुसार वसुली कमी झाल्यास संबंधित अधिकारी यांना जबाबदार धरावे. जे नागरिक १००% बेटरमेंट चार्जेस भरतात त्यांचे काम होत नाही. झोन कार्यालयाचे रिव्हयू घ्यावे.

**श्री. विकास जैन :** उपायुक्त (मह) हे किती वेळेस झोन ऑफिसला भेटी देतात.

**श्री. राजकुमार बचाटे, श्री. स. अली मिरा सलामी :** शहरातील नळ कनेक्शनच्या बाबतीत ही हा प्रकार आहे. कुठे १९५० रु. तर काही नागरिकांकडून २१०० रु. नळपट्टी वसुली केली जाते. दोन झोनमध्ये नळपट्टी आकारणी करतांना तफावत दिसून येते.

**मा. सभापती :** उपआयुक्त (प्र.) यांनी खुलासा करावा.

**उपआयुक्त (प्र.) :** मागच्याच आठवड्यात झोन ऑफिसर यांच्या समवेत एक बैठक झाली. जी वसुली व्हावयास पाहिजे ती झाली पाहिजे असे बैठकीत सांगण्यात आले आहे. त्या नागरिकांनी मालमत्ता कर, व पाणीपट्टीची रक्कम संबंधित झोन ऑफिसला अदा केली नाही तर त्या नागरिकांची तशी नावे वृत्तपत्रात देवून त्यांच्यावर कार्यवाही होईल व जी माहिती आजपर्यंत बैठकीत स. सदस्यांना मिळाली नाही ती येत्या स्थायी समिती सभेमध्ये पुरविण्यात येईल.

**कार्यकारी अभियंता :** ज्यांचे अनाधिकृत नळ कनेक्शन आहे. असे आढळून आल्यास त्या नागरिकांना ६०० रुपये दंड आकारला जातो व ७०० रुपये ॲडव्हान्स घेऊन असे एकूण १३०० रुपयामध्ये कायम नळ देण्याची कार्यवाही करण्यात येते. अशाच प्रकारचे अनाधिकृत नळ कनेक्शन हे जर २ ते ३ वर्षापासूनचे असेल तर पाणीपट्टी वसूल करतो त्यानुसार दंड आकारणी जास्तीची थकबाकी म्हणून आकारण्यास रक्कम वसुलीमध्ये तफावत होत असेल. विभागीय अधिकारी यांचेकडून माहिती घेवून पुढील बैठकीत देण्यात येईल.

**श्री. स. अली मिरा सलामी :** ज्या नागरिकांचे नळ कनेक्शन हे अनाधिकृत असेल तर त्यांना नोटीस दिल्यानंतरच संबंधित विभागाकडे नळ कनेक्शन घेण्यात तगादा लावतात. स्वतःहुन कुण्ी येत नाही. ज्याचे ५ ते ६ वर्षापासून असेल तर त्यांच्याकडून जास्त रक्कम आकारण्यास योग्य आहे. परंतु जे स्वतःहुन येत असेल तर त्यांना एक ठराविक रक्कम ठेवावी. झोन क्र. २ मध्ये २१०० रु. तर ४ मध्ये १९०० रुपये आकारणी केली जाते.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांना आतापर्यंत किती अनाधिकृत नळ कनेक्शनधारका निदर्शनास आलेले आहेत. १ ते ७ झोनपासून तपासणीस सुरुवात करावी. ज्यांची अनाधिकृत नळ कनेक्शन घेतलेले असेल त्यांना समाजावून सांगून नळपट्टी भरावयास सांगणे. पुढच्या बैठकीत सर्व माहिती सभगृहात द्यावी.

**श्री. बन्सी गांगवे :** मुकूंदवाडी अंतर्गत असणाऱ्या संजयनगर भागात झोन क्र. ५ ला साफसफाईसाठी फक्त १५ ते १६ लेबर कर्मचारी वर्ग आहे. शिवाजी कॉलनी, लघुवेतन कॉलनी, अंबिकानगर, बंजारा कॉलनी, आणखी इतर भागात मिळून एकूण जवळजवळ ६ कि.मी. ची गटार बांधण्यात आलेली आहे. त्या गटारी व इतर साफसफाई करण्यासाठी हे लेबर कर्मचारी कमी पडतात. तात्पुरते नेमलेले मजूर बंद केले. लेबर कर्मचारी संख्येत वाढ केली होती. त्यास मान्यता दिली नाही. पावसाळा व स्लममध्ये अत्यंत दुर्गंधी पसरलेली आहे. त्यामुळे या भागात नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता आहे. जालना रोडवर फोर्बेस कंपनीकडून नाला जातो या ठिकाणी अतिशय दुर्गंधी सुटते. या नाल्यास नेहमी घाण साचलेली असते. साफसफाई करण्यासाठी प्रशासनाने लेबर कर्मचारी वाढ करावी.

**श्री. स. अली मिरा सलामी, श्री. म. अ. रऊफ :** ताबडतोब साफसफाई करण्यासाठी आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचेकडील लेबर कर्मचारी पाठविण्यात यावे.

**मा. सभापती :** उपआयुक्त (प्र.) यांनी तात्काळ संबंधित अधिकारी यांना या बाबत कार्यवाही करण्याचे आदेश द्यावे. तसेच वैद्यकीय अधिकारी यांनी जाणीवपूर्वक अशा बाबींकडे लक्ष द्यावे.

**मा. उपआयुक्त (प्र.)** या संदर्भातील संचिका मा. आयुक्तांकडे गेलेली आहे. तरी पण सोमवारी लेबर कर्मचारी पाठवून तेथील साफसफाई करण्यात येईल.

**सौ. यशोदा वाडेकर :** भवानीनगर, संजयनगर भागात नाल्याचे बांधकाम केलेले आहे. बांधकाम केल्यानंतर दोन्ही बाजुला थोड्या फार प्रमाणात जागा सुटलेली आहे. ती दुसऱ्या कुण्या व्यक्तींने अतिक्रमण करण्यापेक्षा महापालिकेला या बाबतीत काय करता येईल याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.

**मा. सभापती :** जागा महापालिकेची असेल तर संबंधित अधिकारी यांनी त्या ठिकाणी तार कुंपन लावावे.

**सहा. संचालक नगररचना :** त्या ठिकाणी तपासणी करावी लागेल त्यानंतर कार्यवाही करता येईल.

**श्री. संजय जोशी :** असे समजले की, महापालिकेतील नियमित कामा घेणारे कॉन्ट्रक्टर यांनी नोटीस बोर्ड तोडले. कॉन्ट्रक्टर काम करत नाही. त्यांनी निविदा घेण्याचे बंद केलेले आहे. कॉन्ट्रक्टर काम करत नाही. तर प्रशासन निविदा काढणार नाही काय? मा. आयुक्तांनी स्वतःच्या अधिकार वापरून शहरातील विकास कामे करावयास पाहिजे. तसेच संबंधित कॉन्ट्रक्टर यांनी महापालिकेचे बोर्ड तोडूनही त्यांच्यावर प्रशासनाने कार्यवाही केली नाही.

**मुख्यलेखाधिकारी :** नोटीसबोर्ड उतरून घेण्यात आला. त्यातील नोटीसा काढून घेतल्या या संबंधात मा. आयुक्तांना लेखी रिपोर्ट केला त्यांनी मा. आयुक्तांची माफी मागितली. लोकांना टेंडर खरेदी करू दिले नाही. त्यामुळे तारखापुढे काढवण्यात आल्या आपली कार्यवाही चालू आहे. टेंडर खरेदीच्या तारखेला टेंडर खरेदी करू देत नाही.

**श्री. गौतम लांडगे :** सभागृहात तोडफोड झाली तर गुनहा दाखल करतात. नोटीस बोर्ड हा लटकता बोर्ड नाही. खिळे काढून काढण्यात आले टेंडरची विक्री पोलिस संरक्षणात करण्यात यावी.

**मा. सभापती :** ठेकेदारांनी नोटीस बोर्ड काढून नुकसान केले असेल तर त्यांच्यावर प्रशासनाने पोलिस केस करावी. प्रशासनाला दबावाखाली आणत असेल तर

त्यांची गुत्तेदारी बंद करून झालेल्या कामाबाबतची चौकशी करून कार्यवाही करावी.

**श्री. स. अली मिरा सलामी :** ठेकेदार संघटात्मक दृष्टीकोनातून योग्य कामे होत नाही. मागणीनुसार विचार करण्यात यावा शासनाच्या धोरणामुळे महापालिकेचे नुकसान होत आहे. तसेच महापालिका प्रशासनाने शासनास पत्राने कळवावे.

**श्री. म.अ. रऊफ :** उपलब्ध ठेकेदाराकडून काम करून घेण्यात यावे.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**उपआयुक्त (प्र.) :** कोणत्याही कामात अडचण निर्माण होणार नाही. झाल्यास कलम ६७/३ (क) चा वापर करण्यात येईल व विकास कामे बंद पडणार नाही.

**मा. सभापती :** दि. २८-०८-८९ च्या इतिवृत्तातील विषय १६५/१० व १७४/१९ स्थगित ठेवण्यात आले होते. त्यास मंजुरी देण्यात येते. (ठरावांची नोंद शेवटच्या पानावर आहे.)

**विषय क्र. २४७/१ :**

दिनांक १५-०९-९८ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री. राजकुमार बचाटे :** दि. १५-०९-९८ च्या इतिवृत्तातील पान क्र. १ वर "सतारवादक" ऐवजी "शहनाई वादक" तसेच "गोपाळरावजी" ऐवजी "प्रभाकरराव" अशी दुरुस्ती करण्यात यावी.

**श्री. विकास जैन :** इतिवृत्तातील विषय क्र. २१३/११ स्थगित ठेवण्यात आलेला होता. त्यास मंजुरी देण्यात यावी.

**मा. सभापती :** मंजुरी देण्यात येते.

**श्री. गौतम लांडगे :** इतिवृत्तातील पान क्र. १ व २ वर शहरातील होणारे अतिक्रमण व अनाधिकृत बांधकामे यास प्रतिबंध घालण्यासाठी प्रशासनाचे कार्यपध्दती कशी असावी या संदर्भाने शासनाचे सचिव श्री. नलिनाक्षन यांनी दिलेल्या पत्रानुसार सभागृहात चर्चा झालेली होती. अतिक्रमण होऊ पाहणाऱ्या अधिकारी यांनी किती लोकांवर आजपर्यंत कार्यवाही केलेली आहे व किती लोकांवर नोटीसा दिलेल्या आहेत. याबाबत सभागृहात या बैठकीत माहिती देऊ असे आश्वासन पान क्र. ४ वर संबंधित अधिका४यांना दिलेले होते. तरी संबंधित अधिकारी यांनी सभागृहात माहिती द्यावी.

**मा. सभापती :** मा. आयुक्त, प्रशासकीय अधिकारी इतर अधिकारी वर्ग मुंबईला गेलेले आहेत. शहरातील पुंडलिकनगर, हनुमाननगर, जाधववाडी, जयभवानीनगर, ई. काही अनाधिकृत बांधकामाबाबत कार्यवाही करण्यात येईल. इमारत बांधकामाच्या संदर्भात हलगर्जी आढळून आल्यास ज्या निरिक्षकांवर कार्यभार सोपविलेला आहे. त्या-त्या इमारत निरिक्षक यांच्या अंतर्गत येणाऱ्या प्रभागात अनाधिकृत बांधकामे होत असेल तर त्यांच्यावर कार्यवाही करण्यात येईल. या बाबत सविस्तर माहिती येत्या १६ तारखेच्या स्थायी समितीमध्ये सभागृहात देण्यात येईल.

**श्री. संजय जोशी :** मागच्या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार आदेश दिलेले होते. त्यानंतर झालेले खुल्या जागेवरील बांधकाम पाडण्यात यावे. सभागृहात आदेश दिल्यानंतर प्रशासनाने ताबडतोब कार्यवाही केली पाहिजे.

**मा. सभापती :** इमारत निरिक्षक तसेच प्रशासकीय अधिकारी यांनी संबंधितांचे कागदपत्रे पाहुन अनाधिकृत बांधकाम झालेली असेल तर पोलिस संरक्षण घेऊन तेथील बांधकाम पाडण्यात यावे.

**श्री. म.अ.रऊफ :** इतिवृत्तातील पान क्र. ४ वर नारेगांव येथील महापालिकेच्या जागेवर अनाधिकृत टपरी बाबत मी सभागृहात बोललो होतो. कार्यवाही करण्याचे आदेशही मा. सभापती यांनी दिल्यानंतरही कार्यवाह झालेली नाही.

**श्री. संजय जोशी :** इतिवृत्तातील पान क्र. ४ वर राजनगर येथे १६००० हजार स्क्वेअर फुट खुल्या जागेवर महापालिकेने रजिस्टी केलेली आहे. याच प्रमारे मयुरबन येथे ही १२००० हजार स्क्वेअर फुट मध्ये बांधकाम झालेले आहे. संबंधित अधिकारी यांनी सभागृहात चर्चेनुसार कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासन दिलेले होते. काहीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

**मा. सभापती :** उपआयुक्त (प्र.) यांनी खुलासा करावा.

**उपायुक्त (प्र.) :** या जागेबाबतची कागदपत्रे तपासून कार्यवाही करण्यात येईल.

**श्री. स. अली मिरा सलामी :** इतिवृत्तातील पान क्र. ९ वर शहागंज येथील महापालिकेचे भाजी मार्केट आहे. तेथील संबंधित गाळे धारकांकडून मालमत्ता कर घेण्यात येतो काय त्यांना कराची पावती दिली जाते काय? याबाबत पुढच्या बैठकीत खुलासा करण्यात येईल असे सांगण्यात आलेले होते.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**करमुल्य निर्धारण अधिकारी :** सदर दुकाने नगरपारिषदेच्या काळात भाड्याने दिलेले आहेत. ९७-९८ पासून मालमत्ता कर आकारावा असे अॅग्रीमेंट झालेले होते. याबाबत एक बैठकही झालेली होती. त्या बैठकीत बरेच दुकानधारक उपस्थित होते.

**श्री. स. अली मिरा सलामी :** अशा प्रकारच्या करारनामा झालेला नाही. मी त्या बैठकीत उपस्थित होतो. मा. मुख्यलेखा परिक्षक ही त्या बैठकीत उपस्थित होते. त्यांना विचारणा करावी.

**मुख्यलेखा परिक्षक :** पूर्वीच करारनामा झालेला असला तरी त्यात मालमत्ता कराचा उल्लेख नाही. त्यामुळे सदर दुकानधारकांना समाजावून सांगनू नविन करारनामा करावा लागेल असे सांगण्यात आलेले आहे.

**श्री. स. अली मिरा सलामी :** इतिवृत्तातील पान क्र. ३१ वर विषय क्र. २४४/२ वर ए.एफ.एम. औषधी खरेदी करणेसाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यामध्ये दोन मुंबई व एक ठाणे असे उल्लेखित आहे. संबंधित अधिकारी औरंगाबादची निविदा का आली नाही. कुण्या वृत्तपत्रात जाहिर प्रगटन दिले होते याबाबतची माहिती मागविली असता संबंधित अधिकारी यांनी स्थानिक पेपरमध्ये जाहिर प्रगटन दिलेले होते. असे सभागृहात सांगितले. ज्या वृत्तपत्रात जाहिरात दिलेली आहेत त्या वृत्तपत्राचे "मजकूर" (कात्रण) सभागृहात दाखवावे अशा प्रकारची औषधी पहिल्यांदा खरेदी करण्यात येत आहे.

**श्री. संजय जोशी :** या ठरावात फक्त दुरुस्ती करता येते चर्चा नाही.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** याबाबतची सर्व माहिती मागच्या बैठकीत दिलेली आहे.

**श्री. स. अली मिरा सलामी :** स्थानिक वृत्तपत्रात जाहिर प्रगटन दिल्यानंतर मुंबई ठाणेची निविदा येते. औरंबादची का नाही याची मला पूर्ण माहिती पाहिजे आहे. प्रस्तावात प्र. कि. १४०/ रु. प्रमाणे दाखवलेले आहे. सदर औषधी हि रु. २८ ते ४० प्रति किलो प्रमाणे बाजारामध्ये मिळतात यात मोठा भ्रष्टाचार

होतो आहे. याबाबत मला पूर्ण माहिती दिली नाही तर निषेद करतो मी टेबलावर बसून राहतील.

(याचवेळी स.स.श्री. स. अली मिरा सलामी हे टेबलावर जाऊन बसतात व उत्तर न दिल्यास मी निषेध करतो.)

**मा. सभापती :** सदर प्रस्ताव हा मागच्या बैठकीत होता. त्यास मंजुरी ही मिळाली आहे. आपणांस काही वाटत असेल तर आपण न्यायालयात जाऊ शकता.

**श्री. गौतम लांडगे :** मागच्या बैठकीत चर्चा होऊन मंजुरी ही देण्यात आली त्याच वेळेस प्रस्ताव स्थगित का ठेवण्यात आलेला नाही.

(याचवेळी स. सदस्य श्री. स. अली मिरा सलामी मी न्यायालयात जाईल असे बोनूल सभागृहात विषयपत्रिका फाडून सभागृहाच्या बाहेर जातात वेळ अंदाजे ६.१० वाजता.)

**श्री. गौतम लांडगे :** इतिवृत्तातील पान क्र. ९ वर सिडको एन-७ येथील महापालिकेच्या शाळेत चार महिन्यापासून शिक्षक नाही. शिक्षक देण्यात यावे असे आदेश संबंधित अधिकारी यांना देण्यात आलेले होते. परंतु आजपर्यंत त्या ठिकाणी एकही शिक्षक आलेले नाही. माहिती द्यावी.

**मा. सभापती :** शिक्षणाधिकारी यांनी माहिती द्यावी.

**शिक्षणाधिकारी :** स. सदस्य यांच्या बरोबर मी चर्चा केलेली आहे. शिक्षकाच्या ३० जाता रिक्त असून शिक्षक भरती करण्यासाठी सेवायोजन अधिकारी, समाजकल्याण अधिकारी, आदिवासी विकास अधिकारी यांचेकडून नावाची यादी मागविलेली आहे. त्यानंतर शिक्षक या शाळेवर देण्यात येईल.

**मा. सभापती :** मागच्या बैठकीत चर्चेनुसार तुर्त शिक्षक देण्याचे आदेश देण्यात आलेले होते. शिक्षक का देण्यात आलेले नाही याची माहिती द्यावी.

**उपआयुक्त (प्र.):** शिक्षक भरती बाबत संबंधित कार्यालयाकडून पत्र देऊन यादी मागविलेली आहे परंतु अद्यापपर्यंत यादी आलेली नाही.

**श्री. गौतम लांडगे :** मागच्या बैठकीत ही अधिकारी यांनी उत्तर दिलेले होते. त्यावेळेसही पत्र पाठविले असे सांगण्यात आले होते. अद्यापपर्यंत नावाची यादी आलेली नसल्यास प्रशासनाने ताबडतोब कार्यवाही करावी व आता शाळेला सुट्ट्या लागणार आहे. दिवाळीनंतर तरी या शाळेवर शिक्षक देण्याची प्रशासनाला विनंती आहे.

**मा. सभापती :** मा. उपायुक्त (प्र.) यांनी यादी आल्यानंतर संबंधित उमेदवाराची ताबडतोब मुलाखती घेऊन सदर शाळेवर दिवाळीनंतर शिक्षक देण्याची कार्यवाही करावी.

**ठराव :**

ठराव क्र. २१३/११ दि. १५-०९-९८ अन्वये स्थगित ठेवण्यात आला होता. त्याऐवजी प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हर्सूलगांव येथील जलकुंभ भरण्यासाठी १५० मी. मी. व्यासाची डी.आय.के-९ जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी रक्कम रु. ७,४५,१५९/- च्या वाढीव अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

वरील दुरुस्तीसह दिनांक १५-०९-९८ च्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्तास कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४८/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, चिकलठाणा येथे व्यायामशाळेची इमारत बांधावयाची आहे. त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन ९६-९७ चे जिल्हा

दरसूचीनुसार र. रु. ५,०९,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दि. २७-१२-९७ अन्वये मंजुरी दिलेली आहे. तसेच मा. स्थायी समितीने ठराव क्र. ४४९/३८ दि. २६-१२-९७ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार कार्यालयीन निविदा सूचना जा.क्र.मनपा/लेखा/नि/२४/९८ दि. ०३-०६-९८ अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण १४ निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण तीन निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्या दि. २३-०६-९८ रोजी उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | सुजात अली हाश्मी | १०% जास्त दराने |
| २) | सय्यद अथरअली | ०.५% कमी दराने |
| ३) | कुलवंतसिंग | ८% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५% कमी दराचे निविदा दर सय्यद अथरअली यांचे आहेत. दराबाबत मा. आयुक्त महोदय यांचे दालनात झालेल्या वाटाघाटी अंती अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चिकलठाणा येथे व्यायामशाळेची इमारत बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री. स. अथर अली यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदर काम त्यांचेकडून अंदाजपत्रक दरापेक्षा ५% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४९/३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, म्हाडाकॉलनी पीरबाजार येथे आरोग्य केंद्र बाधावयाचे आहे. त्यासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९६-९७ चे जिल्हा दरसूचीनुसार र. रु. ७,४०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून. त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दि. १४-०८-९७ अन्वये मान्यता दिलेली आहे. तसेच स्थायी समितीने ठराव क्र. १९१/५० दि. १६-०८-९७ अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार कार्यालयीन निविदा सूचना जा.क्र.मनपा/लेखा/नि/८४/९७ दि. १२-१२-९७ अन्वये निविदा मागविल्या आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण १७ निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ०७ निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्या दि. २९-१२-९७ रोजी उघडण्यात आल्या असता तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | विश्व कन्स्ट्रक्शन | ६.५७% कमी दराने |
| २) | कल्याणी कन्स्ट्रक्शन | ८.७% कमी दराने |
| ३) | एच. बी. संत्रे | ३% कमी दराने |
| ४) | हा कन्स्ट्रक्शन | १०.९९९% कमी दराने |
| ५) | एस. एच. असोसिएट्स | १२.९९९% कमी दराने |
| ६) | मे. सरव कन्स्ट्रक्शन | ७.८६% कमी दराने |
| ७) | सोहेल सिद्दिकी | ७.८% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२.९९९% कमी दराची निविदा मे. एस. एच. असोसिएट्स यांची आहे. त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दि. ०८-०९-९८ अन्वये मान्यता दिलेली आहे. सरील आरोग्य केंद्र हे संस्थतर्फे कार्यान्वित होणार आहे.

तरी मे. एस. एच. असोसिएटस यांची १२.९९९% कमी दराची निविदा मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे म्हाडाकॉलनी पीरबाजार येथे आरोग्य केंद्र बाधणेचे कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२.९९९% कमी दराचा मे. एस. एच. असोसिएट्स यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५०/४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, किराडपुरा प्रा. शाळेसाठी चार वर्ग खोल्या व्हरांड्यासह बांधणेचे कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९६-९७ जिल्हा दरसूचीनुसार रक्कम रु. ८,८०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दि. २९-०३-९७ अन्वये मान्यता दिलेली आहे. तसेच मा. सर्वसाधारण सभेने ठराव क्र. ३२/३६ दि. ३१-०५-९७ अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार उपरोक्त निविदा सूचना जा.क्र.मनपा/लेखा/नि/२४/९८ दि. ०३-०६-९८ अन्वये निविदा मागविल्या आल्या असता निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण १५ निविदा दर भरून प्राप्त झाल्या. व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ०२ निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्या दि. २३-०९-९८ रोजी उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | सय्यद फैजुलहक्क | ५% जास्त दराने |
| २) | सुजात अली हाश्मी | ८% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराची निविदा श्री. सय्यद फैजुलहक्क यांचे आहेत. परंतु मा. आयुक्त महोदय यांचे दालनात झालेल्य वाटाघाटी अंती अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% ऐवजी अंदाजपत्रकीय दराने करण्यास मा. आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार श्री. सय्यद फैजुलहक्क यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे किराडपुरा प्रा. शाळेसाठी चार वर्ग खोल्या व्हरांड्यासह बांधणेचे कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री. सय्यद फैजुलहक्क यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम त्यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५१/५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिध्दार्थ उद्यान येथील प्राणी संग्रहालयात हरिणीकरिता मोट तयार करावयाची आहे. त्यासाठी सार्वजनिक बांधकाम

विभागाचे सन ९६-९७ जिल्हा दरसूचीनुसार रक्कम रु. ४,५६,९१०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दि. ०७-०६-९८ अन्वये मंजुरी दिलेली आहे. तसेच मा. स्थायी समितीने ५०८/१७ दि. २०-०३-९८ अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार कार्यालयीन निविदा सूचना जा.क्र.मनपा/लेखा/नि/३४/९८ दि. १४-०७-९८ अन्वये निविदा मागविल्या आसता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत २१ निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ०७ निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्या दि. १२-०८-९८ रोजी उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | महेंद्र कन्स्ट्रक्शन | ३४% कमी दराने |
| २) | शेख मसुद | २१.९२% कमी दराने |
| ३) | न्युस्टार कन्स्ट्रक्शन | २६.७८४% कमी दराने |
| ४) | बसरा कन्स्ट्रक्शन | २१.३५% कमी दराने |
| ५) | इ.आय.मथ्यू | २५.२% कमी दराने |
| ६) | कुलवंतसिंग | २६.८६% कमी दराने |
| ७) | सफवान कन्स्ट्रक्शन | २.५% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३४% कमी दराची निविदा महेंद्र कन्स्ट्रक्शन यांची आहे. त्यास मा. आयुक्त महोदय यानी दि. २८-०८-९८ अन्वये मान्यता दिलेली आहे.

तरी महेंद्र कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३४% कमी दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यान येथील प्राणी संग्रहालयात हरिणीकरिता मोट तयार करण्याचे कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३४% कमी दराचा महेंद्र कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५२/६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, इंदिरानगर (बायजीपुरा) येथे सांस्कृतिक हॉल बांधावयाचा आहे. त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन ९७-९८ चे जिल्हा दरसूचीनुसार रक्कम रु. ५,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दि. २९-०८-९८ अन्वये मान्यता दिलेली आहे.

सदरील कामाचा खर्च हा दहावा वित्त आयोगाकडून प्राप्त शासकीय अनुदानातून करण्यात येईल. तरी उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. ५,००,०००/- चा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे इंदिरानगर (बायजीपुरा) येथे सांस्कृतिक हॉल बांधण्याचे कामाकरिता तयार करण्यात आलेले र. रु. ५,००,००० चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५३/७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. घाटी येथील जयभिमनगर येथील मेडीटेशन सेंटरचा विकास करणे उदा. मार्बल, कलरिंग, सौंदर्यीकरण इत्यादी कामे करणेकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन ९७-९८ च्या जिल्हा दरसूचीनुसार रक्कम रु. १,७९,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दि. ०८-०९-९८ अन्वये मान्यता दिलेली आहे.

सदरील कामाचा खर्च हा हा श्री. गौतम खरात श्री. गौतम लांडगे, श्री. फैय्याज कुरैशी, श्री. अ. रशिदखॉन मामू, श्री. सुदाम सोनवणे आदी स. नगरसेवक यांचे स्वेच्छानिधीतून करण्यात येईल.

तरी उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. १,७९,०००/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे घाटी येथील जयभिमनगर येथील मेडीटेशन सेंटरचा विकास करणे (उदा. मार्बल, कलरिंग, सौंदर्यीकरण इ.) कामाकरिता तयार करण्यात आलेले र. रु. १,७९,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५४/८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पदमपुरा येथील माजी महापौर श्री. गजानन बारवाल यांच्या घरासमोरील खुल्या साईट जागेस संरक्षित तारकुंपन करणे बाबतचे अंदाजत्रक र. रु. २,६२,२८६/- चे सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन ९७-९८ चे दरसूचीनुसार तयार करण्यात आले असून त्यास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सदरील काम हे नविन उद्याने तरतूदी अंतर्गत प्रस्तावित आहे.

सबब वरीलप्रमाणे प्रस्ताव स्थायी समिती समोर मान्यतेसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पदमपुरा येथील माजी महापौर श्री. गजानन बारवाल यांच्या घरासमोरील खुल्या साईट जागेस संरक्षित तारकुंपन करणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेले र. रु. २,६२,२८६/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५५/९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, नंदनवन कॉलनी जवळील वसुंधरा को. हौ. सोसायटी येथील रेखांकनातील खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे बाबतचे अंदाजपत्रक र. रु. १,३६,५००/- एवढ्याचे तयार करण्यात आले असून त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यात आली आहे. सदर काम हे नविन उद्याने या तरतूदी अंतर्गत प्रस्तावित करण्यात आले आहे.

सबब वरीलप्रमाणे स्थायी समिती समोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नंदनवन कॉलनी जवळील वसुंधरा को. हौ. सोसायटी येथील रेखांकनातील खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. १,३६,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५६/१० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, संजय सहकारी गृहनिर्माण संस्थेतील खुल्याजागेस संरक्षित भिंत बांधणेच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाचे जिल्हा दरसूची सन ९७-९८ नुसार रक्कम रु. १,४६,२००/- चे तयार करण्यात आले असून सदर कामास प्रशासकीय मान्यता घेण्यात आली आहे. सदर प्रस्तावित काम हे विकास योजने अंतर्गत भूखंडाचे संरक्षण या तरतूदी अंतर्गत प्रस्तावित आहे.

सबब वरीलप्रमाणे कामाचा प्रस्ताव स्थायी समिती समोर मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संजय सहकारी गृहनिर्माण संस्थेतील खुल्याजागेस संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. १,४६,२००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५७/११ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. जयनगर येथे अंतर्गत खेळाकरिता टेबल टेनिस हॉल बांधावयाचा आहे. त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन ९६-९७ जिल्हा दरसूचीनुसार रक्कम रु. ६,३२,३००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दि. ११-०९-९८ अन्वये मान्यता दिलेली आहे.

सदरील कामाचा खर्च हा विकास इमारती शाळा व दवाखाने या लेखाशिर्षाअंतर्गत करण्यात येईल. तरी उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक र. रु. ६,३२,३००/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. जयनगर येथे अंतर्गत खेळाकरिता टेबल टेनिस हॉल बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ३,३२,३००/-च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५८/१२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वॉर्ड क्र. ४८ अजबनगर व छोटा तकीया येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन ९६-९७ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डि. एस. आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रु. ४,९८,९००/- चे तयार करण्यात आले असून सदरील खर्च सन ९८-९९ च्या भांडवली रस्ते "नविन डांबरीकरण व रस्ते दुरुस्तीमध्ये ठेवण्यात आलेल्या तरतूदीमधून करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. ४८ अजबनगर व छोटा तकीया येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ४,९८,९००/-च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५९/१३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर करीत आहे की, रेंगटीपुरा येथील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन ९७-९८ चे डि. एस. आर. दराने अंदाजपत्रक

रक्कम रु. ४,२६,७००/- चे तयार करण्यात आले असून सदरचा खर्च "नविन डांबरी" या लेखाशिर्षा अंतर्गत ठेवण्यात आलेल्या तरतूदीतून करण्यात येईल.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रेंगटीपुरा येथील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ४,२६,७००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६०/१४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर करीत आहे की, झोन क्र. २ मधील विविध डांबरी रस्त्यांना डांबरी पॅचवर्क करण्याकरिता पॅचवर्क मटेरिअलचा पुरवठा करणेच्या कामासाठी सन १९९६-९७ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याचे डि. एस. आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रु. ३,००,०००/- चे तयार करण्यात आले असून सदरचा खर्च " रस्ते दुरुस्ती (पॅचवर्क) " या लेखाशिर्षा अंतर्गत ठेवण्यात आलेल्या तरतूदीतून करण्यात येईल.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. गौतम लांडगे :** सदर प्रस्तावात झोन क्र. २ मधील विविध डांबरी रस्त्यांना डांबरी पॅचवर्क करण्याकरिता अंदाजपत्रक रु. ३ लाखाचे तयार करण्यात आलेले आहे. या अगोदरही ज्या झोनमध्ये पॅचवर्कसाठी ३ लाखाचे ढोबळ अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. प्रत्येक झोनमध्ये रस्त्याचे अंतर कमी जास्त, झोनचे क्षेत्रफळ कमी जास्त असून प्रत्येक झोनसाठी एकच रक्कमेची अंदाजपत्रक का ठेवण्यात आहे. योग्य तो सर्व्हे करून कमी जास्त अंदाजपत्रक का ठेवण्यात आलेले नाही.

**श्री. स. अ. एकबालोद्दिन :** ३ लक्ष रुपयाप्रमाणे अंदाजपत्रक रक्कम धरल्यास १० लक्ष च्या वर जाते असे प्रकारचे प्रस्ताव सर्वसाधारण सभेमध्ये जावयास पाहिजे.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**अति. शहर अभियंता :** टेलिफोन विभागाकडून नेहमी नेहमी रस्त्यावरू केबल वगैरे टाकण्यासाठी खोदकाम करण्यात येतात. त्यामुळे गड्डे पडतात. तसेच महापालिकेच कधी कधी ड्रेनेज चे कामे करण्यात येतात. त्यामुळे सर्व्हे केल्यानंतरही ४ दिवसानंतर त्या रस्त्यावरील जागेवर खोदकाम होऊ शकते.

**मा. सभापती :** मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे झोन क्र. २ मधील विविध डांबरी रस्त्यांना डांबरी पॅचवर्क करण्याकरिता पॅचवर्क मटेरिअलचा पुरवठा करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ३,००,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६१/१५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, ज्ञानेश्वरनगर (गारखेडा) येथील अंतर्गत खडी रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन ९६-९७ च्या सार्वजनिक

बांधकाम खात्याच्य डि. एस. आर. दराने अंदाजपत्रक र. रु. २,४०,३००/- चे तयार करण्यात आले असून सदरचा खर्च ९८-९९ च्या "नवीन डांबरी रस्ते" या लेखाशिर्षाकातून करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ज्ञानेश्वरनगर (गारखेडा) येथील अंतर्गत खडी रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. २,४०,३००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६२/१६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, नंदीग्राम हौ. सो. गारखेडा येथील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन ९६-९७ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डि. एस. आर. दराने अंदाजपत्रक र. रु. १,१९,४०५/- चे तयार करण्यात आले असून सदरचा खर्च ९८-९९ च्या पुर्नडांबरीकरण या लेखाशिर्षाकातून करण्यात येईल.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नंदीग्राम हौ. सो. गारखेडा येथील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,१९,४०५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६३/१७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जयसिंगपुरा भागातील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन ९६-९७ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डि. एस. आर. दराने अंदाजपत्रक र. रु. ३,८९,०६३/- चे तयार करण्यात आले असून सदरचा "पुर्नडांबरीकरण" या लेखाशिर्षका अंतर्गत ठेवण्यात आलेल्या तरतूदीतून करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जयसिंगपुरा भागात रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ३,८९,०६३/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६४/१८ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, झोन क्र. ३ मधील विविध डांबरी रस्त्यांना पॅचवर्क करण्याकरिता पॅचवर्क मटेरियलचा पुरवठा करणेच्या कामासाठी सन ९६-९७ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याचे डि. एस. आर. दराने अंदाजपत्रक र. रु. ३,००,०००/- चे तयार करण्यात आले असून सदरचा "रस्ते दुरुस्ती (पॅचवर्क)" या लेखाशिर्षकाखाली ठेवण्यात आलेल्या तरतूदीतून करण्यात येईल.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे झोन क्र. ३ मधील विविध डांबरी रस्त्यांना डांबरी पॅचवर्क करण्याकरिता पॅचवर्क मटेरियलचा पुरवठा करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ३,००,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६५/१९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, उस्मानपुरा स्मशानभूमी करिता डांबरी रस्ता तयार करणेच्या कामासाठी सन ९६-९७ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डि. एस. आर. दराने अंदाजपत्रक र. रु. ३,२५,०००/- चे तयार करण्यात आले असून सदरील खर्च सन ९८-९९ च्या पुर्नडांबरीकरण मध्ये ठेवण्यात आलेल्या तरतूदीमधून करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे उस्मानपुरा स्मशानभूमी करिता डांबरी रस्ता तयार करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ३,२५,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६६/२० :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, न्यु नंदनवन कॉलनी पद्मपाणी सोसायटी भुजबळनगर येथील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन ९७-९८ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डि. एस. आर. दराने अंदाजपत्रक र. रु. ६,०१,४९२/- चे तयार करण्यात आले असून सदरचा "नवीन डांबरी रस्ते" या लेखाशिर्षा अंतर्गत ठेवण्यात आलेल्या तरतूदीतून करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे न्यु नंदनवन कॉलनी पद्मपाणी सोसायटी भुजबळनगर येथील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ६,०१,४९२/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६७/२१ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर केला आहे की, नवा मोंढा येथील रोडचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी सन ९६-९७ च्या डि. एस. आर. दराने अंदाजपत्रक र. रु. २,३४,७००/- चे तयार करण्यात आले असून सदरचा पुर्नडांबरीकरणेच्या या लेखाशिर्षा अंतर्गत ठेवण्यात आलेल्या तरतूदीतून करण्यात येईल.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ज्नवा मोंढा येथील रोडचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. २,३४,७००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६८/२२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, झोन क्र. ५ मधील विविध डांबरी रस्त्यांना डांबरी पॅचवर्क करण्याकरिता पॅचवर्क मटेरियलचा पुरवठा करणेच्या कामासाठी सन ९७-९८ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डि. एस. आर. दराने अंदाजपत्रक र. रु. ३,००,०००/- चे तयार करण्यात आले असून सदरील खर्च सन ९८-९९ च्या रस्ते दुरुस्ती पॅचवर्क (६०-०० लाख) मध्ये ठेवण्यात आलेल्या तरतूदीतून करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे झोन क्र. ५ मधील विविध डांबरी रस्त्यांना डांबरी पॅचवर्क करण्याकरिता पॅचवर्क मटेरियलचा पुरवठा करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ३,००,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६९/२३ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, मोतीकारंजा व जाधवमंडी येथील गल्ल्यामध्ये फरशी बसविण्याचे कामासाठी सन ९७-९८ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डि. एस. आर. दराने अंदाजपत्रक र. रु. १,६१,१००/- चे तयार करण्यात आले असून सदरचा "नवीन खांडकी रस्ते" या लेखाशिर्षा अंतर्गत ठेवण्यात आलेल्या तरतूदीतून करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोतीकारंजा व जाधवमंडी येथील गल्ल्यामध्ये फरशी बसविण्याचे कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. १,६१,१००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७०/२४ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, झोन क्र. १ मधील विविध डांबरी रस्त्यावर डांबरी पॅचवर्क करण्याकरिता पॅचवर्क मटेरियलचा पुरवठा करणेच्या कामासाठी सन १९९६-९७ च्या डि. एस. आर. दराने अंदाजपत्रक र. रु. ३,००,०००/- चे तयार करण्यात आले असून सदरचा खर्च रस्ते दुरुस्ती पॅचवर्क या लेखाशिर्षा अंतर्गत ठेवण्यात आलेल्या तरतूदीतून करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे झोन क्र. १ मधील विविध डांबरी रस्त्यावर डांबरी पॅचवर्क करण्याकरिता पॅचवर्क मटेरियलचा पुरवठा करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ३,००,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७१/२५ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, गोपाळनगर पहाडसिंगपुरा भागातील खडी रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९७-९८ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डि. एस. आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रु. २,६५,१०२/- चे तयार

करण्यात आले असून सदरचा खर्च "नवीन डांबरी रस्ते" या लेखाशिर्षा अंतर्गत ठेवण्यात आलेल्या तरतूदीतून करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गोपाळनगर पहाडसिंगपुरा भागातील खडी रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. २,६५,१०२/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७२/२६ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, पहाडसिंगपुरा येथील कला को. हौ. सो. व लायब्रीअन सोसायटी येथील रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९७-९८ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याचे डि. एस. आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रु. ४,३०,११९/- चे तयार करण्यात आले असून सदरचा खर्च "नवीन डांबरीकरण रस्ते" या लेखाशिर्षा अंतर्गत ठेवण्यात आलेल्या तरतूदीतून करण्यात येईल.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पहाडसिंगपुरा येथील कला को. हौ. सो. व लायब्रीअन सोसायटी येथील रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ४,३०,११९/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७३/२७ :**

महिंद्रा ॲन्ड कंपनीच्या विविध मॉडेलसच्या जीपसाठी स्पेअरपार्टस खरेदी करण्यासाठी सन १९९८-९९ या आर्थिक वर्षा करिता वार्षिक करार करण्यासाठी कंपनीचे अधिकृत विक्रेते यांचेकडून निविदापत्रके मागविण्यात आली असता एकूण दोन निविदा पत्रके विक्री झाली व प्राप्त झाली. दोन्ही एजन्सीचे दर खालीलप्रमाणे भरले आहेत.

| | | प्राईजलिस्ट |
|---|---|---|
| १) | मे. रत्नप्रभा मोटार्स औरंगाबाद | १५ १/२ % |
| २) | मे. भारत ॲटो स्टोअर्स औरंगाबाद | १३% |

वरील दोन्ही एजन्सीज पैकी मे. भारत ॲटो स्टोअर्स औरंगाबाद यांचे दर कमी असून प्राईजलिस्ट + १३% असे आहेत.

महानगरपालिकेडे एकूण १९ जीप्स असून वर्षभरात एकूण रु. ३ लाखाचे मे. भारत ॲटो स्टोअर्स औरंगाबाद जे महिंद्रा कंपनीचे अधिकृत विक्रेते आहेत. त्यांचे कमी दराचे दर मंजूर करून वार्षिक करार करण्यास मंजुरी मिळावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महिंद्रा ॲन्ड कंपनीच्या विविध मॉडेलसच्या जीपसाठी स्पेअरपार्टस खरेदी करण्यासाठी सन १९९८-९९ या आर्थिक वर्षा करिता वार्षिक करार करण्यासाठी कंपनीचे अधिकृत विक्रेत्यापैकी कमी दराचे दरपत्रक धारक मे. भारत ॲटो स्टोअर्स औरंगाबाद यांचे प्राईजलिस्ट + १३% या दराने वार्षिक करार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७४/२८ :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, पशु वैद्यकीय अधिकारी यांच्या वापरातील जीप क्र. एम.ए./१०५ ही सन १९८५ चे मॉडेल असून आतापर्यंत २.५ लाख कि. मी. पेक्षाही जास्ती चाललेली असून या जीपची कंडीशियन एकदम खराब झालेली आहे. व या गाडीला रिपेरिंग करण्यास जास्त खर्च येत असल्यामुहे सदरील जीप ही निलेखात करण्यास व त्या ऐवजी नविन जीप खरेदी करण्यास मा. आयुक्तांनी मंजुरी दिली आहे.

महिंद्रा ॲन्ड महिंद्रा या कंपनीच्या मे. रत्नप्रभा मोटार्स व मे. भारत ॲटो स्टोअर्स, औरंगाबाद यांचे कडून दरपत्रके मागविली असता, मे. भारत ॲटो स्टोअर्स यांनी खालील प्रमाणे दरपत्रक दिले आहे.

| | |
|---|---|
| एम.एम. ५५०/२ व्हील ड्राईव्ह / जीप + | रु. ३,०८,६३७=०० |
| सप्लाय बंद फायबर बॉडी बसविणे | रु. ३०,४७१=०० |
| एकूण | रु. ३,३९,१०८=०० |
| सुट | रु. ९२३=०० |
| एकूण | रु. ३,८५,१८५=०० |

महिंद्रा ॲन्ड महिंद्रा कंपनीने दिलेल्या डीजीएस ॲन्ड डी दराप्रमाणे जीप पुरवठा करण्यास तयार आहेत. डिलीव्हरी घेण्याचे दिवशी किंमतीत कमी जास्त झाल्यास त्याप्रमाणे अदाई करावी लागेल. सदरील दर जकात कर वगळून आहेत. व जकात अधिक्षक यांना जकात सुट द्यावा म्हणून पत्र द्यावे लागेल. जीपची पूर्ण किंमत अदाई केल्यानंतर ८ ते १० दिवसांत जीपची डिलीव्हरी मिळेल असल्याचा उल्लेख केला आहे.

तरी मे. भारत ॲटो स्टोअर्स, जे महिंद्रा ॲन्ड महिंद्रा कंपनीचे अधिकृत विक्रेते आहेत. त्यांचे रुपये ३,३८,१८५=०० ने दरपत्रक डीजीएस ॲन्ड डी दराप्रमाणे मंजूर करण्यासाठी शिफारस करण्यांत येते. स. स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपाच्या पशु वैद्यकीय अधिकारी यांचेकडील जीप अडीच लाख कि. मी. पेक्षाही जास्त चालल्याने सदरील वाहन निर्लेक्षित करून नविन जीप मे. भारत ॲटो स्टोअर्स, औरंगाबाद यांचेकडून र. रु. ३,३८,१८५/- ला दरपत्रक डीजीएस ॲन्ड डी दराप्रमाणे खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७५/२९ :**

महानगरपालिकेच्या विविध वाहनासाठी लागणाऱ्या आकाराच्या बॅटरीज खरेदी करण्यासाठी व सन १९९८-९९ या आर्थिक वर्षात करार करण्यासाठी वर्तमान पत्रात निविदा सूचना देवून निविदा मागविल्या असता एकूण ६ निविदा प्राप्त झाल्या. वाहनासांठी बॅटरीज खरेदी करतांना चांगल्या प्रतीच्या नावाजलेल्या कंपनीच्या बॅटरीज खरेदी करणे वाहनाच्या दृष्टीने चांगले असते. त्यामुळे एनर्जी बॅटरी, शक्ती बॅटरी, मॉस्काट बॅटरी पेसीट बॅटरी या बॅटरीज वापरण्याच्या महानगरपालिकेस अनुभव नाही व दर कमी असेल तरी त्या तांत्रिकदृष्ट्या योग्य नाहीत. त्यामुळ "एक्साईड" व सुरज मेक बॅटरीज ज्याचा अनुभव महानगरपालिकेस आहे त्या खरेदी करण्यासाठी शिफारस करण्यात येते. या दोन कंपन्याच्या

बॅटरीजमध्ये बॅटरीजची किंमत वजा करून व सर्व टॅक्सेस धरून खालील प्रमाणे कमी किंमतीचे दर आलेले आहेत.

अ) मे. व्हेस्पा ॲक्युम्युलेटर्स,
<u>ॲक्सेसरीज ॲन्ड केमिकल्स, औरंगाबाद</u>

यांचे "सुरज" कंपनीच्या बॅटरीजसाठीचे दर खालील ६ प्रकारच्या बॅटरीजसाठी कमी असून ते खालील नमूद केल्याप्रमाणे आहेत. सन १९९७-९८ मध्ये या बॅटरीजसाठी वार्षिक करार केला होता व या बॅटरीजचा अनुभव चांगला आहे. सर्व्हिस पण चांगली मिळते.

| | बॅटरीचा प्रकार | किंमत | गॅरंटी |
|---|---|---|---|
| १) | ६ व्होल्ट १४ ॲम्पीयर बॅटरी | ५६७/- | १८ महिने |
| २) | १२ व्होल्ट १४ ॲम्पीयर बॅटरी | ९४०/- | १८ महिने |
| ३) | १२ व्होल्ट १७ प्लेट बॅटरी | ४७५०/- | १८ महिने |
| ४) | १२ व्होल्ट १९ प्लेट बॅटरी | ५,५००/- | १८ महिने |
| ५) | १२ व्होल्ट २१ प्लेट बॅटरी | ६,७१४/- | १८ महिने |
| ६) | १२ व्होल्ट २५ प्लेट बॅटरी | ७,४०८/- | १८ महिने |

ब) <u>मे. जे. जे. एजन्सीज, औरंगाबाद</u>

हे एस. एफ. एक्साईड बॅटरीजचे अधिकृत विक्रेत आहेत त्यांचे दर खालील प्रमाणे ३ प्रकारच्या बॅटरीजसाठी कमी आहेत.

| | बॅटरीचा प्रकार | किंमत | गॅरंटी |
|---|---|---|---|
| १) | १२ व्होल्ट ११ प्लेट | ३२४४/- | १२ महिने |
| २) | १२ व्होल्ट १३ प्लेट | ४०९६/- (बंद बॅटरी पी. पी.) | १२ महिने |
| ३) | १२ व्होल्ट १५ प्लेट | ३३७०/- (बंद बॅटरी पी. पी.) | १२ महिने |

तरी वरील प्रमाणे "एक्साईड" कंपनी व "सुरज" कंपनीच्या बॅटरीज खरेदी करण्यासाठी ११९८-९९ या आथिक वर्षात करार करण्यासाठी स. स्थायी समितीच्या मंजुरीस्तव.

**संवाद :**

**श्री. गौतम लांडगे :** सदर प्रस्तावात ६ निविदा प्राप्त झालेल्या होत्या त्या एक्साईड व सुरज कंपनीच्या बॅटरीज किंमती दर्शविण्यात आलेल्या आहे. सुरज बॅटरी का घेण्यात येतात. एक्साईड कंपनीची का नको? चांगल्या प्रतीच्या बॅटरीज घेण्यात याव्या. सदर विषय दुरुस्तीसह पुढच्या बठकीत ठेवण्यात यावा. तुर्त स्थगित करण्यात यावा.

**उप अभियंता (यां.):** एक्साईच्या कंपनीच्या बॅटरीज दोन वर्षापासून वापरण्यात येतात या कंपनीच्या बेटरीजचे ३ प्रकारे रिकमंड केलेले आहे.

**श्री. संजय जोशी :** ६ टेंडर आलेले होते. ४ निविदाचे रेटस दर्शविलेले नाही. सभागृहात या बाबत माहिती व्हावयास पाहिजे. असे अर्धवट ठराव कसे टाकण्यात येतात.

**मुख्यलेखाधिकारी :** ठराव ठेवतांना संबंधित विभागाकडून ठेवण्यात येऊन त्यास मा. आयुक्तांची मंजुरी घेतली जाते.

**उपअभियंता (यां.)** : सदर ४ निविदातील बॅटरीज चांगल्या प्रतीच्या नव्हत्या करिता दर दर्शविण्यात आलेले नाही.

**श्री. संजय जोशी :** सदर ठराव स्थगित ठेवून सविस्तर चौकशी करावी सुरज बॅटरीज का आवडतात, दुसऱ्या का नको?

**मा. सभापती :** प्रस्ताव स्थगित ठेवून चौकशी करावी.

**ठराव :**

सर्वानुमते असे ठरले की, सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा.

**विषय क्र. २७६/३० :**

महानगरपालिकेच्या विविध वाहनाच्या ॲटो इलेक्ट्रीकल्सच्या कामासाठी लागणारे जॉबवर्क/ स्पेअर पार्टस्/ लिपार्टर्स करिता वर्तमान पत्रातून निविदा सूचना देवून निविदा मागविण्यात आली असता तीन निविदा विक्री झाल्या. व तीन निविदा प्राप्त निविदामध्ये मे. चाणक्य ॲटो अलेक्ट्रीकल्स ॲन्ड डिझेल सर्व्हिसेस, औरंगाबाद यांचे दर कमी असून त्यांना मा. आयुक्त यांनी दि. २८-०८-९८ रोजी खालील दराने जॉबवर्क करण्यास व स्पेअर पार्टस् पुरवठा करण्यास मान्यता दिली आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | जॉबवर्क | अंदाजपत्रकापेक्षा १७% कमी दराने |
| २) | स्पेअर पाटर्स | मॅक्झीन रिटेल प्राईजलिस्ट पेक्षा १०.५% कमी दराने |
| ३) | लिज पाटर्स | अंदाजपत्रकापेक्षा १०.५% कमी दराने |

सन १९९८-९९ या आर्थिक वर्षात सर्व वाहनाचे ॲटो इलेक्ट्रीक्सचे काम अंदाजे रुपये ६ लाख पर्यंत अपेक्षित आहे. मे. चाणक्य ॲटो इलेक्ट्रीकल्स ॲन्ड डिझेल सर्व्हीसेस औरंगाबाद यांनी भरलेल्या कमी दरानुसार सन १९९८-९९ या आर्थिक वर्षाकरिता करार करण्यास मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. गौतम लांडगे :** महापालिकेच्या संबंधित विभागाकडे सध्या गाड्या किती आहेत या विषयाला अनुसरून मागच्या बैठकीत चर्चा झालेली होती. जॉबवर्क / स्पेअरपार्टस्/ लिजपाटर्स म्हणजे काय याची माहिती द्यावी.

**उपअभियंता (यां.) :** सध्या विभागाकडे १२० गाड्या असून एकाच वेळी वेगवेगळ्या पार्टसचे दुरुस्तीचे काम होत नाही. चेकींग वायरींग करिता काही वेळेस बाहेर गाड्याचे दुरुस्तीचे काम करून घ्यावी लागतात.

**श्री. गौतम लांडगे, श्री. संजय जोशी :**गाड्याची किती दुरुस्ती बाहेरूनकेली जाते. जास्तीत जास्त किती खर्च होतो. याची माहिती द्यावी. मे. चाणक्य ही एकच संस्था अहो. दुसऱ्यांचे किती दराने निविदा येतात. सविस्तर माहिती घेऊन पुढच्या बैठकीत प्रस्ताव ठेवण्यात यावा तोपर्यंत तुर्त स्थगित ठेवण्यात येतो.

**मा. सभापती :** प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव :**

सर्वानुमते असे ठरले की, सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा.

**विषय क्र. २७७/३१ :**

टाटा कंपनीच्या सर्व मॉडेल्सच्या वाहनांसाठी लागणाऱ्या स्पेअरपार्टसच्या सन ९८-९९ या आर्थिक वर्षात पुरवठा करण्यासाठी वर्तमान पत्रात टेंडर नोटीस देवून टाटा

कंपनीच्या अधिकृत विक्रेत्याकडून निविदा बोलविल्या असता फक्त एकच निविदा विक्री झाली व प्राप्त झाली. मे. सतिष मोटार्स, औरंगाबाद हे टाटा कंपनीचे अधिकृत विक्रेते असून त्यांचे दरपत्रक वसूल झाले आहे. मा. आयुक्तांनी त्यांना वाटाघाटीस बोलावून दर कमी करण्यास लावले असून त्यांनी खालीलप्रमाणे अंतिम दर दिले आहेत.

१) **<u>जमशेदपुरहून पुरवठा होणाऱ्या पार्टससाठी</u>**

कंपनी प्राईजलिस्ट + ११% (फ्रेट, ऑक्ट्रॉय, सी.एस.टी.
बुकींग चार्जेस+८% महाराज्य टॅक्स)

२) **<u>ठाणा येथून पुरवठा होणाऱ्या पार्टससाठी</u>**
कंपनी प्राईजलिस्ट + ७<sup>१/२</sup>% (फ्रेट, ऑक्ट्रॉय, बुकींग चार्जेस+८% महाराज्य टॅक्स)

वर्षभरात अंदाजे ८ लाख रुपये पर्यंतचे पार्टस् खरेदी अपेक्षित आहे. तरी मे. सतिश मोटार्स, औरंगाबाद यांचेकडून वार्षिक करार करण्याच्या मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. गौतम लांडगे :** प्रस्तावात दर्शविल्यानुसार एकच निविदा प्राप्त झालेली आहे. जमशेदपुरहून येणारे पार्टस मध्ये ११% (अगाऊ) जास्तीने व ठाणे येथून येणारे पार्टस् ७<sup>१/२</sup> कंपनी प्राईजलिस्ट दाखवलेले आहे. हे कसे याबाबत माहिती द्यावी.

**उपअभियंता (यां.) :** काही पार्टस् जमशेदपुरहून येतात. त्यांना टॅक्स द्यावा लागतो.

**मा. सभापती :** मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे टाटा कंपनीच्या सर्व मॉडेल्सच्या वाहनासाठी लागणाऱ्या स्पेअरपार्टसच्या सन ९८-९९ या आर्थिक वर्षात पुरवठा करण्याकरिता प्राप्त झालेल्या मो. सतीश मोटार्स, औरंगाबाद यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार खालील प्रमाणेच्या दराने वार्षिक करार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

१) **<u>जमशेदपुरहून पुरवठा होणाऱ्या पार्टससाठी</u>**

कंपनी प्राईजलिस्ट + ११% (फ्रेट, ऑक्ट्रॉय, सी.एस.टी.
बुकींग चार्जेस+८% महाराज्य टॅक्स)

२) **<u>ठाणा येथून पुरवठा होणाऱ्या पार्टससाठी</u>**
कंपनी प्राईजलिस्ट + ७<sup>१/२</sup>% (फ्रेट, ऑक्ट्रॉय, बुकींग चार्जेस+८% महाराज्य टॅक्स)
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७८/३२ :**

महानगरपालिकेच्या मारुती कंपनीची खालीलप्रमाणे वाहने आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | मारुती कार - ८०० | : ०८ |
| २) | मारुती व्हॅन | : ०१ |
| ३) | मारुती जीप्सी | : ०३ |
| ४) | मारुस्ती ईस्टीम | : ०१ |
| | एकूण | १३ |

मारुती कार स्पेअरपार्ट व जॉबवर्क करिता सन ९८-९९ या आर्थिक वर्षासाठी वार्षिक करार करण्यासाठी वर्तमान पत्रात जाहिरात देवून निविदा मागविण्यात आल्या असता मे. मारुती केअर पॉईंट, औरंगाबाद जे मारुती वर्कशॉप ओनर्स असोसिएशनचे सभासद आहेत. त्यांची एक निविदा प्राप्त झाली आहे. त्याचे दर खालीलप्रमाणे आहेत.

१) स्पेअर पार्टस प्राईजलिस्ट : + १४.५%
२) जॉबवर्क अंदाजपत्रकीय दरापेक्षा (कमी): २%

जॉबवर्क व स्पेअरपार्टस् मिळून या आर्थिक वर्षात अंदाजे १.५ लाख रुपयाचे काम अपेक्षित आहे. तरी वार्षिक करार करण्यासाठी मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेकडील मारुती कार कंपनीच्या स्पेअरपार्ट व जॉबवर्क करिता सन ९८-९९ या आर्थिक वर्षासाठी वार्षिक करार करण्याकरिता मागविण्यात आलेल्या निविदाप्रमाणे मे. मारुती केअर पॉईंट, औरंगाबाद यांच्या खालील प्रमाणेच्या दरास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

१) स्पेअर पार्टस प्राईजलिस्ट : + १४.५%
२) जॉबवर्क अंदाजपत्रकीय दरापेक्षा (कमी): २%
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७९/३३ :**

मा. अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, रोषणगेट भगात हायमास्ट दिवा लावणे करिता दिनांक च्या सभेमध्ये विषय क्र. ५६५/३४ दि. २६-०३-९८ अन्वये रुपये १०.०० लक्षच्या अंदाजपत्रकास मान्यता मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र. मनपा/लेखा/नि/२२/९८ दिनांक २२-०४-९८ अन्वये प्रगट निविदा मागविण्यात आल्या असता, निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकूण तीन निविदा विक्री झाल्या असून दि. १३-०५-९८ रोजी सदर निविदा प्राप्त झाल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | मे. कॅपको एजन्सीज | ०१% कमी दराने |
| २) | मे. दानिश सेल्स कार्पोरेशन | अंदाजपत्रकीय दराने |
| ३) | मे. रायल इलेक्ट्रीकल्स पुणे | १.४% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.४% कमी दराने मे रायल इलेट्रीकल्स पुण यांची निविदा असून प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. तुळशीबागवाले किशारे :** गुलमंडीवर १०० फुट उंचीचा हायमास्ट दिवा बसविण्यात आला पुणे महानगरपालिकेकडून दराबाबत माहिती घेण्यात यावी.

**मुख्यलेखा परिक्षक :** वेगवेगळ्या उंचीचे हायमास्ट दिवे असतात. १०० उंचीचे हायमास्ट आहे.

**श्री. म. अ. रऊफ** : गुलमंडी येथे २० फुटाचा रस्ता असून कुठे किती उंचीचे हायमास्ट दिवे बसवणे याकरिता निरिक्षक समिती नाही काय?

**श्री. विखारोद्दिन :** यासाठी ३०' ते ४०' फुट रुंद रस्ता पाहिजे. शहरात कुठे बसविणार आहे. याचा माहिती द्यावी.

**मा. सभापती :** शहरात ज्या ठिकाणी जास्त रहदारी उदा. रेल्वेस्टेशन, बसस्टँड गुलमंडी, पुणे महानगरपालिकेचे रेटस् काय आहेत त्या बाबत कॉन्फॉरमेशन करून घेण्यात यावे.

**विखारोद्दिन :** एक हायमास्ट दिवा रेल्वेस्टेशन येथे बसविण्यात यावा.

**श्री. म. अ. एकबालोद्दिन :** सिटीक्लब आमखास (शिवाजी) मैदान येथे एक हायमास्ट दिवा बसविण्यात यावा.

(याच वेळी स. सदस्य श्री. अली मिरा सलामी सभागृहात येतात.)

**मा. सभापती :** रेल्वेस्टेशन येथे शासकीय अनुदान आल्यावर एक हायमास्ट दिवा बसविण्याबाबत विचार करण्यात येईल. तसेच या प्रस्तावातस मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रोशनगेट भागात हायमास्ट दिवा लावणेकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रक दरापेक्षा १.४% कमी दराची मे. रॉयल इलेक्ट्रीकल्स, पुणे यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८०/३४ :**

अतिरिक्त शहर अभियंता महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शहराचा वाढता विस्तार लक्षात घेता स्वच्छतेच्या कामासाठी सध्या उपलब्ध असलेली ३२ वाहने कमी पडतात. सन १९९८-९९ या आर्थिक वर्षात प्रत्येक झोनसाठी एक प्रमाणे एकूण ६ टिप्पर्स खरेदी करण्यासाठी तरतूद केली आहे.

भारतीय बाजार पेठेत वेगवेगळ्या कंपन्याचे टिपर्स उपलब्ध आहेत. त्यानुसार डी. जी. एस. ॲन्ड डी. किंवा गर्व्हमेंट रेटस् प्रमाणे टिप्पर्स खरेदी करण्याकरिता खालील उत्पादक कंपन्यांना व त्यांच्या अधिकृत विक्रेत्यांकडून ४ टन कचरा वाहनु नेण्यासाठीच्या दृष्टीने योग्य अशा चेसीसवर टिप्पर बॉडी व टिपींग फिटसहचे दरपत्रके मागविण्यात आले आहेत.

१) **स्वराज्य माझदा कंपनीच्या टिप्पर्ससाठी :**
अ) स्वराज माझदा लि. अहमदाबाद - (उत्पादक कंपनी)
ब) भारत इंजिनिअरिंग कंपनी औरंगाबाद (अधिकृत विक्रेते)

२) **आयशर कंपनीच्या टिप्पर्ससाठी :**
अ) आयशर मोटर लि. पितबरपुर - (उत्पादक कंपनी)
ब) कैलास एजन्सीज प्रा. लि. औरंगाबाद (अधिकृत विक्रेते)

३) **लेलँन्ड कंपनीच्या टिप्पर्ससाठी :**
अ) अशोक लेलॅन्ड, मुंबई - (उत्पादक कंपनी)
ब) ॲटोमोटीव्ह मॅन्युफॅक्चर्स लि. औरंगाबाद (अधिकृत विक्रेते)

४) **टाटा कंपनीच्या टिप्पर्ससाठी :**
अ) टाटा इंजिनिअरींग ॲन्ड लेकोमोटीव्ह कंपनी लि. मुंबई - (उत्पादक कंपनी)

ब) सतिष मोटार्स प्रा. लि. औरंगाबाद (अधिकृत विक्रेते)

वरील सर्व कंपन्याकडून व अधिकृत विक्रेत्याकडून खालीलप्रमाणे दरपत्रके वसूल झाले आहेत.

१) स्वराज माझदा या कंपनीने दिलेले दरपत्रक मे. भारत इंजिनिअरींग कंपनी माफ्रत प्राप्त झाले आहे. सदरील उत्पादक कंपनीने ४ टन कॅपॅसिटीचे व ३.५ क्युबीक मिटर कॅपासिटीचे करिता दर खालीलप्रमाणे दिले आहेत.
रुपये ६,०९,६०७=०० डी. जी. एस. ॲन्ड डी. दराप्रमाणे व सर्व टॅक्सेस सह मात्र जकात वगळून हे दर आहेत.

२) आयशर मोटार्स लि. या कंपनीचे दरपत्रक मे. कैलास एजन्सीज प्रा. लि. औरंगाबाद यांच्या मार्फत प्राप्त झाले आहेत. ३.८ क्युबीक मीटर कॅपोसिटीचे बंद बॉडी टाईप टिप्परसाठी त्यांचे दर ६,६९,२८४/- आहेत व फक्त टिप्पींग बॉडीसाठी त्याचे दर रु. ५,७३,६२०=०० आहेत. सदरील वाहने जापान टेक्नॉलॉजिची असून आयशर कंपनीची वाहने पण चांगली आहेत.

३) अशोक लेलॅन्ड कंपनीच्या टिप्पर्ससाठी वाहने मे. ॲटोमोटीव्ह मॅन्युफॅक्यचर्स, लि. औरंगाबाद यांनी ६.४ क्युबीक मीटर कॅपॅसिटीच्या टिप्परसाठी खालीलप्रमाणे दर दिलेले आहेत.
रुपये ६,८५,८६१=०० सदरील दर सर्व टॅक्सेस सह असून मात्र जकात दर वगळून आहेत. ४ टनी टिप्परच्या तुलनेत सदरील मॉडेल मोठे आहे व किंमत जास्ती आहे.

४) टाटा इंजिनिअरींग ॲन्ड लोकोमोटीव्ह कंपनी लि. मुंबई यांनी पत्र दिले आहे की, मे. सतिष मोटार्स प्रा. लि. औरंगाबाद हे गर्व्हमेंट दराप्रमाणे दरपत्रक देतील. त्या प्रमाणे मे. सतिष मोटार्स प्रा. लि. औरंगाबाद यांनी टाटा-७०९ मॉडेल चेसीसवर ४ क्युबीक मीटर कॅपॅसिटीचे टिप्पर करीत गर्व्हमेंट रेटस, खालीलप्रमाणे दिले आहेत. रु. ५,१७,४८०=०० चे ददरत्रक दिलेले आहे. सदरील दर सर्व टॅक्सेससह असून मात्र जकात कर वगळून आहेत.

टाटा कंपनीचे टिप्पर्स चांगल्या प्रतीचे आहेत.

अशा प्रकारे ४ टन लोर्डीगच्या टिप्पर्ससाठीचे दर जकात कर वगळुन खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | टाटा-७०९ वर बसविलेले | रु. ५,१७,०००/- |
| २) | आयशर मॉडेल-१०७० वर बसविलेले | रु. ५,७३,६२०/- |
| ३) | स्वराज माझदा मॉडेल वर बसविलेले | रु. ६,०९,६०७/- |

मा. आयुक्तांनी ३ टाटा टिप्पर्स खरेदी करण्यास मंजुरी दिली आहे. व स्थायी समिती समोर सादर करण्याचे आदेशित केले आहेत. प्रत्येक कंपनीच्या दरात फरक असतोच. टाटा कंपनीचे टिप्पर्स कमी दराचे आहेत. प्रत्येक कंपनीने दरामध्ये डिलीव्हरीच्या दिवशी कमी-जास्त दर झाल्यास त्याप्रमाणे अदायी करावी लागेल. अशी अट घातली आहे व टिप्पर्सचा पुरवठा, बिलाची अदायी झाल्या नंतरच केली जाईल अशी अट आहे.

तरी टिप्पर्स खरेदी बाबत स्थायी समितीच्या निर्णयास्तव मंजुरीस्तव सादर सन १९९८-९९ य वर्षी वाहन खरेदीसाठी ठेवलेल्या रु. ६० लाखाचे तरतुदीतून टिप्पर्स खरेदी करण्यास मंजुरी मिळावी.

**संवाद :**

**श्री. विकास जैन :** झोन नं. ६ मध्ये कचरा उलण्यास गाड्या नाहीत या झोनमध्ये १४ वॉर्ड येतात. तीन गाड्या कोणकोणत्या झोनला देणार आहे.

**मा. सभापती :** गाड्या घेणे आवश्यक आहेत. परंतु काही ठिकाणी ८-८ दिवस कचरा उचलल्या जात नाही. यासाठी अधिकारी यांनी जाणीवपूर्वक लक्ष द्यावयास पाहिजे.

**उपअभियंता (यांत्रिकी) :** बजेटमध्ये तरतूद आहे.

**श्री. ढगे नरसिंग :** मा. आयुक्त श्री. भोगे साहेब असतांना गाड्यांची संख्या कमी असतांना केरकचरा पडून राहत नव्हता. माझ्या वॉर्डात काही ठिकाणी खूपच कचरा साचलेला आहे. त्यासाठी लेबर कर्मचारी वर्ग वाढवावा. गाड्या महत्त्वाच्या नसून तीनही गाड्या खरेदी करण्याच्या रद्द कराव्या व झोन ऑफिसमध्ये चौकशी करून, गाड्या किती, कचरा उचलणारे लेबर कर्मचारी किती यांची माहिती द्यावी.

**उपअभियंता (यांत्रिकी) :** सध्या ३२ गाड्या आहेत.

**श्री. म. स. एकबालोद्दिन :** प्रत्येक अधिकाऱ्यांकडे ५ ते ६ मजूर कर्मचारी आहेत त्यातील कमी करून कचरा भरण्यासाठी काहीचा समावेश करावा.

**श्री. राजकुमार बचाटे, श्री. म. अ. रऊफ, श्री. विकास जैन :** प्रत्येक झोनला एक गाडी देण्यात यावी.

**मा. सभापती :** शहरातील प्रत्येक झोनला गाड्या आवश्यक आहे. सध्या ३ गाड्याची खरेदी करण्यांस मंजुरी देण्यात येते. व ३ गाड्याची अंदाजपत्रक पुढच्या बैठकीत संबंधित अधिकारी यांनी तसा प्रस्ताव ठेवावा. या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहराच्या वाढता विस्तार लक्षात घेता सध्या स्वच्छतेच्या कामासाठी उपलब्ध असलेली वाहने कमी पडत असल्याने मे. टाटा इंजिनिअरींग ॲन्ड लोकोमोटीव्ह कंपनी लि. मुंबई यांचे अधिकृत विक्रेते मे. सतिश मोटार्स प्रा. लि. औरंगाबाद यांचेकडून जकात कर वगळता सर्व करासहित रुपये ५,१७,४८०/- प्रतिनग या प्रमाणे तीन नगर ४ क्युविक मीटर कॅपॅसिटीचे टाटा-७०९ मॉडेलचे टिप्पर खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

खरेदी करण्यात येणाऱ्या तीन टिप्पर स्वच्छतेच्या कामासाठी अपुरे पडणार असल्याने प्रत्येक झोनसाठी संबंधित विभागाने आगामी सभेत ठेवावे असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८१/३५ :**

मा. कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनिःसारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. मकसूद कॉलनी, करीम कॉलनी येथे १५० मी.मी. व्यासाची एस. डब्ल्यु. जी लाईन काढून नवीन २५० मी.मी. आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता महाराष्ट्र जिवन प्राधिकरण खात्याच्या सन १९९७-९८ च्या दरसूचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रुपये १,१६,१८०/- चे तयार करण्यात आले असून सदरील काम भांडवली कामे या लेखा शिर्षकातून प्रस्तावित केले आहे.

करिता सदरील कामास मा. आयुक्तांनी दि. ०३-०९-९८ ला मंजुरी दिलेली आहे. तरी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. मकसूद कॉलनी, करीम कॉलनी येथे १५० मी.मी. व्यासाची एस. डब्ल्यु जी लाईन काढून नवीन २५० मी.मी. आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. १,१६,१८०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८२/३६ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु. व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, दोन कोटी शासकीय अनुदान सन ९७-९८ मधून पाणी पुरवठा विभागाची खालील प्रमाणेची कामे करण्यास सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. १५१/१५ दि. १५-१२-९७ अन्वये मान्यता देण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| १) | जय शिव भारती कॉलनी जलकुंभापासून वितरण व्यवस्थेसाठी विविध व्यासाच्या जलवाहिन्या टाकणे. | ५९.५८ लाख |
| २) | राजाबार कुँवारफल्ली येथे दुषित पाणी पुरवठा होत असल्यामुळे नविन सी.आय.जलवाहिनी टाकणे | |
| ३) | इंदिरानगर बायजीपुरा येथे विविध व्यासाच्या जलवाहिनी टाकणे. | |

त्याप्रमाणे निविदा मागविण्यात आल्या असता निविदेतील दर जास्त असल्यामुळे व सन ९७-९८ दरपत्रक नुसार अंदाजपत्रक तयार करण्यात येवून फेर निविदा काढण्यास मा. आयुक्त यांनी आदेश दिले. त्यानुसार वरील तीन्ही कामासाठी रक्कम रुपये ७२,३३,८८५/- एवढ्याचे वाढीव अंदाजपत्रक रक्कम झाली आहे. म्हणजेच रक्कम रु. १२,७५,८८५/- एवढ्याचे वाढीव अंदाजपत्रक तयार झाली आहेत. तरी वाढीव अंदाजपत्रक रक्कम रु. १२,७५,८८५/- चे विशेष बाब मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे (१) जय शिव भारती कॉलनी जलकुंभापासून वितरण व्यवस्थेसाठी विविध व्यासाच्या जलवाहिण्या टाकणे. (२) राजाबार कुंवारफल्ली येथे दुषित पाणी पुरवठा होत असल्यामुळे नविन सी.आय.जलवाहिनी टाकणे (३) इंदिरानगर बायजीपुरा येथे विविध व्यासाच्या जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या पूर्वीचे मंजूर अंदाजपत्रक र रु. ५९,५८ लाखाचे मंजुर अंदाजपत्रका व्यतिरिक्त वाढीव रक्कम रु. १२,७५,८८५/- च्या अंदाजपत्रकास विशेष बाब म्हणून सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८३/३७ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु. व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जायकवाडी जुने पंप हाऊस येथील ४०० अश्वशक्ती मोटरची रिवायंडीग व दुरुस्ती करण्यांसाठी बाजारातील दराप्रमाणे रु. २,०८,५७७/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर कामाचा खर्च हा पाणी पुरवठा देखभाल दुरुस्तीच्या आर्थिक तरतूदीतून करण्यात येणार आहे.

तरी अंदाजपत्रक रु. २,०८,५७७/- च्या मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जायकवाडी जुने पंप हाऊस येथील ४०० अश्वशक्ती मोटरची रिवायंडीग व दुरुस्ती करण्यांकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. २,०८,५७७/- च्या अंदाजपत्रकास विशेष बाब म्हणून सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८४/३८ :**

कार्यकारी अभियंता व जलनिःसारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या जायकवाडी व फारोळा येथील नविन पंपगृहाच्या पॅनलबोर्ड वरील रिले टेस्टींग करणे आहे.

त्यासाठी म.जी. प्रा. च्या मंजुरी अंदाजपत्रकाप्रमाणे रक्कम रु. १,११,५२३/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर कामाचा खर्च हा पाणी पुरवठा देखभाल व दुरुस्तीच्या आर्थिक तरतूदीतून करण्यात येणार आहे.

तरी अंदाजपत्रक रु. १,११,५२३/- चे मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या जायकवाडी व फारोळा येथील नविन पंपगृहाच्या पॅनलबोर्ड वरील रिले टेस्टींग करण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. १,११,५२३/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८५/३९ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. सादनगर स्लम भागातील नाल्यातील गाळ काढणे कामाकरिता अंदाजपत्रक रक्कम रु. १,३३,३००/- सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांची दरसूची १९९७-९८ अनुसार तयार करण्यात आली असून मा. आयुक्तांनी दि. २०-०८-९८ रोजी प्रशासकीय मान्यता प्रधान केली आहे.

सदर काम अर्थसंकल्प १९९८-९९ लेखाशिर्ष पाणीपुरवठा व जलनिःसारण ठेवण्यात आलेली तरतूदीमधून खर्च करण्याचे प्रस्तावित आहे.

करिता मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सादनगर स्लम भागातील नाल्यातील गाळ काढणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. १,३३,३००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८६/४० :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. इंदिरानगर बायजीपुरा स्लम येथे ५ फुट गल्लीत शहाबाद फरशी बसविणे बाबत कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खते यांच्या वर्ष ९६-९७ च्या दरसूचीनुसार रक्कम रु. ९,६५,८००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम "खांडकी रस्ते" या शिर्षकातून करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. १६-०६-९८ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे. तसेच अंदाजपत्रकास स्थायी समितीत दिनांक २६-०६-९८ ला मंजुरी मिळालेली आहे.

प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यात आले असता अंतिम तारखेपर्यंत एकूण ८ निविदा प्राप्त झाल्या व उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| १) | महेंद्र कन्स्ट्रक्शन | ३६.३०% कमी |
| २) | परफेक्ट कन्स्ट्रक्शन | ३५.३३% कमी |
| ३) | ए. एम. फारुकी | ३४.८६% कमी |
| ४) | बसरा कन्स्ट्रक्शन | ३३.३३% कमी |
| ५) | अंबादास पिसोळकर | २४.८२% कमी |
| ६) | आनंद बिल्डर्स | २४.३% कमी |
| ७) | एम. जे. कन्स्ट्रक्शन | २०.८६% कमी |
| ८) | एस.एच. असोसिएटस | १७.१७% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३६.३०% कमी दराची असलेली महेंद्र कन्स्ट्रक्शन यांची निविदेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे इंदिरानगर बायजीपुरा स्लम येथे ५ फुट गल्लीत शहाबाद फरशी बसविणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३६.३०% कमी दराची महेंद्र कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८७/४१ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. घाटी जयभिमनगर स्लम येथे गुलाबडवाडी परिसरासाठी जोड रस्ता तयार करणे बाबत कामाकरिता सा. बां. खाते यांच्या वर्ष ९६-९७ च्या दरसूचीनुसार रक्कम रु. १५,३१,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामा "खडी रस्ते" या शिर्षकातून करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. १८-१२-९७ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे. प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता अंतिम तारखेपर्यंत एकूण १९ निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेवर्यंत एकूण ३ निविदा प्राप्त झाल्या व उपस्थित गुत्तेदारासमोर उघडण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| १) | न्यु स्टार कन्स्ट्रक्शन | ५.५% जास्त |
| २) | कुलवंतसिंग | १५% कमी |
| ३) | सलीम पटेल | २०% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.५% जास्त दराची निविदा मे. न्यु. स्टार कन्स्ट्रक्शन यांची आहे. परंतु मा. आयुक्त यांच्या दालनात दराच्या वाटाघाटीसाठी बोलवले असता सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% जास्त दराने करण्यास एजन्सीने लेखी संमती दिली आहे. करिता मे. न्यु स्टार कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% जास्त दराची निविदेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे घाटी जयभिमनगर स्लम येथे गुलाबडवाडी परिसरासाठी जोड रस्ता तयार करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम अंदाजपत्रकीय

दरापेक्षा २% जास्त दराने मे. न्यु. स्टार कन्स्ट्रक्शन यांचेकडून करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८८/४२ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. गौतमनगर स्लम येथील गटाराची उंची वाढविणे व अंतर्गत भागात अर्धगोलाकार आर. सी. सी. गटार बांधणे बाबत कामाकरिता सा. बां. यांच्या वर्ष ९६-९७ च्या दरसूचीनुसार रु. ६,९१,३००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम "खडी रस्ते" या शिर्षकातून करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. २९-०८-९८ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेलेल रु. ६,९१,३००/- चे अंदाजपत्रकास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गौतमनगर स्लम येथील गटाराची उंची वाढविणे व अंतर्गत भागात अर्धगोलाकार आर. सी. सी. गटार बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ६,९१,३००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८९/४३ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. संसारनगर येथे शहाबाद फरशी व काँक्रीट रस्ते करिता अंदाजपत्रक रक्कम रु. ३,७०,६५८/- सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांची दरसूची १९९७-९८ अनुसार तयार करण्यात आली असून मा. आयुक्तांनी दि. ०७-०९-९८ रोजी प्रशासकीय मान्यता प्रधान केली आहे.

सदरील काम अर्थसंकल्प १९९८-९९ लेख (शिर्ष खांडकी/ फरशी रस्ते) ठेवण्यात आलेली तरतूद मधून ५०५ उर्वरित ५०% रक्कम १० वा वित्त आयोतून खर्च करण्यांचे प्रस्तावित आहे. करिता मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संसारनगर येथे शहाबाद फरशी व काँक्रीट रस्ते तया करण्याकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ३,७०,६५८/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९०/४४ :**

उपआयुक्त (म.) यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद महानगरपालिका अंतर्गत प्राणी संग्रहालयातील सर्पोदयानाची खाद्य खर्चासह सर्पाची देखभाल करणे करिता सन १९९८-९९ या एका वित्तीय वर्षाकरिता वार्षिक ठेका मासिक पध्दतीने देण्याबद्दलचे वर्तमान पत्राद्वारे निविदा मागविण्यात आल्या होत्या. पैकी एक निविदा प्राप्त झाली.

| | निविदाधारकाचे नांव | दर |
|---|---|---|
| १) | श्री. बबनराव रावजी उजीवाल, रा. पदमपुरा, औरंगाबाद | प्रतिमाह/ प्रतिसर्प (खाद्यखर्चासह) रु. १५०/- |

वरीलप्रमाणे एकच निविदा प्राप्त झाल्याने मा. आयुक्त यांचे दालनात सदर निविदाधारका सोबत झालेल्या वाटाघाटीनंतर प्रतिमहा/प्रतिसर्प (खाद्यखर्चासह) रु. १२०/- (रुपये एकशेवीस मात्र ) देण्याचे मान्य केले आहे.

तरी संबंधिताचे दर दिनांक ०१-०८-९८ ते ३१-०३-९९ पर्यंत प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका अंतर्गत प्राणी संग्रहालयातील सर्पोदयानाची खाद्य खर्चासह सर्पाची देखभाल करणे करिता सन १९९८-९९ या एका वित्तीय वर्षाकरिता वार्षिक ठेका मासिक पध्दतीने प्रतिमहा प्रतिसर्प रु. १२०/- या दराने श्री. बबनराव रावजी उजीवाल, रा. पदमपुरा, औरंगाबाद यांना देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९१/४५ :**

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा व जलनिःसारण) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, संजयनगर गल्ली क्र. १ येथील सौ. रजनी मधुरदास वैष्णव यांच्या मालकीची विहिर महानगरपालिका २५ वर्षाकरिता भाडेपट्ट्याने घेऊ इच्छित आहे. या विहिरीचे पाणी, कैलासनगर स्मशानभूमी येथे व आणीबाणीच्या वेळेस पाणी पुरवठा करण्याकरिता वापरण्यात येईल. या विहिरीसाठी प्रतिवर्ष रु. १५००/- रु. मानधन म्हणून संबंधित विहीर मालकास देण्यात येईल व करारपत्राच्या वेळेस ११ वर्षाचे मानधन रु. १६,५००/- अगाऊ देण्यात येईल व उर्वरित पुढील १४ वर्षाकरिता प्रतिवर्ष्र्षी करिता रु. १५००/- मानधन म्हणून देण्यात येईल. तरी विहिर भाडेपट्ट्याने घेण्याचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर. करारनाम्याचा पुढील कार्यवाही मालमत्ता विभागाकडडे करण्यात येईल.

**संवाद :**

**मा. सभापती :** दि. २८-०८-९८ इतिवृत्तातील विष्ज्ञय क्र. १६५/१० स्थगित ठेवण्यात आलेला होत. त्यास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संजयनगर गल्ली नं. १ येथील सौ. रजनी मधुरदास वैष्णव यांच्या मालकीचे विहिरीचे पाणी, कैलासनगर स्मशानभूमी आणि आणीबाणीच्या वेळी पाणीपुरवठ्याच्या कामी वापरण्यासाठी विहिर मालकास प्रतिवर्ष रु. १५००/- मानधन या प्रमाणे २५ वर्षाच्या भाडेपट्ट्याने घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. भाडेपट्ट्या बाबतचा करार करतान प्रतिवर्ष रु. १५००/- या प्रमाणे ११ वषाच्या भाडेपट्ट्याची रक्कम रु. १६,५००/- आगाऊ देण्यास तसेच पुढील १४ वर्षाकरिता प्रतिवर्ष रु. १५००/- या प्रमाणे विहिर मालकास मानधन देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९१/४५ :**

मो. मोतीकारंजा येथील ४० फुट रुंद रस्त्याच्या विकासानंतर न.भु.क्र. ७९४१ च्या समोरील १९.५० चौ. मी. एवढ्या क्षेत्रफळाची खूली जागा अर्जदार श्री. भास्करराव पा. नारायणराव कुलकर्णी यांनी भाडेपट्ट्याने मागितली आहे. तरी सदर जागेवर कोणतेही बांधकाम करता येणार नाही व नेहमीच्या अटी व शर्तीवर व योग्य ते भाडे ठरवून

अर्जदारास देण्याबाबतचा प्रस्ताव मंजुरीसाठी सादर. प्रस्ताव मान्यतेनंतर उर्वरित कार्यवाही मालमत्ता विभागातर्फे करण्यात येईल. प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** दि. २८-०८-९८ च्या इतिवृत्तातील विषय क्र. १७४/१९ स्थगित ठेवण्यात आलेला होता. त्यास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोतीकारंजा येथील ४०" फुट रुंद रस्त्याच्या विकासानंतर नगर भूमापन क्र. ७९४१ च्या समोर खुली राहिलेली ल १९.५० चौ. मी. क्षेत्रफळाची जागा सदर जागेवर सदर जागेवर कोणतेही बांधकाम करता येणार नाही तसेच नेहमीच्या अटी व शर्तीवर व योग्य ते भाडे ठरवून अर्जदार श्री. भास्करराव पा. नारायणराव कुलकर्णी यांना भाडेपट्ट्याने देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी जाहीर केले.

स्वाक्षरीत/-
नगर सचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
मा. सभापती,
स्थायी समिती,
महानगरपालिका, औरंगाबाद

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.*

**दिनांक १६-१०-९८ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. मा. सभापती श्री. जयवंत ओक, यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा महानगरपालिका औरंगाबाद येथील "मलिक अंबर" स्थायी समिती सभागृहात दि. १६-१०-९८ रोजी संपन्न झाली तिचे इतिवृत्त. सभेची सुरुवात "वंदे मातरम्" या गिताने दुपारी ४=०० ऐवजी ५.४५ वाजता झाली. या सभेस कार्यालयीन अधिकारी वर्ग व खालील स. सदस्य उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स.स. श्री. प्रभाकर सिताराम विधाते | स. सदस्य |
| २) | स.स. श्री. अ. रऊफ म. अ. माबूद | -//- |
| ३) | स.स. श्री. स. अली मिरा सलामी | -//- |
| ४) | स.स. श्री. संजय जोशी | -//- |
| ५) | स.स. श्री. गौतम लांडगे | -//- |
| ६) | स.स. श्री. गांगवे बन्सी तुळशीराम | -//- |
| ७) | स.स. श्री. इंगळे रविंद्र बाबुराव | -//- |
| ८) | स.स. सौ. यशोदा धनंजय वाडेकर | -//- |
| ९) | स.स. श्री. जैन विकास रतनलाल | -//- |
| १०) | स.स. श्री. ढगे नरसिंग मुरलीधर | -//- |
| ११) | स.स. सौ. राधाबाई तळेकर | -//- |
| १२) | स.स. श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | -//- |
| १३) | स.स. श्री. बचाटे राजकुमार (मामा) | -//- |
| १४) | स.स. श्री. विखारोद्दिन पि. खुदबोद्दिन | -//- |
| १५) | स.स. श्री. स. अ. एकबालोद्दिन स. मो. कुतूबोद्दिन | -//- |

**संवाद :**

**श्री. संजय जोशी :** गुलमंडी प्रभागात येत असलेल्या गोकुळनाथ वस्तीतील इमारत कोसळून त्यात श्रीमती मैनाबाई कुलकर्णी यांचे अपघाती निधन झाले. त्यांना समभागृहात ०२ मिनिटे श्रध्दांजली अर्पण करावी.

**मा. सभापती :** श्रीमती मैनाबाई कुलकर्णी यांचे अपघाती निधानानिमित्त त्यांना सभागृहात ०२ मिनिटे श्रध्दांजली वाहण्यात येते. यावेळी स्व. श्रीमती मैनाबाई कुलकर्णी यांचे अपघाती निधनाबाद्दन सभागृहाने ०२ मिनिटे उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.

**संवाद :**

**श्री. विखारोद्दिन :** सभेची वेळ दर्शविल्यानुसार आजची सभा उशिरा होत आहे. सभागृहात अधिकारी वर्गही उपस्थित नसल्याने आजची सभा उद्या आयोजित करण्यात यावी.

**मा. सभापती :** उद्या सर्वसाधारण सभा असल्याने सभा आजच घ्यावी लागणार आहे. गुलमंडी प्रभागात जुनी इमारत कोसळून श्रीमती मैनाबाई कुलकर्णी यांचे त्यात अपघातील निधन झालेले आहे. सदर ठिकाणी अधिकारी, पदाधिकारी व मी स्वतः पाहणी करण्यासाठी गेलेलो होतो. त्यामुळे सभेला वेळ झालेला आहे.

**श्री. स. अली मिरा सलामी :** महाराष्ट्र शासनाचे सचिव श्री. नंदलाल औरंगाबादला आले होते. मा. आयुक्त यांच्या समवेत विविध बाबींवर चर्चा झाली आहे. त्यात महानगरपालिका व छावणी बोर्ड या अंतर्गत असलेल्या नगरनाका येथील नाक्यावरून जकात उत्पन्न महापालिकेला मिळते. त्या उत्पन्नाच्या दृष्टीने महापालिकेने छावणी बोर्डला किती रक्कम वर्षाला अदा करावी याबाबत चर्चा झालेली आहे काय? सदर नगरनाक्याची जागा ही छावणी बोर्डची असून महापालिका छावणी बोर्डला दरवर्षी पैसे देते. छावणी बोर्ड व महानगरपालिका यांच्यात न्यायालयात दावा चालू आहे. त्याचा काय निर्णय झालेला आहे. नसता छावणी बोर्ड? जानेवारी रोजी सदर नाक्याची जागा ताब्यात घेणार आहे. असे कळते. जर जागा ताब्यात घेतली तर महानगरपालिकाने जकात वसुलीसाठी काय पर्यायी व्यवस्था केलेली आहे काय?

**मा. सभापती :** उपआयुक्त (प्र.) यांनी माहिती द्यावी.

**उप आयुक्त (प्र.) :** महाराष्ट्र शासनाचे सचिव श्री. नंदलाल यांना उच्च न्यायालयाने सेवा निवृत्तीचे वय ५८ वर्षे ठेवण्याच्या संदर्भाने न्यायालयात हजर राहण्याबाबत कळविलेले होते. त्यानुसार ते हजर झाले. छावणी बोर्ड संदर्भात कुठली चर्चा करण्यासाठी आलेले नव्हते. उपआयुक्त (म.) हे मंत्रालयात गेलेले होते ते माहिती देतील.

**मा. सभापती :** उपआयुक्त (म.) यांनी माहिती द्यावी.

**उप आयुक्त (म.) :** छावणी बोर्ड व महानगरपालिका यांचा जकातीबाबतचा वाद उच्च न्यायालयात चालू आहे. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार महापालिकेने छावणी बोर्ड ४० लक्ष रु. द्यावे. सदरच्या निर्णयाचे आदेश राज्य शासनाने काढावे व केंद्र शासनाकडे पाठवून त्यास मान्यता घ्यावी. छावणी बोर्डचे म्हणणे असे की, महानगरपालिकेने जकातीच्या उत्पन्नाच्या प्रमाणात हिस्सा द्यावा. सर्वसाधारणता छावणी बोर्डची मागणी ही १.८२ कोटी रु. ची होती व महानगरपालिकेचे म्हणणे असे की, १९८२ च्या करारानुसार ९७%, ३% या प्रमाणे आजापर्यात देऊ इच्छितो. १९९२-९७ या कालावधीमध्ये २० लक्ष रु. प्रतिवर्ष महानगरपालिका छावणी बोर्डला अदा करत आलेली आहे. यानंतर पुन्हा बैठक होऊन त्यात ३० लक्ष देण्याचे मान्य केले. पुन्हा छावणी बोर्डची मागणी वाढली व हे प्रकरण उच्च न्यायालयात गेले व न्यायालयाने ४० लक्ष छावणी बोर्डला द्यावे असा निर्णय दिला. परंतु महानगरपालिकाने असे मत मांडले की, कलम ३२(४) व (५) अन्वये लोकसंख्येच्या प्रमाणकानुसार कुठल्याही प्रकारची जकात कराची मागणी देण्यात येऊ नये व तशी अधिनियमात तरतूद नाही. असे म्हणणे मा. सचिवासमोर मांडले. छावणी बोर्डने असे म्हणणे मांडले की, १९९१ च्या जनगणनेनुसार छावणी छोर्डची लोकसंख्या १९ हजार दर्शविण्यात आलेली आहे. त्यामध्ये जे सैनिक आहे त्यांचा ही समावेश येतो. तसा विचार केल्यास जे सैनिक आहेत त्यांचा यात समावेश करायला नको होता. १९९१ च्या जनगणनेनुसार छावणी बोर्डच्या लोकसंख्या १९,००० आणि ५,७४,०००/- ची लोकसंख्या यांचे प्रपोर्शन ३.४% येते. सर्वसाधारणपणे नगर नाक्याचे उत्पन्न ६ कोटी १८ लाख गृहित धरले तर त्यांच्या ३.४% प्रमाणे २२ लाख रु. होतात. त्याऐवजी महानगरपालिका रु. ३० लाख रुपये जकातची हिस्सा छावणी बोर्डला देतो. अशा प्रकारचे

म्हणणे महनगरपालिकेने मांडले आहे. यावेळी छावणी बोर्डाने असे म्हणणे मांडले की, रहदारी फि वसूल करण्याचे काम बोर्डाने केले तर त्यापासून बोर्डाला एक ते दीड कोटीचे उत्पन्न मिळते. या दृष्टीने सर्वे केला असता रहदारी पासून २० लाख रुपये आणि छावणी भागात असलेल्या दुकानापासून (एकूण ५० ते ६० प्रकारचे दुकाने आहेत त्यापेकी १० दुकाने मोठ्या पण मध्यम स्वरुपपाची आणि बाकीची लाहन दुकाने) मिळणारे जकातचे उत्पन्न २ लाख ६२ हजाराचे उत्पन्न मिळणार आहे. यानुसार बोर्डाला वार्षिक उत्पन्न २२.५० ते २३ लाखापर्यंत उत्पन्न मिळाले असते. त्याऐवजी महापालिका छावणी बोर्डाला रु. ३० लाख देण्याचे आव्हान केले आहे. अशा प्रकारे दोन्ही ही बाजू महापालिकेतर्फे शासनाला समाजवून सांगण्यात आल्या आहेत. छावणी बोर्डाने लोकसंख्येच्या प्रमाणात एकूण जकात उत्पन्नाच्या प्रमाणानुसार १ कोटी ८२ लाखाची मागणी केली आहे. यावर महापालिकेने ३० लाख रुपये देण्याचे म्हणणे मांडले आहे. तथापि यावर अद्यापही निर्णय झालेला नाही.

**श्री. स. अली मिरा सलामी :** निर्णय काही होऊ शकतो. केंद्र शासनाकडे सदर रक्कम देण्याबाबत माहिती पाठवली त्यानंतरही केंद्र शासन नामंजूर करू शकते. परंतु छावणी बोर्डने असा निर्णय घेतलेला आहे की, १ जानेवारी पर्यंत महापालिकेने जकात वसुली रक्कम देण्याबाबत चा काहीही निर्णय घेतला नाही तर सदर नगरनाका व छावणी बोर्डच्या अंतर्गत येणारी जागा ही छावणी बोर्ड ताब्यात घेणार आहे असे कळते. तर त्यावेळी महापापलिकाने नाका स्थलांतर व वाहतुक व्यवस्थेसाठी काही पर्यायी व्यवथा केलेली आहे काय?

**श्री. विखारोद्दिन :** मा. महापौर यांच्या दालनात छावणी बोर्डला ३० लक्ष देण्यात यावे असे ठरले. व नंतर ४० लक्ष झाले यावरून छावणी बोर्डला जकात कर वसुलइ बाबत नेकमी किती रक्कम द्यावी असे निश्चित काहीही निर्णय झालेला दिसत नाही.

**मा. सभापती :** सदर विषय हा शासनाच्या विचाराधीन असून लवकरात लवकर मार्ग कसा निघेल त्याचे प्रयत्न करावे.

**श्री. स. अली मिरा सलामी :** १ जानेवारी ९९ पासून छावणी बोर्ड नगरनाका व छावणी बोर्ड अंतर्गत येणाऱ्या जागेमध्ये तोल नाका करणार आहे. असा निर्णय त्यांनी घेतलेला आहे. महापालिकेचे या संदर्भात काही पुढील नियोजन काय आहे. नाक्याचा हिस्सा तेथून मिळणार आहे काय?

**मा. आयुक्त :** छावणी व महानगरपालिका यांच्यात जकातीचा वाटा काय असावा याबाबत वाद चालू आहे. छावणी बोर्डला महानगरपालिका जकातीचा मोबदला म्हणून २० लक्ष रु. देत आलेली आहे. छावणी बोर्डची मागणी ही १.२१ कोटी रुपयाची असून लोकसंख्येच्या प्रमाणकानुसार जकातीचा मोबदला रक्कम द्यावी असे म्हणणे आहे. ती मागणी महापालिकाने फेटाळली. याबाबत एकूण ३ बैठका झालेल्या आहेत. पहिली बैठक प्रशासकीय स्थरांवर झालेली आहे. दुसरी बैठक माजी महापौर श्री. रशीदखॉन (मामू) यांच्या कालावधीत व तिसरी बैठक मा. महापौर सौ. शिलाताई गुंजाळे यांच्या समवेत झालेली आहे. तडजोडी (सेटलमेंट) करण्यास नका दिलेला आहे. मा. उच्च न्यायालयाच्या अंतिरिक आदेशाप्रमाणे प्रथम ३० लक्ष नंतर ४० लक्ष देत

आहोत. मा. उच्च न्यायालयाचे असे ही आदेत आहेत की, शासनाने मध्यस्थी करून महानगरपालिकाने छावणी बोर्डला योग्य ते आदेश द्यावेत या संदर्भात शासनाने महानगरपालिका व छावणी बोर्डला सुनावणी दिलेली असून शासनाचे आदेश आल्यानंतर सभागृहात माहिती देण्यात येईल.

**श्री. स. अली मिरा सलामी :** दिनांक ०१-०१-९९ पासून त्यांचा या ठिकाणी तोल नाका सुरू करण्याचा प्रस्ताव आहे. या संदर्भात महापालिका प्रशासनाने काय उपाययोजना केलेली आहे.

**मा. सभापती :** तसे पत्र छावणी बोर्ड कडून महापालिका प्रशासनाकडे आलेले नाही. पत्र आल्यानंतर कार्यवाही करता येईल.

**श्री. स. अली मिरा सलामी :** छावणी बोर्डने महानगरपालिका पत्र दिल्यावरच तेथील काम चालू राहील काय? आपले देखील पुढील नियोजन असणे आवश्यक आहे.

**मा. सभापती :** छावणी बोर्ड हे नियमाप्रमाणेच काम करील सदर प्रकरण हे उच्च न्यायालयातील आहे.

**श्री. प्रभाकर विधाते :** गुलमंडी प्रभागात श्रीमती मैनाबाई कुलकर्णी यांचे इमारत कोसळून निधन झालेले आहे. त्यांना सभागृहात श्रध्दांजली अर्पण करण्यात आलेली आहे. सदर महिला ही गरीब असून त्यांना एक मुलगी आहे. महानगरपालिका फंडातून ५०००/- रु. ची तातडीची मदत म्हणून देण्यात यावी.

**श्री. स. अली मिरा सलामी :** महानगरपालिका फंडातून ५०००/- रु. ची आर्थिक मदत म्हणून देण्यास हरकत नसावी.

**मा. सभापती :** महानगरपालिका फंडातून ५,०००/- रु. ची आर्थिक मदत म्हणून प्रशासनाने देण्याची कार्यवाही करावी.

**श्री. संजय जोशी :** बैठकीमध्ये बऱ्याच वेळेस अतिक्रमणा बाबत चर्चा झालेली आहे. त्यानंतर काही ही निर्णय झालेला दिसत नाही. तसेच मा. आयुक्तांना निवेदने ही दिलेली आहे. शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही होत नाही. महानगरपालिकेच्या १६००० हजार स्क्वेअर फुट जागेवर राजनगर येथे एका व्यक्तींने घर बांधले आहे. मधुबन गृहनिर्माण संस्था मधील अतिक्रमण निघालेले नाही. १२ ते १३ हजार स्क्वेअर फुट जागा निघेल. परत स्थगिती आदेश येईल. प्रशासनाला कार्यवाही करण्यासठी वेळ लागतो. त्यामुळे संबंधित अतिक्रमण धारक न्यायालयातून स्थगिती आदेश उपलब्ध करतात त्यामुळे महापालिका प्रशासनाला काहीही कार्यवाही करता येत नाही.

२. पैठण रोड लगत असलेल्या बीड बायपास रोडला टपऱ्या बसलेल्या दिसून येतात. सदर रस्ता हा सार्वजनिक बांधकाम विभागाचा असून संबंधित विभागाकडून परवानगी घेतलेली आहे काय? त्या टऱ्या ज्यांनी पैसे देऊन जागा विकत घेतली आहे त्यांच्या घरासमोर बसलेल्या आहे. त्यामुळे तेथील घर मालकांना त्रास होत आहे.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**सहा. संचालक नगररचना :** सार्वजनिक बांधकाम विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र घेतलेले आहे. उड्डान पुलासाठी टपऱ्या काढण्यात आलेल्या होत्या. त्यापैकी २ लोकांना कृषी कार्यालयासमोर जागा दिलेली आहे.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी त्या टपरीधारकांना पर्यायी दुसऱ्या एकाद्या ठिकाणी टपरीसाठी जागा देण्यात येते काय ते पहावे. पर्यायी जागा देतांना ती कुणाच्या घरासमोर देता कामा नये.

**श्री. संजय जोशी :** संबंधित घर मालकाने मा. आयुक्त यांना पत्र हि दिलेले आहे.

**मालमत्ता अधिकारी :** या संदर्भात संचिका सादर केलेली आहे. कृषि विद्यालयासमोर दोन टपऱ्यांना परवानगी दिलेली आहे.

**श्री. संजय जोशी :** प्लॉट समोर टपरी देणे चुकीचे आहे. पर्यायी जागा द्यावयाची असल्यास महानगरपालिकेच्याच जागेवर देण्यात यावी. विनाकारण कुणाला त्रास होणार नाही यांची दक्षता घ्यावी.

**श्री. विखारोद्दिन :** स. सदस्य यांनी सदर जागा कुठे येते याची माहिती सभागृहात द्यावी जागेचे लोकेशन दाखवण्यात यावे व त्या प्लॉट मालकाचे नाव काय आहे.

**मालमत्ता अधिकारी :** पैठणरोडला बीड बायपास च्या कॉर्नर वर कृषि विद्यालयाच्या समोर ची जागा टपरी धारकांना दिलेली आहे.

**श्री. विखारोद्दिन :** स. सदस्य जे बोलत आहे त्या जागेवर कुणाचेही घर नाही. प्लॉट असेल तर त्या जागा मालकाला काय त्रास आहे. तो रस्ता महानगरपालिकेच्या हद्दित येतो. ज्यांचा उल्लेख स. सदस्य करीत आहे त्या व्यक्तीचा प्लॉट नाही.

**मा. सभापती :** जागेवर जाऊन पाहणी करावी.

**श्री. संजय जोशी :** सदर प्लॉट मालकाला त्या टपरी धारकांकडून त्रास होत आहे. तसा अर्ज त्यांनी मा. आयुक्तांना दिलेला आहे. राजनगर, व मधुबन गृहनिर्माण सोसायटी मध्ये झालेले अतिक्रमण या प्रभाग अंतर्गत असलेले इमारत निरिक्षक यांच्यार संबंधित अधिकारी यांनी कार्यवाही करावी. तसेच संबंधिताने न्यायालायातून स्थगिती आणलेली असेल तसे महानगरपालिकेच्या वकीलाने न्यायालयातून स्थगिती उठविण्याची कार्यवाही करावी. शहरात जेथे जेथे अतिक्रमण झालेले असेल त्याबाबत संबंधित झोन अंतर्गत येणाऱ्या इमारत निरिक्षकांनी कार्यवाही करावी.

**श्री. प्रभाकर विधाते :** बेगमपुरा येथे ६ एकर मध्ये स्मशानभूमी असून त्या ठिकाणी महानगरपालिकेचे तारकुंपनही केलेले आहे. त्यासाठी १० लक्ष रु. खर्च दाखलेला आहे. १० लाखापैकी किती खर्च लागलेला आहे. त्या ठिकाणी विटभट्ट्या थपायी करणारे यांनी अतिक्रमण केलेले आहे.

**मा. सभापती :** सदर ठिकाणी १० लक्ष रु. खर्च करून आदर्श स्मशानभूमी केलेली आहे. १० लक्ष पैकी किती खर्च झालेला आहे. संबंधित अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**उपअभियंता (उद्यान बांधकाम) :** एकूण ७ लक्ष रुपये खर्च झालेला आहे. विटभट्टी बाहेर आहे.

**श्री. प्रभाकर विधाते :** विटभट्टी बाहेर असली तरी विटा आत लावलेल्या आहेत.

**श्री. संजय जोशी :** विटा आता लावणे म्हणजे अतिक्रमण झालेले आहे.

**मा. सभापती :** मा. आयुक्त खुलासा करीत आहे.

**मा. आयुक्त :** बेगमपुरा, मकबरा येथील विटभट्टी धारकाने मागे अतिक्रमण केलेले होते. त्या जागेवरून त्यांना उठविण्यात आलेले होते. पुन्हा अतिक्रमण केलेले असेल तर उठविता येईल. ही सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे. संबंधित अधिकारी यांनी त्या बाबत कार्यवाही करतील.

**श्री. गौतम लांडगे :** दि. १४-०९-९८ रोजी मा. आयुक्तांकडे तक्रार केलेली होती व दि. १५-०९-९८ च्या स्थायी समितीच्या बैठकीत शहरात अतिक्रमण होत आहे. या बाबत चर्चा झालेली होती. संबंधितावर कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासन दिले. मागच्या बैठकीत ही या विषयावर चर्चा झालेली आहे. त्यावेळेस अधिकारी सभागृहात उपस्थित नव्हते. आता तिसऱ्यांदा बोलण्याची वेळ आलेली आहे. मा. आयुक्त यांच्यासमोर मुद्दा उपस्थित करू इच्छितो की, शहरात अतिक्रमणे होत आहे. संबंधित कर्मचाऱ्यांवर प्रशासनाने काय कार्यवाही केलेली आहे. याची माहिती द्यावी. इमारत निरिक्षकांनी किती अतिक्रमणे पाडलेली आहेत. व न्यायालयात किती प्रकरणे चालू आहे व किती लोकांना त्या संदर्भात नोटीसा दिलेल्या आहेत.

**मा. सभापती:** शहरात किती अतिक्रमण झालेले व त्यापैकी किती अतिक्रमणे पाडण्यात आलेले तसेच किती लोकांना नोटीसा दिलेल्या आहेत. या बाबतीत माझ्याकडे आलेली माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | इमारत निरिक्षकांचे नांव | अतिक्रमण झालेली | पाडण्यात आलेली | नोटीसा दिलेल्या |
|---|---|---|---|---|
| १) | श्री. पवार | २३ | ७ | १६ |
| २) | श्री. कुरेशी | ३२ | ८ | ३२ |
| ३) | श्री. जैस्वाल | ३८ | १२ | १६ |
| ४) | श्री. बावस्कर | १४ | ४ | १० |
| ५) | श्री. पाठक | १५ | ६ | ९ |
| ६) | श्री. गारुडी | ८ | १ | ७ |
| ७) | श्री. राचतकर | १९ | - | १९ |
| ८) | श्री. संगेकर | १५ | २ | १५ |
| ९) | श्री. सनान्से | २४ | ४ | १८ |
| १०) | श्री. राजपुत | ३० | ६ | २४ |
| | | **२१८** | **५०** | **१७६** |

एकूण अतिक्रमणे २१८ झालेली आहेत. त्यातील ५० अतिक्रमणे पाडण्यात अलेली असून १७६ अतिक्रमण धारकांवर कार्यवाही चालू आहेत. यात ज्यांनी ५ फुटाच्या अंतरामध्ये अतिक्रमण केलेले आहे. त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करता येते. तशी प्रशासनाने कार्यवाही केलेली आहे. २०X३० चे जे प्लॉटींग पाडून विकतात त्यांच्यावर नोटीस न देता पोलिस कार्यवाही करावी. शहरात ६० अनाधिकृत वसाहत झालेल्या आहेत. या बाबत मा. आयुक्तांनी संबंधित विभागाकडे चर्चा केली आहे. ८० टक्के वसाहतीमध्ये १५ ते २० टक्के आहेत त्यात अतिक्रमणे होत आहेत दि. ०१-०१-९५ पूर्वीचे (अगोदर) १० ते १५ टक्के रिकाम्या जागेवर अतिक्रमणे झालेली आहे. त्याबाबत प्रशासन कार्यवाही करील.

**श्री. गौतम लांडगे :** महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक दि. ४ मार्च ९६ च्या नुसार नगरपालिका असो किंवा महानगरपालिका मध्ये वेगवेगळे झोन करावे झोनवाईज एक क्षेत्रिक अधिकारी असावे. संबंधित झोन अंतर्गत झालेले अतिक्रमणे या बाबतीत क्षेत्रिय अधिकारी व त्या बांधकाम अंतर्गत येणाऱ्या इमारत निरिक्षक यांच्यावर खाते चौकशी होईपर्यंत त्यांच्यावर निलंबनाची कार्यवाही करण्यात

यावी. असे प्रशासनाला शासन परिपत्रक मिळालेले आहे. शहरात जी २१८ ठिकाणी अतिक्रमणे झालेली आहे. ती येत्या ८ ते १० महिन्याच्या मधील कालावधीतील आहे. असे बांधकाम होऊ देणाऱ्या इमारत निरिक्षकांवर प्रशासनाने कार्यवाही का केलेली नाह. २ ते ३ मजली इमारतीचे बांधकाम झाल्यानंतर इमारत निरिक्षक हे संबंधितांना नोटीसा देतात. अतिक्रमण होऊ द्यावयाचे नसल्यास अगोदरच कार्यवाही करावायास पाहिजे.

**श्री. संजय जोशी :** सभागृहात दिलेली माहिती ही मुळातच चुकीची असून झोनमध्ये फक्त २० अतिक्रमणाची बांधकाम झालेली आहेत काय? त्या सर्व टिकाणी इमारत निरिक्षकास लक्ष देणे शक्य होत आहे का? ५ फुटाच्यावर बांधकाम केल्यास कार्यवाही केली जाते. महानगरपालिकेच्या जागेवर कितीही मोठी इमारत अनाधिकृत झाल्यास ती प्रशासनाला कायद्याने पाडण्याचा अधिकार आहे. जी २१८ अनाधिकृत बांधकामे दाखवलेली आहे त्यात महापालिकेच्या जागेवर होणारी अतिक्रमणे दाखवलेली नाही. संबंधित अधिकारी किवा कर्मचारी यांच्या खाते चौकशी केलेली आहे काय?

**मा. सभापती :** २१८ अनाधिकृत बांधकाम नाही तर ४५% अनाधिकृत वस्ती आहे. जवळजवळ २० ते २५ वर्षापासून अनाधिकृत बांधकाम चालू आहे हे काम या आयुक्तांच्या काळात झालेली नाही.

**श्री. म. अ. रऊफ :** जुन्या शहरात ४० टक्के अनाधिकृत वसाहत झालेल्या आहेत.

**मा. सभापती :** २०x३० चे अनाधिकृत प्लॉट करून विक्री करणाऱ्यावर प्रशासनाने कडक कार्यवाही करावी तसेच इमारत निरिक्षक यांच्या अंतर्गत येणाऱ्या भागात अतिक्रमण करणाऱ्यांवर ही कार्यवाही करावी इमारत निरिक्षक यांच्यावरही कार्यवाही झाली पाहिजे.

**श्री. संजय जोशी :** हर्सूल रोड लगत असलेल्या जमीनीवर डी.के. पाटील नावाच्या गृहस्थाने प्लॉट पाडून विक्री केलेले आहे. त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल केला व त्याच शेजारी श्री. पवार नावाच्या व्यक्तीने प्लॉट पाडून विक्री केलेली आहे. त्यांच्यावर का कार्यवाही केली नाही.

**श्री. गौतम लांडगे :** २१८ जी अनाधिकृत बांधकामे दाखवलेली आहे ती माहिती चुकीची असू शकते. सहा. संचालक नगररचना यांना या परिपत्रकानुसार कार्यवाही करता आली असती. संबंधित इमारत निरिक्षकांवर कार्यवाही का केली नाही.

**मा. सभापती :** सहा. संचालक नगररचना अधिकारी यांना मी विचारू इच्छितो की, दि. ०१-०१-९५ नंतरच्या व ०१-०१-९६ च्या शासन परिपत्रकानुसार जी अनाधिकृत बांधकामे झाली त्या संबंधाने आपण काय कार्यवाही केली याची माहिती सभागृहात द्यावी.

**सहा. संचालक नगर रचना :** शासनाच्या परिपत्रकानुसार शहराचे वॉर्डवाईज भाग पाडले प्रत्येकाने त्याची कर्तव्ये पार पाडली पाहिजे. तशा प्रकारची कार्यवाही केली पाहिजे. १२ इमारत निरिक्षकांना १ तासाचे प्रशिक्षण दिले आहे. त्यांना कामाची जाणीव करून देण्यात आली आहे.

**श्री. गौतम लांडगे :** सभागृहात प्रशासन व संबंधित अधिकारी उत्तर देण्यास टाळाटाळ करीत आहे. अनाधिकृत बांधकामे पैसे घेऊन होतात. असा माझा आरोप आहे. इमारत निरिक्षक यांच्या सोबत अधिकारी यांचे हात गुंतलेले आहे. ही अनाधिकृत बांधकामे होतात. असा याचा अर्थ होता. प्रशासन सभागृहात उत्तर देण्यास टाळाटाळ करीत असेल व शहरात अशी अनाधिकृत बांधकामे

थांबत नसतील तर शासनाच परपत्रकानुसार मी स्वतः शासनाचे सचिव श्री. नालिनाक्षन यांचेकडे तशा प्रकारची तक्रार करणार आहे.

**श्री. प्रभाकर विधाते :** २१८ अनिाधिकृत बांधकामपैकी ५० पाडण्यात आलेले आहे. १७६ लोकांवर कार्यवाही चालू आहे. ज्यांनी अनाधिकृत बांधकामे केलेली आहे. अशा नागरिकांवर दंडात्मक कार्यवाही करावी. त्यामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होईल.

**श्री. म.अ.रऊफ** : अनाधिकृत बांधकाम करणाऱ्यांना नोटीस दिल्यानंतर नागरिक न्यायालयात केसेस दाखल करून त्या बाबतीत स्थगिती आदेश आणतात. त्यामुळे अनाधिकृत बांधकाम वाढत आहे.

**श्री. स.अली मिरा सलामी :** स. सदस्य श्री. लांडगे, श्री. जोशी यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे तो योग्य असून शहरात १० वर्षापासून जेथे जेथे अनाधिकृत जागेवर बांधकामे झालेली आहेत त्या सर्वांवर कार्यवाही करण्यात यावी.

**मा. सभापती :** स. सदस्य यांनी अधिकारी यांच्यावर तडकाफडकी आरोप करणे योग्य नसून स्वतः मा. आयुक्त यांनी वॉर्डावॉर्डात भेटी देऊन योग्य त्या परीने विकास कामा बाबत कार्यवाही केलेली आहे.

**श्री. स.अली मिरा सलामी :** अनाधिकृत बांधकामे होतात याबाबत ५ ते ६ वेळेस सभागृहात चर्चा झालेली आहे. २०X३० चे प्लॉट पाडून विक्री करणाऱ्यावर कार्यवाही करावी. तसेच इमारत निरिक्षक यांनी २३ पैकी ७ बांधकामे पाडली. ३२ पैकी ४ बांधकाम पाडली या बाबतीत शिक्षा कुणाला देणार, संबंधित विभागाकडून तशा प्रकारचे नकाशे देण्यात येते. त्यानुसार एक मजल्याचे दोन व दोनचे तीन असे बांधकाम वाढत जाते. माझ्या वॉर्डात १० नवीन बिल्डींग झालेल्या आहेत. यात फक्त दोषी गरीबांना धरण्यात येते. नगररचना विभागाकडून नकाशा दिल्याच्या व्यतिरिक्त सनी कॉर्नर यास पार्कींग नाही. रोडवर बॅलरी बांधली आहे. या दुकानातील वरील मजले हे अनाधिकृतपणे बांधण्यात आले आहे. महानगरपालिकाने पोलीस चौकी नियुक्त केली त्या पोलिसांचा वापर केवळ टपरी मालकांच्या दुकानाचे नुकसान करण्यावर केला आहे. गरीब लोकांचे नुकसान करणे याकडे लक्ष आहे. मोठमोठ्या व्यापारी व्यक्तींच्या अनाधिकृत बांधकामे पाडण्याच्या वेळी इमारत निरिक्षक यांनी पोलिस संरक्षणात ते पाडण्यात यावे तसे न केल्यास इमारत निरिक्षक यांच्यावर प्रशासनाने कार्यवाही करावी.

**मा. सभापती :** मा. आयुक्त या बाबतीत खुलासा करतील.

**मा. आयुक्त :** प्रशासनाने काय कार्यवाही केली पाहिजे. शासनाच्या परिपत्रकाच्या आधारे सभागृहात चर्चा चालू आहे. महाराष्ट्र शासनाने मुंबई येथे ४० लक्ष घरे बांधण्याचा निर्णय होती घेतलेला होत. यात ज्या वसाहतीत, व त्या नागरिकांची भूमिका लक्षात घेऊन दि. ०१-०१-९५ ही दिनांक गृहित धरून त्यानंतर होणारे बांधकाम मालकावर कार्यवाही करता येईल. यापूर्वी महापालिकेला पोलिस विभागाकडून नेहमी पोलिस संरक्षण मागवावे लागत असे. त्यामुळे अशा प्रकारचे प्रशासकीय काम करण्यास वेळ लागत असे आता महापालिकेकडे पोलिस चौकी निर्मित करून त्यात एक पोलिस निरिक्षक म्हणून श्री. बुवा तसेच २४ पोलिस शिपाई यंचे समावेश आहे. शहरातील अनाधिकृत बांधकामे ज्या ज्या लोकांनी केलेली असेल त्यांच्यावर योग्य त्या पर्यायाने कार्यवाही करण्यात येईल. प्रशासकीय अधिकारी, सहा.

संचालक नगररचना विभागाच्या माध्यमातून एकत्रित चौकशी करण्यात येऊन यात २१ झोन पाडलेले आहेत. या प्रत्येक झोनच्या प्रभागात इमारत निरिक्षक नेमलेले आहेत. तसे इमारत निरिक्षक यांना कार्यवाही करण्याचे आदेश देण्यांत आलेले आहे. आदेशाचे पालन न केल्यास इमारत निरिक्षक यांच्यावर कार्यवाही करण्यात येईल. त्यांना प्रोत्साहित करण्याचे प्रशासनाचे कोणतेही धोरण नाही. या सर्व बाजू सामाजिक, राजकीय, आर्थिक धारेणाशी संबंधित आहे. कुणावर अन्याय होणार नाही ही भूमिका लोक प्रतिनिधीची असते. विचार केल्यास ९६९ शहरातील एकूण टपऱ्या काढण्यात आलेल्या आहे. रशिदभाई लोकमत पत्रकार यांनी २० वर्षापासून मुद्रणालयाच्या बाजूला परवानगी देण्यात यावी. अशी मागणी केलेली आहे. विस्तापितांचे पुनर्वसन केल्यास त्यात नुकसान होते. पावसाळा संपत आलेला आहे. सर्वाच्या भावना लक्षात दोषी कुणी असेल त्यांच्यावर प्रशासन कार्यवाही करील यात शंका नाही.

**मा. सभापती :** मी सभागृहात बोलू इच्छितो की, मी स्वतः या बाबतीत आमरण उपोषणास बसलो होतो. ५२ स्लम वसाहती सरकारी जमीनीवर झालेल्या आहेत. ६० अनाधिकृत वस्त्या झालेल्या आहेत. त्या २० ते २५ वर्षापासून आहेत. त्यात १० ते १५% रिकाम्या जागेवर बांधकामे होत आहे. त्या जागा नगरपरिषदेच्या काळापासून आहेत. त्या महानगरपालिकेच्या नाही व खाजगी मालकीच्या अह. अशी शासनाकडे मागणी करेन. ६० अनाधिकृत वसाहतीमध्ये जे बांधकामे होत आहेत ती होणार यात रोडवर होणारी अनाधिकृत बांधकामे तात्काळ तोडावे. यापुढे २०X३० चे प्लॉट करून विक्री करणाऱ्यावर प्रशासनाने कायदेशीर कार्यवाही करावी. इमारत निरिक्षक त्यात दोषी आढळून आल्यास त्यांच्यावरही प्रशासनाने कार्यवाही करावी. शहराच्या बाजुला असलेल्या खुल्या जागा आहेत त्या महापालिकाने ताब्यात घ्याव्यात न घेतल्यास त्या ठिकाणी प्लॉटींग करून विक्री होणारच.

**श्री. संजय जोशी :** शहरात २० x ३० चे प्लॉट पाडून विक्री केली जाते. त्यासाठी प्रशासनाने सर्वसाधारण सभेत एक ठराव संमत करावा. यापुढे अनाधिकृत बांधकाम करणाऱ्यावर कार्यवाही होईल. प्लॉट घेणाऱ्यांना बी.सी. टॅक्स लावावा. विक्री करणारे यांनी सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजे. असा प्रस्ताव घेऊन शासनाकडे पाठवावा. शासनाची मंजुरी आणावी.

**मा. सभापती :** ६० अनाधिकृत वसाहती बाबतचा ठराव घेतलेला आहे. शासनाकडे पाठवलेला आहे. यापुढे २० X३० चे प्लॉट होणार नाही. याची संबंधित अधिकारी यांनी या सुचनाचे पालन करावे.

**श्री. स. अ. एकबालोद्दिन :** महापालिकातील वैद्यकीय विभागातील अन्न निरिक्षक हॉटेलमध्ये जातात तर कशाची तपासणी करतात.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी** : आरोग्य विभागात दोन अन्न निरिक्षकाच्या जागा आहेत. त्यापैकी एक रिकामी आहेत. एक अन्न निरिक्षक परवाने देतात. पाण्याचे तपासणी करतात. पाण्यसाचे नमुने, अन्नाचे नमुने घेण्याकरिता शासनाचे आदेश नाही.

**श्री. स. अ. एकबालोद्दिन :** शहरात येणारे दूध तपासणी होत नाही. विविध दूध उत्पादक संघ, सोसायटी यांच्या मार्फत वितरीत होणारे दूधाचे तपाणी संबंधित अधिकारी यांनी केली पाहिजे.

**मा. सभापती :** दूध तपासणी करणे आवश्यक आहे. तशी संबधित अधिकारी यांनी कार्यवाही करावी.

**श्री. विखारोद्दिन :** कोणत्याही विकास कामाबाबतचे टेंडर काढुन ते काम पूर्ण करण्याचा कालावधी हा मर्यादितर असतो. कटकटगेट येथील दवाखान्याचे कामाचे उद्घाटन होत आहे. परंतु आमच्या येथील दवाखान्याचे काम अपूर्ण राहिलेले आहे. ठेकेदारही व्यवस्थित कामे करत नाही. कधी ते काम पूर्ण होणार आहे. या ठिकाणी लाईट नाही. टाईल नाही.

**मा. सभापती :** सदर दवाखान्याचे काम पूर्ण करण्याबाबत मा. आयुक्ताबरोबर चर्चा झालेली आहे. ते काम लवकरच करण्यात येईल.

**मा. आयुक्त :** सिल्कमिल कॉलनी, व कटकट गेट येथील दवाखान्याचे इमारतीचे उद्घाटन हे एकाच दिवशी झालेले आहे. सदर काम डिसेंबर पूर्वी पूर्ण होईल.

**श्री. विखारोद्दिन :** रेल्वेस्टेशन येथील गेस्ट हाऊस महापालिकेचे कशा पध्दतीने वापररास दिल्या जाते. त्या गेस्ट हाऊसमध्ये किती खोल्या आहेत त्यापैकी सध्या कुणाला खोल्या दिलेल्या आहेत काय? माहिती द्यावी.

**मालमत्ता अधिकारी :** सध्या एकही खोली कुणाला दिलेली नाही. सर्व गेस्ट हाऊस रिकामे आहेत.

**श्री. विखारोद्दिन :** सभागृहात चुकीची माहिती देत आहेत. त्या गेस्ट हाऊसमध्ये झोन क्र. ६ मधील कर्मचारी श्री. पवार शिपाई हे सध्या स्वतःच्या मालहक्का प्रमाणे राहत आहे. तशी रजिस्टरमध्ये बरोबर नोंद होत नाही.

**मा. सभापती :** उपआयुक्त (म.) यांनी खुलासा करावा.

**उपआयुक्त (म.) :** श्री. पवार, शिपाई हे एका महानगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या जागेमध्ये राहत होते. संस्थेलार विकासासाठी ती जागा पाहिजे आहे. करिता श्री. पवार यांना तात्पुरते २ खोल्या त्यांना राहण्यासाठी दिलेल्या आहेत.

**श्री. विखारोद्दिन :** श्री. पवार यांचे तेथील असलेल्या रजिस्टरमध्ये नोंद नाही. चांगले गेस्ट हाऊस व्हावयास पाहिजे असे ठरले होते. तसेच गेस्ट हाऊसच्या समोर दुकाने काढण्यात येणार होते. त्याबद्दल काय झाले माहिती द्यावी.

**मा. सभापती :** गेस्ट हाऊस भागातील श्री. कांबळे साहेब यांच्या निवास्थानाच्या जागी श्री. पवार यांना निवासासाठी जागा देण्यात यावी.

**उपआयुक्त (म.) :** गेस्ट हाऊस मध्ये ३ ते ४ खोल्या ब्लॉक आहेत. त्यामधून काही विभागणी करून २ खोल्यांचा ब्लॉक वर्ग चारसाठी देता येईल व ३ खोल्यांच्या ब्लॉक वर्ग ३ साठी देण्यास हरकत नाही.

**मा. सभापती:** श्री. पवार यांना २ खोल्यांचा ब्लॉक निवासस्थानसाठी देण्यात यावा. तशी तेथील रजिस्टरमध्ये नोंद असावी.

**श्री. स. अली मिरा सलामी :** महानगरपालिकेचे डॉग युनिट दररोज किती कुत्र पकडते.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी सभागृहात उपस्थित नाही.

**श्री. विखारोद्दिन :** शादीखाना येथील संरक्षित भिंतीचे काम अर्धवट राहिलेले आहे. त्या ठिकाणी संबंधित अधिकारी यांनी भेटी दिलेल्या आहेत. दीड वर्षापासून हे काम तसेच पडून आहे. का पूर्ण करण्यात आलेले नाही.

**मा. आयुक्त :** संबंधित अधिकारी श्री. गायकवाड हे आज सभेला उपस्थित नाही. पुढच्या बैठकीत त्याचा खुलासा होईल.

**श्री. स. अ. एकबालोदिन :** मी याच संदर्भात पत्र दिलेले होते. त्याचे काय झाले माहिती द्यावी.

**मा. सभापती :** स. सदस्यांच्या ज्या मागण्या असतील त्या पूर्ण करण्यात येतील विषय क्र. १ वर चर्चा करावी.

**श्री. रविंद्र इंगळे :** शहरात मटन शॉप ही उघडयावर आहेत. त्यांना संबंधित अधिकारी हे कोणत्या नियमाच्या आधारे परवानगी देतात. रस्त्याच्या बाजूला मटन शॉपस् नसतात, सिडको भागात रस्त्याच्या कडेला दुकाने आहेत. सदर दुकानदार हे रस्त्याच्या कडेला घाण करून ठेवतात. त्यामुळे दुर्गंधी सुटते व सर्वसामान्य नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता आहे. अशा लोकांना कशी परवानगी देतात.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** नगरपरिषदेच्या कायद्यानुसार दुकानाची परवानगी देतो. त्यात काही अटी असतात. उदा. जाळी लावण्यात यावी, मांस उघड्यावर ठेवू नये. ज्यांचे जुने लायसन्स आहेत त्या सर्व दुकान धारकांकडून लायसन्सवर नुतनीकरण करून दिल्या जाते. यात  नवीन कुणीही नाही. सदर मटन मार्केटसाठी सिडकोने जागा दिलेली असेल तर तशी त्यांच्या मार्फत कार्यवाही व्हावयास पाहिजे. महानगरपालिकाने अशा धारकांना परवानगी देण्याचे रद्द केलेले आहे. सिडकोने ना हरकत प्रमाणपत्र न दिल्याने परवानगी दिलेली नाही. कत्तलखाना, शहाबाजर, पडेगांव येथील सर्व दुकानांवर स्वच्छता दिसून येते.

**श्री. स. अली मिरा सलामी :** अन्न निरिक्षक जातात जिवंत बकरे होऊन येतात परंतु योग्य ती तपासणी करत नाही.

**श्री.स. अ. एकबालोद्दिन :** संबंधितावर कार्यवाही व्हावी.

**मा. सभापती :** चिकलठाणा मुकूंदवाडी येथील दुकाने ही अतिक्रमणाच्या जागेवर असतील तर तात्काळ संबंधित अधिकारी यांनी कार्यवाही करावी. व ज्यांना परवाना दिलेला आहे ते जर योग्य त्या पध्दतीने विक्री करत नसतील तर त्यांचे परवाने रद्द करावे. उदा. जाळ्या लावत नसतील, उघड्यावर मटन विक्री करत  असतील, रस्त्यावर घाण टाकत असतील अशावर कार्यवाही व्हावयास पाहिजे.

**विषय क्र. २९३/१ :**

दिनांक ०९-१०-९८ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री. गोतम लांडगे :** इतिवृत्तातील पान क्र. ६ पर चालू आर्थिक वर्षात मालमत्ता कर पाणीपुरवठा कर या बाबतचे जे उद्दिष्ट होते त्यात मालमत्ता कराचे १५ कोटींचे उद्दिष्ट होते त्यापैकी १.५३ लक्ष वसुली म्हणजेच १८% वसुली झाली, पाणीपट्टीचा ७ कोटीचे उद्दिष्ट होते त्यापैकी सप्टेंर या ६ महिण्याच्या कालावधमध्ये ज्या प्रमाणात वसुली व्हावयास पाहिजे ती झाली नाही. त्यामुळे उद्दिष्ट गाठले नाही. आता राहिलेल्या ६ महिण्याच्या कालावधीमध्ये राहिलेली वुसली होणार नाही. त्याचप्रमाणे जकात कराची जी सहा महिण्यात वसुली व्हावयास पाहिजे होती ती झालेली नाही. त्यामुळे विकास कामे होण्यास वेळ लागतो. सहा महिण्यात वसूली कमी का झाली याची माहिती द्यावी.

**मा. सभापती :** ६ महिण्याच्या कालावधीमध्ये जी वसुली करण्यात आली त्याहीपेक्षा यापुढे मालमत्ता कर, पाणीपट्टी कर, जकातकर जास्तीत जास्त वसुली होईल. व लवकरात लवकर वसुली होईल. याबाबत संबंधित अधिकारी यांनी योग्य ती कार्यवाही करावी.

**मा. आयुक्त :** मालमत्ता कर, पाणीपुरवठा कर, ही मागील वर्षापेक्षा १ कोटीने जास्त वसुली झालेली आहे. अंदाजपत्रकात जे उद्दिष्ट ठेवलेले आहेत. त्यानुसार पूर्णतः वसुली करण्यात येईल. परंतु यावर्षी पावसाळा जास्त असल्यामुळे अडीअडचणी येत आहे. जे उद्दिष्ट ठरलेले आहे व ज्यांचेकडे जास्त रक्कमेची वसुली आहे त्यांची जंगम मालमत्ता हस्तगत करण्यात यईल. मौलाना आझादर सारख्या मोठ-मोठ्या संस्थेकडून कोर्टा मार्फत मंजुरी घेवून १,२ याना वसुली होण्याबाबतचे तसेच आदेशही दिलेले व जे उद्दिष्ट आहे ते पूर्ण करण्यात येईल.

**मा. सभापती :** इतिवृत्तातील पान क्र. २३ व २४ वर विषय क्र. २७५/२९,२७६/३० स्थगित ठेवण्यात आले होते. त्यास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

दि. ०९-१०-९८ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीचा ठराव क्र. २७५/२९ मध्ये स्थगित ऐवजी.

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९८-९९ या आर्थिक वर्षात महानगरपालिकेच्या वाहनांना लागणाऱ्या एक्साईड व सुरज मेक बॅटरीज खरेदी करिता मे. व्हेस्पा ॲक्युम्युलेटर्स ॲक्सेसरीज ॲन्ड केमिकल्स औरंगाबाद आणि एस.एफ. एक्साईड बॅटरीजचे अधिकृत विक्रेते यांच्याकडून खालील दर्शविल्याप्रमाणे बॅटरीज खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**अ) <u>मे. व्हेस्पा ॲक्युम्युलेटर्स,</u>**

<u>ॲक्सेसरीज ॲन्ड केमिकल्स, औरंगाबाद</u>

| | बॅटरीचा प्रकार | किंमत | गॅरंटी |
|---|---|---|---|
| १) | ६ व्होल्ट १४ ॲम्पीयर बॅटरी | ५६७/- | १८ महिने |
| २) | १२ व्होल्ट १४ ॲम्पीयर बॅटरी | ९४०/- | १८ महिने |
| ३) | १२ व्होल्ट १७ प्लेट बॅटरी | ४७५०/- | १८ महिने |
| ४) | १२ व्होल्ट १९ प्लेट बॅटरी | ५,५००/- | १८ महिने |
| ५) | १२ व्होल्ट २१ प्लेट बॅटरी | ६,७१४/- | १८ महिने |
| ६) | १२ व्होल्ट २५ प्लेट बॅटरी | ७,४०८/- | १८ महिने |

**ब) <u>मे. जे. जे. एजन्सीज, औरंगाबाद</u>**

| | बॅटरीचा प्रकार | किंमत | गॅरंटी |
|---|---|---|---|
| १) | १२ व्होल्ट ११ प्लेट | ३२४४/- | १२ महिने |
| २) | १२ व्होल्ट १३ प्लेट | ४०९६/- (बंद बॅटरी पी. पी.) | १२ महिने |
| ३) | १२ व्होल्ट १५ प्लेट | ३३७०/- (बंद बॅटरी पी. पी.) | १२ महिने |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

दि. ०९-१०-९८ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीचा ठराव क्र. २७६/३० मध्ये स्थगित ऐवजी.

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९८८-९९ या आर्थिक वर्षात मनपाच्या विविध वाहनाचे ॲटो इलेक्ट्रीकल्सचे कामासाठी लागणारे जॉबवर्क/ स्पेअर पार्टस्/ लिनपार्टर्स करिता मे. चाणक्य ॲटो अलेक्ट्रीकल्स ॲन्ड डिझेल सर्व्हिसेस, औरंगाबाद यांचे खाली दर्शविलेल्या कमी दराचे दर पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| | | |
|---|---|---|
| १) | जॉबवर्क | अंदाजपत्रकापेक्षा १७% कमी दराने |
| २) | स्पेअर पार्टर्स | मॅक्झीन रिटेल प्राईजलिस्ट पेक्षा १०.५% कमी दराने |
| ३) | लिज पार्टर्स | अंदाजपत्रकापेक्षा १०.५% कमी दराने |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या व इतर दुरुस्तीसह दिनांक ०९-१०-९८ रोजीच्या स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९४/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सिध्दार्थ उद्यान येथे फक्त लहान मुलांची ट्रेन आहे. व ती सध्या जुनी झालेली आहे. त्याऐवजी नविन ट्रेन ज्यामध्ये लहान व मोठी माणसू बसू शकतील अशी ट्रेन प्रस्तावित करण्यात आली आहे.

या करिता शासकीय अनुदानास ५.०० लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. परंतु प्रत्यक्ष खर्च १० लक्ष रुपयांपर्यंत अपेक्षित आहे. असे संबंधित एजन्सीकडे चौकशी केली असता त्यांनी कळविले आहे. तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यान येथे फक्त लहान मुलांची ट्रेन आहे. व ती सध्या जुनी झालेली आहे. त्याऐवजी नविन ट्रेन ज्यामध्ये लहान व मोठी माणसू बसू शकतील अशी ट्रेन बसविण्याकरिता रु. १० लक्षच्या अंदाजीत खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९५/३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पंचकुवा कब्रस्तान येथील नाल्याकडील संरक्षित भिंतीची उंची वाढविणे व सपाटीकरण करणेच्या कामाची फेरनिविदा दि. १०-०७-९८ चे स्थायी समिती चे इतिवृत्तातील चर्चे अन्वये सदर कार्यालयीन निविदा सूचना जा.क्र. मनपा/लेखा/नि/४५/९८ दि. १७-०८-९८ रोजी शहरातील दैनिक वर्तमापत्रात प्रसिध्द करून बी-१ नमुन्यात फेरनिविदा मागविल्या असता कोरे निविदा विक्री दि. २०-०८-९८ पर्यंत चौदा विकल्या गेल्या व स्विकृतीच्या अंतिम दि. २४-०८-९८ पर्यंत तीन (३) निविद प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | एस.एस. शेख | अं. प. दरापेक्षा ०.२५% कमी |
| २) | विपुल कन्स्ट्रक्शन | अं. प. दरापेक्षा ५% कमी |
| ३) | सुंदर कन्स्ट्रक्शन | अं. प. दरापेक्षा १५% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ०.२५% कमी दराची श्री. एस. एम. शेख यांची निविदा आहे. तरी प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पंचकुवा कब्रस्तान येथील नाल्याकडील संरक्षित भिंतीची उंची वाढविणे व सपाटीकरण करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.२५% कमी दराची श्री.एस. एम. शेख यांची निविदा निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९६/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिटीचौकी ते किलअर्क पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९७-९८ च्या सा. बां. खात्याचे डी. एस. आर. दराने र. रु. ८,६१,९६२/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदरचा खर्च "नविन डांबरी रस्ते" या लेखा शिर्षा अंतर्गत ठेवलेल्या तरतूदीतून करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. प्रभाकर विधाते :** सिटीचौक ते किलेअर्क या रस्त्याचे संपूर्णतः रुंदीकरण झालेले आहे काय? डी. एस. आर. केंव्हाचे आहेत.

**अति. शहर अभियंता :** पूर्णतः रुंदीकरणाचे काम झालेले आहे. रस्ता संपादितही केलेला आहे. रस्त्यांच्या बाजूला असलेली मजीद जवळ काम करावयाचे राहिलेले आहे. डि.एस.आर. हे ९७-९८ चे आहे.

**श्री. प्रभाकर विधाते :** अतिक्रमणात येत असेल तर प्रस्ताव रद्द करावा.

**श्री. स. अ. एकबालोद्दिन :** पूर्ण रोड लवकरात लवकर करण्यात यावा.

**मा. सभापती :** रस्त्याच्या बाजूला किंवा रस्त्यात अतिक्रमण येत असेल तर तात्काळ काढावे. अतिक्रमण नसेल तर डांबरीकरण लवकरात लवकर करावे. मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिटीचौकी ते किलअर्क पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ८,६१,९३२/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९७/५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, समतानगर येथे फरशी बसविणे व खडी रस्ता तयार करणेच्या कामासाठी सन ९६-९७ च्या सा. बां. खात्याच्या डी. एस. आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रु. ४,३२,५५०/- चे तयार करण्यात आले असून सदरील खर्च सन ९८-९९ च्या नविन खांडकी रस्ते या लेखा शिर्षकातून करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. प्रभाकर विधाते :** प्रस्तावात ९६-९७ चे डिस. एस.आर. दराने अंदाजपत्रक दर्शविलेले आहे. ९७-९८ का दर्शविण्यात आले नाही.

**अति. शहर अभियंता :** पूर्वीचे अंदाजपत्रक रद्द केल्याने पुन्हा बैठकीमध्ये ठेवावे लागले. आपल्याकडे ९७-९८ च्याच डिस. एस.आर.आहेत.

**मुख्य लेखाधिकारी :** मागील वर्षी निधी उपलब्ध नसल्याने तेच अदांजपत्रक ठेवण्यात आलेले आहे.

**श्री. गौतम लांडगे :** ९६-९७ च्या डि.एस.आर. दराने काम केल्यास परत वाढीव अंदाजपत्रक होईल. त्यासाठी प्रशासकीय मंजुरी घ्यावी. ९७-९८ च्या डि. एस.आर. दराने ते काम करण्यात यावे. अशी मंजुरी द्यावी.

**मा. सभापती :** सदरील प्रस्तावात दर्शविलेले ९६-९७ च्या डि.एस.आर. दराऐवजी ९७-९८ च्या डि.एस.आर. दराने काम करावयास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे समतानगर येथे फरशी बसविणे व खडी रस्ता तयार करणेच्या कामासाठी सन १९९७-९८ च्या डि.एस.आर. दराने अंदाजपत्रक तयार करण्यात यावे असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९८/६ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, लोटाकारंजा भागात विस्कळीत झालेल्या खांडकीवर शहाबाद फरशी बसविण्याच्या कामासाठी सन ९७-९८ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी. एस. आर. दराने अंदाजपत्रक र. रु. १,२४,८३३/- चे तयार करण्यात आले असून त्यास दि. २०-०९-९८ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली असून सदरचा खर्च "नविन खांडकी रस्ते" या लेखा शिर्षा अंतर्गत ठेवण्यात आलेल्या तरतूदीतून करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. स.अ. एकबालोद्दिन :** मागील एका बैठकीत पंचकुवा येथे १ १/२ ते २ वर्ष झाले. शहाबाद फरशी बसविण्याचा प्रस्ताव होता. या वस्तीमध्ये गोरबरीब लोक राहतात. त्या वस्तीतील शहाबाद फरशी बसविण्या बाबतचे अंदाजपत्रक आज पर्यंत का आले नाही. विचा ारणा करावी.

**मा. सभापती :** स. सदस्य यांनी सूचित केलेल्या पंचकुवा येथील शहाबाद फरशी बसवण्याच्या कामासाठी संबंधित अधिकारी यांनी अंदाजपत्रक तयार करण्याबाबतची कार्यवाही करावी.

**सौ. यशोदा वाडेकर :** वॉर्डात फरशी बसविण्याचे काम अपूर्ण आहे. १० लक्ष रुपयाचे अंदाजपत्रकास मंजुरी देऊन त्या १० लक्ष रु. तून काम करता येणार नाही काय?

**मा. सभापती :** आपण ज्या प्रभागाचा उल्लेख केलेला आहे तो भाग स्लम येत असून सदर १० लक्ष रु. चे अंदाजपत्रक हे झोपडपट्टीतील प्रभाग फरशी बसविण्याचे आहे.

**श्री. विखरोद्दिन :** बऱ्याच ठिकाणी खांडकी उपलब्ध असते. अशी उत्तरे मिळतात. परंतु प्रत्यक्षात खांडकीच्या जागी खांडकी नसतेच त्याच ठिकाणी फरशी बसविण्यात येते असे होता कामा नये.

**मा.सभापती :** २', ३',४', ५', फुटाच्या आत फरशी बसविण्यात यावी.

**अति. शहर अभियंता :** फरशी बसविण्याचे २-३ प्रकार असतात त्याच जागेवरील फरशी निघालेली असेल त्या ठिकाणी तीच फरशी बसविण्यात येते. शहरातील

ड्रेनेज लाईन, पाणी पाईप लाईन, टेलिफोन केबल, वाहिनी इ. कामासाठी खोदकाम केल्यानंतर तेथील फरशी ही निखळलेली असते.

**श्री. स. अ. एकबालोद्दिन :** माझ्यासाठी वॉर्डात दोन वेळेस खोदकामामुळे फरशी काढण्यात आलेली आहे.

**मा. सभापती :** शहरातील ९५-९६-९७ च्या कालावधीमध्ये ज्या ठिकाणी शहाबाद फरशी बसविण्याचे कामे केले आहे. त्याबाबत चौकशी करावी. चौकशी नंतर ज्या ठिकाणी तोडफोड झालेल्या फरशा काढून चांगल्या फरशी बसविण्याचे काम व आवश्यकतेनुसार ज्या त्या प्रभागात फरशी घेऊन लवकरात लवकर पूर्ण करावे. विषय मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे लोटाकारंजा भागात विस्कळीत झालेल्या खांडकीकर शहाबाद फरशी बसविण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. १,२४,८३३/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९९/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, बडातकीया सिल्लेखाना येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन ९६-९७ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डी. एस. आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रु. ४,२४,३४०/- चे तयार करण्यात आले असून सदरील खर्च ९८-९९ च्या "नविन डांबरी रस्ते" या लेखा शिर्षकातून करिता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बडातकीया सिल्लेखाना येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ४,२४,३४०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३००/८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, वॉर्ड क्र. १२, आंबेडकरनगर येथे जी. आय. पोल रोऊन त्यावर लाईट व्यवस्था करणेच्या कामाकरिता सा. बां. खात्याच्या दरसूचीनुसार र. रु. १,४२,५६०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च ९८-९९ च्या "जी.आय.पोल" या लेखा शिर्षामधून करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. १२, आंबेडकरनगर येथे जी. आय. पोल रोऊन त्यावर लाईट व्यवस्था करणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. १,४२,५६०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०१/९ :**

अतिरिक्त शहर अभियंता, मनपा औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, विविध प्रकारच्या वाहनांच्या विविध आकाराचे टायर्स हॉट व कोल्ड या दोन्ही पध्दतीने रिट्रेडींग करून घेण्याच्या कामासाठी व सन ९८-९९ चा वार्षिक करार करण्यासाठी वर्तमानपत्रात निविदा सूचना देऊन निविदा मागविण्यात आल्या असता एकूण ८ निविदा विक्री झाल्या व सहा निविदा दर भरून प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांमध्ये सर्वात कमी दराचे दर मे. भगवानदास इंडस्ट्रीज औरंगाबाद यांचे असून ते खालील प्रमाणे आहेत.

| टायर साईज | कोल्ड रिमोल्डींगचे दर (प्र. नग) | हॉट रिमोल्डींगचे दर (प्र. नग) | कर रिपेअरचे दर | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | १' | २" | ३" | ४" |
| ५.९०X१५ | ५००/- | ४००/- | ९० | १७० | - | - |
| ६.६०X१२X१५५० एसआर१३ | ४५०/- | ४००/- | ९० | १७० | - | - |
| ५.६५X१२ | ४२५/- | ४००/ | ९० | १७० | - | - |
| १७५.७० एसआरX१३ | ५५०/- | - | ९० | १७० | - | - |
| ४.५०X१२ | ४२५/- | ४००/- | ९० | १७० | - | - |
| ६००X१६ | ७४०/- | ५९०/- | ९० | १७० | २५० | - |
| १९ एस.एस.आर-१३ | ६००/- | - | ९० | १७० | - | - |
| एम-७८X१५ | ८५० | - | ९० | १७० | २५० | - |
| ७.५०X१६ | ९५०/- | ८००/- | ९० | १७० | २५० | - |
| ९.००X२० | १४००/- | १२५०/- | ९० | १७० | २५० | ३५० |
| ६००X१६ (टीएफ) | ६९०/- | ५९०/- | ९० | १७० | - | - |
| १२X४X२८ | - | २५९० | ९० | १७० | २५० | ३५० |
| ७००X१५ | ८७५/- | ६५०/- | ९० | १७० | २५० | - |

तरी कमी दराचे दर मे. भगवानदास इंडस्ट्रीज यांचे असल्यामुळे त्यांचे दर एक वर्षासाठी मान्य करण्यास मंजुरी मिळाली.

**ठराव :**

सदरचा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ३०२/१० :**

कार्यकारी अभियंता (पापु व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. जाफरगेट जवळील मार्केटींग फेडरेशन जवळ १२०० मीमी व्यासाचा आर.सी.सी. पाईप टाकणेच्या कामाकरिता परिसर अभियांत्रिकी खात्याच्या सन ९७-९८ च्या दरसूचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रु. ५,७०,३००/- चे तयार करण्यात आले असून सदरील काम देखभाल व दुरुस्ती या लेखा शिर्षकातून प्रस्तावित आहे. सदर कामास मा. आयुक्तांनी दि. २८-०८-९८ ला मंजुरी दिलेली आहे. तरी प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. जाफरगेट जवळील मार्केटींग फेडरेशन जवळ १२०० मीमी व्यासाचा आर.सी.सी. पाईप टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ५,७०,३००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०३/११ :**

कार्यकारी अभियंता (पापु व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, गौरीशंकर कॉलनी येथे १५० मीमी व्यासाचा आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण खात्याच्या सन १९९७-९८ च्या दरसूचीनुसार अंदाजपत्रक र.रु. १,८०,२५०/- चे तयार करण्यात आले असून सदरील काम भांडवली तरतूदीतून प्रस्तावित केले आहे. सदरील कामास मा. आयुक्तांनी दि. २०-०९-९८ ला मंजुरी दिलेली आहे. तरी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. गौरीशंकर कॉलनी येथे १५० मीमी व्यासाचा आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,८०,२५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०४/१२ :**

कार्यकारी अभियंता (पापु व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. संजयनगर येथील जुनी गटार बांधणेच्या कामाकरिता परिसर अभियांत्रिकी खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसूचीनुसार अंदाजपत्रक र.रु. ६,९९,४२०/- चे तयार करण्यात आले असून सदरील काम देखभाल व दुरुस्ती या लेखा शिर्षकातून प्रस्तावित आहे.

सदरील कामास मा. आयुक्तांनी दि. २८-०८-९८ ला मंजुरी दिलेली आहे. तरी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. संजयनगर येथील जुनी गटार तोडून नविन ४५० मीमी व्यासाची आर.सी.सी. अर्धगोलाकार गटार बांधणेच्या बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ६,९९,४२०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०५/१३ :**

कार्यकारी अभियंता (पापु व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जायकवाडी जुने पंपगृहात अेऊट सर्कीट ब्रेकर पुरवठा करणे, बसविणे व चाचणी देणेचे कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या यांत्रिकी दरसूची (९७-९८) नुसार र.रु. १,७६,६६८/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च पाणी पुरवठा देखभाल व दुरुस्ती च्या आर्थिक तरतूदीतून केला जाईल.

करिता अंदाजपत्रक र. रु. १,७६,६६८/- चे मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जायकवाडी जुने पंपगृहात अेऊट सर्कीट ब्रेकर पुरवठा करणे, बसविणे व चाचणी देणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,७६,६६८/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०६/१४ :**

कार्यकारी अभियंता (पापु व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, पडेगांव येथील घाण पाणी उपसा करण्यासाठी व्हॅक्युम एम्टीअर खरेदी करण्यास स्थायी समिती ठराव क्र. ११/१० दि. ०६-०६-९८ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे. टाटा-१६१३/४२

चेसीजवर व्हॅक्युम एम्टीयर युनिट बसविण्याच्या कामासाठी निविदा सूचना प्रसिध्द करून निविदा मागविल्या असता एकूण दोन निविदा विक्री झाल्या व दोन निविदा प्राप्त झाल्या असून खालील प्रमाणे दर दिलेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | मे. कॅम अव्हीवा एन्हायशे इंजिनिअर्स प्रा. लि. पुणे | रु. ७,४७,२५४/- |
| २) | मे. कृष्णा सेल्स कार्पोरेशन, पुणे | रु. ८,५०,८४७/- |

तुलनात्मकदृष्ट्या मे. कॅम अव्हीवा एन्हायशे इंजिनिअर्स प्रा. लि. पुणे यांचे दर सर्वात कमी असून र. रु. ७,४७,२५४/- असे आहेत. यात सर्व करांचा समावेश आहे. या कंपनीने इतर महानगपालिकेस पुरवठा केलेल्या या प्रकारच्या मशिन्सचे अहवाल घेतले. मशिन चांगल्या प्रतीची असून इतर महानगरपालिकेप्ेक्षा आलेले दर कमी आहेत करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पडेगांव येथील घाण पाणी उपसा करण्यासाठी व्हॅक्युम एम्टीअर युनिट टाटा-१६१३/४२ चेसीजवर बसविण्याच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे दरपत्रकधारक मे. कॅम अव्हीवा एन्हायशे इंजिनिअर्स प्रा. लि. पुणे यांचे र. रु. ७,४७,२५४/- च्या सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०७/१५ :**

कार्यकारी अभियंता (पापु) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शहरातील हातपंप दुरुस्तीसाठी लागणाऱ्या स्पेअर पार्ट खरेदी करण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकुण तीन निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या शेवटच्या तारखेपर्यंत एकूण दोन निविदा प्राप्त णाल्या. आलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| | पुरवठादा | आलेले दर |
|---|---|---|
| १) | मे. तिरुपती इलेक्ट्रीकल्स सेल्स ॲन्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद | अं. प. दर + १०% (जास्त) |
| २) | मे. चेतन इन्टरप्रायजेस, औरंगाबाद | अं. प. दर + १८% (जास्त) |

तुलनात्मकदृष्ट्या मे. तिरुपती इलेक्ट्रीकल्स सेल्स ॲन्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांचे दर कमी असून अंदाजपत्रक दरापेक्षा १०% जास्त आहे. आलेले दर जास्त वाटत असल्यामुहे संबंधित पुरवठादारांस मा. आयुक्त यांचे दालनात वाटाघाटीसस बोलावण्यात आलेले आहे. चर्चेत ठरल्याप्रमाणे सदर एजन्सीजने अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% जास्त दराने स्पेअर पार्टचा पुरवठा करण्यासेच मान्य केले आहे. तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. संजय जोशी :** प्रस्तावात अंदाजपत्रकाची रक्कम दर्शविलेली नाही.

**कार्यकारी अभियंता :** मागील वेळेस ४० लक्ष रुपयाचे अंदाजपत्रक या दराने होते. हा खर्च पूर्ण शहरातील हातपंप दुरुस्तीसाठी या स्पेअर पार्ट वापर करण्यात येईल.

**श्री. स. अली मिरा सलामी :** शहरातील ज्या हातपंपाना पाणी आहे. त्यांचीच दुरुस्ती करावी. ज्या ठिकाणी पंपाना पाणीच नाही त्यांना बसवून काय उपयोग.

**मा. सभापती :** शहरातील ज्या हातपंपाना पाणी उपलब्ध आहे. त्यांची दुरुस्ती करावी. याबाबत संबंधित अधिकारी यांनी कार्यवाही करावी. प्रस्तावास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातील हातपंप दुरुस्तीसाठी लागणाऱ्या स्पेअर पार्ट खरेदीसाठी मागविण्यात आलेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे पुरवठाधारक मे. तिरुपती इलेक्ट्रीकल्स सेल्स ॲन्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम त्यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०८/१६ :**

कार्यकारी अभियंता (पापु व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, इंदिरानगर बायजीपुरा सं. नं. २५ मधील गल्ली क्र. १९ ते ३० मधील जलवाहिनीची खोली वाढविणे आहे. त्यासाठी र. रु. ४,१७,५५५/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात येऊन त्यास स्थायी समितीचा ठराव क्र. ५९/९ दि. २६-०६-९८ अन्वये मंजुरी देण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने कार्यालयाची निविदा सूचना क्र. ३४/९८ जी. की. दै. वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येऊन बी-१ निविदा मागविण्यात आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत एकूण १४ कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस एकूण ६ सिलबंद निविदा प्राप्त झाल्या त्या खालीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. सुरेश बी. साधवानी | ३५.८९% कमी |
| २) | श्री. आर. बी. साळवे | २०% कमी |
| ३) | मे. फरफेक्ट कन्स्ट्रक्शन | २०.३३% कमी |
| ४) | न्यु स्टार कन्स्ट्रक्शन | १६.७८४% कमी |
| ५) | श्री. एस. के. मिसाळ | ४५.५१% कमी |
| ६) | श्री. मन्नाव खॉन | २६% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४५.५१% कमी दराची निविदा श्री. एस. के. मिसाळ यांची आहे. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे इंदिरानगर बायजीपुरा सं. नं. २५ मधील गल्ली क्र. १९ ते ३० मधील जलवाहिनीची खोली वाढविणेच्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री. एस. के. मिसाळ यांची अं. प. दरापेक्षा ४५.५१% कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०९/१७ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, म्हाडा कॉलनीचे दक्षिण चौसरनगर भागात जुने सार्वजनिक शौचालय उठविणे बद्दल मुख्य अधिकारी, औरंगाबाद गृहनिर्माण मंडळ व तेथील रहिवाशी यांच्या सतत पत्र व्यवहार चालू होते. तसेच तेथील रहिवाश्यांनी ग्राहकमंचमध्ये सदरील शौचालय पाडण्याबाबत म्हाडा अधिकाऱ्यांना आदेशित केले. परंतु महानगरपालिका प्रतिवादी केलेले नाही. तथापी मा. आयुक्त साहेबांची स्थळ पाहणी दि. ३१-०७-९३ आदेशित केले की, दुसऱ्या शौचालयाचे बांधकाम झाल्याशिवाय जुने (प्रस्तुत) शौचालय तोडु नये. त्याकरिता चौरसनगर लगत असलेल्या ४० फुट रस्त्यालगत पाच बैठकीचे सार्वजनिक शौचालय बांधणेचे अंदाजपत्रक र. रु. १,४८,६००/- सार्वजनिक

बांधकाम विभाग औरंगाबाद यांची दरसूची ९७-९८ अनुसार तयार करण्यात आले असून मा. आयुक्तांनी दि. ३०-०९-९८ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

सदर काम म.न.पा. अर्थसंकल्प १९९८-९९ लेखा शिर्ष सुलभ शौचालय यात ठेवण्यात आलेल्या तरतूदीमधून खर्च करण्याचे प्रस्तावित आहे. करिता मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे म्हाडा कॉलनीचे दक्षिण चौसरनगर भागात चौरसनगर लगत असलेल्या ४० फुट रस्त्यालगत पाच बैठकीचे सार्वजनिक शौचालय बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. १,४८,६००/- च्या अंदाजपत्रकसस सर्वानुमते सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१०/१८ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. गारखेडागाव येथील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता अंदाजपत्रक र. रु. ९,८९,५००/- सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबादची दरसूची ९७-९८ नुसार तयार करण्यात आले असून मा. आयुक्तांनी दि. १९-०६-९८ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली असून. स्थायी समिती, ठराव क्र. ८०/३८ दि. २६-०६-९८ रोजी मंजुरी मिळाल्यानंतर रितसर निविदा सूचना क्र. मनपा/लेखा/नि/३७/९८ दि. २२-०७-९८ वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन निविदा विक्रीच्या अंतिम दि. ३०-०७-९८ पर्यंत एकूण ७ निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याच्या अंतिम दि. १२-०८-९८ रोजी फक्त ७ मोहरबंद निविदा प्राप्त झल्या त्या दि. १८-०८-९८ रोजी उपस्थित ठेकेदारासमक्ष उघडण्यात आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | मे. व्यंकटेश कन्स्ट्रक्शन | अं. प. दरापेक्षा ३३.७९% कमी |
| २) | चांदराम आशन्ना | अं. प. दरापेक्षा ३३.३३% कमी |
| ३) | राजासिंग | अं. प. दरापेक्षा ३२.९६% कमी |
| ४) | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | अं. प. दरापेक्षा ३१.५५% कमी |
| ५) | मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | अं. प. दरापेक्षा १७.८६% कमी |
| ६) | रे कन्स्ट्रक्शन | अं. प. दरापेक्षा १३.६% कमी |
| ७) | सिद्दिकी मो. अहमद | अं. प. दरापेक्षा १२.२०% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात कमी व अंदाजपत्रक दरापेक्षा ३३.७९% कमी दराची निविदा मे. व्यंकटेश कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे. करिता करिता मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. गारखेडागाव येथील रस्त्याचे डांबरीकरा करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रक दरापेक्षा ३३.७९% कमी दराची मे. व्यंकटेश कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३११/१९ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, छत्रपती शिवाजी महाराज पुराण वस्तु संग्रहालय प्रवेशद्वार येथे रणगाड्यावरील तोफ फायबर ग्लासमध्ये तयार करणेच्या कामासाठी अंदाजपत्रक र. रु. १,०४,०००/- ला दि. २९-०६-९८ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

सदरील काम करणेसाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र. मनपा/लेखा/नि/३८/९८ दि. २७-०७-९८ अन्वये प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकूण पाच निविदा विक्री झाल्या त्यापैकी निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकूण चार (४) निविदा दर भरून प्राप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | मे. सुवर्णा फायब्रोटेक प्रा. लि. | रु. ४५,०००/- प्र. नग |
| २) | मे. मडीलगेकर्स आर्ट स्टुडिओ | रु. ४९,५००/- प्र. नग |
| ३) | मे. मारुती फायबर | रु. ७०,०००/- प्र. नग |
| ४) | श्री. सासमकर पी.आर. | रु. १,००,०००/- प्र. नग. |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा मे. सुवर्णा फायब्रोटेक प्रा. लि. याची निविदा कमी दराची असून त्यांनी र. रु. ४५,०००/- प्रति नग असा दर दिलेला आहे.

मे. सुवर्णा फायब्रोटेक प्रा. लि. हे स्वत: शिल्पकार नाहीत व त्यांनी अशा प्रकारचे कसलेही काम महानगरपालिकेत केलेले नाही. उलट मे. मडीलगेकर्स आर्ट स्टुडिओ हे स्वत: शिल्पकार असून त्यांनी अशा प्रकारची बरीचशी कामे महानगरपालिकेत केलेली आहेत. त्यामुळे सदरच्या कामासाठी दोन्ही स्पर्धकांना चर्चेसाठी बोलविण्यात आले असता मे. सुवर्णा फायब्रोटेक प्रा. लि. यांनी दिलेले दर व मे. मडीलगेकर्स आर्ट स्टुडिओ यांचे दरामध्ये जास्त तफावत आलेली नाही. म्हणून चर्चेच्या वेळी मे. सुवर्णा फायब्रोटेक प्रा. लि. यांनी निविदेसोबत जोडलेल्या पुराव्यावरून व प्रत्यक्ष सादर केलेले फोटो अलबम अन्वये व त्यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी असल्यामुळे त्याचबरोबर दरबाबत वाटाघाटी केल्या असता त्यांनी सदरचे काम हे त्यांनी दिलेल्या रक्कम रु. ४५,०००/- प्रति नग ऐवजी र. रु. ४४,००० प्र. नग अशा प्रकारे दोन नगासाठी र. रुञ ८८,०००/- इतक्या रक्कमेत काम करून देणेसाठी संम्मती दिलेली आहे.

करिता वरील बाबींचा विचार करता तुलनात्मकदृष्ट्या कमी मे. सुवर्णा फायब्रोटेक प्रा. लि. यांनी दिलेल्या हमीवरून त्यांचे निविदेस तसेच सदरच्या कामासाठीच्या अंदाजपत्रक र. रु. १,०४,०००/- ला मंजुरी मिळाणेस्तव प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज पुराण वस्तु संग्रहालय प्रवेशद्वार येथे रणगाड्यावरील तोफ फायबर ग्लासमध्ये तयार करणेच्या कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या कमी व प्रति नग रु. ४४,०००/- या मे. सुवर्णा फायब्रोटेक प्रा. लि. यांचे दरास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१२/२० :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, छत्रपती शिवाजी महाराज पुराण वस्तु संग्रहालय प्रवेशद्वार येथे रणभेदी वाजविणाऱ्या मावळ्याचे चलशिल्प फायबर ग्लासमध्ये तयार करणेच्या कामासाठी अंदाजपत्रक र. रु. १,३६,०००/- ला दि. २९-०६-९८ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

सदरील काम करणेसाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र. मनपा/लेखा/नि/३८/९८ दि. २७-०७-९८ अन्वये प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकूण पाच निविदा विक्री झाल्या त्यापैकी निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस चार निविदा दर भरून प्राप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | मे. सुवर्णा फायब्रोटेक प्रा. लि. | रु. ५४,०००/- प्र. नग |
| २) | मे. मडीलगेकर्स आर्ट स्टुडिओ | रु. ६५,०००/- प्र. नग |
| ३) | मे. मारुती फायबर | रु. ८०,०००/- प्र. नग |
| ४) | श्री. सासमकर पी.आर. | १) रु. १,२५,०००/- प्र. नग. |
| | | २) रु. १,०५,०००/- प्र. नग. |
| | | विदाऊट मोमेंट ॲन्ड ड्रेपली |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा मे. सुवर्णा फायब्रोटेक प्रा. लि. याची निविदा कमी असून त्यांनी रु. ५४,०००/- प्रति नग असा दर दिलेला आहे.

मे. सुवर्णा फायब्रोटेक प्रा. लि. यांनी महानगरपालिकेमध्ये अशा प्रकारचे कामे केलेले नसून निविदेसोबत देखील त्यांनी अशा प्रकारचे काम केल्याचे पुरावे सादर केलेले नाहीत. उलट द्वितीय उलट द्वितीय क्रमांकाचे निविदाधारक मे. मडीलगेकर्स आर्ट स्टुडिओ यांनी महानगरपालिकेत कलात्मक बरीच कामे समाधानकारकरित्या पूर्ण केलेली आहेत व ते स्वत: शिल्पकार असून मे. सुवर्णा फायब्रोटेक प्रा. लि. हे स्वत: शिल्पकार नाहीत. त्यामुळे सदरच्या कामासाठी अ.क्र. १ व २ चे निविदाधारकांस मा. आयुक्तांचे दालनात चर्चेसाठी बोलावले असता मे. सुवर्णा फायब्रोटेक प्रा. लि. यांनी प्रत्यक्ष मुलाखतीच्या वेळेस अशा प्रकारचे कोणतेही काम महानगरपालिकेत केल्याबाबत कसलाही पुरावा सादर करू शकले नाहीत.

त्यामुळे मे. मडीलगेकर्स आर्ट स्टुडिओ हे स्वत: शिल्पकार असल्यामुळे व त्यांनी कलात्मक कामे केल्याचे पुरावे सादर केले असून महानगरपालिकेची बरीचशी कामे समाधानकारकरित्या पूर्ण करून दिलेली असल्यामुळे त्यांना चर्चेअंती दराच्या वाटाघाटीबाबत चर्चा केली असता त्यांनी सदरचे काम हे त्यांनी निविदेत दिलेल्या दराऐवजी म्हणजे रक्कम रु. ६५,०००/- च्या ऐवजी र. रु. ५३,०००/- प्रति नग म्हणजे दोन नगासाठी र. रु. १,०६,०००/- मध्ये काम करून देणेसाठी संमती दिलेली आहे.

अशा प्रकारे निविदाधारक अ.क्र. २ मे. मडीलगेकर्स आर्ट स्टुडिओ यांनी संमती दिल्यानुसार सदरचे काम र. रु. ५३,०००/- प्रति नगानुसार दोन नगासाठी रक्कम रु. १,०६,०००/- मध्ये करून घेणेस्तव तसेच सदरील कामासाठी तयार केलेले अंदाजपत्रक र. रु. १,३६,०००/- ला मंजुरी मिळणेसाठी प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज पुराण वस्तु संग्रहालय प्रवेशद्वार येथे रणभेदी वाजविणाऱ्या मावळ्याचे चलशिल्प फायबर ग्लासमध्ये तयार करणेच्या कामाकरिता मे. मडीलगेकर्स आर्ट स्टुडिओ यांचेशी झालेल्या वाटघाटीनुसार प्रति नग रु. ५३,०००/- या दराने सदरील काम करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१३/२१ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, छत्रपती शिवाजी महाराज पुराण वस्तु संग्रहालय प्रवेशद्वार नगारा वाजविणाऱ्या मावळ्याचे चलशिल्प फायबर ग्लासमध्ये तयार करणेच्या कामासाठी दि. २९-०६-९८ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र. मनपा/लेखा/नि/३८/९८ दि. २२-०७-९८ चे निविदा सुचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकूण पाच (५) निविदा विक्री झाल्या. पैकी निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकूण (४) निविदा दर भरून प्राप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | मे. सुवर्णा फायब्रोटेक प्रा. लि. | रु. ६३,०००/- प्र. नग |
| २) | मे. मडीलगेकर्स आर्ट स्टुडिओ | रु. ६५,०००/- प्र. नग |
| ३) | मे. मारुती फायबर | रु. ७५,०००/- प्र. नग |
| ४) | श्री. सासमकर पी.आर. | १) रु. १,२०,०००/- प्र. नग. |
| | | विदाऊट मोमेंट ॲन्ड ड्रेपली |

तुलनात्मकदृष्ट्या कमी अंदाजपत्रकाचे दरापेक्षा र. रु. ६३,०००/- प्र. नग. या दराने मे. सुवर्णा फायब्रोटेक प्रा. लि. याचे दर प्राप्त झालेले आहेत.

मे. सुवर्णा फायब्रोटेक प्रा. लि. यांचे दर कमी आलेले आहेत. परंतु त्यांनी अशा प्रकारचे कोणतेही काम महानगरपालिका औरंगाबाद येथे केलेले नसून त्यांनी चलशिल्प तयार केल्याबाबत कुठलाही पुरवा सादर केलेला नाही. उलट द्वितीय क्रमांकाचे मे. मडीलगेकर्स हे एक शिल्पकार असून त्यांची अशा प्रकारचे बरीच कामे महानगरपालिकेत केलेली असल्यामुळे त्याचे दरात व मे. सुवर्णा फायब्रोटेक प्रा. लि. यांचे दरात फारसा फरक नसल्यामुळे या दोन्ही स्पर्धकांना चर्चेसाठी मा. आयुक्त यांचे दालनात बोलावून दराबाबत चर्चा करण्यात आली.

त्यानुसार प्रत्यक्ष चर्चेअंती मे. सुवर्णा फायब्रोटेक प्रा. लि. यांनी यापूर्वी महानगरपालिकेचे कोणतेही शिल्पाबाबत कामे केलेले नसल्याने व ते स्वत: शिल्पकार नसल्यने व हे काम चल शिल्पाचे असल्यामुळे हे काम त्यांना न देता मडीलगेकर्स आर्ट स्टुडिओ यांनी यापूर्वी अशा प्रकारचे महानगरपालिकेचे शिल्पाबाबत काम समाधानकारकरित्या केल्यमुळे मे. मडीलगेकर्स आर्ट स्टुडिओ यांचेबरोबर कामाबाबत चर्चा केली असता त्यांनी निविदेत दिलेल्या दरापेक्षा म्हणजे रु. ६६,०००/- प्र. नगाऐवजी र. रु. ५१,०००/- प्रति नग काम करून देणेसाठी संमती दिलेली आहे. जेणेकरून सदरील दर हे पहिल्या कमी दराच्या (मे. सुवर्णा फायब्रोटेक प्रा. लि.) स्पर्धाकापेक्षा कमी आहेत.

तरी सदरील कामासाठी तयार केलेले अंदाजपत्रक र. रु. १,३६,०००/- ला व सदरचे काम हे मडीलगेकर्स आर्ट स्टुडिओ यांचेकडून त्यांनी संमती दिल्यानुसार र. रु. ६१,०००/- प्रति नग या दराने करून घेणेस्तव प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज पुराण वस्तु संग्रहालय प्रवेशद्वार येथे नगारा वाजविणाऱ्या मावळ्याचे चलशिल्प फायबर ग्लासमध्ये तयार करणेच्या कामाकरिता मे. मडीलगेकर्स आर्ट स्टुडिओ यांचेशी झालेल्या वाटघाटीनुसार प्रति नग रु. ६१,०००/- या दराने सदरील काम करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

# *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र. ३१४/१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पुष्पनगरी स्मशानभूमी विकसित करणेसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन ९७-९८ चे दरसूची नुसार र. रु. ५,००,०००/- चे तयार करण्यात आले असून सदर काम "स्मशान भूमी विकास" तरतूदीतील निधी संपुष्टात आलेली असल्याने सदरील प्रस्ताव दहाव्या वित्त आयोगकडून प्राप्त अनुदानातून घेण्यात येणाऱ्या कामामधून जे की, चिकलठाणा येथील कब्रस्तान विकास कामासाठी रु. ८.०० लक्ष चा निधी प्रदान करण्यात आलेला होता. परंतु तेथे जागेची उपलब्धता नसल्यामुळे चालू वर्षात निधी खर्च होणे शक्य होणार नाही करिता पुष्पनगरी स्मशानभूमी विकासाचा प्रस्ताव सादर करण्यांत येऊन त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यात आली आहे.

सबब वरीलप्रमाणे प्रस्ताव स्थायी समितीसमोर विचारार्थ व मान्यतेसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पुष्पनगरी स्मशानभूमी विकसित करण्याचे कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. ५,००,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१५/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, रमानगर स्मशानभूमी येथे अंतर्गत (उर्वरित) खडी रस्ता तयार करणे व डांबरीकरण करणेसाठीचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाचे जिल्हा दरसूचीनुसार सन ९७-९८ नुसार र.रु. २,३४,७००/- चे तयार करण्यात आले असून सदर काम स्मशानभूमी विकास कार्यक्रमा अंतर्गत प्रस्तावित केलेला आहे. परंतु सन ९८-९९ सालाकरिता ठेवलेली तरतूद संपुष्टात आलेमुळे सदर प्रस्ताव चालू वर्षाच्या सुधारित अंदाजपत्रकात वाढीव तरतूद ठेवणेच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता घेण्यात आली आहे.

सबब सदरीलप्रमाणे प्रस्ताव स्थायी समितीसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रमानगर स्मशानभूमी येथे अंतर्गत (उर्वरित) खडी रस्ता तयार करणे व डांबरीकरण करणेसाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. २,३४,७००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१६/३ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनिःसारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.रोकडिया हनुमान कॉलनी येथे श्री. बोडखे यांच्या घराजवळील गटार बांधणे व गटरीवर फरशी बसविणेच्या कामाकरिता अंदाजपत्रक र. रु. २,१७,०००/- चे परिसर अभियांत्रिकीच्या सन ९७-९८ चे दरसूचीनुसार तयार करण्यात आलेले आहे.

सदरील काम लेखाशिर्ष "शहरी भागात गटारी बांधणे" यातून प्रस्तावित केले आहे. मा. आयुक्तांनी दि. ३०-०९-९८ रोजी सदरील कामास मंजुरी दिलेली आहे.

तरी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.रोकडिया हनुमान कॉलनी येथे श्री. बोडखे यांच्या घराजवळील गटार बांधणे व गटरीवर फरशी बसविणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. २,१७,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१७/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पीरबाजार येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याभोवती झाडे व लॉन लावण्याकरिता विटकाम करणे व रोड डिव्हायडर व वाहतुक बेटांचे कर्बीगचे काम करणेच्या कामासाठी सन १९९६-९७ च्या सा. बां. खात्याच्या डि.एस.आर. दराने अंदाजपत्रक र. रु. मुळ निविदा ७५,६७०/- व मान्य वाढीव तरतूद रु. ६०,७०८/- व त्यामध्ये पुनश्च वाढीव तरतूद ५४,०००/- अशी एकूण रु. १,९०,३७८/- चे तयार करण्यात आले असून सदरील खर्च १९९७-९८ च्या "शहर सौंदर्यीकरण" या लेखा शिर्षकातून करण्यात येईल करिता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पीरबाजार येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याभोवती झाडे व लॉन लावण्याकरिता विटकाम करणे व रोड डिव्हायडर व वाहतुक बेटांचे कर्बीगचे काम करणेकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. १,९०,३७८/- च्या सुधारित अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१८/५ :**

शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, सन १९९८-९९ या आर्थिक सालासाठी महानगरपालिकेच्या विकास कामासाठी ५०,०००/- हजार ४३ ग्रेड सिमेंट बॅगा खरेदी करण्यासाठी दि. १६-०७-९८ च्या सर्वसाधारण सभेमध्ये विषय क्र. १३ अन्वये अंदाजपत्रक रक्कम रु. ६२,५०,०००/- ला मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र. मनपा/लेखा/नि/३८/९८ दि. २८-०७-९८ अन्वये प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकूण पाच (०५) निविदा विक्री झाल्या त्यापैकी निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस चार (०४) निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | सी. सी. आय. सिमेंट | आयकर क्लीअर्स सर्टिफिकेट न दिल्यामुळे निविदा उघडण्यात आलेली नाही. |
| २) | अे. सी. सी. सिमेंट | निविदेसोबत इसारा रक्कम जमा केलेली नाही. |
| ३) | व्ही. ए. ट्रेडींग कंपनी | रक्कम रु. १३५ प्रति बॅग सर्व करासिहित दर दिला आहे किंवा कसे याचा बोध होत नाही. |
| ४) | ओरिएंट सिमेंट | रक्कम रु. १२९.८४ प्रति बॅग सर्व करासहित दर दिला आहे. |

वरील चारहि निविदा धारकांपैकी सी.सी.आय. सिमेंट यांनी निविदेसोबत इनकम टॅक्स बेबाकी प्रमाणप९ा न दिल्यामुहे त्यांची निविदा उघडण्यात आली नसून त्यांच्या निविदेचा विचार ग्राह्य धरण्यांत आलेला नाही. सदरील कंपनीने सगळ्या निविदा उघडल्यानंतर त्यांनी पत्र देवून रक्कम रु. १२२ प्रति बॅग सर्व करासहित सिमेंट पुरवठा

करणे बाबत कळविले आहे. परंतु सर्व निविदा उघडल्यावर असे पत्र देता येत नसल्याने त्यांचे पत्र ग्राह्य धरता येत नाही.

त्याचप्रमाणे अे. सी. सी. सिमेंट यांनी निविदा सादर करते वेळी निविदे सोबत इसारा रक्कम जमा केली नसल्यमुळे निविदा ग्राह्य धरात येत नाही. तसेच त्यांनी रक्कम रु. ११९/- प्रतिबॅक सिमेंट पुरवठा करणेसाठी दर दिले आहे. परंतु सदरचे दर हे सर्व करासहित आहेत किंवा कसे हे निविदेत नमूद न केल्यामुळे निदिा परीपूर्ण होत नसल्याने त्यांचे निविदेवर विचार करता येत नाही.

तसेच व्ही. के. ट्रेडींग कंपनी यांनी निविदेत रक्कम रु. १३५ प्रति बॅग दर दिलेला असून सदरचे दर हे सर्व करासहित आहेत किंवा नाही याचा उल्लेख केलेला नसून त्यांनी निविदेसोबत तीन अटी दिलेल्या आहेत. अटीयुक्त निविदा ग्राह्य धरता येत नाही.

वरील चार निविदा धारकांपैकी तीन निविदा धारकांच्या निविदा निविदेत नियमानुसार पूर्तता न केल्यामुळे त्यांच्या निविदा ग्राह्य धरण्यात आलेल्या नाहीत. वरील चार निविदा धारकांपैकी ओरिएंट सिमेंट यांना विना अट सर्वात कमी म्हणजे रक्कम रु. १२९.८४ प्रति बॅग असा दर दिलेला आहे. त्यांनी जे दर दिलेले आहे ते जास्त असल्याने त्यांना प्रत्यक्ष मा. आयुक्त यांचे समक्ष चर्चेसाठी बोलावले असता त्यांनी त्यांचे दिनांक १२-१०-९८ च्या पत्राद्वारे खाली नमूद केल्यानुसार रु. ८४.०० सिमेंटची प्रति बॅक + रु. ३८.५० वाहतुक खर्च + रु. ३.५५ जकात कराचा भार असे एकूण रक्कम रु. १२२.०५ प्रति गोणी सिमेंट पुरवठा करण्यासाठी लेखी हमीपत्र दिलेले आहे.

तरी वरील बाबींचा विचारकरता चार निविदा धारकांपैकी सर्वात कमी ओरिएंट सिमेंट यांनी सर्वात कमी रक्कम रु.१२२.०० प्रति बॅग सिमेंट पुरवठा करण्याचे लेखी हमीपत्र दिल्यावरून त्यांचेकडून सिमेंट खरेदी करण्यास्तव व ओरिएंट सिमेंट यांची निविदा मंजूर करणेस्तव प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे १९९८-९९ या आर्थिक वर्षाकरिता महानगरपालिकेच्या विकास कामासाठी ५०,०००/- सिमेंट बॅगा (४३ ग्रड) खरेदी करण्याकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी निविदा नियमानुसार परिपूर्ण निविदाधारक मे. ओरिएंट सिमेंट यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार र. रु. १२२.०० प्रति बॅग प्रमाणे सिमेंट करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१९/६ :**

सहाय्यक संचालक नगररचना यांचेकडून प्रस्ताव सादर करण्यात येतो की, न.भु.क्र. १७८०४ मो. जयहिंद, प्रेस कॉलनी पैठणगेट करिता श्री. मनोहर किशनराव पाडळकर यांनी बांधकाम परवानगी प्रस्ताव सादर केला आहे. सदर भूखंड जयहिंद को. ऑ. हौ. सो. व शादराश्रम कॉलनीचे एकत्रित मंजूर रेखांकनातील खुली जागा असल्याबाबत महानगरपालिकेचे म्हणजे म्हणणे असून संबंधितांनी या भूखंडाचे मालकी हक्काबाबतचा वाद न्यायालया नेला असता न्यायालयाने या भूखंडाची हौसिंग सोसायटीने करून दिलेले खरेदी खत आदींचा विचार करून संबंधिताचे बाजुने निर्णय दिला आहे. सध्या न. भु. क्र. कार्यालयाकडील आखिव पत्रिकेवर संबंधितांची नोद आहे. महानगरपालिकाने या संदर्भात वरच्या न्यायालयात आपले म्हणणे मांडून अपली केलेले आहे.

या रेखांकन प्रकरणी मूळ रेखांकन ६१ साली मंजुर झालेनंतर ६५ व ६७ साली ते सुधारित करण्यात आले. प्रत्यक्ष जागेवर आज झालेला भूखंडाचा रस्त्याचा/ खुल्या जागाचा

विकास Location इ. त्या दोघांपेक्षी एकाप्रमाणे नसून काही विकास ६५ चे तर काही विकास ६७ चे रेखांकनानुसार झालेला आहे.

खुल्या जागेबाबत महानगरपालिकाने संबंधितास कळविले असता त्यांनी न्यायालयाने या प्रकरणी दिलेला निर्णय महानगरपालिकाचे अपील व संपूर्ण न्यायप्रक्रिया होऊन अंतिम निर्णयास लागणारा कालावधी विचारात घेवून महानगरपालिकाकडे तडजोड प्रस्ताव सदार केला आहे. ह्यानुसा महानगरपालिकास भूखंड क्षेत्राचे २५% बांधकाम संबंधित विना मोबदला करून देणार आहेत.

संबंधितांनी सादर केलेला प्रस्ताव जागा मालकी संदर्भात न्यायप्रविष्ठ प्रकरणी न्यायालयाने दिलेला निर्णय महानगरपालिकाने केलेले अपील व अंतिम निर्णयास लागणारा कालावधी तोपर्यंत महानगरपालिकास जागेचा विकास करता येणार नाही. इ. संदर्भात विविधी सल्लागार तसेच महापालिकाने न्यायप्रविष्ठ प्रकरणी नेमलेल्या विधीज्ञाचे अभिप्राय घेतले असता न्यायप्रविष्ठ प्रकरणांमुळे महानगरपालिकास या जागेचा विकास करता येणार नाही. त्यामुळे विकासात निर्माण झालेली बाधा दूर करून महानगरपालिका आर्थिक फायदा व्हावा. महानगरपालिकोच उत्पन्ननात भर पडावी, महानगरपालिकाचे assets वाढवेत म्हणून हा समावेशक आरक्षण विकासाचे धर्तीवर भूखंड खेत्राचे २५% बांधकाम विना मोबदला महानगरपालिका बांधून देण्याबाबत तडजोड चा प्रस्ताव स्विकारण्यास हरकत नाही. महानगरपालिकास मिळणाऱ्या बांधकामचा सध्या वसंतभूवन येथे congested भागात असलेले झोन नं २ चे कार्यालयासाठी वापर करून वसंत भुवन येथे भविष्यात भव्य व्यापारी संकूल बांधणे महानगरपालिकास शक्य होईल.

करिता प्रस्ताव मान्यतेसाठी सादर प्रस्ताव मान्यतेनंतर लागू विकास नियंत्रण नियमावली नुसार पडताळणी करून बांधकाम परवानगी संदर्भाने कार्यवाही करण्यात येइल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे न.भु.क्र. १७८०४ मो. जयहिंद, प्रेस कॉलनी पैठणगेट करिता श्री. मनोहर किशनराव पाडळकर यांनी मागितलेल्या बांधकाम परवानगी संदर्भातील वादाचे अनुषंगाने न्यायप्रविष्ठ प्रकरणी निर्णयास लागणारा कालावधी लक्षात घेता मनपास समावेशक आरक्षण विकासाचे धर्तीवर भूखंड क्षेत्राचे २५% बांधकाम विना मोबदला महानगरपालिकेला बांधून देण्याबाबतच्या तडजोड प्रस्ताव स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

यानंतर "जन गण मन" या राष्ट्रगिताने आजची सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगर सचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
मा. सभापती,
स्थायी समिती,
महानगरपालिका, औरंगाबाद

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.*

**दिनांक ११-११-९८ रोजी भरलेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. दिनांक ०९-११-९८ रोजी गणपूर्ती अभावी तहकूब करण्यात आलेली स्थायी समिती सभा बुधवार दि. ११-११-९८ रोजी रोजी दुपारी ४.०० वाजता मा. सभापती श्री. जयवंत ओक, यांच्या अध्यक्षतेखाली "मलिक अंबर" स्थायी समिती सभागृहात "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेस कार्यालयीन अधिकारी वर्ग व खालील स. सदस्य उपस्थित होते.**

१) स.स. श्री. प्रभाकर सिताराम विधाते स. सदस्य
२) स.स. श्री. अ. रऊफ म. अ. माबूद -//-
३) स.स. श्री. संजय जोशी -//-
४) स.स. श्री. गौतम लांडगे -//-
५) स.स. श्री. इंगळे रविंद्र बाबुराव -//-
६) स.स. सौ. यशोदा धनंजय वाडेकर -//-
७) स.स. श्री. जैन विकास रतनलाल -//-
८) स.स. श्री. ढगे नरसिंग मुरलीधर -//-
९) स.स. सौ. राधाबाई तळेकर -//-
१०) स.स. श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल -//-
११) स.स. श्री. विखारोद्दिन पि. खुदबोद्दिन -//-
१२) स.स. श्री. स. अ. एकबालोद्दिन स. मो. कुतूबोद्दिन -//-
१३) स.स. श्री. बन्सी गांगवे.

**संवाद :**

**श्री. संजय जोशी :** महानगरपालिका प्रशासनातर्फे शहरातील अनाधिकृत झालेले बांधकाम हटाव मोहिम राबविण्यात येत आहे. त्याबद्दल प्रशासनाचे अभिनंद बऱ्याच दिवसानंतर का होईना प्रशासनाने ही मोहिम हाती घेतली आहे. त्याबद्दल बऱ्याच नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. यात ज्यांची अधिकृत घरे, दुकाने कुणाची तोडली गेली असेल व तसा अन्याय झाला असेल तर त्या त्या मिळकत धारकांनी महापालिका प्रशासनाशी स्वतः भेटून आपले म्हणणे मांडावे. यात प्रशासन, प्रशासकीय अधिकारी, उपआयुक्त, तसेच महापालिका प्रशासनाकडे असलेले पोलिस कुमक कर्मचारी यांच्या सर्वांच्या संयुक्त मदतीने ही मोहिम राबविण्यात येत आहे. तसेच मालमत्ता कर वसुलीसाठी २-३ पकरणामध्ये पोलिस कर्मचारी यांची मदत झालेली आहे. त्याबद्दल सभागृहात प्रशासनाचा अभिनंदनाचा ठराव ठेवण्यात यावा.

**श्री. स. अ. एकबालोद्दिन :** अभिनंदनाचा ठराव ठेवण्यात मी सहमत नाही. प्रशासनाच्या माध्यमातून जी अतिक्रमण मोहिम राबविण्यात येत आहे. यात गरीबांवर अन्याय होत आहे.सेवायोजना कार्यालयासमोर झुनका भाकर केंद्र असून फुटपाथच्या जागेवर आहे. सदर झुनका भाकर केंद्र धारकांना ही जागा कुणी दिली.

**मा. सभापती :** झुनका भाकर केंद्र साठी मा. जिल्हाधिकारी यांच्या माध्यमातून जागा दिलेल्या आहेत. जर कुणी जास्तीच्या जागेवर अतिक्रमण करत असेल तर कार्यवाही करण्यात येईल. तशी सविस्तर माहिती पुढच्या बैठकीत देण्यात येईल.

**श्री. बन्सी गांगवे :** स. सदस्य श्री. संजय जोशी यांनी सभागृहात प्रशासनाचा. अभिनंदनाचा ठराव मांडू इच्छितात, त्यास माझा विरोध आहे. महानगरपालिका अतिक्रमण हटाव पथकाने कुठलीही पुरेपुर माहिती न घेता मुकूंदवाडी भागातील बसस्टॉप जवळील दुकाने हटविली. सदर दुकाने हटवितांना बऱ्याच चर्मकार समाज असलेल्या दुकान धारकांचे नुकसान अतिक्रमण हटाव पथकाने केलेले आहे. सदर समाजातील लोकांचे शनिवार या दिवशी दुकाने बंद असतांना बुलडोझर लावून ही दुकाने तोडली गेली. त्यामुळे दुकानातील विक्री वस्तु, कच्चा माल चोरीला गेलेला आहे. खरोखरच ती जागा महानगरपाकेच्या अतिक्रमणात येत होती का खुलासा करावा.

**श्री. संजय जोशी :** मी अभिनंदनाचा ठराव बाबत जे बोललो आहे ते बरोबर असून त्याचे नजरचुकीने नुकसान झालेले असेल त्यांनी प्रशासनाकडे प्रत्यक्ष भेटून आपले म्हणणे मांडावे तशा प्रकारची प्रशासन कार्यवाही करील. असे मी बोललो ही बाब स. सदस्यांनी लक्षात घ्यावी.

**श्री. प्रभाकर विधाते :** स. सदस्य श्री. गांगवे यांनी जी सूचना मांडली त्यास मी सहमत आहे. महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील असलेले वाहन तळाच्या समोर एका व्यक्तींने घरगुती नळ कनेक्शन घेतलेले असतांना त्या ठिकाणी वाशिंगसेंटर उघडण्यात आलेले आहे. त्या ठिकाणी वॉशिंग सेंटर करण्यात आले ती जागा कुणाची, तसेच सदर व्यक्तीला घरगुती नळ कनेक्शन किती इंचीचे दिलेले आहे. याची सविस्तर माहिती द्यावी.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**कार्यकारी अभियंता :** याबाबत झोन कार्यालयातून सविस्तर माहिती घेऊन पुढच्या बैठकीत खुलासा करण्यात येईल.

**श्री. संजय जोशी :** संबंधित व्यक्तींने घरगुती वापरासाठी नळ कनेक्शन घेतलेले असतांना त्या ठिकाणी गाड्या धुण्याचे काम चालू आहे. संबंधितावर कार्यवाही करावी.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी सविस्तर माहिती घेऊन जर नळ कनेक्शन हे विना परवानगी घेतले असेल तर आवश्यक ती कार्यवाही करावी. स. सदस्य श्री. गांगवे यांचा प्रश्न संदर्भात खुलासा संबंधित अधिकारी यांनी करावा.

**उपआयुक्त (म.) :** शहरातील अनाधिकृत जागेवर, तसेच रस्त्याच्या बाजुला अधिकृत जागेपेक्षा जास्तीच्या जागेवर झालेली दुकाने अनाधिकृत बांधकाम प्रशासनाच्या माध्यमातून हटविण्यात येत आहे. स. सदस्य यांनी वेगवेगळे मुद्दे मांडलेले आहेत. सदर अतिक्रमण असलेली जागा महापालिकेची होती का? अतिक्रमण पांडतांना सर्वांना समाज कार्यवाही केलेली नाही. परंतु पखपाती पणाच्या भूमिकेतून कुणावरही अन्याय झालेला नाही. अतिक्रमण हटवितांना लगत कुणाची भिंत, समान असेल तर नुकसान झालेले असेल व तशी स. सदस्य यांनी सभागृहात भावना व्यक्त केलेल्या आहेत. त्यासी प्रशासन सहमत आहे. शहरात वाहतुकीसाठी अडथळा निर्माण करणाऱ्या टपऱ्या, बांधकामे झालेली आहेत. अशा अनाधिकृत मिळकत धारकांवर योग्य ती नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईलच यात शंका नाही. मुकूंदवाडी

येथील टपऱ्या काढण्यात आल्या त्या अगोदर सदर ठिकाणी सहा. संचालक नगररचना, उपआयुक्त (प्र.) कार्यकारी अभियंता यांनी पाहणी केल्यानंतरच तेथील अतिक्रमण हटविण्यात आलेले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने महापालिकेला दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने व नियमाप्रमाणे सदर रस्त्याच्या माध्यमापासून दोन्ही बाजुला ६६" फुटाच्या आत ज्यांनी ज्यांनी अतिक्रमणे केलेली आहेत. ती हटविण्यात आलेली आहे. मुकुंदवाडी येथील मटन विक्री करणारे दुकानदार यांची बरीचशी दुकाने ही अनाधिकृतपणे थाटलेली होती. याबाबत पशुधन विकास अधिकारी व मा. पोलिस आयुक्त यांच्या तक्रारीवरूनही वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. त्यानुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे. यात जर अतिक्रमण हटवितांना कुणाचे नुकसान झालेले असेल तर तशी संबंधित नागरिकांनी मा. प्रशासनाकडे रितसर लेखी तक्रार मांडावी. त्यानुसार महापालिका प्रशासन, सार्वजनिक बांधकाम प्रशासन,पोलिस प्रशासन, सिडको प्रशासन यांची संयुक्त बैठकी घेऊन निर्णय होऊन तसा अहवाल सभागृहात ठेवण्यात येईल. त्यानुसार सभागृहाने मंजुरी दिल्यानंतर सदर मंजुरी अहवाल टपरी कमिटीकडे पाठविण्यात येईल. औद्योगिक वसाहतीतील रस्त्याच्या बाजुला ५०' फुटाच्या आत ज्यांनी अतिक्रमण केलेले होते ते ही पाडण्यांत आलेले आहेत. परंतु या ठिकाणी अतिक्रमण पाडतांना सदर दुकान धारकांनी असे मत व्यक्त केले की, मुकूंदवाडी येथील पोस्ट ऑफिस जवळील रस्त्यांच्या दोन्ही बाजूला "एल" आकाराच्या जागेत महापालिकेच्या माध्यमातून २५ + २५ अशी दोन्ही बाजुने ४'x६' फुटाची अशी एकूण ५० दुकाने काढावीत ती भाडेतत्त्वावर घेण्यास आम्ही तयार आहोत. सभागृहाची मंजुरी मिळाल्यानंतर प्रशासन तशी कार्यवाही करील व ज्यांचे अतिक्रमण हटवितांना नुकसान झालेले असेल त्यांचा प्रशासन योग्य तो विचार करेल. परंतु दिल्लीगेट येथे अतिक्रमण अडथळा निर्माण झालेला होता. तसेच गारखेडा येथील अतिक्रमण हटवितांना दगडफेक झाली होती. असे होता कामा नये. यातील बरीचशी अतिक्रमणातील दुकाने व बांधकामे ही स.नगरसेकांच्या शिफारशीने झालेली आहेत. सभागृहाने प्रशासनाच्या मागे राहून अशी नियोजनबध्द कठोर कार्यवाही करण्यास संमती दिली तर प्रशासन योग्य त्या वेळीच त्यांची अंमलबजावणी करील. प्रशासनाचा अभिनंदनाचा ठराव ठेवण्यात आला त्याबद्दल धन्यवाद.

**श्री. बन्सी गांगवे :** संबंधित अधिकारी ज्यावेळी दर ठिकाणी गेले त्यावेळी मला कुठलीही कल्पना न देता पाहणी करून अतिक्रमण हटाव मोहिम सुरू करून ६६ फुटाच्या बाहेरील दुकाने तोडण्यात आली. त्यात चर्मकार समाजोच दुकान धारकांचे दुकानातील साहित्याची तोडफोड झालेली आहे. प्रशासनाने सदर दुकान धारकांना कुठलीही सूचना दिलेली नाही. कुणाच्या तरी दबावाखाली येऊन संबंधित नगरसेवकांना न विचारता अतिक्रमणे काढण्यात आलेली आहे. स नगरसेवक हे नागरिकांच्या विरोधात आहे असे प्रशासनाने दाखवून दिले.

**श्री. विखारोद्दिन :** अनाधिकृत टपरी बसवतांना दुकान धारक ३० ते ४० हजार रुपये खर्च करून टपऱ्या सुरू करतात टपरी लावण्याचे काम चालू असतांना त्यावेळेस महापालिका कर्मचारी / अधिकारी काय करतात? शहरात अनाधिकृत टपऱ्या

बसतात त्यावेळेस प्रशासनाच्या नजरेस येत नाही काय? प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे टपऱ्या बसविल्या जातात व त्याच टपऱ्या हटवितांना कर्मचारी यांच्या मदतीने हटविल्या जातात. व अशा कामगिरी बद्दल प्रशासनाचा अभिनंदनाचा ठराव सभागृहात ठेवतात हे कसे काय? यास मी सहमत नाही.

**श्री. स.अ. एकबालोद्दिन :** गरीबांच्या टपऱ्या हटविण्यात आल्या. जे मोठमोठे बिल्डर आहेत. त्यांनी ३-३, ४-४ मजली इमारती अनाधिकृत बांधलेल्या त्या का पाडण्यात येत नाही.

**श्री. बन्सी गागवे :** उच्च न्यायालयाची संरक्षित भिंत ही मुख्य रस्त्याच्या मध्ये भागापासून ६६ फुटाच्या आत येते. तसेच दै. लोकमत प्रसेची भिंतही अशाच प्रकारची आहेत. याच बरोबर रामा हॉटेलही रस्त्याच्या मुख्य भागापासून ६५ फुटाचे आत संरक्षित भिंत असलेली आहे. असे अतिक्रमण का पाडण्यात आलेले नाही. उच्च न्यायालयाला नियम लागू नाही काय? खुलासा करावा.

**श्री. विखारोद्दिन :** एकाच ठिकाणी असलेल्या १०-२० टपऱ्या असल्यास त्या ठिकाणच्या २-३ टपऱ्या उचलल्या जातात बाकीच्या का नाहीत?

**उप आयुक्त (म.) :** १०० ते ८०' फुटाच्या रुंद रस्त्यावर टपरीसाठी परवानगी देऊ नये अशा सर्वसाधारण सभेचा निर्णय झालेला आहे. त्या टपऱ्या काढण्यात आलेल्या नाहीत सदर दुकान धारकांनी न्यायालयातून स्थगिती आदेश आणलेला आहे. त्यामुळे त्या काढता येत नाही. परंतु ४x६ फुटाची टपरी ही अनाधिकृत झालेली असेल ती काढण्यात येईल यात शंका नाही.

**श्री. बन्सी गांगवे :** औद्योगिक वसाहतीमधील काही टपरी धारकांकडे न्यायालयाचा स्थगिती आदेश होता परंतु स्थगिती आदेश दाखविण्याची संधी त्या नागरिकांना दिलेली नाही. महापालिका प्रशासनाने अशाही प्रकारची दुकाने काढलेली आहे. तसेच शहरातील अनाधिकृतपणे केलेले बांधकाम इमारत मालक तसेच संबंधित आर्कीटेक्ट तसेच बांधकाम होऊ देणारे महानगरपालिकातील अधिकारी यांच्यावर कार्यवाही करावी.

**सौ. राधाबाई तळेकर :** प्रशासनाने कुठलाही भेदभाव न ठेवता टपरी धारक असो किंवा इमारत बांधकाम करणारे बिल्डर असो. प्रथमतः माझ्या वॉर्डातील अतिक्रमण काढण्यात यावे. त्रिमुर्ती चौका जवळील शास्त्रीनगर येथे १५' x ४०' फुटाच्या जागेवर ५० फुटांच्या रस्त्याच्या बाजुला बँकेचे अनाधिकृत बांधकाम झालेले आहेत. रस्त्याच्या एका बाजुला डि. पी. (विद्युत) व दुसऱ्या बाजुला बँकेने केलेले बांधकाम यामुळे नेहमी अपघात होतात. जवाहर कॉलनी येथील रस्ता रुंद करण्यास कुण्याही नागरिकांचे व माझे सर्व सहकार्य राहील.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** १० x १० फुटाच्या जागेवर टपरी बसविण्यासाठी एका सलीम नावाच्या व्यक्तीला जाफरगेट नाल्याच्या पुलाच्याबाजूला जागा दिलेली होती. सदर इसमाने ५ फुटाची गल्लीची जागा नसोडता त्या ठिकाणी ४०० स्क्वे. फुट बांधकाम केलेले आहे.

**श्री. विकास जैन :** सर्वसाधारण सभेमध्ये ठराव पारीत झालेला आहे की, १०० ते ८० फुट रुंद रस्त्याच्या बाजुला कुणाही व्यक्तांला टपरी अथवा बांधकामासाठी जागा देऊ नये. रेल्वेस्टेशन येथील रस्त्याच्या बाजुला एकूण ८ व्यक्तीं तर्फे टपऱ्या टाकण्यात आल्या आहेत. त्या कोणत्या नियमा आधारे बसविल्या आहेत. हे टपरीधारक टपऱ्या काढण्यास तयार नसेल तर कोण जबाबदार, संबंधित

नगरसेवकांना टपरी बसवितांना व प्रशासनाच्या माध्यमातून हटवितांना विचारणा होत नाही.

**मा. सभापती :** रस्त्याच्या बाजुला ६x८ फुटाची टपरी बसविणे किंवा बांधकामे करण्याची परवानगी आहे. परंतु प्रत्यक्षात १०x१०, १०x१५, फुटाचे अनाधिकृतपणे झालेली बांधकामे व टपऱ्या असेल तर त्या प्रशासनाने तात्काळ काढाव्यात. कुठलाही भेदभाव न ठेवता कार्यवाही करावी १००' ८०' फुटाच्या रस्त्यावर टपरी, बांधका न होऊ देण्याचा निर्णय णालेला असतांना पुन्हा त्या ठिकाणी पुर्नवसन होते. काही टपऱ्या काढल्या जातात काही तशाच ठेवतात. हे प्रशासनाचे धोरण योग्य नसून ज्या ठिकाणी धार्मिक स्थळ आहेत त्या ठिकाणी समाजातील लोकांच्या भावना ह्या दुखावल्या जाणार नाही. असे कृत्य करू नये. स. स. गांगवे यांनी मुद्दा उपस्थित केल्याप्रमाणे प्रशासनाने अगोदर सूचना नोटीस न देता अतिक्रमण तोडणे चुकीचे असून कुणावरही अन्याय होणारनाही याची दक्षता घ्यावी. जे अतिक्रमण काढावयाचे असेल त्या दुकानधारकांना दुकानातील सामान बाहेर दुसऱ्या स्थळी स्थलांतर करण्यास वेळ द्यावा जेणे करून संबंधिताचे नुकसान होणार नाही.

**श्री. प्रभाकर विधाते :** सिडको एम.आय.डी.सी. भागाज जागा घेऊन त्या जागेवर दुकाने होणार आहेत. मुकूंदवाडी येथील ज्यांच्या टपऱ्या काढण्यात आल्या त्यांना त्या ठिकाणी दुकाने देण्याची प्रशासनाने कार्यवाही करावी.

**मा. सभापती :** अतिक्रमणामध्ये येणारे शहरातील सर्व दुकाने बांधकामे त्यांच्यावर प्रशासनाने योग्य कार्यवाही करावी. ज्या जागेसंबंधी टपरी, बांधकाम संदर्भाने न्यायालयात प्रकरण चालू असेल तर अतिक्रमण काढण्यास वेळ लागेल.

**श्री. म. अ. रऊफ :** मटन मार्केट चे काम ९६ चे आहे. काम करण्याचे आदेश कधी देणार.

**शहर अभियंता :** सदर ठिकाणी पाहणी करून कामास सुरुवात करण्यात येईल.

**श्री. बन्सी गांगवे :** दुकाने बंद असतांना प्रशासनाच्या अतिक्रमण पथकाने दुकाने तोडलेली आहेत चर्मकार समाजाच्या लोकांचा प्रामुख्याने विचार करावा. त्यांचे झालेले नुकसान भरपाई देण्यांत यावी.

**मा. सभापती :** स. सदस्य यांनी नुकसान भरपाई बाबतची तक्रार सर्वसाधारण सभेसमोर मांडावी त्यानुसार निर्णय घेत जाईल.

**श्री. गौतम लांडगे :** प्रशासनाने अतिक्रमण हटाव मोहिम सुरू केली त्याबद्दल प्रशासनाचे अभिनंदन. अतिक्रमण हटवितांना प्रशासनाने स. नगरसेवकांना त्यात समावेश करून पाहणी करू नये असे माझे मत आहे. प्रशासनामार्फत जे धोरण राबविले जाते. त्या संबंधित नगरसेवका बाबत नागरिकांचा / रहिवाश्यांचा वेगळा गैरसमज होतो. त्यासाठी प्रशासनाने जे धोरण अवलंबविले त्याची पूर्तता करण्यासाठी कुण्याही राजकीय नेत्यांच्या दबवाखाली येऊ नये. कुणी मोर्चे काढू द्या. कुणी निवेदने देऊ द्या यात प्रशासनाला दबावाखाली येण्याची गरज नाही.

**श्री. बन्सी गांगवे :** प्रशासनातील अधिकारी यांना इतर पक्षाचे लोक भेटण्यासाठी येऊन त्यांच्या दबावाखाली येऊन प्रशासनाने मुकूंदवाडी येथील अतिक्रमणे हटविलेली आहे. असे दिसून येते.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**उपआयुक्त (म.) :** सदर जागेवर दुकान धारकांनी काही लोकांवर अन्याय झालेले होते. त्यामुळे प्रत्यक्ष मोजमाप करण्यासाठी व त्या अगोदर उपआयुक्त (म.) यांनी

स्थळ पाहणी करून आलेले होते. प्रत्यक्ष मागणीनुसार अतिक्रमणे पाडण्यात आली हे सभागृहाचे म्हणणे चुकीचे आहे. कदाचित सभागृहाचा असा गैरसमज झालेला असेल तर यापुढे असे होणार नाही. याची प्रशासन दखल घेईल. व कुणीही अतिक्रमण धारक असो त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल.

**श्री. गौतम लांडगे :** १) प्रशासनातील अधिकारी यांनी कुणाच्या तरी दबावाखाली ही अतिक्रमणे हटविलेली आहे.

२) प्रशासनातील अधिकारी यांच्या सांबत माजी महापौर, व काही राजकीय मंडळी तेथील स्थळ पाहणी करण्यासाठी एकत्रित गेलेले होते. त्यानंतर प्रशासनाने लगेचच अतिक्रमण हटाव पथकाला आदेशित करून कुठलीही सूचना न देता मुकूंदवाडी येथील दुकाने तोडण्यात सदर दकान धारकांचे नुकसान झालेले आहे. यापुढे प्रशासनाने कुणाच्याही दबावाखाली न येता अतिक्रमण हटाव मोहिम सातत्याने राबवावी.

**श्री. बन्सी गांगवे :** संजयनगर, मुकूंदवाडी येथील प्रभागात ड्रेनेज लाईन करण्याच्या कामासाठी अडीच वर्षापूर्वी पत्र दिलेले होते. २ वर्षापासून विचारणा केली असता बजेट नाही. अशी उत्तरे अधिकाऱ्यांकडून मिळतात. सदर संचिका लेखा विभागातून बजेट नाही असा संबंधित अधिकारी शेरा लिहतात.

**कार्यकारी अभियंता :** सदर कामास आर्थिक तरतूद नाही.

**श्री. बन्सी गांगवे :** मुकूंदवाडी येथील ड्रेनेज लाईन बाबतची दुसरी संचिका असेल त्यास मंजुरी मिळालेल्या अंदाजपत्रकील रक्कमेतून सदर ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी लागणाऱ्या रक्कमेचा समावेश करावा. तशी प्रशासनाने कार्यवाही करावी.

**मा. सभापती :** स. सदस्य यांनी दिलेल्या पत्रानुसार तीच संचिका पुन्हा चालू करावी व त्यास मंजुरी घेऊन प्रशासनाने तशी तात्काळ कार्यवाही करावी.

**विषय क्र. ३२०/१ :**

दिनांक १६-१०-९८ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**मा. सभापती :** दिनांक ०९-१०-९८ च्या इतिवृत्तातील विषय क्र. २२३/२१ च्या ठरावामध्ये "शहागंज भाजीमंडई येथील मुत्री तोडून तेथे दुकाने बांधण्याची परवानगी देणारा ठराव मंजूर करण्यात आलेला आहे. त्यात खालील प्रमाणे दुरुस्ती करण्यात येते.

सदर दुकान श्री. शेख फारुख व श्री. बलविरसिंग हे स्वखर्चाने बांधून घेणार असल्याने त्यांना अनामत रक्कम न घेता फक्त भाडे आकारणी करून दुकाने बांधण्याची परवानगी द्यावी अशी दुरुस्ती करण्यास स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**श्री. स. एकबालोदिन :** इतिवृत्तातील पान क्र. १० वर मागच्या बैठकीत दुधामध्ये युरिया मिसळला जातो. अशी चर्चा केलेली होती. संबंधित अधिकारी यांनी काय कार्यवाही केलेली आहे?

**मा. सभापती :** आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** दुधाचे ५० नमुने घेऊन ते तपासणीसाठी पाठविण्यात आलेले आहे. त्यात किती प्रमाणात युरिया मिळसला आहे की नाही ते तपासण्यात येईल. असल्यास कार्यवाही केली जाईल. याचबरोबर सीलबंद पाकिटातून मिळणाऱ्या दुधाचीही तपासणी करण्याची अंमलबजावणी करण्यात येईल.

**श्री. प्रभाकर विधाते :** दुधाच्या नमुन्यातील युरिया मिसळलेले आढळून आल्यास तशी त्या दूध एजन्सीचे नाव वृत्तपत्रात देवून शहरात दुधाची विक्री करण्यास मनाई करावी.

**ठराव :**

दिनांक १६-१०-९८ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ३२१/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, स.न. ५९/ भाग गारखेडा परिसर सहारा अपार्टमेंट समोरील खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे व खेळणी बसविणेसाठीचे अंदाजपत्रक र. रु. १,५६,५००/- चे सा. बां. विभागाचे जिल्हा दरसूची सन ९७-९८ नुसार तयार करण्यात येऊन सदर काम हे "नविन उद्याने" या तरतूद अंतर्गत प्रस्तावित करण्यात येऊन त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यात आली आहे.

सबब वरील प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स.न. ५९/ भाग गारखेडा परिसर सहारा अपार्टमेंट समोरील खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे व खेळणी बसविणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. १,५६,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२२/३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राजवळील जोड रस्त्यास खडीकरण व डांबरी रस्त्यास सिल्क कोटी करणे बाबतचे अंदाजपत्रक र. रु. २,४७,७६०/- चे तयार करण्यात आले असून त्यास मा. आयुक्त साहेब यांची मान्यता प्राप्त आहे. सर काम हे "नविन उद्याने" या तरतूदी अंतर्गत प्रस्तावित करण्यात येऊन त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यात आली आहे.

सबब वरीलप्रमाणे प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राजवळील जोड रस्त्यास खडीकरण व डांबरी रस्त्यास सिल्क कोटींग करणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. २,४७,७६०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२३/४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. समतानगर येथे शाळा बांधावयाची आहे. त्यासाठी सां. बां. विभागाचे सन ९७-९८ चे जिल्हा दरसूचीनुसार र. रु. ९,९०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा. आयुक्तांना दि. २७-१०-९८ ला स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत शिफारस केली आहे.

सदरील कामाचा खर्च शासकीय अनुदान ९६-९७ अंतर्गत करण्यात येईल. तरी उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे समतानगर येथे शाळा बांधणेकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. ९,९०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२४/५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, हॉटेल वेदांत ते एकनाथनगर रोडवर मिनी शॉपिंग सेंटर बांधावयाचे आहे. त्यासाठी ९६-९७ च्या जिल्हा दरसूचीनुसार र. रु. १०,६६,३०३/- चे अंदाजपत्रक तयार करून मा. सर्वसाधारण सभेपुढे ठेवले असता सर्वसाधारण सभेने ठराव क्र. ३७/३४ दि. २१-०६-९७ अन्वये मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार निविदा मागविल्या असता श्री. आर. बी. चव्हाण यांची १७% कमी कमी दराची निविदा प्राप्त झाली होती. सदरील निविदा मंजुरीस्तव स्थायी समितीकडे पाठविली असता ठराव क्र. ४२२/१० दि. २६-१२-९७ अन्वये सदरील प्रस्ताव रिकॉलसाठी ठेवण्यात यावा असे आदेशित केलेले होते. त्यानंतर पुनविचारार्थ स्थायी समिती समोर सदरील निविदा ठेवण्यात आली असता ठराव क्र. ८५/४३ नुसार सदरील कामासाठी पुर्ननिविदा मागविण्यात याव्यात असे आदेशित करण्यात आले.

त्यानंतर सदरील कामासाठी ९७-९८ च्या जिल्हा दरसूचीनुसार अं. प. रक्कम रु. १२,२८,५२७/- चे तयार करण्यात आले. मा. स्थायी समितीने विषय क्र. १२१/१६ दि. ३०-०७-९८ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र. जा.क्र.मनपा/लेखा/नि/५०/९८ दि. ३१-०८-९८ अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण १४ निविदा विक्री झालया व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण २ निविदा दर भरून प्राप्त झाल्या त्या दिनांक २२-०९-९८ रोजी उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | ए. एम. फारुकी | ५% जास्त दराने |
| २) | बी. आर. आनंद | १५% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अं. प. दरापेक्षा ५% जास्त दराने निविदा दर श्री. ए. एम. फारुकी यांचे आलेले आहेत. त्यानुसार मा. आयुक्त महोदय यांचे दालनात दराबाबत झालेल्या वाटाघाटीनुसार अं. प. दरापेक्षा ५% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त दराने मा. आयुक्त महोदयांनी मान्यता दिलेली आहे.

तरी श्री. ए. एम. फारुकी यांची अं. पं. दरापेक्षा ३% जास्त दराची निविदा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हॉटेल वेदांत ते एकनाथनगर रोडवर मिनी शॉपिंग सेंटर बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीत ठरल्यानुसार सदरील काम श्री. ए. एम. फारकी यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२५/६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पंचवटी चौक ते कर्णपूरा माता मंदिरापर्यंत रस्त्यास डांबरीकरण करणेसाठी सन १९९७-९८ च्या सा. बां. खात्याचे डि. एस. आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रु. ४,०४,८००/- चे तयार करण्यात आले असून सदरील काम तातडीचे असल्यामुळे उपलब्ध गुत्तेदार श्री. जी. एम. कटारिया यांच्याकडून करून घेण्यात आले.

सदरील कामासाठी खर्च सन ९८-९९ च्या "पुर्नडांबरीकरण" या लेखाशिर्षातून उपलब्ध करून घेण्यात येईल. तरी प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पंचवटी चौक ते कर्णपूरा माता मंदिरापर्यंत रस्त्यास डांबरीकरण करणे या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. ४,०४,८००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम तातडीने करून घेणे आवश्यक असल्याने उपलब्ध गुत्तेदार श्री. जी. एम. कटारिकया यांचेकडून करून घेण्यात आलेल्या कामास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२६/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, किराणाचावडी पोलिस स्टेशन ते मोतीकारंजा चौरस्त्यापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करून गटार बांधणेच्या कामासाठी सन ९७-९८ चे सा. बां. खात्याचे डि. एस. आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रु. ५,५९,६००/- चे तयार करण्यात आले असून सदरचा खर्च "भांडवली डांबरी रस्ते" या लेखाशिर्षाखाली दहाव्यावित्त आयोगान्वये तून उपलब्ध करून घेण्यात येईल. तरी प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे किराणाचावडी पोलिस स्टेशन ते मोतीकारंजा चौरस्त्यापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करून गटार बांधणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ५,५९,६००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२७/८ :**

अतिरिक्त शहर अभियंता मनपा औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेच्या डिझेल वाहनांच्या मायको कंपनीचे बॉशपंप, ॲटोमायझर आददींचे स्पेअर पार्टसह रिपेरींग करण्याच्या कामासाठी सन ९८-९९ या आर्थिक वर्षासाठी वार्षिक करार करण्यासाठी वर्तमापत्रात निविदा सूचना देऊन निविदा मागविली असता दोन निविदा विक्री झाल्या व दोन निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांमध्ये भरलेले दर व एजन्सीज खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | एजन्सीजचे नांव | स्पेअर पार्टसाठी चे दर | जांबवर्कसाठीचे दर |
|---|---|---|---|
| ०१ | मे. नवजीवन ॲटो सर्व्हिसेस सेंटर, औरंगाबाद | एम. आर. पी. प्राईजलिस्ट प्रमाणे | एम.आर.पी. प्राईजलिस्ट पेक्षा १०% कमी |
| ०२ | मे चाणक्य ॲटो इले. ॲन्ड डिझेल सर्व्हिसेस, औरंगाबाद | एम.आर.पी. प्राईज लिस्टपेक्षा ६.५% कमी | एम.आर.पी. प्राईजलिस्ट पेक्षा १०% कमी |

वरील प्रमाणे दर प्राप्त झाल्यानंतर दोन्ही एजन्सीजना वाटाघाटीसाठी बोलाविण्यात आले. वाटाघाटीनंतर बॉशपंपेचे मे. नवजीवन ॲटो सर्व्हिसे सेटार औरंगाबाद हे अधिकृत विक्रेते असल्यामुळे त्यांच्याकडून निविदे अंतर्गत प्राप्त झालेल्या कमी दराने म्हणजेच स्पेअरपार्टसाठी एम.आर.पी. प्राईजलिस्ट पेक्षा ६.५% ने कमी व जॉबवर्कसाठी १३% ने कमी दराने काम करून घेण्यास मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे.

तरी सन १९९८-९९ या आर्थिक वर्षात एक वर्षासाठी वाहनांचे बॉशपंपचे ॲटोमायझरचे स्पेअरपार्टसह रिपेरींग करण्याच्या कामासाठी मे. नवजीवन ॲटो सर्व्हिसेस सेंटर, औरंगाबाद यांची निविदा मंजूर करून वार्षिक करार करण्यासाठी मंजुरी मिळावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपाच्या डिझेल वाहनांच्या मायको कंपनीचे बॉशपंप, ॲटोमायझर आददींचे स्पेअर पार्टसह रिपेरींग करण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे निविदाधाराक मे. नवजीवन ॲटो सर्व्हिस सेंटर, औरंगाबाद यांचे स्पेअरपार्टसाठी एम.आर.पी. प्राईजलिस्टपेक्षा ६.५% कमी व जॉबवर्कसाठी १३% ने कमी दराचे निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२८/९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, विशालनगर गारखेडा येथील ५० विकास रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ५,५४,१८५/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ९ कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त ६ निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | के. बी. पाथ्रीकर | ११.११% जास्त |
| २) | डी. एस. जग्गी | १५.००% जास्त |
| ३) | पाटील कन्स्ट्रक्शन | १४.८८% जास्त |
| ४) | मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | १७.००% जास्त |
| ५) | डी. अजितसिंग | २०% जास्त |
| ६) | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | २०.१२% जास्त |

वरील प्राप्त निविदापैकी मे. के. बी. पाथ्रीकरण यांचे दर तुलनात्मदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ११.११% जास्त आहेत. सदरील कामाचे अंदाजपत्रक सन ९६-९७ च्या दरसूचीनुसार बनविण्यात आलेले आहेत. सन ९७-९८ च्या दरसूचीनुसार घेतल्यास ठेकेदाराचे दर २.६१% कमी दराचे येतात.

तरी सन ९६-९७ सा. बां. खात्याच्या दरसूचीनुसार मे. के. बी. पाथ्रीकर यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.११% जास्त दराची निविदा विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विशालनगर गारखेडा येथील ५० विकास रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.११% जास्त दराची श्री. के. बी. पाथ्रीकर यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२९/१० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, महावीर चौक ते रेल्वेस्टेशन रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ४९,३२,५००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण १० कोरी निविदापत्रके विकल्या गेली व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त ६ निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | १३.९९% जास्त |
| २) | डी. अजितसिंग | १८.५०% जास्त |
| ३) | के. बी. पाथ्रीकर | १८.२१% जास्त |
| ४) | डी. एस. जग्गी | १८% जास्त |
| ५) | मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | १७.५९% जास्त |
| ६) | पाटील कन्स्ट्रक्शन | १७.५५% जास्त |

वरील प्राप्त निविदापैकी मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांचे दर तुलनात्मदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा १३.९९% जास्त दराचे आहेत. सदरील कामाचे अंदाजपत्रक सन ९६-९७ च्या दरसूचीनुसार बनविण्यात आलेले आहे. सन ९७-९८ च्या दरसूचीनुसार घेतल्यास ठेकेदाराचे दर ०.४३% कमी दराचे येतात.

तरी सन ९६-९७ बांधकाम खाच्याच्या दरसूचीनुसार मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांची अं. प. दरापेक्षा १३.९९% जास्त दराची निविदा विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महावीर चौक ते रेल्वेस्टेशन रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प दरापेक्षा १३.९९% जास्त दराची मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३०/११ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, शांतीनिकेतन कॉलनी येथे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. २,६२,५५०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर निविदापत्रके मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण नऊ कोरी निविदापत्रके विकल्या गेली व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त चार निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | व्यंकटेश कन्स्ट्रक्शन | ११.११% जास्त |
| २) | के. बी. पाथ्रीकर | १६% जास्त |
| ३) | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | १८.८१% जास्त |
| ४) | डी. अजितसिंग | २०% जास्त |

वरील प्राप्त निविदापैकी मे. व्यंकटेश कन्स्ट्रक्शन यांचे दर तुलनात्मदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ११.११% जास्त आहेत. सदरील कामाचे अंदाजपत्रक सन ९६-९७

च्या दरसूचीनुसार बनविण्यात आलेले आहे. सन ९७-९८ च्या दरसूचीनुसार घेतल्यास ठेकेदाराचे दर २.९२% कमी दराचे येतात.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शांतीनिकेतन कॉलनी येथे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प दरापेक्षा ११.११% जास्त दराची मे. व्यंकटेश कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३१/१२ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, नागेश्वर मंदिर ते निराला बाजार रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी दि. ३०-०७-९८ च्या स्थायी समिती सभेत ठराव क्र. १४९/२३ अन्वये रक्कम रु. ७,७०,९००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र. मनपा/लेखा/नि/४६/९८ दि. १८-०८-९८ अन्वये प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकूण ०९ निविदा विक्री झालया पैकी स्विकारण्याच्या नियोजित तारखेस एकूण ०६ निविदा दर भरून प्राप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १) | मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | ११.९३% जास्त |
| २) | डी. एस. जग्गी | १५% जास्त |
| ३) | श्री. के. बी. पाथ्रीकर | १५% जास्त |
| ४) | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | १९% जास्त |
| ५) | श्री. डी. अजितसिंग | २०% जास्त |
| ६) | पाटील कन्स्ट्रक्शन | २०% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अं. प. दरापेक्षा ११.९३% जास्त दराची मे. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे. परंतु सदरील ठेकेदाराने अं. प. दरापेक्षा जास्त दर दिल्याने त्यांना दराच्या वाटाघाटीसाठी मा. आयुक्तांचे दालनात बोलावले असता त्यांनी सदरचे काम त्यांनी दिलेल्या दराच्या म्हणजे ११.९३% जास्त ऐवजी अंदाजपत्रकीय दराने काम करून देण्यासाठी संमती दिलेली आहे.

तरी वाटाघाटीअंती निश्चित केलेले दराने म्हणजेच अं. प. दराने मे. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांची निविदा मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नागेश्वर मंदिर ते निराला बाजार रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदा धाराकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम मे. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३२/१३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, मुथीयान कॉर्नर ते पीरबाजार रस्त्याचे डांबरीकरण या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ११,३९,७१०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ११ कोरी निविदापत्रके

विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त ५ निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | डी. एस. जग्गी | १०% जास्त |
| २) | के. बी. पाथ्रीकर | १५% जास्त |
| ३) | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | १८.३३% जास्त |
| ४) | व्यंकटेश कन्स्ट्रक्शन | २०% जास्त |
| ५) | डी. अजितसिंग | २०% जास्त |

वरील प्राप्त निविदापैकी मे. डी. एस. जग्गी यांचे दर तुलनात्मदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा १०% जास्त आहेत. सदरील कामाचे अंदाजपत्रक सन ९६-९७ च्या दरसूचीनुसार बनविण्यात आलेले आहेत. सन ९७-९८ च्या दरसूचीनुसार घेतल्यास ठेकेदाराचे दर ३.९४% कमी दराचे येतात.

तरी सन ९६-९७ च्या बांधकाम खात्याच्या दरसूचीनुसार मे. डी. एस. जग्गी यांची अं. प. दरापेक्षा १०% जास्त दराची निविदा विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुथीयान कॉर्नर ते पीरबाजार रस्त्याचे डांबरीकरण या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प दरापेक्षा १०% जास्त दराची मे. डी. एस. जग्गी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३३/१४ :**

कार्यकारी अभियंता (पापु व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, गारखेडा गावाजवळ स. न. ५० मधील रेखांकनामध्ये ड्रेनेज लाईन टाकणे बाबत परिसर अभियांत्रिकी विभागाचे सन ९६-९७ च्या दरसूचीनुसार र. रु. २,१८,३२५ चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च "भांडवली कामे" या आर्थिक लेखा शिर्षकातून करण्यात येईल.

तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गारखेडा गावाजवळ स. न. ५० मधील रेखांकनामध्ये ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. २,१८,३२५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३४/१५ :**

कार्यकारी अभियंता (पापु व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. श्रीनाथनगर येथे ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता अंदाजपत्रक र. रु. १,४४,४००/- चे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण च्या सन ९७-९८ च्या दरसूचीनुसार तयार करण्यात आले आहे.

सदरील काम लेखा शिर्ष भांडवली कामे ९८-९९ यातून प्रस्तावित केले आहे. मा. आयुक्तांना सदरील कामास दि. ३०-०९-९८ रोजी मंजुरी दिलेली आहे.

तरी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्रीनाथनगर येथे ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. १,४४,४००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३५/१६ :**

शिक्षणाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, शिक्षण विभागांतर्गत सन ९८-९९ "सावित्रीबाई फुले दत्तम पालक योजना" या लेखाशिर्षाखाली रु. ५.०० लाखांची तरतूद करण्यात आलेली आहे. सदर योजने अंतर्गत महानगरपालिकेतील इ. १ ली ते ७ वी तील विद्यार्थीनीसाठी पाट्या वह्या, (१०० पानी व २०० पानी) दफ्तर हे शैक्षणिक साहित्य खेरदी करण्यासाठी निविदा दि. २९-०७-९८ ला दै. लोकमत व दै. आलमगीर टाईम्समध्ये प्रकाशित करण्यात अली. आखेरच्या तारखेपर्यंत एकूण १६ निविदा प्राप्त झाल्या व दि. १८-०८-९८ रोजी मा. मुख्यलेखाधिकारी यांच्या समक्ष निविदा उघडण्यात आल्या.

शैक्षणिकदृष्ट्या उत्तम असलेल्या साहित्याची निविड उपआयुक्त (प्र.) आणि शिक्षणाधिकारी यांच्या संयुक्त अभिप्रायानुसार करण्यात आली व ती खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | साहित्याचे नांव | एजन्सी | दर. प्र. नग (रु.) |
|---|---|---|---|
| १) | १०० पानी वही (फुल साईज १९x१५ से. मी) मनपाच्या बोधचिन्हासहित) | युनायटेड स्टेशनरी | ४.१० |
| २) | १९२ पानी वह्या (फुल साईज १९x१५ से. मी) मनपाच्या बोधचिन्हासहित | व्यंकटेश बुक सेंटर | १०.१० |
| ३) | पाट्या (हार्डबोर्ड प्लस्टीक बॉर्डर) ३०x२५ सेमी | मुभा इंटरप्रायजेस | १४.४० |
| ४) | दफ्तर (कापड जीन, रंग गडद साईज ३०x४५ सेमी) मनपाच्या बोधचिन्हासहित | मुभा इंटरप्रायजेस | १४.४० |

मा. मुख्य लेखाधिकारी यांना सदरील दराचे संदर्भात संबधिताशी वाटाघाटी करून १०% किंमतीत कमी या दराने दर मंजूर करण्याचे प्रस्तावित केले व वरील एजन्सीनी संमती दर्शविली.

मा. आयुक्तांनी प्रस्तावास मान्यता दिली असून सदरील प्रस्ताव स्थायी समितीचे विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शिक्षण विभागांतर्गत सन ९८-९९ "सावित्रीबाई फुले दत्तम पालक योजना" या लेखाशिर्षांतर्गत तरतूदीतून इयत्ता १ ली ते ७ वी तील विद्यार्थीनींसाठी पाट्या वह्या, (१०० पानी व २०० पानी) दफ्तर हे शैक्षणिक साहित्य खेरदीकरिता प्राप्त झालेल्य निविदापैकी शैक्षणिकदृष्ट्या उत्तम साहित्याची निवड मा. उपआयुक्त (प्र.) व शिक्षणाधिकारी यांचे संयुक्त अभिप्रायानुसार खालील प्रमाणे साहित्य एजन्सीजच्या नांवासमोर दर्शविलेल्या किंमतीत १०% कमी करून (वाटाघाटीनुसार) खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अ. क्र. | साहित्याचे नांव | एजन्सी | दर. प्र. नग (रु.) |
|---|---|---|---|
| १) | १०० पानी वही (फुल साईज १९x१५ से. मी) | युनायटेड स्टेशनरी | ४.१० प्र.नग |

| | | | |
|---|---|---|---|
| | मनपाच्या बोधचिन्हासहित) | | |
| २) | १९२ पानी वह्या (फुल साईज १९x१५ से. मी) मनपाच्या बोधचिन्हासहित | व्यंकटेश बुक सेंटर | १०.१० प्र.नग |
| ३) | पाट्या (हार्डबोर्ड प्लस्टीक बॉर्डर) ३०x२५ सेमी | मुभा इंटरप्रायजेस | १४.४० प्र.नग |
| ४) | दफ्तर (कापड जीन, रंग गडद साईज ३०x४५ सेमी) मनपाच्या बोधचिन्हासहित | मुभा इंटरप्रायजेस | १४.४० प्र.नग |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३६/१७ :**

शिक्षणाधिकारी यांनी प्रस्ताव दिला की, मनपाच्या शाळेसाठी ड्वेल डेस्क (तीन सिटर) खरेदी करावयाचे आहेत. यासाठी (सन ९८-९९ वर्षासाठी) वर्तमानपत्रातून जाहिर निविदा मागविण्यात आल्या होत्या त्यामध्ये सर्वात कमी दर र. रु. २०४५/- प्रति नग असे होते प्राप्त कमी दराच्या निविदेमध्ये मा. आुक्तांनी वाटाघाटी करून रु. १९७५/- प्रति नग या दरास मान्यता देण्यात आली आहे. सर्वात कमी दर वर्षामेटल वर्क्स यांचे आहेत ड्वेल डेस्क सागवानाचा साईज या प्रमाणे असेल.

| | | |
|---|---|---|
| लांबी | - | ३<sup>१/२</sup> फुट |
| टॉप | - | १० इंच |
| सीट | - | १० इंच |
| बुकसेल्फ | - | ८ इंच |
| ॲगल फ्रेम | - | १<sup>१/४</sup> x४ एम.एम. |

यासाठी नऊ लाख रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. मा. आयुक्त यांनी सदर प्रकरणी प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ ठेवावा असे सूचित केले आहे. त्यानुसार वरील प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपाच्या शाळेसाठी ड्वेल डेस्क (तीन सिटर) खरेदी करणेकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदा धारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार प्रति नग रु. १९७५/- या दराने डेस्क खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३७/१८ :**

कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. इंदिरानगर (बायजीपुरा) येथे मुख्य रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणे करिता अंदाजपत्रक र. रु. ५,०३,३००/- चे सा. बां. खात्याचे दरसूची ९५-९६ नुसार तयार करण्यात आले होते. सदरील अंदाजपत्रकास मंजुरी मिळाल्यानंतर अंदाजपत्रकीय दराने मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन कं. यांच्याकडून सुरू करण्यात आले. दरम्यानच्या काळात "स्वच्छ औरंगाबाद" मोहिम अंतर्गत पूर्वीच्या पाच मीटर रुंदीऐवजी ७ ते ८ मीटर रुंदीचे डांबरीकरण करण्यात आले. त्यानुसार वाढीव खर्च रु. २,४३,५२४/- ला स्थायी समिती सभा दि. ३१-१२-९७ मध्ये ऐनवेळीच्या प्रस्ताव क्र. २७ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे. अशाप्रकारे एकूण र. रु. ७,४६,८२४/- एवढ्या सुधारित अंदाजपत्रकास यापूर्वीच मान्यता मिळालेली आहे. काम पूर्ण करत असतांना काही ठिकाणी रस्त्यावर नागरिकांना अतिक्रमण करून ओटे, न्हान्या इ. बांधकाम केलेले होते. ते काढून त्याठिकाणीही रत्यांचे डांबरीकरण करण्यात आले.

ठिकठिकाणी पाणी पुरवठा व जलनि:सारण जोडण्यामुळे रस्ता खोदला गेलेला होता. त्या ठिकाणी पॉटहोल फिलींग करून डांबरीकरणाचे काम करण्यात आले. सबब वाढीव कामामुळे रु. १,२३,५३१/- चा जास्तीचा खर्च येत आहे या वाढीव खर्चास मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे.

तरी सुधारित अंदाजपत्रक र. रु. ८,७०,३५५/- ला मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा वाढीव खर्च रु. १,२३,५३१/- ला कार्योत्तर मंजुरी मिळणेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. इंदिरानगर (बायजीपुरा) येथे मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करतांना अतिक्रमित ओटे, स्नान गृह इ. बांधकाम तोडून पॉटहोल फिलींग केल्याने डांबरीकरणाचे काम वाढल्यामुळे जास्तीचा खर्च र. रु. १,२३,५३१/- ला तसेच अंदाजपत्रक र. रु. ८,७०,३५५/- ला तसेच सदरील काम कामाचे पूर्वीचे गुत्तेदार मे. आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांचेकडून करून घेण्यात आलेल्या कामास कार्योत्तर मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३८/१९ :**

मो. जुनाबाजार येथील न. भु. क्र. ३३३१ ह्या मिळकतीमधून जुनाबाजार रस्ता व औरंगपुरा भाजीमंडई ते नेहरूभवन ह्या रस्त्यासाठी जागा बाधित होते त्याचे एकूण बाधित क्षेत्र ५८.५४ चौ. मी. एवढे आहे.

ह्या जागेच्या मोबदल्याची मागणी मिळकतधारकाने केली आहे. सदर जागेचे मुल्यांकन ह्या वर्षाचे शिघ्र सिध्द गणकाच्या आधारे खाजगी वाटाघ्झाटीने जमीनीचे मुल्यांकन करता ते र. रु. ४,२१,४८८/- निश्चित करण्यात आले आहे.

खाजगी वाटाघाटीने मिळकतधारकाने वरील मुल्यांकनास मान्यता दिली आहे. तसेच खरेदीखताचा खर्च महानगरपालिकेने ५०% व मिळकतधारकाने ५०% करायची मान्यता मिळकत धारकाने दिली आहे. तरी खरेदी खतासाठी एकूण र. रु. ४२,१००/- लागणार आहे. त्याचे निम्मी र. रु. २१,०५०/- वळती करून उर्वरित र. रु. ४,००,४३८/- मिळकतधारक (१) श्री. मो. शाकेर पि. अब्दुल अजित अ. पा. क. अब्दुल अजिम पि. अब्दुल हमी व (२) श्री. शे. वजीर शे. घासी ह्यांना देणेच्या मान्यतेस्तव तसेच खरेदीखताच्या खर्चाची रक्कम रु. ४२,१००/- शाखा अभियंता श्री. डी. डी. कालेले ह्यांना अग्रीम म्हणून देण्यात यावी. प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. एकबालोद्दिन :** प्रस्तावात दर्शविलेली मिळकत कोणत्या ठिकाणी आहेत माहिती द्यावी.

**मा. सभापती :** सदरचा प्रस्ताव तूर्त स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव :**

सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ३३९/२० :**

औरंगाबाद शहर मंजूर विकास योजनेनुसार सिटीचौक ते टिळकपथ मार्गे रंगारगल्ली ५० फुट रुंद रस्ता संपादन खाजगी वाटाघाटीने करणेसाठी मुंबई प्रा. मनपा अधिनियम १९४९ चे कलम ७७ नुसार मा. आयुक्तांनी गेल्या दोन तीन वर्षापासून तेथील नागरिकांसोबत व पदाधिकाऱ्यांबरोबर ज्या बैठका घेतल्या त्यात रंगारगल्ली मधील सर्व मिळकतधारकांना सदर रस्ता ४० फुट रुंद करावा असा आग्रह धरला त्यानुसार नियोजन समिती व सर्वसाधारण सभेची मान्यता घेऊन शासनास मंजुरीसाठी सादर केलेल्या विकास योजना सुधारितमध्ये रंगारगल्ली य भागापुरता रस्ता रुंदी ४० फुट रुंद करण्यात आली आहे.

त्यानुसार रंगारगल्ली येथील पूर्व बाजुकडील बहुतांश मिळकतींचा ताबा नुकताच घेण्यात आला आहे. खाजगी वाटाघाटीने जागा ताब्यात घेण्यासाठी बैठकीत जे निर्णय घेण्यात आले होते. त्यानुसार रंगारगल्लीमधील ज्या मिळकती बाधित होतात त्यातील दुकानांचे भाडेकरून (सन १९९० पूर्वीचे) यांना पर्यायी दुकाने औरंगपुरा येथील महानगरपालिकेच्या दुकान केंद्रात भाड्याने देण्याचे तसेच बाधित मिळकतीत रहिवाशी भाडेकरू असलेल्या व्यक्तींचे पुनवर्सन करावयाचे ठरले आहे.

तरी वर नमूद केल्याप्रमाणे ज्या रहिवाशी भाडेकरूंचे पुनवर्सन करावयाचे आहे. त्यांची नांव पुढीलप्रमाणे आहे.

१) श्री. विश्वनाथ दशरथ वायकोस
२) श्री. श्रीनिवास पाशा बोबडे
३) श्री. भानुदास आमृत गणोरे
४) श्रीमती मिराबाई परसवाणी
५) श्री. भार. एम. कोल्हापुरे

वरील भाडेकरुंना गारखेडा स. नं. ५३ मधील महानगरपालिकेच्या जागेत २०x३० ची जागा भाडेतत्वावर देण्याचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर प्रस्ताव मान्यतेनंतर महानगरपालिका प्रचलित धोरणानुसार भाडे आकारणी करून आवश्यक त्या करारनाम्या आधारे संबंधितांना जागेचा ताबा देण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहर मंजूर विकास योजनेनुसार सिटीचौक ते टिळकपथ मार्गे रंगारगल्ली ५० फुट रुंद रस्ता वाटाघाटीने संपादन करतांना ज्या मिळकती बाधित होतात. त्यातील सन १९९० पूर्वीचे रहिवाशी भाडेकरूचे पुनर्वसन करण्याचे दृष्टीने प्रस्तावातील अ.क्र. १ ते ५ चे रहिवाशी भाडेकरूंना गारखेडा स. न. ५३ मधील महानगरपालिकेच्या जागेत २०x३० ची जागा भाडेतत्वावर प्रचलित धोरणानुसार भाडे आकारणी करून देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *ऐनवेळचे विषय*

**श्री. संजय जोशी :** आजची बैठक ही तहकूब असून ऐनवेळचे प्रस्तावास सभागृहात मंजुरी देता येणार नाही. तसे नियमात येते का? विधी सल्लागार यांनी खुलासा करावा.

**उपआयुक्त (प्र.) :** तहकुब बैठकीत ऐनवेळचे प्रस्ताव घेता येत नाही असे नियमावलीत आहे.

**मा. सभापती :** ठिक आहे, ऐनवेळचे विषय पुढच्या बैठकीत घेण्यात येतील.

यानंतर "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी जाहिर केले.

स्वाक्षरीत/-
नगर सचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
मा. सभापती,
स्थायी समिती,
महानगरपालिका, औरंगाबाद.